

शून्य संपादन
(शिवगण प्रसादी महादेव विरचित 'शून्य संपादने'
या कन्नड पुस्तकाचा अनुवाद)
अनुवाद व संपादन
डॉ. जयदेवीताई लिगाडे
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# शून्य संपादन

अनुक्रमणिका

# शून्य संपादन

*( शिवगण प्रसादी महादेव विरचित “शून्य संपादन” चा अनुवाद )*

अनुवाद व संपादन

डॉ. जयदेवीताई लिगाडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती -१९८९**

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई - ४०० ०३२.

© प्रकाशकाधीन

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
५१, गंगापुरी, रास्ते वाडा,
वाई- ४१२ ८०३.
जिल्हा सातारा.

**किंमतः रुपये ८०=००.**

## अनुक्रमणिका

# निवेदन

*श्री. बसवेश्वर हे लिंगायत पंथाचे संस्थापक. त्यांचे चरित्र आणि तत्त्वज्ञान यावर शिवगण प्रसादी महादेव यांनी एक काव्यग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा डॉ. जयदेवीताई लिगाडे यांनी केलेला हा अनुवाद व संपादन.*

*डॉ. जयदेवीताई लिगाडे या स्वतःच कानडीच्या प्रतिथयश अशा कवयित्री होत्या. तेव्हा त्यांनी केलेल्या या अनुवादासंबंधी अधिक काही सांगण्याची गरज नाही. इतर सर्व ग्रंथांप्रमाणेच हा ग्रंथही वाचकांना प्रिय होईल, असे वाटते.*

*४२, यशोधन,*
*मुंबई ४०० ०२०*
*दि. ४ जुलै १९८७*

***सुरेन्द्र बारलिंगे,***
*अध्यक्ष,*
*महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ*

अनुक्रमणिका

# प्रस्तावना

भारताच्या धार्मिक इतिहासात 'शैव धर्म', 'शैव-संप्रदाय', 'शिवाराधना' ही इतिहासपूर्वकालापासून अनेक स्तरावरून स्थित्यंतरे पावत वृद्धिंगत होत आली आहे. लकुलीश, पाशुपत, काळामुख, सिद्ध, नाथ इ. पंथांच्या रूपाने ती प्रकट होत आली आहे. या निरनिराळ्या पंथांचे सिद्धांत, दर्शन इ. एकसूत्रांत न सामावता विभिन्नतेत परिवर्तित होत आली आहेत. "वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासकांना एक गोष्ट प्रकर्षाने आढळून येते, की शिव व विष्णू या देवतांपेक्षा अन्य वैदिक देवतांचा प्रभाव अधिक होता." असे प्रो. एम्. आर्. साखरे या विद्वान संशोधकांचे मत आहे. कालांतराने शिव व विष्णू यांचे स्थान व माहात्म्य वाढत जाऊन, हिंदूधर्माचे अनेक पंथ, संप्रदाय, जाती, उपजाती व पोटजाती इ. शैव व वैष्णव या दोन प्रमुख शाखांमध्येच विभागल्या गेल्याचे आढळून येते. वैष्णवांना 'विष्णू' हे 'परब्रह्मन्' तर शैवांना 'शिव' हे 'परब्रह्मन्' होते.

भारताच्या द्रविड-आर्य संस्कृतीच्या संगमांतून उगम पावलेले शैव व वैष्णव संप्रदाय हे परस्पर प्रतिष्ठेसाठी आपसांत संघर्ष करीत आले व भारताला जर्जर करून टाकले. विद्वान-बुद्धिजीवी वर्गाने आपली पौरोहित्याची परंपरा अखंड टिकवून धरण्याच्या स्वार्थाने अनेक काल्पनिक अशा पौराणिक कथा-काव्यांची निर्मिती केली. जगन्नियामक अशा एकच ईश्वराला अनेकविध नामरूपे देऊन व त्याभोवती एक एक कथा-काव्ये गुफून दैवी कल्पनेची समग्रता दुभंगली.

शैव धर्मात अनेक पंथ व उपपंथ आणि विविध विचारप्रणाली आढळून येतात. उदा., अद्वैत, शिवाद्वैत, काश्मीर-शैव, तामिळ-शैव, वीरशैव इ.- याप्रमाणे शैव तत्त्वज्ञान, काळाकाळाने प्रगतिपर आचार-विचार रूपाने वृद्धिंगत होत आले.

आदि शंकराचार्यांनी अद्वैत सिद्धांताचा सगळ्या देशभर संचार करून प्रचार केला व भारताच्या चारही दिशांच्या टोकांना पीठांची स्थापना केली हे सर्व विदितच आहे. 'ब्रह्मंसत्य-जगन्मिथ्य:', 'सच्चिदानंद रूप शिवो ऽहं शिवो ऽहं ॥' ही ब्रीदवाक्ये भारतीय तत्त्वज्ञानाच्या अंतरिक्षांत निनादत आली आहेत. शैवधर्माचा दुसरा प्रबेध म्हणजे काश्मीर शैव-सिद्धांत किंवा शिवाद्वैत-सिद्धांत हा जग मिथ्या असे मानीत नाही. आपला 'प्रत्यभिज्ञाहृदय सिद्धांत' मांडीत. शिव सत्य आहे, तेव्हा त्याने निर्माण केलेले जग कसे मिथ्य असू शकेल ? असा प्रश्न ते करतात.

भारताच्या इतिहासात बाराव्या शतकात धार्मिक क्रांती घडून आली त्याचा उगम कलचुरी राज्याची राजधानी कल्याण ( सध्याच्या कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण ) येथे झाला. त्याचे अध्वर्यू म. बसवेश्वर हे होते. ते बिज्जळसाम्राज्याचे महा प्रधान व महान् विचार-प्रवर्तक होते. त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रावर पडल्याचा दिसून येतो. जनसामान्यांनासुद्धा आकलन होईल असे सृजनशील साहित्याची त्यांनी निर्मिती केली. म. बसवेश्वर स्वतः अनुभवून व आचरून अनेक शरणांचा मेळावा जमवून नव्या मन्वंतराचा ते अग्रणी बनले. त्यांनी बोधलेला धर्म म्हणजे 'बसव धर्म', 'लिंगायत-धर्म' होय. तसेच त्याला 'वीरशैव धर्म' म्हणूनही पर्यायी नाव आहे. वीरशैव सिद्धांत. जग मिथ्या मानीत नाही, तो जग सत्यच आहे असे मानतो. "स्वर्ग व नरक हे वेगळे कोठे नाहीत. सदाचार हाच स्वर्ग, अनाचार हाच नरक. देव एकच आहे. त्याला दिलेली ब्रह्म, विष्णू, महेश ही अनेक नावे होत. तो निर्गुण, निरावरण, निराकार व साकारही आहे. तो नित्य निरंजन, निरालंब आहे."

अनुक्रमणिका

अशी वीरशैवांची धारणा आहे. शरणांचा शिव हा शब्द त्रिमूर्तीतील अभिप्रेत असलेल्या शिवया अर्थाने आलेला नाही. बसवधर्मीय शिव हा शब्द-कल्याणकर, मंगलमय, सत्य या अर्थाने उपयोगात आणतात. इंद्रलोक, स्वर्गलोक, नरक, पाताळ आदि चौदा भुवनांची कल्पना त्यांना मान्य नाही. ते लाक्षणिक अर्थाचे पद-प्रयोग असावेत असे ते समजतात. ते एक चैतन्य-विश्व-चैतन्य- आणि-सर्वशक्त सर्वतंत्र-स्वतंत्र-लिंगस्वरूप म्हणून मानतात.

बाराव्या शतकाच्या मध्यकालांत क्रांतीच्या लाटेने समग्र भारतीय जीवनाचे सर्व स्तर व अंग व्यापून टाकलेले होते. उच्च-नीच, स्त्री-पुरुष, स्वर्ग-नरक या कल्पनांना अव्हेरून, भारतात रूढ झालेल्या अनेक अंधश्रद्धांना तडा दिला गेला. कायक तत्त्वाचा त्यांनी प्रसार केला. गृहस्थ-धर्म हाच श्रेष्ठ प्रतीचा मार्ग म्हणून भक्तिपंथाने लिंग धरून आपणच लिंग-स्वरूप होण्याचे योगविज्ञान त्यांनी शोधून काढले.

भारताच्या दश-दिशांतून आलेले असंख्य शिवशरण जात-पात, आदि भेद मोडून, बसवकल्याणातील अनुभव-मंटपांत सामील झाले. आपल्या स्वानुभावाने शोधून काढलेल्या तत्त्व-सत्त्व इत्यादींचे निरुपण हृद्मय अशा गद्यांत 'वचन' या नामाभिधानाने लाखोंच्या संख्येने निर्माण केले. हे वचन वाङ्मय अनुभावगम्य होय. शरणांनी निर्मिलेल्या या वचनांची संख्या २८० कोटी आहे अशी त्यांची श्रद्धा आहे, पण ही अतिशयोक्ती असावी. नंतर घडलेल्या उत्पाताने या वचन साहित्याच्या बहुभागाचा विध्वंस झाला. केवळ अंशरूपाने उरलेले वचन साहित्य काय ते हाती पडले.

म. बसवेश्वरांच्या काळानंतर म्हणजे बाराव्या शतकाच्या अखेरीस कल्याणांतील क्रांतीमुळे शिवशरण इतस्ततः विखुरले गेले. त्यानंतर दोन शतकांनी संगमवंशयींचे विजयनगर साम्राज्य उदयास आले. विजयनगरच्या 'प्रौढदेवराय' ( १४१९ ते १४४७ ) या सम्राटाच्या कारकीर्दीत वीरशैव धर्माच्या पुनरुत्थानास प्रारंभ झाला. त्यांचे प्रधान 'जक्कण दंडेश' हे महाप्रतापशाली व महाबुद्धिमान निपजले. तसेच दुसरे प्रधान 'जक्कणाचार्य' हे कलाप्रेमी व शिल्पशास्त्रतज्ञ होते. वीरशैव साहित्याचे ( वचनसाहित्याचे ) संकलकार्य क्रोडीकरण, परामर्ष इ. करण्याच्या कार्यास याचकाळात प्रारंभ झाला. याच सुमारास निर्माण झालेली साहित्यकृती म्हणजे 'शून्य-संपादन' होय. पाच निरनिराळ्या ग्रंथकर्त्यांकडून निरनिराळ्या काळांत निरनिराळ्या रीतीने याची रचना झाली. म्हणजे १४१९ ते १५१९ पर्यंतच्या शंभर वर्षांच्या अवधीत या पाच साहित्यकृतींच्या रचना झाल्याचे दिसून येते. याचे आद्य संकलनकार म्हणजे शिवगण-प्रसादी महादेव हे होत.

शिवगण-प्रसादी महादेव हे कल्याण नगरींत प्रसाद कायक करीत कल्याण क्रांतीनंतरही कल्याणातच वास्तव्य करून त्यांनी हा ग्रंथ रचिला, असा काहींचा अभिप्राय आहे, परंतु या विधानाच्या पुष्ट्यर्थ विशेष आधार व पुरावे उपलब्ध होत नाहीत. या ग्रंथाचा संकलनकार शिवगण-प्रसादी महादेव यांचेबद्दल काहींच माहिती मिळत नाही. शिवगण-प्रसाद हा एक प्रकारचा कायक ( व्रत-आचार ) आहे. दासोहांतून प्रतिफलाची अपेक्षा न करता भक्तगणांना निरपेक्ष बुद्धीने अन्नसंतर्पण करणे व त्यांच्या संतोषातच आपला संतोष मानणे हा शिवगण-प्रसाद कायक होय.

ग्रंथाच्या शेवटी संकलनाच्या संदर्भात प्रस्तुत ग्रंथकर्ता फक्त आपल्या नावाचा तेवढाच उल्लेख करतो. "शून्य-संपादनेच्या महानुभाव गोष्टी-शिवशरण-महागण बसवदेव, चन्नबसवदेव, प्रभुदेव आदि करून प्रामुख्याने वचनानुसंगे कथानिरूपण करून शिवगण-प्रसादी महादेव याने शिवगणांचे शिवानुभव

स्तोत्र द्वारमुखाने निर्मल दर्पण समर्पिले आहे'' अशा शब्दांत ग्रंथाचा उपसंहार करतो. स्वतःचे गाव, माता, पिता किंवा आपण रचलेली इतर साहित्यकृती याबद्दलचा कसलाही निर्देश तो करीत नाही. याच ग्रंथकर्त्याचा 'शून्य-संपादन' हा प्रथम ग्रंथ होय. या ग्रंथात आणखी एका गोष्टीचे निवेदन तो करतो ( पहा पृष्ठ ३९१ ). हे 'शून्य-संपादन' शिवशरणांनी श्रवणकरावे, लालन करावे, पालन करावे व लिहून पठण करावे. या निरूपणक्रमांत उणीव भासल्यास तुमच्या परमज्ञानाने सुधारणा करून या वचनानुभवाची चर्चा करून सुख संपादन करावे ( पहा पृष्ठ ३९१ ). ग्रंथकर्त्याची प्रस्तुत विनंती मान्य करण्यासाठीच जणू काय पुढील संकलनकारांनी आणखी काही वचनांची व प्रसंगांची भर घालून हा ग्रंथ विस्तृत करीत गेले असावेत. अशा रीतीने ९५९ वचनांचा हा ग्रंथ विस्तृत होऊन १,६०० वचनांचा झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

शिवगण-प्रसादी महादेवानंतर 'केंच वीरण्ण वडेय'-काळ सुमारे इ. स. १४९५, गुम्मळपूरचे सिद्धलिंग देवरु-सुमारे इ. स. १५००, गुळूर-सिद्धवीरणार्य-इ. स. १५१०, हलिगेय देव इ. स.-१५२० याप्रमाणे पाच ग्रंथकर्ते होऊन गेले.

मराठी साहित्य व संस्कृती मंडळाने मला शिवगण-प्रसादी महादेव या ग्रंथकर्त्याच्या 'शून्य-संपादने' चे मराठीकरण करण्यास सुचविले. कारण तोच मूळ ग्रंथ होय. कन्नडमध्ये याचे संशोधन करून तो प्रसिद्ध करणारे म्हैसूर विद्यापीठाचे डॉ. एल्. बसवराज हे आधुनिक लेखक होत ( १९६९ ). नंतर कर्नाटक विश्वविद्यालयाचे विद्वान डॉ. आर्. सी. हिरेमठ यांनी हा ग्रंथ संपादून प्रसिद्ध केला ( १९७१ ). या दोन्ही प्रकाशनांत विशेष असा फरक नाही. आम्ही मराठीकरणासाठी निवडलेले आधारभूत असे हेच दोन ग्रंथ होत.

यामध्ये सुद्धा कोठे कोठे प्रक्षिप्त अशा वचनांचा समावेश झाल्याचे आढळून येते. या सगळ्यांचे मी सूक्ष्म रीतीने परिशीलन ( परीक्षण ) केले आहे. शिवशरणांच्या तत्त्वज्ञानाला व मूळ ग्रंथकर्त्याच्या हेतूला अनुसरूनच मी हा ग्रंथ मराठी वाचकांसाठी सादर करीत आहे. शब्दशः अनुवादाला अनुसरून, वचन वाङ्मयाचा हृद्मय गद्य वचनसाहित्याच्या छंद शैलीतून मराठीत आणण्याचा मी प्रयत्न केला आहे. वचने लिहिण्याची शैली, त्यांतील लालित्य व गेयता हा मराठी भाषेतील एक नावीन्यपूर्ण साहित्यप्रकार व्हावा, याच हेतूने असा मराठीत अनुवाद करण्यात आला आहे.

साहित्यप्रकारांत 'संकलन-साहित्या' ला विशिष्ट स्थान आहे. जागतिक मान्यता पावलेले ग्रंथ यजुर्वेद, सामदेव, अथर्ववेद व प्लेटोची प्रवचने ( Plato's Discourses ) हे सर्व संकलन-साहित्याचे प्रकार म्हणता येतील. निरनिराळ्या संप्रदायांत त्यातील ज्ञानी, द्रष्टे पुरुष व तपस्व्यांचा अनुभव, बोध इत्यादी संकलन होऊन ते त्या त्या संप्रदायाचे पवित्र ग्रंथ बनले आहेत. त्यातील काही संकलन-ग्रंथ 'अपौरुषेय' असल्याचे गणले गेले आहेत. परंतु शिवकरण आपल्या ग्रंथांना 'अपौरुषेय' मानीत नाहीत. एवढेच नव्हे तर काही संकलनकार संदर्भ जुळण्यासाठी स्वतःची रचना त्यात जोडतात व तसा स्पष्ट उल्लेख करून त्यांना 'संदर्भ-वचने' असे नाव देतात. मानव जन्म घेऊन विश्वमानवाचे जीवन जगून अतिमानवाच्या दिव्यत्वाच्या स्वानुभावांतून स्फुरलेला हा वाचनांचा संग्रह होय. हाच 'शून्य-संपादन' ग्रंथ. म्हणूनच प्रसिद्ध तत्त्वज्ञानी प्रो. आर्. डी. रानडे यांनी या ग्रंथाची तुलना प्लेटोच्या प्रवचनांशी ( Plato's Discourses ) केली आहे. जागतिक गूढ तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात त्याला खास स्थान आहे, असे मत त्यांनी प्रकट केले आहे ( पहा 'Mysticism in Karnataka' by Prof. R. D. Ranade ). चन्नबसवेश्वर, मुक्तायक्का, अक्कमहादेवी,

अक्क-नागम्मा, धोबी-माचय्या, डोहार -ककय्या, न्हावी-अप्पण्णा इत्यादींच्या अनुभाव दृष्टीची चर्चा या 'शून्य-संपादन' ग्रंथात आढळून येते.

प्रस्तुत ग्रंथात एकूण ९५९ वचनांचा समावेश झालेला आहे. या चर्चेत १३ शिवशरण व ३ शिवशरणी यांचा सहभाग आहे. ९५९ वचनांत केवळ प्रभुदेवांचीच ३५० वर वचने आहेत. त्याखालोखाल बसवेश्वर, चन्नबसवेश्वर इत्यादींची वचने आहेत. म्हणून या ग्रंथाला 'प्रभुदेवांचे शून्य-संपादन' असेही म्हणतात.

म. बसवेश्वरांनी कल्याणांत अनुभव-मंटपाची स्थापना केली. ती एक विचार-वेदिका एक अनुभाव-मंच होय. तेथे अनुभाव, तत्त्वज्ञान, धार्मिक, आर्थिक, सामाजिक व तत्कालीन प्रचलित विषयावर चर्चा चाले. भारताच्या विविध भागांतून विविध स्तरांतील, निरनिराळ्या जातीजमातीचे लोक येऊन अनुभव-मंटपांत सामील झाले. पांड्य, चोल, चेरा, गुर्जर, ओरिसा, काश्मीर इत्यादी भागांतून मुमुक्षु जन तेथे येऊन बसवेश्वरांनी आरंभलेल्या महान धार्मिक कार्यात सहभागी झाले. काश्मीरमधून भूपाल (मोळगी मारय्या) व त्यांची राणी महादेवम्मा, काश्मीरची राजकुमारी बोंतादेवी, गुजरातेंतून आदय्या, गांधारहून(अफगाणिस्थानातून) मरूळ शंकरदेव, आंध्रदेशातून रामय्या, कुंतलदेशातून एकांत रामय्या, विदर्भातून डौहार ककय्या चोळदेशातून मादार चन्नय्या, सोलापूरातून सिद्धरामेश्वर, शिवमोग्गेतून अक्कमहादेवी, प्रभुदेव, कर्नाटकातून नूली चंदय्या, बुरुड केतय्या, कोटणद रेमेव्वे इ. असे असंख्य शरण-शरणी कल्याणात एकत्र जमले होते. या अनुभव-मंटपाचे अध्यक्षपद म. बसवेश्वरांनी प्रभुदेवांना दिले होते. कारण प्रभुदेव त्या काळचे प्रकाण्ड पंडित व सिद्धपुरुष होते. अनुभव-मंटपांतील या शरणजनांनी विचारप्रणाली वाढविली. पारंपरिक अंधश्रद्धा झुगारून देऊन कुठल्याही नवीन विचारावर तेथे मुक्त चर्चा चाले.

'बदल'(Change) हा निसर्गाचा क्रम आहे. व्यक्ती असो, समाज असो, देश असो हे सर्व उत्क्रांतीच्या आधिन आहेत. धर्म, समाज निसर्गाला व काळाला अनुरूप व पोषक बनून मानवी जीवनाचा उत्कर्ष साधला पाहिजे. कोणताही बोध व आचरण असो तो रूढिबद्ध होता कामा नये. त्यांचा विशेष भर एका प्रमुख गोष्टीवर होता, ते म्हणजे आचरण होय. 'चाले तैसा बोले' हे त्यांचे घोषवाक्य होते. शिवशरणांनी भारतांतील विविध तत्त्वज्ञानाची सांगोपांग चर्चा केली. भारतीय जीवनांत कल्लोळ माजविणाऱ्या अंधश्रद्धा, बहुदेवता उपासना, वर्गकलह, अस्पृश्यता, स्त्रीदास्यत्व, श्रमजीवींची पिळवणूक व पौरोहित्याची-मतांधता, राजे-महाराजांची निरंकुश सत्ता, काल्पनिक लोक-विलोकांची सृष्टी, होम-हवन, लग्नकार्य यातील उधळपट्टी इ. प्रचलित रूढी-पद्धतींनी भारतीय समाजाला ग्रस्त व पीडित करून टाकले होते. भिक्षकांच्या टोळ्या, निरुद्योगी बनून राहणारे कृषिकार्मिक, देवांना बेडीस धरणारे पुरोहित, आचार्य या सर्वांची दिवसेंदिवस होणारी वाढ यामुळे संपन्न असा भारत देश दरिद्री बनणे हे एक प्रकारे अनिवार्यच होते. या सर्व अनिष्ट गोष्टींचे निर्मूलन होण्यासाठी शरणजनांनी दीर्घ विचार केला. दारिद्र्य निवारणार्थ कायक-तत्त्वाचा पुरस्कार केला (कायक- पहा पृष्ठ ४४२). कितीही लहान असो वा उच्चपदस्थ असो प्रत्येकाने दिवसांतून कांहीतरी शारीरिक कष्टाचे काम केलेच पाहिजे असा अनुभव-मंटपाचा दण्डकच होता.

बाराव्या शतकाच्या अखेरीस भारताच्या उत्तर दिशेला परकीय आक्रमण होण्याची चाहुल शरणांना लागल्याचे व त्याच्या संभाव्य परिणामांना तोंड देण्याच्या पूर्वतयारीला ते लागल्याचे त्यांच्या वचनांवरून आढळून येते. दक्षिणेकडे जरी आक्रमणाच्या तीव्रतेची झळ नसली तरी त्याच्या संभाव्य परिणामांचा प्रतिरोध करण्याची तयारी आणि जबाबदारी त्यांच्यावर होतीच. 'अहिंसो परमोधर्मः' असे म्हणत, अहिंसेच्या

अतिरेकाने दुष्ट शक्तीचा सुद्धा समर्थपणे प्रतिकार करण्याची अस्मिता समाजपुरुषांतून लोप पावत असल्याचे त्यांच्या चाणाक्ष नजरेत आले. देशांत व संस्कृतीला क्षते पडून ती दुभंगण्याचा धोका त्यांनी हेरला. देश व धर्म रक्षणार्थ समाज सक्षम व सजग होण्यासाठी गणाचार तत्त्वाचे सूत्र त्यांनी आपल्या धर्मनिष्ठेत गोवले (गणाचार-पहा पृष्ठ ४४३).

त्यांच्यासमोर उभी ठाकलेली दुसरी समस्या म्हणजे बहुदेवता-उपासनेचे दुष्परिणाम. 'बहुदेवता-उपासने' चे निर्मूलन करून त्यांनी 'एकदेवोपासना' आचरणांत आणली आणि अस्तेय व अपरिग्रह व्रतांचा पुरस्कार केला. शिक्षण सार्वत्रिक केले. संस्कृत ज्ञानभांडारातील सारसूत्रे व रहस्ये जनसामान्यांच्या भाषेत आणली. असंबद्ध कथागोष्टींचे स्पष्ट शब्दांतून खंडन केले.

"स्त्री ही शूद्र आहे तिला मोक्ष नाही, मोक्षप्राप्तीकरता पुरुष देहच धारण केला पाहिजे" अशा निराधार, स्वार्थी घोषणेचे त्यांनी विडम्बन केले. स्त्री ही राक्षसी नसून ती 'कपिलसिद्धमल्लिकार्जून' आहे (म्हणजे आपल्या इष्ट देवतेसमान आहे ), 'मातृदेवोभव' असे वेदांत सांगितले आहे. फक्त माताच नव्हे तर समस्त नारीकुलच देव आहे, असा शरणांनी उद्‌घोष केला, स्त्रियांना समान संधी प्राप्त करून दिली. या कारणाने अनुभव-मंटपांत शिवशरणींनी भाग घेऊन, अत्यंत अनुभावप्रचुर वचने लिहिली. या 'शून्य-संपादन' ग्रंथात येणाऱ्या मुक्ताई, अक्कमहादेवी, अक्कनागम्मा यांची वचने परिशीलन करण्याजोगी आहेत. अनुभव-मंटपांतील ६० शरणींनी वचने लिहिल्याचा उल्लेख आहे. परंतु आतापर्यंत फक्त २७ शरणींचीच फारच थोडी वचने उपलब्ध झाली आहेत. या शरणींविषयी अधिक माहिती 'संतिणी बसवयुगांतील' (लेखिका लल्लेश्वरी मूगी) या मराठी ग्रंथात पहावी. अनुभव-मंटपाने समाजाला व राष्ट्राला अपार असं देणं दिलं आहे.

उच्च-नीच या जातिभेदाच्या रूढी व कल्पना दूर करण्याकरिता चांभार जातीच्या हरळय्याचा मुलगा 'शीलवंत' व ब्राह्मण जातीचा मंत्री मधुवरस याची कन्या 'कलावती' यांचा विवाह अनुभव-मंटपांत साजरा केला गेला. या कारणाने तत्कालीन राजा बिज्ज्ळ व त्यांचा पुरोहितवर्ग यांनी वर्णसंकर होत आहे म्हणून गदारोळ उठविला. या कारणाने प्रधानमंत्री असलेल्या म. बसवेश्वरांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हरळय्या व मधुवरस यांना मृत्यूदंडाची शिक्षा होऊन त्यांना हत्तीच्या पायी देऊन ठार करण्यात आले. म. बसवेश्वर यानंतर एकही क्षण न थांबता कल्याण सोडून निघून गेले. कल्याणांत हलकल्लोळ माजला. अनुभव-मंटपांतील शरणजन देशांत इतस्ततः विखुरले गेले. सध्याच्या 'बसवकल्याणां'त नष्ट झालेल्या अनुभव-मंटपाचे अवशेष अद्यापही पहावयास मिळतात.

प्रभुदेवांनी आपला अंतकाळ समीप आल्याचे ओळखून, आंध्र प्रदेशातील 'श्रीशैल' क्षेत्राकडे प्रयाण केले व तेथे कर्दळी-बनांत ऐक्य पावले.

या 'शून्य-संपादन' ग्रंथात प्रभुदेव व बसवेश्वर यांचे व्यक्तिमत्त्व समसमान (एकरूप) असल्याचे चित्रीत झाले आहे. वीरशैव धर्मातील गुरु-लिंग-जंगमाचे स्थान आणि अष्टावर्ण, पंचाचार, षट्स्थल, इष्टलिंग, भावलिंग, प्राणलिंग व 'कायक' तत्त्वाचे प्रतिपादन 'शून्य-संपादन' ग्रंथात आढळते. शिवयोग साधनेचा क्रम व त्याचे अंतिम ध्येय म्हणजे शून्य-निःशून्य प्राप्ती कन्नड भाषेत याला 'बयलु' , 'निर्बयलु' अशा पारिभाषिक संज्ञा आहेत.

अनुक्रमणिका

अंगच लिंग होऊन त्या परवस्तुच्या घनांत समरस होऊन आपणच आपण होऊन शून्य-निशून्यांत (बयलु) पावणे शिवयोगाची चरम आणि परम सिद्धी आहे. त्या साधनेच्या विविध स्तरांचा निष्कर्ष या 'शून्य-संपादन' ग्रंथात झाला आहे. या दृष्टीने हा ग्रंथ षट्स्थल-ज्ञान-सारामृताचा मार्गदर्शक असा आहे. कन्नड साहित्यात हा एक महान ग्रंथ म्हणून गौरविला गेला आहे. एवढेच काय, आधुनिक पाश्चिमात्य तत्त्वज्ञान्यांनी सुद्धा 'शून्य-संपादन' हा ग्रंथ जागतिक स्तरावरील महान कृती असल्याचे कबूल केले आहे (कर्नाटक विश्वविद्यालयाकडून प्रकाशित झालेले सहा खंड पहावेत).

शरणांच्या परिभाषेत 'बयलु', 'निर्बैयलु' या संज्ञांचे तत्सम शब्द म्हणजे 'शून्यं', 'निःशून्य' आणि 'निर्वाण' इ. आहेत. निःशून्य हा शब्द एकप्रकारे नकारात्मक अर्थ दर्शवितो. आदि शंकराचार्यांच्या 'अद्वैत सिद्धांता' त व बौद्धांच्या तत्त्वज्ञानांत या शून्य शब्दाचा प्रयोग दिसून येतो. शून्यत्वाची प्राप्तीही अंतिम स्थिती आहे. 'शून्य' याच्या समानार्थी बौद्धांचा 'निर्वाण' हा शब्द 'भगवद्गीते' त वापरलेला आढळतो. 'लभन्ते ब्रह्मनिर्वाणः। अभितो ब्रह्मनिर्वाणः । वर्तते विधितात्मनाम् ॥' इत्यादी. तथापि शरणांनी 'शून्य' शब्दाला विशेष अर्थ प्राप्त करवून दिला आहे. बौद्ध धर्मात ही शेवटची स्थिती असूनही, ती अशाश्वत मानली जाते. अद्वैत वेदान्तानुसार व शरणांच्या धर्मात ही स्थिती शाश्वत, नित्य, सत्य मानली जाते. परंतु अद्वैत सिद्धांत बौद्धांच्या मायावादाचा स्वीकार करतो, पण वीरशैव या मायावादाचा स्वीकार करीत नाहीत.

दुसऱ्या शतकातील तत्त्ववेत्ता नागार्जुन हा 'माध्यमिक कारिका शून्यता' हे एक तत्त्वच आहे असे म्हणतो. शून्यत्व हे आपले आपणच जाणावयाचे आहे. त्याचे वर्णन तो याप्रमाणे करतो. 'अनिरोधं, अनुत्पादं, अनुच्छेदं, आशाश्वतं, अनागमं, अनिर्गमं' तसेच 'प्रतित्यासमुत्पाद' इत्यादी. यालाच दुसरे नाव म्हणजे बुद्धांचे निर्वाण. उपनिषदांत बोधिलेल्या ब्रह्न् प्रमाणे, पण बौद्धांच्या दृष्टिकोनांतून विश्व हे काल्पनिक आहे. संसार हा मायामय आहे. 'मायोपमा' अथवा 'प्रतिबिम्बोपमा' म्हणजे आरशांत दिसणाऱ्या प्रतिबिंबाप्रमाणे-कार्यकारणाच्या आधीन-गंधर्व नगरीप्रमाणे-वा 'वांझपुत्रासम' त्याला अस्तित्व नाही. या कारणाने ते शून्य आहे. विश्वाची निर्मिती व अस्तित्वच ते मानत नाहीत. कारण विश्व हे सत्य व शाश्वत नाही, अशी त्यांची धारणा आहे. तथापि बसवधर्मानुसार संसार हे सत्य व सुसंबद्ध आहे. प्रारंभात शिव, कल्याण, मंगळ अशा सर्व शून्य स्थितीत-सर्वशून्य निरालम्ब, निरंजन, ब्रह्मस्थितीत असून ही स्थिती निरंजन ॐकार शक्तीतून उत्पन्न झाल्याचे मानतात. म्हणून याला 'निष्कल-ब्रह्म', 'शून्य ब्रह्म' असेही मानतात. शिव शब्द त्रिमूर्तीच्या देवतेपैकी एक असे नाही, हे पुन्हा वाचकांना स्मरण करून देण्यात येत आहे.

वीरशैव धर्माच्या शून्य तत्त्वाचे शून्यता असे सांगता येईल :'एकं, नित्यं, शाश्वतं । द्वंदातीतं त्रिगुणरहितं । सर्वदासाक्षीभूतं ॥ इत्यादी. उपनिषदामध्ये येणारा 'पूर्ण' हा शब्द सम-सम होणे शक्य आहे. तसेच परब्रह्म, परमात्मन् असे सम-सम होतात. आत्मा परमात्म्यात समरस होणे-अंग-लिंग होण्याची ही रीत.

बौद्धांच्या 'शून्या' ला व शरणांच्या 'शून्या' ला महदंतर आहे. शरणांची 'निर्बयलु' कल्पना हे शाश्वत तत्त्व आहे. हा केवळ निषेधात्मक शब्द नाही. आत्मा परमात्म्यात ऐक्य पावणे हेच 'निर्बयलु'. हेच शाश्वत सत्य, हाच मूलब्रह्म. अशा या विचारांचे शास्त्रीय विवेचन या 'शून्य-संपादन' ग्रंथात करण्यात आले आहे. हा विषय या ग्रंथाच्या प्रथमोपदेशात सविस्तर रीतीने वर्णिलेला आहे.

अनुक्रमणिका

हा ग्रंथ कर्नाटक विश्वविद्यालयाकडून ६ खंडांत प्रकाशित झाला आहे (इंग्रजी भाषेत). संपादक समितीवर तीन विद्वान मंडळींचा समावेश होता व त्यांच्या हाताखाली इतर कर्मचारी मदतीस-टंक-लेखक इ. अनकूल साधने त्यांना उपलब्ध होती. पण मी हा ग्रंथ एकाच खंडात मराठी वाचकांना समर्पित करीत आहे. म्हणून माझ्या इतिमितीची (क्षमतेची) कल्पना आहे. सर्व गोष्टी सविस्तररीत्या सांगण्यास मला अवसर नाही आणि वार्धक्यामुळे शारीरिक क्षमताही नाही. या ग्रंथाच्या संदर्भात शरणांच्याबद्दल विविध रीतीने व सविस्तररूपाने लिहिण्याचा अगम्य उत्साह आहे. जास्त वेळ आता लेखणी हाती धरवत नाही, ते बळ आता संपले.

हा सर्व मी शिवप्रसाद मानते. त्याची इच्छा माझी इच्छा मानते. माझ्या मते मूळ कन्नड वचने देवनागरी लिपीत (मराठीत) देऊन त्यांच्या खाली अनुवाद दिला असता तर बरे झाले असते. पुढील आवृत्तीत ही इच्छापूर्ती होईल अशी आशा बाळगते.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हाती घेतलेली ही योजना अत्यंत स्मरणीय आणि अनुकरणीय आहे. माझ्यावर हे कार्य सोपविणारे बंधूमाजी अध्यक्ष **तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी** व सांप्रतचे अध्यक्ष **श्री. सुरेंद्र बारलिंगे** यांची मी ऋणी आहे. या ग्रंथाचे मराठीकरण मीच करावे असा आवर्जून आग्रह कविवर्य **प्रो. द. रा. बेंद्रे** यांनी मला केला. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळालाही त्यांनीच माझे नाव सुचविल्याचे मला नंतर कळाले. या संदर्भात दिवंगत श्री. बेंद्रे यांचे स्मरण होत आहे. विशेष आस्थेने व सहनतेने मुद्रण कार्य चालू ठेवलेल्या वाईच्या शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक **श्री. वि. का. विसपुते** व **श्री. अ. कृ. राव** आणि **त्यांचा कर्मचारी वर्ग**-यांना मी शुभ चिंतिते. तसेच या पुस्तकाच्या मुखपृष्ठ सजावटीबद्दल **श्री. जी. के. अनंतराम**, व्यवस्थापक, इंडिया बुक हाऊस, बंगलोर यांचे मला आभार मानलेच पाहिजेत.

या ग्रंथाच्या छपाईचे काम चालू असताना मुद्रणालयाकडून येत असलेल्या प्रुफांची तपासणी करून मी पाठवीत असते. मधे मधे माझे प्रकृती स्वास्थ्य बिघडत असते. हे काम पूर्ण करणे कठीण बनत आहे. पण कामाची पूर्ती होण्याच्या दृष्टीने, अनेक टिप्पणी मी तयार करून ठेवल्या आहेत.

माझ्या साहित्यकार्यात माझी सावली बनून माझी मुलगी **श्रीमती लल्लेश्वरी मूगी** ही सदैव सहकार्य करते. बसवकल्याणात मी स्थापिलेल्या भक्तीभवनाची ध्येयादर्शाची ती वारस आहे. तिचेकडून ही कार्यपूर्ती होईल अशी आशा बाळगते. तसेच माझ्या सर्व कार्यात सहकार्य करीत आलेल्या **डॉ. शंकरराव मूगी** ( माझे जावई ) ॲडव्होकेट, सुप्रीम कोर्ट व माझा मुलगा **डॉ. बसवराज लिगाडे** व हस्तप्रती तयार केलेल्या **सौ. प्रमिला अंडगे व श्री. आर्. एस्.सेटे** या सर्वांना शुभ चिंतिते.

**जयदेवीताई**

‘भक्ती भवन’,
अनुभव-मंटप हिल्स,
बसवकल्याण ५८५ ३२७.

**अनुक्रमणिका**

# शून्य संपादन
## कथासारांश

या ग्रंथात २२ प्रकरणे आहेत. त्यांचा ठळकपणे सारांश खाली देण्यात येत आहे.

( १ )

ग्रंथकर्ता श्री. शिवगण-प्रसादी महादेव हे या संकलनाचा उद्देश विवरण करतात. अल्लमप्रभू यांनी बोधिलेल्या वीरशैवधर्माचे गूढतत्त्वज्ञान व शिवयोगाचा क्रम शब्दांकन करण्यात आला आहे. महायोगी अनिमिषदेवांच्या दर्शनलाभाने प्राप्त झालेल्या लिंगदीक्षासंस्काराचा अनुभव विवरण ग्रंथकर्ते करतात.

( २ )

मुक्ताई नावाची महाशिवशरणी अजगण्णा नावाचा आपला भाऊ लिंगैक्य पावल्याने झालेल्या वियोगाने परितप्त होऊन अश्रू ढाळत असते. प्रभुदेव तिला जन्म व मरण याचे मर्म समजाऊन देऊन, तिला ज्ञानबोध करतात.

( ३ )

योगीकुल चक्रवर्ती सोन्नलगीचे (सोलापूरचे) श्री. सिद्धरामेश्वर हे देवळे, विहिरी, तलावं बांधून, ६८ लिंगांची स्थापना करीत, कर्मयोगात रत असतात. प्रभुदेव त्यांना संदर्शन ( बोध ) करून, कर्ममार्गापासून परावृत्त करून ज्ञानमार्गाकडे वळवितात. "आपणास आपण जाणले पाहिजे व ते इष्टलिंगाकडून साध्य आहे", असा बोध करून त्यांना म. बसवेश्वरांच्या दर्शनार्थ कल्याणास घेऊन येतात. (पुढील चारही संकलनकारांच्या रचनेत त्यांना चन्नबसवेश्वरांकडून लिंगदीक्षा झाल्याचा प्रसंग विवरिला आहे.)

( ४ )

श्री. बसवेश्वरांनी आपले प्राणलिंग अनिमिषयोगींना देऊन गेलेला व ते परत प्राप्त करून घेण्याकरिता-७७० अमरगणासहित . . . मर्त्यलोकाला आलेला . . . आणि इंगळेश्वर बागेवाडी (सध्या बसवन-बागेवाडी जि. विजापूर) येथे मादरस आणि मादलांबिके यांच्या पोटी बसवेश्वरांचा जन्म-आणि आपली बहीण अक्कनागम्माबरोबर-कल्याणला त्यांचे आगमन आणि बसवेश्वरांनी कोणालाही उपदेश व दीक्षा न देण्याचा व्यक्तविलेला निर्धार-तथापि अक्क-नागम्मांचा मुलगा चन्नबसवेश्वर यांना केवल बसवेश्वरांच्या हस्तस्पर्शाने प्राप्त झालेला लिंगसंस्कार-इत्यादी घटनांचा समावेश आहे.

अनुक्रमणिका

तात्पर्य, अनिमिषदेवांना लिंग देणारे बसवेश्वर व अनिमिषदेवांचे शिष्य प्रभुदेव-म्हणून बसवेश्वर हे प्रभुदेवांचे गुरुंचे गुरू ठरतात-आणि चन्नबसवण्णांनाही बसवेश्वरच गुरू ठरतात-हे दाखवून देण्याचा संकलनकाराचा हेतू दिसतो.

( ५ )

प्रभुदेव सिद्धरामेश्वरांबरोबर कल्याणास येतात. कल्याणनगरीच्या प्रवेशद्वारात ठेवलेले शिला-शासन(शिलालेख) वाचून दाखवून कल्याणचा महिमा वर्णितात.

( ६ )

प्रभुदेव व सिद्धरामेश्वर बसवण्णांच्या महागृहासमोर येऊन उभे ठाकतात. तेथे जमलेल्या शरणसमूहांना पाहून बसवण्णांच्या दासोहाची घनता ( माहात्म्य ) वाखाणतात आणि ही नगरी ‘अविमुक्त क्षेत्र’ आहे व

‘आदिलिंगाला मेदिनीला आणिला बसवअण्णा ।
मर्त्यलोकांत बांधविला महामने ( महागृह ) जाण ।’

असे म्हणत भक्ति-विवश होतात.

( ७ )

अल्लमप्रभू व सिद्धरामेश्वर बसवण्णांच्या घरासमोर येऊन उभारल्यावेळी-बसवेश्वर आत लिंगार्चनेत मग्न होते-ते दोघे महापुरुष आल्याचा निरोप मिळाल्यावर-त्यांना आत बोलावून बसवा असे ते आपले आप्त कार्यदर्शी न्हावी अप्पण्णा यांना सूचना देतात, पण ते दोघे आत जाण्यास नकार देतात. कारण आलेला कोण, उभारलेला कोण, हे त्यांच्या डोळ्यांना न दिसले तरी अंतर्मनाला त्याची जाण नाही काय ? हा बसवेश्वराचा सदाचार नसून अहंकाराचे प्रतिक असल्याचे मत ते दोघे प्रकट करतात. त्यांनी स्वतः येऊन स्वागत करावे अशी अपेक्षा करतात.

पण बसवेश्वर दुसरा निरोप पाठवून देतात की, भक्तांचे घर हेच आपले घर असताना ‘आपल्या घरात आपणच येण्यासाठी स्वागताचे अवडम्बर कशाला ?’ फारच स्वारस्यपूर्ण चर्चा येथे चालते.

( ८ )

प्रभुदेव बसवेश्वरांचे महाद्वारातून प्रवेश करीत असतांना एक महदाश्चर्य पाहिल्याचे उद्‍गार काढतात. त्याला बसवेश्वर ‘आपल्यापेक्षा महातिशय दुसरे काय आहे ?’ असा प्रतिप्रश्न करतात. तेथे महागृहाच्या दासोहांत १२ वर्षेपर्यंत आपले स्वरूप लपवून वास करीत असलेला शिवगण-प्रसादी मरुळ-शंकरदेव नावाच्या महामहिमान साधकास प्रभुदेव ओळखून काढतात.

अनुक्रमणिका

आपले महागृहांतील दासोहांत बारा वर्षे सेवा करीत आलेल्या महाशिवशरणाला आपण ओळखले नाही-याचा म. बसवेश्वरांना पश्चात्ताप होतो.

आपली गुप्त भक्ती प्रकट झाली म्हणून मरुळ-शंकरदेव निर्बैल पावतात. मरुळ-शंकरदेव हे गांधार ( आजचे अफगाणिस्तान ) देशांतून आलेले महाशिवशरण होय.

( ९ )

मरुळ-शंकरदेव हे तात्काळ निर्बैल समाधि पावल्याचे पाहून तेथील सकल शरणगण स्तुती करून प्रभुदेवांची पूज करतात.

( १० )

त्या प्रसंगी प्रभूदेव म्हणतात की, बसवेश्वर हे चुतुर्युगांत क्रमाने स्कंध, नीललोहित, वृषभ आणि अनिमिष यांचे अवतारपुरुष होय. गुरु-लिंग-जंगम-प्रसाद त्यांना बसण्णाकडूनच स्वायत्त ( मिळाला ) झाला, असे प्रभुदेव म्हणतात. पण बसवेश्वर हे मानीत नाहीत. 'शक्तीला शिव असल्यापरी। भक्त असलेला मला। जंगम, तूच आधार ॥', असे बसवेश्वरांचे मत असते.

बसवेश्वर पुढे प्रतिपादन करतात की, बिज्ञळ सम्राटांच्या वतीने पतकरलेल्या शैव-धर्माच्या प्रतिपादनात व प्रसारात प्रभुदेव हेच प्रमुख सूत्रधार आहेत.

( ११ )

प्रभुदेवांचे गुरू अनिमिष-अनिमिषाला लिंग देणारे बसवण्णा- अर्थात प्रभुदेव बसवसंप्रदायाचे शिष्य- बसवण्णांच्या अनुग्रहानेच चन्नसंगमनाथ नावाचे लिंग चन्नबसवेश्वरांनी परिग्रह केले-चन्नबसवेश्वर बसव संप्रदायाचे शिष्य-हे दोघे एकाच गुरुपरंपरेतले आहेत. परंतु गुरू-शिष्यामध्ये भेद उरला नाही. 'गुरुही शिष्य होतात व शिष्यही गुरू होतात. तेव्हा गुरू-शिष्यांत भेद नाही' असे श्री. बसवण्णा म्हणतात. हे परंपरेचे बंधन आणि संप्रदायबद्ध आचार-विचार-सरणी नको, अशी त्यांची धारणा असते. आलेल्या केवळ-लिंगामुळेच ज्ञान मिळते-कैवल्य लाभते, हे कल्पित आहे. आपणच आपणास जाणावयाचे आहे. लिंग हे नैमित्तिक आहे-असा प्रभुदेवांचा बोध आहे.

( १२ )

चन्नबसवण्णा हे नित्यप्रसादी आहेत व त्या प्रसादाचा मार्ग सर्वांना प्रकट केला, असे प्रभुदेव स्तुती करतात. पण चन्नबसवेश्वर हे मानीत नाहीत. ते ज्ञान आणि प्रसादित्व क्रमाने मडिवाळ माचिदेव व बसवेश्वरांकडून प्राप्त झाले, असे विनवितात. पण मडिवाळ माचिदेव हे कबूल करीत नाहीत. याचा निष्कर्ष या बाराव्या उपदेशांत आहे.

अनुक्रमणिका

( १३ )

प्रभुदेव, चन्नबसवदेव आणि धोबी माचय्या यांच्यातील महानुभाव गोष्टी चालूच राहतात. 'अंगांवर लिंग नसल्यावर, । प्राणांत लिंग परिणाम होणार कसा ?'असा प्रश्न करतात. मडिवाळांची अवस्था सिद्धरामेश्वरांना कशी अवगत झाली ? त्यावर सिद्धरामेश्वर म्हणतात, 'माझी कायाच बसवण्णा । माझा प्राणच प्रभुदेव । माझ्यांत आंतबाहेर असे कांहीं नसे ।' 'आकाशांत चढून बसणाऱ्याला शिडीची काय गरज आहे ?' असे प्रभुदेव म्हणतात.

अंगास लिंग पाहिजे ।<br>लिंगास लिंगाची काय गरज ?॥

याप्रकारे चर्चा चालते.

( १४ )

महावैराग्यनिधी अक्कमहादेवी या कल्याणच्या अनुभव-मंटपात येतात. त्यांच्यात व प्रभुदेवांत प्रदीर्घ व मार्मिक अशी चर्चा चालते. त्यांचे वैराग्य, ज्ञान इ. पाहून त्यांच्या श्रीपादाला 'नमो-नमो' म्हणून नमस्कार करतात. त्या पुढे श्रीशैलांत कर्दळी-वनांतच लिंगैक्य पावतात.

( १५ )

लोककल्याणार्थ श्री.प्रभुदेव हे कल्याण सोडून देशपर्यटनाला निघतात. 'काया-समाधिपेक्षा ज्ञान-समाधि ही श्रेष्ठ आहे' असा सिद्धरामांना उपदेश करून त्यांना सोलापूरास पुन्हा परत पाठवितात.

( १६ )

प्रभुदेव कल्याणातून निघून नाना देश, कोष व गिरी-गव्हरांतून पर्यटन करीत, सद्‌भक्ति, सदाचार बोध व सद्‌गोष्टींचे सत्र चालवितात. पूर्वेकडे रामेश्वर, पश्चिमेकडे महाबळेश्वर, उत्तराभिमुख सौराष्ट्र सोमनाथ-हिमालयाच्या केदार-इत्यादी सपादलक्ष पर्वतांत हिंडून, शेवटी,

इहलोक-परलोक आपुले ठायीं ।<br>गगन-मेरु-मंदिर आपुले ठायीं ।<br>अंतर-महदंतर हे सारे आपुले ठायीं॥

म्हणून शिवयोग समाधीत काही काळ मग्न होतात.

अनुक्रमणिका

( १७ )

परमशिवयोगांत निरवयव झाल्यासमयी प्रभुदेव आपल्या इहलोकीच्या लीलेचा अवसानकाल समीप आल्याचे जाणून आपल्या वचनाप्रमाणे कल्याणकडे धाव घेतात. कल्याणात श्री. बसवेश्वर शून्य-सिंहासन-पीठ स्थापून, प्रभुदेवांच्या आगमनाची वाट पाहत असतात. प्रभुदेवांना श्री. बसवेश्वर शून्य-सिंहासनाचे पट्टाधिकारी नेमतात. प्रभुदेव हे वीरशैवसिद्धांताचे महादार्शनिक पुरुष असल्याचेच ही घटना दर्शविते. या ग्रंथाची कथावस्तु म्हणजे अनुभव-मंटपांतील चाललेल्या चर्चेचा ठळक गोषवाराच होय.

( १८ )

बसवेश्वरांनी प्रभुदेवांना दिलेल्या या बहुमानामुळे अनुभव-मंटपातील १ लक्ष ९६ हजार जंगम नाराज होतात. स्थानिक व्यक्तीला डावलून परदेशस्थ एका व्यक्तीला आणून त्याला पट्टाधिकार दिल्याची त्यांना खंत ( व्यथा) होती. ‘अधिकाराकरिता जिगुप्सा बाळगणारे जंगम तुम्ही कसले ? आपल्या तपोबलाने, ज्ञानबलाने तुम्ही महामहीम होऊ शकता. गुणाला व योग्यतेला मत्सर कशाला ?’ अशी बसवेश्वर पृच्छा करितात.

( १९ )

प्रभुदेव आपले विराट स्वरूप दाखविण्याकरिता १ लक्ष ९६ हजार जंगमांसाठी तयार केलेला स्वयंपाक मला वाढून दाखवा, असे आव्हान करतात व सगळ्या स्वयंपाकाचे ( अन्नाचे ) सेवन करून दाखवितात. ‘जगविस्तार , नभोविस्तार, विस्तारातीत-विस्तार अशा घनशक्तीला लौकिक पदार्थांनी तृप्ती होईल काय ?’ असे विचारतात.

( २० )

पण बसवण्णा १ लक्ष ९६ हजार जंगम विमुख होऊन गेल्याच्या विवंचनेत पडतात. अयोग्य वर्तन करणाऱ्या जंगमांना आपण भिण्याचे कारण नाही. सत्याची कास धरणाऱ्यांना कोण रागाऊन, काय करणार ? तरीही बसवण्णांचे समाधान झाले नाही. तेव्हा प्रभूदेव वेगवेगळ्या शरणांना बोलावून त्यांच्या संशयाचे निराकरण करून, बसवेश्वरांना साहाय्य करण्याचे आवाहन तेथील जनतेला करतात.

( २१ )

सकल शरणसमूहाला उद्देशून प्रभुदेव सांगतात की, माझे जीवनकार्य संपत आले असून माझा अंतकाळ अगदी समीप आला आहे. यावर सकलजनसमूह त्यांचा जयजयकार करून त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करतो. त्यावेळी प्रभुदेव म्हणतात,

‘निर्विकल्प अशा निजाठायी । निरहंकार भावांत करीत असे मी वास ॥
पाहिले म्हणावे तर, पाहण्याचे नसे कांही । ऐकले म्हणावे तर, ऐकण्याचे नसे कांही ॥
घन- निरंजन-प्रकाश सामावल्याचे । कसे काय सांगता येईल हो । - मज गुहेश्वरा ॥

अनुक्रमणिका

प्रभुदेव असंख्य शिष्यांना आपापल्या स्थानी परत जाऊन, तेथे आपली शिवयोग साधना चालू ठेवून-ही महान् क्रांतीची ज्योत तेवत ठेवण्याचा आदेश देतात. आणि श्रीशैलक्षेत्राच्या कर्दळी-वनाकडे जाण्याची इच्छा प्रकट करतात व त्याप्रमाणे निघून जातात. वाटेत त्यांची गोरखनाथ या सिद्ध-पुरुषाची गाठ पडते. त्यांना सिद्ध-पंथापासून विमुख करून लिंगदीक्षा देतात. प्रभुदेवांनी परवशतेने निराळांत निराळ झाला, हे एका वचनांत सांगतात ( पहा वचन क्र. ९२५ )

बहुतेक सगळे शरणगण लिंगैक्य पावतात व म. बसवेश्वरही निर्बयलू पावलेली रीत, - मडिवाळ माचिदेवांनी आपल्या एका वचनात फार सुंदर रीतीने सांगितले आहे.

नेसलेले वस्त्र काढून टाकून गेलात हो तुम्ही, बसवण्णा ।
पादुका फेकून गेलात की हो, बसवण्णा ।
मोकळे केस सोडून गेलात की हो, बसवण्णा ।
सीमेचे नाते सोडून गेलात की हो, बसवण्णा ।
लिंगात केलेल्या त्या क्रियेस, न स्पर्शता गेलात की हो, बसवण्णा ।
जंगमास केलेली क्रिया गेली तुमच्यासंगे, बसवण्णा ।
प्रकाश नेसून, निःशून्य होऊन गेलात की, बसवण्णा ।
त्या बसवण्णाच्या पाठोपाठ जाण्याचा मार्ग मज दावा हो कलिदेवाच्या देवा ॥

**मंगलं अस्तु ।**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ........ ५

प्रस्तावना ........ ६

शून्य संपादन ........ १३

१ ........ २१

२ ........ ४४

३ ........ ५७

४ ........ ९४

५ ........ १०७

६ ........ ११२

७ ........ ११६

८ ........ १४४

९ ........ १५१

१० ........ १५६

११ ........ १६९

१२ ........ १९४

१३ ........ २१०

१४ ........ २१९

१५ ........ २२९

१६ ........ २३२

१७ ........ २३६

१८ ........ २५१

१९ ........ २६३

२० ........ २७७

२१ ........ ३०४

२२ ........ ३२३

पारिभाषिक शब्द ........ ३३७

अकारादी कोश ....................................................................................................३४३
वचन-मुद्रिका ......................................................................................................३७०
अनुभाव-कायक-गणाचार ......................................................................................३७१
व्यक्ति नाम व स्थळ नाम........................................................................................३७३
वचनामध्ये संख्यात येणारे शब्द ...........................................................................३७९
शरण-शरणीवर काही टिप्पणी................................................................................ ३८६

अनुक्रमणिका

श्रीमत् परमतत्व, परमानंद, परंज्योति, परमेश्वर, अगम्य, अगोचर, अप्रमेय, अनामय, अनुपम, अप्रतर्क्य, महाज्ञान, प्रभामय, यम-नियमासन-प्राणायाम-प्रत्याहार-ध्यान-धारण-समाध्यष्टांग योग-योगीश्वर, देहेंद्रियमनः प्राणाहंकारादि गुणधर्म कर्म विलेपन, सकल भुवन भुवनांतरंग, नित्य निर्मल स्वरूप, शिवशरणगण, हृत्कमल कर्णिकावास मत्तमधुकरायमान, इष्टलिंग, प्राणलिंगतृप्ति, लिंगालिंगीतांगलेप, गुरु, लिंग, जंगम, प्रसाद, पादोदकादि, पंचाचार प्रतिष्ठापनाचार्य, भक्तमाहेश्वर-प्रसादी प्राणलिंगी, शरणैक्यादि -षड्स्थल चक्रवर्ती, बसव, चन्नबसवराज, प्राणनायक, श्रीवीर-शिवाचार शिरोरत्न, श्रीवीरशिवाचारप्रमथनायक, श्री वीरशिवाचार-शिक्षाचार्य मर्त्यलोक-पावनकारणावतार, अनिमिष श्रीचरणां-भोजातकर्णिकावास, गुहेश्वर, नामामृत, स्वीकार संतुष्ट, श्रीमत्सकलजगताचार्य अल्लमप्रभुदेव, बसवेश्वर,चन्नबसवेश्वर हे प्रामुख्याने असंख्यात महागणासंगे महान्-अनुभावप्रसंगी भाग घेत असत. शून्य-संपादनाच्या सद्गोष्टि कथा निरूपणाच्यावेळी मुक्तक अशा शिवाद्वैत वचनांचें उत्तर-प्रत्युत्तर संबंधित संकलन करून शिवगणप्रसादि महादेव यांनी मर्त्यलोकीच्या महागणांना हा महाप्रसंग समर्पण केल्याचे मर्म असे आहे.

प्रथमतः प्रभुदेवांचे पूर्व-कथन

नित्य निरंजन परंज्योतिस्वरूपी परमेश्ववराच्या श्रीकैलास मंदिराच्या सभामंडपामध्ये शोभत असलेल्या अनंत रुद्रगणांत अत्यंत श्रेष्ठ असा निर्माय नावाचा एक महागणेश्वर होता. तो शिवाच्यापेक्षा अधिक होऊन विराजमान झाला होता. त्या गणेश्वराची प्रतापशक्ति परमेश्वराच्या तोंडून श्री पार्वतीदेवीने ऐकले. ती परमेश्वरास म्हणते, "हे देवा! या गणेश्वराची निर्माय हे बिरुद नष्ट करून त्यास मायासक्तकरून दाखविते." असे जगन्माता हैमवती शिवास सांगून पतीची आज्ञा संपादिते.

एके दिवशी पार्वतीदेवीने आपल्या सभामंडपातील रुद्रकन्यिकेतल्या एका अतिशय लावण्यवती स्त्रीस बोलविले. तिचे नाव 'कामलता' ठेविले. त्या स्त्रीस आपल्याहून जास्त रूप लावण्याची करुणा केली. तिला सांगितले, "तू निर्माय गणेश्वर येतो त्या वाटेत उभी रहा. तुझे विलास तू अनेक रीतीने प्रदर्शित करून, त्याच्या डोळ्यास-मनास कामजाल टाकून, तुझ्या माधुर्याने त्याच्या मनाचे चिंतन तुझ्या मीलनास संमत होईल असे कर." प्रभुदेवास मायासक्त करण्याची आज्ञा पार्वतीदेवीने केली. त्या कन्यिकेने अनुज्ञेनुसार, परमेश्वराच्या सभामंडपास गणेश्वर ज्या वाटेने येत होता, त्या वाटेत कामलता उभी राहिली. मुक्तिदानी राणीने निरुपिल्याप्रमाणे ती आपल्या स्वरूपलावण्याने डोळे दिपवीत होती. तिचे सौंदर्य पाहून निर्माय गणेश्वराचे डोळे पराभूत होऊन निरखूं लागले. मनापासून अपेक्षिले. चित्त चंचल झाले. करणेंद्रिये चलबिचल झाली. कामातुरतेने विव्हल होऊन मीलनाकरिता अत्यातुर झाला. तत्क्षणी स्वतःस आवरून सावध झाला-

हाय ! हाय ! माझ्यात ही मायाधीनता कशी निर्माण झाली ? मला कुठल्या कुठे नेले ? या अनुतापाग्निने विरून कळवळून स्वतःचें समाधान स्वतःच करून घेतले. विवेकानें पडताळून पाहिले. या स्त्रीच्यायोगे मला भव-प्रारंभ झाला. याची जाणीव होऊन चिंताक्रांत झाला. त्या मनःस्थितीतच रोजच्याप्रमाणें शिव-सभेस गेल्यावर -

अनुक्रमणिका

तेव्हा सदाशिवाने गणेश्वराची स्थितिगती ओळखली. "गणेश्वरा, मायेने तुझे मन जिंकले आहे. त्याकरिता तू मृत्युलोकी जन्म घेऊन, त्या रुद्रकन्येबरोबर सुरतसुख अनुभवण्यास जा" ही आज्ञा ऐकून निर्माय गणेश्वर वदतो, "हे देवा, या रुद्रलोकी वास करून, तुम्हांहून अधिक सामर्थ्य संपादिले. असे असून आता मजला मृत्युलोकी जन्मण्याचे भव प्राप्त झाले. मृत्युलोकी अज्ञानाशिवाय काय असणार ? तुम्हांस जाणण्यास तेथे अवकाश नसतो."

"भिऊ नकोस गणेश्वरा, तुला आवरलेल्या मायेस निवृत्त करितो. मीच तुझा प्राणलिंग होऊन येतो. तुझ्या सर्वांगाठायी स्थिर होऊन तुजला निजलिंगैक्य करितो. निर्वाण समाधीत निश्चल करतो. तुझ्यामुळे श्रीवीरशिवाचाराचा पूर्णोद्धार होणार आहे. तसेच मृत्युलोकीचे महागण कृतार्थ होणार आहेत. जा आता." असे म्हणून शिवाने अभयहस्त ठेवले. तेव्हा गणेश्वराने महाप्रसाद म्हणून अनुज्ञा स्वीकारून मानवाकार चैतन्यकलेचे धारण केले आणि तो मृत्युलोकी उतरला. मेरुच्या दक्षिणभागातील प्रांतात शोभणाऱ्या बनवासी या गांवात वास करणाऱ्या नागवासाधिपति शिवभक्त आणि त्याची सति सुज्ञानीदेवी हिच्या पोटी जन्मला. साऱ्या पुण्यपापाधीन न होण्याचे जगास दाखविण्याकरिता 'अल्लम' हे नामाभिधान धारण केले. दिवसेंदिवस वाढूं लागला. दिव्य रूपलावण्याने संपूर्ण होऊन वाद्य-विद्याभ्यासांत पारंगत झाला.

त्याच गावात एका शिवभक्ताच्या पोटी रुद्रकन्येने जन्म घेतला. तिचे नाव कामलता ठेवण्यात आले. पाहता, पाहता सुस्वरूपिणी अशी ती वाढू लागली. तिजला नव-यवन प्राप्त झाले. ती नृत्यविद्येत निपुण झाली. पुढे ती अल्लमाची सति झाली. ते दोघे सुरतोन्नत सुखात परवश झाले होते. काही संवत्सरे लोटल्यानंतर त्या गावातील मूलस्थान अशा गुहेश्वराची सेवा करीत होते. पुढे उःशापानें रुद्रकन्या मुक्त झाली. ती अंतरल्यानें अल्लम चिंतामग्न होऊन एका पुष्पवाटिकेत परवश झाला.

परमेश्वराच्या कृपा प्रसन्नतेच्या काळी 'कामतत्व विरले. शिवतत्व उरले.' याची सत्यता पटली. कर्मक्षय होऊन सुज्ञानांकुराचा उदय झाला.अल्लमप्रभुदेवांच्या सत्पिण्डांत सामावलेल्या शिवतत्वाचे निदर्शन हेंच प्रथम पिंडस्थल होय.

१

पिंडस्थल

**पाषाणांतील पावकागत**
**उदकांतील प्रतिबिंबागत**
**बीजांतील वृक्षागत**
**शब्दांतील निःशब्दागत**
**गुहेश्वरा, असे आहेत तुमच्या शरणाचे संबंध**

२

**पाषाणांतील अग्नि नाही जाळत**
**बीजांतील वृक्ष आवाज नाही करीत**
**हे प्रकटपणे कोणास नाही दिसत,**

अनुक्रमणिका

**पण, गुहेश्वराची निजस्थिती अनुभाव सुखीयास अवगत.**

**३**

पिंडात सामावलेले शिवतत्व, प्रभुदेवांच्या अंतरंगात ज्ञानांकुर स्वरूप स्फुरले ते सुज्ञान दृष्टीने जाणून मी मांसपिण्ड जनित जन्मलेला नव्हे. वाढण्यात वाढलेला नव्हे. नाश पावण्यात नाश होणारा नव्हे. ( नश्वर नव्हे ). ब्रह्मांडादि समस्त जग निर्माण होण्यापूर्वी आदि चित्शक्तीनें उदयास आलो. हे मी स्वतःच विवेकाने पहात आहे.

पिंडज्ञान स्थलः

**नव्हता तेव्हां आदि-आधार, नव्हता गर्व अहंकार**
**नव्हते तेव्हां सगुण-निर्गुण, शून्यही नव्हते-नव्हते निःशून्य**
**नव्हती सचराचराची रचना**
**तेव्हां उदयास आला, गुहेश्वराचा शरण.**

**४**

**नव्हता तेव्हां नाद बिंदू, होता तेव्हां निर्भय गणेश्वरः**
**उत्पत्ति स्थिति लय नव्हता, तेव्हां होता अक्षय गणेश्वरः**
**नव्हते तेव्हां वेद-पठण, होता तेव्हां ॐकार गणेश्वरः**
**गुहेश्वर लिंग नव्हता, तेव्हां होता निर्माय गणेश्वर.**

निराकार असलेली आपली पूर्वस्थिती विवेकाने जाणून प्रभुदेव कैलासात आपला निर्माय असलेला अवतार विवेकाने पाहतात.

माया विलास विडंबन स्थल :

**५**

**जेव्हां ब्रह्म विष्णू आदींची माया पायाखाली तयाना तुडवीत होती,**
**रुद्रगण-प्रथमगणांची माया भुलवुनी तयांना छळीत होती,**
**भालनेत्र पंचवदन दशभुजांची झाली माया अर्धांगी,**
**अष्टविंशति ऋषिगणांना तपोमदानें पिडीत होती माया,**
**तेव्हां होतो मी निर्माय गणेश्वर, हे गुहेश्वरा.**

आपल्या रुद्रावताराचे गणेश्वरत्व जाणून, चार युगांचा प्रारंभ करून आपण मृत्युलोकी संचार करण्यास आल्याचा वृत्तांत निवेदितात.

प्रभुदेवांचे गणेश्वरत्व

अनुक्रमणिका

६

**कृतयुगांत भक्तिकारणें,**
**मी होतो स्थूल काय गणेश्वर,**
**त्रेतायुगी मी होतो, शून्यकाय गणेश्वर,**
**द्वापारयुगांत भक्तिकारणे**
**मी होतो अनिमिष गणेश्वर.**
**कलियुगांत भक्तिकारणास्तव**
**होऊनी अल्लमप्रभू गणेश्वर**
**गुहेश्वरांनी पाठविलेल्या महत्कार्याच्या पूर्ततेंस**
**झालो मी तद्‌गत.**

मूलज्ञानाने आपले पूर्वापार नाते विवेकाने जाणून आपणाहून भिन्न असलेला संसार भ्रांतिभाव प्रभुदेव निवृत्त करतात.

संसार हेयस्थल

७

**सकल जगास नसे अवगत कायेच्या मूळास बीज असे कोणते ?**
**इंद्रियायोगे न होई उदय,**
**स्वप्न विषयायोगे न होई,**
**ज्ञानकळाने न होई उदय.**
**हे कोणासही नसे उमजत**
**शुद्ध सावधान नसे जाण गुहेश्वरा.**

८

**ओढ्यांत काष्ट वाहतांना लाटा आदळल्याविना राहतील का ?**
**संसारसागरांत बुडणाऱ्या प्राण्यांना**
**सुखदुःखांचें संपर्क झाल्याविना राहील काय ?**
**याकारणें मूर्ति झाल्याने, प्रलय न चुके गुहेश्वरा.**

९

**आलेला उदयमान, गेलेला अस्तमान**
**पावले कीं हो विनाश पाण्यानें झालेले सकळ निर्माण,**
**तिन्ही लोकीं पडला गाढ अंधःकार**

अनुक्रमणिका

याचें रहस्य काय असे सांग ना गुहेश्वर ?

१०

संसाररूपि पडले होते प्रेत
तें खाण्यास आलेलीं कुत्रीं होती भांडत
ती भांडण्याची रीत पाहून हंसे तें प्रेत
गुहेश्वररूपी लिंग नसे त्या ठायीं देख

११

पाण्याच्या बाहुलीनें केले वेषधारण,
अंगार रंगाचें घातले प्रावरण.
करिती संचार सकल भूत प्राणि वाऱ्यानुसार
ते कैसे जाणती देवास हे गुहेश्वरा.

१२

कर्मसमूहाचे झालें आज निरसन
पापाचे पाश झाले हरण.
नको नको या संसाराचें बसले चटकें झालो मी दुःखित.
गेलो मी त्या मायेचें मस्तक तुडवून.
आतां नाही करीत मी भ्रमण, हे गुहेश्वरा, वाहतो तुमची आण.

जीव भ्रांति निरसन स्थल:

१३

भूमीची केली बाहुली, तिज नेसवुनी पाण्याचा रंग
नानाविध आश्रमांत निनादणारे बांधुनि घुंगरु
वायु अग्नीच्या बिंदीनें करुनी शृंगार
कोण असे तो यंत्रवाहक खेळविणारा ?
शून्यातीत ( बयलु ) खांबास आणून,
होऊनी स्वय परास केल्यास
स्थिर, स्वयंचि झाले अद्वय, हे गुहेश्वरा.

१४

आहे गाय अच्छेराची, कास आहे पंचेर,

अनुक्रमणिका

**दोन्ही शिंगे ताडवृक्षा इतके लांब**
**तिच्या शोधात गेले सहा दिवस ती नष्ट होऊनी झाले तीन दिवस.**
**अघटित अघटित, हे गुहेश्वरा आपण शोधू या तीस.**

**१५**

**मृग चर्मधारी स्वामीस शोधीत, रानांत सगळे चोर**
**मिळून तपासास जाय**
**मालवला दिवा दिसेना काहीं.**
**अन्नपान करणारे वडिलधारे करिती अधरपान.**
**मागती सुरापान.**
**एका जाणकारानें जाणते शीर धरुन अध्यात्म विकरींचे रक्त**
**प्याला बा गुहेश्वरा.**

**१६**

**जंबुद्वीपाच्या व्यापाऱ्यानें भरले सामान**
**कुंभिनीच्या उदरावर पसरिले दुकान.**
**उष्ण तृष्णा झाले घन सात समुद्र पिऊनही लागली तहान.**
**तहानेने झाला विस्मित.**
**शिशुने उचलिले आईचे शव सांगतसे नांव.**
**गुहेश्वराची निजस्थिती गिळियली व सुधेची आकृती.**

**१७**

**गगनावरती जन्मलें एक अभिनव पोपट**
**त्यानें केले संभ्रमात एक घर.**
**एकाचे झाले पंचवीस पोपट;**
**ब्रह्म झाला त्या पोपटांचा पिंजराः**
**विष्णू झाला त्यांचा कडधान्य चारा;**
**रुद्र झाला त्या पोपटांचा दांडा.**
**तिघांच्या पुढचे गिळुनी अर्भक**
**हे गुहेश्वरा, दृष्ट नाम नष्ट देख.**

जीव भाव भ्रांति निवृत्त झाल्याने प्रभुदेव, मी शिव आहे; मज नाही ती, जीवभाव भ्रांति कोठुन निर्माण झाली ? असा सुविवेकानें विचार करतात.

मिथ्याभावाच्या माया संबंधाने हे असे घडले हे जाणून, स्वतःस समोरहोऊन दिसणाऱ्या मायेहून आपण वेगळे आहोत. अशा माया विलासास निवृत्त करतात.

अनुक्रमणिका

१८

एका राक्षसीणीस दोन लेकरे : पाळण्यावरती पांच.
राक्षसीण झाल्यास बाळंतीण लेकरांची काय गत ?
मीच हालवितो पाळणा, गातो अंगाई गीत.
राक्षसीण गिळाली बाळंतिणीचा पाळणा
गुहेश्वरा, हे काय सांग ना ?

१९

खेळांत हा खेळ चालला आहे तरी काय ?
उडुनी गेला ब्रह्म दरबार !
झाला साफ सपाट, म्हणत येतो बाजुला सरा !
विष्णुनें गिळुनी ब्रह्मास, लपला रुद्र गर्भात हे कसे काय ?
मुळीविना झाड पाण्याविना सावलीत दिसणारे
प्रतिबिंब काय वाणूं गुहेश्वरा ?

२०

रेड्याच्या शिंगाच्या अग्रांत सातशें सत्तर रहाट विहिरी.
विहिरीत आहेत मोठाले झरे.
त्यात वसती एकेक वेश्या.
त्या वेश्येंच्या गळ्यांत सातशे सत्तर हत्ती चढल्याचे
देखिले गुहेश्वरा.

२१

पंचशतकोटी विस्तीर्ण भूमंडळास
एक रुंड नसलेले मुंड येऊन गिळीले ते पाहिले.
रुंडाविना पाहुन झालो मी चकित.
नव खंड मंडल भिन्न झाल्यानें
त्या रुंडास पाहिले कां कोणी हे गुहेश्वरा ?

२२

दाट वनातल्या गावाच्या मध्यभागी पडली पांच प्रेते.
येऊ येऊनी रडत होता गोतावळा मोठा असल्याकारणानें

अनुक्रमणिका

जळेना प्रेत विझेना वनः
गुहेश्वरा, जळला हो प्रेत पुरण्याचा कोनाडा.

२३

अंगाराच्या गिरीवर पाहिला मी लाखाचा खांब.
त्या लाखाच्या खांबावर होता एक हंस,
जळला खांब, उडाला हंस,
लपला कुठे अंगारा, हे गुहेश्वरा.

२४

भूत भूत मिळुन झाले अद्‌भुत
निखारे झाले थंड, तहानले जल.
अग्नि पवनांत शिरुन वायु झाले दुप्पट, हे गुहेश्वरा.

२५

अंगरुपि झाडाच्या अग्रभागी वसतो माकड,
उडी घेई फांदीवर.
पहा हो, हे चोद्यः
हात पुढे केल्यास गिळतो सर्वांग.
बोलाविता क्षणी उभा टाकी समोर.
केल्यास आव्हान होई अदृश्य, गुहेश्वरा.

२६

सागराच्या खोल पाण्यात
एका काळ्या कोळ्याने फेकिले देख जाळें.
जाणकार पांच शिर, अजाण पांच शिर
काळे शिर पांच
तो काळा कोळी आपले जाळे उचलून घेऊन गेल्यावर
नेत्रांत खेळे लाल रंग, पाहिले मी गुहेश्वरा.

२७

भूमीचे काठिण्य आकाशाचे म्रुदुपण
जाणण्याची बुद्धि झाली स्थगित
उदकांतुन उभ्दवलेली तृषा शोधते कीं हो उदकास !

अनुक्रमणिका

**मरुनी आंत खेळते बाहेर गुहेश्वराठायीच झाले स्थिर.**

२८

**वाघाचें शिर हरिणीस, हरिणींचे शिर वाघास;**
**दोन्हींचें कंबर झाले एक.**
**नसे वाघ नसे हरिण !**
**दुसरे एक येऊन करितसे चर्वण**
**रुंडाविना धडाने खाल्ल्यास पानें**
**लपली पानें गुहेश्वरा**

२९

**जळल्यानें लाखेची बाहुली कोरड पडे उदकाच्या तोंडास , हे काय !**
**खोदा हो ही विहीर, विहीर खोदा.**
**मेला खोदणारा, आटली विहीर.**
**यास्तव तिन्ही लोक पडले ओसाड, गुहेश्वरा.**

३०

**नाहींच्या ठायी असे नकारात्मक. त्या नकारात्मकात आहे होकारात्मक.**
**होकारात्मकात आहे नकारात्मक.**
**होकार म्हणावे तर तेच झाले नाहींसे.**
**त्या नाहींच्या ठायी एक डोके आले उदयास.**
**त्या डोकींत देखिले तीन लिपी.**
**त्या लिपीत एक ध्वनी असल्याचे दिसले.**
**ध्वनीचा रंग डोके वर करण्यापूर्वी**
**पांच तोंडाच्या राक्षसीने चावून गिळले त्यास.**
**त्या राक्षसीस माकड जन्मून रेड्याचा गळा बांधल्याचे पाहिले.**
**रेड्याचे शिंग मोडून फेकल्याने सापडले माकड.**
**जाळुनी रान आकाशांत शिरून गुहेश्वरलिंगाठायी केले**
**गुरूकारुण्य संपादन.**

माया विलासास निवृत्त करून, प्रभुदेव निर्माय झाले. सगळी प्रापंचिक व्याप्ती विसरून गेले. शिवज्ञान प्रकाशांत अंतरंग शुद्धात्मा होऊन शिवचिंतन समारूढात करणादि सारे गुण समाधान पावले. एकाग्र चित्ताने शिवभाव सामावून सद्वासना विवेकात मन बुडाले. नवमास भरलेल्या गर्भवतीप्रमाणे शिवतत्व विद्येने आतल्या आत संपूर्ण व्यापून टाकिले.गुरू हस्त स्पर्शनाआधीच शिखी कर्पूराप्रमाणे झाल्याचा भाव समोर सूचित झाला. 'गुरूच्या आधीच शिष्य हा गुरू' या शिवाद्वैत वाक्यानुसार सत्य पटले. अंतरंगात गुरू हा भाव डोकावीत असतांना एके दिवशी अल्लमप्रभु एका एकांत स्थळी शिवचिंतनातुर समाधीत बसले होते.

अनुक्रमणिका

अंजन घातलेल्यास जसा द्रव्याचा साठा दिसतो, तसा शिवज्ञानारंजन दृष्टीपुढे अनादि संसिद्ध अशा अनिमिषदेवाची समाधि दिसू लागली. तेव्हा परमहर्षित होऊन त्या समाधीवर अच्छादलेल्या भूमीस खणून पाहता, तेथे एक शिवालयाचा आकार दिसला. तो पाहून परमानंदानें आपला अनुभव कथितात.

**३१**

**तिच्या नजरेने मज आणिले मृत्युलोकी.**
**तिच्या मिलन गोडीच्या विपत्तीनें पीडिले मज.**
**तिच्या मिलनाच्या अपेक्षेची मुळी तुटली त्यायोगें**
**पाहिले मी त्रिपुर नष्ट झाल्याचे.**
**आगीवर आग घेरल्याने झाला थंडावा निर्माण.**
**काळ्या पारध्यास गिळला कस्तुरीमृग**
**पाहिले मी थोरल्या बायकोनें काढल्याचे कर्णाभरण**
**काळरात्री किल्ल्यावर चढाई करून.**
**जिंकिले युद्ध, पुरलेल्या निधानास पाहिले मी, गुहेश्वरा.**

अनिमिषदेवांची समाधी प्रभुदेव पाहताच आत जातात. तेथे एक दिवा प्रकाशात असल्याचे पाहून स्वस्थ पद्मासन घालून बसतात. करस्थलात अमृतलिंग धारण करून त्या लिंगाठायी समरसहोतात. सकळ करणेंद्रिये निष्करण झाली. भाव निर्भाव झाले. नजर रोखून, दृष्टि निश्चल झाली पापण्या न लवता ज्ञान दृढ झाले. मीपणाचे निराकरण झाले. तू पणाचीही झाली निष्पत्ति. उभयातील अंतर स्वय झाले. मनोलय स्थानांत सर्व चैतन्य परम चैतन्यमय होऊन तनु परमकष्टात परवश झाली.

**उर्ध्व शून्यं मध्यः शून्यं मध्यशून्यं निरामयं**
**सर्व शून्य मनाभासं समाधिस्थस्य लक्षणं ॥**

या सिद्धांत वाक्यार्थाप्रमाणे स्वतःठायी पूर्ण होऊन नित्यनिज समाधीत मूर्ति पावलेल्या त्या सद्गुरुंना अवलोकून प्रभुदेव म्हणतात-

**३२**

**पुण्याईच्या काळीं माती होई सोनें;**
**पुण्याईच्या काळी पाषाण होई परिस;**
**पूर्वापूर्वीचें बिंबलेले भाग्य**
**माझ्या या डोळ्यांदेखत दिसतसे जाण.**
**मातीच्या आड होते देऊळ, त्यांत होतें एक माणिक**
**तें पाहिल्यावर हें गुहेश्वरा, पूर्वीसारखे असूं शकेल काय ?**

अनुक्रमणिका

३३

**शोधित असलेली वेल पायांत गुंडाळल्यागत,**
**इच्छित अभिलाषा हातीं आल्यागत,**
**गरीब धनांस ठेंचाळल्यागत,**
**मी आलो शोधित शोधित, पाहिलें या भाव-अगम्यास.**
**मी माझ्या मनाचा ओघ पाहिला.**
**माझ्या आंत-बाहेर सर्वांगांत परम-प्रकाशित**
**उजळणारी ज्योत पाहिली.**
**चिन्हविरहित करस्थळीचा, अत्याश्वर्यकरदृष्टीचा.**
**माझा परमगुरु, मी पाहिला. त्यांस पहात, कंठितो मी**
**जीवित, गुहेश्वरा.**

अनिमिषदेवांस पाहून हाच माझा गुरु, मीच याचा शिष्य हे प्रभुदेवांनी ताडले. श्रीगुरूंचे चरणकमल धरून अतीत अशा परवस्तूंस ते जाणतात. आनंदातिशयाने निश्चितपणे निरूपतात.

३४

**जें पाहिलें तें न धरतां, न दिसणारें त्यांस धरलें, म्हणती,**
**सांपडेना म्हणून तळमळती.**
**पाहिलेले पाहून गुरुचरण धरल्यास,**
**न दिसणारें दिसेल, बा गुहेश्वरा.**

श्रीगुरुमूर्तीस पाहून श्रीप्रभुदेव स्तवतात.

३५

**कायायोगें झाली नच ही मूर्ति, जीवयोगेंही नच बनली,**
**प्राणयोगे नच घडली ही मूर्ति, पुण्याईनेंहि नच घडली,**
**योगायोगे झाली नच ही मूर्ति शिवाच्या योगे नच बनली**
**शक्तियोगे नच झाली ही मूर्ति-**
**या मूर्तिस कोणती देऊ उपमा ?**

कधी न पाहिलेली काया, न दिसणारे तेज, उपमातीत निजस्थिती. या कारणें डोळ्यास गोचर झाल्याचे सुख कसा मी सांगू, गुहेश्वरा ?

अनुक्रमणिका

३६

**ना आंत ना बाहेर असे ते स्फटिक ते घटागतः**
**या अद्भुत चरित्रानें झाली विस्मित,**
**दिसतसे पहाता, स्पर्शणा न लागे हाता.**
**पोहोचण्यास असे नजिक, जवळ जाता दिसतसे दूर दूर.**
**आकारानें गिळले निराकार**
**बयलु समाधीठायी झाले कुंठीत.**
**दर्शनमात्रें लाभलो अमृत आहार,**
**समरसानें किती तरी होईल तो अपार, हे गुहेश्वरा.**

प्रभुदेव अनिमिषदेवांची निजमूर्ति पाहून वाखाणणी करतात. या श्री गुरूकडून मी उपदेश घ्यावा म्हणतो पण हा महात्मा आपण कोण हे जाणत नाही, समोरचे कोण हेही ओळखत नाही. निःशब्दाने वेधिले आहे. हा मुग्ध झाला आहे. समोरच्यांना उपदेश करीत नाही, माझ्या मीच गुरू उपदेश घ्यावा म्हणून निश्चय करतात, निरूपितात.

३७

**न चाले न बोले असा हा गुरु**
**उपदेश घेण्यास गेलो पण नाहीं बोलत,**
**मी बोललो तरी नाही ऐकू येते.**
**हे देवा, अंत आरंभाचे कार्य कोणते ?**
**मुक्या मुक्याच्या संभाषणागत आहे माझ्यातील ज्ञान परिमल**
**पहाता बाहेर असे मुग्ध.**
**यास देऊ मी कसली उपमा या अनियमाच्या रहस्यास ?**
**हे आहे स्वयं निर्माण भिन्नत्वास आहे का ठाव, गुहेश्वरा ?**

गुरूस व आपणास विभागून पाहून निश्चयाने प्रभुदेव सांगतात :

३८

**म्हणावे एक तर आहेत दोन, दोन म्हणावे तर एकच आहे ;**
**एक दोनींचा हा कसला संदेह ?**
**न अंतरणाऱ्या मिलनाचा हा अभिन्न उपदेश**
**हे गुहेश्वरा,गुरू शिष्य या भावांत आहे का भेद ?**

अनुक्रमणिका

३९

अलभ्य गुरू झाल्यास गोचर डोळ्यास
उच्चारविना विज्ञापनाः न शिवता हस्त मस्तक संयोगः
न लावितां विभुति धारणः न ऐकतां कर्ण मंत्रः
भरुनि न ओसांडे कलशाभिषेकः
आगमाविना दिक्षा ; पूजा न करिता येई ऐसा लिंग.
संगाविण संबंध स्वयं होणारे अनुग्रह
होण्यापरि, करी मज गुहेश्वरा.

४०

तु माझा गुरु असल्यास, मी तुझा शिष्य असल्यास
माझ्या कायेचा कर्म करावे निवारण,
माझ्या करणादि गुणांचे करावे निर्मुलन.
तुं माझ्या कायेंत पाव बा अंतर्धान,
तसेच माझ्या प्राणांत, भावांत पाव गुरु देवा अंतर्धान
हे गुहेश्वरा, माझ्या करस्थली येऊन करी करुणा.

४१

आदिच्याहि पलिकडे तुंच होतांस माझा गुरु.
अनादिच्याहि पलिकडे तूंच होतास माझा गुरु.
ही दोन्हीं नामे निर्माणापूर्वी मी होतो तुमचा शिष्य.
माझ्या भावकायेंतील भ्रम निरसून.
माझ्या ज्ञानकायेतील विस्मरण विनाशुन.
माझ्या अंतरंगी जाणीवेची दावीशी रीत, बहिरंगी,
नचवदशी, मी नाहीं सोडित तव श्री चरण.
केल्यास तोच महाप्रसाद म्हणुन करितो स्विकार;
नच केल्यास तुम्हीच मी होऊन करितो महाप्रसाद स्वीकार.
कोणत्या ना कोणत्या रितीने कां होईना
माझा देह तुम्हाठायीं झिजवून, संपादितो तुमची करुणा
पहा बा गुहेश्वरा, माझ्या जीवनाची अशी आहे रीत.

पुन्हः प्रभुदेव आपल्या गुरुच्याठायीं अभिन्नाक्रिया असलेल्या निश्चयाने कथन करतात.

अनुक्रमणिका

४२

**ज्योतितील कापूर, जलातील मीठ,**
**श्रीगुरुठायीं समरस पावलेल्या शिष्यास,**
**निरनिराळे क्रिया वर्तन असू शकतील कां गुहेश्वरा?**

गुरु-शिष्य या भावांत भेद न मानतां आपल्या अंतरंगाची बोधामूर्तिच हा श्री गुरू आहे. या निश्चयानें प्रभुदेवांनी, अनिमिषदेवांच्या श्रीचरणास वंदिले,करस्थलातील लिंग स्वयेच अनुग्रह करून घेतले. त्यायोगे गुरू निरवय पावले. अस्ती-धर्माची जोडणी निखळून जमिनीवर गळून पडले. ते पहाताच प्रभुदेव गुरुद्रोह माझ्या हातून घडला म्हणून अनुतापाने उद्‌गारतात.

४३

**आणवमल मायामल कार्मिकमल हे मलत्रय नुरुनि उरुनि**
**निर्मल झालेला शिष्य :**
**काया जिवाची भ्रांति सूतक सांडून झाला गुरु निःशंक :**
**या उभय भावांत कोणते आधी, कोणते मागावून हे न येई जाणतां**
**करस्थलास केल्यास कृपा, मनस्थल असे निर्धास्त.**
**मनस्थलात पदर पसरुन मागितल्यास करस्थल लिंग येई हाता.**
**गुरुस्थलाची निजस्थिती परस्थली पावल्यास अंतर्धान**
**भाव कां बरे तळमळावे, गुहेश्वरा ?**
**पुनश्च अनुताप :**

४४

**हे मना निर्णयाच्या अजाणतेनें दुःखाच्या आहारी गेलास कीं ?**
**हे कसले रे मायासूत्र ?**
**न कळे रे डोळ्यातील अंधार !**
**प्रकाशातील शृंगार का कळवळावे बा, गुहेश्वर !**

अनिमिषदेव निजत्व पावल्यावर प्रभुदेवास अनुताप होतो. तेव्हा त्यांनी स्वतःच विचार करून सांत्वन करून घेतले. त्या गुरुचे चैतन्य त्या लिंगाठायी अंतर्धान पावले आहे, तो लिंग माझ्या करस्थली आला आहे. त्यायोगे हा श्रीगुरु माझ्या करस्थली, मनस्थली, तनुस्थली संपूर्ण होऊन वास केला आहे. अन्यभाव विषयानें न उरून उरला आहे. याची निश्चिती मनास पटली तेव्हा कथन करितात.

अनुक्रमणिका

४५

**अहा हे मना, तुझ्या पूर्वापारचे पडले की रे तुज विस्मरण !**
**घन दडुनी मनी, ते मज दडुनी लिंगाठायी,**
**तोच लिंग आला मम करस्थली, तो नष्ट झाला दुखला**
**ही भावभ्रांति कसली ?**
**नसे जनन ऐसा घन, तयास कुठचे मरण ?**
**अविरळ निज आपल्या ठायी आपण झाल्यानें वेद्य**
**समोर ठेवून दिसेना म्हणणें हा कसला अज्ञान ?**
**मी तू पण सांडून साह्य झाले ते आपण होऊन**
**यास काय म्हणू बा गुहेश्वरा ?**

४६

**धुंडती न दिसे तयास परि दिसलेले धुंडती का ?**
**धनाचा धन असा वस्तु झाला आपणचि गुरु**
**झाला आपणचि लिंग, झाला जंगम,**
**झाला आपणचि प्रसाद, झाला मंत्र,**
**झाला आपणचि सकल विद्यारूप, या सकलास करुनि अंतर्गत**
**आला माझ्या करस्यलात**
**आता निर्विकार जाण गुहेश्वरा.**

प्रभुदेवास अनुताप-संताप या दोन्हीचा विसर पडला. श्रीगुरु नित्य असल्याचे जाणवले. प्रभुदेवानी त्या गुरुमुर्तिस आपल्या हृदयकमलाच्या मध्यस्थानी असल्याचे पाहून मनःपुष्पाने पुजून परम हर्षाने वदतात.

४७

**वावरतसे कस्तुरी मृग येऊन**
**सकल विस्ताराचे रूप येऊन उभे टाकिले समोर**
**कोणत्या ग्रहाने केला स्पर्श हे मज नसे अवगत**
**गुरुस ओळखून केली मी पूजा हृदयकमल मध्यांत,**
**ताडिले देख,गुरू माझा असे प्रख्यात**
**पाहिले मी गुहेश्वर लिंगाठायी, पूर्वजनन गेले सुकून.**

श्रीगुरुस अशाप्रकारे पूजून त्या गुरुच्या ठायी परवश झाल्याचे कथितात.

अनुक्रमणिका

४८

**माझ्या मनाच्या अग्रांवर अंगरहित रूप**
**देखोनि झालो मी विस्मित**
**अंतरंगाच्या आत्म्याठायी अनिमिष निजैक्य गुहेश्वरल्लमास**
**पाहुन झालो मी चकित**

प्रभुदेव, गुरुच्या ठायी एकोभाव पावतात.

४९

**गुरु शिष्याचा संबंध गेलो मी शोधित**
**आपणचि झाला गुरु, आपणचि झाला शिष्य,**
**आपणचि झाला लिंग**
**गुहेश्वर, तुमच्या शरणांच्या हाती दिल्यास लिंग**
**भाव होई दिगंबर.**

प्रभुदेव श्रीगुरु ठायी आपण समरस होतात. आपल्या करस्थलातील लिंगास पहाता पहाता तो लिंगभाव अलिंग होतो. दृष्टि रोखल्याने मनापासून आनंदित झाले. आपल्या आपण आश्चर्यचकित होऊन निरुपतात.

५०

**पूर्वीची रीत अशी नाही**
**तसे असल्यास हे कसे होईल ? तसे नव्हते म्हणून बरे झाले**
**नाना दिशांची कामना प्रत्यक्ष निदर्शन होत असता**
**गुहेश्वर लिंगाने तनुस नेले आपणाकडे**

५१

**आंब्याचे झाड कुठले, कोकिळा कुठली**
**कुठल्या कोठे तो संबंध देवा ?**
**पर्वतावरचा आवळा समुद्रातील मीठ,**
**कोठल्या कोठे तो संबंध**
**गुहेश्वर लिंगाचा व माझा कोठल्या कोठचा संबंध ?**
**प्रभुदेव त्या लिंगाचे महात्म्य पाहुन शब्द मुग्ध होतात.**

अनुक्रमणिका

### ५२

**अदृश्य लिंग माझ्या करस्थलीं आल्यानें न येई सांगता, न पुसता**
**मज हे वाटतसे आश्चर्य, वाटतसे अद्‌भुत**
**गुहेश्वर लिंग हा निराकार बयलु**
**साकार होऊन करस्थली आल्याने येईना सांगता, येईना पुसता**

प्रभुदेव त्या लिंगामध्ये परवश होतात.

### ५३

**तनु होऊनी कंपायमान मन झाले तव ठायी तल्लीन**
**नजर होऊनी प्राण, भूक, तहान तव ठायीं पावे विलीन**
**एक झाले शून्याठायी, गुहेश्वर निराल निरंजन**

### ५४

**तुम्हांस पाहण्यातच सुख आहे तोंवर मी कसा कुठे होऊं समरस ;**
**तुमच्यांत होण्याची आतुरता असेतोंवर नजर न तुटे,**
**समरसानें झालेल्या आश्चर्यकर सुखास कोणती उपमा देऊं गुहेश्वरा.**

भक्तीस्थल :

इष्टलिंगाठायी विश्वास प्रबळ झाल्यास तोच आयत लिंग. त्या दृष्ट लिंगाचा भाव मनास वेध झाल्यास तोच स्वायत्तलिंग. त्या इष्टलिंगाचा भाव मनोवेध सुख भिन्नत्वें न दिसतां अनुपम परिणामपूरित झाल्यास तोच सन्निहितलिंग. याप्रकारे इष्टलिंग, प्राणलिंग, तृप्तिलिंग. हे लिंगत्रय शरणांच्या तनुमयावर आयत्त, स्वायत्त, सन्निहित झाल्याने पंचभौतिकनाश होऊन लिंगतत्व होतात. आत्म्याचा जीव-भाव नासून परमात्मा म्हणवितो. षडंगयोग झाल्याने षड्‌स्थलांचे क्रम संभवतात. ते अशा प्रकारें,

### ५५

**पणतीही आहे, वातही आहे**
**तेलाविना उजळेल कशी ज्योति** ?
**गुरुही आहे, लिंगही आहे** ?
**शिष्यास ज्ञानोदय झाल्याविना कशी बाणावेल भक्ति**?
**लेकुनि सोऽहं, न केल्यास दासोऽहं**
**मज नसे मान्य हें, गुहेश्वरा**

अनुक्रमणिका

५६

**न मिसळतां अन्य विकार, जयाचें न बाधे मनोविकार**
**न उपयोगिता रवियोगे आलेले पीक,**
**जो जाणुनी लिंगाचें पीक झिजवितो जंगमाठायीं**
**अशा भक्ताठायी वसतसे, गुहेश्वर.**

५७

**भल्या पहाटे उठून स्पर्शावे लिंगाचें चरण,**
**सुप्रभातीं उठून, पहावे शिवभक्ताचें मुख**
**जन्मास आल्याचे होई साफल्य देख**
**याविण मज न रुचे बा, गुहेश्वर.**

माहेश्वर स्थल :

विश्वासच प्राण झालेल्या भक्ताच्या विश्वासांतील एकनिष्ठाच माहेश्वर स्थल.

५८

**येईना चढतां दिलेल्या घोड्यावर**
**दुसरा घोडा इच्छिणारा कसला तो वीर ? नसे तो धीर,**
**या कारणें लादुन घेती जीन, हे गुहेश्वरा,**
**थकती तिन्ही लोकींचे जन.**

५९

म्हणती मी भक्त:

**पृथ्वी पूर्वाश्रयाचें केल्याविण हनन,**
**आपचा पूर्वाश्रय केल्याविण निवारण,**
**तेजाचा पूर्वाश्रय केल्याविण परिहरण,**
**वायूचा पूर्वाश्रय नाशिल्याविण,**
**आकाशाचा पूर्वाश्रय झाल्याविण निरसन**
**सोमसूर्याचा पूर्वाश्रय झाल्याविण निवारण,**
**आत्म्याचा पूर्वाश्रय केल्याविण निरसन,**
**भक्त म्हणूनी करिती लिंगार्चन, हे पाहून झालो मी विस्मित,**
**गुहेश्वरा.**

अनुक्रमणिका

६०

**चालुनी पुढे चढुनी वरती म्हणती मी धरिले**
**परि घसरुनि पडले गडगडता अनंतजन**
**धरिले म्हणणारे सारे परिणाम गेले भोगून**
**आहे मी धरिलेला बंदिवान झाला सोबती बंदिवान, गुहेश्वरा.**

६१

**अष्टविर्धाचन षोडशोपचार करितो मी तुमचे अव्याहत**
**मी करीत असलेली सारी क्रिया तुम्हीच झालांत**
**गुहेश्वरा, तुम्हां ठायीं झालो मी तद्‌गत.**

प्रसादि स्थल :

विश्वास ठेवून झाला भक्त त्या विश्वासांतील निष्ठेनें झाला माहेश्वर. ती निष्ठा चलबिचल न होतां सावधानी झाल्याची रीतच प्रसादस्थल होय.

६२

**त्रिविधाची नित्यता, त्रिविधाची अनित्यता, कोण जाणता ?**
**अर्पुनि त्रिविधास त्रिविध जो घेई त्रिविध प्रसाद**
**त्यास म्हणतो मी त्रिविध नाथ.**
**त्यास म्हणतो वीर, म्हणतो धीर**
**म्हणतो त्यास गुहेश्वर लिंगाठायीचा प्रसादि.**

६३

**अर्पित अनर्पित जाणती कां कोण,**
**अर्पून घेणें ते अनर्पित, अर्पिल्याविण सेवणें तेही अनर्पित,**
**अर्पून अर्पणाविण प्रसाद सेवणारा तोच तुमचा प्रसादि, गुहेश्वरा.**

६४

**तनु स्पर्श होण्याआधी, मन स्पर्श होण्याआधी**
**भूक लागण्याआधि करावे अर्पित**
**गुरुच्या हाती देऊन आधी करावे अर्पित.**
**डाव्या हातांत जाळ उजव्या हाती गवत;**
**हे गुहेश्वरा, लागली आग तुमच्या प्रसादीस.**

अनुक्रमणिका

प्राणालिंग स्थलः

विश्वास ठेवून झाला भक्त, विश्वासाच्या निष्ठेने झाला माहेश्वर, त्या निष्ठेच्या सावधानाने झाला प्रसादि, सावधानतेच्या स्वानुभाव विवेकाने प्राणलिंगी झालेल्या लिंगप्राणाच्या वर्तनाची ही रीत.

६५

**उदक मूर्ति होऊन झाला उदय पीठाचा,**
**स्वदेह शिवपुरात मूल स्थानाची झाली स्थापना**
**वायु पुजारी होऊन परिमळाचा गुच्छ बांधून करितसे पूजन.**
**नवद्वार शिवालयाच्या आदि मध्यस्थानात.**
**गुहेंश्वरलिंग तेथेच झाला स्तंभित.**

६६

**डोळ्याच्या प्रकाशास न येई कल्पिता, कर्णाच्या झेंकारास न येई वर्णित !**
**जिव्हेच्या रुचिस नसे प्रति.**
**सुषुन्मनाळाचे सुविधान न येई प्रमाणिता.**
**अणु, रेणु तृण काष्टात सूक्ष्म अक्षय स्थिर निराळ गुहेश्वर.**

६७

**डोळ्याच्या बुबुळाच्या काळ्या नाळात झाली चौदा भुवनें अंतर्गत.**
**खेळात चालला कठपुतळीचा खेळ.**
**खेळवित असलेल्या सूत्राची पहातो रीत**
**गुहेश्वर होय निराळ चैतन्य.**

शरणस्थल :

विश्वास ठेवून भक्त झाला, विश्वासाच्या निष्ठेने झाला माहेश्वर, त्या निष्ठेच्या सावधानाने झाला प्रसादि, सावधानतेच्या स्वानुभाव विवेकाने झाला प्राणलिंगी, त्या स्वानुभाव विवेकाच्या जाणीवेने शरण झाल्याची ही रीत.

६८

**आठवण सारे विरले, होरपळे भ्रांति.**
**जाणिवेचा पडला विसर खूण निरसन.**
**तेथे शोधती का गति ? शोध ती कां मति ?**

अनुक्रमणिका

**सकल अंग होऊनी नष्ट झाले लिंग लीन**
**डोळांग कळेच्या प्रकाशाचे भंग सामावले हे गुहेश्वरा.**

**६९**

**उपाधिक मन निरूपाधिक मन निश्चला ठायी झाले निवांत.**
**आनंद भाव बिंदु नाळाठायीं निश्चलानें झाले निवांत**
**लिंग प्रकाश प्रज्वलिण्याचे देखिले मी गुहेश्वरा.**

**७०**

**डोकीवर डोके असे एक**
**वरच्या डोक्यानें खालचे डोके गिळीले देख.**
**मरून दूध पिता आल्यास, रथाचा मर्म जाणल्यास सांगा हो !**
**अर्भकाच्या स्वप्नलोकीचे आनंद लाभले गुहेश्वरा तवठायी.**

ऐक्य स्थल :

विश्वास ठेवून झाला भक्त, त्या विश्वासाच्या निष्ठेने झाला माहेश्वर, त्या निष्ठेच्या सावधानाने झाला प्रसादि, सावधानाच्या स्वानुभव विवेकाने झाला प्राणलिंगी, स्वानुभव विवेकांच्या जाणिवेने झाला शरण, ती जाणीव निजाठायी समरस झाल्याने निर्भावपदी निश्चल झाल्याची ही रीत.

**७१**

**वाणीस नसे आवाज, अंतराळास नसे सीमा**
**वाणीस ना ठाव, ठावास ना शेवट**
**गुहेश्वर या शब्दास वेदिल्याक्षणा.**

**७२**

**निर्विकल्प हे असे निजा ठायी, मी आहे निरहंभावाठायी**
**पाहिले म्हणावे तर पाहिले नाही, ऐकिले म्हणावे तर ऐकिले नाही.**
**घन निरंजनाचा प्रकाश स्थल झाल्याचे वाणु कसा गुहेश्वरा**

**७३**

**तू निज जाणकार निश्चिंत, मरणास थोपटलेला महंत**
**तू धनाठायी सामावलेला महिमावंत, पराठायीं बाणावलेला**
**परिणामी, तू बयलुठायी दडलेला भरित.**

**अनुक्रमणिका**

**गुहेश्वर लिंग निराळ सामावलेला असशी तू सहज**

जंगम स्थल :

षडांगाठायी षडस्थल समरस झाल्यानें सर्वाचार संपत्ति झाली निष्पत्ती. महाज्ञानच आपोआप निश्चलतेनें निचपदस्थल, स्थल झाले. अगम्य गमन होऊन, पर हे नाम प्राप्त झाले. निराशारूपी जंगम स्थल सामावून निशब्द या वचनानुभवाने आपणास आश्रयिलेला महानुभावीस निरूपण करण्याकरिता कायारूपी कोयेची धारणा केली. छायेंविना स्थिरावल्याने पाऊलाविना संचार करीत असलेल्या अल्लमप्रभुरायांच्या अंतःस्थितीगतीची स्थिती अशी आहे.

**७४**

**परमतत्त्व, परमार्थ, परापर, वाङ्मानस अगोचर**
**शब्दगंभिर, उपमातीत, उन्नत परशिवज्ञान,**
**ज्ञानज्योति सुज्ञान प्रभेच्या प्रकाशांत वावरणाऱ्या महामहिमाशालीस-**
**शिवज्ञान हेचि शृंगार, महा प्रकाशचि विभुती**
**पंचब्रह्मचि दर्शन, गगनस्थानचि कंथा,**
**आकाशचि कानटोपी, अजांड ब्रह्मांडचि कर्णकुण्डल,**
**आदि आधारचि कक्षपाळ, आनाहतचि कंबरपट्टा,**
**अद्वैतचि योगदण्ड, अगम्यचि योगपादुका,**
**अचलितचि भिक्षापात्र, अप्रमाणचि योगदण्ड,**
**ते विचाराचे संचार, अकल्पितचि भिक्षा,**
**निघणेच गमन, थांबणेच निवास,**
**निश्चिंततेच्या आश्रमांत, घातले तृप्तरूपी सिंहासन,**
**गगनगंभीर या विहिरींतील अगोचरांचे उदक आणून**
**महाघन प्राणलिंगास मंगल प्रकाशाचें केले मज्जन,**
**बिद्वाकाशचि गंध, महदाकाशचि अक्षता,**
**परापरचि बिल्वपत्र पुष्प, निर्मलचि लिंगार्चन**
**महाप्रकाशचि पूजा, नित्य निरंजनचि धूप दीपारति,**
**सकल भुवनादि भुवनेचि स्वयंपाक,**
**आचारचि अर्पित, महास्थळचि थंडपाणी,**
**अखण्डितचि सुपारी, एकोभावचि पान, शुद्धशिवाचारचि चुना**
**विवेकविचाराने तांबुलाचा करावा स्वीकार.**
**महालिंगाची तृप्तीच प्रसाद, सम्यक्ज्ञानचि संतोष.**
**सहज निराभारी यांच्या मेळाव्यांत, निस्सीम निभ्रांति**
**यांच्या सुसंगात; निराशापथचि अनुकूल, निःशब्दचि अनुभाव**
**अनुपम निशून्यचि विश्राम, निराकारचि गमन,**
**पाताळोर्ध्वपवन त्रिभुवनगिरीच्या पर्वतावर चढून,**
**कायारूपि केळीच्या वनांत प्रवेशून संचार करिती**

अनुक्रमणिका

**अशा महिमावंताना इहलोक काय ? परलोक काय ?
त्याच्याहि पलिकडे असे अगम्य निराळ परमज्ञान सिद्धी
महालिंगाचा प्रकाश. हे गुहेश्वरा, तुमच्या निजतत्त्वाचे जाणकार
महामहिमाना म्हणतो मी नमो नमः ।**

जंगम स्थळात सामावून सकल पुरातनगणांना कृतार्थ करण्याकरितां प्रभुदेव संचार करतात.

**७५**

**पायाविण गमन, हाताविण स्पर्शन, तोंडाविण चव
भावचि व्हावे भिक्षापात्र, 'परम देही' म्हणत मागणारा
थोर अशास मज दावा, गुहेश्वरा.**

**७६**

**नयन होऊनि काठी, हातचि भिक्षापात्र
तोंडाने वदावे सकल पुरातनांची करुणा
मनाची भिक्षा जेवून, व्हावी तनु तृप्त
दावी मज गुहेश्वरा, असा महिमावंत.**

**७७**

**जे पाहिले ते सर्व पावन, ऐकिले तो परमबोध,
जे स्पर्शिले ते सारे परीस स्पर्श,
जे बोलती सत्वर ते सकल सद्योन्मुक्त,
संचारित सारे संचार जगत् पावन,
तुडविलेली धरणी सारी अविमुक्तक्षेत्र,
स्पर्शित पाणी सारे पुण्यतीर्थ,
ज्यांनी केली शरणांगतेने भक्ति, तेच होय सायुज्य
गुहेश्वरा, तुमच्या संसाराचा भाट असे उपमातीत.**

*** * * ***

अनुक्रमणिका

# २

प्रभुदेव मृत्युलोक पावन करण्याकरितां संचारास निघाले. सत्यसदाचारी शिवलिंगैक्यांना आपणासारखे करीत, श्री वीरशिवाचाराची घनता करतळामळक करून समस्तांत प्रकाशमान करून दाखवीत, शिवाद्वैत तत्वभेद शिवसुखि यांना कृपेनें निरूपण करीत असत. स्वानुभव अगम्यांचें संम्मेलन भरवीत असत. सम्यक् शरणामध्यें समरस होत होते. परस्थळ लिंगास करस्थळी स्थापून बाहेरची दृष्टिप्राण होऊन भावच आश्चर्यकर होऊन ज्ञानच सर्वांगालिंग झाले. मन करस्थळीं लीन झाले. अकाया हीच काया झाली. उजव्या हातांत वीणादंड धरून, परमानंद ओसरणारे गाण्याचे स्वर नादब्रह्मांत एकरूप पावले होते. दिव्य वचनामृत गात, इहलोकीचा लज्जाभिमान अलक्षून, निर्लेप झाल्यानें इतर साऱ्या भावांचें विस्मरण झाले होते. स्वतःमध्ये आपली सत्याची खोली पडताळीत, अनंत देशामधून संचार करीत, देशांतरांत यात्रिकासारखे चालले होते. पुढे जात असतांना शरण 'अजगण्णाबाबा' निरवयपदी निजैक्य पावल्यानें त्यांची बहिण'मुक्तायक्का' अजगण्णास अंतरल्यानें वियोगावस्थेत प्रलाप करीत होती. प्रभुदेवांनी तो प्रलाप ऐकला. मुक्तायक्का महाज्ञानी असल्याचें त्यांनी ओळखले. तेथे उभे राहून पाहतात आणि प्रस्ताव करतात. तेव्हांमुक्तायक्काकथन करतात.

७८

**साऱ्या मृत्युलोकानें धरिले आहे ज्ञानास आपल्या दाढेंत**
**विनाश न जाणतां नाश पावे सकल लोक,**
**कशी मी जगूं अण्णा ?**
**अंधार प्रकाशांत सांपडलेली संदेही मी एक**
**बांधुनि डोळे माझे, दावितसे आरसा, अजगण्णा तुझा योग.**
**( हा तुझा वियोग )**

७९

**स्फटिक प्रज्वलज्योति दिसते घरांत**
**तिरस्करुनि सत्यास, असत्य आणावे कां आचरणांत ?**
**अंतरंग शुद्धीस आणुनी बहिरंगी.**
**संतोषित न करिता खुला झाला की हो अण्णा**
**जंत्रा सूत्राच्या जोडणीचे क्रम चुकून**
**होऊनी मंत्र भिन्न वदावे का अजगण्णा ?**

८०

**असावे, आंधळ्याचा हात आंधळा धरल्यागत,**
**मुक्याच्या तोंडून काव्य ऐकल्यागत,**
**असावे दर्पणांतल्या प्रतिबिंबागत, धरितां न आल्यागत;**
**अण्णा कासवाच्या शिशु स्नेहागत न राहता**

अनुक्रमणिका

**ही रूढी टाळून गेलांत अजगण्णा?**

८१

**रविच्याठायीं लपलेल्या प्रतिबिंबागत,**
**तुझ्यांत दडलेल्या भेदास भिन्न करावे कां आण्णा ?**
**तुमची वाणी सारी प्रतिबिंब झाली कां अण्णा ?**
**घागरींतील ज्योति दडवितां न आल्यानें**
**जाणकार झाला नाहीस, तू, अजगण्णा !**

आपल्या जाणिवेच्या पुढें सामोरे होऊन दिसणाऱ्या परवस्तु ठायीं विकलावस्थेंत भरून येणाऱ्या भरांत मुक्ताई होत्या. त्यांना प्रभुदेव विचारतात.

८२

**तळहातीं गोंधळलेले धरुनी तव शिर**
**डोळ्यांतून ओघळशी मोत्यांच्या धारा**
**असशी कोण तूं सांग मज जरा.**
**विकसित चांफ्याच्या फुलास, येऊनी मधमाशी सेवी तयास**
**हा विवेक नसे अवगत. सांग मज, शोकानें कां करिशी परिताप**
**म्हणावे एक तर झालेत दोन, दोन म्हणावे तर एकच आहे.**
**ज्ञानाठायीचें अज्ञान, हें कसले सांग**
**दुःखाविण रोदन, रोदनाविण अनुताप**
**हे दिसता आमच्या गुहेश्वर लिंगाठायीं**
**असशी कोण, तूं, सांग गे माई.**

प्रभुदेव विचारतात, तेव्हां मुक्ताई आपली खूण प्रभुदेवांस सांगतात.

८३

**पुसता तुम्ही माझी खूण, काय सांगू मी आहे कोण ?**
**कायाठायीं नुरे माया, भावाठायीं नो हे भ्रम.**
**बोलावून पुसल्यास नसे खूण.**
**एकाच्याही पोटी न जन्मता, आले अयोनितून**
**निर्बुद्ध झाले मी मज काय पुसशी अण्णा ?**
**डोके निरसून सीमातीत उजळी ज्योत**
**माझा पिता अजगण्णा, त्याच्या पाठची आहे मी बहीण.**
**मुक्ताई अक्का  आपली खूण सांगतात, ते ऐकून प्रभुदेव हर्षित होतात.**

अनुक्रमणिका

८४

**न दिसणारे ते देखिले, न ऐकू येई ते ऐकले,**
**स्पर्शण्या न येई ते स्पर्शिले, असाध्य ते साधिले,**
**जे ग्रहण करता येत नाही त्यास मी केले ग्रहण.**
**ज्याचि खोली नाही येत निर्धारिता त्यास मी निर्धारिले,**
**हे गुहेश्वरा तुमच्या अजगण्णास करुनी नमन मी वाचलो.**
**प्रभुदेव मुक्ताईस आपली खूण निरुपितात.**

८५

**शरणु शरणार्थि माते, तेव्हां धरणी आकाश नव्हते अस्तित्व,**
**वायु वाहण्यापूर्वी, अग्नि जाळण्याच्यापूर्वी जल वाहण्यापूर्वी**
**तेव्हा जन्मली माझी माता त्यापूर्वीच न जन्मता.**
**वाढला मम पिता या दोघांच्या पोटी आलो मी.**
**मज बहिणी पाच जणी; निराश्रित होऊनी झाल्या माझ्या पत्नि**
**न स्पर्शिता कामबाण, केला मी त्यांचा संग.**
**मी तुझा दीर आहे अल्लय्या, माझी तू आहेस जाऊ,**
**आमच्या गुहेश्वराचा हात धरुनी व्हावे परमसुखी**
**कळवळ्याचा डोळा उघडशील कां ? मज सांग.**

प्रभुदेवानी आपला पूर्वापार संबंध मुक्ताईस निरुपिला ते ऐकून हर्षित झाली. तेव्हा कथिते.

८६

**देव देवा शरणु शरणार्थि, ऐक बा लक्ष देऊन**
**पूर्वापार संबंध ऐकून झाला अपार आनंद,**
**कानाचा आनंद, मूर्तिमंत झाली डोळ्यापुढे,**
**डोळ्यास झाकलेला आनंद मनास झाले वेद्य**
**शिवशरण दर्शनाचा आनंद मी कसे काय वदुं ?**

हे प्रभो, मरण विदूर महाठायी झाला समरस, अशा माझ्या अज गण्णाचा वियोग दुःख, स्वय झाले, तुमच्या संगाने, तुमच्या दर्शनानें मी कृतार्थ झाले, असे मुक्रयक्का निवेदीतात तेव्हा प्रभुदेव, मुक्तायक्कांची विव्हलता दूर करुन समाधानाचे निरुपण करतात.

८७

**जो होता जाणकार, खूण विदूर आपल्या ठायीं आपण झाला एक**
**सांग तूंच, तयाकरितां करावा का शोक ?**

अनुक्रमणिका

**निर्देही यास वेगळे ठाव असे कां विनाशास**
**अशी भाषा वदणे भ्रांति जाण**
**द्वंद्वातीत असे ऐक्य ना आंत ना बाहेर**
**गुहेश्वराचा शरण अजगण्णास.**

प्रभुदेवांचे निरुपन ऐकून ( अजगण्णा हा परमयोगीश्वर, सुज्ञान परिपूर्ण असून अंतरंगात अविरळ लिंगैक्य होता ; बहिरंगाच्या व्यवहारापासून दूर होता. सर्व कारण निर्मुक्त, सर्वांगरहित, नित्य निजवत्वांत मनो वेद्य होता. सच्चिदानंद रसार्णवि, सद्योन्मुक्त, सवीक्रियातीत निशब्द गंभीर, निरुपम चरित्र, निस्संसारी, सकल तत्व शिरोरत्न, शरीरधारक असून संगरहित होता. इंद्रिये असूनही निःकामी होता. गमनी असून अगम्य, विवेकी असून निर्विचारी, जाणकारी असून त्रिपुटरहित, घनाठायी गंभीर, निस्संचलन, वाणीत परवशता होती ; गतीतं इहपर दोन्हींच्याही अतीत होऊन निराशाभरित होता. स्थितीत निःस्थिती होती. जीवन जगण्यात परवशता होती. अशा या महिमाशालीस अंतरुन कशी मी जगू असे मुलायक्का विनम्रपणें निरुपतात.

८८

**अंबरी खेळणाऱ्या भ्रमर बिंबाच्या**
**आंसवांतील रत्न इच्छिल्यागत होई यास म्हणूं तरी काय ?**
**वेद शास्त्र श्रृति स्मृतीस करितां न येई स्तुती**
**नसे नाद नसे सुनाद, असे ते भेदण्या अगम्य**
**स्वर रहित, संपत्ति विरहित अशा घनाचे काय मी वाणूं ?**
**कशी विसरु मी, मम पिता सम अजगण्णा यांस ?**

मुक्ताईस प्रभुदेवास प्रत्युत्तर-

८९

**पाहिले म्हणणे हेच डोळ्याचें विस्मरण,**
**नाहीं पाहिले म्हणणें मनाचें विस्मरण.**
**समरस झालो म्हणणें ज्ञानाचें विस्मरण.**
**अंतरलो म्हणणे अज्ञानाचें विस्मरण.**
**यामुळें पाहिले, नाहीं पाहिले, समरण झालो, अंतरलो**
**अशा भ्रांति सूतकांस निवारण करुनी पाहावे.**
**हे माते, गुहेश्वर रुपि लिंग अंतरण्यास नसे वाव.**

अनुक्रमणिका

मुलायक्का विनयाने  सांगतात.

९०

**पाण्याच्या बाहुलीस बांधुनी निराळाचे घुंगरु**
**देऊनी बयलु बाहुलीच्या हाती, होता तो गोंजारीत.**
**कर्पूराच्या पुतळ्यास घालूनी अग्नि सिंहासन,**
**विरुनी अग्नी, उरले कर्पूर पाहुनी झाले मी विस्मित.**
**मम पिता अजगण्णाचा योग असे ऐसा.**
**आपले स्वरुप शिवतत्व स्वरूपाठायी सोपवून अजगण्णा मला.**
**चुकवून गेला.**

असे मुक्ताई प्रभुदेवांस सांगतात. त्यांना प्रभुदेव उत्तरतात.

९१

**नसे तो नश्वर, नसे तो शाश्वतः**
**धनास नसे गमन, मनास तो असाध्यः**
**स्वतःस चुकवून समोर अर्पण करणारा तो नव्हता भिन्नभावी.**
**गुहेश्वराच्या शरणांना म्हणता न येई हे असे ते तसे**

प्रभुदेवांच्या सांगण्यास मुक्ताई प्रत्युत्तर देतात.

९२

**तनुवर विश्वास ठेवल्याने अंतरले मी सत्यतेस.**
**मनावर विश्वास ठेवल्यानें दूरावलें मी ज्ञानास**
**भावाच्या पाठी लागल्याने वियोगी होऊनी झाली हानी.**
**बोलुनी ज्ञानाच्या गोष्टी झाले मी अज्ञानाधीन.**
**स्वयं न देखतां झाले भिन्नज्ञानी.**
**अजगण्णा हा महिमान्वित धन वेध झाला,**
**पाडुनी गेला मम मतीस विस्मरण**

मुक्ताईस, प्रभुदेव कथितात.

९३

**तनु आहे म्हटल्यास होतसे पाशबद्धः मन आहे म्हटल्यास होई ते भवबीज.**

अनुक्रमणिका

**बोलुनी ज्ञानाच्या गोष्टी झाली हानी म्हणणेंच अज्ञान.**
**भावनेत गुरफटलो म्हणणेंच रिकामा भ्रम**
**एकदां पाहिले म्हणणे, एकदां पाहिले नाही म्हणणे,**
**एकदा समरस, एकदा अंतरले म्हटल्यास कर्म न सुटता लागे पाठीस**
**तुझ्याठायी तूच जाणिवेनें पाहिल्यास आहे का भिन्न ?**
**गुहेश्वरलिंग जाणल्यास, असशी तुंच स्वयं, हे वेडी, पहा जाणून.**

परतत्व हे वेगळे नाहीं तुच असल्याचे ओळख. असे प्रभुदेव म्हणतात मुक्ताई त्यांना प्रत्युत्तर देते.

**९४**

**धरलेला आचार न सुटे तोंवर, माझ्या ज्ञानाचे विस्मरण न होई तोंवर**
**मन माझें जाणण्यापर्यंत, माझ्या आडंबराचा भार दूर होईपर्यंत**
**कसें सुलभ होईल सांग मज ?**
**चालीची वाट उमजण्यापर्यंत होता न येई, माझ्या अजगण्णाअप्पासम.**

देहेंद्रिये, मन व प्राण इत्यादी सूतके निवारण होईपर्यंत, उत्पत्ति, स्थिति व लय यांचे भेद जाणण्यापर्यंत लिंगास समोर ठेवून करीत असलेली सर्व क्रिया सूतक सुटेपर्यंत स्वयं शिव होऊं नये, असें मुक्ताई सांगतात. त्यांस प्रभुदेव प्रत्युत्तर देतात.

**९५**

**नसत्या शंका आहेत, अशी केल्यास भावना**
**त्या छळतात डोळ्यांपुढे रूप होऊन,**
**नसलेली तनु आहे म्हणेतोंवर**
**सतविते तीच माया होऊन.**
**क्रियारताविण निःक्रियालिंग न पावे असे म्हणणाऱ्यांना**
**संशयाने पुढच्या मार्गांत होई आतंक.**
**तुझे मनच लिंगाचे निजधाम असल्याचे रहस्य जाणल्यास**
**हे वेडे, गुहेश्वररूपि लिंग नसे दूर.**

प्रभुदेवांच्या या निरूपणांस मुक्तायक्का उत्तर देतात.

**९६**

**तनुमध्ये होऊनी तनु, मनामध्ये होऊनी मन**
**प्राणामध्ये होऊनी प्राण राहतो म्हणती हे अनेकांना येईल कां जाणता ?**

अनुक्रमणिका

**परवस्तु मनातीत आहे त्यास तूं म्हणशी अंतरंगी**
**आहें वास ते कसे काय कळेना सांग मज**
**बहिरंगांत आहे म्हटल्यास नाही तो पूजा केल्याविण.**
**तो आहे साकाररहित निराकारलिंग.**
**न होई साध्य ती भक्ति व्याकुळ झाल्याविना.**
**माझ्या मनी धनाची प्रतिष्ठापना करुन व्यक्त करून**
**दाखविणारे नसल्यायोगें,**
**माझ्या अजगण्णांनी घातलेली रेशीम गांठ**
**पाहून पडले मज कोडे.**

मुक्तायक्कांच्या उत्तरास प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

**९७**

**सर्वव्यापी घन हं चिन्हांस येण्याआधी**
**या महाघनलिंगैक्यांस तुज पटवून दाखविणारा**
**कोण आहे सांग.**
**आरूढ मीलनांत नाहीं तेथे कुणाची साक्ष.**
**प्राणलिंग हा अन्य आहे असं वदतां येईल कां ?**
**ज्ञान होऊनी स्वयं नष्ट व्हावे अज्ञान**
**तेव्हां गुहेश्वरलिंगचिं आपण.**

उपदेशाआधीच संसारावस्थेचा त्याग करावा. स्वतःच लिंगाठायी लीन व्हावे. या बुद्धिच्या उदयाने गुरूध्यान केलेला शरण आपल्या आपण जाणून स्वयेच शिव असल्याचें जाणावे. विना भिन्न होऊन शोधूं नये. असें प्रभुदेव निरिपण करतात. त्यांना मुक्तायक्का प्रत्युत्तर देतात.

**९८**

**गुरु वचनाविण न येई लिंगास जाणतां, न येई जंगमास जाणता,**
**गुरु वचनाविण न येई प्रसादास जाणता,**
**गुरु वचनाविण न येई जाणतां आपणास आपण,**
**पूर्वजन्मीं गुरु पूजिल्यानें आतां ज्ञानोदय झाल्यास,**
**गुरु नव्हता त्या आधीच झाले म्हणता येईल कां ?**
**आपल्या ठायी आपण संयोग होईल कां ? न होता येई गुरुविण.**
**माझा अजगण्णा या गुरुविण न होई प्राप्त आरूढ मीलन.**

अनुक्रमणिका

गुरुकृपेशिवाय आपोआप होत नाही या मुक्ताईंच्या म्हणण्यास प्रभुदेव उत्तरतात.

**९९**

**गुरु-शिष्यांत कोणते अंतर,**
**कोणते ते साम्य, कोणांस हे ठाऊक ?**
**गुरुच झाला शिष्य आपल्या विनोदास्तव.**
**कर्मरूपि कौटिल्य मध्यंतरी शिरल्या कारणें**
**भिन्न होऊनी राहिले म्हणणें निश्चयाचे कां ?**
**आदिरहित अनादि विरहित या तत्वांस जाणून पाहतां,**
**तूंच असशी स्वयंज्योतिप्रकाश, या जाणिवेनें**
**तुझ्या तूंच असशी गुरु, तुझ्याहून थोर असें कां गुरु?**
**यास्तव गुहेश्वरलिंग आपणच असल्याचे**
**जाणावे देख आपल्या आपण.**

आदितत्व तूंच परशिव असल्याने तुझा गुरू कोण नाही. मध्यन्तरी कर्मरूपी डोळ्याआड चौकट बांधल्याने तुझ्यांत ज्ञानोदय झाला. त्यायोगे तुझ्या तुंच जाणलीस. हें दुसऱ्याच्या हातून घडत नाही. याकरितां तूंच परात्परवस्तु आहेस. हे तूं जाणून पहा. असें प्रभुदेव मुक्ताईस सांगतात. त्यांना मुक्ताई प्रत्युत्तर देते.

**१००**

**जो जाणतो आपल्या आपणांस त्याची ती जाणीवच त्याचा गुरु होय.**
**जाणुनि ज्ञान नष्ट झाल्यास विस्मरण दृष्ट नष्टचि गुरु होय.**
**दृष्ट, नष्ट गुरु आपणच झाल्यास शिवून दाखविणारा नसल्यानें**
**सहजयोग निश्चित झाल्यावर त्या निश्चितपणाचा निर्णयच**
**निष्पत्ति गुरु होय.**
**आपण गुरु होऊनही माझ्या अजगण्णासारखा गुरु असावा.**

कोणत्या क्रमाने कां होईना गुरुशिवाय होता येत नाही. या मुक्ताईच्या उत्तरांस प्रभुदेवांचें प्रत्युत्तर.

**१०१**

**मज झालें ज्ञान म्हणणे हेच अज्ञान.**
**विस्मरणाचा पडला विसर म्हणणेही अज्ञान,**
**साकार नष्ट, निराकार दृष्ट म्हणणें भावनेचें अशांतिपण.**
**शिष्यत्व पत्करतांच गुरुपणाचा होई लोम.**
**हा शिष्य हा गुरु म्हणतांच गुरुत्व विरले**
**निर्णयाठायीं निजैक्य झालो म्हटल्यास चुकतसे सावधानाठायीं**

अनुक्रमणिका

**सहज संबंधास असतो गुरु, विना असहजास असतो का गुरु?**
**गुहेश्वर लिंगाठायीं अन्य म्हटल्यास गुरु म्हणता येईल,**
**स्वयं म्हटल्यास होई शब्दातीत.**

आपण लिंग झालो असे म्हणेंपर्यंत गुरु आहे. आपण आपणच झाल्यावर गुरु आपणच कसा होतो हेप्रभुदेव निरूपण करतात. मुक्ताई त्यांना प्रत्युत्तर देते.

**१०२**

**जो अद्वैतास खोल रुजवून म्हणतो मी झालो द्वंद्वातीत**
**तो असावा शिशु देखिल्या स्वप्नागत**
**ते बोलून दाखवीपर्यंत तो नव्हे कां द्वैतभाव ?**
**होऊनी जाणकार विस्मरणास करूनी नाश म्हणती गुरुस टाळता येते**
**ते वात्सल्यपण समोर सांगण्याची रीत ती कोणती ?**
**मनाच्या टोकाच्या अग्रावर ज्ञानाच्या डोळ्यांसमोर**
**स्वयंप्रकाश जो दिसतो तो आपणच होऊ शकतो कां प्रकाश ?**
**समरस होण्याचे जाणूनही नेणता झाल्यास**
**माझ्या अजगण्णासारखे व्हावे शब्दमुग्ध आपण**
**शब्द संचयाची वाणी स्वयं नोहे जाण.**

तुझ्या तूं जाणून परब्रह्म झाले असे म्हणणे निशब्द वेद्य झाल्याशिवाय शब्दसंचय होऊ नये असे मुक्ताई म्हणते. त्यास प्रभुदेव उत्तरतात.

**१०३**

**बोलणेंच ज्योतिर्लिंग, स्वरचि परतत्व.**
**टाळ-ओढांची सपुटीच नाद-बिंदु-कळातीत.**
**ऐक मूढमति, गुहेश्वराचें शरण बोलुनी सुतकी होत नाहीत.**

शिवचरण शब्द सुतकी नाहीत. या प्रभुदेवांच्या सांगण्यास, मुक्ताईचें उत्तर-

**१०४**

**जे चालून चालून शेवट गांठती, ते बोलून बोलून दाखविती कां ?**
**जोवर बोलीनें बोलून दाखविती तोंवर ते लटकें असें मी म्हणते**
**वाणीच्या मंथनानें झालेले ज्ञान ते करण मंथनानें होते.**
**अनुपम स्वरभेद झाल्याची रीत ती कोणती ?**
**मज सांगा, समोरच्यांना जिंकण्यास्तव असें बोलतां काय ?**
**मनांस मन साक्ष असल्यानें ती नच होई निष्पत्ति**

अनुक्रमणिका

**माझ्या अजगण्णा आप्पांस शब्दांचा आल्यानें किळस तो झाला मुग्ध.**

समोरच्यांना जिंकण्याच्या हेतूनें तुम्ही असे बोलता. जाणण्याशिवाय सहजज्ञान तुम्हास नाही असे मुक्ताई सांगतात. त्यात प्रभुदेव उत्तरतात.

**१०५**

**जो जाणतो आपल्या आपण त्याची सारी वाणी परतत्वजाण;**
**ज्यास होई आपले आपणास विस्मरण ती सारी वाणी माया जाण;**
**जाणून विसरून शिवयोगी बोलतो ते शब्द सारे**
**उपदेशाविना असती कां भिन्न ?**
**तुझ्या मनीची तळमळ तुज द्यावी समजावुन यास्तव बोललो तुजशी**
**माझ्या मनीं नसे किंचित् दोष**
**आमच्या गुहेश्वलिंगाची तूं आहेस कारुण्याची शिशु**
**तुझे तोंड उघडण्या लाविले विना आहे कां भिन्न ? सांग बये ?**

प्रभुदेवांच्या या निरुपणास मुक्ताई प्रत्युत्तर देतात.

**१०६**

**बोलण्याची आशा अजुन तुमची जाईना.**
**चालण्यास काय सांगता दुसऱ्यांना ?**
**शरीर आशेचे चलन वलन सुटेना**
**माझ्याशीं आतां कराव्या अनुभाव गोष्टी आपण ?**
**आपण झाल्याविना सांगतां येईल कां समोरच्यांना ?**
**जाणकार असूनही आपण न सांगता, सांगत असे जाण,**
**मम अजगण्णा आप्पा.**

"तुझ्या शरीराची आशा अजून सुटेना, बोलीचे मंथन मिटेना, मला कसल्या ज्ञानाच्या गोष्टी सांगता ? जा हो जा." असे मुक्ताई म्हणल्ये. प्रभुदेव प्रत्युत्तर देतात.

**१०७**

**अंगाची कळा लिंगाठायीं उमजल्यास**
**अंग ही शंका नसे जाण शरणास !**
**प्राणाची कळा ज्ञानानें जाणल्यास,**
**शब्दावडंबराच्या आधीन न होई जाण,**
**चालतो परि निर्गमनी असे शरण**
**बोलतो परि निःशब्द असे जाण !**

अनुक्रमणिका

**हे माते, गुहेश्वर शरणांस नसे खूण**

प्रभुदेवांच्या निरुपणांस मुक्ताई उत्तर देते.

**१०८**

**हातानें खूण, तोंडानें ओरडणें**
**माझ्या दिरा, आवाज करा बंद ! नका बोलूं मोठ्यांदा !**
**गाराच्या घागरींत भरुनी मोती माणिक**
**उचलून देण्यास नाहीत कोण हुडकीत आहात सखीना.**
**मनाच्या तनूंत, त्या तनुच्या मनीं**
**आपणच उचलून घेतल्यास,**
**मन सीमा ओलांडितां पघळून येई ऊतूं**
**माझ्या अजगण्णाचा योग आहे असा.**

जलबिंदु स्वरूपासारखा तुझा तनुरुपी घट आहे. त्यांत ज्ञानरूपि रत्न भरून. तुझ्या तूं धारण करण्याचे जाणता येत नाही. अजून सर्वींना हुडकत आहेस. तुझे हेच कां ज्ञान ? म्हणते मुक्ताई. त्यांस प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

**१०९**

**ज्ञान निरसून, खूण विनाशून जयाची झाली भाव भ्रांति निभ्रांति**
**तया ठायीं हुडकती कां खूण** ?
**आपणच नुरुन, आपणच उरून आपणच होतो निजशरण**
**तयांच्या अंतरंगी उरे कां ज्ञान** ?
**गुहेश्वर शरणांची अंतःस्थिती देह धारींच्या डोळ्यांस वाटे संदेह**
**निःसंदेहीना निजचि असे जाण.**

प्रभुदेवांच्या उत्तरांस मुक्ताईचे प्रत्युत्तर

**११०**

**बोलत नाहीं या म्हणण्यांतच आहे बोलणी,**
**चालत नाहीं म्हणण्यांत आहे चालणें**
**अंगाठायी लिंग लीय झाले म्हटले तरी तेथेच आहे अंग.**
**अनंगरंगी झालो म्हणण्यांत आहे विषयसूतक.**
**मीच मी झालो म्हणण्यांत आहे मी-तूंपण**
**जाणून विसरल्याची रीत तो कोणती मज सांग**
**जाण नष्ट होऊन अजाण लय पावलेला माझा अजगण्णा**

अनुक्रमणिका

१११

**अंग आणि अनंग हे दोन्ही करुनी निर्मूलन**
**निजाठायीं निश्चेल जो लिंगैक्य तयाच्या अंगावरील साऱ्या क्रिया**
**लिंग क्रिया जाण :**
**जो पावे मनोलय त्या लिंगैक्यांचें सारे अनुभव ज्ञान नष्ट शब्द जाण.**
**जो आपल्या ठायीं आपण होई तद्वत त्या शिवयोगीस भिन्न नसे जाण**
**सांगतो गुहेश्वर साक्ष ठेवून.**

११२

प्रभुदेवांस मुक्ताईचे प्रत्युत्तर.

**वीज पडल्यानें होई तयार विहीर तिला पायऱ्या कशाला** ?
**जो जाणतो समरस त्यांत पुनः मती उद्‌भवेल का** ?
**दिवा असलेल्या घरांत अंधार आहे म्हणणें योग्य होईल का** ?
**आपल्या ठायी आपण तद्वत झाल्यावर,**
**ब्रह्म-परब्रह्म मीच आहे म्हणत नव्हता, माझा अजगण्णा पिता** ?

मुक्तायक्काचे सांगणे ऐकूण प्रभुदेव निरुपण करतात.

११३

**बोलण्यातच चालण्याचे होईनाश, चालण्यातच बोलण्याचा होई,**
**भावनेचा मलिनपणा लाजून आपोआप सोडून जाई,**
**गुहेश्वररूपि ज्ञान पूर्ण वांझ होई.**

११४

प्रभुदेवानी आपल्या निजपदाची स्थिती निरुपल्यावर मुक्तायक्का म्हणतात

**होय, होय शिवचरणांची महति कोणास नाही कळत !**
**लोखंड खाल्लेल्या पाण्यागत, हळदिने खाल्लेल्या सावलीगत.**
**अग्निंत दडलेल्या कर्पुरागत, पोकळींत सामावल्या वायुगत,**
**राहणीची अंतःस्थिती बोलून दाखवतो.,**
**अशा बोलीस गवसेल कां** ?
**जाणण्यास नाहीं मति, चिंतनास नसे मन.**
**माझ्या अजगण्णा अप्पा ठायीं सामावलेल्या तुमच्या महतीस मी**
**नमो नमो म्हणते.**

अनुक्रमणिका

मुक्ताईचे कथन ऐकून प्रभुदेव निरवयल समाधिचे भेद निरूपतात.

१९५

**मुक्तीस होऊनी मुख, युक्तीच्या बाहेर,**
**ज्ञानास ज्ञान होऊन असल्याचे रहस्य मज आले दिसून !**
**ज्ञान जाणून अज्ञान नष्ट झाल्याची स्थिती,**
**तुमच्या ठायी सामावली.**
**गुहेश्वर शरण अजगण्णाची अंतःस्थिती**
**बयलुठायी किरण एक झाल्यापरि अभिन्न होऊनी एक व्हावे जाण.**
**प्रभुदेवानी महालिंगैक्याचा रहस्य निरूपण केल्यावर**
**मुक्तायक्कानं तो उपदेश**
**मनोलयस्थानांत धारण करून नित्य निरवलय समाधींत मुक्तायक्का**
**निजलपावण्या**

११६

**घन महिम शरण संगाने घनास घन झाले वेद्य.**
**आतां जाणणे नाहीं, विसरणे नाही; न मिलन न वियोग**
**मनाची सीमा होऊनी पार निरवलय झाल्याच्या सुखास**
**शून्य वा निशून्य वदता येईल कां शब्द मुग्ध झाल्यावर ?**
**अजगण्णा अप्पा ठायीं एक झाल्यावर**
**झाले बा, मी अग्नित जळलेल्या कर्पूरागत**

मुक्तायक्काच्या प्रलापाचे सांत्वन करुन प्रभुदेवांनी महानुभवाचा बोध केला. अजगण्णाचीं अंतःस्थिती मुक्तायक्काच्या सर्वांगात प्रतिष्ठित करून दाखविले निरवयल समाधींत निश्चल केले. तेथून प्रभुदेव सिद्धरामेश्वरांच्या दर्शनाकरिता सोन्नलगीपूरास आगमन करतात.

****

अनुक्रमणिका

# ३

मुक्तायक्काच्या प्रलापाचे सांत्वन करून प्रभुदेवांनी मुक्तायक्कास महानुभावाचा बोध केला. अजगण्णांची अंतःस्थिती त्यांच्या सर्वांगात प्रतिष्ठित करून दाखविली. निरवयल समाधीत निश्चल करून प्रभुदेव तेथून सिद्धरामदेवांच्या दर्शनाकरिता सोन्नलगीपुरास आगमन करतात. त्या गावातील जनसमूहास पाहून विडंबन करतात.

**११७**

**त्या बाजारांत जमलेल्यास म्हणूं तरी काय ?**
**व्यापार हर एक नमुन्याचा, माल असे वैविध्यमय,**
**तेथें घेणारे नाहींत, देणारेही नाहीत,**
**हा वृथा विलास कशापायी ?**
**वेडपट देवानें निर्मिले आहे**
**तरी काय ? या बुद्धिभ्रम जगास ?**
**गुहेश्वरा, झालो मी हें चकित पाहून.**

**११८**

**सागरांतील प्राणी राहू शकतील कां अन्य ठिकाणी ?**
**भवसागरांत असणाऱ्या जीवांची तीच गत,**
**त्यांना असू शकेल कां अन्य ठाव ठिकाणा ?**
**गुहेश्वराची लीला झाल्यास जगन्मय**
**वाटे मज हा विस्मय.**

गावातील लोकांना पाहून विडम्बना करीत पुढे जात असताना, एक लाख शहाण्णव हजार शिवालये बांधणाऱ्यांना पाहून प्रभुदेव हास्य करतात.

**११९**

**बांधुनीं दगडाचें घर, दगडाचा देव करून**
**तो दगड आणून ठेवती, दुसऱ्या दगडावर**
**देव गेले तरी कोठें हो ?**
**हे गुहेश्वरा, लिंग प्रतिष्ठा केल्यास होई**
**नायक नरक.**

अनुक्रमणिका

१२०

**देहच आहे हो देऊळ आणिक दुसरे हवे**
**कशाला देऊळ ? प्राणचि आहे लिंग आणिक**
**अन्य लिंग कशाला ? नाही सांगता येत,**
**नाहीं ऐकता येत. गुहेश्वरा, तू झाल्यास दगड,**
**मी सोऊ तरी काय देवा ?**

शिवालयाची प्रतिष्ठा करीत असल्याचे पाहून उपहास करीत ते पुढ येतात. तेथे तलाव बांधीत असल्याचे पाहून प्रभुदेव विडम्बन करतात.

१२१

**वाढुनी अन्न, बोली सत्य, ठेविल्यास पाणपोई,**
**बांधिल्यास तळें,**
**मरणानंतर वरती स्वर्ग मिळे,**
**परि अशानें शिवाचे निजत्व न होई साध्य.**
**गुहेश्वर, जाणकार शरणास नको कोणतेही प्रतिफळ.**

सिद्धरामदेव तलाव बांधित असल्याचे पाहून प्रभुदेव विडम्बन करतात. ‘मी एक तलाव बांधला आहे’. त्याचे परमार्थसूचक निरूपण करतात.

१२२

**तनुरूपि चढण, मनरूपि बांधारा, आचारचि सोपान,**
**परमानंद हेचि जल भरून,**
**तळे बांधणारा जाणकार नाहीं मी पहिला जाण.**
**मी बांधलेले तळें झालें स्थिर. तुमची आण गुहेश्वर.**

१२३

**तळें बांधण्याचें वडारकाम काय सांगू हो त्याची महिमा ?**
**खोदून जमीन पाणी भरण्याचें असे श्रम.**
**दगडावर दगड बसविणें हे कसलें अज्ञान ?**
**अशा या जिण्याची पाहुनी रीत,**
**हे गुहेश्वरा, झालो मी विस्मित.**

तळे बांधित असल्याचे पाहून हसे करून प्रभुदेव, तळे बांधणाऱ्या वडारांना विचारतात की, सिद्धरामय्या कोठे आहेत ?

अनुक्रमणिका

१२४

**धुवुनि आत जलभरणाचे नच उमगत,**
**सांगारे, झाला कसा हा भ्रमित !**
**जलसंग सांडण्याचें न जाणता,**
**अपेक्षिती जल, तो कोठे आहे सांगा मज.**
**शोधुनी जमीन न जाणतां त्याचे अंतस्थ.**
**मज सांगारे, तळे बांधितो, त्याची कसली ही पद्धत ?**
**आमच्या गुहेश्वराचें उन्नत स्थान तो न जाणी**
**असा अजाण सिद्धराम कोठे आहे, सांगारे मज.**

बांधकामात निरत असलेला कोठे आहे म्हणून प्रभुदेव त्या वडारांना विचारतात. गुरुनिंदा ऐकून मुकाट्याने न बसता ते कामकरी दगड-धोंडे-काठ्यांनी मारहाण करून प्रभुदेवांना दुखापत करतात. तेव्हां प्रभुदेवांना झालेल्या दुखापती परतून त्या वडारांनाच होतात. हा प्रकार पाहून प्रभुदेव उद्‌गार काढतात.

१२५

**गुरूस नाही जाणत, थोरांना नाही ओळखत;**
**देवांस नाही जाणत, भक्तांस नाही ओळखत;**
**लिंगास नाही जाणत, जंगमांस नाही ओळखत;**
**येण्याचे कारण नाही उमजत, अचल अंतःस्थिती**
**नाही जाणत शिवशरणांना दुखविती अशा**
**पातकीना म्हणावे तरी काय ?**
**गुहेश्वरा, तुम्हांस दुखविल्याच्या यातना न जाई वाया,**

१२६

**“ऐका हो बंधूनो, सहज बोलणी न होती सहन.**
**लोकी न भजती असहजाविण.**
**तळें बांधणाऱ्यांस पाहून वडुरामय्या म्हटल्यास**
**रागाच्या भरात लिंगदेवाच्या तनूंस दुखवितात काय ?**
**आमचा गुहेश्वर लिंग या जगा परिपूर्ण झाल्यायोगे**
**शरणांची व्यथा, पातकीना परत भोगावे लागत असल्याचे**
**पाहून हसतसे अल्लय्या”.**

अनुक्रमणिका

१२७

**मातेचे सुखदुःख भोगावे लागते गर्भातील शिशूंस**
**शिवशरणाना दिल्याचे सुखदुःख होती शिवास,**
**करणेंद्रियेधारक मरणरहितावर रागावल्यास**
**देहधारींचाच भोगावे लागते विना,**
**निर्देहीना कसा हो स्पर्शू शकेल ?**
**हे गुहेश्वरा, विस्तवास वाळवी स्पर्शु शकेल कां ?**

सिद्धरामदेवांनी अज्ञ जनांना उपदेश केल्यामुळे त्या शिष्यांनी केलेले पाप त्यांच्यावरच उलटते, असे प्रभुदेव सांगतात.

१२८

जगांतील जीवांना धरून आणून, उपदेश देणारा गुरु, त्याचा देणे घेणेचा चालतो व्यवहार.

**तेथे बाणावेल कां निजत्व ?**
**क्रम न जाणतां, संसारजीवीनी केलेला अपराध**
**त्यांना गिळून, त्या गुरुसही देतसे तो उपद्रव.**
**गुहेश्वरा, आपण बाळगलेला वेताळ, आपणास**
**खातो म्हटल्यास, "खा" वा "नको"म्हणण्यास**
**अवकाश देईल कां तो ?**

प्रभुदेवांना झालेल्या दुखापती परतून त्या शिष्यांनाच झाल्याने, जखमेनें घायाळ होऊन, आक्रंदन करीत पळत येऊन, ते सिद्धरामदेवापुढे व्यथेने सांगतात, 'देवा, तो एक इंद्रजाल आला आहे. तो तोंडाला येईल, तशी तुमची निंदा करीत होता. ते ऐकून गप्प न बसता, गुरूनिंदा करणाऱ्या त्यास आम्ही सर्वांनी दगडधोंड्यांनी मारले. त्याला मारलेले दगडधोंडे परतून आम्हासच मार बसला. त्यामुळे आम्ही घायाळ झालो आहोत. हे त्यांचे निवेदन ऐकून, सिद्धरामदेव, तेथे आलेले प्रभुदेव असावेत हा विचार न करिता क्रोधास बळी पडले. शिष्याचे दुःख ते आपलेच असे ते म्हणतात.

१२९

**अरेरे देवा, ते आहेत तुमचे, त्यांना झालेले दुःख माझेच दुःख**
**जाणून बूजून जे करिती, ते मज नाही सहन होत !**
**तुम्हास करिती जे विरोध, तयांना पाहून**
**मज येतो त्यांचा राग, कपिलसिद्धमल्लिनाथ,**
**तुमचा वास असे शिष्यांत.**

अनुक्रमणिका

तेव्हा क्रोधाने सिद्धरामदेव भालनेत्र उघडतात.

१३०

**हा सारा शिष्यगण, हे त्रिनेत्रधारी ! असे तुमचाच गण.**
**कोरड पडलेलें तळें तोंड वासल्यागत, आले आहेत ते दैनावस्थेंत**
**पेटलेली तळपायाची आग पोंहोचे माझ्या मस्तकास**
**त्याक्षणीं उघडे रे भाळनेत्र कपिलासिद्धमल्लेश.**

सिद्धरामदेवांनी लगेच भाळनेत्र उघडून त्यास आज्ञापिले.

१३१

**ब्रह्म असो वा विष्णु असो, असेना कां इंद्र ?**
**असेना कां तो चंद्र ?**
**आमच्या शिवशरणांचे दुःख ते माझेच देख.**
**त्याना जाळून नाश करण्याकरता आज्ञापितो आमुचा**
**कपिलसिद्धमल्लेश आपल्या भाळनेत्रास**
**त्यासमोर उभारणारा मस्तीखोर नाही मी पाहिला कोणास.**

क्रोधाने पेटुन त्या भाळनेत्रास आज्ञापिलेले सिद्धरामदेव आपल्या भाळनेत्रांच्या महाज्वाळांना पाहून, आश्चर्यचकित होऊन उद्गारतात.

१३२

**देवा, तुमची मूर्ति पाहण्यास दृष्टि नाही हो माझी पोहचत,**
**तुमचे तेज पाहण्याची ताकद आहे कां कोणांत ?**
**देवा रे, तुमच्या तेजाची उपमा कोण देऊं शकणार ?**
**तुम्ही क्रोधानें भाळनेत्र उघडल्यास कोण उभारतो त्यासमोर**
**कपिलसिद्धमल्लेश्वर, तुमचें तेज तिन्ही लोक गिळे,**
**तें पाहून मिटतो रे मी माझे डोळें.**

सिद्धरामदेवांनी सोडलेल्या भाळनेत्राचा महाज्वालेच्या लोंढा ब्रह्मांडमंडल व्यापून येत असल्याचे पाहून प्रभुदेव म्हणतात.

१३३

**वणवा पेटल्यास बळी पडे कानन.**
**वडवाग्नि पेटल्यास बळी पडे सागर.**
**देहांत आग पेटल्यास पडे आहुति देहाची.**
**कालाग्नीनें पेट घेतल्यास सकल लोक पडे बळी,**
**शिवशरणांच्या मनांत कोपाग्नि पेटल्यास,**
**निंदकांची होई होळी, गुहेश्वरा, तुमच्या मायेच्या**
**या प्रबल अग्नीस मी नाही होतहो बळी.**

भू-आकाश व्यापून येत असलेली ही महाज्वाला कोठून येत आहे, हे प्रभुदेवांनी तात्काळ ओळखले. सिद्धरामांच्या भाळनेत्राचीच ही ज्वाला आहे असे ते ओळखतात.

१३४

**सांडुनि कायागुण, मर्दुनी मायामद,**
**कामक्रोधादींनी घेतली माघार.**
**सकल अंग लिंगलीय होऊन डोळ्याच्या कळेचे**
**तेज न उरे रे लवलेश.**
**गुहेश्वराच्या विरहाग्नीत जो होरपळला आहे, त्यास**
**पुन्हा जाळतो म्हणतो हा सिद्धरामेश.**

१३५

**तापत्रयांत जे होरपळले, अशा देहधारकास आणून,**
**ज्ञानरूपि अग्नीस ज्यांनी दिली आहुति,**
**ज्ञानरूपि कायेस, जो जाळी निशून्य तेजांत.**
**निशून्य शब्द जाळून जो करी भस्मधारण,**
**अशा लिंगैक्यास जगाच्या स्थितीगतीचे पडे विस्मरण**
**स्थिरावे निर्वाणी**
**गुहेश्वर लिंगाठायी, अल्लमाच्या मीपणाचे झाले आहे विस्मरण.**
**अशा मज, जाळतो म्हणतो सिद्धरामेश, म्हणावे तरी**
**काय अशास** ?

प्रभूदेव आपले माहात्म्य दर्शवून सिद्धरामदेवांचा गर्वहरण करण्यास्तव त्या भाळनेत्राच्या ज्वाळा आपल्या श्रीपदी दडवून म्हणतात.

अनुक्रमणिका

१३६

**तुमची शक्ति वसे जगांत; जगाची शक्ती वसे तुमच्यात**
**जगांतल्यांत, तुमच्यांत भेद झाल्याचें पाहून झालो हो मी चकित.**
**तेव्हां एकदां त्रिपुर दहन केल्यांचे पाहून, लाजले होते माझें मन.**
**कामास जाळून, म्हणवून घेतले होते तुम्ही कामहर,**
**पाहून तव अहंकार मज आला होता वीट फार.**
**काळास जाळून दाखविले बोट, तुझ्या घनतेचे**
**हास्यास्पद मज वाटे.**
**हे गुहेश्वरा, क्रोधानें तूं उघडल्यास भाळनेत्र,**
**माझ्या तळपायांत दडे रे तुझा क्रोध.**

सिद्धरामदेवांच्या भाळनेत्र महाज्वालेस प्रभुदेव आपल्या तळपायात दडवून, सिद्धरामदेवांची शक्तिअजमावण्याकरिता आपल्या तळपायातील अग्निनेत्र उघडित असल्याचे सांगतात.

१३७

**हर करुणेनें संपादिले सामर्थ्यबळ,**
**त्या जोरांवर शिवशरणांशी स्पर्धिल्यास होईल कां हो ते भले** ?
**अघटित घटिताना असती अघटित घटित जाण !**
**एकानें उघडल्यास भाळनेत्र, दुसरा उघडतो आपल्या**
**तळपायातील नयन.**
**उपमातीत असती हो गुहेश्वरांचे शरण.**

प्रभुदेव आपल्या तळपायातील अग्निनेत्र उघडतात.

१३८

**ज्यांना आहेत दोन डोळें त्यांना म्हणतो मी चतुर्भूज.**
**ज्यांना तीन डोळें आहेत, त्यांना म्हणतो माहेश्वर.**
**ज्यांना अंगभर डोळें आहेत, त्यांना म्हणतो सदाशिव.**
**गुहेश्वरा, तुमच्या शरणाच्या तलपायांत**
**डोळा उद्‌भवल्यास, म्हणतो मी त्यास निरुपम महिमाशाळी अल्लम.**

आपल्या तळपायात उद्‌भवलेल्या डोळ्यांचे तेज बघत बघत प्रभुदेव वाखाणतात.

१३९

**तुमचें तेज पाहण्यास्तव मागें सरून पाहत असता,**
**झाले मज शतकोटी सूर्य प्रकट झाल्यागत.**
**झळकणाऱ्या वेलीचा देखिला मी संचय,**
**मज होई हो याचे विस्मय.**
**गुहेश्वरा, तुम्ही झाल्यास ज्योतिर्लिंग त्यास उपमा देऊन**
**पाहणारा जाणकार नाहीहो कोण.**

प्रभुदेव आपल्या तळपायातल्या डोळ्याच्या महाज्वालेस सिद्धरामदेवांकडे जाण्याची आज्ञा करतात.

१४०

**कालाग्निसम पेटवुनी भयंकर ज्वाला,**
**जगास जाळतो म्हटल्यानें, शिवशरण न होती भयभीत.**
**शशिधर रागानें उघडल्यास अग्निनेत्र,**
**शिवभक्त ते मनावर नाही घेत.**
**असमाक्ष लिंगास वश करून घेतलेले शरण,**
**कोपाग्निचे उघडल्यास नेत्र,**
**सामना करणारा आहे कां हो या चतुर्दश भुवनांत ?**
**गुहेश्वरा, तुमचा ज्ञानप्रकाश झाला प्रज्वलित,**
**सिद्धराम या शिवयोगीचे हृदयच तळमळणार**
**असें आज्ञापिले अल्लय्यांनी.**

तेजोमय होऊन आठी दिशांना आलिंगीत, धरणी आकाश आवरून गिळीत, सचराचरांना 'उःफ्' म्हणून फुंकर मारीत, समस्त सागरांस पीत, 'भुगिर्भुगिल' अशी गर्जना करीत, महावेगाने ब्रह्मांडाची सीमा दुभंगित येत असताना पाहून चतुर्दश भुवनांचा प्रलयकाल न भरता त्यापूर्वीच हा महाप्रलयकाल आला हे पाहून हरीब्रह्मादि सकलदेव जर्जरित होऊन 'शिवधो-शिवधो' म्हणत कैलासास धावले. अनंतमुखाचे एकमुख होऊन, एकमुख अनंतमुख होऊन येत असलेल्या महातेजाच्या राशीस पाहून, ही कुठली असावी बरे महाज्वाला ? हे विवेकाने सिद्धरामदेवांनी ताडले. हा 'शिव' आहे याची जाणीव होऊन अनुतापाने वदतात.

१४१

**देवा, युग जुग हे एकदा होती नाश धगिल भुगिल ही**
**रोषाची ज्वाला असल्याचे आज माझ्या**
**डोळ्यास झाले हो गोचर !**
**हे देवा, तुम्ही आहांत याची ओळख मज नाही पटली.**

अनुक्रमणिका

मी माझ्या कायेच्या कळवळात होतो, परि
तुम्ही आहात याचा नाही केला विचार !
यायोंगे झाली माझी हार.
धनी रागावल्यास चाकरांवर,
कोणाचें नुकसान, सांग बा तूच कपिलसिद्धमल्लेश्वर ?

१४२

न येई जाणतां ऐसे धन, तयास जाणून साधनें
जिंकिले शरणगण.
अशा घन महिमाशाली शरणांच्यापुढें चालेल कां
हो माझा प्रताप ?
शरण आहेत सारे लिंगप्रभेंत,
मी आहे अहंकार पिंजऱ्यांत,
माझ्या भाळनेत्राची अग्नि होऊनी शमन,
लाजेनें मज बिलगली परतून,
सदैव रक्षितो म्हणणारे गुरुवचन,
आज झाले कीं हो हनन ? कपिलसिद्धमल्लिनाथा ठायीं
मी होतो नाहींसा न उरता,

अनुतापाने सिद्धरामदेव आणखी वदतात.

१४३

हें देवा, आजच्या या अवस्थेमुळे मज काळ कां रे येईना ?
आजच्या या अवस्थेनें मम लिखित पुसुन कां जाईना ?
आज क्षणभर तरी तूं कां बरे येत नाहीस ?
माझ्या देवा, कपिलसिद्धमल्लेशा,
तुम्हांसाठीं या अवस्थेंत असतांना लिखितही
पुसेना, प्राणही जाईना,
असे ठेवलांत हो मज, माझ्या देवा.

१४४

हायरे देवा, मज दुःखाच्या खाईत लोटलात,
माझ्या विकारांत माझी आहुति दिलांत.
हे कपिलसिद्धमाल्लिनाथ,
तुझ्या कोपाग्निच्या महाज्वालेनें पेटविले माझे घोरारण्य.

अनुक्रमणिका

सिद्धरामदेव अनुतापाचे शमन करून समाधानान प्रभुदेवास शोधण्यास सुरुवात करतात.

**१४५**

**मध्यरानांत न म्हणतां दिनरात,**
**पूर्वी मी तुज 'अप्पा, देवा !' म्हणत होतो हुडकत,**
**'मी येथें आहे, ये माझ्या मुला', असें वदत**
**जवळ घेऊन आसवें पुसून, आपलें निजस्वरूप**
**दाविलेल्या देवाचें चरण आज माझ्याकडे चालत आल्यास**
**मज नकळत मी जाईन तुज भुलून, यास्तव माझ्या मनांस**
**जागे केलांत. त्या तुज शोधून ठाव देतो माझ्या हृदयांत**
**हें कपिलसिद्धमल्लिनाथ.**

**१४६**

**देवास जो धुंडित जातो, त्यास देवच हुडकत येतो,**
**देव कोठें आहे तेथें जाऊन, 'धावरे देवा धाव',**
**म्हटल्यास, आपल्यात बिंबवून घेतो**
**माझा कपिलसिद्धमल्लिनाथ.**

प्रभुदेवांना शोधण्याकरिता जात असलेल्या सिद्धरामदेवास त्यांचे शिष्य त्यांना म्हणतात, 'देवा, तो जेथे उभा ठाकतो, तेथे त्याची सावली नसते. तो संचार करतो पण त्यास पावले नाहीत. काया असून काथा नाही. आता तुम्ही कोणत्या प्रकारे त्याच्या रागाचे सांत्वन करणार ?" ते ऐकून सिद्धरामदेव शिष्यांना म्हणतात.

**१४७**

**तो ज्या मार्गाचा अवलंब करितो, तोच मी करितो**
**तो ज्या स्थितींत राहतो, त्यांतच मी राहतो.**
**तो जें सोडतो तेंच मी सोडतो, त्याच्या पाठीस मी लागतो,**
**माझा प्राण त्याच्या हवाली करतो,**
**कपिलसिद्धमल्लिकार्जुनाठायीं मी होतो एकरूप.**

**१४८**

**मदगजास मदगजच धरतो विना न धरीरे अन्य.**
**अरुपीस अरुपीच धरतो विना, न धरी अन्यरूपी,**
**रूप नसलेल्या त्यास, आणुनी रूपास धरतो मी**
**कपिलसिद्धमल्लेशास.**

अनुक्रमणिका

**१४९**

**धावत धावत जाऊन धरितो मी तयास,**
**लागुनी पाठीस मनाच्या अग्रभागी धरितो मी,**
**महाप्रचंडमनानें धरितो मी कपिलसिद्धमल्लिकार्जुनास.**

असे सांगत असताना, सिद्धरामदेवास त्यांचे शिष्यगण विचारतात, 'देवा, त्यांच्या कोपावेशाने आलेल्या तलपायाच्या डोळ्यांच्या त्या महाज्वालेस कसे तुम्ही थोपविणार ?' त्यास सिद्धरामदेव सांगतात.

**१५०**

**तयाने आणिला तळपायाचा कोप मनास,**
**त्या मनाच्या कोपास ठेविले तयांनी हृदयांत,**
**तयाच्या पदास माझ्या भाळोचे शीतल लेपितो.**
**माझ्या भाळीच्या अमृतानें त्याच्या मनाची**
**काढतो मी समजूत ! हे कपिलसिद्धमल्लिनाथ.**

सिद्धरामदेव शिष्यांना सांगत असतानाच प्रभुदेवांचे दर्शन त्याना घडते. त्यांची ती मूर्ति निरखून पहात हर्षानेंअश्रू गाळतात. आनंदाने म्हणतात.

**१५१**

**आटलेल्या तलावास, ओढा वाहत आल्यापरि,**
**हे देवा, तुमच्या दर्शनानें माझ्या पापण्यांच्या कडा भरून वाहताहेत.**
**माझ्या मनीचे अंतस्थ जाणल्यास कळेल**
**माझ्या अंगावर नुरे भान.**
**अहा देवा, कपिलसिद्धमल्लिकार्जुना,**
**तुज देखिल्याचे सुख न लाभे रे कोणास.**

**१५२**

**हे देवा, तुम्हास पहात असता या डोळ्यानीं, न पाहू शकता,**
**झाले रे ते बावरे होऊनी विस्मित**
**तू असशी रे शतकोटी सूर्यप्रकाशातीत,**
**तुज पाहिल्यावर कर्म असूं शकेल कां हे कपिलसिद्धमल्लिनाथ.**

प्रभुदेवांची मूर्ति पाहून सिध्दरामदेव प्रभूदेवांस वंदन करतात.

अनुक्रमणिका

१५३

हे देवा, माझें शिर तुमचें चरण स्पर्शिल्यावर,
कां बरें हुडकावे माझ्यांतील गुणदोष ?
'भृत्यापराध : स्वामीनो दंडः,
कपिलसिद्धमल्लिकार्जुना तारावे रे मज.

१५४

पुण्यपाप जाणण्याआधीं येऊनी भवांत
झाली माझी हानी, तुमच्या उन्नत स्थितीच्या अजाणतेनें.
आता आलो मी देवा तुम्हास शरण.
तुम्हांस न अंतरण्यागत मज चालवा हो देवा, हाच
तुमचा धर्म. तुम्हांस माझी एकच एक मागणी,
माझें कर्मबंधन तोडण्यापरि करा बा, कपिलसिद्धमल्लेश्वरा.

नमस्कार करताना सिद्धरामदेवांचे देहभान हरपून ते स्तोत्र करतात.

१५५

देवा, तुमच्या निजत्वाचा अंत जाणती कोण ?
सारी चतुर्दशभुवनें दडली तुमच्या करस्थली.
तुमच्यासमान आहे कां अन्य कोण ?
हे देवा, कपिलसिद्धमल्लिकार्जुना.

१५६

अनंत देव सारे समुदायानें येऊन करीत असतां प्रणाम,
त्यांच्या मुकुटांचें होत असता घर्षण । गळल्यानें कणकण
तेथें होई रजतगिरी । देवाधिदेवा कपिलसिद्धमल्लेश्वरा,
तुमच्यासमोर.

१५७

हरी न जाणी तुमचें चरण, ब्रह्मनच जाणी तुमचें मुकुट
यति-व्रती ऋषि हें सारें न च जाणती तुमचें आंतरिक
समस्त देव न जाणती तुमच्या रोमाचें प्रमाण.
शतकोटी सूर्यांस न मिळे पाहण्यास तुमचा प्रकाश,
हे देवा, मी तुम्हांस जाणूं शकेन कां कपिलसिद्धमलेशा ?

अनुक्रमणिका

१५८

**स्मरण विस्मरण, हा गुणदोष असे हो तुमचाच.**
**ऐकावी देवा, माझी विज्ञापना.**
**देवा, मी नव्हे तुम्हांस चिंतणारा,**
**तुमच्यानेंच करितो तुमचें चिंतन**
**करावी करुणा, कपिलसिद्धमल्लिकार्जुना.**

१५९

**हात सोडवून घेऊन दूर लोटल्यास,**
**तोडुनी अंगांग वेगवेगळाले केलांत तरी, आता नाही मी सोडत तुमचे चरण.**
**नष्ट झाल्यास माझी तनु, ज्ञानतनुनें तुम्हांठायीं होतो समरस,**
**हे कपिलसिद्ध मल्लेशा.**

सिद्धरामदेव स्तोत्र करीत असतांना प्रभुदेव त्या स्तोत्राचा तिरस्कार करतात आणि आपली निजस्थिती निरूपतात.

१६०

**कायाधारी मानवपरि, हाती सांपडूनही नाही सापडत**
**प्राणधारी जीवागत, संचल करूनही असे ते न केल्यागत,**
**पाहण्याची नाही ताकद या डोळ्यात.**
**ऐकण्याचीं ताकद नसे कानास.**
**बा सिध्दरामा, गुहेश्वर स्वरूप कोरड्या स्तोत्रानें नच लागे हाती.**

१६१

**डोळ्यानें पाहतो परि नच रूप, तयास स्पर्शितो परि नच देहधारी,**
**चालतो परि नच संचारी, बोलतो परि नच वाचा.**
**निंदकांचा ना शत्रुस्तुतिकारांचा ना मित्र.**
**गुहेश्वराची भव्यता, गवसेल कां बोलीच्या मालेस ?**
**सिद्धरामा नाहीं का हे तुज उमजत ?**

सिद्धरामदेव त्याना उत्तर देतात

अनुक्रमणिका

१६२

**स्तोत्रहीं तुम्ही केल्यानेंच झाले आहे.**
**हे देवा, मूर्ती ही तुमच्या स्मरणानें झाली आहे.**
**ती मूर्तीच तुमचा स्वभाव होय.**
**माझ्या हृदयकमलांत स्फुरलेलें स्मरण असे तुझी गति.**
**कपिलसिद्धमल्लिनाथ, तूं स्तोत्रप्रिय नव्हतास तर कसा**
**झाला रे प्रसन्न बाण, मयुर, हलायुधास ?**

प्रभुदेव निरूपितात.

१६३

**वचनांची रचना ही नव्हे अलंकारिक भाषा,**
**किर्तीगान गाणारे सारे बनले मूर्तिचे आराधक,**
**वेदशास्त्रादिंचा उद्घोष करून गेले ते न जाणता**
**सिद्धरामा, गुहेश्वर साक्षीनें ही गोष्ट जाणती तिन्ही लोक.**

१६४

**हें देवा, तूं वेदप्रिय नाहीस, तूं नसशी बा शास्त्रप्रिय,**
**स्तोत्रप्रिय नाहींस, युक्तिप्रियही नाहीस,**
**तूं नाहीस रे मुक्तिप्रिय । देवा, या साऱ्यांना असशी तूं असाध्य.**
**तूं आहेस भक्तिप्रिय हें जाणून आलो मी तुज शरण,**
**तारी तूं, मज कपिलसिद्धमल्लिकार्जुन.**

'तूं भक्तिप्रिय आहेस यावर माझी श्रद्धा आहे', असे सिद्धरामदेव सांगतात. त्यावर प्रभुदेव निरूपतात.

१६५

**भक्ति, युक्ति हें सारें कोणास हो अवगत ?**
**असा जाणकार नाही मी पहिला.**
**मीपणाचा पडुनी विसर, समोरचें विसरून, ज्याना येते**
**जीण्यास, तोच होय भक्त । त्या भक्तास होतो शिव प्रसन्न.**
**वाचेंत असुनी भक्ति, नसल्यास आचरण,**
**शेवटीही शिव प्रसन्न होण्याचे असे लटके जाण.**
**विस्मरणानें फुंकलो मी कोपाग्नि, आता जाणून आलो मी**
**तुज शरणागत, । हे म्हणणे अर्थहीन शब्द जाण, आमचा**

अनुक्रमणिका

**गुहेश्वरलिंग अज्ञानें होईल कां हो प्रसन्न ?**

सिद्धरामदेव म्हणतात.

**१६६**

**माझा राग हाच तुमचा डोळा,**
**हें देवा, मी कशांत काय आहे, सांगा हो, तुमच्या तेजापुढें ?**
**माझी खरी भक्ति आहे तुमचें रूप ।**
**माझी खोटी भक्ति देवा, तुमचेंच रूप जाणा.**
**मज वेगळे स्वातंत्र्य, आहे कां हो हे कपिलसिद्धमल्लिकार्जुना.**

प्रभुदेव म्हणतात.

**१६७**

**कोप, ताप हें सारें असते जाणण्यांत,**
**भक्ति युक्ति ही असते नित्यांत,**
**भावाच्या विषयीं जर रंगविल्यास**
**निर्भाविकांस ते सहज वाटूं शकेल कां ?**
**आलेल्या शरणांची जाणून निजस्थिती,**
**संदेह संशय निरसून न ठेवल्यास श्रद्धा**
**मागे पुढें न पाहता, परत जातो आमच्या गुहेश्वरलिंग.**

प्रभुदेव रागाने परत फिरून जाण्यास निघतात. तेव्हा सिद्धरामदेव आडवे येऊन विनवितात.

**१६८**

**अतिशय जिद्दीने, तू दोष माझ्यावर लादून,**
**जात आहेस, मज दूर लोटून,**
**हे देवा, तुज धरल्यास तूं कसा घेशील रे सोडवून ?**
**माझ्या हृदयात तुज कवटाळून धरल्यास कसा घेशील देवा सोडवून ?**
**तूं जाण्याचा मार्ग मी त्वरेने धरितो मी आडवून.**
**ऐक देवा, सूक्ष्मतनुनें धरल्यास कसा घेशील रे तूं सोडवून ?**
**सांग बा, कपिलसिद्धमल्लिकार्जुना.**

प्रभुदेव म्हणतात.

अनुक्रमणिका

१६९

**अंगाने कवटाळितो म्हटल्यास नाही सापडत.
प्राणानें कवटाळितो म्हटल्यास नाही गवसत.
भावानें बिलगतो म्हटल्यास नाही सांपडत.
सूक्ष्म अशा मनाच्या शेवटच्या अग्रांवर कवटाळितो
म्हटल्यास नाही सापडत.
भावातींत अशा निराकाराचे घन, सुज्ञान मुखास
असाध्य जाण ! । गुहेश्वराच्या शरणांना आता तू कोणत्या प्रकारें
अडविणार ? सांग बा तूच सिद्धरामा.**

सिद्धरामदेव म्हणतात.

१७०

**मला तूं इतक्या लवकर केलास ना बंदिवान् ?
तुम्हास धरणारेच धरतात.
तनु असूनही त्यापासून असतात जे अलिप्त.
तुम्हांस तेच धरतात.
मन असून, मनापासून असताता जें अलिप्त, तेच तुम्हास धरतात.
हात असून, हातापासून अलिप्त असतात, तुम्हास तेच धरतात.
डोळे असुनही त्यापासून असतात ते दूर,
या तनुमनाच्या आधीन असणारे तुम्हांस नाही धरू शकणार.
हें कपिलसिद्धमल्लेश्वर, मी कसा हो. तुम्हास अडविणार ?
माझ्या देवाधिदेवा, येई बा दाऊनी करुणा मजवर,**

सिद्धरामदेव, प्रभुदेवाना आपल्या मठास येण्याची विनवणी करतात.'तुझा मठ आहे तरी कुठे ? याच ठिकाणी तुझी भक्ति अर्पण कर ! मी तिकडे नाही येत' प्रभुदेव, सिद्धरामदेवास उत्तरतात.

१७१

**गति निरसन, धृति हरण माझें मतिनाशन.
चालण्यास ना शक्ति, बोलण्यास ना जीभ.
दुसऱ्यांचा शिष्टाचार मज नाहीं रे रुचत.
आल्याचें कारण उमजून अचल स्वरूपांत जो
होतो एकाकार ! अशा शरणांस एकांत आगळा आहे,
असा संदेह असूं शकेल कां ?
निरंतर घन सामावल्यावर,
येण्याची जागा वेगळी असू शकेल कां आमच्या गुहेश्वरलिंगास ?**

अनुक्रमणिका

प्रभुदेवांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर. सिद्धरामदेव पृच्छा करतात,’आपण भक्तवत्सल म्हणवून घेता तर येथवर येऊन आपण मठास न येण्याचे कारण काय सांगावे ?

१७२

**सांग मज देवा ?**
**अविरत घन खुणास आल्याचें कारण काय ?**
**भक्तिकारणें इच्छेनुसार येणें झाल्यावर,**
**शिष्टाचारास आहे कां प्राधान्य ? कपिलसिद्धमल्लिकार्जुन,**
**करुणेच्या राजा, करा हो आगमन.**

१७३

प्रभुदेव निरूपण करतात.

**जेथें भक्त असतो, तेथें कर्ता आल्यावर,**
**मनास इकडे तिकडे न चळूं देता, ठेवावा बा विश्वास.**
**कर्त्यास पाहून भृत्यानें आग पाखडल्यास,**
**कुठें उरला संबंध हा कर्ता हा भक्त या भावाचा ?**
**चूक घडून, दोषी होऊन, मी सुधारलो म्हटल्यास**
**ते खरें पटेल कां मनास ?**
**गुहेश्वरांचें शरण कोण, याची तुज नसे जाणीव**
**जा सिद्धरामेशा.**

प्रभुदेवांचे उद्‌गार ऐकून, सिद्धरामदेव अत्यंत खिन्न होतात. मोठ्या आग्रहानें ते विनवणी करतात.

१७४

**माझें अंतरंग उघडून पाहतां माझ्यांत आहे तरी काय ? सांग देवा.**
**बोलण्याच्या अतीत आहेस तूं अभव ! बोलण्यास मज**
**येते म्हणून, तुमची संमति मिळविण्याचें सामर्थ्य**
**देवा, माझ्यांत आहे कां ?**
**अनंत वेद तुमच्यापुढें बोलण्यास होऊनी असमर्थ झाले हो ते मूक.**
**तुम्हांस उत्तर दिल्यानें माझी फार मोठी झाली हानी**
**आतां काय सांगू रे देवा, कपिलसिद्धमल्लिनाथा,**
**मीं भयग्रस्त झाल्याचें तुम्हीच जाणतां.**

अनुक्रमणिका

१७५

देवा रे, तुमच्या संदर्शनावर निष्ठा न ठेवता,
प्रेमानें शरणागत होण्याचें न जाणतां,
निष्कारण अहंकाराचा भार वाहुनि, झाली माझी हानि थोर,
सर्वनाश करून घेऊन तळमळत धुंडितसे मी तुज मंदमति,
कपिलसिद्धमल्लिनाथा तूं मज बुडवी बा,
दुधांत वा पाण्यात; तूंच गति,तूंच मज मति.

१७६

देवा, माझा भार असे तुमचाच,
माझी हानि, माझी वृद्धि ही तुमचीच.
कठोर होऊन, मज नकोस रे छळूं बापा !
तुझ्या छळवणुकीनें मज होतसे प्राणसंकट,
हें कपिलसिद्धमल्लेमश्वरा, मज तारा वा मारा,
आहे मी तुमच्या धर्माचा.

व्यथित मनाने सिद्धरामदेव नतमस्तक होतात, तेव्हा प्रभुदेव कारुण्याने त्यांचे सांत्वन करतात.

१७७

बहिरंगात तूं विहरीत असल्यानें तुजशी न बोलता मी गप्पच होतो.
होऊनी माझ्या मनास व्यथा.
परि तुझ्या लोचनातून ओघळणाऱ्या अश्रुधारानें झाले बा ते
अभिषेक केल्यापरि,
आलो मी त्याक्षणीं तुझ्याकडे धावत, आमचा गुहेश्वरलिंग
हे निरखून धरिला बा उचलून,

सिद्धरामदेवांची आसवे प्रभुदेव पुसतात. तेव्हा सिद्धरामदेव प्रभुदेवांना म्हणतात.

१७८

तनु जाली माजी क्षीण, मन तळमळल्याचें दुःख
तें कोणाचें, रे देवा ?
देवा, देवा रे हा आर्तस्वर कोणाचा ?
मज विस्मरण झाल्यानें, या तळपणाऱ्या खड्गास माझी कुणी
दिली रे आहुती ?
हाय हाय देवा, करुणार्णवा आतां करू काय ?

अनुक्रमणिका

**ही माझ्या अंतःकरणाची हाक ऐकून,**
**पाहिलांत कृपेनें, उचललात माझे धरुनि शीर,**
**पुसलांत नयननीर, बा, कपिलसिद्धमल्लेश्वर.**

सिद्धरामदेवांची ती दैन्यावस्था पाहून, डोळ्यांतील आसवे पुसून प्रसन्नतेने खालीलप्रमाणें वाखाणणी करतात. “परमयोगी, शुद्ध सात्विक योगी, सच्चिदानंद योगी, नित्यपरिपूर्णयोगी, शिवयोगामृतसेव्य संतुष्ट योगी, परमानंदयोगी, सकलकरणगुणरहितयोगी, सर्वेंद्रियसुखनिर्मूलयोगी, संसारवनदावानलयोगी, मायाहरयोगी, मायामददूरयोगी, मायामदमंथनयोगी, सगुणयोगी, समिधानयोगी, निर्गुणयोगी, निरंजनयोगी, सकलनिष्कलतत्वशिरोरत्नयोगी, अखण्डितपरिपूर्णयोगी, अप्रमाणगुणभरितयोगी, अप्रतर्क्यचरित्रयोगी, असाध्यसाधकयोगी, अभेद्यभेदकयोगी, सुज्ञानप्रभामययोगी, महाज्ञानैक्यचैतन्ययोगी, कायागुणधर्मकर्मसंहारयोगी, ब्रह्मांडसंदोहसंभूतकारणयोगी, निखयनिर्लेप-निष्पापयोगी, इहलोकपरलोकगतिरहितयोगी” याप्रकारें स्तवून सिद्धरामदेवांना प्रभुदेव हृदयास घट्ट धरतात.

**१७९**

**देवा, तुमच्यांत समरस होऊन, जाणुनि निजत्व एकाकार**
**झालेल्या शिवयोगीस पाहून मन माझें अंतरेना.**
**माझी तनु तुज कवटाळल्याविना राहीना.**
**माझ्या शब्दांस तुज वाखाणण्याविना समाधान होईना.**
**गुहेश्वरा, तुमचा शरण सिद्धराम शिवयोगीस कवटाळून**
**झाले माझें निष्ठुरपण निवारण, म्हणतो मी तयास**
**‘नमो नमो’ सिद्धरामा.**

**१८०**

**कायेंत नच करणेंद्रिये, प्राणांत ना भाव**
**भावांत नच भ्रम, नवनाळांत ना किंचितही चलन.**
**ब्रह्मरंध्राठायीं जाणकार शिवयोगी**
**गुहेश्वराचा शरण सिद्धरामय्यास पाहून,**
**माझी भवंनास्ति झाली जाण.**

**१८१**

**म्हणती सारे योग-शिवयोग.**
**योगाची रीत जाणकार आहे कां कोण ?**
**हृदयकमलपत्रांत भ्रमण करणे त्याजिल्याविण**
**कसला हो तो योग ?**
**बावन्न अक्षराची लिपी उमजून, ओलांडुन त्यास**
**साही स्थानाच्या वरती असणाऱ्या वरच्या माळ्या**

अनुक्रमणिका

**वर वसता आल्यास तोच रे योग.**
**सोहं हा संचार लोपून, मनास करुनी नष्ट,**
**बसला आमचा गुहेश्वराचा शरण सिद्धरामय्या,**
**तुज नमो नमो म्हणून मी जगतो.**

प्रभुदेवांचें म्हणणे ऐकून सिद्धरामदेव वदतात.

१८२

**देवा, योगाची रीत मी कसा जाणूं शकेन ?**
**योग हा शिव-शक्ति संपुट झाल्याविण.**
**शिवशक्ति वियोग झाल्यास, तो योग नव्हे देवा !**
**हृदयकमलांत भ्रमण न करिता वसणारा तूंच असशी,**
**मज अन्य स्वातंत्र्य आहे कां रे कपिलसिद्धमल्लेशा ?**

१८३

**हे देवा, उत्पत्ति-स्थिती-लयाच्या आधीन नसलेला**
**तूं आहेस रे अभव. ऐक बा मज नसे दुजे स्वातंत्र्य.**
**आहे रे मी तुझ्या इच्छामात्रांत.**
**थोर तूंच, तूंच थोर आहेस हे कपिलसिद्धमल्लिनाथा,**
**सांग तूंच माझी कशांत आहे रे योग्यता ?**

सिद्धरामदेवांचे म्हणणें ऐकून प्रभुदेव निरुपितात.

१८४

**मनांस मन मिळून एक झाल्यावर, ते आहे असे,**
**ते आहे तसे, असे म्हणण्याची रीत नसे रे समंजस । ऐक बा,**
**मज नसे हे उमजत। समोरच्यांची इच्छा जाणता नसे येत,**
**पाहिल्यास अंतरी ते असतात बट्ट बयलु,**
**गुहेश्वरांचे शरण विस्तार-विस्तारातीत असती महिमावंत**
**हें मी ताडिलें तुझ्यायोगें बा सिद्धरामेशा.**

सिद्धरामदेव म्हणतात.

अनुक्रमणिका

१८५

**मान्य अमान्यास तुम्हीच करतां हो पावन.**
**देवा रे तुझी करुणा असे सुखसंपन्न.**
**तुम्ही करता तेच होतसे, त्यांस नाकारिती कां कोण ?**
**हे कपिलसिद्ध मल्लिकार्जुन,**

सिद्धरामदेवांचे निवेदन ऐकून प्रभुदेव हर्षाने उद्गार काढतात.

१८६

**स्वतंत्र परतंत्राची कोणती ती खूण ?**
**मीपणाचें करुनि निरसन, समोरचें व्हावे विस्मरण.**
**भाव करूनी दहन, राहता आल्यास तेच असे स्वतंत्र जाण.**
**तूंपणास अधिकारून, मीपणास निराकरून**
**उभयभावास करुनि जवळीक राहिल्यानें होई परतंत्र.**
**स्वतंत्र वा परतंत्र या दोन्हींचें न करितां विवरण,**
**मीपणाचा ज्यास पडे विस्मरण, तोच उपमातीत जाण.**
**गुहेश्वराचें शरणगण देहविरहित निर्देही असल्याचे,**
**आज आले माझ्या पाहण्यांत हे सिद्धरामय्या.**

सिद्धरामदेव म्हणतात.

१८७

**वाणी असेतोंवर न सुटे देह.**
**स्मरण असेतोंवर न सोडी प्राणसूतक.**
**काया-जिवाच्या भ्रांतीचें शिवण न येई उसवितां.**
**मी निर्देही म्हटल्यास हसल्याविना राहतील का तुमचें प्रमथ ?**
**माझ्या अंतरंगांतील अवगुण नाशून जर तूं**
**केलास तुझ्यासम तर मी बचावतो देवा !**
**अन्य गति मज नसें जाण, कपिलसिद्धमल्लिकार्जुन.**
**पूर्वी जे नव्हते ते पुढें तरी कसे होणार ?**

सिद्धरामदेवांच्या विनंतीस मान देऊन प्रभुदेव, सिद्धरामदेवांचा हात धरून एकांत-समाधी स्थानास जात असता म्हणतात.

अनुक्रमणिका

१८८

**होय, तें खरें आहे;**
**भक्तिभावाचें भजन । तीच आहे, अंतरंगाची जाण.**
**अंतरंगाच्या जाणीवेस आचारचि काया.**
**आचारकायाविना जाणास ना आश्रय.**
**त्या जाणिवेच्या आचारांत, समवेदि होई जो लिंगैक्य**
**त्यांस क्रियाबद्ध म्हटल्यास होई पंचमहापातक.**
**तुझी जाण होऊनी दृढ, होऊनी आचाराचा सेवक,**
**आमचा गुहेश्वर, तुज वश होऊन झाला रे आधीन.**
**सिद्धरामदेवा येई बा तुझी सुख-समाधी दाव मज.**

सिद्धरामदेवांचा हात धरून प्रभुदेव एकांत समाधीस आगमन करतात तेव्हां सिद्धरामदेव म्हणतात.

१८९

**माझा स्वामी आला मज आकर्षित होऊनी, मजशी झाला हो**
**मान्य, माझी पारख करुनि वदला,"येई बा ये,"**
**माझी करणेंद्रियें हरण करुनि दाविल्यानें,**
**आपण होऊन आला घरीं, अंतःकरणाने धरिला उचलून,**
**दिलें आलिंगन, या कपिलसिद्धमल्लिनाथाच्या**
**प्रेमाची घनता, वाणूं कसा मी,**
**यास कशाची उपमा देऊं आता ?**

प्रभुदेवांचे आगमन मठांस झाल्यावर, सिद्धरामदेव आपल्या हृदयकमलसिंहासनावर प्रभुदेवांना आरूढ करून त्यांची पादपूजा करतात. त्यांचें पादोदक घेतात. व परमानन्दाने म्हणतात.

१९०

**देव देवा, तुमच्या न येण्यानें मज लागला होता तुमचा निदिध्यास,**
**जाणुनि माझी आतुरता, तुम्ही करुणेनें आला त्वरित,**
**तनुमनधनाची आशा झाली बा निःपात, मी अवगुणरूपि काढला केर,**
**कांबळपीठ न अंथरितां घातला मी हृदयपीठ;**
**सहस्त्रदळ झऱ्याचे आणुनी अमृत**
**करितो मी पादार्चन.**
**पुजेस वाहतो मी, दोन पाकळ्यांचे कमळ,**
**दोन्ही चरणांवर । डोळ्यांतील तेजाची आरति ओवाळितो.**
**श्वास गिळलेल्या परिमळाचें घालतो मी धूप.**
**मस्तकाच्या ताटात वाढुनी अन्न वाढतो तुपापरि,**

अनुक्रमणिका

**उच्छीष्ट न करता स्वयंपाक, सेवुनी प्रसाद,**
**तोंड धुतल्यास संदेह वाटेल म्हणून वरच्या पदरानें पुसला तोंड,**
**त्रिकरणरूपि तांबुल सामावुन, भावना नेत्राचा पडदा**
**ज्यानें केला नाश, त्याच्या चरणास वंदुन सेविले पादोदक**
**प्रसादास्तव पदर पसरून, प्रसाद सेवन करून झालो मी सुखी,**
**देवा कपिलमल्लिनाथा, तुमचा शरण प्रभुदेवाची**
**करुणा साध्य झाल्याची ही रीत, असे हो उपमातीत.**

प्रभुदेवांची, पादपूजा सिद्धरामदेवानीं अष्टविद्यार्चन षोडशोपचाराने केली. कृपा करून मज बोध करावा म्हणून प्रभुदेवांस विनवितात.

१९१

**तुमच्यायोगें झालो मी आदिपासून,**
**देवा, झालो मी तुमचाच अनादिपासून,**
**तुम्ही केल्यानें हस्त-स्पर्श, मी तुम्हांस ठेवून घेतले मनांत.**
**कायारूपि आडपडदा पसरून तुम्ही जरी मज विसर**
**पडण्या जोगें केलांत तरी मी तुमच्या पाठीं लागून**
**पाहिले देवा मी तुम्हास कपिलसिद्धमल्लेशा,**
**करूनी माझे अंतरंग शुद्ध सांगा मज समजावून तुमचा धर्म**

प्रभुदेव म्हणतात.

१९२

**आदिपासून गुरुबीज झालेल्या पिंडास,**
**अनादि असल्याचे सांगावे का दुसऱ्यानें समजावून ?**
**आदि काया, अनादि प्राण असल्याचे भेटून,**
**आपल्या ठायीं आपण घेतल्यास उमजून**
**सोहं हेंच सत्य.**
**गुहेश्वरलिंगाचे स्वरूप वाणीनें न, येई सांगता, न येई**
**ऐकतां, असे ते असाध्य जाण सिद्धरामय्या.**

सिद्धरामदेव म्हणतात.

१९३

**हे देवा, मी सांगतो ऐका. तुमच्या प्रकाशाची रीत,**
**मी कोण आहे ? हें उमजून एकाग्रतेनें**

अनुक्रमणिका

**प्रकाश पाहण्याची रीत ती कोणती सांगा हो,**
**जे पाहण्याचें होतें तें पाहिल्यावर कायेंत**
**सामावण्याची रीत ती कोणती ?**
**तुम्ही माझें मन ओळखणें आहे कां असाध्य ? हे देवाधिदेवा.**

प्रभुदेव निरुपतात.

**१९४**

**आपण कोण याची नसे जाण म्हणणेंच अज्ञान**
**अजाण अज्ञानांस तिरस्कारून ज्ञानांस पाहिलें**
**म्हणणें विपरीत भाव जाण ?**
**सारे-समग्र दर्शविणारें घन कोठेंही नसें ते दिसत.**
**न दिसणारें निजत्व, न येई दर्शविता,**
**न दाखविता येणारें परब्रह्म येईल कां समजावून सांगता ?**
**गुहेश्वरलिंगाठायी अपेक्षा असेतोंवर आतुरतेस**
**असे ठाव ? या कारणें, मज समजावून दिले नाही म्हणणें**
**तुझ्या तुच समजून पहा बा, सिद्धरामय्या**

सिद्धरामदेव विचारतात.

**१९५**

**पाहिलेले स्वप्न खरे वाटे, ते पाहिल्याचे नसे खोटे,**
**ते पुरवितसे पाठ.**
**पाहिले अथवा नाहीं पाहिले, हे दोन्हीही न जाणता,**
**आतुरतेने कळवळच्या आहारी गेलो देवा !**
**आतुरतेच्या संगाने झालो मी तद्गत तुमच्यात.**
**तुमची कृपा मज झाली हो साध्य, बा कपिलसिद्धमल्लिनाथा**

संगाची आतुरता तुमच्यांत समरस झाली आहे असे सिद्धरामदेवांनी म्हटल्याने, प्रभुदेव निरुपतात.

**१९६**

**चिंतितो म्हटल्यास अंतरें संग.**
**नच चिंतन म्हणणें, मीलन सांधाचा भेद,**
**हे दोन्ही डोळ्याआड येणारें पडदेविना नच स्वभाव सिद्ध.**
**मीलनानें पाहिल्याची रीत ती कोणती लिंगैक्याचें सांगा हो**
**प्रियकराठायी झालो परवश म्हटल्यास,**

अनुक्रमणिका

**ही गोष्ट संमत होईल कां आमच्या गुहेश्वरलिंगास ?**

लिंगाठायी प्रेम ठेवणे म्हणजे द्वैत भाव, तेथे समरसभाव नाही. असे प्रभुदेव म्हणतात; त्यांवर सिद्धरामदेव उत्तरतात.

**१९७**

**तुं प्रेमळपण दाविल्यास मी ही दावितो.**
**देवा, तूं नाकारल्यास माझाही नकार.**
**माझे जाण, अजाणपण मज तुज दोघांसही असे समान !**
**मी इच्छिलेल्या इच्छेचे निधान,**
**तूंच असल्याचें दिसून आल्यावर इच्छा**
**करणारा तूंच जाण कपिलसिद्धमल्लिकार्जुना.**

प्रभुदेव निरुपण करतात.

**१९८**

**वांछित इच्छा तूंच झाल्याची रीत ती कोणती सांग बा ?**
**शोधक शोध तूंच झाल्याची रीत कोणती ?**
**ज्याची कायाचलिंग, प्राणचि शरण झालेल्या शरणांस**
**अन्य देवालय करण्याचें काय कारण ?**
**गुहेश्वरलिंग, मज झालें साध्य म्हणणें वाणीत**
**दिसतेविना करणींत नाहीं पाहिले, मी सिद्धरामय्या.**

प्रभुदेवांच्या म्हणण्यास सिद्धरामदेव उत्तरतात.

**१९९**

**हे देवा, तूं अणूंमध्यें अणु होऊनी वसशी,**
**देवा, मनांत घन होऊनी राहशी.**
**जगांत तूं नसल्याचें असू शकेल कां रे ठाव ?**
**चौऱ्याऐंशी लक्ष शिवालय करूनी, तुम्ही आंत**
**असल्याचें पाहुन, मी बांधिलें विना; मज प्रत्येक**
**स्वतंत्र नाही रे हें मी जाणतो, कपिलसिद्धमल्लिनाथ.**

सिद्धरामदेवांच्या म्हणण्यास प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

अनुक्रमणिका

२००

**निस्सीम लिंगास, सीमेस आणिले म्हणण्याचा**
**अहंकारच झाला थोर.**
**चौऱ्याऐंशी लक्ष शिवालयें असल्याचा हा**
**व्यर्थ भ्रम कसला तो सांग मज ?**
**महाघन लिंगास जगांतील जीवराशीं कसें होऊ शकतील**
**शिवालय ? तुझ्या या लक्षांवर शहाणऊ हजार लिंगास**
**ठेवुन घे तुझ्या हृदयांत**
**गुहेश्वरलिंग, तुज टाळुन गेल्याचां विसर पडला कां तुज सिद्धरामय्या ?**

प्रभुदेवांच्या म्हणण्यास सिद्धरामदेव उत्तर देतात.

२०१

**सकल लिंगांस धरुन न अंतरितां वागण्यास**
**तुम्हीच सांगितले मज तसाच मी वागत आहे, देवा.**
**तुम्हीच मज निरुपिलें, लिंग-प्रतिष्ठा करण्यास, त्यायोगें**
**करीत आहे, मज आहे कां अन्य स्वातंत्र्य ?**
**पूर्वी तुम्ही केलेली आज्ञा, तुम्हास लटके वाटल्यास,**
**आता यापुढें तुम्हांस जसें वाटतें तसें वागवा मज देवा,**
**कपिलसिद्धमल्लिनाथा.**

२०२

**मी जें जें करीत आहे ते सारे तुम्हीच करवितां देवा ;**
**मी करीत असलेलें सारें तुज न पटल्यास, तुझी आज्ञा**
**मानून, देतो रे मी ते सारे सोडून.**
**न दिसणाऱ्या घनास कायेंत ठेवून,**
**सांगतां न येणारें निजत्व मनांत सामावून,**
**दाखवितां न येणारे चिन्ह माझ्या ज्ञानांत ठेवून,**
**आता तुम्हांस उमजण्याजोगें करा हो मन कपिलसिद्धमल्लिकार्जुना**

सिद्धरामदेवांचे निवेदन ऐकुन प्रभुदेव सांगतात.

२०३

**न दिसणारें घन न येई सांगतां,**
**सांगतां न येणारें घन येई कां ते दाखवितां ?**

अनुक्रमणिका

**जाण बा, स्वर संधानाची नसे ही रीत,**
**गुहेश्वरलिंग, हा नसें कल्पित.**

परब्रह्मास कल्पून सांगू नये, दाखवूं नये असे प्रभुदेव निरुपितात. त्यास सिद्धरामदेव उत्तर देतात.

**२०४**

**समरसानें पाहिले मी,**
**त्याचा मार्ग मज नच उमगत,**
**शरीरधारक शतकोटी जीवांचा भेद मज नाहीं माहीत**
**तुमचें मज कसें उमजणार ?**
**तुम्ही जें केलें तेंच मी अनुसरण्यास पाहिलें बाहेर.**
**मी वेगळेपणानें पाहणें असें व्यर्थ,**
**तुम्हीच मज दावा, देवा, कपिलसिद्धमल्लिनाथ.**

सिद्धरामदेवांचे म्हणणे ऐकून प्रभूदेव सांगतात.

**२०५**

**नव्हेत या अभ्यासाच्या गोष्टी, नव्हें हे श्रोत्र सुख.**
**नव्हेत या शास्त्र अनुभवाच्या गोष्टी**
**अंतरिची ना गोष्ट, ना बाहेरची.**
**याचे अंतरंग न जाणतां अनुभव करणे निष्फळ जाण**
**हा गुहेश्वरलिंग असे उपमातीत, बा सिद्धरामय्या.**

परब्रह्म कोणासही दिसत नाही. ते उपमातीत आहे असें प्रभुदेव निरुपितात. तेव्हा सिद्धरामदेव निवेदितात.

**२०६**

**हें पहा देवा, उपमा अनुपमा हे आहेत तुमच्या आधीन**
**सांगणारा, ऐकणारा आहेस रे तूंच जाण.**
**माझ्या अंतरंग बहिरंगाचा तूंच आहेस कर्ता,**
**तुमचें निजत्व सांगितल्या विना मी कसा जगेन ?**
**रे देवा, कपिलसिद्धमल्लिनाथा.**

सिद्धरामदेवांना, प्रभुदेव काया-जिवाचे तारतम्य भेद विवरण करून बोध करतात.

अनुक्रमणिका

२०७

**देहभावाचा झाल्याविना निःपात, जीवभाव नाहीं जात.**
**जीवभाव गेल्याविना, भक्तिभाव नाहीं बिंबत.**
**भक्तिभाव बिंबल्याविना, ज्ञानोदय नाहीं होत.**
**ज्ञानोदय झाल्याविना खूण नाहीं नासत.**
**खूण नासल्याविना माया नामशेष नाहीं होत.**
**याकारणें काया-जिवाचें शिवण निरसुन, सिद्धरामय्या,**
**भेद जाणता आल्यास गुहेश्वरलिंग होई साध्य.**

काया-जिवाचा व्यत्यास, तारतम्य जाणून पाहिल्यास, निजत्व साध्य होत आहे, असे प्रभुदेव सांगतात. त्यांना सिद्धरामदेव विचारतात.

२०८

**हे देवा, नीर-क्षीर वेगळे असल्याचा भेद जाणतो हंस**
**देह जीवाचा भेद तुम्हीच जाणताविना मज नाहीं कळत.**
**देवारे, तुम्ही घातलेली गुंतागुंत मज नाहीं सोडवितां येत.**
**तुम्ही सोडविलेली गुंतागुंत मज नाही घालता येत,**
**हें कपिलसिद्धमल्लिनाथ, माझ्या काया जिवाचें शिवण**
**तूंच उसव देवा, तुमचा धर्म.**

प्रभुदेव सांगतात.

२०९

**कायेच्या कळवळास दुर्लक्ष केल्यानें जातसे ते सोडून,**
**जिवाचे दुष्कृत्य त्यजिल्यानें होई ते दूर.**
**मन झाल्यानें निर्मल, काया-जिवाचे सूतक होई परिहार**
**गुहेश्वरलिंग जाणणें असल्यास,**
**तुं अंतरी धुवून पहा, सिद्धरामय्या !**

अंतरंग तू धुतल्याने निर्मळ होऊन सारे संशय नाश होऊन शिवतत्त्व साध्य होते, असे प्रभुदेव निरुपण करतात. सिद्धरामदेव विचारतात.

२१०

**देवा, मनाच्या दोषाची माती काढुनी,**
**शांति उदकांत काढतो बुडवून,**

आंघोळ करून, योग सुगंध घालून, त्याचें करितो मी पांघरूण
तें एका जागी आणून पिळतो रे पिळणार यंत्रांत
घालून. त्या पिळल्या रसाच्या सुगंध लेपनास तूंच
अधिपति असशी रे कपिलसिद्धमल्लेशा.

प्रभुदेव निरुपतात.

२११

धुवून मन केलें निर्मल म्हणशी, तो कोणता योग ?
जो म्हणतो मी मनांस रोखिलें, त्यास
सतवितसे रे त्याचे मन.
मनाचें विकल्परूप ज्ञानानें जाणून, केलें मी शुद्ध
म्हणणें, तेच मन जाण ! गुहेश्वरलिंग
स्वरूपाचा, जो आहे जाणकार ! बा सिद्धरामय्या, त्यानें
मनाचा करावा परिहार.

सिद्धरामदेवांचे प्रत्युत्तर.

२१२

मनाचा संकल्प मज नाहीं उमजत, झाल्यानें
संकल्प सिद्धि ! संकल्पाचा संबंध नच मज उमजत.
मज आक्रमिल्यानें तुमचे विचार.
देवा, तुमच्या विचाराची झाली पूर्तता माझ्या अंतरंगात,
माझ्या मनासमोर सर्वत्र तुम्हीच व्यापिलात
हे देवा, कपिलसिद्धमल्लिनाथ.

प्रभुदेव निरुपण करतात.

२१५

योग-वियोग या क्रमाचा जाणकार नाहीं मी पाहिला,
नवनाळाचें संचलन जाणतो म्हणणें तो योग नव्हें.
बावन्न अक्षराचें शासन जाणून,
मज गवसलें हृदयकर्णिकांत, म्हणणें तो नव्हें रे योग.
बहिरंग म्हटल्यास क्रियारहित, अंतरंग म्हटल्यास
असे तो वाङ्मनांतीत.
गुहेश्वरलिंग हा नसे पड्चक्रांवर जाण, बा, सिद्धरामेश्वरा.

अनुक्रमणिका

सिद्धरामदेव म्हणतात.

२१६

**देवा ऐक बा, अंतरंगाठायी तुम्हास पाहणारा मी नव्हे रे.**
**हें देवा, बहिरंगात आचरणाराही मी नव्हे.**
**हें देवा ऐक, सुषुम्ना मार्गाच्या अग्रावर चढून**
**सहस्त्रदळ मंडपांत तुजठायीं केला वास,**
**पहा हे कपिलसिद्धमल्लेशा.**

प्रभुदेव निरुपितात.

२१७

**स्वस्थ पद्मासन घालुन बसती, करिती पाठीचा**
**कणा ताठ, निष्ठेनें मागचा मार्ग**
**शोधुन, केले म्हणती अमृत सेवन.**
**तयांच्या विनाशास नच अंत,**
**अत्यतिष्ठ दशांगुल या श्रुतिस पाहतां,**
**तेथे पोहोचून वास करण्यास असें कां रे ठाव ?**
**जो स्थानमान या गोष्टीपासून असें दूर,**
**अशा धनास ब्रह्मरंध्रात देखिलें म्हटल्यास तो दिसेल कां ?**
**ऐक बा, सिद्धरामय्या, आमचा गुहेश्वरलिंग अशा कल्पितां**
**पासून असे दूर.**

त्या परब्रह्मास ब्रह्मारंध्रांत वास करण्यास लाविले असे म्हणणे कल्पित आहे. विना, निर्विकल्पित नव्हे, असे प्रभुदेव निरुपितात. तेव्हा सिद्धरामदेव आपले विचार मांडतात.

२१८

**देवा ऐक बा, मी तुझे रूप नाहीं विचारित !**
**मी नाही रे तुझ्या ध्यानांत !**
**अत्यतिष्ठ दशांगुलांत तुज ठेवून, मी एका ठायीं**
**करीतो वास !**
**ॐकाररूपि पीठ मी होऊन, निशब्दरूपि लिंगास**
**करुनि स्थिर, एका कार होऊन दुजे न होतां**
**करितो वास, हे कपिलसिद्धमल्लेशा, तुं प्रणवरूपि**
**असल्याने.**

अनुक्रमणिका

प्रभुदेव निरुपण करतात.

२१९

**बिंदु हाचि होऊनी पीठ, नादचि झाल्यास लिंग,
तो होई भिन्न लिंग !
कळारूपि पूजा निर्माल्य झाल्याने नाद
बिंदु कळातीत असे देख!
महाधन लिंगैक्य नच गवसे येथे तेथ.
अचल अशा निराळास प्रणवरूप म्हणून, येईल
का संबोधिता ? आमच्या गुहेश्वरांचे स्वरूप
'निशब्दं ब्रह्ममुच्यते' सिद्धरामा हें तुज
नाहीं का अवगत ?**

सिद्धरामदेव उत्तरतात.

२२०

**नाद बिंदु यास म्हणतो मी अंग-लिंग संबंध.
नाद प्राण बिंदु काया झाल्या योगें,
नाद नच स्वर, बिंदु नच काया, हा द्वय
सूतक रहित रहित देख !
नाद बिंदुचा व्युह दाखवून मनमग्न झाल्याची,
अंतस्थिती, कपिलसिद्धमल्लिनाथा
तुम्हीच जाणतां.**

नाद-बिंदु-कळातीत अशा महाघनलिंगाठायी मन मग्न झाल्याचे सिद्धरामदेव सांगतात. त्यांना प्रभुदेव विचारतात.

२२१

**जाणण्याचे जाणून, विसरुनि विस्मरण, संकल्प
संशय विनाशून, अंतस्थिती जाणण्याची रीत
ती कोणती सांग मज ?
जाणले म्हटल्यास ते ज्ञानांस दूर;
विसरलो म्हटल्यास मनांस दूर;
जाणुन विसरलो म्हटल्यास उपमेस दूर;
निर्भावाच्या जोडणीने न सुटे भाव संकल्प,
आमच्या गुहेश्वरलिंगाठायीं, मनमग्नयोग तुज**

अनुक्रमणिका

**कसें झालें रे साध्य, सांग, मज सिद्धरामदेवा ?**

या शिवानुभवाच्या उत्तरास सिद्धरामदेव सांगतात.

२२२

**हे पहा देवा, मम मनी नसें अन्यास ठाव,**
**तुम्हांस मी आठवतो, तुम्ही मज आठवतां,**
**तुज मज असे एकचं मन देख.**
**तू असशी मनमुक्त, तुजसंगे माझे मनही**
**मुक्त असें जाण, कपिलसिद्धमल्लिकार्जुन.**

सिद्धरामदेवांचे मनमग्नतेचे महानुभाव ऐकून प्रभुदेव म्हणतात.

२२३

**सिद्धरामा, मन असें कां शिवयोगीस ?**
**आणखी मनमग्न असती का शिवशरण ?**
**नसणारे मन आहे, असे सांगून त्यास**
**करुनी अंतर्भूत, ही तुझी बोली मनासच स्थान केल्याचे दिसतें.**
**गुहेश्वर जाणकार शरणास दिसले नाही**
**अंतर्भूत पावले ही नाही. ऐक बा सिद्धरामय्या ?**

प्रभुदेवांचे महानुभाव-निष्पत्तिचे निरुपण ऐकून सिद्धरामदेव विचारतात.

२२४

**सांगा देवा ! मनमग्न म्हटल्यानें त्यात आहे का हो न्यूनता ?**
**मन हे नाही का काहीच ?ब्रह्म म्हटल्यास त्यात**
**विशेष आहे तरी काय सांगा मज ?**
**बोल बोलण्यात तें कसलें देवा, दिसल्यास विवर,**
**त्यात तात्पर्य तें कसलें देवा,**
**कपिलसिद्धमल्लेश्वरा ?**

सिद्धरामदेवांचे निजानुभव ऐकून, प्रभुदेव विचारतात.

२२५

**मनमग्न कसे आहे तसेच रहावेविना**
**दुसरे मन असू शकेल का सांग मज ?**
**जाणून विसरून, जाणून वदुन विसरलो म्हणण्यात**
**असू शकेल का ज्ञान ?**
**गुहेश्वरलिंग विलीन होऊन, विसरलो म्हटल्याविना**
**विस्मरण नसे छळीत ?**

सिद्धरामदेव विचारतात.

२२६

**अंगासम लिंग, लिंगासम अंग झाल्यावर**
**होई अंगाचिं लिंगैक्य लिंगापरि अंगैक्य.**
**मनचि लिंग, लिंगचि मन झाल्यावर**
**बोल बोली सारें एक भान झाल्यानें**
**बोलीच लिंगैक्य. लिंगैक्यचि स्वर.**
**शब्द संचयास असें का क्रम ?**
**हे देवा, कपिलासिद्धमल्लिकार्जुन, आता तुम्हास**
**देव म्हणून तुज शोधावे का ! शोधू नयेहें द्या मज समजावून.**

परतत्वजाणिवेची समाधानकारक रीत सांगून, तुमचे निज स्वरूपाचा शोध घ्यावा किंवा घेवू नये हे तुम्हीच निरुपण करावे, असे सिद्धरामदेव विचारतात. त्यांना प्रभुदेव सांगतात.

२२७

**कर्पूराच्या गिरीस घेरल्यास अग्नि तेथें त्याचा असू**
**शकेल कां कोळसा?**
**धुकाच्या शिवालयास असूं शकेल कां उन्हाचा कळस**
**आगीच्या पर्वतास लाखाच्या बाणानें मारून**
**पुन्हां हुडकावें का बाणास ?**
**गुहेश्वरलिंग, जाणल्यावर, देव म्हणून शोधतां**
**येईल कां सिद्धरामेश्वरा ?**

प्रभुदेवांचे महानुभाव ऐकून सिद्धरामदेव विचारतात.

२२८

**देवा, ऐका बा, तुम्हांस देव म्हणून करतां**
**न येई हो मज भावना !**
**माझ्या मनास गिळिल्याचे, तुम्हांस मी यापूर्वीच**
**केली होती विज्ञापना.**
**माझ्या आंत-बाहेर असशी रे तूंच,**
**तुमच्यांत दडलेली वाणी अंतर्गताच्या**
**जाणिवेस जाणून बुजून विसरल्याची रीत**
**ती कोणती बरे ? सांग बा, मज कपिलासिद्धमल्लिनाथ.**

सिद्धरामदेवाचे शिवाद्वैत विवेचन ऐकून प्रभुदेव सर्वशून्य समाधीची स्थितिगति सांगतात.

२२९

**जाणिलें म्हणणें तें बयलु, अजाण म्हणणेही बयलु.**
**विस्मरण म्हणणें तें बयलु, अविस्मरण म्हणणेही बयलु**
**ज्ञानाच्या चिन्हाच्या विस्मरणांत, गुहेश्वर हा**
**आपणचि बयलु देख !**

प्रभुदेवांनी निरुपलेले स्वानुभाव उपदेश ऐकन, सिद्धरामदेव प्रसन्न चित्ताने परब्रह्माठायी निर्वाण कसे असते ते सांगावे म्हणून विचारतात.

२३०

**हे देवा, लोखंड पाण्यांस सामावून घेतल्यापरि,**
**शब्द निराकारांत एक झाल्यापरि,**
**मृगजल अवकाशांत अगोचर झाल्यागत,**
**मज केव्हां तुझ्यांत एकरूप करूनी घेशी, हे कपिलसिद्धमल्लेशा?**

प्रभुदेव महानुभाव निरूपतात.

२३१

**अविरळ धनांस मन सामावून,**
**शीररहित मनांस घन सामावून,**
**आपल्या ठायीं, आपण समरस झाल्यावर,**
**आणखी अन्य ठाव असू शकेल का ?**
**गुहेश्वराची लीला सुटेपर्यंत !**
**असावे, बा, सिद्धरामय्या, ज्वालेंतील कर्पूरागत.**

अनुक्रमणिका

प्रभुदेवांनी निर्वाणाचें अचलत्व निरुपल्यावर, सिद्धरामदेव प्रभुदेवाच्या करस्थल लिंगाचें आद्यंत परामर्ष करून मज सांगावे म्हणून विचारतात.

२३२

**तव स्वर ग्रासित शब्द मम मनीं झाले वेद्य.**
**तव निजत्व निर्णय मम मतीस झाली वेद्य**
**तव करुणा प्रसाद झाला मम सर्वांगी वेद्य**
**तव कायाधारी करस्थलाचें मज न होई बोध**
**कथावे, मज कपिलसिद्धमल्लिनाथ.**

प्रभुदेव आपल्या मनाच्या करस्थलाची संसिद्धता कथन करतात.

२३३

**अनादिगणनाथाचा शिष्य आदिगणनाथ.**
**आदिगणनाथाचा शिष्य अध्यात्मगणनाथ.**
**अध्यात्मगणनाथाचा शिष्य आत्मगणनाथ**
**आत्मगणनाथाचा शिष्य व्योमसिद्धगणनाथ**
**व्योमसिद्धगणनाथाचा शिष्य बसवण्णागणनाथ.**
**बसवण्णागणनाथाचा शिष्य अनिमिषगणनाथ.**
**अनिमिषगणनाथाचा शिष्य अल्लमप्रभुगणनाथ**
**याप्रकारे अनादिपासून अनुपमलिंग व गुहेश्वर**
**हे नाम समरस होऊन मम करस्थली**
**झाले पहा साध्य, सिद्धरामय्या.**

प्रभुदेव आपल्या करस्थल लिंगाचा पूर्वापार समजावून सांगतात. ते ऐकून सिद्धरामदेव, इष्टलिंग धरून निजलिंगैक्य पाहण्याची रीत कशी आहे हें सांगावें म्हणून विनवितात.

२३४

**काया हीच पीठिका, प्राण हाच झाला लिंग,**
**अन्य चिन्हाची आहे कां आवश्यकता ?**
**चिन्ह धरून, एकरूप होणारें, निरवय आहे कां या जगात ?**
**नष्ट धरून हातांत, दृष्ट पाहिलो म्हणण्याची,**
**कपिलसिद्धमल्लिकार्जुनास साध्य करण्याची रीत**
**मज सांगावे, हे प्रभो.**

सिद्धरामदेवांच्या संदेहास प्रभुदेव उत्तरतात.

अनुक्रमणिका

२३५

**इष्टलिंग प्राणलिंगा हा भेद कोणास आहे अवगत !**
**सांग मज ? अंतरंग हा शब्द येतांच बहिरंग हा**
**शब्द येणार हे निश्चित.**
**मनस्थान संपादून, लिंगज्ञान विचाराच्या व्याकुळाधीन**
**होऊ नये. यास्तव मन-भाव-ज्ञान दृष्टिस आणून**
**करस्थली निक्षेपून, अंतरंग-बहिरंग-यांचे नुरुनी**
**भान, जो होतो अनिमिष तोच होय शरण-**
**प्राणलिंगाचे प्रसन्नमुख पाहून, आनंद परवश**
**होण्यास्तव, तेज या दर्पणास धरावे जाण**
**गुहेश्वरलिंगाठायीं, निजत्व पावण्यास**
**चिन्ह धरून व्हावें बा ! चिन्हरहित, सिद्धरामय्या.**

प्रभुदेवांनी आपल्या करस्थलातील इष्टलिंग संबंधाची घनता विवेकमुखाने समजावून दिली. तें ऐकून सिद्धरामदेव परमहर्षित होतात. त्या करस्थलाच्या लिंगाठायीं दडलेलें स्थलनिर्देशाचें किती भाग आहेत, तें सांगावे म्हणून विचारतात.

२३६

**देवा तुमच्या करस्थल धनास उपमा देणारे**
**जाणकार कोणी नाहींत.**
**देवा तुमची महिमा जाणण्यास आहे मी असमर्थ.**
**इष्टलिंगास पोंहोचले या शरणाठायी उद्भवित**
**स्थळ किती आहेत हे समजावून मज वाचवा,**
**हे कपिलसिद्धमल्लिकार्जुनदेवा,**

सिद्धरामदेवानी इष्टलिंगठायीचें सूक्ष्मभेदाची विचारणा केल्यावर प्रभुदेव म्हणतात; त्या सूक्ष्माची स्थितिगति संगनबसवण्णा जाणतो. याच्याकडून तुला समजावून देतो. चल जाऊ या.

२३७

**सिद्धरामदेवा, धरुनी आयतलिंग पहावे स्वायतलिंग,**
**स्वायतलिंग धरुनी पहावे बा जंगमलिंग,**
**जंगमलिंगास धरुन पहावे गुरुलिंग,**
**गुरुलिंगास धरुन पहावे शिवलिंग.**
**शिवलिंगास धरुन पहावे प्रसादलिंग.**
**सिद्धरामय्या, या प्रकारे षड्स्थलाचे**
**प्रकारभेद समरस पावलेलें करस्थलाची**

अनुक्रमणिका

**अंतःस्थिती जाणकार, गुहेश्वराचा**
**शरण आबे बा संगन बसवण्णा**
**चल, बा सिद्धरामय्या विनम्रतेनें**
**विचारू या आपण.**

"बसवराजदेवांच्या दर्शनास आपण जाऊं चल" असे प्रभुदेव सांगतात, तें ऐकून परमहर्षाने सिद्धरामदेव वदतात.

२३८

**देवा, तुमच्या करस्थलाची घनता असूं द्या हो तुमच्या ठायीं**
**तुमच्या परस्थलाची घनता असूं द्या तुमच्या ठायी.**
**मज नच गमें हो करस्थल नच गमें मज परस्थल कोणतेंही**
**मज नच गमें जाणा कपिलसिद्धमल्लीनाथा**
**तुम्ही प्रसन्न होऊन संगनबसवण्णाच्या श्री चरणाची घनता,**
**मज दावितो म्हणता, या तुमच्या गोष्टीस झालो देवा मी आकर्षित**
**आता मज दावुन वाचवा हो देवा, देवाधिदेवा.**

सिद्धरामदेवांचे ऐकून, प्रभुदेव आणि सिद्धरामदेव कल्याणाकडे अभिमुख होऊन चालले. प्रभुदेव बसवदेवांची निजस्थिती भक्तीनें वर्णितात.

२३९

**अंगांठायी केला आचार स्वायत.**
**आचारांठायी केला प्राणस्वायत.**
**प्राणांठायी केला लिंगस्वायत.**
**लिंगाठायी केला जंगम स्वायत.**
**जंगमांठायी केला प्रसादस्वायत.**
**प्रसादांठायी केला नित्यास स्वायत.**
**नित्यांसाठी केला दासोह स्वायत.**
**दासोहांठायी आपणास विसरून निश्चिंत निवासी**
**होऊन करी वास आमच्या गुहेश्वर लिंगांठायी**
**संगनबसवण्णाच्या श्री चरणांस करुनी नमस्कार**
**व्हावें बा धन्य, चल जाऊ या सिद्धरामेश्वर.**

अनुक्रमणिका

# ४

बसवेश्वरांनी, चन्नबसवेश्वरांना अनुग्रह केल्याचें संपादन :

प्रभुदेव आणि सिद्धरामदेव कल्याणास निघाले. बसवदेवांचें माहात्म्य वाखाणीत परमानंदाच्या भरांत दोघेही असतांना, इकडे बसवदेव, अनादित अनिमिषांना आपले प्राणलिंग दिल्यामुळें, बसवदेवांना, परमेश्वरांनी आज्ञा केली, ‘तुझा प्राणलिंग तूं शोधून ये, जा’ या देवाच्या आज्ञेनुसार बसवदेव, सातशे सत्तर अमर गणांच्या सहित मृत्युलोकीं उतरले. इंगळेश्वर बागेवाडीच्या मंडिगे मादिराजांची सति मादलांबिकेच्या गर्भानें, धरणी दुभंगून जसा स्वयंभुलिंग उद्भवतो, त्या प्रमाणें बसवेश्वर उद्भवतात. मृत्युलोकांत शिवभक्तिच्या कल्पतरुचे रोपटे वाढल्याप्रमाणें दिवसेंदिवस ते वाढूं लागले. आपणच जंगमांना सर्वज्ञ असल्याची सत्यता पटवून देण्याकरिता,-वेद शास्त्र पुराण आदि सकल विद्याभ्यास त्यांनी संपादिले. मृत्युलोकीचा अंधार नाश करण्याकरितां, सुज्ञानोदय होऊन, माया-पाश तोडण्याकरितां माता-पिता इत्यादींचा पूर्वाश्रय संबंध सूतक निवारुन, आपली थोरली बहीण नागांबिकाबरोबर बसवदेव, तेथून कप्पडिच्या संगमदेवाकडे येतात. त्यांच्या स्वहस्तानें शिवोपदेश संपादितात. कैलासांहून मृत्युलोकांस बसवदेव येतांना मिळालेल्या निरोपाप्रमाणें सदावकाश येतांच कल्याणनगरीस आले. शिवांनीं धाडलेलें आज्ञापत्र त्यांनीवाचून दाखविले. साठ कोटी वस्तुसंग्रह काढण्यांत आला. तेव्हां बिज्जलराजानें विचारणा केली, राजास प्रत्यक्ष दाखविल्यांनें त्या महाराजांने, बसवेश्वरांना मुख्यमंत्रीपद बहाल केले. ते शिवकायकांत निरत झाले. त्यांनी अनेकानेक अपवादांचे निरसन केले. अनेक मरण पावलेल्यांना प्राणदान दिले. अनेक दैवी चमत्कार दाखविले. मृत्युलोकीच्यांना पावन करीत, त्यांना शिवभक्तिच्या घनतेचा प्रकाश दाखविला. बसवदेव, गुरुलिंग जंगम दासोह आनंदाने करीत असतांना आपला प्राणलिंग अल्लमप्रभूस साध्य झाला आहे. तो लिंग आता मला कोणत्या मुखानें साध्य होणार ? या चिंतेंत असतात. बसवदेव; शिव स्वतःच प्राणलिंग संबंधाचा निर्णय बसवण्णास, सांगण्याकरितां, प्रसादमुखानें नागांबिकेच्या पोटी येऊन ‘चन्नबसवण्णा’ हे नाव धारण करतात. ते शिव-ज्ञान प्रबल करण्याकरिता प्रबुद्ध झाले. शिवज्ञान संपन्न होऊन, बसवदेवांकडून विवेकभावानें चन्नबसवदेवांनी उपदेश घेतला. अल्लमप्रभुदेवांच्या आगमनास चन्नबसवण्णाच कारणीभूत होऊन, चन्नसंगमनाथ हा लिंगच प्राणलिंग होऊन मजला अनुग्रह करावे ; असें चन्नबसवदेव, बसवदेवांना विनवितात.

२४०

**मीनज रोमज ऋषिगण इत्यादि अनंत कोटी,**
**हरी ब्रह्मादि नव्हते तेव्हां**
**त्यांच्याही पलिकडे तूं होतास, एकोलिंग एकटाच शरण.**
**हे गुरो, परमगुरो, तूंच असशी रे मजगति.**
**देवा, आदि कुळाचा होऊनी मूळ, दावुनि संचलित पावन**
**करण्यास आलात.**
**बहुमुख जीवींना बहुमुख प्रसाद तुम्हीच दाखविलात.**
**भुवनास पोसण्यास अवतरून आदिलिंगास, अनादि**
**शरणांच्या हाती दिलांत**
**अशा लिंगास दावून तुम्ही, निर्मिलेल्या या घटांस**
**कृपा करून जतन करा, हे कूडलचेन्नसंगमेश्वरा.**

अनुक्रमणिका

चन्नबसवण्णा विचारल्यावर बसवण्णा भक्तिभाव संपन्नतेनें म्हणतात, “सर्वही संगमनाथ आहे. ही भावना माझ्यांत असल्यानें मी उपदेश करू शकत नाहीं.”

२४१

**अहं ! मी कोणासही उपदेश करू शकत नाही.**
**पूर्वी जे घडले तें आपोआप झालें,**
**तें सारें निजलिंगैक्य होत, मी काहींच नाही केलें.**
**शिवभक्तां चा किंकर होऊन शोध घेण्यास कालाग्निरुद्रानें मज आज्ञापिलें.**
**भृत्य होऊन आलेला मी, कर्ता झालो म्हटल्यास तो कर्ता**
**मज हंसणार नाही का ? जो तत्वानें वागतो, त्याचा मी होतो**
**चाकर, अमरगणांची साक्ष ठेऊन कूडलसंगमदेवांच्या**
**शरणांसमोर बोलीचा प्रसाद नाहीं मी वाढत बा, चन्नबसवण्णा.**

बसवदेवांचे निरुपण ऐकून, चन्नबसवदेव विनम्रतेनें म्हणतात, “तुमच्या कृपेनें मी तुमच्याकडून अनुग्रह संपादिल्याशिवाय सोडत नाहीं. आनादिपासून मी तुमचा शिष्य असल्याने “तुमची मान्यता संपादून चिंतनात असल्याचे सांगतात.

२४२

**भिऊं नका, नका भिऊं, मी नाही अनिमिषासारखा मागत.**
**देवा, मी आहे तुमचा अनादिचा शिशुः**
**अंजनास जलोदर वाढले असे वाटले, असला ती भिऊन प्याली**
**हेमरस ( रसवादींचे रस ) गर्भातील कपिचेष्टा**
**केल्याविण राहील का ?**
**नष्ट होईल कां गुरू उपदेशाचा पिंड ?**
**विसर पडेल का देवा ? शिवज्ञानाचा ?**
**पूर्वी सातशें वर्षें राहुन मंदोदरीच्या गर्भांत,**
**शेवटी उदयास नाहीं का आला इंद्रजीत ?**
**मी पोटांत असतांनाच तुम्ही विभूती संस्कार केलांत,**
**तेव्हांच मज अनुग्रह झाला होता.**
**हें कूडलचन्नसंगमनाथ, तुमच्या दासाचा दास आहे,**
**हा चन्नबसवण्णा.**

चन्नबसवण्णांचे सांगणें ऐकून बसवदेव सांगतात मी सगळ्या शिवभक्तांचा शिशु आहे ; परंतु मी एकाचाही गुरू नाही चन्नबसवण्णा.

अनुक्रमणिका

२४३

आदि अनादिच्या पलिकडे,
त्यापूर्वी, लिंग जंगम हे काय आहे, हे कोणीही नव्हते जाणत.
त्याचे विधविधान संबंध समजावून देण्यास्तव
शशिधरानें मज धाडिलें या मृत्युलोकीं
अंगावर लिंगधारक असणारे सकलगण संगम नाथाविण
मज नच गमती अन्य जाण.
शिष्यास करितो गुरू उपदेश विना,
गुरूस शिष्य उपदेश करूं शकेल का ?
माझ्या जाणण्याच्या आदिस असशी रे तूंच कर्ता
असे असतां तुज मी अनुग्रह करण्याची रीत ती कोणती मज दाव;
कूडल संगमदेवांचे स्वरूपच तूं असशी, या भावनेनें
मी तुजकडें पाहतो बा, चन्नबसवदेव

बसवदेवांचे ऐकून चन्नबसवदेव सांगतात.

२४४

आदिलिंग, आनादि शरण, ऐसे कथन,
आदि गुरू अनादि शिष्य हे कथन न टळे जाण.
देवा, गुरू शिष्यांत आहे का अंतर?
अविरळ परिपूर्ण घन केवळ एकट्यांतच एक
भाव असू शकेल कां ?
माझ्याठायीं प्रकाशणारे ज्ञानलिंग,
तुमच्या हृदयकमलाच्या अमृतलिंगात,
तारतम्यभाव असू शकेल का ?
तुमच्या ठायी झगमग उजळणारा ज्योतिर्लिंग,
माझ्या अंतरंगाचा ज्ञानलिंगास
एकमेकांपासून एकास वेगळे करूं नये, यास्तव
प्राणलिंग हा आहे एकच, उपदेशही एकच, क्रियाकर्मही
एकच, होय.
आता तुम्ही कोणते वेगळे करून वदतां ?
कार्यास होऊनी गुरू, अंतरंगास सुज्ञान उपदेश
यापूर्वीच केलात. आता क्रियेने करता येत
नाहीं म्हटल्यास, ते कसे टाळता येईल ?
कूडलचन्नसंगमनाथ साक्षीनें तुम्ही मजला
केल्यास उपदेश, मृत्युलोकींच्या महागणांच्या
तोंडुन वाहवा म्हणवून घेतो, पहा, संगनबसवण्णा

अनुक्रमणिका

चन्नबसवदेवांच्या म्हणण्यास बसवदेव उत्तरतात.

२४५

**गुरूंस असशी तूंच कर्ता, लिंगास तूंच कर्ता,**
**जंगमास तूंच कर्ता, प्रसादास तूच कर्ता,**
**उपदेशाचा कर्ता तूंच, कूडलसंगमदेव साक्षीने**
**मम कर्ता, तूंच होय. तूं मज अनुग्रह केल्यास**
**तेव्हां म्हणतो महाप्रसाद जाण चन्नबसवण्णा.**

तूंच माझा कर्ता असल्याने तूं मजला अनुग्रह केल्यास, मात्र मी तोच महाप्रसाद मानतो. मजला वेगळे स्वातंत्र्य नाहीं, असे बसवदेव म्हणतात. या यांच्या उत्तरास महाप्रसाद मानून, चन्नबसवदेव मजला तुमचा अनुग्रह झाला असे सांगतात.

२४६

**देव देवा महाप्रसाद; ( तुमची कृपा कटाक्ष )**
**आपलें रुप जाणून पाहण्याकरिता आरशासमोर**
**गेल्यास, तो आरसा पहा अथवा नको**
**पाहूस, म्हणेल का ?**
**पतिची आज्ञा सतीस उल्लंघिता येते का ?**
**देवा, जे काय केलांत ते तुम्हीच केलांत ;**
**मजला महाप्रसाद स्वीकारण्यास योग्य तुम्हीच**
**केलांत. करस्थलातील इष्टलिंगाचें लक्षण**
**पाहण्यास्तव तुम्हीच हाती दिल्यास,**
**लिंगाठायी लक्षणाचा शोध घेता नाही येत,**
**यास्तव चन्नसंगमनाथांनी घे म्हणून**
**दिल्यानें या महाप्रसादाचा केला हो मी स्वीकार.**
**गुरु बावरुन झाल्यास भयग्रस्त, त्याच्या**
**मनास तोषवून एकच वस्तु असल्याची रीत**
**दाखवून आग्रहपूर्वक केले निवेदन.**
**कूडलचन्नसंगमदेवाच्या 'महामने' च्या गणवृंदास ते**
**पडले पसंत. संगन बसवण्णाच्या करुणेचा शिशु मी**
**असल्याचें जाणून, तिन्ही लोकीं झाला माझा जयजयकार.**

अनुक्रमणिका

२४७

**कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग, कलियुग हे काही नव्हते तेव्हा,**
**त्याच्याही पलिकडचे धरणी आणि ब्रह्मांड**
**हे बीजरूप धारण करण्यापलिकडचा जाण.**
**साधुनी प्रसाद आणुनी निक्षेप ( विश्वस्त )**
**सोंपविला माझ्या हातीं, कूडल चन्न**
**संगमदेवाठायीं बसवरुपि गुरु लिंगाने**

बसवदेवांकडून उपदेश होऊन, लिंगानुग्रह संपादिलेलें चन्नबसवदेव, आपणास लिंगस्वायत संबंधस्वय झाल्याची रीत विवेकमुखाने प्रतिष्ठित करून घेतल्याचें सांगतात.

२४८

**भावांत गमन, प्राणांत लोभ, जिभेंत रुचि,**
**श्रवणांत कुशब्द, नाकांत दुर्गंध दृष्टीत काम,**
**शब्दांत निरोध-अशा भविंचा करुनी नाश**
**मज भक्त  केल्याची रीत आहे अशी :**
**कामांस जाळलेली नव्हे हो विभूति, कालांस**
**जाळलेली नव्हे ती विभूती, त्या त्रिपुरास जाळलेलीही नव्हे ती**
**विभूती. आदि आधार नव्हते तेव्हांची, आणुन चिद्‌विभूती**
**धारण केल्यानें, झाली तीच भावास**
**गुरु, प्राणास लिंग, जिभेस प्रसाद,**
**श्रोत्रांस शिवमंत्र, नासिकांस,**
**स्वानुभाव गंध, दृष्टिस झाली जंगम, शब्दांस**
**झाले संभाषण,**
**अशानें पूर्वीचें सारें गुण झाले निवारण;**
**झाल्याने पुनर्जात कूडल चन्नसंगमय्या**
**ठायीं बसवण्णांच्या योगे झालो मी सर्वांगलिंगी.**

२४९

**हस्त मस्तक संयोग होण्या आधिच झालें हो यौवन मंथन**
**कशास म्हणू मी अंतरंग, कशास म्हणू मी बहिरंग,**
**कशास म्हणू आत्मसंग ?**
**हस्त मस्तक-संयोग हाचि बहिरंग,मन संयोगचि**
**अंतरंग, कूडलचेन्नसंगय्याठायीं झाले हो आत्मसंग.**

अनुक्रमणिका

बसवण्णांनी आपणांस उपदेश केल्याचें माहात्म्य चन्नबसवण्णांनी विवेकमुखाने जाणून, पडताळून आनंद परवश होऊन कृतनिश्चयानें वदतात.

२५०

**प्रथम गुरुदर्शनमात्रे, भयानें पळालें सारें कर्म**
**लबाडी, लोभ, तामस, कुटिलादींना उरण्यास नुरें हो ठाव**
**सद्गुरुकृपेनें, हस्तमस्तकसंयोगानें**
**झालें पूर्वगुणनिर्मूलन पुनर्जात होऊन,**
**करणादि गुण नासून, शिवलिंगाठायी उरून,**
**म्हणवितो बा अनुपम सुखसाराय शरण**
**झाल्यानें मज हे अवगत, लिंगाठायी झालो मी तद्गत.**
**जंगमाची कृपा संपादून, भविपणापासून झालो परावृत्त.**
**कूडलचन्नसंगमानाथ याकारणें हेचि तव शरण होत**
**बसवण्णांनी नष्ट केले हो मम भवकल्पित.**

२५१

**चरण धरणाऱ्यांसि दावुनि करुणा,**
**डोळे उघडून, स्पष्ट पाहण्यास्तव विस्मरणाने**
**आलेल्या कायेचे कर्म करुनि निर्मूलन,**
**कृपाळू देवा. तूं मज लाविलें उघडण्यास नयन,**
**प्राणलिंग संबंध हा आहे कसा म्हणजे !**
**डोळ्यातील बाहुली गिळलेल्या नजरेगत,**
**बयलु गिळलेल्या ब्रह्मांडागत, मोति गिळलेल्या उदकागत,**
**पुष्प गिळलेल्या परिमळागत, अशा महानुभावीस**
**अर्पित केलांत माझें शरीर, झाले नष्ट मम शरीराचें पर्याय**
**विकार, हें, कूडलचन्नसंगमेश्वर.**

२५२

**हरआपलें रूप दाखविण्यास्तव आला मृत्युलोकीं**
**गुरुरूप करूनि धारण.**
**झाला मनस्थलास मंत्र, तनुस्थलांस प्रसाद,**
**करस्थलांस झाला इष्टलिंग, झाला प्राणस्थलास जंगम,**
**झाला चतुर्विध स्वायतकूडलचन्नसंगाठायीं,**
**माझा संगनबसवनाथ.**

अनुक्रमणिका

२५३

बसवण्णांनी मांसपिंडास परिवर्तून केले मंत्रपिंड.
वायुप्राणि न उरतां झाला हो लिंगप्राणि बसवण्णा
जगभरित या शब्दांस न अंगिकारितां झाला तो शरणभरित,
लिंग, कूडलचन्नसंगाठायी मम परमगुरु बसवण्णा.

२५४

आदिबसवण्णा, अनादिलिंग म्हणती हे खोटें खोटे नाटें-
हे मज नाहीं ऐकवत ! आदिलिंग अनादि बसवण्णा.
लिंग उद्भवें बसवण्णांच्या उदरीं, जंगम उद्भवे बसवण्णाच्या
उदरी, प्रसादहि अनुसरले बसवण्णांचे या त्रिविधांस
बसवण्णाच असे कारणीभूत,
हें कूडलचन्नसंगमनाथ.

२५५

लिंगाचा पूर्वाश्रय करूनी निरसन हा आहे प्राणलिंग,
हे दाखविण्यास्तव आला आमचा बसवण्णा
काषायवस्त्राचें ( वेषभूषा ) पूर्वाश्रय निवारून हा जंगम
लिंग असल्याचें दाखविण्यास आला बसवण्णा.
प्रसादाचें पूर्वाश्रय निवारून हा महाप्रसाद
म्हणून दाखविण्यास्तव आला बसवण्णा.
लिंग जंगमाच्या प्रसादाचे पूर्वाश्रय करण्यास्तव निर्मूलन.
मृत्युलोकी घेतले जनन, आमच्या कूडलचन्नसंगय्याठायी
संगनबसवण्णा.

२५६

एकदां आठविता श्रीगुरुचरण, तुटे हो भावबंधन
गुरुनाथा, तुज वंदन, गुरुलिंगा तुज वंदन;
हरिब्रह्मादींना अगोचर असा कूडलचन्नसंगमदेव
हाचि लिंग असल्याचें, दाविला मज बसवगुरु तुज नमन.

अनुक्रमणिका

२५७

**नमःशिवाय लिंग ; ॐ नमः शिवायचि बसवण्णा;**
**नमः शिवाय लिंग; ॐनमः शिवायचि बसवण्णा;**
**मम मनस्थली दिसे उजळून,**
**यायोगें कूडलचन्नसंगय्या, आदि आधार नव्हते त्यापूर्वी मी**
**म्हणत होतो, “ॐ नमःशिवाय”**

२५८

**बसवण्णा हा ॐकाराच्या पलिकडचा, नाद बिंदुकलेच्याहि**
**पलिकडचा, तूंच प्रथमाचारी,**
**बसवण्णा, तूंच होय लिंगाचारी, तूंच जंगमाचारी,**
**तूंच प्रसादाचारी, मज तूंच असशी सर्वाचारी**
**तूंच मज गतिमति होऊन मज वाचविलास,**
**कूडलचन्नसंगमदेवय्या, कोणतेही झाले नव्हते**
**निर्णय, तेव्हा म्हणत होतो मी, “ॐ नमःशिवाय”**

चन्नबसवदेवांनीं, बसवदेवांकडून अनुग्रह घेतला. प्राणलिंगसंबंध सामावून अंतरंगाचें ज्ञान, बहिरंगाच्या क्रियेंत समरस झाले, असें म्हणून परमहर्षित होतात. बसवदेवांच्या माहात्म्यांस वंदन करून, त्यांचे स्तोत्र करीत असतांना, बसवदेवांनी चन्नबसवदेवांचें माहात्म्य मन भरून पाहिले. ते परमानंदाने वदतात.

२५९

**न केली पेरणी ना राखण, झाली वृद्धि या अधिक पिकांची**
**रास, सुगंध गडयांगत उगवतांच असे परिमळ !**
**आदि अनादि नव्हते त्यापूर्वी आपल्या आपणच**
**झाल्यायोगे, हात न लाविता, स्पर्श न करितां,**
**करूनी गुरूकृपा संपादन, लिंगाठायीं स्वय होऊन,**
**मज गति पथ दाखवण्या केला रूप धारण,**
**कूडलसंगमदेवाठायी हा चन्नबसवण्णा.**

२६०

**नानाविध स्थानीं येऊन, फिरून यातना भोगित**
**नुरूनी उरलेलें ना स्थान.**
**मृत्यूलोकीं साठेल सदाचाराची घनता,**
**या कारणें कर्ता हाच प्रसादि होऊन आला उदयास.**
**हस्त मस्तक संयोग होण्याआधीं आदि गुरू अनादि शिष्य**

अनुक्रमणिका

**असल्याचें करूनी दाविला निश्चल.**
**संगमनाथरूपि इष्टलिंग देऊन मम करीं,**
**घेऊनी मान्यता संपादिला अनुग्रह.**
**मम पूर्व पूर्वापार दावुन घेतला आतल्याकडे ओढून**
**कूडलसंगमदेवाठायीं चन्नबसवण्णा.**

चन्नबसवदेवांचे स्तोत्रवसदेव करीत असताना चन्नबसवदेवच, बसवदेवांचे पूर्वापर कथन समजावीत वाखणतात.

२६१

**प्रथमावस्थेंत होता तुम्ही निरालंबी**
**द्वितीय काळी होता तेजोमूर्ति, तृतियकाळीं नादमूर्ति,**
**चतुर्थकाळी होता चैतन्यरूपधारक,**
**पंचमकाळीं धर्ममूर्ति षष्टमकाळीं परम पुरूषार्थ**
**साधन होऊन, लिंग दाखविलांत, तेव्हा तें घेऊन**
**लपला एक गणाधीश्वर**
**त्या शिष्याच्या हातांतील इष्टलिंगाचा शोध घेण्यास आलांत**
**तुम्ही अमरगणासमवेत.**
**स्पर्शून प्राणलिंगाचा विस्तार दाखविण्यास्तव**
**तुमच्या आज्ञेनुसार तुमचा कारूण्याचा शिशु मी**
**जन्मलो, तुमच्या करकपली कूडलचन्नसंगमदेवा, तुमच्या महिमेस**
**म्हणतो मी नमो नमो.**

बसवराजदेवांनी आपले पूर्वापर जाणून मला कधी होणार प्राणलिंग साध्य असे चन्नबसवदेवास विचारतात.

२६२

**खाज सुटल्यावेळी नरवानें खाजविल्या, परि,**
**माझ्या पूर्वीची करून तुम्ही दिली जाण. पुढची स्थितीगति**
**समजावून, सोडविला मनीची संदेह.**
**माझा काळा डाग लपटुन काढणारा तूं असशी मम पिता,**
**मजनुरेबा आता कसलीही व्यथा आल्या कार्याचा उद्देश केव्हां**
**सफल होणार;**
**कूडलसंगमदेव, मज इकडे ये म्हणून कधीं बोलावणार ?**
**तो काळ कधी येणार ? हे मज उमजुन सांग बा चन्नबसवेश्वरा !**
**मला कधी होणार प्राणलिंग संबंध, कधी मी निजैक्य पावणार,**
**मज सांग चन्नबसवण्णा म्हणून बसवदेव विचारतात.**

अनुक्रमणिका

२६३

**कैरी तोडुन रगडून येईल कां पिकविता ?**
**देवा, झाले कां कांहीं कार्य केल्यागत ?**
**शशिधरांनी आज्ञापिले ते लवमात्रही कर्तव्य झालें**
**नाही पूर्ण, लिंगप्राण, प्राणलिंगाचा भेद,**
**त्वरित न जाणल्याविना**
**संगमनाथ हा 'ये इकडे' म्हणून न घेई उचलून.**
**कूडलचन्नसंगय्या स्तव झिजण्याआधीं**
**येते कां स्वय होता ? सांगा मज संगनबसवण्णा.**

बसवराजदेव निरूपितात.

२६४

**लिंग आणि प्राणाचा सकिल संबंध कसा आहे,**
**हे मज नाहीं अवगत;**
**प्राणाचा आणि लिंगाचा आहांत विचार संबंध कसा**
**आहे, हे हि मज नाहीं माहित;**
**लावुनी विभूती बाह्या डंबराने पुजित अर्चित**
**गेले माझे दिवस व्यर्थ.**
**कूडलसंगमदेवाठायीं माझा प्राण निक्षेप झाल्याची रीत दावा,**
**मज चन्नबसवदेवा.**

बसवदेवांचे विचारणें ऐकून चन्नबसवदेव प्राणलिंग संबंधाची रीत समजावून देतात.

२६५

**ओहो, हे गुरो, तुझ्या करकमलों पावुनी उदय,**
**अंगावर लिंग धारण करुन झालो मी स्वय,**
**प्राणलिंग लिंगप्राण असल्याचें मी पाहिलें.**
**तुम्हास दावण्यास कसा होईन हो मी समर्थ ?**
**आचार अंगावर होऊनी दृढ, निश्चल इष्ट लिंगाठायी**
**दृष्टि होऊनी अचल, भावपूर्ण अशी तुमची घनता, मज कसे**
**होईल हो अवगत ?**
**अनुभाव अतरंगांत करुनी वास, प्राण लिंगात होऊनी**
**निक्षेप, निज चैतन्य झालेली तुमची घनता मज कसें**
**होईल हो अवगत ?**
**ज्ञानसमाधींत दडुनी वासना, परिणाम लिंगांत**

अनुक्रमणिका

**होऊनी मनोलय, निजलिंग स्थळीं तुम्ही झालांत**
**तृप्त, तुमची घनता मज कसे होईल अवगत ?**
**अंगावर लिंगधारक केलेल्याना म्हटल्यानें संगमनाथ,**
**तुम्ही झालात जंगम लिंगप्राणी, तुमची घनता मज कसे होईल**
**हो अवगत ? लिंगार्पित पदार्थाविना नाही तुम्ही सेवित,**
**मन करूनी अनसूट तनु करुनी अनसूट, सर्वांगसुख सारे**
**प्राणलिंगास केला हो तुम्ही अर्पित, तुम्ही परित्यजुन निराभारी**
**होऊनी, तुम्ही प्रसादलिंगप्रणी**
**झालांत, तुमची घनता जाणण्यांस आहे मी असमर्थ.**
**अनादि शिवास नसे आधार अखंडितास, तुमच्या**
**रोमाच्या अग्रावर करूनी धारण, झालात तुम्ही**
**महालिंगप्रणी तुमची घनता मज नसे अवगत.**
**कूडल चन्नसंगय्यास ठेवून साक्ष, मी तुमच्या प्राणलिंग**
**संबंधाच्या अंतस्पर्शाचा शेषप्रसादि मी आहे बा संगनबसवण्णा !**

प्राणलिंग संबंध कसा आहे म्हणून बसवदेव, चन्नबसवदेवास विचारतात, तेव्हां उपायाने चन्नबसवदेव स्तोत्रमुखाने प्राणलिंग संबंधाचा निर्णय न सांगितल्यासारखे करून दर्शवितात. बसवदेव प्राणलिंग संबंधाचा भेद आपल्यांत आपोआप स्वय झालेले जाणून, आनंदाने हर्षभरित होऊन चन्नबसवदेवांची वाखाणणी करतात.

२६६

**देवा, असतो अग्नि तरूंत परि मंथन करुन दाखविण्याविना**
**तो दिसतो काय हो ?**
**जगभरित परिपूर्ण शिव असूनही अंतरंगी तो दिसतो काय ?**
**आदिलिंग अनादि शरणाचे रहस्य समजावून,**
**निजप्राणांत वसे जो सुज्ञानलिंग, त्यास करस्थली आणून,**
**त्या करस्थललिंगास सर्वांगांत करुनी प्रतिष्ठा दाविलात.**
**तो करस्थललिंग मम सर्वांगांत करूनि प्रतिष्ठा दाविलात.**
**नित्य निजैक्याच्या पथाचे इत्यर्थ दावीलात**
**साऱ्या मृत्युलोकी-आजतागायत-प्राणलिंगाच्या घनतेचा**
**करुनि प्रचार, शिवभक्तीचा केला उद्धार**
**कूडलसंगमदेवांठायी चन्नबसवण्णा मज नुरुनि उरल्यागत केलांत तुम्ही.**
**आता मृत्युलोकीं मी नाही येत, चन्नबसवण्णाच्या**
**श्रीपदाची वाहतो मी शपथ**

मला प्राणलिंग संबंध समजाविल्याने, मी वाचलों, झालो कृतार्थ, असे बसवदेव म्हणतात. चन्नबसवदेव विनम्रपणाने म्हणतात.

अनुक्रमणिका

२६७

**मृत्युलोक शिवलोकास एक शिडी तुम्हास आहे का देवा ?**
**हे देवा, तुम्ही अवतरुन कल्याणात,**
**सकल सत्य शरणगणाना पावन करण्याकरिता आलात.**
**"जन्मास आलो" असे तुम्हास म्हणता येते कां हो ?**
**कर्त्याची आज्ञा झाल्याने भृत्यांस,**
**तो भृत्य कर्त्यास आला की, हो शोधण्यास**
**सत्यसदाचाराचा करुनि पसार, मृत्यु लोक करुनि पावन**
**निजलिंग समाधींत निर्गमन होणारे कोण आहेत हो**
**तुम्हाविण ? सांगा ही मज सांगा ?**
**कूडलचन्नसंगमनाथ साक्षीने तुम्हांस भव आहे असे आल्यास मनांत,**
**संगनबसवण्णा, तुमच्या श्रीपदाची शपथ.**

मृत्युलोकी तुम्ही आलांत तरी काय ? शिवलोकांत राहिलांत तरी काय ? तुम्हांस भव नाहीं असें चन्नबसवदेव विनम्रपणे सांगतात. तें ऐकून बसवदेव अत्यानंदानें आपले पूर्वापार सांगत्य समजावून सांगतात.

२६८

**भव नसले तरी काय, बंधन नसलें तरी काय ?**
**शिवगणांच्या मनांस जें नाही पटत तेच भवबंधन होय !**
**परहितास्तव दिल्यानें लिंग, तुमच्या प्रथमादेखत**
**मज धाडिले शिवानें मृत्युलोकास,**
**अंगावर लिंगधारक सारे संगमनाथ हा माझा विश्वास**
**तुमचे प्रथम मजला ठेवून घेतले आपल्यात.**
**जंगममुखाठायी घेई तूं लिंगाचा शोध म्हटल्यानें,**
**दासोहरूपी उघडला मी दुकान.**
**कूडलसंगमदेवांसमोर, जंगममुख लिंगाठायी**
**कधी मी सुखी राहीन सांग बा मज चन्नबसवण्णा ?**

जंगमठायींचें लिंग कधी मी पाहून समरस होतो असें चन्नबसवदेवांस बसवदेव विचारतात. तेव्हां त्यांना सांगतात, अल्लमप्रभूदेवांच्या मुखानें तुमची इष्टार्थसिद्धि होणार आहे, त्यांना आतांच तुम्हांस दाखवितो.

२६९

**लिंगजंगम-जंगमलिंगाचे मुख तुम्हांवांचून कोणास हो उमजणार ?**
**अंगावर लिंगधारण जे करिती ते सगळे संगमनाथ**

अनुक्रमणिका

असें तुम्ही म्हटल्यानें,
परवादी बिज्ञळानें पारखून पाहण्यास पाठविले,
तेव्हां, नटास जंगममुख लिंग कोणी केले सांगाहो तुम्हांवीण ?
लाकडानी केलेल्या माणसास हांक मारून लाविले तुम्ही
"ओ" म्हणण्यास, त्याला तुम्ही खाण्यांस, जेवण्यांस लाविले,
संगन बसवण्णा हेंचि जंगमलिंगप्रणी असल्याचें पटवून
ध्वज, उंच उडवून या कल्याणनगरीत मिरविलें
कोण हो तुम्हांवीण ? करावें मज कथन
जंगममुखलिंग असल्याचें मज नाही अवगत
असें सांगून,
माझ्या मनांत संशयांस आस्पद देऊन, निसटल्यास
मज ते कसें होईल बरे सहन ?
तूं जंगममुख लिंग संबंधी आहेस हें ऐकून, आदिगणनाथ
अल्लमप्रभु हे नांव करुनि धारण करित आहे आगमन,
कूडलचन्नसंगमदेव साक्ष ठेवून, संगनबसवण्णा
तूंच आहेस जंगमप्राणी यांवर आहे हो माझा विश्वास.

अल्लमप्रभुदेव तुम्हांस शोधीत येत आहेत, असें चन्नबसवण्णांनी सांगितले, तेव्हां परमहर्षित होऊन वदतात.

२७०

जंगम हाचि लिंग ही प्रतिज्ञा झाल्यास सफल
आजच्या पुण्याईसमान असें कां अन्य ?
लिंगाचें शरीर करुनि घर, जो करी वास असा तो जंगम
माझ्या डोळ्यांसमोर करीत आल्यास संचार,
आज मम भाग्यांस नसे पार.
तो जंगम प्रत्यक्ष आल्यास मम घरा
कूडलसंगमदेवाठायी जवळीक योग्यतेचा
वरप्रदान संपादिले मी चन्नबसवण्णा,
तुझ्यासमोर.

अनुक्रमणिका

चन्नबसवदेव आणि बसवदेव आपल्या ज्ञानानुभावाच्या विवेकमुखानें पाहून, ताडून म्हणतात. प्रभुदेवांचे कल्याणास आगमन होणार हें नक्कीच आहे. अशाप्रकारें महानुभावाच्या गोष्टी करीत असताना; इकडे प्रभुदेव व सिद्धरामदेव सोन्नलापुराहून अनेक प्रदेश संचार करीत कल्याण नगरीस येऊन पोहोचतात. कल्याणपुर निदर्शून प्रभुदेव प्रशंसा करतात. या मृत्यूलोकीच्या सकलैश्वर्याचे भांडार असून निजनिवास म्हणवून घेत आहे. या भूतलास हृत्कमल कर्णिका वास होऊन शोभायमान झाले आहे. वाणीस मुखदर्पण होऊन सगळ्या धर्मास आपल्या ठायीं सामावून समानतेचें स्थानमान बहाल केली आहे या नगरीचे सत्याचे सागर होऊन, मुक्तिस मुख झाले आहे. पुण्याईचे पुंज होऊन, अभिनव कैलास या भूमीवर विराजमान झालेल्या, कल्याणनगरीस पाहून, येथे बसवेश्वरदेवाची मूर्ति वास करीत असल्याने वंदन करून, प्रभुदेवसिद्धरामदेवास कल्याण नगरी दाखवून वाखाणतात.

२७१

**कल्याणचि प्रणीत, भक्तिरस तेल ओतिले त्यात.**
**आचार हीच वात, बसवण्णा हाचि ज्योत**
**चेतविल्यानें ती ज्योत, शिवप्रकाश झगमग उजळीत,**
**विराजिती त्या प्रकाशात असंख्यात**
**हे खोटे आहे का हो ?**
**भक्त करिती वास, तोच होय क्षेत्र, तोच अविमुक्ति क्षेत्र !**
**हे खोटे आहे का हो ?**
**शिवभक्तांचा जेथें वास, तोच होय पावन देश !**
**गुहेश्वरलिंगाठायी, माझा परमाराध्य आहे हो हा संगनबसवण्णा**
**त्याची महिमा पहा आता सिद्धरामण्णा !**

प्रभुदेवांनी कल्याण नगरीचे महात्म्य सिद्धरामदेवांना विदीत करून, प्रशंसा करतात. त्या काळोचितात, त्या नगरीच्या महाद्वारापुढे शासनातील कल्याणाचे महात्म्य चन्नबसवदेवांनी, वचन रूपात विवर करून लिहिलेले प्रभुदेवांनी पाहिले, आणि ते वाचू लागले.

२७२

**स्वस्ती समस्त प्रशस्ती सहीत श्रीमत् कल्याणनगरीचे**
**महात्म्य काय आहे हे मी विस्ताराने सांगतो**
**समस्त शिवगणांनी ऐकून कृतार्थ व्हावे.**
**मृत्यूलोकीच्या महागणांनी ऐकून कृतार्थ व्हावे :**
**रूद्रलोकीच्या रूद्रगणांनी ऐकून कृतार्थ व्हावे.**
**नागलोकीच्या नागगणांनी ऐकून कृतार्थ व्हावे :**
**चौदा भुवनास कळसप्राय म्हणविणारे रुद्रलोकच**
**मृत्युलोकास उतरविल्याने कल्याण नगरी**

अनुक्रमणिका

निर्माण झाली आहे ते पहावे
तेथें सत्यजन, सात्विकजन, नित्यजन, निजैक्य,
महाज्ञानीगण परमशिवयोगी, शिवानुभाव संपन्न
शिवलिंगप्राणी, शिवप्रसाद पादोदक संबंधित
शिवाचार वेद्य, शिवागमसाध्य, शिवसमयपक्ष
यांच्या शिवाय तेथें दुसरे कोणी नाहींत हो
पापी,कोपी, असत्य, अनाचारीस प्रवेश नाही कल्याणात
हे उल्लंघून आल्यास खड्गधारी आहे
कल्याण हे अगम्य, अगोचर आहे पहा हो
त्या महाकल्याणाचे विस्तीर्ण असे आहे :
बारा योजन प्रमाणाच्या रुंदीचे विस्तीर्ण
असलेल्या त्या नगरास तीनशे पासष्ट
महाद्वार आहेत.
त्या महाद्वारास तीनशे पंचावन्न वज्रधारेची
दारे आहेत. दोनशे पंचवीस शिल्पकलेच्या
महाद्वारास,चारशे पंचवीस सोन्याने
मढविलेले कलाकुसरिचें दरवाजे आहेत. तेथील एकशें पंधरा
चोरखिंडास वीस दरवाजे ज्याचे आवार सतत उघडे असते, त्यास
दारे नाहीत. एकशे पंधरा खिळ्यांचे दरवाजे आहेत-
त्या नगराच्या भोवतालच्या किल्ल्याची
मोजणी अठ्ठेचाळीस योजन आहे
बाहत्तर नियोगी यांची घरे एकलक्ष
मांडलिकांची घरे एकलक्ष, सावंतांची घरे, एकलक्ष
रायराऊतांच्या घरी समावेश झालेल्या घरांची
गणतीच नाही. द्वादश योजनेचे विस्तीर्ण सूर्यमार्ग
एकशे सत्तर, द्वादश योजनेचे विस्तीर्णाचे
सोममार्ग एकशेसाठ त्याच्यापेक्षा अधिकाधिक अश्या आतल्या
गल्लीची व बाहेरच्या गल्लीची गणनाच
करता येत नाही. त्या नगरीत एकलक्ष शहाण्णवु
हजार शिवालये आहेत.-
त्या शिवालयांना मुख्यत्वे करून त्रिपुरांतक देवाचे
शिवालय आहे. तीनशे साठ पद्मपत्रांनी भरलेली
सरोवरे आहेत
दोनलक्ष पंच्याऐंशीहजार सातशेसत्तर दासोहाचे
मठ आहेत. त्या दासोह मठांत प्रामुख्याने बसवदेवांचे
मठ आहे. त्याचे विस्तीर्ण असे आहे :
योजनेपर्यंत कौशल्याने कोरलेले दगडाच्या पोवळ्या असून,
अति नाजुकरितीने कोरलेल्या त्यांच्या पाच महाद्वारांना
पंचाक्षरीचे शासन आहे.

अनुक्रमणिका

सोन्याच्या खांबास बांधलेल्या तोरणामध्ये
रुद्राक्षाचे गोंडे लोंबत असल्याने ती महाद्वारे शोभिवंत दिसताहेत.
नंदीस्तंभध्वज, उंचपताके, निशाणे, व्यासध्वज
शोभायमान दिसतात. त्याच्या मध्यभागी बसवेश्वरांच्या
सिंहासनाचे विस्तीर्ण प्रमाण असे आहे :
सहस्त्र सोन्याच्या खांबाचे उंचमंडप, राजधानीस
कोरलेले सुवर्ण कळस सहस्त्र;
गुरूलिंग जंगम पादार्चना करीता पुष्करणे चार पुरुष
प्रमाणाइतके खोल आहेत तेथें भरलेल्या
पादोदकाच्या उदकाने पिकणारे राजशाला साळी बाराखांडी
त्या योजनापर्यंत नक्षिकाम केलेल्या
राजवाड्याच्या विस्तीर्णात, लिंगार्चन करणाऱ्यांच्या मठाची
संख्या लक्षावर शहाण्णव हजार आहे.
अशा प्रकारे बसवदेव मुख्यत्वे करून असंख्यातांची
मठे त्या कल्याणात किती आहेत म्हणजे :
बारा हजार क्रमनेमाच्या भक्तांचे मठ, बहात्तर हजार
'महामने' दहा हजार नित्यनियम
करणारांचे मठ.
पंधरा हजार झऱ्याचे उदक वापरणाऱ्या व्रतस्थांचे मठ, पांच हजार.
क्रमबद्ध वीरव्रत नेम करणाऱ्यांचे मठ, बारा हजार
अच्चप्रसादिंचे मठ एकहजार,
शीलसंपन्नाचे मठ एक हजार.
रोज एक हजार जंगमांना भोजन घालणारे
दासोहमठ बत्तीस हजार.
रोजपाचशें जंगमांना बोलावून दासोह करणारे
सत्यसदाचारींचे मठ अठ्ठावन्न हजार.
दररोज एकहजार एकशें जंगमांना दासोह करणारे
मठ अकराहजार.
दररोज नियमितपणे क्रियाज्ञान आचरणारे
सद्भक्तांचे मठ एकलक्ष.
जंगमसहीत समयाचारांने लिंगार्चन करणाऱ्या
भक्तांचे मठ दोन हजार सातशें सत्तरः
अशा प्रकारे दोन लक्ष पंच्याऐंशी हजार
सातशे सत्तर मठ. असंख्यातांमध्ये प्रमुख्य असलेले रूद्रलोकाहून
आलेल्या प्रमथगणांचे मठ सातशे सत्तर.
अशा महाप्रमथांचा, पुरातनांचा, असंख्यात महागणांचा
प्रथम नायक होवून;
एकमुख, दशमुख, शतमुख, सहस्त्रमुख, लक्षमुख, कोटीमुख
अनंतकोटीमुख होवून भक्तांचा स्नेही

अनुक्रमणिका

झाला संगनबसवण्णा ! जगदाराध्य बसवण्णा,
प्रथमगुरू बसवण्णा, शरण संन्नहित बसवण्णा,
सत्यसात्विक बसवण्णा, नित्यनिज्यैक्य बसवण्णा,
षट्स्थल संपन्न बसवण्णा, सर्वाचार संपन्न
बसवण्णा, सर्वालिंगी बसवण्णा, सुज्ञानभरित बसवण्णा,
नित्यप्रसादि बसवण्णा, सच्चिदानंदमूर्ति
बसवण्णा, सद्योन्मुक्तिरूप बसवण्णा अखंड परिपूर्ण
बसवण्णा, अकायचरित्र बसवण्णा, असाध्यसाधक
बसवण्णा, अभेद्य भेदक बसवण्णा, अनामयमूर्ति बसवण्णा,
घनास घर केला बसवण्णा, रुद्रलोक, मृत्युलोकी
आणीला बसवण्णा, शिवाचारीची थोरवी मिरविला
बसवण्णा, अशा बसवण्णाच्या भक्तीस कसास
लावण्यास्तव धसास लावून घासून पहाणारा, प्रज्वलीत करणारा,
अश्वपती, गजपती, नरपतीराया, अधिपती
राजाधिराज बिज्ञळराजा आणि बसवण्णा कल्याण नगरीत
सुखसंकथा विनोदाने भक्तिसाम्राज्य चालवितांना, त्या
कल्याणाच्या नावास अनुसरून कल्याण हे नाव विवाहास
प्राप्त झाले आहे. या लोकीचे कल्याणच कैलास म्हणून घेत आहे.
या कल्याणाच्या दर्शनांने भवनाश होतसे अशा या
कल्याणाच्या स्मरणाने पापक्षय होतेस कल्याणमहात्म्य
ऐकल्यांने कर्मक्षय होऊन मोक्षसाध्य होतो.
या कारणें कुडलचन्नसंगमदेवा, तुमचा भक्त, बसवण्णा
वास करित असलेला ठावच महाकल्याण झालेले
मी जाणून दिव्यशासन लिहून, केल्याने पठण,
झाले हो माझ्या भवाचे नाशन.

प्रभुदेव कल्याण नगरीच्या महाद्वारापुढील कल्याणाचे शासन वाचून परम हर्षित होतात. बसवदेवांची स्तुति करीत प्रभुदेव सिद्धरामदेवांना निरूपण करितात.

२७३

नाहीं हो तयास आदि आधार, असे तो आगम नास्ती
संसारसागर विरहिताचा जाणकार नसे हो कोण !
भले मोठे वृक्षाने केले अतिशयरूप धारण, करून,
ते आवरिले पृथ्वीस, ते नच जाणती कोण !
अंतरंग भुवन पायतळी तुडवून पहात,
सुरेख कमलाच्या मध्यांतील तारकीस
नच कोण जाणत !
रवि शशि उभय नयन दृष्टिचे पुष्प परिमळ

अनुक्रमणिका

झाल्याचे नाही कोणास अवगत !
वासस्थळ झालेल्या नयनांत संभ्रमाविनारूप विशाल
असल्याचे नाही हो ते कोणास अवगत !
सागरातल्या ज्योतिपरि गुहेश्वरलिंगाठायी,
माझा परमाराध्य संगनबसवण्णाचे
अस्तित्व असे उपमातीत जाण बा सिद्धरामण्णा.

सिद्धरामदेव, प्रभुदेवाना, बसवदेवांचे महात्म्य प्रशंसा करीत निरूपितात.

२७४

हे देवा, जेथे जेथे माहेश्वराचे वासस्थान,
तेथे तेथे वसे शिवलोक जाण.
हे देवा, होईल का हे खोटे असे हो सत्यवचन
हे कपिलसिद्धमल्लिकाजुंन
तुमचे शरण तुडविती जी धरणी,
ती असे हो पावन, हे मज आज आले आढळून.

२७५

उद्भवुनी जलात पुन्हा ते न होई जल
परिजल वदती या लोकीचे जन.
परमगुरू बसवण्णा, आला जगास करण्या पालन,
मम परिभवभवाचे कष्ट झाले निरसन
हे न जाणता मन मानेल तैसे बोलती हो जडजीवि
जे पावती मरण, तयाना प्राण देण्याची शक्ति आहे कां
मृत्युलोकीच्या ना शिवाविण ?
शिवगुरू बसवण्णा, बसवगुरू शिव होऊन,
गतिविहीन देवतापशुस झाला हो पशुपति
अशा बसवण्णाचे चिंतन, सुखसमुद्र जाण.
हे कपिलसिद्धमल्लिकार्जुन दाविल्याने बसवण्णास वाचलो मी

* * * *

अनुक्रमणिका

## ६

सिद्धरामदेव बसवदेवांचे महात्म्य स्तवन करित असताना बसवदेवांच्या महाद्वारापुढें उभारून प्रभुदेव, बसवदेवांच्या 'महामने' चे वर्णन करतात.

२७६

**बसवण्णाची कर्मरहित काया, करणरहित प्राण,**
**मथनरहित शब्द, गमनरहित गमन,**
**गुहेश्वराचे झाले आगमन, संगनबसवण्णाचे पहाता आंगण,**
**झाले मज समाधान, बा सिद्धरामण्णा.**

२७७

**उपपातक-महापातक, कोट्यानुकोटी केल्याचे कर्म, होई हरण**
**एका शिवशरणाचे देखता आंगण,**
**त्या शिवशरणाच्या अंतरंगी शिव करी हो वास;**
**शिवाच्या वासस्थानी असे कैलास;**
**कैलासाठायी असती समस्त रुद्रगण;**
**तेथे अडुसष्ट तिर्थांचा असे वास**
**या संगनबसवण्णाचे देखता आंगण,**
**आमच्या गुहेश्वरलिंगाचे झाले नयन तृप्त बा सिद्धरामण्णा.**

सिद्धरामदेवाना प्रभुदेव, बसवराजदेवांचे 'महामने' दाखवून वर्णन करतात, त्याचप्रमाणे सिद्धरामदेवही, बसवदेवांचे गृह पाहून स्तवन करतात.

२७८

**निश्चल शरणांच्या घरच्या आंगणात, वसती अडुस्ष्ट तीर्थ.**
**हे सारे एकमेकात मिळून प्रसन्न झाल्याने, तेथे असे तुझा वास,**
**हे देवा कपिलसिद्धमल्लिनाथ.**

सिद्धरामदेव, बसवदेवांचे आंगणच अविमुक्ति क्षेत्र असल्याचे वर्णितात.बसवदेवांच्या त्या मठात शिवगणांचा समूह पाहून प्रभुदेव सिद्धरामदेवाना दाखवून प्रशंसा करतात.

अनुक्रमणिका

**मृत्यूलोकातील 'महामने' होऊ नये नाश म्हणून**
**कर्त्याने पाठविले एका शिवशरणास.**
**तो शरण येऊन कल्याण या शिवपुरास केला कैलास.**
**रूद्रगण प्रथमगण या सकलाना आणून, असंख्यात**
**या नावाने संबोधिले.**
**भक्तिच्या कुळस्थलाचे श्रुत-दृष्ट दैविचमत्कारानें**
**थोरवी दावून, जगास पटवून देण्यास्तव उचीलला**
**शिवाचाराचा ध्वज**
**मर्त्यलोक-शिवलोक या दोन्हीस झाला आपण शिडी.**
**त्या शिवशरणाच्या घरी वसणारे शिवगण.**
**समूह पाहून आनंदाने फुगून डोलतसे हे मम मन.**
**आमचा गुहेश्वर, शरण संगनबसवण्णाच्या**
**दासोहाचे घन, कसा मी वाणू सिद्धरामण्णा !**

प्रभुदेव आणि सिद्धरामदेव, बसवदेवांच्या द्वारापुढें उभारून त्या महाद्वाराच्या आत जाणाऱ्याना, बाहेर येणाऱ्याना पहात होते. महालिंगवंताना; तेथेवचनशास्त्र कथन करणाऱ्याना; श्रवण करणाऱ्याना, शिवतत्व विद्याभ्यास करणाऱ्याना, शिवयोगरूढीत राहणारे परमराजयोगी याना; आणि शिवानुभाव गोष्टीत करणमथन रहित, इतरेतर भाव विसरुन, संभाषण करणारे महानुभावी याना आचारलिंगाठायी सदाचारचप्राण होऊन, चौसष्ट शीलातील दृढ व्रतस्थ शीलवंताना; आपल्या करस्थलाच्या इष्टलिंगास अष्टविधार्चन, षोडषोपचार करण्याकरिता आतुरतेने निरालस्य भावभरित होऊन त्रिकाल लिंगार्चन करणारे लिंगार्चन पारायण; आणि त्या लिंगाठायी वीरव्रत नियम पाळीत डोळे काढून धारण करून डोळे संपादणारे, जिव्हा समर्पून पुन्हः जिव्हा संपादणारे, शिर तोडून आरती ओवाळून, शिर परत मिळविणारे वीरगण; इष्टलिंगाठायी दृष्टि रोखून भाव बिंबून निश्चलतेने आनंद परवश होऊन, डोळे निश्चल होऊन अनिमिष दृष्टिने त्या इष्टलिंगास पहाता पहाता परवश होणारे महालिंग निष्ठात्मक; आणि श्री गुरू सेवेत तनु झिजवून, परिचारक होऊन, त्या श्रीगुरूपदी मनमग्न झालेले गुरू भक्तियुक्त; आणि जंगमच आपला प्राणलिंग समजून, त्या श्रद्धेने अर्थ-प्राण आणि अभिमान समर्पून निर्वंचकत्वचि प्राण झाल्यानें त्रिकरणशुद्धि संपादून, दासोह करणारे सद्‌भक्तियुक्तगण; शिवगणास भोजन करवून उरलेले शेष प्रसाद सेवीत अत्यानंदात गुंगून नाचत त्या प्रसादातील अणुमात्र प्रसाद जमिनीवर न सांडू देता, वेचून घेऊन त्या महाप्रसादाच्या राशीस अष्टविधार्चनानें पुजून परमानंदानें सेवन करून परम आनंदात रत होणारे शिवगण प्रसादि; गुरू लिंग जंगमाचे श्रीचरणांबु परमानंदजल निश्चलतेच्या श्रद्धेने करस्थळी घेऊन स्वतःस विसरून, पादोदक स्विकारून, सर्वांगास लावल्यानें मलत्रय धुवून, शुद्धात्मक झालेले पादोदक प्राणसंबंधी; आणि काया हीच शिवज्ञान प्रभेचा पिंजरा होऊन, नित्य निजतत्वाचे संभाषणच प्राण होऊन, आत बाहेर न म्हणता महाप्रकाशांत परवश होऊन, सद्योन्मुक्तिच्या स्थळात निवास केलेले. महाज्ञानैक्य शरणगण; आणि कक्ष-करस्थळ-कंठ-उत्तुमांग-हृदयचि इष्टलिंगास ठेवित असलेले लिंगाकार, अमलोक्यरूपि षड्स्थलचि प्राण असलेले, लक्षावर शहाणऊ हजार जंगम हुंकार करीत मोठा समूह समुद्राच्या लाटाप्रमाणें इकडे तिकडेवावरत होते शिवभक्ति परिचारक. आणि मृत्युलोकीच्या या महामनेस रुद्रलोकीच्या या महामनेस रुद्रलोकीचे सकल शिवगण लिंगार्चनेस यावे, असे म्हणत हात करून बोलावीत असल्याप्रमाणें

शिवमहाद्वारासमोर शोभत होती. उंचध्वजा-जयशाली पताके; आणि बसवण्णाची भक्ति, दशदिशेंत दैदिप्यमान असल्याचे जगास दाखविण्याकरिता उच्चस्थानी उभे राहून चोहोकडे शोभत होती. वृषभ खांबे, बसवण्णाची भक्ति, ज्ञान प्रभा अंकुरून वाढत असलेले शोभिवंत शिवगृहाचे सुवर्ण कळस; आणि गुरू लिंग जंगमांच्या आगमनाकरिता, नवरत्नखचित तोरणे बांधून विस्तारून वस्त्राचा छत घालून, पायघड्या अंथरलेले प्रत्यक्ष भक्तांगनेच्या हृदय कमलाप्रमाणें अलंकारित भक्तिगृह; या प्रकारे अनंत मुखाने शोभनिक संगनबसवण्णांचे वास स्थान असलेले शिवालयास, प्रभुदेव आणि सिद्धरामदेव, डोळे भरून किती तरी वेळ पहात उभे राहिले होते, तरी त्यांच्या दृष्टिस समाधान मिळाले नाहीं. आनंदाच्या भरांत रंगूनही अंगमुखास व्यप्ति लाभली नाहीं म्हणून साष्टांग दंडवत घालतात. त्यानेही संतृप्ति न मिळाल्याने आपणांत आपण विरून कळवळिच्या अपेक्षेने पूर्णपणें हृदयकमल उमलले. परमानंदात बुडून, तरंगून रोमांचित होऊन परवश झाले. त्यांतच गुंगून पराकाष्ठेंत असताना प्रभुदेव, सिद्धरामदेवाना बसवदेवांच्या महामनेची प्रशंसा करीत सांगतात.

२८०

**आदिच्या लिंगास मेदिनीस आणुन,**
**बांधला मृत्युलोकी महामनें संगनबसवण्णा.**
**ते घर पहाण्यास गेले असता, गृहप्रवेशा आधीच ते गिळीले मज**
**त्यास एक खांब, तुळया सहा, वासे छत्तीस**
**पायेच्या दगडास नसे धरणी, नसे आकाशाचा आधार.**
**ठोकळी आहेत कुलुपे नऊ द्वारास.**
**दुसरे एक द्वार ओकत आहे अंगार**
**मोत्याचे खांब असून, त्या छतावर माणिकाचे शिखर.**
**त्या शिखराच्या अग्रावर शुभ्र सुवर्ण कळस वसे.**
**न दिसे तो पाहणाऱ्यास, जो न पाही, दिसे तो त्यास**
**तेथे आहेत दहाजण परिचारक.**
**सतत इकडून तिकडे तिकडून इकडे फिरतात.**
**दोघे छडीदार, दार राखणदार.**
**एक स्त्री फिरते इकडे तिकडे, एकीने ठेवले लिंगार्चनास,**
**एक स्त्रीनें सकल शिदा शोधून दिले आणून;**
**एकीने जाळविण अग्नित केला स्वयंपाक**
**एकीने लिंग जंगमाना भोजन करवून केले तृप्त,**
**एका आडणीवर पुढ्यातले पाच ताट भरलेले अन्न**
**जेवला एकटाच, सकल प्रमथगण आले तेथे शेषप्रसाद**
**घेण्यास. अशा घरी करून प्रवेश, झाले ते निश्चिंत निवासी.**
**सिद्धरामण्णा, गुहेश्वराच्या शरण संगनबसवण्णाचे**
**घर पाहून झालो हो मी धन्य.**

प्रभुदेव, बसवदेवांचे गृह पाहून परवशतेने वाखाणीत सिद्धरामदेवाना सांगत होते ते ऐकून सिद्धरामदेव म्हणतात.

अनुक्रमणिका

देवा, तुमच्या शरण वासाविण जे घर वसे ते व्यर्थ जाण ।
तुमच्या शरणांचे घर, मज झाले ते स्थिर स्थान.
श्रीयाळ करूनी घर, गेला तो परगांवी बसण्यास.
दासिमय्याने केले घर, परि गेला करूनी व्यवहार.
सिंधुबल्लाळानें केले घर, गेला तो होऊनी मजूर
गंगेवाळुकाने केले घर, न जाणता गेला हो लिंग पथ.
या साऱ्यानी करूनी घर न जाणता महाघनास,
सालोक्य, सामिप्य, सारूप्य, सायुज्य या चतुर्विध
पदवीच्या झाले हो आधीन.
तुमचा संगनबसवण्णा, येऊन कल्याणात बसविल्यानें घर
सारे मृत्युलोक झाले हो भक्ति साम्राज्य.
त्या घरात जे मस्तक नमवून, करिती प्रवेश ते सारे
संपादिती निजलिंग पद जाण.
ते गृह पाहण्यास्तव मी अनेक काल केला तपाचरण
कपिलसिद्धमल्लिकार्जुना, तुमचा शरण संगनबसवण्णाच्या
महामनेस नमो नमो म्हणून जगत आहे.

अनुक्रमणिका

७

प्रभुदेव, सिद्धरामदेव-बसवदेवांचे महात्म्य वाखाणीत महाद्वारापुढे उभे असतात त्यावेळी हडपदअप्पण्णा उभयताना पाहून परम हर्षित झाले, तेथून जाऊन बसवदेव लिंगपूजेस बसल्यावेळी, त्यांना प्रभुदेव, सिद्धरामदेव आल्याचे सांगतात.

२८२

**देव देवः महाप्रसाद**
**डोळ्यात ना किल्मिष, कायेत ना उपाधि,**
**वाणीत ना अंत, करणीत ना गति,**
**हा कसला हो संचार, न कळे ते मज, हे कसले अस्तित्व**
**तेही न उमजे, वेडाविण वेडेपण, जाणाविण जाण.**
**बसवप्रिय कूडलसंगाच्या शरणांचे आगमन,**
**झाल्याचे मज वाटे कौतुक, संगनबसवण्णा करा हो श्रवण.**

हडपदअप्पण्णा येऊन बसवदेवाना निवेदितात, त्यावेळी बसवदेव शिवलिंगार्चन करीत परमसुखाने डोलत, परवश होऊन सुज्ञानमुखाच्या विवेकाने पहात असतात. लिंगपूजा सोडून न उठता, माझी काया भक्त असून प्राणच जंगमझाल्यावर येथे तेथे हा भेदाभेद माझ्यात उरला नाही. एकोभावाने कृतनिश्चय करून त्या जंगमाना तुमच्या बरोबर घेऊन या, असे सांगून हडपदअपण्णाना बसवदेव बोलावण्यास पाठवितात.

२८३

**कायेच्या हाती करस्थल, प्राणाच्या हाती जंगमस्थल,**
**या उभयभावाचे लिंगार्चनच परमानंद सुखस्थल.**
**काया भक्त, प्राण जंगम, कोणते म्हणू मी घन कोणते म्हणू सान ?**
**कूडलसंगमदेवाच्या शरणांचे झाल्यास आगमन,**

शिष्टाचारा ना वाव, अप्पण्णा कृपा करून उभयताना या म्हणावे असा बसवदेव आपला निरोप सांगून, हडपदअप्पण्णास बोलावण्यास पाठवितात. अप्पण्णा येवून प्रभुदेवाना सिद्धरामदेवाना आगमन करण्याबद्दल बसवदेवांचा निरोप कळवितात.

२८४

**मनास मन झाले एकार्थ, कायेस कायेचा असे संबंध,**
**अज्ञाना स्मरण विस्मरण नसे देख.**
**होई संग निस्संग, त्याच्या शिष्टाचारास नसे वाव,**
**बसवप्रिय कूडलचन्नसंगाचा शरण बसवण्णाने मज धाडिले जाण,**

अनुक्रमणिका

**हे गुरो करी करुणा.**

हडपदअप्पण्णा विनयाने बोलावतात, तेव्हा प्रभुदेव, एकसारखे पाठ पुरवून बसवण्णा आम्हास बोलावणे धाडीत आहे असे रागाने म्हणतात.

२८५

**मन मन होऊनी एक, तनु तनु एक होऊनी समरस**
**झाल्यावर, ना बोलावणे, ना पाय ठेवणे,**
**असे असल्यावर उपचाराने का बरे धाडावे बोलावण ?**
**त्यास तेच असे न्यून !**
**अंगाच्या हाती असुनी क्रिया, वाणीत कसले ते अद्वैत पण ?**
**जे परिपूर्ण होण्यापूर्वीच झाले म्हणती त्यांच्यात,**
**आमचा गृहेश्वरलिंग पाय नाहीं ठेवीत.**

अंगाच्या हातात क्रिया धरून, वरती बोलणी अद्वैताचे आहेत, आणि भृत्याचार ज्यांच्या घरी नाहीं, तेथे आम्ही येत नाहीं. हा प्रभुदेवांचा निरोप, हडपदअप्पण्णा परत जाऊन बसवदेवास सांगतात.

२८६

**अंगकळा लिंगाठायी न होता लीन.**
**लिंगकळा अंगाठायी न होई विलीन**
**बोलीची माला कैसे होईल ब्रह्म ?**
**ज्याची काया झाल्यास भक्त, त्यास असावा भृत्याचार :**
**प्राण जंगम झाल्यास व्हावा तो जाणकार.**
**भक्तिज्ञानाविण ना होई भक्त ना होई शरण.**
**आल्यास वडिलधारे, सामोरे जाऊन न करि जो स्वागत,**
**त्यांच्या घरी पाय नाही ठेवीत, ऐका हो संगनबसवण्णा**

असे म्हणून बसवप्रिय कूडलचन्नसंगाचे शरण छळतात.
बसवदेव पुन्हः बोलावण्यास पाठवितात.

२८७

**भक्ताची कायाच जंगम करितो धारण,**
**जंगमाचा प्राणच भक्त करितो धारण,**
**भक्ताठायी, भक्त-जंगम हे दोन्ही असती एकच,**
**जंगमाठायीही भक्त आणि जंगम हे दोन्ही असती एकच,**
**जंगमासही भक्तिअगत्य; भक्तासही हवे भक्तिस्थल.**

अनुक्रमणिका

भक्ताच्या अर्थ-प्राणाभिमानाचा आपणच कर्ता मानून,
आलेला जंगम, त्या भक्ताच्या घरचा आपण कर्ता
असे समजून येऊन, तनु मन धन सारे आपल्यात सामावून,
भक्तास करि जो पावन, त्यासच म्हणतो मी जंगम जाण.
त्या जंगमाचे तिरस्कार बोलणीस करूनी सहन,
जो तीनशें पीठ बांधितो, अशाच म्हणतो मी भक्त.
आपल्या मठास आपण येण्यास धरावा का बरे रुसवा ?
कूडलसंगमदेवाच्या शरणांचा आहे हो मी द्वारपालक.
घर कर्ता आल्यास घरा, या म्हणत नाही वा नकोही
म्हणत नाहीं.

बसवदेवांचा निरोप प्रभुदेवाना निवेदन करून अप्पण्णा बोलावतात.

२८८

तनु तुमची, मन तुमचे, धन असे तुमचेच;
तुम्हाविण अन्य एकही अणुमात्र नसे देख
भक्ताचे मठ आपलेच मठ, हे आधीच जाणून येथे आलात बुजून
आता पुन्ह : पुन्ह : कसले विचार करता ?
बसवप्रिय कूडलचन्नसंगाचा शरण संगनबसवण्णा
यास नसे स्वतंत्र भाव, वाहतो मी तुमच्या चरणांची आण

अप्पण्णाचे ऐकून प्रभुदेव उत्तरतात.

२८९

भक्त जंगमाचा सकील संबंध जाणकार कोण आहे बा सांग ?
जो करी अर्थ अर्पण तो नव्हे भक्त.
अभियान अर्पितो तो नव्हे भक्त, प्राण अर्पितो तो
नव्हे भक्त. त्याचे कारण, तो सत्यसदाचारास न होई पात्र.
त्या भक्ताच्या घरी जाऊन करूनी घेती पादार्चन.
पोटाच्या काकुळतेनें जेऊनी अन्न, व्यसन पूर्ततेकरीता पैसे मागून,
दिल्यास स्तुती, न दिल्यास निंदा
करीत जाणारा तो नव्हे हो जंगम
आदि अनादिच्या पलिकडे त्याही पूर्वीचा महाघनास भेटून
पाहिलेला जाणकार, काया जिवाची जोडणी तोडुन फेकणारा,
आपणास अर्पण करून जो राहतो तोच भक्त होय.
संचलन सूतकास अंगवळणी न लावून घेता
पोराच्या कळवळाच्या आधीन न होता, चवीस न इच्छिता,

अनुक्रमणिका

ज्ञान होऊनी अंग, तृप्ति झाल्यास भक्ति,
विनय होऊनी शिवमंत्र, त्यास जो म्हणे नमो नमो तोच जंगम जाण.
अशा भक्तांचा सम्मिलनचि होय मेळावा.
इतर अर्धवट भक्तांचा, अर्धवट जंगमांचा स्नेह,
संग न रुचे हो आमच्या गुहेश्वरलिंगास.

प्रभुदेवास अप्पण्णांचे उत्तर.

२९०

लिंग जंगम, जंगमचि लिंग, हे मृत्युलोकी-शिवलोकी कोणास
नच अवगत बसवण्णाविण ?
लिंगास मृत्युलोकी नच आधार, यास्तव अवतरला हो बसवण्णा.
जंगममुख लिंग असल्याचे जाणून,
आपणास अर्पून, अन्यभाव निवारून राहतसे हो बसवण्णा.
अंगमुख सारे करूनी निर्मूल, भृत्याचारास करूनी स्थल,
राहतसे बसवण्णा, जाणूनी प्राणकळा,
जंगमचि प्राण होऊन आशाविण असे जिणे बसवण्णाचे.
उपाधिच्या किर्ती वार्तेचा करूनी धिःकार,
निरूपाधिका विवेकातीत होऊनी सहज दासोही
होऊनी राहतसे हो बसवण्णा.
बसवप्रिय कूडलचन्नसंगाचा शरण बसवण्णाच असे
तुमचा भक्त, तयाविण नाहीं पाहिला मी कोण.

प्रभुदेव निरूपतात.

२९१

भक्ति आहे तुमच्यात, आहे भक्ति आमच्यात,
आमच्यातच आहे म्हटल्यास भक्ति,
मिळेल कां हो त्यास शरण संमति ?
लटक्याच वर्णरंजिताने तोंडाने गोड गोड बोलणारे
होतील कां हो ते सारे भक्त?
शिकुनी अद्वैताच्या गोष्टी प्रत्युत्तर देणारे होतील का ते भक्त?
जातीवंत गाईची कालवड चरवी भरून
देते का दूध ? हे वेड्या ?
संगनबसवण्णा बोलतो त्या साऱ्या गोष्टी
भक्तिच्याच का असतात ?
आलेल्या जंगमाचे मर्म जाणून

अनुक्रमणिका

**स्वागतास्तव पुढे येऊन, जोडुनी हात होऊनी कंपायमान,**
**करूनी वंदन, सेवकास भयभीत भृत्याचारी**
**होऊनी राहाता आल्यास तीच होय बा भक्ती, तोच असे वर्म !**
**आलेले कोण न जाणता, उन्नतस्थान मान**
**न ओळखता, वृथा अहंकार जे वाहती गुहेश्वरलिंगास**
**ते न रुचती.**

प्रभुदेव येत नाहीत म्हणून पुन्हा परत येऊन अप्पण्णा बसवदेवास सांगतात.

२९२

**देव देवा महाप्रसाद**
**तुमच्या शरणांच्या घरचा स्नेहाचाराचा नसे हो मी**
**सैनिक तनु मन धन मागे ठेवलेला असे मी वंचक.**
**तुमचे शरण माझ्या इच्छेनुसार येतील कां ?**
**'चकित मभिदत्ते श्रुतिरपि' माझे बोलणें तुमच्या**
**शरणापर्यंत पोहोचतील कां ! हो ?**
**पोट भरविणारा मी आहे**
**न्हावी, तुमच्या मागे लपलेला सेवक**
**बसवप्रिय कूडलचन्नसंगाचे शरण, मी बोलाविले**
**तरी नच करिती आगमन,**
**आपणच जाऊन करावे हो स्वागत संगनबसवण्णा.**

२९३

**तुज नसे साध्य, मजही नसे साध्य, ऐसे घन सकलास ही असाध्य.**
**ते पहावयास डोळ्यास न होई हो साध्य,**
**शिवावे म्हटल्यास स्पर्शास असाध्य,**
**बोलावे म्हटल्यास असे वाङ्ःमनातीत,**
**उभारल्यास नचसाऊली, संचारास ना पाऊल.**
**तो प्रभुदेव असल्याचा दिसतो हो भाव,**
**बसवप्रिय कूडलचन्नसंगय्याच्या शरणाचे**
**चरण धरण्यास तुम्हीच उठा हो संगनबसवदेवा.**

मी भक्त नसल्यानें मी बोलाविले तरी ते येत नाहींत, आपणच जाऊन स्वागत करावे, असे हडपदअप्पण्णा विनवित असताना, चन्नबसवदेव येऊन म्हणतात. प्रभुदेव आणि सिद्धरामदेव तुमच्या महाद्वारापुढें येऊन उभे आहेत, बसवदेवा, तुम्हीच जाऊन त्यांना बोलावून आणा.

२९४

अनुक्रमणिका

**लिंगचि-जंगम, जंगमचि लिंग, या श्रद्धेत पडे हो अंतर,**
**झाले पहा हो दुधाच्या डेऱ्यात आंबट पडल्यापरि,**
**अंगावर लिंग धारक सारे संगमनाथचि होय,**
**हा तुमचा विश्वास. हे गुरो त्या विश्वासाने**
**आलेल्या शरणांची उन्नत स्थिती न जाणता घडला**
**हो अपराध, संगमनाथ घरास आला आहे चालुन देहधारी होऊन.**
**त्वरीत जाऊनी समोर, करावे तयास वंदन.**
**कूडलचन्नसंगय्याचे शरण-प्रभुदेव-सिद्धरामदेव**
**उभे आहेत की हो दाराशी येऊन.**
**ते दिसले नाहीं जरी डोळ्यास, तरी वात्सल्याच्या नात्यानें**
**आले नाहीं का हो ओळखता, बा संगनबसवण्णा ?**

अल्लमप्रभुदेव आणि सिद्धरामदेव येऊन तुमच्या दारात उभे असताना, सेवकास बोलावून आण म्हणून सांगितलात. तुमचे हे विस्मरण तुम्हास योग्य नाही. हे चन्नबसवदेवांचे सांगणे ऐकताक्षणीं बसवदेव भयभीत झालें, बाष्पांजलानें त्यांना पुढचे कांही दिसेना, चन्नबसवण्णाना बसवदेव विनयानें प्रभुदेव रागावण्याचे कारण काय मज सांगा म्हणून विचारतात.

२९५

**आता मी कसे करू हो काय करू? वृथा झाले मम हनन.**
**काय करू झाले की हो मम अधःपतन.**
**उभे असता दारी तुमचे शरण, नच मज उमगले की हो,**
**त्वरे जाऊन समोर न केल्यानें नमन,**
**झाली की हो माझी हानी झाले हो नाश**
**यास आता काय देऊ मी उपमा कूडलसंगमेश ?**
**मी उभय भ्रष्ट असल्याचे आज मज आली जाण.**

२९६

**झाली मम मति हीन, गेला हो ममधीर खचून,**
**देवा, झालो मी दिग्मूढ, गति झाली माझी नष्ट.**
**मूलवस्तुचा पडला की हो विसर, झालो आता मी बाहेर.**
**कडु भोपळ्याने वेल भरल्यापरि झाली मम भक्ति निर्मळ.**
**चालणारा लिंग आला असता घरास, वास्तव्य देण्याचे मज न कळे.**
**या हानीस, या नाशास काय देऊ उपमा ?**
**घेऊनी हाती नवरत्न फेकीतो तळ्यात,**
**देवारे, झाली मम भक्ति अशा माकडागत.**
**कूडलसंगमदेवाच्या आणून दिल्यास पादुका,**
**तुमच्या पादुका घेऊन नाचतो पहा चन्नबसवण्ण.**

अनुक्रमणिका

अत्यंत भयाने बसवदेव विचारतात, चन्नबसवदेव नमन करून सांगतात.

२९७

**ओ हो गुरूराया, तुमच्या पादुकेचा आहे हो मी दास,**
**मी असताना आपणास कशाची भीति ?**
**कशाचे भय ? तुमचे मन पाहण्यास आला संगमनाथ.**
**तुमचे मन पारखण्यास्तव करीत आहे तो ही एकलीला,**
**ती तुम्हास सहज वाटू नये काही बोला ?**
**दवबिंदु रवि किरणाने होत नाही का हनन.**
**केल्यास तुमचे स्मरण, होती संसार विहीन,**
**अशी करिते श्रुति स्तवन, तुमच्या ज्ञानास**
**असे का न्यून ?**
**कूडलचन्नसंगमदेवाचे आगमन होण्यास्तव, माझे मनचि आहेत**
**पादुका त्या घालुनी चलावे तुम्ही संगनबसवदेवा.**

चन्नबसवदेवांचे कथन ऐकून बसवदेव म्हणतात, चन्नबसवदेवाच्या कृपेने माझे रक्षण झाल्याचे मी कृतनिश्चयानें सांगतो.

२९८

**विश्वासलो बा मी, मज झाले हो मान्य,**
**तारिले मज तुम्ही दावुनी करूणा**
**पशुचे वासरू पडले असता ओसाडखड्यांत.**
**त्यास काढुनी वरती आईचे तोंड दाखविल्यागत,**
**अज्ञानात पडलेल्यास जागे करून**
**कूडलसंगाच्या शरणांचे दाऊनी चरण,**
**केलात ममरक्षण. गेला होता की हो मम प्राण, आपल्या करुणेचे**
**पिळुनी संजीवन घेतलात मज उचलून,**
**चन्नबसवण्णायोगेच मज लाभले हो जीवन.**

बसवदेव आपल्या ठायी आपण संतोषिले असताना सोड्डुळबाचरस येऊन म्हणतात.

२९९

**जाण-विस्मरण हे नच असती तव गुण**
**अमृताच्या सागरात असू शकेल का हो कडुलिंबाचा थेंब ?**
**मन पारखण्यास्तव नटानें केल्यास नाटक**
**त्यास सहज समजावें, विना का भ्यावे हो तुम्ही मज सांगा ?**

अनुक्रमणिका

**महाज्ञानी सोड्डळाचे मनास होतील अज्ञाने व्यथा म्हणून**
**भिऊ नका बा संगनबसवण्णा.**

सोड्डुळ बाचरसांचे ऐकून बसवदेव म्हणतात.

**३००**

**वैऱ्यानें भोसकलेल्या जखमेस उपचार करणारा**
**तोच आप्तमित्र होय.**
**हातातील आयुध गळून पडल्यावर उचलून देणाराच हितकर्ता,**
**कूडलसंगाचा शरण सोड्डुळबाचरसांची**
**करुणा, मजवर असेपर्यंत नाहीं हो मी आता भीत.**

चन्नबसवदेव, सोड्डुळबाचरस आणि हडपदअप्पण्णा आदिकरून प्रभुदेव आणि सिद्धरामदेवाना बोलावून आणण्याकरिता चलावे आता असे बसवदेव म्हणतात. त्यावेळी लिंगार्चन करीत करीतच,त्या इष्टलिंगास करस्थली धरूनच बसवदेव जाण्यास निघतात.

**३०१**

**करितो मी लिंगार्चन, माझ्या मठास व्हावे जंगमचे आगमन**
**जंगम आल्यास मठास, लिंगार्चन सोडून करितो मी**
**जंगमार्चन. कारण त्या लिंगाठायी आहे पद, आहे फल, आहे भव,**
**जंगमाठायी नाहीं पद, नाही फल, नसे हो भव,**
**मी आता भवभवांतरी करितो,**
**तुमचे जंगमार्चन कूडलसंगमदेवा.**

**३०२**

**मम करणेंद्रियाना करितो मी एकरूप त्यांच्यात,**
**मम मनास करितो मी एकरूप त्यांच्यात**
**मम मस्तकाने करितो मी त्यांचे पादार्चन,**
**कूडलसंगाच्या शरणसंगे येऊन, तोडतो मी मम भवबंधन**

बसवदेव लिंगपूजा सोडून उठले. चन्नबसवदेव आदिकरून असंख्यात महागणाना बोलावून घेतले. (विभूती विळळे) विभूती विडाचा नजराणा घेऊन पंचमहावाद्यासमवेत स्वागत करण्यास निघाले. तेथे नवरत्नखचिताचा तोरण बांधिला होता, देवांगवस्त्राचे छत घातले होते. पायघडा अंथरिले होते. इकडे प्रभुदेव, बसवदेवांचा स्मरणाचे विस्मरण झाल्याचे पाहून विस्मयाने सिद्धरामदेवाना सांगतात.

अनुक्रमणिका

३०३

**पहा पहा हो सिद्धरामेश्वरा,**
**इतक्या लवकर आला पहा या भक्ताना अहंकार.**
**भूत्य असल्याठिकाणी कर्ता आपण होऊन आला**
**असताना, त्यास सेवकास बोलावण्यास पाठवावे काय ?**
**संगनबसवण्णासच असा विसर आवरल्यास,**
**इतर भक्तांची कथा काय ? सांगा हो.**
**गुहेश्वरलिंगास भक्तिने मनःपूर्वक बोलाविल्यास जातो,**
**अन्यथा नाहीं मी जाणार**

प्रभुदेवांचे उद्‌गार ऐंकूण सिद्धरामदेव उत्तरतात.

३०४

**तुमची शक्ति आहे हो त्याच्या ठायी,**
**त्याचे प्राण तुमच्या ठायीं,**
**तुमचे त्यांचे भेद कोणास होई अवगत ?**
**सांगा हो तुम्हीच कपिलसिद्धमल्लिनाथ.**
**तुमच्या शरणबसवण्णांचे स्वरूप तुम्हासच अवगत आहे.**

प्रभुदेव आणि सिद्धरामदेव आपापसात बसवदेवांच्या अंतःस्थितीगतिविषयी बोलत असताना, इकडे बसवदेव असंख्यात महागणासमवेत येऊन दर्शन घेतात.

३०५

**तुम्ही भवरोग वैद्य म्हणून देवा, मी ठेविली श्रद्धा तुम्हावर**
**एक वेळा करा हो करुणा मजवर**
**देवा, तू असशी भक्ति फलदायक, एक वेळा तरी करुणा मजवर,**
**जय जय श्री महादेवा, म्हणतो मी हे कूडलसंगमदेवा**
**तुमच्या पदी नमो नमः**

३०६

**देवा रे, तुज पहाताच मज होतसे अपार सुख, तू न दिसल्यास**
**होतसे रे दैन्यावस्था आतुरतेच्या स्नेहास होई दर्शनानें, तृप्ति,**
**कूडलसंगमदेवा, देखता तुमचे श्रीचरण झालो हो मी धन्य**

अनुक्रमणिका

३०७

हे देवा, तुमच्या शरणाना पाहिल्याचे सुख मी कसा हो वाणू ?
ते नसे सालोक्यासम, नसे ते समिज्यासम
ते नसे सारूप्यासम, नसे ते सायुज्यासम,
कूडलसंगाच्या शरणांचे पद परिस पाहून
झालो हो मी धन्य

३०८

हे देवा, मन स्पर्शिता भक्तिनें, तनु होई रे अर्पण
देवा, तनु अर्पित भक्तिने मन होई अर्पण
मम तन मन दोन्ही तुमच्या चरणास असती वेद्य
त्राही त्राही देवा, तुम्हासच अवगत कूडलसंगमनाथ

३०९

माझे शिर तुमच्या चरणास घासून पुसून झाले हो अभेद्य जाण
देवारे, मम कायेचे कपट, मम मनाचा विकार,
तुमचे अंगुष्ट अग्र स्पर्शिता, झाले हो परिहार.
कूडलसंगमेशा, पाहता तुमचे चरण प्रकाश,
मम अंतरंगाचा काळोख पावे हो नाश.

बसवदेवांच्या नमस्कारादि क्रियेस प्रभुदेवांची निजमूर्ती असाध्य होऊन ती निराकारस्थलांत अचल झाली.

३१०

रूप निरूपाठायी पावे निश्चल, अवग्रहिले अरूप निरूपास,
निजरूप निर्णयाठायीं पावे निष्पत्ति.
निष्पत्ति पावल्या निजशरणाचे स्वरूप,
कायाधारी पहातो म्हटल्यास, ते कसे दिसू शकेल ?
कूडलसंगमदेवाचे शरण प्रभुदेवांची, अंतःस्थिती
मज कैसे होईल हो साध्य ?

३११

शिव दिसतो हो, शिव लपतो, अंतरतो तो शिव.
डोळ्यापुढें होऊनी कायाधारी, मनापुढें होऊनी स्वप्न
सतवितसे शिव.

अनुक्रमणिका

शिवाचा वास असुनी एकेठायीं, परि तो दिसतो अनेक ठायी
अनेक ठायी असुनीवास, एके ठायीच रूप वसे.
कूडलसंगमेश होऊनी चिन्मय, झाला हो मज तो असाध्य

३१२

हा मज पाहतो म्हणून झाला हो तो डोळ्याआड.
ऐकतो म्हणून झाला तो कानाआड, शिवतो म्हणून
झाला माझ्या हाताआड. स्पर्शितो म्हणून झाला
माझ्या तनुआड, आठवितो म्हणून झाला हो
मनाआड. जाणतो म्हणून झाला तो अंतरंगाआड,
पूजा करतो म्हणून आला की हो क्रियेआड,
कूडलसंगमदेवाशी केला मी अहंकार.
उपमा नच तयास, झाली हो माझी दैन्यावस्था अपार

बसवदेव नानाविध क्रियेने शिवावे म्हणतात. परंतु प्रभुदेवांचे स्वरूप स्पर्शास असाध्य झाल्याने अनुतापाग्निने विरून, कळवळून व्यथित मनानें बसवदेव म्हणतात, माझ्या अहंकाराने झाली हो माझीच हानी.

३१३

शरणू म्हणत गेलो मी धरण्यास तव चरण,
परि चरणाची उपस्थिती मज नाही दिसत,
खूणास धरावे म्हटल्यास नच द्यावे ते माझ्या हाता
संयोगाने शिरावे म्हटल्यास त्या पूर्वीच झाला की हो असाध्य
हाय, हाय देवा, अहंकाराने झाला की हो अनाहुत
हे गुरो. माझ्या परम गुरो ,येई बा आता,
या अजाण बालकाचे अवगुण न पाहतां. कूडलसंगमनाथा.

३१४

त्रिविध, त्रिविधाठायी घडला माझ्या हातून अपराध, आहे हो अपराधी
देवा, एकदा तरी करी मज करुणा,
जाणूनही पुन्हा केल्यास मी अपराध,
तुम्ही केलेल्यास होईन मी पात्र
बा, कूडलसंगमनाथ

अनुक्रमणिका

३१५

देवा, अहंकारी, वरपांगी असे हो हे मन, देवा, माझ्यात तुम्ही
आता काय हुडकता ?
तुम्हावर विश्वास ठेवुनही घडले माझ्या हातून श्रद्धा न ठेवण्यापरि.
साप दावुनी, दूध तूप मागितल्यापरि,
झाली मम भक्ति, हे कूडलसंगमेश्वरा.

३१६

शाईस कितीक काळ उजळले तरी होईल कां ती धवल ?
कर्मस्थिती पुरवीतसे हो माझी पाठ
अनंतकोटी वेळा करूनी सन्मान, काय प्रयोजन ?
हनन होई ते एक क्षण केल्यानें उदासीन.
कूडलसंगमनाथ, तव ठायीं श्रद्धा ठेवुनही न ठेवीले
ऐसा मी आहे निगरगट्ट.

३१७

स्थावर, जंगम हे एकच, असा मी घालतो वाद,
परि बोलण्यात अडखळतो, ममठायी नच हो सहजता,
मी उभयलिंग संबंधी ही गोष्ट होऊनी गेली कूडलसंगमनाथा.

३१८

मज तुम्हीच पिता, तुम्हीच माता, तुम्हीच माझे बंधु,
देवा, तुम्हीच हो सगे सोयरे जाणा, तुम्हाविण मज ना अन्य कोण.
हे कूडलसंगमनाथ, मज बुडवा तुम्ही दुधात वा पाण्यांत.

३१९

आमच्यानी ( शरणांनी ) करूनी माझी स्तुती,
मज चळविले सोन्याच्या सुळावर
अहंकाराच्या जखमेनें मी कसा हो जिवंत राहीन ?
कसा हो मी जगेन ?
जंगम होऊनी यावें तुम्ही, मज उतरवा देवा सुळावरून.
औषधरूपी प्रसाद देऊन, तारावे मज
कपिलसिद्धमल्लिकार्जुन.

बसवदेव अनुतापाने व्यथित होऊन नम्रतेने सांगतात, ते ऐकून प्रभुदेव आक्षेपितात.

३२०

**लिंगाठायी जंगम, जंगमाठायी लिंग असल्याचे**
**जाणुनही जाहले हो व्यर्थ. आता जंगमास करून**
**अन्य का बरे शोधावा ? त्या लिंगातच जंगम शोधावा.**
**लिंगार्चन करित असता, जंगम आल्यास घरा,**
**सोडुनी लिंगार्चन, जंगमास करूनी स्वागत, करावे वंदन**
**जो या भक्तिची जाणतो रीत तोच भक्त जाण.**
**जंगम बाहेर उभा असताना, आंत लिंगार्चन**
**जो करितो तो कसला भक्त?**
**जंगमाच्या समोर लिंगास हातात धरून,**
**सहपंक्तित बसून, जो करितो पूजा तो भृत्याचार द्रोही.**
**अशा भक्ताच्या घरी जो जाई जंगम तो अज्ञानी होय.**
**आमच्या गुहेश्वर शरणांच्या संगे जो अहंकाराने**
**वर्तती, त्यास पाहून मज नाही रूचत संगनबसवण्णा.**

३२१

**जंगम बाहेर असताना ते कसले बरे लिंगार्चन ?**
**प्राण बाहेर ठेवून देहाचे होईल कां चलन वलन ?**
**येऊनी शरण उभे दारात, आपणास विसरल्याचे**
**पाहून, आमचा धनी गुहेश्वरलिंग**
**शास्ती दिल्याविण राहील कां ?**

बसवदेव, लिंगार्चन करीत असताना, त्यांना विसर पडल्याचे प्रभुदेव आठवण करून देऊन टोचून बोलतात. ते ऐकून बसवदेवांच्या मनास ती गोष्ट लागली. आपल्या कृत्याचा तिरस्कार करतात.

३२२

**तीनशे साठ दिवस करूनी तालीम,**
**आखाड्यात उतरण्या आधी डावपेच**
**विसरल्यागत झाली हो माझी भक्ति !**
**अनेक काळ करूनी लिंगार्चन, काय प्रयोजन ?**
**मन माझे दृढ असल्याविण**
**भरल्या दुधाची घागर जमिनीवर लवंडून,**
**त्या दूधास झाडूने गोळा होईल का साध्य बा कूडलसंगमदेवा ?**

अनुक्रमणिका

३२३

देवा, बहुत काळ दगड पाण्यांत भिजत
ठेवल्यास ते होईल कां हो नरम ?
कित्येक काळ तव पुजून काय झाले प्रयोग जन ?
मम मीन दृढता बळावल्याविण ?
भूमीगत धन सांभाळलेल्या पिशाचा परि
झाली हो माझी गत, हे कूडलसंगमनाथ.

३२४

अष्टविद्यार्चन षोडशोपचार ही सारी क्रिया,
बिगारीच्या कामाकडें धन्याचे लक्ष न वेधण्यापरि होई,
मज झालेले सुख न येई अर्पिता जंगमास, ऐसा अजाण मी आहे
शिष्टाचारी, स्थावर-जंगम हा भेद न जाणणारा मी एक पूजक.
आणिक न लाजता म्हणतो मी, कूडलसंगमदेव हा मम प्राणलिंग.

३२५

आहेत बघणारे म्हणून करितो मी भक्ति,
माझ्यात एकही नाही खरे, नाही हो माझ्यात निष्पत्ति,
लिंग दाखवून उदर भरण करणारा आहे मी वंचक कूडलसंगमदेवा.

३२६

लिंगपूजा करूनी काय प्रयोजन ?
समरति, समकळा असल्याविण ?
लिंगपूजा करूनी काय प्रयोजन ?
कूडलसंगमनाथ पुजून, नदीत नदी मिसळुन एक झाल्यापरि
न होता काय प्रयोजन ?

३२७

लिंग हे कसे असतें हे मज नसे अवगत,
लिंगाचे स्वरूप कोणते, हे मागील क्रमात मज
नच झाले अवगत. लिंगार्चनाची गोष्ट मज हवे कशाला ?
जंगमलिंग होऊन तुम्ही येथें आलात, तुम्ही येथें आला असताना
स्थावरास झालो मी मोहित
हे कूडलसंगमनाथ, माझ्या अपराधास ना गणति ना अंत.

अनुक्रमणिका

३२८

**माझे अपराध अनंत कोटी, तुमच्या सहनेस ना गणती रे देवा**
**घडल्यास पुन्हा अपराध, तुमचे पायीच दिव्य**
**कूडलसंगमनाथ, तुमच्या प्रथमांच्या देखत सांगतो मी,**
**किन्नर बोमय्यांचे पाद समक्ष ठेवुन.**

पूर्वी घडलेला अपराध पुन्हा मी जाण, वा अजाणतेने करीत नाही हे मी किन्नरी बोम्मण्णांच्या साक्षीने तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतो असे बसवदेव आळवितात, तेव्हा किन्नरी बोमय्या, प्रभुदेवांना चलावे म्हणून विनवितात.

३२९

**तनु बेल ( इष्टलिंग ठेवण्याचे )**
**मन लिंग झाल्यावर विहित आचरण वेगळे**
**शोधतात कां हो ?**
**तनुच असे बसवण्णा, मनचि प्रभुदेवरूपि घन सामावल्यावर**
**गुणावगुण करती का संशोधन हे महालिंग त्रिपुरांतक देवा ?**
**संगनबसवण्णाठायी, तुमच्या चरणाठायीं असावा का हो भिन्न भाव**
**का बरे संशय असावा ?**
**शरणु शरणार्थि हे प्रभो करावे हो आगमन**

३३०

**जंगमाचा अंतस्थ उद्देश जाणून**
**जंगमचि लिंग हे जाणणाराच सद्भक्त होय.**
**मन मन एक झालेल्या कासवाच्या शिशु स्नेहापरि,**
**प्रत्यक्ष बघण्याआधीच व्हावे अविरळ**
**आगमनाचे कारण उमगता, जो अतिशय अहंकारी होतो**
**अशाना न मानी आमचा गुहेश्वरलिंग, ऐक वा किन्नरी बोमय्या**

किन्नरी बोम्मण्णास प्रभुदेवानी म्हटलेले ऐकून, केविलवाणे होऊन प्रभुदेवास, बसवदेव विनवितात.

३३१

**सत्य संबंधित भृत्याचार नसे हो माझ्यात**
**देवा, अनुदिन चिंतन करण्याची भक्ति नसे माझ्यात**
**हे कूडलसंगमनाथ करुणाकरा, करावी मजवर कृपा आता**

अनुक्रमणिका

माझा अहंकार परिहार करून मज कृतार्थ करावे म्हणून बसवदेव विनवितात.

३३२

**मम मनीचे कलंक वितळून, काढा हो निपटून.**
**हे देवा, घाला मुशींत, पहा घासून कसास लावून,**
**तावून, सुलाकून, ठोकून करा मज सोन्याचा लगड.**
**तुमच्या शरणांच्या चरणास करूनी आभरण,**
**कूडलसंगमदेवा, करा हो रक्षण**

बसवदेवांचे ऐकून प्रभुदेव म्हणतात.

३३३

**तनुत तनु सेवा करून नाहीं झाले कृश,**
**मनात मन सेवा करून नाही झाले जर्जरित,**
**धनात धन नाहीं झाले कमी.**
**भक्ति युक्तिच्या गोष्टी तुज कशाला हवेत सांग बा बसवण्णा ?**
**क्रिया-समरस या किर्ती-वार्तेत गुंतून, बसवण्णा,**
**जंगम लिंग याचे पडे तुज विस्मरण.**
**गुहेश्वरलिंगास त्रिकरण अर्पिल्याविण,**
**भक्त होता न येई बा संगनबसवण्णा !**

प्रभुदेवास बसवदेव म्हणतात, तनु मन, धन हे सारे तुम्हास वंचना न करिता मी अर्पण केले आहे.

३३४

**कसभर कनक, वस्त्रातील एकल धागा,**
**आज वा उद्या येई ते उपयोगा,**
**असे न येई मम मनी, वाहतो देवो आण तुमची,**
**तुमच्या शरणगणांची, तव सेवेविण अन्यठायी न करी हो**
**धन व्यय, कूडलसंगमदेवा, स्मरूनी सांगतो मी तव पाय.**

३३५

**तुम्ही मागितल्यास देतो मी तन, मागितल्यास देतो माझे मन,**
**देवा, मागितल्यास देतो मी धन तुमच्या शरणाना,**
**'मज पाहिजे' हा भाव आल्यास मम मनी न कळत,**
**घन महिमावंत तुमच्या पायाची शपथ.**

अनुक्रमणिका

**मन-वचन-कायात अन्य चिंतिल्यास कूडलसंगमनाथ.**
**मज लोटावे बा भवघोरांत**

तनु, मन, धन तुम्हास अर्पिले आहे असे बसवदेवांनी सांगितल्यावर त्याचे खंडन करीत प्रभुदेव म्हणतात.

**३३६**

**सकल मेरूगिरी या प्रमथांच्या वस्तु होत.**
**रजतगिरी या पुरातनांच्या वस्तु,**
**चतुर्दश भुवने लिंगदेवाच्या ( कर्त्याच्या ) वस्तु.**
**पृथ्वि ही कर्त्याची टंकशाळा, छापण्याचे खिळे,**
**स्वयंपाकघर, तनु मन धन ही सारी आमच्या**
**गुहेश्वरलिंगाची संपत्ति, यात तुझे आहे तरी काय ?ते**
**देऊन झालास तूं भक्ति, सांग बा संगनबसवण्णा.**

**३३७**

**तनु अर्पित म्हटल्यास होई गुरू द्रोह,**
**मन अर्पित म्हटल्यास लिंग द्रोह,**
**धन अर्पित म्हटल्यास जंगम द्रोह,**
**तनु, मन धन हे अनित्य जाण, नित्या**
**ते नित्यास अर्पून मी भक्त झालो म्हणणेंच अज्ञान.**
**धन्याना लाडू फोडून वाढून मी झालो भक्त म्हटल्यास,**
**कसे रुचेल बा ही गोष्ट सम्यक् शरणांना !**
**आमच्या गुहेश्वरलिंगास तू काय अर्पून झालास भक्त**
**सांग बसवण्णा ?**

प्रभुदेवांना, बसवदेव अनुकंपाने उत्तरतात.

**३३८**

**तीळाविण घाणास, फिरलेल्या बैलागत झाली हो माझी भक्ति !**
**मीठ पाण्यांत बुडवून खाल्यांगत, झाली देवा माझी भक्ति !**
**हे कूडलसंगमनाथ, मी केले या बोलीच्या ज्वालेनें**
**केले माझे दहन, अजून नाहीं झाली कां पूर्तता, सांगा मज प्रभो !**

अनुक्रमणिका

३३९

ही तनु दिली असे वदून गुरू वचनास झालो दूर,
देवा रे, मन दिले असे म्हणून लिंग वचनास झालो हो दूर.
धन दिले असे म्हणून, जंगमवचनास झालो मी दूर.
हे कूडलसंगमेश्वर, तुम्हास दिले असे
म्हटलेल्या या माझ्या भ्रमेस ना अंत ना पार.

३४०

नाहीं भी भक्त, नाही हो युक्त, नाही मी मुक्त,
देवा, मी नच सर्वशक्ता,
कूडलसंगमनाथ, माझी भक्ति झाली रसरहित फळागत,
असल्याचे तुम्ही मज दाखविल्यानें झाले हो मज अवगत

बसवदेव विनम्रतेने आपला भाव सादर करतात, ते ऐकून प्रभुदेव विडंबन करून म्हणतात.

३४१

सजन सांनिध्य भक्ति, जशी येई वेळ तसे वागण्याची
ही कसली बा रीत, सांग तूच मज आता ?
एकदा अहंकार, एकदा किंकर येते का होता ?
मनाठायी मन ठेवुन साक्ष, जो करी भक्तीत्याठायी असे
गुहेश्वर निवास, नसे बा प्रापंचिकात संगनबसवण्णा.

३४२

जंगमचि लिंग म्हणून श्रद्धा ठेविल्यावर नसावा बा संशय !
भिन्न संशय निपटून स्वयं पावे जी भक्ति,
तिने मागे घेतल्यास पाऊल, होई ती निर्मूल !
एकदा होऊनी किंकर, पुन्हांः आल्यास अहंकार,
येथून जा म्हणून परतवितो आमचा गुहेश्वर.

बसवदेव विनवितात.

३४३

नका हुडकु, हुडकू नका हो नका, नसे हो सत्व,
सत्व नसलेल्या फळात आणखी काय हुडकता ?

अनुक्रमणिका

तुमचा चांगुलपणा मिरवा बा कूडलसंगमनाथ !

३४४

देवा मम चित्त असे उंबराचे फळ !
विचार केल्यास त्यात ना सत्व.
प्रापंचिक मोठेपणात करूनी साकार, तुम्ही मज ठेवलात
बा, कूडलसंगमनाथ.

३४५

प्रभुदेव म्हणतात

हाती जनावरास दाणे चारणारे, मनी क्रोध, वचनी विनय.
तुज कशास हवे बा बसवा लिंगाची वार्ता ?
जंगमचि लिंग होय, हा शब्द सूतक विना
सजन सद्भक्तिचे कथन, तुज कशास हवे बसवा ?
लोखंड परिसाच्या स्पर्शानें आपले रूप पालटून होतसे सोने,
परि ते परिस होऊ शकेल कां बसवा ?
गुहेश्वररूपि परिस पुतळ्याचा असल्यास तूं जाणकार,
तूंच समजून पहा संगमबसवेश्वर.

३४६

बसवदेव विनयाने सांगतात

मज नाही समजत तुमच्या भक्तिची घनता.
मज कसे समजावे तुमच्या श्री पदाचे उन्नतोन्नत ?
कायेच्या कळवळाधीन झालेल्यास
बाणावेल का तुम्हाठायी निष्ठा ?
कूडलसंगमनाथ, माझ्यातले अवगुण न बघता,
माझ्या बापा, करूनी करुणा, मज दावा भक्तिची निजस्थिती.

३४७

प्रभुदेव कथन करतात

कासवाच्या शिशु स्नेहागत तुज राहता येऊं नये का बसवा ?
फांद्यावरून फांद्यावर उडी मारणाऱ्या माकडापरि सावध

अनुक्रमणिका

**असू नये कां ?**
**पाणी व दूध वेगळे करणाऱ्या हंसापरि तुज राहता येऊं**
**नये कां बसवण्णा ?**
**गुहेश्वरलिंगाठायी चुकूनी अवधान,**
**पुन्हः धुंडावे का सांग तूं संगनबसवण्णा.**

बसवदेव उत्तर देतात.

३४८

**मम तनुचा धनी असशी तूंच देवा,**
**मम मनाचा धनी तूच असशी देवा,**
**मम धनाचा धनी तूच असल्यावर**
**तुझाच होई रे मम स्मरण, तुझाच रे मम विस्मरण**
**कूडलसंगमेश्वर 'भृत्यापराधः स्वामीनो दंडः' ॥**
**हे प्रभो तुम्हीच करा हो याचा विचार.**

प्रभुदेव म्हणतात.

३४९

**बसवण्णा, आपणास न येई जीवन जगता, देती बा शिव्या विधीस**
**घडले हे या म्हणीपरि.**
**चुकुनी अवधान, आचाराविण वर्तन, म्हटल्यास शिवाधीन,**
**जे आता घडले ते अज्ञानें होईल का मान्य**
**गुहेश्वरलिंगाठायी, मुखस्तुतीची वाणी,**
**मज न रुचे बा ऐक संगनबसवण्णा.**

३५०

**लिंग-जंगम पुजुन भक्त होणारास**
**मूळ हवे भृत्याचार सदाचार !**
**श्रद्धेच्या भक्तिस नसे बा भार,**
**अहंकाररूपि तलवारीच्या धारेस धरूनी करी,**
**करीत असलेली भक्ति, करिते ती आपणासच वार,**
**गुहेश्वररूपि वैरी जिंकण्यास, धरावे बा,**
**ज्ञानरूपि तलवार न चुकता अवधान संगनबसवण्णा.**

प्रभुदेवाच्या निरूपणास बसवदेव सांगतात.

अनुक्रमणिका

३५१

**ध्यान मौनरूपि शस्त्र धरण्यास मज नच उमगता,**
**अहंकार रूपि तीक्ष्ण टोकाचे शस्त्र धरूनी हाती,**
**झाली हो माझी हानी, याची मज वाटें भय, वाटे हो भिती.**
**जंगम लिंग ही भाषा बदलली.**
**आता जंगम लिंग या शिक्षा शस्त्राने मज मारून,**
**रागे भरून करा हो रक्षण कूडलसंगमदेवा.**

बसवेश्वरांचे ऐकून प्रभुदेव रागाने म्हणतात.

३५२

**मनास मन एकार्थ होऊन, कायेस काया समदर्शन,**
**प्राणात प्राण समरस होऊन जे असती,**
**अशांच्या मन वचन कायेंत शब्द सूतकाची झाल्यास उत्पत्ति,**
**सहन न होई जाण.**
**आमच्या गुहेश्वरलिंगाचा भक्त तूच असल्या कारण,**
**स्फुरला बा कोप, पहा संगनबसवण्णा.**

३५३

**वेश्या अनेकाठायीं होई रत, परि तिज न करिती कोणी निंदा.**
**पतिव्रता आपल्या पुरुषाविण, अन्यमुख देखता,**
**तिज म्हणती या जगी चांडाळीण.**
**किर्ती वार्तेस करीत असलेली भक्ति,**
**चुकल्यास ते मनास नाहीं पटत.**
**ठेचाळल्यास सज्ञन सद्भक्त, ते नच होई बसवा सहन**
**आमच्या गुहेश्वरलिंगास, आदिच्याहि पलिकडे**
**बसवण्णा, तूच भक्त असल्या कारणें**
**होई मनास व्यथा बा संगनबसवण्णा.**

प्रभुदेव रागाने बोलतात, त्यांना बसवदेव अनुतापाने सांगतात.

३५४

**माझ्या वाणीने माझ्या हृदयाचे केले वितरण**
**माझ्या खङ्गानें माझेच केले हनन.**
**मी असे पापी, असे हो कोपी.**

अनुक्रमणिका

पोरकटपणांने केली माझी हानी
चाकर रागावल्यास त्याचीच होई हानी.
जरी धनी रागावला तरी चाकराचीच होई हानी.
तुम्ही रागावल्यास मीच पावतो नाश, हे कुडलसंगमेश.

३५५

पेटती चुल येते विझविता,
कोण विझवी धरती माता ?
बांधारा प्याल्यास नीर,
कुंपणच चरल्यास शेत,
नारी आपल्या घरी केल्यास चोरी.
आईचे दूध झाल्यास वीष, कुणासमोर करावी तक्रार ?
हे कुडलसंगमेश्वरा, तुम्ही मजवर रागावल्यास मज ते
सोसवेल कां हो ?

३५६

मम गुणावगुण ममठायी करितो मी संपादन,
तवसम कसा बरे मी होईन ?
अप्रतिम महिम देवा तवसम कसा मी होईन ?
कूडलसंगदेवा, तव करणीनेंच झालो मी !
तुम्हीच सांगा, मजवर करावा का तुम्ही कोप सांगाबापा ?

बसवेश्वरांनी विनविल्यावर प्रभुदेवानी बसवेश्वबरांचे महात्म्य दाखवून देऊन आक्षेप करतात.

३५७

आराधून करिती का विरोध ? पूजुनी पूजेची
व्हावी का विस्मृति ?
जंगम लिंगाचे जाणकार, चुकतील का हे मर्म ?
वारा गंध एकचि झाल्यागत, आहे बा या जगात,
हीच किर्ती वार्ता मिळविलास कीं बसवण्णा ?
तव शिशु स्नेह, आठवण, विस्मरण, हे वसुधेच्या
प्रमथाना होईल का बरे मान्य ?
जाणून पाहिल्यास, गुहेश्वराचा शरण
अल्लयास तूंच असशी बा परमाराध्य हे संगनबसवण्णा.

अनुक्रमणिका

माझा तू परमाराध्य आहेस, याचा तुला विसर पडला आहे. असे प्रभुदेव कथन करतात. ते ऐकून बसवदेव विनयाने सांगतात.

३५८

**ममगति मति तूच असशी देख देवा.**
**मम गुरू परमगुरू असशी तूच.**
**मम अंतरंग ज्योति असशी तूंच.**
**कूडलसंगमेश, तूच मम गुरू, मीच तुझा शिष्य.**
**हे तव शरण सिद्धरामदेवाना असे हे अवगत,**
**करावी कृपा मजवर हे प्रभो !**

माझा परमगुरू तुम्हीच असल्याचे सिद्धरामदेवाना माहीत आहे असे सांगून बसवदेव मठास यावे म्हणून प्रभुदेवास विनवितात. तेव्हा सिद्धरामदेव,बसवदेवांच्या श्रेष्ठतेची स्तुती करून प्रभुदेवांना मठास आगमन करण्याबद्दल नम्रतेने सांगतात.

३५९

**ऐका हे देवा ऐका !**
**आदि अनादि नव्हते तेंव्हा, होता बसवण्णाच भक्त.**
**नाद बिंदु कळा नव्हते तेंव्हा, तूंच होतास जंगम.**
**शिव-शक्ति उदयापूर्वी बसवण्णाच भक्त.**
**आकार निराकार हे शब्द उद्भवण्यापूर्वी तूंच जंगम.**
**उभय भावाठायीं असू शकेल का हो भेद ?**
**हे कपिलसिद्धमल्लिनाथ, बसवण्णा कोण ?**
**हे तुझ्या तूच ओळखून करावी बा करूणा प्रभो.**

सिद्धरामदेव, बसवदेवाच्या घनतेचे निवेदन नम्रपणे करीत असताना चन्नबसवदेव येऊन नमस्कार करतात.

३६०

**शरणु शरणार्थि.**
**महादेवाच्या देवा, तुज शरणु, शरणार्थि.**
**परब्रह्म स्वरूप शरणु शरणार्थि**
**निराकार तत्वा, तूच गति-मति, तव चरणी शरणु शरणार्थि.**
**सति पतिच्या प्रेमाचा रूसवा ते अति प्रेम असल्याचे आहे प्रतिक !**
**तुमच्या शरण बसवण्णाचा स्नेह, राग पाहून हे गुरो**
**मम मनि न येई शंका. बाजारातल्या जमावांत अभिमानाच्या**

अनुक्रमणिका

गोष्टी विकतात का हो ?
रस्त्यात उभारून अनुभावाच्या, प्रीतीच्या गोष्टी करणें
होतसे हो हास्यास्पद.
संगनबसवण्णात, तुमच्यात नसे हो भेद,
हे जाणुन बुजून पुन्हा जाण्याचे नाकारता, हे तुम्हास वाटते कां उचित
कूडलचन्नसंगमनाथाचा शरण संगनबसवण्णाच
तुमचा प्राण आहे, असे असून तुम्ही कोणावर करिता हो रूसवा ?
करा कृपा हे प्रभुदेवा.

३६१

भक्ताची उन्नती त्याची अवनती, जंगमाची उन्नती
त्याची अवनती, याची तुम्हास नाहीं का जाण
प्रभो, तुझा प्राण तो बसवण्णाचा प्राण,
बसवण्णाचा प्राणच तुझा प्राण,
तुझी छाया तीच बसवण्णाची काया,
बसवण्णाची कायाच तुझी काया;
तुजविण बसवण्णा नाहीं, बसवण्णाविना तू नाहींस,
दुजे करून पाहता न येई,
हे तुम्हास अवगत असुनही विनाकारण रुसतो कां हो
जाणता ?
चालताना घोडा ठेचाळतो म्हणून त्यास नशिकवता चाल,
लगाम तोडून मारतात कां हो या जगी कोण ?
विस्मरणानें आलेले अवगुण पारखुन न पाहता तव गृहास
करावे हो आगमन
कूडलचन्नसंगमदेवा, तुमच्या शरण संगनबसवण्णा कोण
याचा तुम्हीच करा हो फेर विचार

चन्नबसवदेव विनवीत असताना मडिवाळ माचिदेव, प्रभुदेवास विनम्रपणे म्हणतात.

३६२

शरणु शरणार्थि, लक्ष देऊन ऐंकावी माझी विज्ञापना,
आला बसवण्णा मृत्युलोकी गुरूरूप करूनी धारणा
आला चन्नबसवण्णा मृत्युलोकी लिंगरूप करूनी धारण
प्रभुदेव आलात तुम्ही मृत्युलोकी जंगमरूप करूनी
धारण भक्तिच्या अभिवृद्धिस बसवण्णा झाला कारणिक
ज्ञानाच्या अभिवृद्धिस चन्नबसवण्णा झाला कारणिक
या उभयताठायी सामावलेल्या महाघनास तुम्हीच झालात

अनुक्रमणिका

**कारणिकल गुरू लिंग जंगम हे तिन्ही असती एकोभाव,**
**यात असूं शकेल का भिन्नभाव, बसवण्णा-चन्नबसवण्णांची**
**विनंती न करिता अमान्य,**
**कलिदेवर देवा करावे आगमन**

चन्नबसवण्णा, मडिवाळ माचिदेव यांनी विनवणी केल्यावर प्रभुदेव संतुष्ट होऊन, बसवदेवांचे महात्म्य अनेक रितीनें स्तोत्र करतात.

नित्य बसवण्णा, निरंजन बसवण्णा, सच्चिदानंद बसवण्णा, अखंड परिपूर्णबसवण्णा, अनंतकोटी ब्रह्मांडास आधाररूप बसवण्णा, चराचर सकलास रक्षण करणारा सद्धर्मरूपी बसवण्णा, शिवाचार चक्रवर्ती बसवण्णा, सर्वाचार संपन्न बसवण्णा, षड्स्थल ब्रह्मरूप बसवण्णा, सर्वांग लिंगमूर्ति, स्वानुभाव सारोद्धार बसवण्णा, जंगमप्राणी लिंगैक्य बसवण्णा, आरूढ दासोही बसवण्णा, निस्संग निजरूप बसवण्णा, शिवसमयप्रतिष्ठा स्थापनाचार्य बसवण्णा, अशा प्रकारे स्तोत्र करून प्रभुदेव बसवदेवास नमस्कार करतात.

**३६३**

**आयताठायी पाहिला पूर्वाचारी,**
**स्वायताठायी पाहिला पूर्वाचारी**
**सानिध्याठायी पाहिला पूर्वाचारी**
**गुहेश्वरलिंगाठायी पूर्वाचारी संगमबसवण्णाच्या**
**श्रीपदी म्हणतो मी नमो नमो**

**३६४**

**गुरुस्थल लिंगस्थल जंगमस्थल प्रसादस्थल,**
**हे करस्थलाच्या इष्टलिंगाठायी सामावल्याचे कोणास होते**
**हो अवगत ?**
**निर्वचकत्व, नित्यनिज क्रियेचे भक्तिस्थल,**
**बसवण्णाविण कोणास होते अवगत ?**
**गुहेश्वरा, तुमच्या शरणास होऊनी शरणागत**
**मी जगतसे**

**३६५**

**जन्मलेल्या कुळीत न मिसळता, आपले अस्तित्व कुणी प्रबल केले**
**सांग बा तूच ?**
**विस्तारलेल्या तीन पर्वतास, आपले मनास विस्तारू न देता,**
**लिंग जंगमाची सेवा करीन होऊनी जर्जरित,**
**कोण झाले हो स्वयलिंग तुम्हीच सांगा ?**

अनुक्रमणिका

स्वतःच लिंग, स्वतःच शरण स्वतःच झाला भोग,
गुहेश्वरा, तुमच्या शरण संगनबसवण्णास म्हणतो नमो नमो

३६६

दासोहाच्या सेवेत तनु होऊनी क्षीण, लिंगध्यानी मन झिजुनी,
धन जंगमास्तव करूनी व्यय, जयशाली झालेल्या संगनबसवण्णाविण
नाहीं मी पाहिला कोण.
हे गुहेश्वरा, तुमच्या शरण संगनबसवण्णास म्हणतो मी नमो नमो,

३६७

एका शरणाने निराकारास आणिले साकारास,
त्या साकारात भक्तिस स्वायत्त केले एका शरणानें,
त्या भक्तिस सुज्ञानमुख केले एका शरणानें
ते सुज्ञानच लिंग झाल्याने त्यास धारण केले एका शरणानें
त्या लिंगास आपल्या सर्वांगात वेधुन घेतले एका शरणाने,
त्या सर्वांगास निर्वाणसमाधींत निश्चल केले एका शरणाने,
मी निर्वणांत निश्चल होऊन अगम्य झालो म्हटल्यास,
भक्तिकंपित म्हणवून, मज येण्यास लाविले आपल्या
ठिकाणीं एका शरणानें
गुहेश्वरा, तुमच्या शरण संगनबसण्णाचें देखुनी श्रीचरण,
मी वाचलो करीत वंदन.

प्रभुदेव प्रसन्न होऊन बसवदेवांचे स्तोत्र करीत असताना बसवदेव, प्रभुदेवांचे स्तोत्र करतात.

३६८

चाले पायाविण, धरी तसे हाताविण,
सहज पाही डोळ्याविण.
कायाविण रंग, मथनाविण संग !
त्याठायीं होऊनी स्वयेलीन, शिलेवरचा-देह
न ओळखे स्वतःस, देह स्वतःनच ओळखत.
पहा, हो अविरत माझ्या पाठीस लागून आलेली ही रीत
धरली जडत्व मम काया, तिची कळवळ समजण्यास्तव.
पावलो पावली दावीतसे अनुभाव.
बसल्या जागी लंगडा, उभारल्या जागी पांगळा,
जिकडे पहावे तिकडे परिपूर्ण,
हळुहळु आंतरिक पाही कसास लावून

अनुक्रमणिका

दाखवितसे जाणकारानो तुम्ही जगा म्हणून.
झालरीच्या वरती धवल छत्र धरून,
बलवान थांबवितो हत्तीस धरून,
कूडलसंगमदेवाच्या महामनेत प्रभुदेवांचे मागुनी रक्षण
वाचलो मी.

३६९

समजाविला आदि; दावीला अनादि,
केला इहास परिहार केला परासस्थिरः,
दाविला घन, तोषविला मन.
दावुनी अंतःस्थिती गति केला आयत,
पाडुनी तनुचे विस्मरण, महाचे, महत्त्व करी कथन;
पूर्वाश्रय मागे सारून,
केला पुढच्या गतिची शंका निरसन.
कूडलसंगमदेवाठायीं, प्रभुदेवांच्या श्रीपदास म्हणतो मी नमो नमो

या पद्यांत बसवदेव, प्रभुदेवांचे स्तोत्र गातात.

*राग : गुज्ञरी*

गुरू चरण हीच गति गुरू चरण हीच मति
गुरू शब्द मज परिस पावन ।
नगुरोरधिकं न गुरोरधिकं
न गुरोरधिकं वदतसे श्रृति ॥पल्लव ॥
नच जात अजात जीनत नच
नच खेचर नच भूचर
नच अन्य सुख आचरीत
भ्रांतरहित निभ्रांत होय लिंगैक्य ॥१॥
यत्र तत्र शिव तत्व नच साधक
नच अष्टतनु मूर्ति !
अष्टमद बांधुनी केला निश्चल.
अष्टदल कमल तूची पूजकगुरो ॥ २ ॥
आकार-निराकार-साकार सन्‌मत
नच अवकाश मन कामनेश
आकार निराकार साकार सन्‌मत
एकांतातकरी वास निज लिंगैक्य गुरो ॥ ३ ॥
जीव-देह, देह जीवातील
अन्य भिन्न नच भावुक ।

अनुक्रमणिका

समस्थानाच्या सुखाचा सुख भोगी
अणु-रेणु स्थूल-सुक्ष्म भरित तूच गुरो ॥ ४ ॥
भृंग पुष्प परिमलात बसल्यापरि
लिंग संग सुख निर्लेप
अंग लिंग संगी झालेला शिवयोगी
संग कूडलसंगमदेवाठायीं प्रभुदेव ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

बसवेश्वर प्रभुदेवांची स्तुती नानाविध मुखानें करीत असताना प्रभुदेव, आता स्तोत्र करू नकोस म्हणून बसवदेवास सांगतात.

३७०

**मन मन होऊनी एक, झाले बा ज्ञान स्वय,**
**आता स्तुति करण्यास असे का वाव सांग तूच ?**
**शब्दास ना अवकाश, गुहेश्वरलिंगाठायी झाले एकाकार**
**अन्य ना देख संगनबसवण्णा.**

प्रभुदेव, बसवदेवाना निरूपण करीत असताना आणखी एक विशेष आधिक्य पाहिल्याचे सांगतात.

३७१

**नीर क्षीर एकरूप झाल्याचे पाहून ते प्रत्येक करून**
**कोणी पाहिले नाही,**
**कोणी नाहीं केली प्रशंसा,**
**टंकानें सोने झाळल्यावर मध्यें अंतर दिसेल कां तूच सांग बा ?**
**अग्नि ग्रासिले त्या कर्पूरापरि झाल्याची ती रीत पाहून त्याच्यापुढें**
**त्याच्यासमोर प्रशंसा करून सांगतात का ?**
**ते असो संगनबसवण्णा, गुहेश्वराच्या डोळ्या देखत**
**तुझ्या कृपेने मी देखिले एक असामान्य;**

प्रभुदेवांचे निरुपण ऐकून बसवेश्वर अत्यंत आर्ततेने प्रभुदेवास पुसतात, तुम्ही आणखी कोणते असामान्य पाहिलात ?

३७२

**देव देवा महाप्रसाद;**
**तव कथनागत तव चरणी वास करितो**
**हो मी अविरत**
**दुज्या भेदाने मी राहिल्यास तुमचीच साक्ष,**
**देखिल्यानें तव श्रीपद, झाले मम भव नाश.**
**हे कूडलसंगमेशा, तुम्हाहून नसे असामान्य कांही,**
**अशी करिते श्रृति स्तुती.**
**हे प्रभो तुम्ही जे देखिले ते असामान्य कोणते सांगावे मज.**

अनुक्रमणिका

प्रभुदेवांनी असामान्य असल्याचे निरूपण करून मज कृतार्थ करावे, अशी बसवराजदेव विनवणी करतात. मरूळ शंकरदेव हे बसवदेवांच्या प्रसाद कुंडात शेष प्रसाद सेवन करीत बारा वर्षापासून तसेच आहेत. आपले निजस्वरूप प्रकटन न करता वास करीत आहेत असे प्रभुदेव बसवदेवाना कथन करतात.

**३७३**

**वाटेवर पडलेले माणिक**
**पुरलेले निधान, कोणाच्याही नजरेस नाही बा पडत.**
**मरणाऱ्यास गवसेल कां संजिवन** ?
**अज्ञ-मंद दृष्टिस परिस दिसे हो पाषाण,**
**तद्वत् राहतात शिवशरण.**

गुहेश्वराचे शरण मरूळ-शंकरदेवाचे स्वरूप असे आहे. जाण संगनबसवण्णा.

**३७४**

**आदिस केला तो अनंगमुखी अर्पण,**
**अनादिस केला प्राणमुखी अर्पण,**
**मनास केला ज्ञानमुखी अर्पण;**
**आपणास निराकाराठायीं करूनी निश्चिंत;**
**अत्यानंद प्रसादाठायी झाला तो तद्वत;**
**प्रसादचि प्राण; प्रसाद हीच काय, प्रसादचि ज्ञान,**
**प्रसादचि ध्यान, झाले बा प्रसादचि भोग**
**असा आहे आमच्या गुहेश्वरलिंगाठायी आमुचा**
**निजप्रसादि मरूळशंकरदेव, बा संगनबसवण्णा.**

प्रभुदेवाने अशाप्रकारे मरूळशंकरदेवाचे महात्म्य वर्णन करून सांगतात, ते ऐकून बसवदेव चिंताक्रांत होतात. इतके दिवस माझ्या दारापुढें महालिंगैक्य पावलेले शरणाचा वास असताना त्यांची अंतःस्थिती मज जाणता आले नाहीं, हे फार वाईट झाले असे बसवदेव अनुतापाने म्हणतात.

**३७५**

**देवा, तुमचे शरण येऊन माझ्या दारी करीत असता वास**
**स्मरण-विस्मरणाने झाला माझा नाश.**
**माझ्या नाशास ना अंत, ना पार.**
**कूडलसंगमनाथ, माझी भक्ति झाली**
**हजारो व्रत नष्ट झाल्यापरि.**

३७६

**कायेच्या कपटापासून केंव्हा होईल हो माझी सुटका ?**
**सापडलो मी या माया प्रपंच पाशांत;**
**व्यर्थ संभ्रमाचे वाटे थोरपण.**
**हे कोणत्या भावनेचे आहे मुख हे न जाणता**
**झालो देवा ज्ञान शून्य**
**तुम्ही माझ्यात निर्मिलेल्या अतिभयंकर अष्टमदायोगें**
**ते तुम्हास नाहीं हो पाहू शकले.**
**मम तनुचे अवगुण, मम मनीचे मर्कटपण**
**न सोडी हो मज, काय होणार माजी गत**
**कूडलसंगमनाथ, तुमच्या शरणांची निजस्थिती**
**न जाणता, देवा, झालो हो मी भवदुःखित.**

मरूळशंकरदेवांची कृपा मजवर कधी होणार हो ? म्हणून बसवदेव प्रभुदेवास विचारतात.

३७७

**नदीच्या मध्यात नावेतून उतरल्यागत, झाली हो मम भक्ति !**
**चढुनी झाडांवर हात सोडल्यापरि, झाली मम भक्ति !**
**शिव शिवा, झाला मम विनाश हे गुरो !**
**कूडलसंगमेश्वर, मरूळशंकरदेवाची कृपा कधी**
**होणार मजवर, सांगावे हे प्रभो !**

बसवदेवांची विनवणी ऐकून प्रभूदेव सांगतात.

३७८

**तोडुनी कच्चेफळ त्यास रगडून पिकवितो म्हटल्याने पिकेल का ते ?**
**परिमळाविण कळी उमलवुन वेणीत**
**माळल्यास सौरभ दरवळेल का ? त्याचे ?**
**शिवशरणांची अंतःस्थिती सगळ्याच काळी**
**ती दिसू शकेल का ?**
**सुसमय येता क्षणी आपणच होई ती प्रकट.**
**गुहेश्वराच्या शरणांची उन्नतस्थिती पाहताचि विस्मृति-**
**प्रकाश पाहिलेल्या अंधारागत-**
**पाहता पाहताचि होई निःपात, बा संगनबसवण्णा.**

प्रभुदेवांचे निरूपण ऐकूनी बसवदेव, मरूळशंकरदेवाच्या चरणास वंदन करतात.

अनुक्रमणिका

३७९

आभाळा आड असलेल्या विजा परि,
देहाआड असलेल्या आत्म्यापरि,
भूमीआड असलेल्या निधानागत, असणारी
तुमची अंतःस्थिती कोण हो जाणकार ?
देवा, तुमची निजस्थिती अनेक कालापासून
पाहूनही झाले माझ्याकडुन अलक्ष्य. विस्मृतिने झालो देवा मतिहीन
माझ्या अपराधास नाही अंत नसे पार.
त्राही त्राही, तारावे मज कूडलसंगमेश्वर.

बसवराजदेव, मरूळशंकरदेवाची घनता चन्नबसवदेवास निरूपण करतात.

३८०

डोळ्यात ना कल्मष, कायेत ना माया,
मनात ना विस्मरण देहाची ए जाण निर्देहाचीहि नसे जाण.
सूत्राच्या बाहुलीसारखी
असलेली ही अत्याश्चर्यकारक पहा हो ही मूर्ति !
सेवुनी लिंग जंगमाचा शेष प्रसाद आहे हा अत्योन्नत निश्चल,
या महाप्रसादिस पहा हो !
आपणास ओळखतील म्हणून, या जगाच्या डोळ्यास
मायेचा अंधेर पसरवून, आपण नित्य निजपदी
झाला तो तद्‌ग ! कूडलसंगमदेवाठायीं,
या मरूळशंकरदेवाचे अस्तित्व पहा बा चन्नबसवण्णा.

बसवदेवांचे निरूपण ऐकुन चन्नबसवदेव, मरूळशंकरदेवाच्या स्थितीची वाखाणणी करतात.

३८१

अर्पिला हो अंग आचारास, आचार अर्पुनी अंगास,
झाला तो आचारलिंग प्रसादि
अर्पिला प्राण, लिंगास, लिंगास अर्पिला प्राण
झाला प्राणलिंगी प्रसादि
देहभावाचा अहंकार, दासोहभावावणि न होई परिहार,
यास्तव लिंग जंगमाचा होऊनी सेवक
झाला हो जंगमलिंग प्रसादि,
सत्य शरणांच्या आंगणात पडलेला अन्नाचा शित
उचलुनी सेवन करीत, बारा वर्षे राहुनी प्रसाद कुंडात

अनुक्रमणिका

**झाला हो तो निरंतर प्रसादि**
**कूडलचन्नसंगमदेवाठायी, मरुळशंकरदेवाच्या**
**श्रीपदाची घनता तुमच्याने जाणून झाले हो मम रक्षण**
**बा संगनबसवण्णा**

चन्नबसवेश्वर आणि बसवेश्वर हे उभयता मरुळशंकरदेवाची श्रेष्ठता आनंदाने वाखाणित असताना, मरुळशंकरदेवाच्या स्थिर स्थितीची गुप्त भावना शेवटी प्रकट झाल्याने, मरुळशंकरदेवाचा अंतसमय जवळ येऊन ठेपला आहे. नित्य निरव यात मरूळशंकरदेव निरवय पावणार आहेत असें प्रभुदेव, बसवराजदेवाना निरूपण करतात.

३८२

**कामाच्या डोळ्याचा काटा निपटून,**
**भूमिच्या कार्याची सीमा नाशून,**
**होम जाळिल्या दक्षाचे शिर केले हनन,**
**ऐशा निस्सीम शरणांची निजस्थिती येईल का जाणता ?**
**जाणण्यास होईल असाध्य उपमेच्या असती अतीत**
**गुहेश्वराचे शरण कसे असतात हे पाहिलास**
**कां संगनबसवण्णा ?**

निराकार असलेला प्राण निरवय होण्याचे साध्य आहे परंतु काया ही जड आहे ती कशी काय निरवयव होणार ? त्याचे वर्म सांगावे म्हणून बसवदेव, प्रभुदेवाना विचारतात.

३८३

**लिंगाठायी अर्पित झालेले काया सुख, लिंगाठायी झाले ते लीय**
**अंगलिंगाठायी पुन्हा निक्षेपिले असे म्हणण्याचे**
**शरणाना कारण तरी काय ?**
**शरणांची प्राण लिंगाठायी क्षिणल्याने होई तो निरवय**
**परि कर्मानीं आलेली काया, झिजविल्याने,**
**होते का ती स्वरा, सांगावे त्याची कोणती असे ती रीत ?**
**हे कूडलसंगमनाथा तुमचे, शरण असुनी कायाधारी**
**ते कसे होतील हो निर्माय**
**ते मज एकदा सांगा देवा, तुमचा धर्म**

तुमचे शरण देहधारी असून निजाठायी निश्चल कसे होतात हे मज सांगावे म्हणून बसवराजदेव विचारतात तेव्हा प्रभुदेव शरणांचे महात्म्य निरूपण करतात.

अनुक्रमणिका

*( राग : गौळ )*

नचकर्म काया नच कर्म मूर्ति ।
परब्रह्म वदत आपण, नच निर्मोही ॥ पल्लव ॥
माता पिता उदरी नच जात जनित
श्वेत-पीत कपोत षड्वर्ण रहित
नच मूर्तिती असे स्वय, नसे नवमास भरित
अविरळ लिंगकळा प्रकाश असे तो शरण ॥ १ ॥
आचरण अनुसरताना पाहुनी जगाची रीत न घेई आधार
बोलीस नसे बिंदुचा अलंकार
नच तो पद्मपरिमळास धावणारा भ्रमर
भवकुळास जिंकीला विश्रांत शरण ॥ २ ॥
जाग्र स्वप्नी सुषुप्तिचा नच तो लोभी
आगमाच्या कुळातला नच तो भोगी
तेजस रंजनेचा नच तो गणित गुणित
सहज नित्य स्वय अभेद्य शरण ॥ ३ ॥
बिंदु कलेच्या सुख शयनाचा नच संपर्क
एका आनंदाच्या लहरीत जिंकीला तो कंदमूल
भेदभाव निरसुनी स्वये सुखास करुनी एक
बंध भेदास जिंकीला तो निष्कामी शरण ॥ ४ ॥
नच तो चंद्रधर नच तो चंद्ररूप
इंद्र चापा परि नसे त्याचा प्रभाव
भृंग ग्रासित रुचिस करूनी एक
गुहेश्वर लिंगाठायी झाला ऋणमुक्त शरण ॥ ५ ॥

याप्रकारे प्रभुदेव, मरुळशंकरदेवांच्या शरणत्वाची श्रेष्ठता निरूपण करतात. ते ऐकून बसवदेव म्हणतात.

३८४

देवा, तव शरण आहेत हो परमसुखी
देवा, रे, तुमचे शरण कायेच्या कर्माधीन न होता निःकर्मी आहेत
देवा, तव शरण मनीं निर्लेप ज्ञानी होत.
कूडलसंगमनाथ, तव शरणांची घनता मज सांगितलात,
मी ऐकण्यास असे हो असमर्थ, हे प्रभो मी म्हणतो तयाना नमो नमो

३८५

देवा, तव शरणांच्या उपस्थितीचे जाणकार नाहींत हो

अनुक्रमणिका

**कोण स्वर्ग, मृत्यु, पाताळांत.**
**ते आहेत अघटित घटित, अखंडित महिमावंत,**
**निजाणची निर्लेप भावुक होत,**
**कूडलसंगमनाथ, तुमच्या शरणांचे अस्तित्व**
**जाणण्यास असे हो मी असमर्थ.**

मरूळशंकरदेवांच्या श्रेष्ठतेची प्रभुदेव आणि बसवदेव वाखाणणी करीत असताना चन्नबसवदेव निरूपितात.

३८६

**काया विनाशिल्यास काय ?**
**काया अविनाशी असल्यास काय ?**
**काया बयलु झाल्यास काय ? मन मन पावे लय ?**
**घनास घन पावलेल्या शरणाना देखता,**
**कूडलचन्नसंगमनाथचि हे होत असे मानून व्हावे शब्द**
**मुग्धविना आश्चर्यास काय कारण, सांगा हो**
**संगनबसवण्णा**

३८७

**आदिठायी ना जनन, अनादिठायी ना पोषण**
**मूर्तिठायी ना अवलंबन; अमूर्तिठायी ना भावना.**
**जाणिवेत ना जाण; विस्मरणात ना विस्मरण.**
**असे असलेलेच ब्रह्म देख !**
**मम मन पावुनी लय, घन घन झाल्याने एक.**
**आणिक मनास व्हावे का विस्मय ?**
**कूडलचन्नसंगमदेवाचे शरण कायारूपि कंथा न विनाशिता.**
**पावल्यास बयलु, हे निज अनुभव घ्यावे हो समजून**
**असे हे झाले तरी कसे ? येईल का असे म्हणता संगनबसवण्णा !**

## ९

मरुलशंकरदेव निरवयल समाधि पावल्याचे महात्म्य प्रभुदेव बसवराजदेव, चन्नबसवदेव, सिद्धरायदेव आदि सकल शिवगण वाखाणणी करतात. परमानंदाने प्रभुदेव, वसवदेवांच्या परिमित गृहांत प्रवेश करतात.

**मन धनी आल्यास माझ्या घरा**
**बांधुनी कनकाचें तोरण, करुनी षड्सम्मार्जन**
**घालुनी रांगोळी, वदतो मी उघे चांगू भला**
**कुडलसंगमनाथ, तुमचें शरण प्रभुदेव आल्यास**
**नाचतो मी फुगुनी रंगूनी होऊनी हर्षभरित.**

प्रभुदेव, बसवदेवांच्या मठास निघाले असताना, मोत्याचा तोरण बांधिला होता, पायघड्याकरितां देवांगवस्त्रांचे सोवळे आंथरण्यात आले होते, नवरत्नखचित झालरी सोडण्यांत आल्या होत्या. षड्सम्यार्जन करून रांगोळी घातली होती. पंचमहावाद्यासमवेत कळस, आरसा घेऊन स्वागतास निघाले होते. सुवासिनी मोती माणिकाचे आरती धरून मंगलस्वरांने गात होत्या. बसवदेवाबरोबर मडिवाळमाचिदेव सावधान असा उद्घोष करीत सोड्ळबाचरसांच्या खांद्यावर हात घालून चन्नबसवदेवाबरोबर हसत मंदस्थिताने संभाषण करीतएकांत मठास आगमन करतात. आसनारूढ झालेल्या प्रभुदेवांची पादपूजा बसवदेव करतात.

## ३८९

**परिमितास आणिले चालवत**
**हर्षाच्या सिंहासनावर झाला परमगुरू साकार.**
**परमानंद जलानें करूनी पादार्चन,**
**दिव्यगंधचि सुगंध लेपुनी, अक्षय अक्षता वाहुनी**
**ह्रदयकमल पुष्पानें करितो पूजन**
**ज्ञानवासनाचिधूप घालून,**
**सुज्ञान दीपारती ओवाळून,**
**भक्तिरसायन नैवेध समर्पून,**
**परमहर्षोदकानिं हस्तमज्ञन करून**
**त्रिकरण शुद्धचि तांबूल देवून,**
**समरसासंगे कुडलसंगमदेवाचा शरण**
**प्रभुदेवांची झाली मजवर करुणाः**
**पूजेच्या वेळी बसवदेव निवाळी ओवाळीत गातात.**

अनुक्रमणिका

*राग ललित*

जय जय श्री महादेव जय जय श्री महादेव
जय जय श्री महादेव तुज नमन गातसे मम मन ॥ पल्लव ॥
ॐ भूःॐ भूवः वदतसे मम मन ।
भर्गोदेवस्य धीमहि तुज नमन वदे मम मन ॥ १ ॥
यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह ।
तस्मै श्री गुरू लिंग तुज नमन वदे मम मन ॥ २ ॥
हररूपं काया संबंध गुरू रूपं प्राण संयुतं ।
अशरिरात्म संबंध गुरू शिष्य मनुग्रहं ॥ ३ ॥
दीर्घ दंड नमस्कारं निर्लजं गुरू सन्निधे ।
शरीरप्राणमर्थंच सग्दुरूभ्यो निवेदयेत ॥ ४ ॥
भवरोग वैद्य आहे सतूं या श्रद्धेंने आलो शरण
कूडलसंगमदेवा तुज नमन वदतसे मम मन ॥ ५ ॥

अष्टविधार्चन पूजेच्या वेळी चन्नबसवदेव मंगळारती गातात.

*राग : ललित*

चन्नसंगमनाथ गातो तव मंगळगीत ।
शरणमुखालिंगा तव सुखें पहात ॥ पल्लव ॥
आपले अहंकारादि गुण विस्मरणे निरसून
गाठायी होऊनी संगी संग झालो तो लिंग ।
आपले सर्वांग तत्त्व महत्तादि सकल गुण
विस्मरून त्या शरणाठायींच झाला संग ॥ १ ॥
आपणास्तव तो कांही नसे इच्छित
लिंग प्रेरणेने आल्यास येवो
ते कांही आले तरी सकलसंबंधसहित
लिंगाठायी अनूग्रहित झाला संग॥ २ ॥
असेना का विध विध पदार्थ आपले वांछित
आलेले लिंगदेवास्तव, अर्पणा आधीच झाले ते अर्पित
आधीच स्वयंचि त्या लिंगाठायी पावे संयोग
जे येई सकल ते तेथेच करी अर्पित ॥ ३ ॥
तयाचे मन लिंग संग, नयनादि चा
तेथेच होई संग, प्राणास लिंग निक्षेप संग ।
तो कोठे करी संग तेथेच होतो अभंग
संग, लिंगाठायी निरंतर झाला तो संगी ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

**निरूपाधिक लिंगाठायी आपण उपाधि अवधी म्हणून**
**सोपाधिक संगासनच करूनी घेई तो प्राप्त**
**देवलोक मृत्युलोक या सीमा ओलांडून**
**निस्सीम शरण झाला कूडलचन्नसंग ॥ ५ ॥**

बसवदेवानी, प्रभुदेवांचे अष्ट विधार्चन षोड्षशोपचारानें अभिवंदन केले, तेव्हा चन्नबसवदेव पादार्चन करून पादोदक घेतात.

**३९०**

**नित्यचि भक्त, तयाच्या घरास**
**घन चैतन्यरूपिजंगम आल्यास,**
**जलविण जलानें केल्यास पादार्चन**
**ते पादोदकचि होई महापदोदक**
**त्या पादोदकचा करूनी स्वीकार**
**झालो मी आनंदपरवश,**
**हे देवा कूडलचन्नसंगमेशा.**

अष्ट विधार्चन करतो म्हणून चन्नबसवदेव सांगतात.

**३९१**

**अंगावर जे करिती लिंग धारण**
**ते सकल संगमनाथ, ही भावना संगनबसवण्णाचीपरि**
**मज नच तो भाव जाण.**
**पाहताच लिंगैक्य शरणास**
**श्रद्धेनें तयांच्या चरणास करी वंदन मन्मन.**
**पाहता तयाना करूणामृताचा वर्षाव होई मजवर.**
**तयांच्या पदास अष्टविधार्चन षोड्शोपचार**
**करितसे मम मन.**
**कूडलचन्नसंगमदेवा, तुमच्या प्रभुरूपिजंगमास**
**पाहून, पूजा करकरून नच थके मम मन.**

चन्नबसवदेव, प्रभुदेवांची अष्टविधार्चनषोड्शोपचारे पूजा करतात. त्यानंतर मडिवाळ माचिदेव पादपूजा करतात.

३९२

सत-चित्त-आनंद नित्य-परिपूर्ण असे वदती.
परि मी तसे मनापासून नाही वदत.
सत हेचि गुरू, चित्त हेचि लिंग आनंद हाचि जंगम;
नित्य हेचि प्रसाद परिपूर्ण हेचि पादोदक असल्याचे
करून अनुग्रहण, तुमच्या जंगमाचा झालो मी भक्त,
होऊन नित्य तुमच्या जंगमास करितो मी वंदन,
आनंदानें तुमच्या जंगमाचे घेतो मी पादोदक होऊनी परिपूर्ण.
तुम्हास पूजुन, करूनी अर्चन होतो मी
परवश-भक्ति  प्रसाद, मुक्तिप्रसाद, नित्यप्रसादाचा
तुमच्या जंगमाकडून संपादिला वर प्रदान.
कलिदेवाच्या देवा, तुमचा शरण प्रभुदेवांच्या
श्रीपदी झालो मी मनमग्न

मडिवाळ माचिदेवानी प्रभुदेवास अशा प्रकारें अर्चिल्यानंतर सोड्डुळबाचरस पूजतात.

३९३

'एकमेव न द्वितीय ब्रह्म' या
घन महिमास देखता दृष्टि मन मन सामावून,
तनु तनु विरून, सकल करणेंद्रिये पावले समाधान,
मम शिर तव चरणाठायीं न दूरावणास संग.
महादानी सोड्डुळाचा शरण प्रभुदेवास देखता,
तुटली मम भववेलीची मुळी.

३९४

नित्य निजतत्व होऊनी भक्तिकंपित ते वळले मजकडे.
"वत्सं गौरीव गौरीशः" ही श्रुति दावण्यास्तव,
मजवर करूनी कृपा, दावियला आपुले श्रीपद,
जय जय श्री महादेव, जय जय श्री महादेव,
हे गुरुदेवा तुज नमो नमो !
मम परमगुरू नमो नमो !
सोडविलेस तू मम भवबंधन गुरू तुज नमो नमो.
मम महादानी सोड्डुळ, तव शरण प्रभुदेवांच्या श्रीपदास
नमो नमो म्हणत जगतसे

अनुक्रमणिका

सोड्डुळबाचरस, प्रभुदेवांची पादपूजा करतात. मनसोक्तभक्तिने गातात. नंतर हडपदअप्पण्णा येऊन प्रभुदेवांची पूजा करतात.

### ३९५

**मन मन एक, झाले भाव भाव एक**
**मनास मनोहर झाले एक, भावास भाव झाले एक,**
**श्रद्धेनें मनमान्य झालेल्या शरणांचे घडल्यावर दर्शन.**
**कळेना मज कुठचे ते लौकिक बसवप्रिय कूडलचन्नसंगा,**
**तुमचे शरण प्रभुदेवास**
**शरणु शरणु म्हणण्याविण अन्य कोणतेही मज ना ठाऊक**

अनुक्रमणिका

## १०

असंख्यात शरणगण येऊन प्रभुदेवांचे दर्शन घेतात, पादाक्रांत होऊन पूजा अर्चा करून, आशिर्वाद घेतात. सुख संकथा विनोदानें प्रभुदेवाची सेवा करित असताना, त्या महागण समूहास बसवदेव मनभरून पहात असताना त्यांचे हृदयकमल फुलुन आले. अपेक्षा पूर्ण झाल्याने परमानंदात रंगून नाचतात.

३९६

**रोपावर सागर वाहत आल्यापरि झाली मम भक्ति,**
**आनंदाने रंगून नाचतो मी,**
**कूडलसंगाचे शरण आल्याने**
**अभिमानानें फुगून हर्षभरे गूंगून मी नाचतो**

३९७

**तव शरणांचे संगसुख कसा काय वाणूं मी !**
**तव शरणसंगे सुख समगोष्टी करण्याचे सुख असे हो अनुपम**
**ते सांगण्यास झालो मी असमर्थ**
**कूडलसंगमनाथ, जमलेल्या तुमच्या या प्रमथगणांच्या**
**समूहातून, कधी कधीही, दूर न होण्या परि**
**करा मज देवा मी तुमच्या करूणेची कपिला**

३९८

**देवा, तव महानुभावींच्या संगाने झाली हो मम तनु शुद्धी**
**झाले मन शुद्ध, झाले देवा सर्वांग शुद्ध**
**झाले गारांच्या पुतळ्यास आलिंगल्यापरि कूडलसंगमनाथ.**
**तव शरण प्रभुदेवांच्या कृपेनें**
**मज घन लाभल्याचे मी कसे काय सांगु ? देवा ?**

३९९

प्रभुदेवांचे प्रत्युत्तर

**जे काया धारक जनित ते देव असेनात, का ?**
**देणारे का असेनात ?**
**माया साधन जाण असावीबा जिंकण्याची,**
**मनाचा काळोख जिंकुनी, सुखी झालो**
**असे जे म्हणती, तयांच्या पाठी लागून छळितो कर्म.**

अनुक्रमणिका

**गुहेश्वरलिंगाचे**
**किंचित् स्मरण केल्यास, विस्मरण अतीव होऊन छळितसे**
**बा संगनबसवण्णा, तू करीत असलेले चिंतन ते**
**कशांत कांहीच नव्हे जाण.**

४००

बसवदेव म्हणतात

**देवा, हत्ती असे घन अंकुशास कसे म्हणता येई सान** ?
**पर्वत असे घन कसे म्हणावे वज्र सान** ?
**अधार घन, कसे म्हणावे ज्योतिस सान** ?
**विसर असे घन तव चिंतन कसे म्हणावे सान** ?
**कूडलसंगमनाथ, तुमच्या कृपेची घनता तुम्हीच जाणता.**

तुमच्या स्मृतिच्या श्रेष्ठतेपुढे माया कशी टिकेल ? तुमच्या चिंतनापेक्षा श्रेष्ठ असे कांहीच नाहीं असे बसवदेव सांगतात, तेव्हा प्रभुदेव विचारतात.

४०१

**चिंतितो म्हटले तरी मनास नसे गवसतात,**
**जाणतो म्हटले तरी चिन्हास नाही येत.**
**पाहिले म्हटल्यास ती नच मूर्ति**
**नच तनुत, नच मनात घन, ते तुमच्या मनी कसे झाले बरे वेद्य**
**गुहेश्वररूपि लिंगानें जगाच्या डोळ्यात अंधेर पसरवुन,**
**आपणास चुकवून घेतल्याचा भेद-**
**तुझ्यात दडलेली रीत ती कोणती सांग बा मज संगनबसवण्णा.**

वाङ्मनातीत असलेली वस्तु, तुझ्या मनात ती लपलेली रीत मज सांग म्हणून प्रभुदेव बसवदेवास विचारतात.

४०२

**देवा, जगास आवरली तव माया**
**तुज आवरिले मम मन जाण.**
**तू जाणतोस देवा जगास, मी जाणतो रे तुज.**
**हत्ती आरशात दडल्यागत,**
**तू ममठायीं झालास अंतर्गत हे कूडलसंगमनाथ**

अनुक्रमणिका

तू महाघन परतत्व आहेस म्हणून काय झाले ? सुक्ष्म अशा माझ्या अंतरंगात तू लपला आहेस. असे बसवदेव म्हणतात. यास प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

४०३

**अंतरंगी लपले म्हटल्यास ते भावनेस नच पूज्य.**
**बहिरंगी लपले म्हटल्यास नच क्रियाबद्ध**
**जाणात लपले म्हटल्यास मतिस नच प्रमाण.**
**भाव-निर्भाव-निशुन्य पाहण्याची रीत ती**
**कोणती सांग मज ?**
**गुहेश्वर या लिंगास जाणुन, होऊनी समरस**
**सुखी होण्याची रीत ती कोणती सांग बा संगनबसवण्णा.**

प्रभुदेवांच्या सांगण्यास बसवदेव उत्तर देतात.

४०४

**मम तनु-मम मन या दोन्हीस करूनी निवारण,**
**गुरूनी केल्यानें एक, मम अंतरंग-बहिरंग हे**
**दोन्ही असती तुमचेच देख**
**तुमच्याच अंतरंगी तुम्हासच दडवुन घेतल्याने**
**तुमच्या बहिरंगी तुम्हीच होऊन करितो मी तुमचे पूजन.**
**तुमच्या जाणिवेनेच जाणतो तुम्हास हो कूडलसंगमदेवा.**

बसवदेवाना प्रभुदेव विचारतात.

४०५

**संगायोगे झाली तनु त्या तनुयोगे पडला विसर.**
**विसर पडल्याने, झाले तू-मी म्हणणें.**
**तू म्हणणे राहो ते बहिरंगी मी म्हणणे अंतरंगीते असो**
**या उभयभावाविण तुझ्या योगें**
**तुज जाणिले म्हणणे हा**
**विपरित भाव जाण.**
**या ज्ञान-अज्ञानाच्या खेळाचा न टळे भ्रांत**
**गुहेश्वरलिंग, तवठायीं निश्चल झाल्याची रीत**
**मज सांग बा संगनबसवण्णा.**

बसवदेव म्हणतात

अनुक्रमणिका

४०६

**मूढत्व आणि गाढत्व तूच असशी देवा,
तान्हुली, तान्हुला तूंच रे देवा
माझ्या थोरल्या बहिणीचा नवरा तूंच देवा.
कूडलसंगमदेवा, भ्रांत निपटुन झाले हो सुस्थिर.**

माझी स्मृति-विस्मृति, माझी शक्ति, शिवात्मक तत्वे सारे तुझ्याशिवाय अन्य नाहींत. माझ्या सुज्ञानशक्तित भोगोपभोगी तुझ्याशिवाय दुसरे नाही भ्रांत विरहित भाव तूच आहेस. असे बसवदेव सांगतात. प्रभूदेव, बसवदेवास विचारतात.

४०७

**अज्ञान सुज्ञान या दोन्हीस शिव वदल्यास
या तुझ्या सांगण्यास शिवज्ञानी करतील का मान्य
शिव- शक्ति हे दोन्ही तुच म्हटल्यास
महानुभावीना होईल का संतोष ?
आपण कोण हे न जाणतां अन्यचि सकल ब्रह्म
अशा या कर्माच्या बोलीस आमचा गुहेश्वरलिंग
देईल का बा मान्यता ?**

बसवदेव सांगतात.

४०८

**जाणिवेने, जण जाणून,
जाणचि तू असशी, ही भ्रांति नसे हो मज.
जाणिवेनें विस्मरण विसरून,
विस्मरणचि तू असशी, असे म्हणणारा मी नव्हे हो.
देह-प्राण निपटुन त्या देहास धरून,
देह तुमचा आहे, ह्या भ्रांतिचा सूतकी नव्हे मी देवा.
तुम्हास जाणल्याची जाण टेवूनि भिन्न,
जर मी पाहिल्यास, वाहतो तुमची आण कूडलसंगमदेवा.**

या वचनाचा तात्पर्यार्थ ऐकून प्रभुदेव, देव-भक्त  ही दोन्ही नावे तुमच्यात दिसतात. ही लपलेली रीत कोणती म्हणून विचारतात.

अनुक्रमणिका

४०९

**कायेस धरून असे लिंग, लिंगास धरून असे काया,**
**ज्ञानास धरून असे वचन, वचनानें दावणारे असे ज्ञान**
**लिंगांग हे दोन्ही तुझ्यात ऐक्य पावल्याची रीत तो कोणतीं सांग ? मज**
**स्वरास धरून शब्द समरस झाल्याची रीत कोणती सांग बा ?**
**देव-भक्त, या नाम सीमा दडुन गुहेश्वरलिंगाठायी,**
**तद्वत झाल्याची रीत ती कोणती**
**सांग बा संगनबसवण्णा**

बसवदेव सांगतात.

४१०

**घन गंभिर महाघनाठायी देवा झालो मी घनाचा घन.**
**कूडलसंगम या प्रकाशाठायीं प्रकाश होऊन राहिल्यानें**
**शब्दमुग्ध झाल्याचे मी कसा काय सांगू देवा ?**

बसवदेवांचे सांगणे ऐकून प्रभुदेव प्रसन्न होऊन बसवदेवांचे स्तवन करतात.

४११

**आदिच्या लिंगास दाविलेला अनिमिष आज मी पाहिला.**
**कृतयुगाचा स्कंद नामक गणेश्वर आज मी पाहिला.**
**त्रेतायुगाचा निललोहित नामाचा गणेश्वर पाहिला हो मी आज.**
**द्वापारयुगाचा वृषभ नामाचा गणेश्वर पाहिला मी आज.**
**कलियुगातल्या जंगमाठायी अनिमिष बसव नावाचा गणेश्वर**
**पाहिला मी आज.**
**मला ज्यानी पाहिले, तुला ज्यानी पाहिले अज्ञाना**
**आज मी पाहिले देख गुहेश्वरा**

प्रभुदेव, बसवदेवांचे स्तोत्र करतात. तेंव्हा बसवदेव, प्रभुदेवांचे स्तोत्र करतात.

४१२

**मरवाच्या झाडापरि जात्याच निर्माण होतो परिमळ**
**रंग बेरंग मिळून रूप केले विद्रुप.**
**हर या प्रेरणेंने, एक मोठ्या वारिधितले कमळ सुकून.**
**करी भ्रमर त्या कमळात भ्रमण, त्याचे पंख तुटून**

अनुक्रमणिका

**गळल्यानें, झाले हो ते निरंजन.**
**कापलेले विजेचे गुच्छ चढुन**
**कवटाळे चंद्र-कोरी प्रभेची शांति होऊन अंतर्भूत**
**कूडलसंगमदेवाठायी प्रितीने करी मिलन**
**ऐशा प्रभुदेवांच्या पादपद्माठायी मी जगतो भृंग होऊनी**

प्रभुदेव, बसवदेवांची प्रशंसा करतात.

४१३

**झाले हो मज बसवा तुजयोगे गुरू स्वायत,**
**झाले मज बसवा तुजयोगे लिंगस्वायत,**
**झाले मज बसवा तुजयोगे जंगम स्वायत,**
**झाले मज बसवा तुज योगे प्रसाद स्वायत**
**हे चतुर्विध स्वायत केलास तूच**
**यायोगें आमच्या गुहेश्वरलिंगास झालास**
**तूच आनंदस्वरूप संगनबसवण्णा** ?

प्रभुदेवास बसवदेवास तुझ्याने मी सर्व स्वायत संपादन करून कृतार्थ झालो म्हणून सांगतात. तेव्हा बसवदेव -मी तुमच्यामुळे सर्व कांही जाणलो असे सांगतात.

४१४

**हे देवा, तप स्पर्शित गुणायोगें झालो मी पूर्वाचारी,**
**देवा, तव स्पर्शित गुणायोगें झालो मी वृषभ**
**देवा, तुमच्या स्पर्शित गुणायोगें होऊनी संगनबसवण्णा.**
**गुहेश्वर शरणांच्या महागर्भात**
**होऊनी शिशु करिते वास बा कूडलसंगमेशः**

हे ऐकून प्रभुदेव, बसवराजदेवास म्हणतात,

**गुरु-लिंग-जंगम-प्रसाद**
**या महाघनास करतलामलक करून तूच मज दाखविलास.**

४१५

**गुरुस एकच गर्भ ( उगमस्थान ) लिंगास एकच गर्भ**
**जंगमास एकच गर्भ, प्रसादास एकच गर्भ**
**यास कोणी दाविले अमलोक्य करून**?

अनुक्रमणिका

यास प्रज्वलित करून,
विभागून करतलामक करून कुणी हो मज दाविले ?
पूर्वाचार्य भक्ति भंडारी बसवनाथ,
तू मज गुहेश्वरलिंग दाविल्याने मज दिसती लोकादि
लोक सारे किंचित

बसवदेव सांगतात.

४१६

देवा, मम अंतरंगी तुम्ही होऊनी ज्ञान,
मम बहिरंगी होऊनी आचार मज आवरिले तुम्ही
मम मनी होऊनी घन चिंतनेनें झालात हो साकार,
गुरुस्थल, लिंगस्थल, जंगमस्थल, प्रसादस्थल,
या चतुर्विधास मज दाविले इष्टलिंगरूपाने
प्राणलिंगाच्या मार्गाचा अग्र दावुन,
सकल असंख्याताना केलात हो पावन
हे कूडलसंगमदेवा, तुमच्यायोगे साऱ्या सम्मतिची झाले मज ज्ञान
याकारणें, देवा माझ्यानेच तुम्ही झालात,
ही गोष्ट मान्य करतील कां हो तुमचे प्रथम ?

प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

४१७

बसवण्णा लाभले बा मज तुजयोगे आदिचे लिंग
तव चिंतल्यानें लाभले मज अनादिचे ज्ञान
तव कृपेनेंच प्राणलिंगाचे ज्ञान मज झाल्याचे
तुमचे प्रमथ करिती बा मान्य,
हे मी सांगतो गुहेश्वराच्या साक्षीने संगनबसवण्णा.
तव प्रसादाचा आहे मी शिशु.

बसवदेव सांगतात.

४१८

आदिभक्त अनादि जंगम, आदि शक्ति अनादि शिव असे देख
माझ्या आदिपिंडास तूंच होऊनी आधार.
दाविले मज प्रकाश, त्यायोगे माझ्या हृदयकमली देखिले तुज.

अनुक्रमणिका

ते पहाण्याचे ज्ञान हेचि जंगम
त्या जंगमाविण न दिसे लिंग. न दिसे गुरु जंगमाविण.
त्या जंगमाविण न दिसे प्रसाद.
काया भक्त, प्राण जंगम असल्याचे वचन समजावयास
माझा प्राण तुजविण असेल का अन्य हे तूच सांग देवा,
या कारणें तुमची घनता करूनी सान,
मज देऊनी घनता, वदता देवा कूडलसंगमनाथा.

बसवदेवांचे ऐकून प्रभुदेव विचारतात.

४१९

आदि जंगम, अनादि भक्त असल्याचे,
कोणास आहे माहित हे तूच सांग बसवण्णा
नित्य निराकार शक्तिविनां ते असल्यास
निरवय बयलु आहे, म्हणून तू घनचैतन्यरूपि
काया जर केलास धारण-त्या बयलु यास
करावे लागते परब्रह्म हे नाव धारण.
त्या महाघनानें आपल्या विनोदास्तव साकार होऊन,
धर्मरूपि काया करूनी धारण, त्या मूर्तिस झाल्याने
आधार जगाचा कर्ता शिव म्हणून त्यास नाम प्राप्त
झाले ना बसवण्णा तुजयोगें ?
जंगम हाचि लिंग ही तुझी भावना असल्याने,
तुझ्या सान्निध्यानें प्रतिनिधीत्व लाभले पहा बसवण्णा
लिंगास धरून तू पूजिल्यानें लिंग हे नाव प्राप्त  जाहले, बसवण्णा
तूं प्रसाद सेवन कर करून पथ दाविल्यानें,
प्रसादास तुझ्यायोगें प्रसाद हे नांव प्राप्त जाहले जाण.
बसवण्णा, त्याकारणें तूच असशी अनादि भक्त.
मी आहे अनादिच्या अलिकडचा
तुझ्या करणीनें झालो मी, हे आमच्या गुहेश्वरास
असे अवगत पहा संगनबसवण्णा

प्रभुदेवांच्या म्हणण्यास बसवदेव उत्तरतात.

४२०

जंगम हाच ज्ञानरूप, भक्त हाच आचाररूप असल्याचे
अटळ असे जाण.
ज्ञानाविण व्रताचार आचरणानें काय होणार ?

अनुक्रमणिका

डोक्याविण धडापरि ज्ञानोदयाच्या आधीच
व्यक्त होईल कां आचार या जगी ?
ज्ञानानेच आचार, ज्ञानामुळेंच अनुभाव, ज्ञानामुळेंच प्रसाद,
विना, दिसणाऱ्या घनास नाहीं हो मी पाहिले !
मम आचारास तू झाल्याने ज्ञानरूप,
संपादिले मी संगनबसवण्णा हे नाम
अनादि परशिव तूच होऊन घन चैतन्यात्मक रूपी महाज्ञान
तूंच झालास, तुजविण मी कसा होईन शिवतत्ववेत्ता ?
देवा, कूडलसंगमदेवाच्या साक्षीनें, मी प्रभुदेवाच्या सेवकाचा
लेक असल्याचे जाणती हो तिन्ही लोक हे प्रभो.

प्रभुदेव प्रसन्नतेने वदतात.

४२१

तनु दासोह, सकल अवयव आचार,
मन व प्राणादि सारे जाणिवेची मूर्ति असे देख
आत बाहेर, बाहेर आत याची तुज नसे रे जाणीव
तू आहेस बा बसवण्णा सत्य सदाचारी.
आहे मी असमर्थ जाण्यास तव योग्यता
अंतरंगी जाण असेल तरी काय ?
माझ्या कायेंत नच भक्ति स्वायत. आचार नसे पलिकडे तुजविण
तू असशी बा सर्वाचार संपन्न, तव योग्यता
मज कसे येईल ओळखता ?
गुहेश्वर साक्षीनें हे मी सांगतो संगनबसवण्णा
तुझ्या महामनेचा मी रखवालदार सेवक असल्याचे
तुमच्या सगळ्या प्रमथाना आहे हो हे विदित

बसवदेव सांगतात.

४२२

तुम्हास पाहता क्षणी जोडूनी हात तुमचा झालो मी भक्त.
तुम्हास नच पाहता जोडता येते का हात,
हे देवा, होता येते का भक्त?
तुम्हास स्पर्शून पूजा करून झालो मी आचारवंत,
न स्पर्शिता तुम्हास माझ्यात कोठुन येईल आचार ?
तव घन मनी केल्यानें धारण झाले हो मज ज्ञानोदय,
तुम्हाविण मज कशी होणार ज्ञान प्राप्ति?

अनुक्रमणिका

या कारणें त्या त्या मुखांत मी-पणाचा करण्यास्तव नाश
तूं पुढे सरसावल्यानें, तुझ्या सानिध्यानें झालो मी
सदाचारी, करता येईल का मज तुमची बरोबरी ?
कुडलसंगमदेवा जंगम मुखानें संगनबसवाचे
होतसे रक्षण, हे प्रभो याची तिन्ही लोकास असे जाण

प्रभुदेव उत्तरतात

४२३

बसवण्णा, तुज पाहून पाहून माझी तनु झाली निराकार,
बसवण्णा, तुज स्पर्शून स्पर्शून माझी क्रिया झाली निशून्य
बसवण्णा, तव चिंतन कर करून मम मन काया झाले हो
बसवण्णा, तव महानुभाव श्रवणानें
मम भव जाले हो परिहार.
आमच्या गुहेश्वरलिंगाठायी तू अजात
असल्याचे होऊनी निजज्ञान, तुटले मम भवबंधन.
वाचलो मी तव संगाने.

बसवदेव विचारतात

४२४

जननाविण जन्म असे तुझा देवा !
जन्मुनिही संसार न जाणणारा निर्विकारी तू असशी देख.
नच तुज भवबंधन, नित्य निजतत्व तू असशी.
तव चरणाची करूनी सेवा, तुटो मम भव असे म्हणतो.
तुमचें घन मज कसे येईल देवा जाणता ?
कूडलसंगमदेवा, तू स्तवन करण्याजोगे माझ्यात
आहे का रे पात्रता, तूच सांग प्रभो ?

प्रभुदेव विचारतात.

४२५

आचार अंग होऊनी निर्लेप, काया मुक्त असशी तू देख.
जाण अंतरंगी भरल्याने, तू असशी मनोमुक्त
अर्पित आनंदात अविरळ राहिल्यानें तू सर्वांगलिंगी आहेस.
नसे मुक्त ही रूढीतली गोष्ट असेना का.

अनुक्रमणिका

**व्यर्थ भ्रम होऊनी निरसरन, भवाची फेरी नाशिल्याचे**
**जाणतो आमचा गुहेश्वर. ही गोष्ट लपवुन बोलावे कां संगनबसवण्णा.**

तू भवबंधन तोडून निर्भय झाल्याची गोष्ट सत्य आहे असे प्रभुदेव निरुपण करतात, तेव्हा बसवदेव उत्तर देतात.

४२६

**हे देवा, ज्ञानाच्या बळायोगें पावे नाश अज्ञान.**
**ज्योतिच्या बळायोगे अंधार होई निवारण.**
**सत्याच्या बळायोगे असत्य होई निरसन.**
**परिसाच्या बळायोंगें लोह पावे रूपांतर.**
**हे कूडलसंगमेश्वरा, तुमच्या अनुभवायोगे**
**माझे भव विनाशिल्याचे तुम्हास नाहीं म्हणता येईल कां प्रभो ?**

बसवदेवांचे सांगणे ऐकून, प्रभुदेव म्हणतात, बसवेशा तुमचा महिमा मज चारयुगापासून माहित असूनही आचार स्वायत असलेल्या या तुमच्या अवतारातील महिमा मज ओळखता आली नाही.

४२७

**कृतयुगात होतास तूं स्कंद गणेश्वर, हेमज होते माहित.**
**त्रेतायुगात होतास तूं नीललोहित गणेश्वर हे मज होते माहित.**
**द्वापार युगात होतास तूं वृषभ गणेश्वर**
**कलियुगात बसवगणेश्वर होऊन, झालास सर्वाचार संपन्न**
**केलेस तूं भक्तिज्ञान वैराग्यद्वारी उघडण्यापरि.**
**केलेस, शिवाचाराच्या घनतेस वृद्धिंगत करून,**
**शिवभक्तिची ध्वजा उचलून, या मृत्यूलोकी**
**दाटलेली भिन्नता भेदुन मी पाहिले, तुझी योग्यता न जाणता.**
**गुहेश्वरासमक्ष ठेवून, तुझ्या महात्म्यास म्हणतो**
**मी नमो नमो बा संगनबसवण्णा.**

बसवदेव विचारतात.

४२८

**कक्ष-करस्थल-उत्तुमांग-हृदय हे लिंगकरंडक-अंगस्पर्श-अमळोक्याची**
**जाणीव माझ्या मनांत झाली तेव्हां, झाली मज भाव-निर्भावाची**
**जाणीव,**
**इष्टलिंगास-प्राणलिंग केल्यानें आलेले पदार्थ लिंगास अर्पित न होई**

अनुक्रमणिका

म्हणून, जंगममुखानें आलेले पदार्थहि न होई म्हणून, त्या जंगमास
मम मनी स्मरून, जंगमदासोहास झाले मम मन वेद्य.
अंगावर लिंगधारक सारे संगमनाथचि असती, या माझ्या जाणीवेने-
लिंग खोटें, जंगमहि लटके असे परवादी बिज्ञळाशी संवाद करीताना
तो आदिगणेश्वर असल्याचे न जाणता, तर्क करीत,
बिज्ञळ माझ्या भक्तीस लाविला कसास,
त्याने नाकारिले भक्तिपथास, मी करीत होतो समर्थन
या दोन्हीचा सूत्रधारी होऊन तूंच खेळवित होतास.
शिवभक्तीचा आड पडदा काढून,
छत्तीस विद्रोहींचे करूनी नायनाट, प्रदर्शित केलात अठ्याऐंशी
दैवी चमत्कार तीनशें साठ मरण पावलेल्याना प्राण देताना,
तुला झाले होते तरी काय ? सांगबा मज कूडलसंगमनाथ.

बसवदेव आपले पूर्वापार वृत्तांत कथन केल्यावर प्रभुदेव आपली पूर्वी घडलेली हकीकत बसवदेवास निरुपण करतात

४२९

आदि गुरूस्थल, लिंगस्थल, जंगमस्थल,
प्रसादस्थल, पादोदक स्थल हे कोणास होते बा अवगत ?
दाविला आदिस, अनादिचे करून दिले ज्ञान.
नाद बिंदु कलेचा भेद दाविला भेदुन
मज उत्पत्तिचे यथार्थ ज्ञान करूनी दिले, निदर्शनास न येणारे,
अज्ञास मज दाविले निदर्शुन.
मम अंतरंग आध्यात्मिक परिपक्व. करून निजलिंगास केला हो
सुस्थिर.
गुहेश्वरा, तुमच्या शरण संगनबसवण्णायोगें परमसन्मताचा झाले रे
मी जाणकार.

प्रभुदेव पुन्ह : स्तोत्र करतात.

४३०

भावुकांनी मूर्ति आराधना होतसे संसारास बीज.
होई लिंगाराधना भावास बीज,
लिंगचि इष्ट लिंग जंगम हेचि प्राणलिंग;
याकारणें गुहेश्वरा, संगनबसवण्णास होऊनी
शरणात वाचलो देवा.

अनुक्रमणिका

प्रभुदेव, बसवदेवांचे स्तोत्र करतात ते ऐकून तुमच्यानेच मी सकल सन्मत जाणले असे बसवदेव म्हणतात.

**४३१**

**लिग जंगम, जंगमलिंग हे मज कोणी दाविले रे देवा ?**
**लिंग पूजल्याने न तुटे भव म्हणून,**
**येऊन जंगममुख लिंग होऊन, करूनी शिक्षा, केले रक्षण.**
**दाविले मज आदि अनादिस.**
**प्राणलिंग हाचि जंगम, हे मज प्रतिष्ठा करून दाविलात.**
**कूडलसंगमनाथ, तुमच्यायोगे मी वाचलो हे प्रभो ?**

अनुक्रमणिका

## ११

बसवदेव आणि प्रभुदेव आपापसात महानुभावाच्या गोष्टी करीत असताना चन्नबसवदेव-त्या दोघानाही पारखुन पाहतात.

४३२

**एकमेकाचे नाते तुम्हा दोघाना झाले नाहीं अवगत,**
**लेकरास पडलेले स्वप्न इतराना सांगता येते का हो ?**
**चंद्रकांत शिलेतील रत्न मी देखिले म्हणण्याचा अहंकार**
**तुज कशाला बा शरणा ?**
**हातातील चिन्ह नच होऊनी निरसन,**
**चालले आहे तुमचे वाग्डंबर**
**कूडलचन्नसंगय्याठायीं, बसव आणि प्रभु तुम्ही**
**उभयता झाला आहात भ्रमित.**

चन्नबसवदेव पारखून पाहिल्यावर प्रभुदेव, चन्नबसवण्णास सांगतात.

४३३

**अंग संसार लिंगाठायी उमजून**
**कायेचा तारतम्यभाव निवारून,**
**निस्संदेही झाला पहा हो बसवण्णा.**
**प्राण भाव ही शंका डोकीत न घोळता**
**निःशंक निजैक्य आहे हो बसवण्णा.**
**अशा बसवण्णाच्या अंतरंगी, आहे मी निश्चिंत निवासी.**
**या बसवण्णाच्या बहिरंगी आहे मी निरालंबज्ञानी होऊन**
**नुरुनी बसवण्णाठायीं मी उरलो.**
**बसवण्णा माझ्या अंतरंगी, झाला आहे हो निज निवासी.**
**अशानें एकमेकास अलग करून वेगळे करता नसे येत.**
**ऐक बा चन्नबसवण्णा, गुहेश्वराचे शरण हा संगनबसवण्णा हा प्रभुदेव**
**अशा द्विधा भाव भ्रांतीस करुनी निरसन, निभ्रांत झाले बा सुस्थिर.**

प्रभुदेवांचे ऐकून चन्नबसवदेव उत्तरतात.

४३४

**भक्त-जंगम हे परस्पर संबंधाचे रहस्य काय आहे, कसे आहे**
**हे कोणास होते हो उमगत ?**

अनुक्रमणिका

**ते आहे हो उपमातीत भक्तामठायीं जंगम झाल्यानें अंतर्भूत,**
**होऊनी भक्त क्रियानिष्पत्तीस समरस सुखी होतो देख.**
**जंगमाठायी भक्त झाल्यानें अंतर्भूत**
**कर्ता-भृत्य हा भाव होऊनी लोप, संबंध संशय**
**न डोकावला, जाणुनी जाण, निरसुनी विस्मरण,**
**व्हावे बा स्वतंत्र शिवाचारी,**
**या उभयभाव संगाचा परिणाम पाहून**
**कूडलचन्नसंगय्याठायी बसवदेव-प्रभुदेवांच्या**
**श्रीपदास नमो नमो म्हणून मी जगत आहे.**

४३५

**माझ्या जाणिवेच्या डोळ्यातला काळोख नाश करणारा**
**संगनबसवण्णाविण मज न दिसे कोणा**
**मनाच्या शेवट अग्रावरचे अनुभाव होऊनी निर्गमन,**
**भाव निर्भावयाची नुरे हो भान !**
**कूडलसंगमदेवाठायी, प्रभुदेवायोगे मी जगत आहे बा चन्नबसवण्णा.**

चन्नबसवदेव, बसवराजदेवांचे आणि प्रभुदेवांचे स्तोत्र करतात. तेंव्हा प्रभुदेव, बसवदेवांचे आणि चन्नबसवदेवांचे स्तोत्र करतात.

४३६

**बसवण्णाचे नाम घेताच मम काया झाली निराकार.**
**चन्नबसवण्णाचे नाम घेताच मम प्राण झाले सर्वशून्य.**
**या उभयस्थानाची निर्णय निष्पत्ति गुहेश्वरलिंगाच्या साक्षीनें**
**सांगतो, हे मी तुज चन्नबसवण्णायोगे झाले मज साध्य बा**
**संगनबसवण्णा.**
**संगनबसवण्णा, हे मी गुहेश्वरलिंग साक्षीने सांगतो तुज.**

बसवराजदेव, प्रभुदेवांची आणि चन्नबसवदेवांची स्तुति करतात.

४३७

**अंगावर लिंग स्वायत करून, केल्यास लिंगार्चन,**
**तयांचे न होई भव निरसन,**
**त्यायोगे-प्राणावर लिंगस्वायत करून,**
**केले मम अंतरंग शुद्ध, दाविले हो मज**
**चन्नबसवण्णाने, लिंगैक्याचे मार्ग.**

अनुक्रमणिका

**कायेचे कळकळ, दासोह मुखाविण न होई निवारण,**
**यास्तव-जंगममुख लिंग होऊन येऊन, करुनी मज**
**शिक्षा, केले हो रक्षण.**
**प्रभुदेवानी माझ्या संसार प्रकृतीस दिले तोडुन.**
**कूडलसंगमदेवाठायी, प्रभुदेव, चन्नबसवण्णाच्या कृपेनें मी जगताहे.**

बसवदेव, चन्नबसवदेवांचे स्तोत्र करतात.

४३८

**भूमीच्या सत्वाने वाढला एक तरु.**
**दिले मज त्या तरुनी नवरस फळ देख !**
**ते काय आहे हे न जाणता, कसे आहे हे मज न उमजता**
**मी त्यास मोहून,**
**सापडलो हो मारारीच्या पाशात.**
**हे कूडलसंगमनाथ, वाचलो मी चन्नबसवण्णाच्या सानिध्यात.**

प्रभुदेव, चन्नबसवण्णाचे स्तोत्र करतात.

४३९

**प्रकाशित ज्योति प्रभागत तळपणारी डोळ्याची कांती.**
**आत बाहेर कांती तळपणाऱ्या नयनाच्या योगीस मी पाहिले हो !**
**निज ग्रासित, निर्मल घन पाहुनी झालो मी विस्मित.**
**गुहेश्वरलिंगाठायी चन्नबसवण्णायोगे मी जगतो.**

चन्नबसवदेवासमोर बसवदेव, प्रभुदेवांची स्तुती करतात.

४४०

**लोचनी करस्थली दिटि दाटली.**
**अंगविकाराचे मज नुरे हो भान !**
**मनाच्या अंतिम अग्रावरचे अनुभाव झाले हो निर्गमन.**
**भाव निर्भावाचे मज नुरे ज्ञान.**
**कूडलसंगमदेवाठायी, प्रभुदेवांच्यायोगे-**
**मी जगतसे पहा चन्नबसवण्णा.**

प्रभुदेव, चन्नबसवण्णासमोर बसवेश्वराची स्तुती करतात.

अनुक्रमणिका

४४१

अंग अंतर्गत लिंगैक्याचा संगन दिसे ते कोणासहि !
प्राणाच्या शेवटच्या अग्रावरील भाव सूतकाचे आवरण
करुनी निरसन, निर्भाव निस्सूतकी झाल्यानें,
निजलिंग समाधिची घनता न दिसे हो कोणासही !
गुहेश्वरलिंगाठायीं या संगनबसवण्णाची पाहुन निजस्थिती,
मी जगत आहे पहा बा चन्नबवण्णा.

चन्नबसवण्णा प्रभुदेवासमोर बसवदेवांचे महात्म्य वाखाणतात.

४४२

परात्पर वस्तूनें पाठविलेल्या आग्रहपूर्वक आज्ञेस
मानुनी, गुरु निरोप समजून केले मान्य.
करुणाकर बसवण्णाने,गुरु लिंग जंगमांची भक्ति करण्यास्तव,
कैलासाहून सातशे सत्तर अमर गणासमवेत केले
मृत्यूलोकी आगमन
झाला बसवण्णा शिवसमयाचारास आधार.
झाला हो सकल लोकादिकांचा परमगुरु.
जडजीविंच्या मनातील काळोख नासण्यास्तव
बांधिले कल्याणात महाकेंद्र.
परमानें धाडलेले पत्र खाली येऊन पडले ते महाराजांच्या
सिंहासनावर.
ते न वाचता येई महा महापंडिताना, ती नसे हो छप्पन देशाची लिपी.
पत्र वाचणाऱ्यास हत्ती-सैन्य, घोडे भंडार देऊन
सहासष्ट ग्रामाचा करितो मी मुख्याधिकारी असे केले
बिज्ज़ळ महाराजानें शपथेपूर्वक.
सर्वेशाचा निरोप शिरसामान्य मानून, शिवशरणू ( नमो नमो )
म्हणत बसवण्णाने ते पत्र दाखविले वाचून, खणून काढण्यास
लाविले सहासष्ट कोटी वस्तु,
राजवाड्यास, राज्यास होऊन मुख्यमंत्री, झाला सकल
हरगणास गति मति चैतन्य संगनबसवण्णा,
कूडलचन्नसंगय्याठायी, राहून मृत्युलोकी झाला हो शिवाचा
भंडारी, मम पिता पूर्वाचार्य संगनबसवण्णा.

अनुक्रमणिका

४४३

**भक्तिचे कुळस्थळ मृत्युलोकी विस्तारण्यास्तव**
**आला आहे हो बसवण्णा.**
**आचार शिवाचारा पुढील पडदा काढून**
**करतळामळक केला आहे बसवण्णा.**
**परवादी बिज्ञळ हा कसोटीस लावीत असता,**
**शिवभक्ति संपादण्यास्तव छत्तीस विद्रोहिंचा केला**
**पराभव. बसवण्णाने उचलिला शिवाचाराचा ध्वज.**
**कूडलचन्नसंगय्याठायी. बसवण्णाची उन्नतस्थिती**
**करण्यास स्तुती, झालो मी असमर्थ ऐकावे हे प्रभो.**

त्या प्रस्तावात चन्नबसवदेव स्तोत्र गातात.

*राग-धन्यासी*
**आचार दुदुंभीस मी कोणती देऊ उपमा**
**झळकतसे प्रकाशांत झगमग झगमग ॥**
**ज्ञानाचरणे चे क्रम करितसे कथन**
**भेदाच्या भेदातले महाघन आचार ॥१॥**
**स्फटिकाच्या गिरी तीरि झाल्यास सुस्थिर**
**घट झळाळे तैं न म्हणता भीतरि बाहेर ॥२॥**
**परिस गिरी कोरण्यास जाता**
**हातातील चाण, हातोडा झाले हे परिस ॥३॥**
**असे हे तैसेचि लागेल का झळ, माणिक धरलेल्या हातास**
**लिग जंगमाच्या कारुण्य प्रसादि ज्ञानिस ॥४॥**
**चाफ्याच्या फुलातील मकरंद करी भ्रमर सेवन**
**तैसेचि वसे कूडलचन्नसंगमदेवाठायीं शरण बसवण्णा ॥५॥**

४४४

**न सुटे विश्वास, असे ते मनी ठसल्यापरि.**
**न म्हणे लिंग, न म्हणे जंगम, न म्हणे प्रसाद.**
**ते आपणात होऊनी आपण झालेहो आपणचि परिपूर्ण.**
**कूडलचन्नसंगमनाथ, तुमचा शरण संगनबसवण्णाच्या**
**उपस्थितीस उपमा देता नाही येत.**

चन्नबसवदेव-प्रभुदेवास बसवदेवांची महती वर्णन करून सांगत असताना प्रभुदेव-चन्नबसवदेवांच्यापुढे बसवदेवांच्या महात्म्याची प्रशंसा करतात.

अनुक्रमणिका

४४५

**आदि अनादि या दोन्हीचें मूळ बसवण्णानें**
**दावियले उचलून, आदिलिंग, जंगम हा भेद**
**दावियले विवरण करून,**
**काया-जिवाचा संबंध असंबंध करून दाविले बसवण्णानें,**
**मम आदि अनादि बसवण्णायोगे जाणून,**
**गुहेश्वरलिंगाठायीं झालो मी सुखी, ऐका बा चन्नबसवण्णा.**

आदिलिंग अनादी जंगम असल्याची रीत मजला बसवण्णाने सांगून कृतार्थ केले असे प्रभुदेव, चन्नबसवण्णास सांगतात. तेव्हां चन्नबसवण्णा प्रभुदेवास विचारतात. तुला आदि-अनादिच्या अतीत असलेला लिंग कसा साध्य झाला ?

४४६

**आदित नाहीं आला, अनादि बिंदुत नाहीं झाला,**
**नादास गिळली कळा, कळास नाद गिळुनी**
**प्रकाशित लिंग, तुज कसा झाला बा साध्य सांग मज ?**
**आज्ञाविण आज्ञा जगी होईल का मान्य ?**
**याकारणे कूडलचन्नसंगमदेवाठायी, आदि स्पर्श**
**तुज कसे साध्य झाले सांग प्रभो ?**

चन्नबसवदेवाच्या प्रश्नास प्रभुदेव उत्तरतात.

४४७

**आदि अनादि हा भेद आहे का ?**
**आदि लिंग अनादि शरण हे झाले आपल्या आपण ऐक बा !**
**धरणी आकाश भुवन भवनें निर्माणा पूर्वी,**
**अनादि परशिव आपण, आपल्या लिलेने केला साकार धारण.**
**तो साकारच असे हा साकार.**
**मम साकाराच्या आदिस, मम निराकाराच्या अनादिचा**
**बसवण्णाच असे जाणकार**
**गुहेश्वरलिंगाची घनता मज बसवण्णायोगे झाले साध्य**
**पहा चनबसवण्णा.**

अनादि शिवतत्त्वाची घनता साध्य झाल्याची रीत प्रभुदेव निरूपण करतात, तेव्हा चन्नबसवदेव पडताळून पाहून प्रभुदेवांची स्तुती करतात.

अनुक्रमणिका

४४८

**आयत्ताविना अनुभाव, स्वायताविना समाधान,**
**सानिध्याविना संबंध असल्याचे कसे काय असावे ते ?**
**भेटुनी घन मन, आदि-अनादिचे अंतर्गत,**
**आधाराविनास्वरूप झाले साध्य देख !**
**कूडलचन्नसंगमदेवा, शरण प्रभुदेव अजात असल्याचे, रहस्य आज**
**मज झाले विदित.**

प्रभुदेव हे अजात असल्याचे जाणून चन्नबसवण्णा, या प्रभुदेवांच्या मुळेच समस्त तत्वांची उत्पत्ति झाली हे रहस्य उमजून स्तुती करतात.

४४९

**निराकारचि होऊनी साकार, उभा ठाकिला एक शरण.**
**तयाच्या विद्या बुद्धिने जन्मला ब्रह्म.**
**तयाच्या शांति सहनेने जन्मला विष्णु.**
**तयाच्या क्रोधाने जन्मला रुद्र.**
**हे तिन्ही पीठ राहोत.**
**या तत्वत्रयास कारणिक शरणाचे अस्तित्व जाणून,**
**करितो मी वंदन कूडलचन्नसंगमनाथ.**

चन्नबसवदेवाना, प्रभुदेवांचे मूल संभुति तत्वाची आणि त्यांच्या महाघनतेची विवेकाने जाणीव झाली, चन्नबसवण्णा स्तुती करीत असताना प्रभुदेव, चन्नबसवण्णाचा पूर्वापारसंबंध जाणून स्तुती करतात.

४५०

**देवा, तत्व-वितत्व नव्हते तेव्हां,**
**प्रकृति पुरुष नव्हते तेव्हां,**
**जीव-परम हा भाव अभिव्यक्त, होण्यापूर्वी,**
**कांही कांहीच नव्हते तेव्हां,**
**पूर्णस्थिती पावल्यानें वृद्धि, झाली तीच बिंदु पहा.**
**तो बिंदु अक्षरत्रयाच्या पीठात बसल्याने**
**तैं झाली ॐकाराची उत्पत्ति.**
**त्या नाद उत्पत्तिने रूप धारण केले एका शरणानें,**
**त्या शरणायोगें झाली प्रकृति,**
**त्या प्रकृतियोगे झाली लोकाची उत्पत्ती.**
**त्या लोक-लौकिकाच्या अतीत होऊन,**
**निजाठायी झाला निवासी, असा गुहेश्वराचा शरण**

अनुक्रमणिका

**चन्नबसवण्याची घनता बसवण्णाच्या कृपेने जाणून**
**म्हणतो मी तयास नमो नमो.**

तेव्हां चन्नबसवदेव प्रभुदेवाना म्हणतात, बसवदेवांची श्रेष्ठता मजला सांगा. बसवदेवांच्या कृपेने मी चन्नबसवदेवांची निजस्थिती जाणलो असे प्रभुदेव सांगतात.

४५१

**निरालंबाठायी निजलिंग मीच आहे, या महदहंकाराने**
**संसारी बनून येतो. ही कष्टप्रद भ्रांति कोणास कशी उमजणार ?**
**बसवण्णाविण कोण करतो हो याचे परिहार ?**
**कूडलचन्नसंगमेश्वर, बसवण्णाच्या श्रीचरणाची**
**घनता मज एकदां सांगावे हे प्रभो.**

४५२

**माझ्यात नसलेल्या घनतेस चढवुन बोलता ती तुमची लीला.**
**मज ते पाहिजे वा नको असे नाही म्हणत,**
**परि ते असो. तुमच्या श्रीपद कृपेनें तुमच्या उपस्थितीची**
**मज झाली हो जाण.**
**कूडलचन्नसंगमनाथ, मज पुन्हा एकदा बसवण्णाच्या आधिक्याचे**
**सांगावे हे प्रभो !**

बसवण्णाची थोरवी मज सांगावे म्हणून चन्नबसवण्णा विचारतात तेव्हा प्रभुदेव तुम्हीच सांगा म्हणतात.

४५३

**अद्वैत शिशु येऊनी मम करस्थली, स्पर्शिता क्षणी**
**मज केले ते आपल्या सम,**
**ऐकवा, माझ्यातले मीपणाचे विचार गेले विरघळून !**
**आणिक अन्य विचार कसले ते मज नसे ठाऊक.**
**माझ्या पूर्वापराची जाण तुमच्याकडून करून घेण्यास्तव**
**मी तुम्हास झालो हो शरणागत.**
**संगनबसवण्णाची अंतस्थिती मज कसे कळणार ?**
**सांगतो गुहेश्वर साक्षीने संगनबसवण्णा प्रकाशित आहे**
**तुमच्या अंतरंगात.**
**मज एकदां बसवण्णाची घनता सांगा समजावून**
**बा चन्नबसवण्णा.**

अनुक्रमणिका

४५४

**आदिस दाविला, अनादिचे समजावून दिला;**
**इहाचा केला परिहार, परास केला हो स्थिर;**
**काया-प्रसाद, भाव-प्रसाद, ज्ञान- प्रसादास एक**
**करूनी दाविलात.**
**परास सामावुन अत्यानंदात ठेविलात**
**गुहेश्वराचा शरण संगनबसवण्णांचा पूर्वापार**
**करूनी कथन, करा मम रक्षण बा चन्नबसवण्णा.**

चन्नबसवदेव प्रभुदेवास बसवदेवांचे पूर्वापार संबंध सुज्ञान दष्टीनें निरखून सांगतात ते या वचनांत;

४५५

**कांही कांहीच नव्हते तेव्हां, नंदीवाहन नव्हते तेंव्हा,**
**पूर्वी चौदा भुवने नव्हती तेंव्हा**
**तेव्हां लिंगास कोणीही नव्हते पाहिले,**
**तेव्हां लिंगास पाहून सांगणारा तोच अद्वैती होय.**
**तेव्हां कुडलचन्नसंगय्याठायी, बसवण्णा हा**
**एकटाच पावला हो उदय, ऐका प्रभो.**

आणखी बसवदेवांच्या अवताराचे अवगत असलेले चन्नबसवदेव प्रभुदेवास सांगतात.

४५६

**कृतयुगात देवासुराचा संहार करताना, होते बसवण्णाचे नाव**
**प्रथमगणेश्वर.**
**गजासुराचे चर्म सोलुन पांघरल्यावेळी, झाला तो उग्रगणेश्वर.**
**जगास भयंकर पीडित असलेल्या असुरांची शिरोमाला गळ्यात,**
**छातीवर हार करून धारण केल्यावेळीं, शंकारहित निःशंक**
**गणेश्वर झाला होता.**
**समस्त देवांना करुणामृत रसाचा वर्षाव करून सुखांत ठेवुन**
**करीत असता रक्षण, होता शंकर गणेश्वर.**
**त्रेतायुगापूर्वी काळांधरात शिव हा निजमंदिर झाल्यावेळी,**
**होता हो कालाग्निरुद्र गणेश्वर.**
**जालांध्र या असुराचा संहार करताना, सुज्ञांचा सुज्ञ झाला होता**
**विचित्र गणेश्वर.**
**पितासुर या दैत्याचा करुनि संहार, जगाच्या रक्षणार्थ,**
**मातापिता गणेश्वर झाला होता.**

अनुक्रमणिका

ताळासूर या दैत्याचा करूनी वध, जगाचे करूनी रक्षण रचलेल्या
सृष्टि ब्रह्मांडाचा भार वाहण्यास्तव झाला होता ताळमेळ गणेश्वर.
जलप्रळयांत जगन्नाथ अविनाशी झाल्यानें, झाला तो जनन-मरण
वर्जित गणेश्वर.
जग सारे शून्य म्हटल्यास मीच केले निर्माण म्हणून झाला तो
आदिगणनाथ गणेश्वर
सकल सुरासुर अहंकारातियानें सीमा ओलांडल्यावेळीं, झाला खोंड
भांडखोर.
त्या पोळानें-खोंडाने साऱ्याना पायाखाली तुडवून, चेंदामेंदा करून
नाश केल्यावेळी श्रेष्ठोत्तम नंदीमहाकाळ गणेश्वर झाला होता.
उघडताचि अग्निनेत्र जळतील सकल लोक म्हणून,
जगाच्या रक्षणार्थ झाला होता वंद्य गणेश्वर.
उमाच्या विवाह समयी, झाला होता काललोचन गणेश्वर.
अंधकासुर संहाराच्यावेळीं, झाला होता नीललोचन गणेश्वर.
त्रिपुर दहनाच्यावेळीं, झाला होता स्कंदगणेश्वर.
ब्रह्मकपाल, विष्णुकंकाळ धरल्यावेळीं, झाला होता नीलकंठ गणेश्वर.
द्वापारयुगात लिंग प्राण होऊनी संयोग झाला वृषभगणेश्वर.
अशा प्रकारें चारी युगें, अठरा युगें मरण जनन होताना,
झाला होता नंदिकेश्वर गणेश्वर.
कलियुगात गुरू-लिंग-जंगम-पादोदक-प्रसादाचा पूर्वाश्रय
निरसुन, होऊनी लिंग कुळस्थळाचा महंत कुडलचन्नसंगमनाथाच्या
'महामने' तील सर्वाचार संपन्न संगनबसवण्णा गणेश्वर झाला
ऐकावे हे प्रभो !

बसवण्णा या मृत्युलोकास आल्याचे कारण चन्नबसवण्णा प्रभुदेवास विवरण करून सांगतात.

४५७

लिंगाचा पूर्वाश्रय करूनि निरसन, हाच प्राणलिंग असल्याचे
दर्शविण्यास्तव आला आहे हो बसवण्णा.
काषाय वस्त्राचा पूर्वाश्रय करूनि निरसन,
हा लिंग जंगम असल्याचे दाखविण्यास्तव आला आहे बसवण्णा,
प्रसादाचा पूर्वाश्रय करूनि निरसन,
हा महाप्रसाद असल्याचे स्वय करून दाखविण्यास्तव
आला आहे बसवण्णा.
पादोदकाचा पूर्वाश्रय करूनि निरसन,
महापादोदकाची जाण करून देण्यास्तव
आला आहे बसवण्णा.
या चतुर्विधाच्या पूर्वाश्रयाचे करूनि निरसन,

अनुक्रमणिका

**स्वायत्त करविण्यास्तव कूडलचन्नसंगय्याठायीं,**
**मुत्युलोकी आला हो जन्मून संगणबसवण्णा.**

चन्नबसवण्णाने बसवदेवाचे सांगत्य कथन केल्यावर प्रभुदेवानी चन्नबसवदेवाच्या जाणिवेची स्तुती केली.

४५८

**तेव्हाच्या गोष्टी तेव्हाच्या तेव्हाच असे मानता नाहीं येत**
**पूर्वी होऊन गेलेल्या युग प्रळयाचा जाणता कोण आहे ?**
**या पुढे येणारे युगप्रलयें कोणास कसे हो कळणार ?**
**बसवण्णा आदिचा लिंग शरण असल्याचें**
**भेदून पाहणारा, असा कोण आहे बरे जाणकार ?**
**लिंग जंगम प्रसादाच्या महात्म्यास बसवण्णाच**
**आदि होय, या गोष्टीचा जो जाणकार तोच स्वयंभुज्ञानी होय.**
**गुहेश्वरलिंगाठायी, चन्नबसवण्णा तूच एकला आहेस.**

बसवण्णा हाच आदि शरण असल्याने त्याच्या महिमेचा जाणकार तूंच आहेस. तुझ्या ज्ञानास प्रती नाहीं, असे प्रभुदेव निरूपण करतात. त्यांना चन्नबसवदेव सांगतात बसवण्णास आदि शरण म्हणता येत नाही.

४५९

**आदि बसवण्णा, अनादि लिंग, ही गोष्ट असे हो खोटी, आहे**
**खोटी. ही गोष्ट माझ्यानें नाहीं ऐकवत, आदि लिंग अनादि**
**असे हो बसवण्णा.**
**लिंगाची उत्पत्ति झाली बसवण्णाच्या उदरात.**
**जंगमाची झाली हो उत्पत्ति बसवण्णाच्या उदरात.**
**बसवण्णा स्वीकारल्यानेच झाले ते प्रसाद.**
**या त्रिविधास कारण असे हो बसवण्णा.**
**याची मला झाली जाणिव कूडलचन्नसगमदेवा**

यांस प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

४६०

**कायाधारी होऊन जो घेई जनन तो असेना का कालाग्निरूद्र,**
**कायाधारी होऊन जो घेई जनन तो असेना का**
**कामहर, कायाधारी होऊन जन्मलेला असेना का तो अनादि**

अनुक्रमणिका

**परमेश्वर, हे ज्ञान या कोणासही न होई साध्य.**
**गुहेश्वरलिंगाठायीं तू कायाधारी होऊन आलास तरी मायेचे**
**आवरण तुज नसल्याचे, आले माझ्या पाहाण्यांत बा चन्नबसवण्णा.**

शरीर धारण करूनही दिव्यज्ञानी तू एकटाच असल्याचे मजला दिसले असे प्रभुदेव म्हणतात. त्याना चन्नबसवण्णा म्हणतात. कायाधारण केल्यानेच मी तुम्हास पाहिले.

४६१

**कायेनेच लिंग दर्शन, कायेनेच होई जंगम दर्शन,**
**कायेनेच लाभे प्रसाद संपत्ति.**
**कूडलचन्नसंगमनाथ, या कायेनेच पाहिले मी तुम्हास.**

शरीर धारण केल्यानेच तुम्हास पाहिले म्हणून चन्नबसवण्णा सांगतात. त्यांना प्रभुदेव म्हणतात, आचारासच लिंग करून घेतल्याचे तुझ्याशिवाय मी दुसऱ्या कोणासही पाहिलें नाही.

४६२

**अंगधारी जरी असशी तूं तरी अंग-अनंगाच्या पलिकडचा**
**असशी तूं महिमावंत.**
**राहशी तूं अंगास आचार करून, आचारासचि अंग करून,**
**अंगरहित असशी बा तूंच अप्रतिम.**
**तुज आचार हाच असे स्वायत्त, आचार हाचि होय प्राण.**
**गुहेश्वरलिंगाठायीं, तुझी आचार भिक्षा**
**मज वाढ बा चन्नबसवण्णा.**

तुजला सदाचारच सर्वांग झाल्यानें, तुझ्या सर्वाचार संपत्तीचा कारुण्य प्रसाद मजला वाढ बा म्हणून चन्नबसवण्णास-प्रभुदेव मागतात. आचार मजला लाभला नाहीं, तो बसवण्णासच लाभला आहे असे चन्नबसवण्णा सांगतात.

४६३

**आयत लिंगठायी उद्‌भवुनी, झाला तो आचार लिंगप्राणी,**
**आचार लिंगाठायी होऊन अवधानी झाला सर्वाचार संपन्न.**
**सर्वाचार संपत्तिठायीं झाला आहे तो लिंगैक्य.**
**कूडलचन्नसंगाठायी, संगनबसवण्णाच असे आचाराचा जाणकार**
**हे प्रभो, मज ते कसे कळणार** ?

अनुक्रमणिका

४६४

**आचार हे असे अगोचर केल्याविना नसे कळत देख.**
**शरीर धारण केल्यानेही नसे ते हाती सापडत.**
**क्रिया-ज्ञान यां साऱ्याचे करूनी निवारण**
**कूडलचन्नसंगाठायी, आचाराच्या अंतस्थितीगतीचा**
**जाणकार असे बसवण्णा बघा प्रभो.**

बसवण्णाच्या आचाराची अंतःस्थिती कशी आहे ? म्हणून, प्रभुदेव चन्नवसवण्णास विचारतात.

४६५

**आयत-स्वायत-सन्निहित होऊन आराध्यलिंगाठायीं**
**झाला आहे तो अनुभावी.**
**बसवण्णा जंगमलिंगप्राणी झाला आहे, त्यायोगें त्याचे**
**प्राण निःप्राण झाले आहे.**
**गुहेश्वरलिंगाठायी , संगनबसवण्णाच्या आचाराची**
**रीत तुजविण कोणासही जाणता नाहीं येत;**
**चन्नबसवण्णा तूच मज एकदा सांग बा समजावून.**

प्रभुदेवाना, बसवदेवांच्या सर्वाचाराचे आचारण चन्नबसवदेव सांगतात.

४६६

**आचारीच लिंग संबंध झाल्यायोगें लाभे हो श्रीगुरू सानिध्य.**
**ज्ञान मन संबंध झाल्यानें लाभे शिवलिंग सानिध्य.**
**या उभय सान्निध्याने लाभे जंगम सानिध्य.**
**याकारणें कूडलचन्नसंगमदेवा, तवठायीं आहे हो त्रिविध**
**संपन्न शरण संगणबसवण्णा.**

४६७

**गुरूठायी सदाचारी, लिंगाठायी शिवाचारी, जंगमाठायी समयाचारी,**
**प्रसादाठायी ब्रह्मचारी, आचरणी असे सुविचारी,**
**कूडलचन्नसंगा, तव शरण बसवण्णा.**

अनुक्रमणिका

४६८

**झाडानें बीजाची उत्पत्ति झाल्यास काय ?**
**अथवा बीजाने झाडाची उत्पत्ति झाली तरी काय हो ?**
**झाडाचे फळ वाढल्याची रीत नच कोण पुसत.**
**रोप पल्लवून झाले ते त्रिविध-**
**कूडलचन्नसंगा, तव शरण बसवण्णाचे.**

बसवण्णाच्या सर्वाचार संपन्नतेची प्रशंसा करून चन्नबसवण्णानी प्रभुदेवास निवेदल्यावर प्रभुदेव-बसवदेव करीत असलेल्या दासोहास पारखून पाहतात.

४६९

**लिंगाठायी उद्भवुनी, अंगविरहित होऊनीही; होई ते निष्फल.**
**जंगमाठायी झाल्यास सन्निहित; दासोह करणें निष्फल होय.**
**तू-मीपणाचा भाव असेतोपर्यंत, जंगमाठायी समयचारी**
**झालो असे, म्हणेंपर्यंत,**
**करीत असलेली भक्ति भिन्न होय.**
**गुहेश्वरलिंगाठायी, संगनबसवण्णाचे आचरण**
**मज कळेना, बघ बा चन्नबसवण्णा.**

बसवदेवांचे आचरण मजला समजत नाही म्हणून प्रभुदेव विचारतात, त्यांना चन्नबसवदेव समजावून सांगतात.

४७०

**शरण हा अनुरागी आहे असे वाटल्यास, नको पाहू तसे तू देवा !**
**नसे हो तो संगसूतकी.**
**लिंग परिचितास नको रे देवा, म्हणू तू संगसूतकी !**
**शरण हा सद्सद्विवेकानें वागतसे.**
**तो शोधूनी झाला सकलागमाचा आचार्य.**
**असे करू शकतो वा करू शकत नाही हे दोन्ही नाहींत,**
**कूडलचन्नसंगय्या, तुमचा शरण संगनबसवण्णा हा संगीही नव्हे,**
**निस्संगीही नव्हे.**

४७१

**नसे हो मी-पणा लिंगरूपि महंतास.**
**विनाशी-अविनाशि नसे तो देख !**

अनुक्रमणिका

विजेच्या गुच्छापरि दिसतसे मागे रूप बनून,
शरण शरीर धारण केल्यानें झाला का हो सामान्य ?
प्रकृतिगुण भिन्नभावी नसे तो, कूडलचन्नसंगय्या,
तुमचा शरण संगनबसवण्णाची थोरवी असे हो आगळी.

४७२

अनायासे करूनी घर, निरायासे परमसुखी.
रूप धारण करूनि ही असती रूपाधिक, पहाताना दृष्टिघन.
अशा या सहज संगीयांच्या निज स्थितीची रीत,
उदकातील बिंदु उदय रत्नापरि,
कूडलचन्नसंगमनाथ, अशी आहे तुमच्या शरणांची थोरवी.

४७३

शरण हा अदर्शनीय अथवा दर्शनीय या दोन्हीस नाहीं जाणत.
शरण स्वतंत्र असुनही असे हो भावरहित.
विकृत वेष करूनी धारण, सुकृताच्या गोष्टी नसे हो तो बोधित.
प्रकृति गुण अनुसरून नव्हे तो साकारास आलेला उपजीविक.
हे कूडलसंगमनाथा, तुमचा शरण आहे हो सार सम्मत.

४७४

नच देही, नच तो निर्देही, नच बोधक, नच हो निर्बोधक.
नच कायी, नच तो निःकामी.
आशा धरून आलेला आमिषी नसे तो.
असे तो अवगुणरहित निर्गुणी,
हे कूडलचन्नसंगय्या, तुमचा शरण.

४७५

घडण्यात असे तो घडण, भेदाचा भेद जाण.
जाणिवेचा असे जाण, ज्ञानाचा असे ज्ञान,
लिंगाठायीं असे अभिन्न सांधा,
कूडलचन्नसंगा, तवठायीचा संगनबसवण्णा.

अनुक्रमणिका

४७६

**शरण हा नसे हो साकार नसे निराकार**
**लिंगाठायीं प्राण झाले एकत्रित- प्राणाठायीं प्रसाद**
**प्राणाठायीं प्रसाद होई सिद्ध**
**प्रसादाठायी कायाश्रित.**
**लोक लौकिक प्रकारें नच ताचे उदय.**
**कूडलचन्नसंगा, ऐसा हो तव शरण.**

४७७

**सकल-निःकल असे हो बसवण्णा, निःकल असुनी असे सकल देवा.**
**सकल असुनीही नसे तो संसारी, निःकल असुनी नसे हो विरागी.**
**संसाररहित संग, वैराग्याविरहित निस्संगी.**
**उभय संगायोगे झाला तो परब्रह्म.**
**कूडलचन्नसंगमनाथ जसा आहे, तसाच तो आहे. तुमचा शरण**
**नसे हो बलहीन.**

चन्नबसवदेव, - बसवदेवांच्या उन्नतस्थितीची महती नाना प्रकारे स्तवन करून प्रभुदेवास विदित करतात. ते ऐकून प्रभुदेव प्रसन्न होतात, आणि चन्नबसवदेवांची स्तुती करतात.

४७८

**अंगरूपि संसारात जे झिजविती आपले जीवन,**
**त्याना परवस्तुचे असते का हो ज्ञान ?**
**मनरूपि संकल्पाच्या खड्डयात पडलेले जन,**
**मायेची उदराग्नि जिंकू शकतील कां हो ?**
**गुहेश्वरलिंगाठायी, सर्व संशय काढला निपटुन**
**अशा चन्नबसवण्णास म्हणतो हो मी नमो नमो.**

४७९

**मीपणाचे करूनी निरसन, गुरूस अनुसरून,**
**गुरूस तूच म्हणुन आचरणारा, गुरूच गति म्हटल्यानें**
**आद्यंत विचार संबंध स्थिरावलेला,**
**लिंग-जंगमाठायीं स्वतःस विसरून जळून घेतलेला लिंगैक्य,**
**गुहेश्वरलिंगाठायी अशा चन्नबसवण्णाच्या श्रीपदास**
**म्हणतो मी नमो नमो.**

अनुक्रमणिका

प्रभुदेवानी केलेले स्तोत्र ऐकून चन्नबसवदेव, प्रभुदेवानी माझ्या जगाची भ्रांति निवारण केल्याने मी कृतार्थ झालो म्हणून त्यांचे स्तवन करतात.

४८०

**नसता संसार डोळ्यापुढें येऊन छळित असता,**
**सुज्ञानरूपि लावुन अंजन, साऱ्या भ्रमरूपि अंधाराचें केले निवारण**
**निजलिंगाचे संबंध करूनी सुस्थिर, कूडलचन्नसंगमदेवाठायीं**
**नित्यात बिंबलेल्या प्रभुदेवाच्या श्रीपदास म्हणतो मी नमो नमो.**

चन्नबसवण्णांचे स्तोत्र ऐकून प्रभुदेव त्यांची प्रशंसा करतात.

४८१

**नरलोकीचे सारे नर झाले हो संसाराधीन.**
**सुरलोकीचे सुर सारे झाले संसाराधीन.**
**मुनीलोकीचे सारे ऋषि झाले तपो संसाराधीन.**
**रुद्रलोकीचे रुद्रगण सारे झाले रुद्रपद या संसाराधीन.**
**लिंगधारक सारे झाले लिंग संसाराधीन.**
**जंगमपूजक सारे झाले सायुज्य संसाराधीन.**
**प्रसाद-पादोदक संबंधित सारे झाले प्रसाद संसाराधीन.**
**गुहेश्वरलिंगाठायी सर्व संसारविरहित अशा**
**चन्नबसवण्णास म्हणतो मी नमो नमो.**

प्रभुदेवांचे स्तोत्र ऐकून चन्नबसवदेव, - प्रभुदेवांच्यामुळे आपण कृतार्थ झाल्याची भावना दर्शवित स्तवन करतात.

४८२

**मम संसार सूतक घासून पुसून काढून,**
**निजलिंगात निरहंकार या श्रेष्ठतेस दाविले मज एका शरणाने.**
**मज कोण नाहीं म्हणून प्रभुदेव नावाच्या एका शरणास**
**आणून केले मज कृतार्थ.**
**माझ्या डोळ्यासमोर वावरण्यास लाविले एका शरणाने.**
**त्या शरण कृपेनें प्रभुरूपि घन पाहून, मन मन होऊनी लीन.**
**झाले घन घन एक,**
**त्यामुळे कूडलचन्नसंगाठायी, अल्लमप्रभू या महिमावंतास**
**म्हणतो मी नमो नमो.**

अनुक्रमणिका

चन्नबसवदेव, आपणास आणि प्रभुदेवास एकाच सांप्रदायात निजपद साध्य झाल्याचे निवेदन करतात. चनबसवदेवास, - प्रभुदेव आपणा दोघास एकाच स्थानीं निजत्वाची जडण घडण झाल्याची रीत ती कशी आहे सांगा बघू म्हणतात.

४८३

**खाजत असता त्या फोडीवर झाले नखानें खाजवल्यागत.**
**शोधीत असता वेल, तीच पायास गुंडाळल्यापरि.**
**मम अपेक्षित कामना झाली सूचित.**
**गुहेश्वरलिंगाठायी, मला-तुला एकच सांपद्राय असल्याची रीत**
**ती कोणती सांग मज चन्नबसवण्णा.**

प्रभुदेवास चन्नबसवदेव सांगतात.

४८४

**काया असे एक, प्राण ही एक, भाव एक, निर्भावहि एक !**
**एकाविण आहेत का ते दोन ?**
**गुरू एकच, लिंग एकच, उपदेशहीं एकच !**
**कूडलचन्नसंगय्याचा शरण बसवण्णाच्या तालिमेत.**
**दोघानाहि अभ्यास असे एकच, देख हे प्रभो.**

चन्नबसवण्णांचे ऐकून प्रभुदेव विचारतात, आपण दोघेजण बसवदेवांचे शिष्य झाल्याची रीत सांगा चन्नबसवण्णा.

४८५

**करण्या जाता एक, ते झाले आगळे,**
**ही म्हण खरी ठरल्यापरि,**
**तुझ्या यजमानत्वाच्या अनुभवानें झाले हो मज गुरूमूख साध्य.**
**गुहेश्वरलिंगाठायी, मला-तुला एकच उपदेश केल्याची रीत ती**
**कोणती सांग बा चन्नबसवण्णा.**

चन्नबसवदेव दोघांचा सांप्रदाय एकच असल्याचे विवरण करून सांगतात.

४८६

**अंग-संसार विरहात होऊनी क्षीण, लिंगास अवग्रहून,**
**मातीच्या सापळ्यातला भुजंग पाहिल्यानें डोके उचलून**

झगमग प्रकाशे तें माणिक्य,
तयाची दीप्ती  फाकल्याने, सद्योजाताच्या मुकुटास वेटाळ घातलेला
असे तो फणिंद्र
नसे हो अन्य कोण. शिखर आदिकरून खणल्यानें, गुंडाळलेला
फणिसूत्र पाहून,
झटकन उघडल्याने दार, दृष्टिस पडलेल्या अनिमिषाचे
करस्थळ देखता दृष्टिनें खेचले इष्टलिंग,
शरीरातील सारे सांधे बंध खिळखिळीत होऊन सारे हाडे घळघळ
गळाले. त्याची समाधिस्थिती वाढविली  तुमची ख्याती पहा हो
त्या योगे अल्लमप्रभु
हे नाव आले तुम्हास.
भक्ति  अत्याधिकारानें होऊनी बदिकार, येऊन केल्यानें प्रवेश,
वांगी बाणलिंग झाल्याविण राहिल कां हो ? पडता दृष्टि त्यावर.
कूडलचन्नसंगमदेवाठायीं, अनिमिष-प्रभूस
झाल्यानें गुरू बसवण्णा, मी तुमचा धाकटा भाऊ आहे,
परिसावे हे प्रभो.

४८७

अनिमिषास लिंग दिले होते बसवण्णाने !
तोच लिंग लाभला तुज, त्यायोगे बसवण्णाचा
सांप्रदायिक शिशु तू झालास !
भक्ति अत्याधिक्याने चन्नसंगमनाथ या लिंगास ग्रहण केल्यानें
बसवण्णाचा सांप्रदायिक शिशु मीहि झालो !
आम्हा दोघासही एकच आहे हो कुळस्थळ,
या कारणें कूडलचन्नसंगाठायी बसवण्णाच्या,
महामनेचा प्रसाद दोघासही असे एकच हो प्रभो.

यास प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

४८८

लहान असला म्हणून झाले काय, थोर असला तरी काय ?
ज्ञान हे असू शकते का सान थोर ?
तेंव्हा नव्हते हो आदि अनादि, तेंव्हा नव्हते
अजांडब्रह्मांडादि कोटी उदय.
गुहेश्वरलिंगाठायी, तूच एक महाज्ञानी असल्याचे
मज आले हो आढळून, हे चन्नबसवण्णा.

अनुक्रमणिका

चन्नबसवदेव उत्तरतात.

४८९

**दुधाची चव स्वादिष्ट असल्याचे सांगू शकतात श्रीमंत.**
**सुखद स्पर्शाचे स्वानुभाव न येई सांगता न येई, पुसता.**
**स्पर्श-संबंध निवारल्यानंतर उपचारास असे का वाव ?**
**कूडलचन्नसंगमदेवाने मज दिल्याने ही जाण,**
**झालो हो मी जाणकार, मज नसे अन्य स्वतंत्रज्ञान.**

मी तुमच्याकडूनच समजावून घेतले, त्याशिवाय मजला स्वतंत्रज्ञान आहे का हो ? असे चन्नबसवदेव विचारतात तेव्हा प्रभुदेव त्यांना सांगतात.

४९०

**लिंग अनुसरून लिंगायोगे झालेले ज्ञान, नसे हो ते ज्ञान**
**गुरूयोगें जाणलेलें ज्ञान ते नसे ज्ञान.**
**गुरूयोगेच लिंग आहे हे म्हणणे आहे कल्पित.**
**ते असे आपल्या आपण विना**
**गुहेश्वरलिंगाठायी, संबंध विच्छेदन होईपर्यंत**
**आपण होता नाहीं येत, पहा चन्नबसवण्णा.**

चन्नबसवदेवाचे प्रत्युत्तर

४९१

**गुरू नसता तर तुजला लिंग कसा लाभला असता ?**
**केलात तुमच्या गुरूची हत्या घेतलेत तयाचे लिंग !**
**तेव्हा तुमचा गुरू अनिमिष असल्याचे नव्हते का माहित ?**
**कूडलचन्नसंगाठायी, अल्लमप्रभु व्रतहीन असल्याचे**
**तिन्ही लोक जाणती.**

अनिमिषाची हत्या करून त्याचे लिंग तू घेतलेस म्हणून तू गुरूद्रोही आहेस, असे चन्नबनवदेव, प्रभुदेवास म्हणतात. त्यांना प्रभुदेव निवेदन करतात.

४९२

**गुरूचा प्राण, लिंगाठायी झाल्यावर लीन,**
**तो लिंग मम करस्थळी आला देख.**

अनुक्रमणिका

**आहे पहा, मम गुरू अनिमिष मम करस्थळी,**
**हा बघा, मम अनिमिष गुरू आहे मम ज्ञानाठायीं,**
**हा पहा, माझ्या गुरूचा गुरू परमगुरू बसवण्णा**
**दिसताहे माझ्या डोळ्यापुढें.**
**गुहेश्वरलिंग साक्षीनें सांगतो, मजवर कसा येईल आरोप**
**गुरू द्रोहाचा बा चन्नबसवण्णा.**

चन्नबसवदेव विचारतात.

४९३

**पहाण्याचे एक, ते पाहून घेण्याचे एक;**
**अजून तुझ्यात आहे कीं द्वैत !**
**करस्थली एक, मनस्थली एक;**
**अजूनही तुझ्यात आहे द्वैत !**
**कूडलचन्नसंगठायीं, गुहेश्वररूपि लिंग तुज साध्य कसा**
**झाला मज सांग प्रभो ?**

चन्नबवण्णांना प्रभुदेवांचे प्रत्युत्तर

४९४

**करस्थळीचा लिंग झाल्याने मनस्थळी वेध,**
**मनस्थळीचा लिंग होऊनी महास्थळी वेध,**
**ते महास्थलच मम सर्वांगी झाल्यावर वेध,**
**आता भिन्नभावात असू शकेल का अवकाश ?**
**गुहेश्वररूपि प्राणलिंग, परतत्वांत होऊनी एक**
**समधातु झाल्यावर नुरे बा द्वैत चन्नबसवण्णा.**

४९५

**लिंग हाचि प्राण, झाला प्राणलिंग.**
**अंगची झाले हो लिंगांग.**
**गुहेश्वरलिंगाठायी, झाले हो सर्वांगचि प्राणलिंग स्वायत**
**ऐक बा चन्नबसवण्णा.**

प्रभुदेव प्राणलिंग संबंध भेद पद्यरूपांत सांगतात.

अनुक्रमणिका

*राग : मधुमाधवी*

**वाणी संचय प्रभा मरूत परिमळापरी**
**भावविरहित परब्रह्म पर हाचि आपण ।**
**ज्ञान चिन्हाचे विस्मरण अविरत घन**
**निश्चल निजपदायोगें झाली प्रथा ॥पल्लव ॥**
**कोमल माणिकापरि उजळे हो ज्ञानज्योत**
**नवनळामाजी प्राणलिंग भरित ।**
**पिंड ब्रह्मांडातीत दिसणारे वचन**
**गगन उदयावरी घनाचे गमन॥१॥**
**आकाशा पलिकडे ना कोणास ज्ञात,**
**पाताळाची घनता जाणतो कोण**
**आत्म्यास धरून परमात्म्याचा परिभाव**
**पहा पहा हो अवलोकुन घनाचे गमन ॥२॥**
**रात गिळियले मन, दिवसासगिळिले घन**
**बोलीचे मथन जो गिळे तोच भरित ।**
**नीति-निज निश्चल निजाचे निर्मल तेज**
**प्राणलिंग घनतेस असे का प्रमाण ? ॥३॥**
**साठी दर्शनाचा धनी करी तो अंतरंगी वास-**
**कोणासही साध्य असे गगन-पवन एक**
**हृदमकमल प्रकाश परब्रह्मी भरून**
**दावियले अत्यानंद परप पदवी ॥४॥**
**धरणीस ना निद्रा उदकास ना स्वप्न**
**अग्नि कळवळाच्या न होई कारे आधीन ।**
**चलन पवन स्वयेचि न होई तामसाधीन ।**
**सर्वशून्यास कुठलेहो भ्रम हे गुहेश्वरा ॥५॥**

प्रभुदेव आपल्या प्राणलिंगाचा निर्णय निरूपण करतात. ते ऐकून चन्नबसवदेव म्हणतात.

## ४९६

**पोहोंचण्या आधी, गुरू असतो, लिंग असतो, जंगम असतो,**
**प्रसाद असतो,**
**पोहोंचल्या नंतर, गुरू नाही, लिंग नाहीं, जंगम नाहीं,**
**प्रसाद नाहीं.**
**कूडलचन्नसंगय्याठायी, स्वयविना नसे हो पर,**
**हे तुझ्यात आढळून आले मज पहा प्रभो.**

बसवदेवांचे ऐकून प्रभुदेव सांगतात.

अनुक्रमणिका

४९७

**मन-मन एक झालेल्या अनुभावानें,**
**घन घन एक झाले देख.**
**तेव्हा आपल्यात आपण तृप्त झाल्याचे**
**सत्य निर्णयानुसार झाले हो निर्धार देख.**
**गुहेश्वरलिंगाठायी, चन्नबसवण्णायोगे झालो हो मी सुखी.**

चन्नबसवदेव, प्रभुदेवांचे स्तवन करून आपणास झालेला परिणाम विवर करतात.

४९८

**जाणिवेच्या तृप्तिस अनुभाव हाच आश्रय.**
**लिंगाच्या अनुभावें देखिले मी तुम्हास.**
**तुम्हास देखिल्यानें झाले मी पणाचे विस्मरण.**
**पहा हो प्रभो, कूडलचन्नसंगमनाथ.**

तुमच्या संगाने मी लिंगैक्य झालो म्हणून चन्नबसवण्णा सांगतात. तेव्हा प्रभूदेव म्हणतात, तुमच्याचसंगाने मी लिंगैक्य झालो.

४९९

**श्रद्धा आणि संतोषानें स्विकारलेल्या लिंगाच्या सभोवार**
**आवरिले प्रेम, झाले ते कर्पूर करंडा नष्ट केल्यागत.**
**लिंगानुभावी यांच्या संगाने उघडले हो मम नयन**
**गुहेश्वरलिंगाठायी, गेलो मी विरून, चन्नबसवण्णा.**

अनुभावी शरणांच्या संगाने कृतार्थ झालो, असे प्रभुदेव निवेदितात. तेव्हा चन्नबसवदेव, प्रभुदेवांच्या आणि बसवदेवांच्या संगसुखाचे वर्णन करतात.

५००

**समसुख समसंधानरहित असे हो तो संग.**
**तयास ना स्पर्श ना विरोध असा तो संग.**
**कोणासही कोणताही नच अनुभव असा तो संग.**
**कूडलचन्नसंगाठायीं, लिंग लीय होई तो संग**

चन्नबसवदेव, - प्रभुदेवांचे आणि बसवदेवांचे स्तोत्र समरस भावाने करतात. ते ऐकून बसवदेव म्हणतात. मी शरणांच्या संगास समदेवी होत नाही.

अनुक्रमणिका

५०१

देवा, तव शरणांनींच केले मज पावन,
आपल्यासम केले मज समजावून,
शरणांनी, मज जसे केले तसा मी झालो.
मी एक असे तुमच्या शरण अनुयायीना अनुसरलेला.
कूडलसंगाच्या शरणांच्या मनास होऊनी मान्य.
ते मजवर झाले प्रसन्न, त्यायोगे मी वाचलोविना,
समसंगाच्या बरोबरीचा मी कसा होईन ?
सांग मज चन्नबसवण्णा ?

यास चन्नबसवदेव विचारतात.

५०२

खंडरहित घन मनांत निश्चल वास केल्यावर.
त्या घनास पडद्याआड लपवितो म्हटल्यानें लपेल का तो ?
चोरून हेमगिरी जमिनीत लपवितो म्हटल्यास ,
ती चोरी सापडल्याविना राहील कां ?
कूडलचन्नसंगाचा शरण प्रभुच्याठायीं एक झाल्याचे सुख,
मज झाले विस्मरण म्हणणें, तुम्हास ते योग्य होईल का ?
सांगा संगनबसवण्णा ?

बसवदेवांचे प्रत्युत्तर.

५०३

समरति समसंधाचे संगसुख तुझ्यायोगे
झाले मज साध्य.
सांग बा, मज दाविले कोण लिंगैक्याचा मार्ग ?
कूडलसंगमनाथाचा शरण प्रभुदेवाठायीं तू मज
ठेवीपर्यंत, मज कसे होईन अवगत सांग तूच चन्नबसवण्णा ?

चन्नबसवदेव सांगतात,

५०४

नच तेंव्हा धरणी आकाश, अनल-पवन-जल-कूर्म
नव्हते तेंव्हा, चंद्र सूर्य यांची कळा नव्हती तेव्हां,

आत्मस्थळ अनुभवास येण्या पूर्वी,
नित्य निजलिंगाचा जाणकार कोण होता हो तुम्हाविण ?
त्या महा घनास होऊनी घन वाहन, अगम्यस्थळी स्थिर होऊनी,
परिपूर्णतेचे जाणकार तुम्हाविण होते कां कोण ?
शेष प्रसादाच्या कारुण्याचा होऊनी शिशु
पोटात असल्यावेळीं, विभुति पट्ट बांधून,
करूनी हस्त मस्तक संयोग, मज कोण वाचविले हो तुम्हाविण ?
कूडलचन्नसंगमदेवाची साक्ष ठेवून, मी तुमचा
करुणेचा शिशु आहे, हे तिन्ही लोक जाणती बा संगनबसवण्णा.

बसवदेवांचे प्रत्युत्तर.

५०५

कृतयुग त्रेतायुगे द्वापारयुग कलियुग हे सारे
भवरूपि राहाटीत फिर फिरून येत असता,
अनंत कोट्यानुकोटी युगे पडली मृत्यूमुखी.
अनंत जलप्रलये गेली हो वृष्टि कर करून गेली.
चौदालोकरूपि अनंतकोटि ब्रह्मांड सारे लय पावले.
या कालचक्रात कोणत्या लोकी कोणत्या युगात
प्राणलिंग-लिंगप्राण या भेदाचा जाणकार कोण होता. सांग बा ?
गंगा-गौरीवल्लभ आदि अनंत कोटि रुद्रादि सारे,
प्राणलिंग संबंधाचा मार्ग न जाणता, अणिमादि-चतुर्विध फल
प्राप्तिच्या झाले आधीन.
शिवाचाराचा विचार न जाणता, या जगाचा ऱ्हास होतो आहे.
यास्तव परपुरुषार्थ कारणिक होऊन मृत्युलोकी अवतरलात
गुरू-लिंग-जंगम-पादोदक-प्रसाद या पंचाचार स्थळाचा
निर्णय करून, षड्स्थल या महानुभावास करूनी
करतलामलक, स्थळ करूनी निर्माण,
प्राणलिंग-लिंगप्राण हा भेद मज समजावून
सोडविलात माझे भ्रांती सूतक.
लिंगैक्याची रीत दाविले मज, तुझ्यायोगे मज लाभले
संगनबसवण्णा हे नांव कूडलसंगमदेवाच्या साक्षीनें सांगतो,
तू आहेस बा माझा परमाराध्य चन्नबसवण्णा

अनुक्रमणिका

## १२

बसवदेव हे चन्नबसवदेवाबरोबर स्वानुभावाच्या गोष्टी करीत असताना चन्नबसवदेवांची स्तुती प्रभुदेव करतात.

५०६

**तनु गुरुस करुनी अर्पित, मन लिंगास करुनी अर्पित, भाव जंगमास**
**करुनी अर्पित, निजत्व तृप्तिस करुनी अर्पित,**
**घन ज्ञानास करुनी अर्पित अर्पितचि झाले अनर्पित;**
**अनर्पित झाले अर्पित; अर्पित अनर्पित निरसून**
**झाले नित्य प्रसादि-प्रसाद मार्ग सकलाना दावून.**
**महाप्रसादाची केली अभिवृद्धि,**
**गुहेश्वराचा शरण चन्नबसवण्णानी.**

प्रभुदेवांनी अशाप्रकारे चन्नबसवदेवांची स्तुती करीत असताना चन्नबसवदेव म्हणतात. माझे शिवज्ञानाचे डोळे उघडविण्यास माझ्या प्रसादित्वास मडिवाळमाचिदेव आणि संगनबसवण्णा कारणीभूत आहेत.

५०७

**निरवयाची भक्ति तनुवर झाली स्वायत.**
**महाप्रसादही संगनबसवाच्या करस्थली झाली साकार-**
**अशा महाप्रसादाचे मज कसे बरं कळणार ?**
**मडिवाळानीं मज दाविले तेंव्हा ज्ञान स्पष्टपणें दिसले.**
**बसवण्णायोगें भक्तिचे आच्छादन स्पष्ट दिसले.**
**कूडलसंगमदेवा, मडिवाळ आणि बसवण्णानीं शेष प्रसाद**
**स्विकारण्यास दिल्याने कृपेस झालो मी पात्र**
**पहा प्रभो, असा आहे प्रसादि.**

चन्नबसवण्णांचे निरूपण ऐकून मडिवाळ माचिदेव चन्नबसवण्णांचे स्तवन करतात.

५०८

**अंग हेचि लिंग, लिंग हाचि झाला प्राण;**
**जंगम हाचि संग, संग हाचि सुसंग,**
**प्राण हाचि प्रसाद, प्रसाद हाचि प्राण होऊन-**
**या त्रिविधात असे तो संपन्न**
**समता प्रसादि, सन्नहित प्रसादि, समाधान प्रसादि**

अनुक्रमणिका

**कलिदेवा, या चन्नबसवण्णाचा प्रसाद सेवुन मी**
**जगतसे पहा प्रभो.**

मडिवाळमाचिदेव, -प्रभुदेवाना निवेदन केल्यावर प्रभुदेव-मडिवाळ माचिदेवाना पारखून पाहतात.

५०९

**कसा असतो तो भाळी डोळा, मनीं विरस, बोलणी सारी भक्तिरस !**
**कुठे आहे ज्ञान, कुठे आहे निरहंकार सांग मज ?**
**ज्ञानाच्या खुणाचे विस्मरणचि आहे वाणींत.**
**तुझ्यानें निजपद कसे साध्य होणार ! सांग बा ?**
**खूण रहित खूणास आल्यास जाणता,-**
**गुहेश्वरलिंगाठायी उभय झाल्याविण परिहार**
**नच तो प्रसाद जाण बा मडिवाळमाचिदेवा.**

प्रभुदेव-मडिवाळमाचिदेवाची स्थिती गति पारखून पहात असताना मडिवाळमाचिदेव आपल्या पूर्वापार संबंधाचा वृत्तांत कथन करतात.

५१०

**माझ्या आदिचे करावे म्हणतो कथन.**
**पण ते तुज आहे माहित-घन गंभिराठायी झाले माझे जनन.**
**माझ्या अनादिचे करावे म्हणतो कथन,**
**ते तुज आहे माहित, - मी आहे कायारहित**
**बसवण्णायोगें आलो मी मृत्युलोकी परि मज**
**देहाची नसे उपाधी देख.**
**माझा देहचि बसवण्णा, प्राण हाचि चन्नबसवण्णा, मम**
**महाज्ञानीच तुम्ही आहात जाणा !**
**अशा प्रकारें नच द्वैत त्याठायीं वाणी लपल्याची रीत**
**जाणतो तुमचा शरण बसवण्णा, हे कलिदेवरदेवा.**

मडिवाळमाचिदेव आपला पूर्वापर संबंध सांगतात, तेव्हा प्रभुदेव विचारतात.

५११

**हा गुरु, हा लिंग, हा जंगम ह्या भेदास एक करून**
**तुज कोण दाविले सांग मज ?**
**आदि-अनादिस एक करण्याचा**
**भाव- निर्भाव कोणी सांगितले तुज समजावून ?**

अनुक्रमणिका

दिक्षा-शिक्षा-स्वानुभावाची रीत दावून
निजपदाठायीं कोणी केले तुज स्थिर ?
गुहेश्वरलिंगाठायीं तुज कोणी केले बरे आयत
मज सांग बा मडिवाळमाचिदेवा.

प्रभुदेवांच्या निरूपणास मडिवाळमाचिदेवांचे प्रत्युत्तर.

५१२

झाले गुरु स्वायत, आठही भाव झाले स्वायत.
सोळा प्रकारची भक्ति झाली स्वायत
अष्टविधार्चना झाली स्वायत. या त्रिविद्याचे ज्ञान झाले स्वायत,
महालिंगाची अंतःस्थिती, महाजंगमाचे निजत्व
झाले स्वायत; शुद्ध प्रसाद तनु स्वायत झाली.
सिद्ध प्रसाद चैतन्य स्वायत झाले.
प्रसिद्ध प्रसाद मन स्वायत झाले.
वामभागात महत् याचे झाले उदय.
शिवाचारांत निरवयाचे झाले उदय.
निजस्थानांत झाले निश्चल. क्षीर स्थानकांत झाले साराय;
अनुभवात वेधिले घनागमन.
स्वानुभवात तुमच्या शरण बसवण्णास म्हणुनी नमन;
आदराने बसवण्णाचा प्रसाद केले सेवन;
तुमच्या बसवण्णाच्या प्रसादायोगें असा घन मज झाला स्वायत.
तुम्ही बसवण्णायोगे झाल्याने अशा बसवण्णास म्हणतो मी नमो नमो
हे कलिदेवरदेवा.

५१३

आदि युगात होती एक मायांगना
अनेकविध रंगाचे वस्त्र नेसून, टोपलीभर देवास डोकीवर घेऊन
म्हणत होती"अहो देव घ्या हो देव, घ्या देव"
म्हटले-तरी देव घेणारे नव्हते कोण.
मी एक कापड देऊन, घेतले ते हो त्या देवाना
मम पिता बसवण्णाच्या प्रसादायोगें जगतो जाण हे कलिदेवरदेवा.

५१४

साऱ्या भक्तिचा भेद, साऱ्या समरसाचा भेद,
साऱ्या शीलाचा भेद, ऐका हो मी सांगतो तुम्हास.

अनुक्रमणिका

ऐक बा लक्ष देऊन, तुज केला कर्ता मज केला भृत्य
हे सारे भेद केले बसवण्णानी.
आदि अनादि सहि केले बसवण्णानी.
साध्य-असाध्य केले बसवण्णानी.
लिंग, जंगम केले बसवण्णानी.
माझे सर्वस्वायतबसवण्णानी केल्याने
मी बसवण्णास आठवीत जगतोसे जाण कलिदेवरदेवा.

मडिवाळमाचीदेव बसवण्णा काय आहेत हे दर्शवीत सांगतात.

५१५

जो मृत्युलोक करितो पावन तोच होय शिव.
जो भवरोग निवारतो तोच गुरु होय.
मज पूर्ण आवरल्याने तोच होय भक्त.
अनादि संसिद्ध घन महिमा असल्यानें तोच माझा जंगम.
माझा तो प्राणलिंग झाल्यानें तोच मज लिंगस्वरूप.
तोच माझा परिधि, तोच माझा केंद्र बिंदु.
हे कलिदेवरदेवा, मज सर्व स्वायत केलेला तुमचा शरण
असे हो बसवण्णा.

५१६

ज्ञानास झाले हो मारक विस्मरण,
विस्मरणास झाली मारक माया,
मायेस झाले मारक कर्म, कर्मास मारक झाली तनु
तनुस मारक झाले संसार, याचे विस्मरण होण्याची होऊनी जाणीव,
ज्ञानास दिले तोलुन आणि घेतले मी गुरुच्या हस्ते इष्ट लिंग.
माझ्या ज्ञानास करूनी इष्टलिंगाठायी सुस्थिर
निज प्राणलिंगी केले मज तुमच्या शरण बसवण्णानीं
हे कलिदेवरदेवा.

मडिवाळमाचिदेवाचे ऐकून प्रभुदेव विचारतात.

५१७

ज्ञानोदय झाल्याविण नष्ट न होई विस्मरण.
विस्मरण नष्ट झाल्याविण ज्ञानी न होई आपण.
ज्ञान प्राप्त झाल्यावर कोण गुरू? लिंग कोण ?

अनुक्रमणिका

**सांग बा मज, कोणते घन कोणते सान ?**
**गुहेश्वरलिंगाठायीं, ज्ञान विस्मरण होऊन, उपदेश घेतल्यास पुढे**
**तरी निजत्व साध्य होणार कां ? सांग मज मडिवाळमाचिदेवा.**

प्रभुदेवास मडिवाळमाचिदेव उत्तरतात.

**५१८**

**ज्ञानाविण नच दिसे गुरू.**
**ज्ञानाविण नच दिसे लिंग, नच दिसे जंगम,**
**हे त्रिविधही बसवण्णाच्या कृपेनें मज झाले स्वायत.**
**नसे भिन्न जाण कलिदेवरदेवा.**

प्रभुदेव सांगतात.

**५१९**

**गुरू झाले स्वायत, लिंग झाले स्वायत,**
**जंगम झाले स्वायत बसवण्णायोगें म्हटल्यास,**
**तनुरहित असावे, मनरहित असावे,**
**ज्ञानी असल्याची जाण, विस्मणही दोन्ही व्हावे नष्ट.**
**गुहेश्वरलिंगाठायी निर्लेप झाल्याविण कांही नसे जाण,**
**हे मडिवाळमाचिदेव.**

मडिवाळमाचिदेवांचे प्रत्युत्तर.

**५२०**

**झाली तनु निराभार, मनास ना विव्हल,**
**भावात ना वासना, जाणात ना विचार**
**निजाठायीं ना अवधान, निर्लेप संगात**
**नच होई विभिन्न.**
**कलिदेवरदेवा, तुमच्यात झालो अभिन्न नुरे विभिन्न.**

प्रभुदेव मडिवाळमाचिदेवांना म्हणतात.

अनुक्रमणिका

५२१

**तनुत असलेला लोभ मनास चोरून बोलल्यानें,
ती तनूच मनरूप होऊन दिसत आहे.
त्या मनातल्या आकांक्षा समरति न झाल्यानें,
कामातिशय लोभांत दडलेले असते.
जाणले म्हणणें या पोकळ बोलीस न करी मान्य
आमचा गुहेश्वरलिंग, पहा मडिवाळमाचिदेवा.**

मडिवाळमाचिदेवांचे उत्तर.

५२२

**कामाच्या करस्थळी मी केला गुरू स्वायत.
क्रोधाच्या नयनी केला मी जंगम स्वायत.
लोभरहित प्रसाद करितो मी ग्रहण.
या त्रिविधांत झालो मी शुद्ध जाण.
हे कलिदेवरदेवा, वाहतो तव आण.**

५२३

**देवा, माझे अष्टविधार्चन झाले शुद्ध.
तुम्ही मूर्तिलिंग झाल्याकारणें
माझी तनु-माझे मन झाले हो शुद्ध तुम्ही जंगम झाल्यानें.
देवा, माझीं भूक झाली शुद्ध, तुमच्या प्रसाद सेवनानें.
माझे काम-क्रोध-लोभ-मोह-मद-मत्सर सारे झाले निवारण,
तुम्ही ज्ञानलिंग झाल्याकारणें
या सर्वांठायी मी सन्नहित झालो, पहा हो कलिदेवरदेवा.**

मडिवाळमाचिदेवांचे ऐकून प्रभुदेव त्यांचा समरसभाव कसास लावून पाहतात.

५२४

**तनु गुण नास्ती, मन गुण नास्ती, धन गुण नास्ती
झाले म्हणुन काय झाले ? व्हावा भाव नास्ती.
भाव नास्ती झाल्याविण जाणीव नच स्थिरावत.
ज्ञान स्थिर झाल्यानें ओलांडे खूण.
खूण निरसन मिलनाचे परम सुख
गुहेश्वरलिंगाठायीं तुज साध्य झाल्याची रीत
मज सांग तूं मडिवाळमाचिदेवा.**

अनुक्रमणिका

प्रभुदेव मडिवाळमाचिदेवांची अंतःस्थिती कसास लावून पहात असता मडिवाळमाचिदेव उत्तर देतात.

५२५

**लीय होऊन आलेली रीत,**
**अकार-उकार, मकार यांचा स्पर्श न झाल्याची रीत,**
**निर्लेपस्थल आधार असल्याची रीत,**
**तुमच्या शरण बसवण्णास असे अवगत.**
**करा विचारणा कलिदेवरदेवा.**

माझी अंतःस्थिती बसवण्णास माहीत आहे, त्यांच्याकडूनच माझी रीत कशी आहे विचारून बघा तुम्हीच म्हणून मडिवाळमाचिदेव सांगतात, तेंव्हा प्रभुदेव, बसवदेवाना विचारतात.

५२६

**मन मन होऊन एक, समरित संगाठायीं जो होई सुखी**
**ते शरणसंगसुख शरणानाच कळते विना,**
**शेजाऱ्याना कसे ते कळणार ?**
**निजगुणभरित अशा शिवशरणांची निजस्थिती**
**निरखिले म्हटल्यानें येईल का निरखिता ?**
**गुहेश्वरलिंगाठायी, मडिवाळमाचिदेवांची रीत**
**तुज आहे अवगत, मज एकदा सांग बा संगनबसवण्णा.**

प्रभुदेवाना, बसवदेव सांगतात.

५२७

**मम कायेचा अंधार निरसन कर यास मज होईना,**
**मम जीवाची स्थिती गति मज जिंकता येईना.**
**मम भावसूतक धुता येईना.**
**मज न कळे हो तुमच्या घनमहिमावंताची अंतःस्थिती.**
**कूडलसंगमनाथा, तुमचा शरण मडिवाळमाचिदेवाची**
**घनता तुम्हीच जाणता.**

बसवदेवांचे सांगणे ऐकून प्रभुदेव, बसवदेवांची रीत कशी आहे म्हणून मडिवाळमाचिदेवाना विचारतात.

अनुक्रमणिका

५२८

**युक्तिनें विचारल्यास दावितो भक्ति,**
**भक्ति विषयीं विचारल्यास दावितो मुक्ति.**
**गुहेश्वराचा शरणबसवण्णा विस्मरणाचा पडदा आड.**
**करून निसटला, बसवण्णाची रीत मज सांग मडिवाळमाचिदेव**
**नित्याची केल्यास विचारण, सरकला तो दूरदूर.**

प्रभुदेव बसवदेवांची रीत कशी आहे मज सांग म्हणून मडिवाळमाचिदेवास विचारतात. त्याना बसवदेवांचे महात्म्य मडिवाळमाचिदेव निवेदितात.

५२९

**प्रथमकाळी देवगण-महागण-किन्नरगण-आळापगण.**
**यांच्यासह संगनबसवण्णा झाला गणप्रसादि,**
**मृत्युलोकास दिव्यप्रभा आणुन दिला, केला सकलाना**
**शिवगण बसवण्णा**
**स्वरूपाचे सर्वस्व अर्पण करावे म्हटलेलाच बसवण्णा.**
**कलिदेवा, तुमचा शरण बसवण्णा असा आहे हो महिमावंत.**

५३०

**सारी विवर वर्णनें असती स्थाप्य वस्तूत.**
**सारी उक्तिउद्‌भवती तापात, क्रोधशमनार्थ निर्मिली सारे स्तोत्र.**
**मथनात होतसे प्रकट ज्ञान, सारे साकार असती प्रळयाधीन.**
**सारे गीत असती संवाद रूपात. हे कसलेही स्मरणात नसे**
**लिंगानुभावीच्या मनी. असे तो याच्या अतीत.**
**स्वतंत्र नित्य असल्यानें, तुमचा बसवण्णा असे हो रत भक्ति दासोहात.**
**कलिदेवरदेवा, असा आहे हो तुमचा बसवण्णा काल कर्म मायातीत.**

५३१

**आदि-अनादित नव्हते हो तेव्हा साध्य असाध्य,**
**स्थूल-सूक्ष्म या मूर्ति नव्हत्या तेंव्हा,**
**साकार-निराकार या शब्दांची उत्पत्ति नव्हती हो तेंव्हा,**
**शंकर-शशिधर-ईश्वर गे गणाधिश्वर नव्हते तेंव्हा,**
**उमाचे लग्न झाले नव्हते तेंव्हा,**
**शिवरति-महारति हे झाले बसवण्णायोगें**
**सर्व विस्तिर्णास निःकरून दाविला हो लिंगार्चन;**
**नित्य लिंगार्चनी असे प्रसादध्यान,**

अनुक्रमणिका

जंगमार्चनी असे प्रसाद भोग,
याचे विवर जाणतो कोण बसवण्णाविण ?
भक्तिचे कुळस्थळ, भक्तिसारायास,
यापूर्वी अतिरथ-समरथ या साऱ्याना नच अवगत,
कलिदेवरदेवा, तुमचा शरण बसवण्णा असा आहे देवा स्वतंत्र.

५३२

आकार-निराकार वदती हो सारेजण;
आकार न म्हणे, निराकार न म्हणे
लिंग-जंगम-प्रसादांत असे तो तद्वतः
कलिदेवरदेवा, असा आहे हो तुमचा बसवण्णा स्वतंत्र

५३३

दासोह, भृत्याचार ; अति प्रेम, निरहंकार नसे हो कोणात,
संगनबसवण्णाविण.
या भक्तिचे कुळस्थळ न जाणता,
सगळे जे बोलती तेच बोलत, आले आलेल्यात.
हे सारे निःकरून जंगमचि लिंग जाणून
संग साहित्य झाला बसवण्णा,
कलिदेवरदेवा, असा नित्य आहे हो तुमचा बसवण्णा.

५३४

बसवण्णांची करणी परिस, बसवण्णांची वाणी परिस.
बसवण्णांची दृष्टि परिस, बसवण्णांचा हस्त परिस.
बसवण्णांचा भाव परिस, बसवण्णांचे मन परिस.
तनु मन धन निवेदिला बसवण्णा.
बसवण्णांचे चिंतन हेच लिंगार्चन,
बसवण्णास आळविणेच परमतत्व.
बसवण्णांचे स्मरणचि मज कल्याण.
कलिदेवरदेवा, असा आहे महिमावंत तुमचा शरण बसवण्णा.

मडिवाळमाचिदेव, प्रभुदेवाना बसवदेवांचे महात्म्य वर्णन करून सांगतात. ते श्रवण करून प्रभुदेव प्रसन्न होतात. प्रभुदेव मडिवाळमाचिदेवांची आणि बसवदेवांची स्तुती करतात.

अनुक्रमणिका

५३५

**गाराचा पुतळा बिलगल्यागत, वारिधीस,**
**कर्पूर पुतळ्यास अग्नि स्पर्श केल्यापरि,**
**काळोखात प्रकाश प्रवेशिल्यापरि,**
**गुहेश्वराचा शरण मडिवाळमाचिदेवाच्या**
**कृपेनें पाहिले मी तुज बसवण्णा; तुजशी,मडिवाळाशीं पाहतो मी**
**तूच असशी म्हणून.**

प्रभुदेव, बसवदेवास मडिवाळमाचिदेवांचे वर्णन करून निरूपितात.

५३६

**अष्टतनुची घनवस्तु वितळवून**
**अतिशय भयंकर अशा काम-क्रोध-लोभ-मोह-मद-मत्सर**
**इत्यादि जाळून खाक करून,**
**तनु मलीन निवारून, मन संचलास करूनी निश्चल,**
**साऱ्या करणांची ज्ञानास देऊनी आहुती**
**नेसुनी सुज्ञान प्रभा, सुज्ञान प्रभा आंथरून, पांघरून**
**सुज्ञान प्रभा गुंडाळून, सुज्ञान प्रभा आंथरून,**
**झाला महाज्ञानाठायीं निर्भाव संपन्न.**
**अशा मडिवाळाचे सोवळ्याचा प्रसाद पांघरल्यानें झालो मी निर्मळ,**
**झालो निजैक्य, झालो निश्चिंत;**
**यायोगें गुहेश्वरलिंगाठायी अखंड अशा मडिवाळाच्या प्रसादानें**
**घनास जाणून,**
**जगतसे मी संगनबसवण्णा.**

प्रभुदेवानी, बसवदेवापुढें मडिवाळमाचिदेवांची स्तुती करीत असताना मडिवाळमाचिदेव प्रभुदेवांचे स्तवन करतात.

५३७

**लिंगैक्याच्या तळहातातील इष्टलिंग झाले विलीन त्याच्या दृष्टिंत,**
**लिगैक्याच्या मनाची जाण निर्भावात झाली लीन.**
**लिंगैक्याच्या सर्वांगनिष्ठा झाली निर्णायात्मक.**
**करूनी निजग्रहण तृप्त झाला हो लिंगैक्य.**
**परब्रह्मास अंतर्गत करून घन वेद्य झाला लिंगैक्य.**
**अशा लिंगैक्य झालेल्या प्रभुदेवाच्या श्रीपदी झालो मी मग्न**
**कलिदेवरदेवा.**

अनुक्रमणिका

मडिवाळमाचिदेवांनी प्रभुदेवांचे स्तवन बसवदेवापुढे केले तेव्हा बसवदेवांनी प्रभुदेवांपुढे मडिवाळमाचिदेवांची स्तुती केली.

५३८

हा मज गुरू होऊन करूनि उपदेश दाविला हो मज,
लिंग होऊन हा व्यापिला मन माझे,
हा प्रसाद होऊनी अवग्रहिला मम सर्वांग,
हा पादोपक होऊनी धुतला मम भितरी बाहेर.
कलिदेवरदेवा, दाविले हो मज या माहिमान्वित प्रभुदेवास
तयाच्या संगाने मी जगत आहे.

५३९

मडिवाळानी माझी काया केली हो शुद्ध.
केले माझे मन निर्मल
उजळिले मडिवाळानीं माझे अंतरंग.
सोडविले मडिवाळानी माझे बहिरंग
कूडलसंगमदेवा, तुम्हास मज योग्य होण्याजोगें केले हो मडिवाळांनी.

५४०

सूत्रधारी मनाचे मालिन्य धुण्यास्तव आला हो मडिवाळ.
माझ्या कायेचे मालिन्य आणून ठेविले मी त्याच्यापुढें,
समतारूपि नदीकाठच्या बुडकीत बुडवून घट्ट पीळ घालून पिळला.
हे देवा, अवगुणरूपि पंचेद्रियें ज्ञानरूपि निर्मल जलांत
घुसळून धुतला कापडागत. वाळविण्या घातला.
त्यास रवि-शशि-अग्नीच्या तेजात वाळविला.
चतुर्दश-षोडशरूपि घातला घडि;
समाधानरूपि पायेच्या दगडावर ठेविला.
समगुणरूपि कपडा बडवण लाकडानें बडविल्यानें
फाटले हो त्याचे पदर, झाले त्याचे तीन तुकडें,
ते तिन्ही फाटके तुकडें दिला माझ्या हातांत.
त्यातील एक कापडाचा तुकडा दिला मी गुरूस,
एक लिंगास, एक जंगमास,
ते तिन्ही तुकडे दिले हो मज एक करून,
ते पांघरून झालो मी निश्चिंत.
अशा मडिवाळाच्या कृपेनें वाचलो हो मी कूडलसंगमनाथ.

अनुक्रमणिका

५४१

**तयास म्हणती हा धोबी हा धोबी;**
**या धोबीस न जाणती कोण.**
**मलत्रयांत सापडून कष्टप्रद झालेल्या मनाचे मालिन्य**
**धुण्यास्तव घेऊन गेला हो आपल्या घरी.**
**हातानें धुवूनही स्वच्छ होत नाहीं म्हणून तुडविला तो आपल्या पायानें,**
**घुसळून धुतला कापडापरि. आपले निर्मलत्व दिले हो मज तयानें**
**दिलेले ते सोवळे वस्त्र पांघरले मी.**
**अशा मडिवाळमाचिबापाच्या कृपेनें वाचलो हो मी कूडलसंगमदेवा.**

बसवदेव, मडिवाळमाचिदेवांची स्तुती करीत असताना मडिवाळमाचिदेवानीच त्यांची स्तुती केली.

५४२

**बिंदुस निवारून, नाद तीत होऊन, कळेची प्रभा साधुन,**
**अशाध्य साधक झालास की तूं बसवण्णा,**
**करणादिरूपि वस्त्र न धारण करिता, मायेस न शिवता,**
**होऊनी निरंजन, निश्चिंत झालास बा बसवण्णा**
**मी तुज अवग्रहिल्यानें, तू मज अवग्रहिल्यानें**
**परस्पर सांदा-भेदास नुरल्यानें ठाव,**
**बसवण्णा स्तुती करण्यास असे कां हो वाव ?**
**कलिदेवरदेवही, कायाधारक असल्याचे देखिले हो बसवण्णा तुमच्यामुळे.**

मडिवाळमाचिदेव, बसवदेवांची स्तुती करीत असताना, प्रभुदेव बसवदेवाच्या कृपेने तुझी घनता मी जाणलो असे म्हणून मडिवाळमाचिदेवांची स्तुती करतात.

५४३

**आदिस पाहिले, अनादिस पाहिले;**
**घनास पाहिले, मनास पाहिले, पाहिली मी निजस्थिती.**
**पाहिले आयत-स्वायत्त-सन्निहित.**
**गुहेश्वरलिंगाठायी, बसवण्णाच्या कृपेने पाहिले तुज**
**बा मडिवाळमाचिदेवा.**

मडिवाळमाचिदेवांचे स्तवन प्रभुदेव करतात. तेव्हा मडिवाळमाचिदेव. बसवण्णाच्या कृपेने तुम्हास पाहून मी वाचलो असे प्रभुदेवास सांगतात.

अनुक्रमणिका

५४४

**हे कलिदेवा, आदिकूळ, अनादिस्थळ, जंगममूर्तीठायीं असे निश्चल.**
**मूल शुद्धाचा शेवट तुमच्या जंगम मूर्तिठायींच निश्चल.**
**उभयकुळकिरणशक्तितव जंगम मूर्तिठायीं असे हो निश्चल.**
**भाव- निर्भाव तव जंगम मूर्तिठायीच निश्चल**
**आदि अनादि हे तव जंगम मूर्तिठायीच निश्चल.**
**साध्य असाध्य हे तव जंगममूर्तिठायीं असती निश्चल.**
**अर्थ प्राण अभिमान हे तव जंगममूर्तिठायीं निश्चल.**
**अंग-लिंग-संग तव जंगममूर्तिठायीं निश्चल.**
**अष्टदळ कमळाची सप्तकर्णिका तव जंगममूर्तिठायींच निश्चल.**
**मम करणी निमाली तव जंगम मूर्तियोगें,**
**मम वाणी निरसन झाली तव जंगममूर्तियोगें.**
**मम दृष्टि झाली निवारण, तव जंगममूर्तियोगें;**
**मम कर्माचा लागला शेवट तुमच्या जंगमायोगें,**
**तुमच्या प्रसादानें झाली ही तनु.**
**बसवण्णानें मज दाविल्यानें, तुझी जंगममूर्ती देखून**
**मी जगतसे पहा हो कलिदेवरदेवा.**

मडिवाळमाचिदेव, बसवदेवांच्या तोंडुन तुमचे महात्म्य ऐकून कृतार्थ झालो म्हणून प्रभुदेवास सांगतात. तेव्हा बसवदेव सांगतात हे बघा प्रभुदेवा मी मडिवाळमाचिदेवाच्या समरस भावातच असतो.

५४५

**कल्पित निरसून, अकल्पित कथून केले समाधान.**
**मनास त्यजुन, धनाचे केले स्थापन,**
**तनुस निवारिल्यानें झाले अध्यात्मिक परिपक्व**
**अंतरंगी भरूनी महाज्ञान, बहिरंगी सदाचारास दिले स्थान.**
**मज कसोटीस लावलावुन दाविलात तुमचे स्वरूप करुनी कथन.**
**मज तुमच्या श्रीपदास योग्य**
**होण्याजोगें केलात कूडलसंगमनाथ,**
**तुमच्या 'महामनें' मडिवाळ आणि मी मिळुन**
**राहत असतो हो सुखात !**

अशा प्रकारें बसवराजदेव, आपले आणि मडिवाळमाचिदेवांचे समरस स्वानुभाव प्रभुदेवास सांगताना, मडिवाळमाचिदेव आपले व बसवदेवांचे समरसभाव निवेदितात.

५४६

**कल्याणांत प्रवेश करण्याची रीत न जाणती कोण,**
**प्रवेशूनही कल्याणाचे स्थानमान न येई हो अजमावता.**
**न लागे हो कोणासही कल्याणाचा अंत.**
**देव-दानव-मानव हे सारे कल्याण निवासी होऊन,**
**कल्याणाच्या चरित्र्यांत सामावण्याची अपेक्षा करतात.**
**कल्याणांत अनंत मूर्ति, अनंत स्थूल मूर्ति,**
**अनंत सूक्ष्म मूर्ति**
**अनंत मंत्रध्यानरूपी, पुण्याईची अभिलाषा करणारे,**
**पूजक, योगी, भोगी, समस्त,**
**द्वैती, अद्वैती, कामी, निःकामी, आश्रित-**
**हे कसे प्रवेश करू शकतील हो, कल्याणात ?**
**परि हे कसे पाहु शकतील कल्याण ? लिंगदृष्टाराविण ?**
**लिंग वेद्याविण, लिंग गंभिराविण, प्रसाद कुळान्वयाविण ?**
**तेथें आशेस नच थारा तोच कल्याण !**
**सर्वांग वर्ण निवारण, कुलमद न अंकुरता,**
**भक्ति नित्य झाल्यास तोच कल्याण !**
**या कल्याणरूपी महाघनाठायीं, बसवण्णा आणि**
**मी मिळून आहोत क्षेम पहा हो कलिदेवरदेवा.**

मडिवाळमाचिदेवांचे ऐकून, प्रभुदेव बसवदेवापुढे मडिवाळमाचिदेवांची प्रशंसा करतात.

५४७

**करावयास गेलो एक पण घडले दुसरेच म्हणतात**
**तशी झाली माझी गत !**
**मडिवाळाची रीत उकलून पाहता,**
**तुझे पूर्वापार आले जाणता,**
**तव पूर्वापराचे केल्यानें संग, मम पूर्वापर आले हो मज जाणता.**
**महाज्ञानियांच्या संगे उभयसंगसिद्धी होते ही**
**गोष्ट झाली सत्य, पहा बसवण्णा.**
**गुहेश्वराचा शरण मडिवाळाच्या श्रीपदास म्हणतो मी नमो नमो.**

प्रभुदेव,-बसवदेवाना, मडिवाळमाचिदेवांचे महात्म्य मी तुझ्यामुळें जाणलो असे सांगत असताना, बसवदेव म्हणतात मडिवाळमाचिदेवांच्या श्री चरणाची श्रेष्ठता मजला चन्नबसवण्णाने दाखविल्याने मी धन्य झालो.

अनुक्रमणिका

५४८

**देवा रे, मम कायेंत दाविला मडिवाळास.**
**मम मनी दाविले आपले निजत्व.**
**मम ज्ञानात दाविले तुम्हास.**
**या त्रिविधस्वायतास मम सर्वांगी प्रतिष्ठापन करून दाविला.**
**कूडलसंगमनाथ, चन्नबसवण्णाच्या करुणेने मज**
**झाले साध्य मडिवाळरूपि परिस.**

बसवदेवांचे ऐकून चन्नबसवदेव प्रत्युत्तर देतात.

५४९

**मज एकही न दाविता येई, मज एकही न वदता येई,**
**मज तयाच्या स्वरूपाची पातळी उंची न येई अजमाविता.**
**कूडलचेन्नसंगमनाथाठायी, मडिवाळाची निजस्थिती मज**
**कशी होईल बा अवगत, सांग मज संगनबसवण्णा.**

चन्नबसवदेव, मडिवाळमाचिदेवांचे महात्म्य वर्णन करून सांगताना मडिवाळमाचिदेव, चन्नबसवदेवांची स्तुती करतात.

५५०

**होय होय ते खरे आहे, असेच असावे निरहंकार !**
**महाज्ञानास निरहंकारच असे शृंगार.**
**निरंहकारास भक्तीच शृंगार, भक्तीस बसवण्णाच शृंगार.**
**बसवण्णास-चन्नबसवण्णाच शृंगार.**
**कलिदेवरदेवा, मजला तुजला चन्नबसवण्णाच असे हो शृंगार.**

मडिवाळमाचिदेव, चन्नबसवण्णांचे महात्म्य सांगत असताना, तेव्हा चन्नबसवदेव, मडिवाळमाचिदेवांची स्तुती करतात.

५५१

**अघटित घटित महाघन साधण्यास,**
**मडिवाळांची कृपा झाल्याविण निज लिंगैक्य कसे**
**येईल जाणता ? माझ्या आरूढ ज्ञानास तूंच असशी बा शृंगार,**
**कूडलचन्नसंगमदेवाठायी, मडिवाळांच्या हातून झालो मी**
**स्वायत पहा हे प्रभो.**

अनुक्रमणिका

चन्नबसवण्णांचे निरूपण ऐकून, मडिवाळमाचिदेव, प्रभुदेवास म्हणतात चन्नबसवण्णांची कृपा मजवर व्हावी असे साध्य करून द्यावे.

५५२

**एक हातभर म बयलु मज दिधला,**
**एक हातभर बयलु चन्नबसवण्णास दिला,**
**तुम्ही येता म्हणून आठ हजार वर्षापासून धुवून धुवून**
**करीत होतो धवल.**
**सोवळ्याचे कापड तुझ्या लिंगास दे म्हणून दिले बसवण्णास,**
**तो न देता लिंगास, गुंडाळला आपल्या डोकीस.**
**त्या सोवळ्याच्या कापडाच्या धुणीची मजुरी, गेलो मी मागण्यास,**
**तेव्हां ते कापड फाडून दिले हो मजवर फेकून**
**तू नेसलेले सोवळे, चन्नबसवण्णाच्या हातून निराकारत्व मज देण्यास**
**लावा हे प्रभो कलिदेवरदेवा.**

मडिवाळमाचिदेवांचे निरूपण ऐकून चन्नबसवदेव त्यांना प्रत्त्युतर देतात.

५५३

**नर सुरादिक समस्त होते हो तुमच्या नदीत.**
**मन-मुनी-यति, व्रती समस्त होते तुम्ही धुण्यास्तव**
**केलेल्या नदीकाठच्या बुडकीत.**
**गंगावाळुक, हे सारे लपके तुमच्या सोवळ्यात.**
**गंगागौरीवल्लभ सारे, चतुर्मुख, पंचमुख, षड्मुख, दशमुख**
**हे समस्त तुमच्या सोवळ्याच्या घडींत लपले,**
**समस्त लोकादि लोक तुमच्या उदरात आहेत.**
**कूडलचन्नसंगमदेव साक्षीनें, तुमच्या निर्गुण ब्रह्म प्रसादानें**
**देखिला मी, ऐक्याचा मार्ग,**
**मडिवाळमाचिदेवा, मी तुम्हाहून कसा होईन हो श्रेष्ठ ?**

अनुक्रमणिका

# १३

मडिवाळमाचिदेव आणि चन्नबसवदेव महानुभावाच्या गोष्टी करीत असताना सिद्धरामदेव-परमहर्षित होऊन म्हणतात.

५५४

**देवा, प्रकाश प्रकाशाचा होत असता घर्षण,**
**अंधार तेथे ठरेल का हो ?**
**शरण शरण मिळून महानुभाव गोष्टी करीत असताना,**
**जे असती तयांच्या संगात तयांचे अज्ञान होऊन**
**निवारण पावती ते निजत्व.**
**तुमच्या महानुभावांच्या स्पर्श पदरात मी राहून मी झालो परमसुखी.**
**मडिवाळांच्या चरणी झालो हो मन मग्न**
**हे प्रभो कपिलसिद्धमल्लिकार्जुन.**

सिद्धरामदेवांचे निरूपण ऐकून चन्नबसवदेव, सिद्धरामदेवांची अंतःस्थिती पाहण्याकरिता कसास लावून विचारतात.

५५५

**अंगाठायी लिंग नसेपर्यंत, प्राणाठायीं**
**लिंगपरवश कसा होता येईल ?**
**अंगत्रय जे असती ते लिंगत्रय संपन्न असावेत.**
**एकेक अंगविरहित होऊन असू शकतील का कोण ?**
**डोळ्याच्या दृष्टीस आधार कोणता हे मज सांग ना ?**
**एका अंगास सोडून एक न दिसल्याने, तारतम्य-भेद विरहित**
**मडिवाळांची निजस्थिती जाणल्याचे**
**कूडलचन्नसंगाठायीं, तुज कसे झाले साध्य सांग बा सिद्धरामदेवा ?**

चन्नबसवण्णांच्या निरूपणास सिद्धरामदेवांचे प्रत्युत्तर.

५५६

**तनु असल्याचा भाव नसे हो मनीं, मन भाव ही नसे ज्ञानात**
**ज्ञान आहे परि भाव नसे वाणीत.**
**तनु मन ज्ञान हे त्रिविध एकार्थ झाल्यावर,**
**आता कोणत्या तनुवर करू स्वायत ?**
**मम कायाचि बसवण्णा, मम प्राणलिंगचि प्रभुदेव,**

अनुक्रमणिका

**कपिलसिद्धमल्लिकार्जुनाठायी ना आंतना बाहेर**
**बा चन्नबसवण्णा.**

सिद्धरामदेवांचे सांगणे ऐकून चन्नबसवदेव विचारतात.

**५५७**

**अंग नाहीं म्हटल्यानें न सोडी अंग शंका.**
**लिंग आहे म्हटल्याने न सोडी लिंग शंका**
**जे नसल्याचे आहे, असे समजणेंच विस्मरण होय.**
**जे आहे ते नाहीं, असे म्हणणेंच विस्मरण.**
**आहे-नाहीं हे उभय नुरुनी उरल्याविण,**
**प्राणलिंग संबंध न होई हो स्वय,**
**कूडलचन्नसंगय्याठायी, प्राणलिंग संबंध तुज कसे झाले साध्य,**
**सांग बा सिद्धरामदेवा.**

चन्नबसवण्णांच्या प्रश्नास सिद्धरामदेव उत्तर देतात.

**५५८**

**तनु असुनीही नसल्यापरि तनु,**
**मन असुनीही नसल्यापरि मन,**
**भाव असुनीही नसल्यापरि भाव,**
**तू-पणा उमटल्यास न होई ते भृत्याचार,**
**मी-पणा असुनीही नसे हो अहंभाव.**
**कपिलसिद्धमल्लिनाथाठायीं, लिंगसंग निर्लेप झाल्याचे**
**शब्दाने न येई सांगता, पहा हो चन्नबसवण्णा.**

चन्नबसवदेव, सिद्धरामदेवांना कसास लावून पाहत असताना प्रभुदेव चन्नबसवण्णाना विचारतात.

**५५९**

**व्योमविहारीना कशाला हवी शिडीची पर्वा ?**
**समुद्र ओलांडणाऱ्याला कशास हवे हो नाव ?**
**सीमातीत निस्मिमास सीमेची पर्वा कशाला हवी ?**
**गुहेश्वरलिंगाठायीं निस्सीम सिद्धरामदेवास, लिंगाचे काय ते**
**सांग बा चन्नबसवण्णा.**

अनुक्रमणिका

प्रभुदेव, सिद्धरामदेवांचे महात्म्य निर्णय चन्नबसवण्णास सांगतात ते ऐकून चन्नबसववदेव आनंदाने सिद्धरामदेवांची निजलिंगैक्याची रीत वर्णन करून सांगतात.

५६०

**होय, होय ते खरे आहे !**
**अंगलिंगास हुडकतो विना, लिंग-लिंगास हुडकतो कां सांग ?**
**प्राण हा ज्ञानास हुडकतो विना, ज्ञान-ज्ञानास हुडकतो का ?**
**द्वैतभावास, एकोभाव करता येते विना, समरस झाल्यावर काय करावे लागते ?**
**कूडलचन्नसंगमदेवाठायीं, निस्सीम अशा सिद्धरामांच्या चरणी**
**करूनी वंदन झालो मी शुद्ध हे प्रभो !**

चन्नबसवदेव, सिद्धरामदेवांच्या प्राणलिंगाच्या ऐक्याची रीत निरूपण करीत असताना, सिद्धरामदेव, प्रभुदेवांच्या प्राणलिंग संबंधाची स्थितिगति कसास लावून बघतात.

५६१

**काया हीच कां लिंग; कां कायेंत प्रकटितो जो लिंग तोच लिंग ?**
**प्राणच लिंग ? कां प्राणात प्रकटित लिंग तोच लिंग ?**
**ज्ञान हाच लिंग कां ? कां ज्ञानाच्या टोकावर दिसणारे**
**प्रकाशचि लिंग**
**लिंगप्राण, प्राणलिंग हे मज नच अवगत,**
**तुमच्या कायेच्या करस्थळी प्रकटित लिंग,**
**प्राणाठायीं वेद्य झाल्याची कोणती ती रीत ?**
**सांगावे मज प्रभो कपिलसिद्धमल्लिनाथ.**

सिद्धरामदेव, प्रभुदेवाना लिंग-प्राणाचा समरसभाव विचारतात, तेव्हां प्रभुदेव आपल्या प्राणलिंगाचा संबंध सांगतात.

५६२

**अंगलिंग, प्राणलिंग, मनलिंग झाले-पहा हो !**
**झाल्यानें अंग लिंग, चाली-बोलीची गति मज नच उमजत.**
**प्राणलिंग झाल्यानें नवनाळाचे संचलन मज नाहीं उमजले.**
**मनलिंग झाल्याने स्मृति परिहार,**
**अनुभाव लिंग झाल्याने विरले हो विचार,**
**भावलिंग झाल्याने भावना पावे निरसन,**
**सर्वक्रिया लिंग झाल्याने मार्ग क्रियेची रीत मज नच अवगत.**

अनुक्रमणिका

**ज्ञान लिंग झाल्यानें नष्ट झाले हो विस्मरण.**
**अंतरंग लिंग झाल्यानें बहिरंग कसले हे नच उमजत.**
**बहिरंग लिंग झाल्यानें अंतरंग नसे मी जाणत.**
**सर्वांगलिंग झाल्यानें सर्वेंद्रियाचे गमन झाले निरसन.**
**महाघन व्यापिल्याने निष्पत्ति पावे निश्चल.**
**गुहेश्वरलिंगाठायी, प्राणलिंग स्वय झाले-पहा सिद्धरामदेवा !**

प्राणलिंगाचा संबंध प्रभुदेवानी निरुपिल्यावर सिद्धरामदेव परमहर्षित होऊन प्रभुदेवांची स्तुती करतात.

५६३

**करस्थळ लिंग दृष्टित स्थिरावले नयन,**
**त्या नयनाचे तेज लिंगाठायीं भरून**
**लिंग प्रभेंत सारे अंग होऊनी लीन,**
**संग-निस्संगाचे क्लेश निवारुन, भूत भविष्य हा भाव निरसून,**
**अचल निज निराकारात प्राण समरति पावून,**
**कपिलसिद्धमल्लिनाथाठायीं, प्रभुदेवांच्या चरणास**
**नमो नमो म्हणून, मी जगत आहे हो चन्नबसवण्णा.**

सिद्धरामदेव, चन्नबसवण्णाना प्रभुदेवांचे महात्म्य वाखाणणी करून सांगतात, ते ऐकून चन्नबसवदेव-प्रभुदेवांची स्तुती करतात.

५६४

**कायारूपि आड पडदा नसे हो झाल्यानें प्राणविरहित.**
**अनुभावरहित झाल्यानें, मनाचे नुरे स्मरण.**
**अन्य भाव नुरुनी, विरले हो ज्ञान खूण.**
**कूडलचेन्नसंगमदेवाठायी, प्रभुदेव पदी नमो नमो म्हणून मी**
**जगत आहे बा सिद्धरामदेवा.**

चेन्नबसवदेव, प्रभुदेवांचे चरित्रस्तोत्र करीत असताना, चन्नबसवण्णांचे स्तोत्र प्रभुदेव करतात.

५६५

**उदयमुखाचे अनुभाव, गगन पवनावरच्या,**
**मदोन्मत्त हत्तीस थांबविणारा आला हो माहुत,**
**अष्टदळ कमळामधील सृष्टि तो अंकुराच्या बहुविधास पायतळी**
**तुडवून,**

अनुक्रमणिका

**उभा टाकल्यानें निश्चल, परमयोगी झाल्याविण राहील का ?**
**शून्यास आणुनी आकारास, छायेस करितसे शृंगार,**
**अशा गुहेश्वराचा शरण चन्नबसवण्णास करितो मी नमन.**

**५६६**

**ऐरावत दडला हो मदोन्मत हत्तीत, सुप्रभा नव कमळ,**
**नच येई साधता भाव परिमळ**
**मस्तावलेल्या भृंगाचे चलनवलन सूक्ष्म झाल्याविना,**
**भृंग रत्न गिळल्याची रीत ती कोणती ? कशी बरे झाली साध्य ?**
**सुख संभाषण गुहेश्वर शरण चन्नबसवण्णास.**

प्रभुदेव चन्नबसवण्णास स्तवित असताना, बसवदेव, आपणही स्तवन करतात.

**५६७**

**इंद्र-व्यास-उपेंद्राचे दरबार, न जाणिले चंद्रमोळीस,**
**बंधन मोक्ष झाल्यानें, भवबंधन सोडीपर्यंत, दुसरेच मुख झाले**
**की हो जनन ?**
**कूडलसंगमनाथ, चनबसवण्णाच्या सानिध्यांत आहे हो मी जगत.**

**५६८**

**प्रसादीचे प्रसाद लाभलेल्या प्रसादीस मी कोणती देऊ उपमा ?**
**त्याची स्तुती कशी बरे करू मी ?**
**प्रसादास महाप्रसादी झालेल्या त्या प्रसादीस ?**
**अगम्य प्रसादाठायीं झाला तो स्वायत**
**कूडलसंगमदेवाठायीं, म्हणतो मी चन्नबसवण्णास नमो नमो.**

बसवदेव, चन्नबसवदेवांचे स्तोत्र करीत असताना बसवदेवांचे स्तोत्र चन्नबसवण्णा करतात.

**५६९**

**देवा, घनगंभिर अशा समुद्राच्या आत एक रत्न झाल्यास उत्पन्न.**
**ते त्या समुद्रातच लपून राहतेविनात्यास समुद्राहून मोठे**
**होऊन दाखविता येते का ?**
**तुमच्या करुण कटाक्षानें होऊनी उदय,**
**अनंत लिंगपुराण, समस्त तव कृपेनें मज झाले हो साध्य.**
**आदि-अनादि नव्हते तेव्हां तू एकटाच होतास प्रसादि.**

अनुक्रमणिका

**उमाचा विवाह झाला नव्हता तेव्हां तूं एकटाच प्रसादि होतास.**
**कूडलचन्नसंगाच्या साक्षीनें, बसवण्णा मी आहे तुमचा**
**दासानुदासाचा लेक.**

५७०

**तनु गुरूठायीं झिजविली, मन लिंगाठायी झिजविले.**
**धन जंगमाठायी झिजवून;**
**तनु झाली गुरू, मन झाले लिंग, धन झाले जंगम-**
**हे त्रिविध झाल्याने सुस्थिर तो झाला निजभरित.**
**कायक धरूनी झाला कर्मविरहित;**
**कूडलचन्नसंगमनाथाठायीं, संगनबसवण्णास म्हणतो मी नमो नमो.**

चन्नबसवदेव, बसवदेवांची स्तुती करीत असताना मडिवाळमाचिदेवही स्तुती करतात.

५७१

**तळपायीं डोळ्याचा होता येते परि-**
**शरीरभर डोळ्याचा होता न येई.**
**शरीरभर डोळ्याचा होता येते परि, भाळनेत्र चतुर्भुज होता न येई**
**भाळनेत्र चतुर्भुज होता येते परि,**
**पंचमुख दशभुज होता न येई.**
**पंचमुख दशभुज होता येते परि, सर्वांगलिंगी होता न येई.**
**सर्वांगलिंगी होता येते परि हे कलिदेवा,**
**तुमचा शरण बसवण्णा होता न येई,**
**हे जाणून त्या बसवण्णाच्या श्रीपदास म्हणतो मी नमो नमो.**

मडिवाळमाचिदेवांचे स्तोत्र ऐकून बसवदेव मडिवाळमाचिदेवांचे स्तोत्र करतात.

५७२

**भक्ति-युक्ति  मज नाहीं कळत, षोडशोपचार मज नाहीं कळत.**
**भाव-निर्भाव नाहीं समजत, ज्ञान महाज्ञान नाहीं कळत.**
**कूडलसंगमनाथ, म्हणतो मी मडिवाळ अप्पाच्या चरणी नमो नमो.**

बसवदेवानी मडिवाळमाचिदेवांचे स्तोत्र केल्यावर मडिवाळमाचिदेव,बसवदेव, चन्नबसवदेव आणि प्रभुदेव या तिघांचे स्तोत्र करतात.

अनुक्रमणिका

५७३

**मम मन बसवण्णा, मम वाणी चन्नबसवण्णा,**
**मम काया प्रभुदेव.**
**या तिघांच्या चरणी त्रिकरण शुद्धिनें ठेवुनी श्रद्धा**
**नमो नमो म्हणतो मी कलिदेवरदेवा.**

मडिवाळमाचिदेव, बसवण्णा, चन्नबसवण्णा प्रभुदेव या तिघांचे स्तोत्र करतात, तेव्हां चन्नबसवण्णा हे बसवण्णा, प्रभुदेव आणि मडिवाळमाचिदेवांचे स्तोत्र करतात.

५७४

**मम अंतरंग बसवण्णा, मम बहिरंग मडिवाळ,**
**या उभयतांचे संग हेच प्रभुदेव.**
**या तिघांच्या कृपेचा शिशु होऊन मी जगतसे पहा.**
**कूडलचन्नसंगमदेवा.**

चन्नबसवण्णांनी बसवण्णा, मडिवाळमाचिदेव आणि प्रभुदेवांचे स्तोत्र केल्यावर, बसवदेव प्रभुदेव आणि मडिवाळमाचिदेवांची स्तुती करतात.

५७५

**पाहिला मी मम करस्थली अल्लमप्रभुदेव.**
**पाहिला मी मम मनीच्या करस्थली चन्नबसवदेव.**
**पाहिला मम ज्ञानकरस्थली मडिवाळमाचण्णा.**
**आत बाहेर बाहेर आत हा भेद नसे माझ्यात,**
**तुमच्या सांगण्याप्रमाणे आहे मी राहत,**
**तुमच्या शरणानीं केल्यानें पावन, हे कूडलसंगमनाथ,**
**त्या अत्यानंदाच्या भरांत मुग्ध होऊन म्हणतो मी नमो नमो.**

बसवदेवानीं चन्नबसवदेव, प्रभुदेव, मडिवाळमाचिदेव यांची स्तुती केली, तेव्हा प्रभुदेवांनी बसवण्णा, चन्नबसवण्णा, मडिवाळमाचिदेवांची स्तुती केली.

५७६

**मम कायेस बसवण्णानी घेतले सामावून ;**
**मम मनास चन्नबसवण्णानीं घेतले सामावून;**
**मम भाव मडिवाळानी घेतले सामावून;**
**या तिघानी एकेक सामावून घेतल्यानें गुहेश्वरा,**

अनुक्रमणिका

**तुमचे शरणरूपि त्रिमूर्तींना म्हणतो मी नमो नमो.**

प्रभुदेवांनी या तिघांचे स्तोत्र केल्यावर सिद्धरामदेव परम हर्षित होऊन प्रभुदेवांची स्तुती करतात.

**५७७**

**हे देवा, तुमच्या निष्ठा प्रितीच्या शरण संगात मज ठेवून**
**मी-पण नाहींसा केलात**
**अहा ! तुमच्या करुणेस देऊ कोणती उपमा ?**
**दोन्ही नगरास तुडवून पहात आहे वरची नगरी**
**वरची नगरी भेदिताच तूच मी झालो.**
**देवा कपिलसिद्धमल्लिनाथा, तुमचा शरण प्रभुदेवांच्या**
**करूणेनें मी धन्य झालो.**

सिद्धरामदेव चन्नबसवण्णांची स्तुती करतात.

**५७८**

**हे देवा, तीन नगरीच्या वरच्या माळ्याच्या कामाची कशी**
**करू वाखाणणी ?**
**मोत्याच्या कळसावर एक फुललेला पुष्पाकाराचा अग्नि**
**मी पाहिला, कपिलसिद्धमल्लिनाथा,**
**तुमच्या शरण बसवण्णानी दाखविलेली वाट मज लाभले हो सुपथ**
**मी म्हणतो चन्नबसवण्णा तुज नमो नमो.**

**५७९**

**हे देवा, तुमचा शरण बसवण्णायोगें पाहुनि लिंग**
**झाकळून ठेवून घेतले अंतरंगात,**
**तुमच्या शरण बसवण्णायोगे लिंगासच घेतले आंथरून पांघरून.**
**तुमचा शरण बसवण्णायोगे झालो मी निरवय.**
**हे देवा कपिलसिद्धमल्लिनाथा, तुमचा शरण बसवण्णास नमो नमो.**

सिद्धरामदेव मडिवाळमाचिदेवांचे स्तवन करतात.

**५८०**

**हे देवा, तयास ठाऊक गारुड, परि तो नच हो गारुडी,**
**मम मनी असलेले शंकारूपि विष,**

अनुक्रमणिका

**गारुडी विष वैद्य होऊन उतरवून मज केले निःशंक**
**कपिलसिद्धमल्लिनाथा, मडिवाळमाचण्णांच्या**
**पदी म्हणतो मी नमो नमो.**

मडिवाळ माचिदेव सिद्धरामदेवांची स्तुती करतात.

**५८१**

**बहिणी बहिणी पांचीजणी, झाल्या त्या एका धन्याच्या राणी.**
**धाकटी संगे करीत असता संभोग, थोरली होई कुंटीणी.**
**थोरली संगे करीत असता संभोग, धाकटी होई कुंटीणी.**
**या दोघीसंगे संभोग वेगवेगळे करता येईना म्हणून,**
**दोघीसंगे एकाच वेळी केले संभोग.**
**एकीनें डोळे केले लाल, दुसरीनें सांगितले बुद्धिवाद**
**तिसरीनें दिले हो अंथरून.**
**या पांचीजणीना कवटाळून, संभोगिले एकाच वेळी.**
**त्यायोगें झाले पाण्यात पाणी मिसळल्यागत.**
**हे कलिदेवा, तुमचा शरण सिद्धरामदेवानी, मज हा**
**मार्ग शिकवून, ठेवले निजनिवासात, मी म्हणतो तयाना नमो नमो**

# १४

प्रभुदेव, बसवदेव, चन्नबसवदेव, मडिवाळमाचिदेव, सिद्धरामदेव हे सगळे महानुभाव गोष्टी करीत असताना, त्यांच्या शेजारी बसलेले सोड्डुळवाचरस, हडपदअप्पण्णा, पडिहारी उत्तण्णा, अक्कनागलांबिका, मोळिगे मारय्या, डोहर कक्कय्या, किन्नरी बोम्मय्या, कन्नदमारण्णा, मिंडमल्लिनाथ, कोल शांतय्या, ओलगद केशिराजदेव, खंडनेय केशिराजदेव, मुख्यत्वे करून असंख्यात गणवृंद महानुभाव नित्य निजतत्त्वांत समरस होऊन परमानंदात विरमत असतात.

इकडे परमेश्वराच्या आज्ञेनुसार एका रुद्रकन्येनें मृत्युलोकी अवतार घेतला. उड्डुतडीची महादेवीअक्का असे तिने नाव धारण करून, भविचेआमिष त्यजुन, दुराग्रह तुडवून लिंगसंगात अविरल संगी झाली. ती दिव्यरूप लावण्यसंपन्न असलेली सोळा वर्षाची नवयुवती, आपल्या नवयौवनाच्या सुखाची सुगी शिवाठायी करण्याकरिता परवश होऊन सर्वसंग परित्याग करते. दिगंबरी होऊन आपल्या केसरूपि वस्त्राने अंग झाकते. आपल्या करस्थळाच्या इष्टलिंगाठायी दृष्टिरोखून, मनजोडुन, भावकरूनी निश्चल, लौकिक लज्जाभिमान सोडून दिला हा भवसागर ओलांडून चन्नमल्लिकार्जुन देवाच्या विकळावस्थेने स्वतःचे भान हरपते. इतर नाते तोडले जातात. अक्कमहादेवी अशा अवस्थेत संचार करीत असताना वाटेत किन्नरी बोम्मीबाया विरती पारखून पाहतात.त्यांना अतीव आनंद होतो, अंतरंगाच्या ज्ञानग्निने कायेस जाळून केलेले भस्म अक्कमहादेवीने सर्वांगी लाविले होते. सगळ्यांचा निरोप घेऊन कल्याणाकडे अभिमुख करून येतात. कल्याणास पाहून महादेवी अक्काम्हणतात.

५८२

**या कल्याणात प्रविशिण्यास येते कां हो कोणासही ?**
**न येई हो प्रवेशण्यास, न येई असे ते असाध्य.**
**आशा आमिष त्याजिल्याविना, न येई हो पाय ठेवण्या.**
**आत बाहेर शुद्ध झालेल्याविना, न येई कल्याण प्रवेशिण्या.**
**तू-मी पणा निरसल्याविना, कल्याणाच्या आतील न कळे कोणा.**
**चन्नमल्लेशास करूनी प्रसन्न, उभय लज्ञात निवारून,**
**नमो नमो म्हणते हो मी पाहुनी कल्याण.**

कल्याणनगर पाहून प्रवेश करताना अक्कमहादेवी बसवदेवांची महिमा वाखाणतात.

५८३

**देवा, तुमचे शरण तुडविलेली ही धरणी असे हो पावन.**
**देवा रे, तुमच्या शरणांचे वासस्थान कैलासपुरी जाण.**
**देवा, तुमच्या शरणांचे ठाव हेचि निजनिवास.**
**चन्नमल्लिकार्जुना, तुमचा शरण बसवण्णा जेथें करितो वास,**
**ते क्षेत्रचि अविमुक्ति क्षेत्र झाल्यानें**
**मी बसवण्णांच्या श्रीपदी म्हणतो नमो नमो.**

अनुक्रमणिका

बसवदेवांचे माहात्म्य वाखाणणी करीत अक्कमहादेवी बसवदेवांच्या निजनिवासात येतात. तेथे प्रभुदेव मुख्यत्वेकरून असंख्य प्रमथगणांचा समूह होता. त्यात परमानंद संगात संगनबसवण्णांची श्रीमूर्ति पाहून अक्कमहादेवी म्हणतात.

**५८४**

**धुंडीत फिरले तरी नच साध्य, कष्टानें हुडकत तळमळल्यासही**
**नच होई साध्य.**
**आशेनें प्रवेशिले तरी नच साध्य, तप आचरणानें नच साध्य.**
**ते आपसुख प्राप्त  होण्याचा काळ न येता नच होई हो साध्य.**
**शिव प्रसन्न झाल्याविण न येई हाता.**
**माझा चन्नमल्लिकार्जुन मज झाला हो वश, त्यायोगे,**
**मी संगनबसवण्णांचे श्रीचरण पाहून जगले.**

**५८५**

**हे देवा, मी सज्ञन शरणांचे सद्भभाव पाहिल्यानें,**
**आज माझ्या डोळ्याचे फाटले पटल.**
**देवा रे, तुमच्या सज्ञन सद्भभावांच्या श्री चरणास करूनी वंदन**
**माझ्या कपाळाचे लिखित गेले हो पुसुन.**
**चेन्नमल्लिकार्जुना, तुमचा शरण संगनबसवण्णाचे श्री चरण पाहून**
**म्हणते मी नमो नमो.**

महादेवीअक्का, बसवदेवांच्या श्रीपदास वंदन करून हात जोडून उभे राहतात. तेव्हा बसवदेव, महादेवीअक्काना पाहून प्रभुदेवाना दाखवित सांगतात.

**५८६**

**काया लज्ञेच्या कल्पितास निपटुन, जीव लज्ञेचा मोह निरसून,**
**मन लज्ञेचे भान करूनि दहन.**
**भाव संयोग नग्न असल्याचे जाणून,**
**तल्लिनतेचा स्नेह व्यवहारात न येई गोवता.**
**बा कूडलसंगमनाथा,**
**माझी जन्मदात्री आई महादेवीअक्कांची निजस्थिती**
**करावे अवलोकन हे प्रभो.**

अनुक्रमणिका

### ५८७

**रूपरहितास जे करिती प्रसन्न तयाना तनुचा आधार कशास हवा ?**
**मनविरहितास जे झाले वश, तयाना हवी कशाला लज्रा ,**
**अभिमान ? जे दिगंबरास करिती प्रसन्न, कशाला हवे तयाना कौपिन ?**
**बा कूडलसंगमनाथ, महादेवीअक्काया भक्तिणीस**
**कसलाही नसे हो व्याप पहा प्रभो.**

बसवदेव, प्रभुदेवाना महादेवीअक्कांची अंतःस्थिती विवर करून सांगतात. तेव्हा प्रभुदेव, महादेवीअक्काना अनुभाव मुखाद्वारे विचारतात.

### ५८८

**तू आहेस नवयुवती इथे का आलीस हे सति.**
**सति म्हटल्यास आमचे शरण रागावती.**
**सांगितल्यास तुझ्या पतिची खूण, बैस इथे येऊन,**
**हे माते, ना तरी जा परतुन.**
**आमच्या गुहेश्वर शरणांचे संगसुख सानिध्य अपेक्षिल्यास**
**हे माते, तुझा पति कोण आहे सांग आम्हास.**

प्रभुदेवांच्या प्रश्नास महादेवीआक्का आपल्या पतिचे चिन्ह सांगतात.

### ५८९

**गुरू झाला वधुकडचा, लिंगदेव हाच वर,**
**मीच झाले त्याची वधु.**
**या भुलोकीचे समस्त शरणगण माझे आई बाप.**
**त्यानी मज दिले प्रभुच्या घरी सादृश्य वर पाहून.**
**या कारणें मम पति चन्नमल्लिकार्जून.**
**इतर या लोकीच्याशी माझे नसे हो नाते हे प्रभो !**

### ५९०

**तयास ना मरण, ना हानी, ना रूप असा तो सुंदर,**
**ना भव, ना भय, अशा निर्भय मनोहरास झाले हो मी वश.**
**चन्नमल्लिकार्जुन असे माझा पति,**
**देवा, इतर लौकिकाशी नाही माझे नाते.**

अनुक्रमणिका

महादेवीअक्कांचे ऐकून प्रभुदेव त्यांचे म्हणणे खोडून काढतात.

५९१

**रूप असे नाशिवंत, निरूप असे शाश्वत.**
**रूप निरूपाच्या लग्नाची रीत ती कोणती ?**
**सांग मज, संबंध असंबंध होऊन**
**या देहेंद्रियांचे जाति सूतक असल्यानें**
**गुहेश्वर लिंगाशी कसा घडे संपर्क आई ग ऐक.**

प्रभुदेवांच्या निरूपणास महादेवीआक्का उत्तर देतात.

५९२

**काढुनी सापाचे दात, आल्यास तया खेळविता,**
**सापाच्या संगच असे हो बरवा.**
**कायागुण करता आल्यास विवरण.**
**कायेचा संगचि असे बरवा !**
**आई राक्षसी झाल्यापरि असे कायाविकारी,**
**चन्नमल्लिकार्जुना तू वश झालेल्याना नका म्हणू हो कायाधारी.**

प्रभुदेव या म्हणण्यास उत्तरतात.

५९३

**तनुगुण विवरिले म्हटल्यास असावे हो मन शुद्ध.**
**मनगुण विवरिले म्हटल्यास, असावेत इंद्रिये शुद्ध.**
**तनु-मन-समस्त इंद्रियेशुद्ध पाक सिद्ध होऊन**
**लिंगमुखास वेध झाल्याविण, गुहेश्वरलिंगाठायी,**
**एक न होता येई, ऐक ग आई !**

महादेवीआक्काचे प्रत्युत्तर.

५९४

**झाली माझी शुद्ध तनु, भक्तांचे शेष प्रसाद सेवुन.**
**झाले हो शुद्धमन, असंख्यांताचे करूनि चिंतन.**
**झाले माझे नयन शुद्ध, घडल्यानें सकल शिवगणांचे दर्शन.**
**झाले हो कर्ण शुद्ध, केल्यानें त्यांची किर्ती श्रवण.**

अनुक्रमणिका

**भावनाची मम जीवन, ऐक बा लिंगबापा !**
**अनन्यभावे तुम्हास पूजुन, झाले हो मम भवहरण.**
**देवाचन्नमल्लिकार्जुना.**

मदेवीअक्कास प्रभूदेव सांगतात.

**५९५**

**केवळ काया शुद्ध झाली म्हटल्यानें नच होई तेथे लिंग वास.**
**झाले मम जीव शुद्ध म्हटल्यास नच तेथे लिंग वास.**
**झाले मम भाव शुद्ध म्हटल्यास नच लिंगवास.**
**गुहेश्वरलिंगाठायीं शुद्ध पक्कान्न सिद्ध झाले म्हटल्यास**
**निज न होई साध्य, ऐक ग आई.**

महादेवीआक्कांचे प्रत्युत्तर

**५९६**

**कायेत झाली अकायस्थिती.**
**जीवाठायी झाली निर्जीव स्थिती.**
**भावाठायीं झाले निर्भाव, मम मनी महाघन चिंतन.**
**मम नारीरूप देखूनहि केल्यानें पावन.**
**मी आहे हो तुमच्या धर्माची बा चन्नमल्लिकार्जूना**

प्रभुदेव पुसतात.

**५९७**

**ना संयोग ना अंतरे ऐशा घनास कसे म्हणता येई संयोग.**
**हे माते ! तयाची रीत कोणती सांग ? मज ?**
**सांगितल्यास त्यास तेच न्यून्य.**
**गुहेश्वरलिंगास करुनी भिन्न, संयोगाची रीत ती कोणती ?**

महादेवीआक्का-सांगतात.

**५९८**

**अंगसंगाठायी झाले मी लिंगसंगी.**
**लिंगसंगाठायी झाले हो अंगसंगी.**

**अनुक्रमणिका**

**उभयसंग न जाणतां संपादिले मी अनुभाव.**
**शब्दाडंबर झाल्यानें विस्मरण, आहे मी अविरळ पूर्ण.**
**मम देव चन्नमल्लिनाथाठायीं समरस झाल्यावर,**
**प्रभो, मीपणा मुळींच न उरे.**

प्रभुदेवाबरोबर, अक्कामहादेवी चर्चा करीत असताना बसवदेव आक्कास विचारतात.

**५९९**

**अंगाठायी लिंग संग, लिंगाठायी अंग संग केले म्हटल्यास**
**त्या उभयभेदाचे तारतम्य निवारल्याची रीत ती कोणती सांग.**
**माते ? अंगाठायी लिंग संग केले म्हटल्यास पुढचे कांहीच न**
**दिसण्याजोगे करुनी छळितो शिव**
**कामरुपि वासनें ते दुःखी कष्टी करतो शिव.**
**आणुनी लिंगाठायीं अंगास निक्षेपिले म्हटल्यास,**
**होऊनी अंगापासुन अलग, दूरदूर सरकून पाहतो गे माते शिव.**
**स्त्री ( प्रकृति ) पुरुष झाल्यास होतो वश शिव !**
**कूडलसंगय्यात एकरुप होण्यास अभिन्न भावें**
**वीर व्हावे लागते, करी श्रवण हे माते.**

अक्का विनयानें सांगतात.

**६००**

**कामारीस जिंकिले मी बसवण्णा तुमच्या दयेने.**
**सोमधरास बिलगिले बसवण्णा तुमच्या बलानें**
**नामात असे हो स्त्रीरुप परि भाविल्यास असे मी पुरुषरुप,**
**पहा हो बसवण्णा ! तुमच्या सामर्थ्यानें**
**अतिकामी चन्नमल्लिकार्जुनास घालुनी प्रेमपाशात झाले हो समरस**
**द्वैतभावाचे झाले हो विस्मरण, हे बसवण्णा तव दयेने !**

अक्कमहादेवी सांगतात.-अंगविकारास मी जिंकले, लिंगास माझ्यात दृढ करून, सर्वांगात ऐक्य करून निजवीर होऊन मी जिंकले.

**६०१**

**भावनेनें पाहिल्यास ते असे हो अंग.**
**अंगगुण नुरुनी उरल्यावर मी झाले तव अंग.**
**भिन्नाची रुचि निरसुन, झाल्यावर लिंगरुचि**

अनुक्रमणिका

**चन्नमल्लिकार्जुनास करुनी निनमि, मी झाले नाहींसे हेचि हो प्रमाण**

बसवदेव आक्कास विचारतात.

६०२

**नच नाशवंत, नच तो अविनाशि, प्रळयाची मुळीच ना जाण तयास.**
**कळाकुळरहित, उभयकुळविरहित.**
**ज्ञान झाकळून, मिरविणारा ! नच गमनी तो.**
**कूडलसंगमदेव हा असे शब्दमुग्ध, तयास भाव**
**प्रयासानें येईल कां जिंकता सांग माते !**

महादेवीआक्का सांगतात.

६०३

**अंगात होऊनी अंग, केले मी अंगलिंगैक्य.**
**मनात होऊन मन, केले मी मन लिंगैक्य.**
**भावात होऊनी भाव, केले मी भावलिंगैक्य.**
**जाणांत होऊनी जाणकार, झाले मी ज्ञानलिंगैक्य.**
**समस्त क्रिया करूनि स्थिर, निःक्रियातीत होऊन पावले मी निष्पत्ति**
**लिंगैक्य, मीपण करुनी निश्चल,तू पण निवारून,**
**केले हो उभय लिंगैक्य.**
**चन्नमल्लिकार्जुनाच्या अंतरी मी नच उरले.**
**याकारणें लिंगरूपि घन ममठायी नच उरे पहा हो संगनबसवण्णा.**

महादेवीआक्कांचे अनुभाव बसवदेवास पटले, ते वाखाणतात.

६०४

**बाळीचे अंग पहा हो पुरातनानो.**
**बालभावाचे अंग पहा हो पुरातनानो.**
**ब्रह्माचरणानें, स्वयाचे ना स्मरण तिच पहा हो सकल लिंगवंत**
**आपल्याठायीं आपणास करुनी निश्चल,**
**आपल्या प्रतिज्ञानुसार वागणूक असे हो,**
**आमच्या महादेवीअक्कांची कूडलसंगमदेवाठायी.**

महादेवीअक्का विनयाने सांगतात.

६०५

**ममभक्ती तव धर्म ( कारूण्य ), मम ज्ञान प्रभूदेवांचा धर्म**
**मम आनंदातिशय चन्नबसवण्णाचा धर्म.**
**या तिघानी मज दिले एकेक, झाले त्यायोगे तीन भाव.**
**त्या तिन्हीसही तवठायीं केल्याने समर्पण**
**मज कसलाही नच प्रयास, माझ्या चन्नमल्लिकार्जुन देवाच्या**
**स्मरणात रमल्यानें तुझ्या कारुण्याची**
**शिशु झाले जाण, बा संगनबसवण्णा**

महादेवीआक्कांचें अनुभाव ऐकून प्रभुदेव नमस्कार करतात.

६०६

**म्हणती आदिशक्ति-अनादिशक्ति,**
**आदि म्हटल्यास आली ती चिन्हास**
**अनादि म्हटल्याने आली नामास नच आदि, नच ती अनादि**
**नामरहित, सीमारहित निजशक्तिच चित्शक्ति झाली ती पहा**
**अंतरंग प्रभा सकल बहिरंगी आवणचि झाली**
**गुहेश्वरलिंगाठायी झाली हो भेदभाव विरहित**
**अशा महादेवी आक्कांच्या श्रीपदास म्हणतो मी नमो नमो.**

महादेवीआक्का निरहंकाराने वदतात.

६०७

**तू आहेस नीरक्षीरागत**
**कोणते मूळ, कोणते मागावून हे मज न कळे**
**कोण कर्ता, कोण भृत्य हे हीन कळे-**
**कोणते धन, कोणते सान हे ही न कळे**
**देवा चन्नमल्लिकार्जूना तू होऊनी प्रसन्न वाखाणल्यास,**
**जीवनरुद्र झाल्याविण राहील का ? तूंच सांग बा मज !**

महादेवीआक्कांची नम्रता पाहून चन्नबसवदेव प्रसन्न होऊन स्तवितात.

६०८

**अजकल्पकोटी वर्ष जगणारे सारे होतील कां हो वडीलधारे ?**
**त्यांच्यावरती वारूळ चढून, त्यावर वाढला जरी वेळू तरी ते**

अनुक्रमणिका

**सारे होतील का तपस्वी, वडिलधारे ?**
**वाकली कंबर, पोकरली छाती, कापतसे शिर थरथर,**
**केस होऊनी पांढरे होती ते मतिहीन,**
**वाचाळ-अजाण सारे होतील कां हो वडिलधारे ?**
**अंतःस्थितीची जाण, घन सामावून, थोर-लहान हा भेद विसरून,**
**कूडलचन्नसंगाठायी, एक होऊन नुरे दुजेपण, लाभले हो थोरपण,**
**आमच्या महादेवी आक्कास.**

सिद्धरामदेवही महादेवीआक्कांचे स्तवन करतात.

**६०९**

**हां हां दुसरे काय ?**
**अज्ञानास असे थोर लहान, ज्ञानास असे का थोर पण लहान ?**
**मरणाऱ्यास असे भयविण, अजातास असे कां हो भय सांगा मज ?**
**कपिलसिद्धमलिकार्जूना, महादेवीआक्कांच्या निजस्थितीस**
**करूनी वंदन, झालो मी धन्य पहा हो चन्नबसवण्णा.**

सिद्धरामदेव, अक्कामहादेवींची स्तुती करीत असताना, त्या आपले ऐक्यस्थान कोणते आहे सांगा म्हणून प्रभुदेवास विचारतात.

**६१०**

**लिंगसुख संगी झाले मम मन वेद्य.**
**आता मजकुठचे हो तुमच्यात निरवय ?**
**आता कुठे उरले तुमच्यात समरस होणे ?**
**परमसुख परमानंदास मनाची सीमा ओलांडली हो !**
**मज निजत्व पावण्याचे ठाव कोठे आहे सांगा हो चन्नमल्लिकार्जुना ?**

महादेवी आक्का, माझ्या लिंगैक्याचे स्थान-काल-स्थिती कोणती आहे ते मज सांगावे म्हणून प्रभुदेवास विचारतात. तेव्हा प्रभुदेव तो काळ, स्थान समरसाचे निरूपण करतात.

**६११**

**तू मी हा उभयसंग निवारून आपण आपणचहोऊन,**
**त्रिकूटरूपि महागिरीवरील अग्र तुडवून पाहतां,**
**दिसे पहा निशून्य सर्वशून्य**
**त्या निशून्यांत समरस झाल्यास, त्रिकूट गिरींत**
**असे एक अदृश्य केळीचे बन बघ माते.**

अनुक्रमणिका

**कदळीवन ओलांडून आत प्रवेशून पाहता,**
**तेथें दिसे तेजोमय उजळती ज्योत, ऐक माते चल तू तेथे.**
**गुहेश्वरलिंगाठायी, परमपदवी तुज लाभे पहा स्वय.**

प्रभुदेवानी निरुपण केल्यावर, महदेवीआक्का हर्षभरित होऊन प्रभुदेव मुख्यत्वेकरून समस्त पुरातनांचा निरोप घेतात.

६१२

**तनु रहित, वाणी विरहित, तयास ना अंत अशा पतिसंगे**
**होऊनी एक, झाले हो मी सुखी ऐका हो सारे शरणगण.**
**प्रतिज्ञेस नाहीं हो मी चुकत,काढुनी टाकले अन्य.**
**नाहीं हो आशा मज कसल्याही भिन्नसुखाची**
**साहीचे झाले तीन, तीनीचे झाले दोन,**
**दोनीचे होऊनी एक झाले, झाले हो मी निश्चल !**
**बसवण्णा आदि सकल शरणाना शरणार्थि,**
**प्रभुयोगें झाले हो मी कृतकृत्य.**
**मज नका हो विसरू मी आहे तुमचे लेकरू चन्नमल्लिकार्जुनाठायीं**
**एक होण्यास्तव मज आशिर्वाद द्यावा.**

मडिवाळमाचिदेव तेव्हां महादेवीआक्कांची स्तुती करतात.

६१३

**एकाग्र दृष्टि झाली करस्थली प्राण;**
**अंगविकार झाले निर्विकार संगसुख झाले निःसंग.**
**बालिकेचा भाव विरलाशून्यात.**
**कलिदेवरदेवा, तुम्हास करूनी प्रसन्न झाली हो तवसमान**
**अशा महादेवीआक्कांचे पद स्मरून वाचलो मी.**

अनुक्रमणिका

## १५

महादेवीआक्कांच्या ऐक्यस्थानाचे मडिवाळमाचिदेव वर्णन करीत होते तेंव्हा प्रभुदेवांनी सगळ्यांच्या स्थितीगतिचे समाधान करून पुन्हः मी येईन मजला निरोप द्या म्हणून सगळ्याना सांगतात.

६१४

**नितांत प्रेमानें सुखशांति, संतोष लाभल्यावर**
**आता अनुभाव गोष्टीस ना ठाव, शब्दाडंबरास नावाव.**
**शशिधराची आज्ञा धारण करून आल्यावर,**
**सोपविलेले महान् कार्य करीत असावे.**
**ते आपल्यात आपण केंव्हा एक होणार ते होवो,**
**त्या दिवशी येऊन सांगतो मी निर्णय.**
**गुहेश्वरलिंगाची आज्ञा होईपर्यंत**
**समस्त शिवशरण बसवण्णा बरोबर सदैव रहावे.**

त्यावेळी सिद्धरामदेव, प्रभुदेवांची अनुज्ञा विचारतात.

६१५

**हे देवा, तुम्ही सांगा हो मज**
**माझी काय होईल गति मति ?**
**सांगा हो, तुमच्याठायीं समरस होण्याची रीत ती कोणती ?**
**तीन मजल्याच्या उंच कोनाड्याच्या उर्ध्व**
**द्वार वास्तूत करू का वास ?**
**चौकामधल्या अष्टदळ अग्र समूहाच्या मधल्या कोठडीत**
**करू का वास ?**
**कामनादि गुणाचा हा पिंजरा त्यजून राहू का ?**
**अथवा राहणी माझी तेथेच असावी का ?**
**कामास बंधित करणारा सोडून पिंजरा, राहतो मी सुस्थिर,**
**निरंतर राहतो हो सुस्थिर.**
**सांग सांग बा तव निर्णय,**
**अरे ओ कपिलसिद्धमल्लिकार्जुना ?**

प्रभुदेवांचे सिद्धरामदेवांना प्रत्युत्तर

अनुक्रमणिका

६१६

**गुरुतत्त्वांत होतसे जनन, शिवतत्वात होई पालन,**
**परतत्त्वांत मग्न झालेला तो शरण.**
**कायात्यजुन निर्वयल झाल्यास काय ?**
**अथवा काया कंथारहित निरवय झाला तरी काय ?**
**काया समाधि, करणसमाधि, भावसमाधि झाल्यावर**
**गुहेश्वरलिंगाठायीं पोकळ भ्रम निवारुन**
**ज्ञानसमाधींत वसणाऱ्या जाणकारास तीच होय निजसमाधि,**
**ऐक बा सिद्धरामण्णा.**

सिद्धरामदेवाना निजयोगाचे रहस्य निरुपण करून प्रभुदेव कल्याणाहून जाण्यास निघतात. तेव्हा बसवदेव, प्रभुदेवांच्या विरहाने प्रलाप करतात.

६१७

**तुमच्याकडें दृष्टिक्षेप टाकीत असताना, तेथेच माझे प्राण**
**असल्याचे दिसून आले हो**
**तुम्हास अंतरल्याक्षणीं माझे प्राण जाई,**
**एकेक रात्र एकेक युग लोटल्यापरि होई,**
**देवा मी कसा रे लोटू ? कसे होईल मज साध्य ?**
**दिवसभर विरहावस्थेंत, होतो मी व्यथित,**
**कूडलसंगमदेवाच्या शरणाना अंतरून कष्टप्रद जगण्यापरिस**
**मरणच मज वाटे बरे**

६१८

**देवा, तुमच्या महानुभावाना अंतरून नाही हो मी वाचत शिवधो !**
**अंग आश्रयात मज दिसेना पुढचे कांहीं.**
**लिंगसंगीना दुरावुन मी जगू कसा हो कूडलसंगमेशा ?**

६१९

**होऊनी जर्जरीत, झालो मी दुबळा,**
**देवा रे, झालो मी हताश होऊनी जर्जरीत.**
**गेले दुभंगून, मी धैर्यहीन, गेले देवा माझे धैर्य खचून,**
**राहिलो रे मी एकटाच, राहिलो मी एकटा दुकटा.**
**हे कूडलसंगमदेवा, तुमच्या शरणाना अंतरून**

६२०

**दिसल्यास वाटे हो मनोहर,**
**डोळ्याआड झाल्यास अशी होतसे देवा दुर्दशा.**
**गमे मज दिवसचि रात्र, रात्रचि दिवस.**
**एकेक रात्र, एकेक दिवस लोटणे,**
**वाटतसे रे देवा, एकेक युग लोटल्यापरि,**
**कूडलसंगमदेवाच्या शरणाना दूरावून काळक्रमण्यापरिस**
**कष्टप्रद जगण्यापेक्षा मरणचि परवडे मज.**

चन्नबसवण्णांची ही विरहावस्था.

६२१

**मनास मन झाले एकार्थ, प्राणास प्राण झाले हो एकार्थ**
**भावास भाव झाले एकार्थ, संगास संग**
**समरतीनें घडलेला संयोग न होई वियोग**
**विरहावस्थेत राहणे एक पळही न करता येई सहन.**
**बा कूडलचन्नसंगा, निष्ठेचा मनाजोगा होता हो तुमचा शरण**
**तयास अंतरल्याचा वियोग, केली माझ्या या प्राणाची हानी.**

बसवदेव, चन्नबसवदेव वियोगावस्थेंत असताना मडिवाळमाचिदेव त्या उभयताना समाधान करतात.

६२२

**म्हणावे तो बाहेर आहे, तर पहा, आहे तोच आत**
**आत आहे म्हणावे तर पहा, तोच आहे बाहेर.**
**आत बाहेर सर्वांगी सानिध्य समरसाच्या त्या**
**महिमावंतास पहा हो तुम्ही उमजून.**
**न दूरावणारे घन दूरावले म्हणणें ही गोष्ट शिवशरणांच्या**
**मनास पटेल कां हो**
**मरणरहित महिमावंताची निजस्थिती आपल्यात पाहून**
**करितो वंदन याचे व्हावे का विस्मरण ?**
**अविरत अस्तित्व, कलिदेवरदेव आहे बा करस्थळीं पहा चन्नबसवण्णा**

अनुक्रमणिका

# १६

प्रभुदेवांनी-बसवण्णा, चन्नाबसवण्णा, मडिवाळमाचिदेव शरणाना महाज्ञानाचा बोध करून, समस्त पुरातनाना कृतार्थ केले. महादेवीआक्काना निजशिवतत्त्वाचे विवर करून कथन केले, त्याना श्रीशैल पर्वतास पाठवून दिले. सिद्धरामदेवाना निजसमाधीचा निर्णय समजावून दिला, त्याना सोन्नलापुरास पाठविले. आपण निर्गमनाच्या चालीनें नानादेश, वेगवेगळे पर्वत, गुहेच्या अंतरंगात संचार करीत कल्याणास्तव निघाले.

६२३

**गमनी असून निर्गमनी गतिविना संचार, काय वाणू कसे सांगू ?**
**अघटित घटित अखंडित महिमावंताचे कसे मी वाणू ?**
**आदिच्या पलिकडचा गुहेश्वराचा अल्लमकरी संचार,**
**जगत्पावनाकार**

६२४

**चालतो परि चालरहित असे तयाची चाल.**
**बोलतो परि बोलीरहित असे तयाचे बोल.**
**देहधारी असून नसे तो देहधारक.**
**समरस होऊनीही तो अविनाशी संयोगी,**
**होऊनी समरस, गुहेश्वरा, तवठायीं झाला हो निश्चल.**

६२५

**हे देवा, अनेक गिरी गुहा कंदरात जमीन शेतात,**
**न स्पर्शिता असे तव वास त्यात !**
**जिकडे पहावे तिकडे वसशी तूं देवा !**
**मनास अगम्य अगोचर होऊनी, जिथे तिथे सगळीकडे तूच वसशी देवा !**
**गुहेश्वरा, तुमच्या व्यापकत्वाचे विस्तार जाणून पाहिले मी देवा.**

प्रभुदेव संचार करीत असताना पोन्नांबलनाथाचे सुक्ष्मरीतिने अवलोकन करतात. तेथे वास करीत असलेले, सद्भक्तियुक्त, सदाचार सन्मार्गी, शिवलिंगार्चन परायण, शिवध्यानैकनिष्ठ, शिवप्रसाद शिवपादोदक सेवणारे, शिवलिंगांग संबंधित, शिवानुभाव संपन्न शिवाद्वैत वेद्य-शिवज्ञानोदय प्रसन्नतेने सद्गोष्टी संबंधित समवेधून-या सर्वांना प्रभुदेव जीवन्मुक्त करतात.

तेथून प्रभुदेव पूर्व समुद्राच्या तीरावर असलेल्या रामेश्वरास येतात. रामनाथाबरोबर सुखसंकथा संभाषण करून त्या रामनाथाकडून पूजा करून घेतात.

अनुक्रमणिका

तेथून दक्षिण समुद्राचे निरीक्षण करून, पश्चिम समुद्राकडे येऊन राहतात, महाबळेश्वर स्थानास जाऊन, स्वलीलेनें फिरतात; तेथून उत्तराभिमुख होऊन सौराष्ट्रास येतात. तेथील सोमनाथास पाहतात. प्रभुदेवास पाहिलेले-ऐकलेले, नामस्मरलेले-बोललेले वंदिलेल्या सर्वजनांचे भवपाश बंधन तोडून तेथून निघतात. अनेक पुण्यक्षेत्रांचे अवलोकन करतात. त्या क्षेत्राना अगणित पुण्यवरदान करतात. अडुसष्ट तिर्थांचे समस्त समूह चालत जाऊन पाहतात. त्या महातीर्थांच्याकडून पूजा करवून घेतात. आपले परमानंदरूपि निर्मल गंगाबुकण त्या सर्व तीर्थाना करुणेने देतात. निर्मलपद बहाल करतात. अनेक देश पर्यटन करीत येत असताना त्या त्या देशाना पावन करतात.

श्री केदारात प्रवेश करतात. अत्युत्कट हिमास जिंकून 'सव्वालक्ष' पर्वत संचारून, त्या गिरिगुहांत ठिकठिकाणी विश्रांती घेत एक मोठी गुहा पाहूनत्या निवासस्थानी स्वलीलेने पद्मासन घालून बसतात. एकाग्रचित्ताने मन पवन ज्ञान ध्यान सम्मतसमरस भावाने निर्भावपदी स्थिर होऊन, निःशून्य निरखित निजसमाधीत मूर्तिमंत होऊन राहतात. त्या समाधिची स्थितीगति कथन करतात.

६२६

**अचल सिंहासनास निश्चल हेचि होय मंडप !**
**संचल ओवरीत साऱ्या आवडी निवडीना करूनी स्थिर,**
**पंचरत्नाचा शिखर त्यास झळकणारे कोटिकळस !**
**वचन वैचित्र्याची पुष्परचना !**
**नवरंगात खेचरादिचे गमन विचारपूरित गिळून,**
**गुहेश्वर स्थिर स्वरूप सचराचराच्या अतीत होय.**

६२७

**स्वस्थान सुस्थिर सुमन मंडपात. नित्य निरंजन प्रभेचा प्रकाश**
**शिवयोगाचा अनुभाव होऊनी एकार्थ,**
**गुहेश्वरा, तव शरण असे हो उपमातीत.**

६२८

**स्थूल सुक्ष्मात प्रकाशित महाप्रकाश होऊन,**
**तेजोमय ज्ञानज्योतिदळ सारे होऊनी अतीत,**
**सावली गिळलेल्या उन्हांत झाला चंद्रमाचा उदय !**
**जलधि गोलाकाराचा विस्तार सांगणे नच होई साध्य,**
**चाकर धन्यास गिळून, चौदा भुवने ओलांडून,**
**गुहेश्वराचे निश्चल स्वरूप गिळले बाहेर आंत.**

अनुक्रमणिका

६२९

जलात जल उद्भवला विधविध रंगाचा वृक्ष,
त्यास शाखेविना आले पुष्प,
अवकाशांत दिसेहो फळ,
जंबुद्विपकन्येच्या तळहातीं विकसित पावलेल्या
मस्तकानें गिळियले इंद्राचे वाहन.
अशन पवन संचलन अंत्य न होणारे असे हो शिवयोग !
साक्षिभूतात्म्याची गोष्ट गिळिले मथन,
ज्योतितील कर्पूर उजळण्यागत असे हो गुहेश्वरलिंगाचा योग !

६३०

सहस्त्रआठव्या दळात खेचर झाले चलनातीत,
पाहिले मी, सर्पाच्या राजानें फणा केल्याचे प्रज्वलित.
समस्त सुरगण आपापसात भिऊन बाजूस सरून पुढें जात असता,
मन आवरिल्याचे पाहिले मधुरवासनेंनें,
झालो हो मी सुखी त्या प्रवेशांने
सहस्त्र गाई लंगडू लागल्या, गुहेश्वरा  तुमच्यात समरति झाल्याने.

६३१

जग विस्तार मंडपाच्या नभो विस्तार छतात
वैचित्र्य पाहता पाहता, ध्यान विश्रांतीत,
सत्याचेसत्य असल्याचे घडले एक दर्शन,
निरखिता निरखिता, गुहेश्वर स्वय झाल्याचे दृष्टिगगन गंभिरात
पाहिले मी उदय झाल्याचे.

६३२

सात तालावर ऐकू येणारे सुनाद,
स्थूल-सुक्ष्म-कैलासाचे वैभव.
तेथें गंगेवाळुक समरूद्रांचा समुह.
गगनगंभिर शिवस्तुति देखदेखता तत् क्षणी,
झाले हो पिंड ब्रह्मांड, अखंडित निराकार गुहेश्वर !

अनुक्रमणिका

६३३

पंचब्रह्मावरचे प्रणवमंत्र असलेले, पंचमुख दशभुज
फणाच्या मणीवरती तो आहे पहात,
समस्त चौदाभुवनें स्वयेचि समता समाधिरुपि समरसात,
चंद्रकांताच्या घागरीत भरून बिंदुचे अमृत
न फोडता घागर गुहेश्वरा उजळितसे.

६३४

येऊनही न आल्यागत, अंतर्भूत होऊनही न होई अंतर्भूत,
अचल असुनी संचल झाल्याची पहा ही रीत !
या अखंड चरित्रास उपमा देऊ कोणती ?
नवखंड पृथ्विस सामावलेली पोकळी !
असे हो अगम्य समाधि संयोगात; अशा गुहेश्वरलिंगास उपमा
देऊ मी कोणती ?

६३५

खेचर पवनागत निज योगींची उपस्थिती !
ही बोली असे खनिज पदार्थ गिळल्यागत,
ते बाहेर ओकल्याविण कसे चालेल ?
भूचक्र गोलाकार आचार्य रचित समस्त ग्रामास करुनी दहन.
नियम झाले जमीनदोस्त. नामनियमास गिळिले,
ग्राम प्रभुस गिळुन, गुहेश्वर गुहेश्वर वदत झाले हो निशून्य

६३६

इहलोक परलोक वसती आपण राहिल्या ठिकाणी;
गगन मेरू मंदिर असती आपण असल्याठायीं,
सकल भुवन सत्यलोक आपण राहिल्याठायीं;
नित्य निरंजन तत्व असती आपण वसल्याठायी;
उत्तरोत्तर पद असती आपण असल्याठायी;
चंद्र सूर्य तारामंडळ हे सारे आपण राहिल्याठायी,
अंतर महदंतर असती ते आपण असल्याठायी,
स्वतंत्र गुहेश्वर वसे आपण असल्याठायीं

अनुक्रमणिका

## १७

परम शिवयोगात निश्चलतेने निराकार होऊन अनंतकोटी समस्त ब्रह्मांडास आपल्या महाज्ञान प्रकाशाने बिलगून, त्या प्रभेने उजळीत प्रभुदेव आपल्या लीलेचे अवसानकाल आपल्या विवेकानें उमजून, तेथून कल्याणाभिमुख होऊन निघतात.

इकडे बसवदेव, प्रभुदेवांचे आगमन होणार असल्याचे जाणून शून्य सिंहासनाची रचना करून आतुरतेने त्यांची वाट पाहतात. हडपदअप्पण्णा शून्य सिंहासनाचे वर्णन विवर करून सांगतात.

### ६३७

**अष्टदळ कमळाचा शिला घालून उभा केला शून्य सिंहासनास्तव**
**धवलालय-चंद्रकांत शिलेचा पश्चिमद्वार उघडून पाहता दिसे**
**हो विचित्र !**
**एकोभाव हा एक खांब; त्यांत अनेक चित्रे लपलेली प्रभा,**
**त्या प्रभेत ब्रह्मरंध्राच्या मस्तकावरती लोंबती ठेविली**
**पंचमोत्यांची माला,**
**कोनाकोपऱ्याच्या मध्यभागी बांधिले नवरत्नाचे गोंडे.**
**त्यास असे काळ्या कापडाचे आच्छादन,**
**घळघळ आवाज करणाऱ्या आभरणाचे तोरण बांधिले सभोवार,**
**दशवायुना करूनि एक, लिंगसुखवायुस करुनी उपशमन,**
**त्याचा केला पंखा, स्थिरावलेल्या मंदानिलास उशी करून,**
**हर्ष वसंताच्या झऱ्यास चौकोनी आसन घालुनी,**
**नवनाळांत गुणगुणणारे शब्द शुकपिक भ्रमराना आमोद करुनी,**
**परमशांतीच्या शैल्याकाराचे मृदुमधुर आंब्याची पाने, आंथरून,**
**उत्तर द्वाररुपि गवाक्ष रचून,**
**पूर्वयोगास पायऱ्या करून,**
**पश्चिमद्वारास निजमहाद्वार करून,**
**सप्तव्यसन पचेंद्रियाची करूनी पौळी, आशा आमिशांचा**
**करुनी ध्वंश, उर्ध्वचक्रास करूनी वरचा मजला.**
**सूर्य चंद्राचे उजळुनी दिवे,**
**सोहं या शिखरावर महाज्ञान-प्रकाशाचा करूनी सोन्याचा कळस,**
**निशून्य निराळरूपि निर्मिला शून्यसिंहासन.**
**बसवप्रियकूडलचन्नसंगय्याठायीं मम परमगुरू बसवण्णानें.**

अनुक्रमणिका

६३८

अंग प्रकृतिस लिंगाठायी केले निरसन,
मन प्रकृतीस ज्ञानाठायी केले निवारण.
जीवभ्रांतिस निश्चितपदी निपटुन,
निशून्य निरामय या निवासास
घातला सदाचाराचा पाया.
झाकळला सर्वाचार संपत्तिचा फूलशिला.
अंतःकरण चतुष्ट्याचे उभारिले चार खांब.
ज्ञातृच्या भिंतीवर ज्ञानाचा केला शिखर तयार,
ज्ञेयाच्या सोन्याच्या कळसाने केला शृंगार.
ब्रह्मरंध्राच्या उर्ध्वद्वाराचे करूनी निजद्वार,
निशून्याठायीं केला सुस्थिर.
बसवप्रियकूडलचन्नसंगाचा शरण प्रभुदेवांचे आगमन
होणार असल्यानें, रचुनी शून्यसिंहासन त्यांच्या येण्याचे
करीत आहे निरिक्षण मम परमगुरु बसवण्णा.

प्रभुदेवांच्या आगमनाकरितां गुढी तोरण बांधून उत्कंठतेने वाट पाहतात.

६३९

बांधिले उंचध्वज तोरणें कल्याणांत.
अष्टद्वार दुकानें राजमार्गांत सारे, बांधिले व्यासाचे बाहु.
आठही दारात अंथरिल्या पायघड्या,
केला संकल्प संतोषानें वृषभेश्वर.
बसवप्रिय कूडलचन्नसंगमदेवाच्या आगमनास्तव.

शून्य सिंहासन रचून बसवदेव, प्रभुदेवांच्या आगमनाचे निरीक्षण करतात.

६४०

कार्यारंभ करून लोटली बारा संवत्सरे.
काय करून काय होणार, माझ्यांत सत्य नाहीं तोवर ?
कार्यारंभ करून काय प्रयोजन ? माझ्यात नसे खरेपण.
मम पुण्याईचे फल, कूडससंगमनाथ,
वाणाचे लाडू येणार म्हणून तोंडास पाणी सुटल्यागत झाले मज.

६४१

समुद्रास चंद्र आगमन हाच होय जिव्हाळा.
आटलेल्या तलावातील कमळाना उदकचि जिव्हाळा.
चकोरास चंद्रमाच जिव्हाळा कूडलसंगमदेवा
मजला तुमच्या शरणांचे आगमनच असे जिव्हाळा.

६४२

दिसते काहो अंधकास परिसाची गिरी ?
दुर्भाग्यास सुधारसाची मिळेल का विहीर ?
दारिद्रयास खणता येईल का सोन्याची खाण ?
अपवित्रास दूध देईल का कामधेनू ?
कूडलसंगाचे शरण पुण्याई विण मज देतील कां हो दर्शन ?

६४३

सूर्योदयचि कमळास जीवकळा.
चंद्रोदयचि राजकमळास जीवकळा.
प्रेमिकाना परस्पर नजरचि जीवकळा.
कूडलसंगाच्या शरणांचे आगमनचि मज जीवकळा.

६४४

हरवलेले लेकरू आपल्या आईकरिता टाहो फोडण्यापरि,
वाट चुकारू वासरू आपल्या कळपास्तव हंबरण्यापरि
अहर्निश चिंतन असे मज देवा, तुमच्या शरण आगमनाची !
दिनकर उदयानें कमल विकसित होण्यागत,
आपल्या आगमनाने मज होई बा कूडलसंगमनाथ.

६४५

डाव्या हाती दुधाची वाटी, उजव्या हाती शिक्षकाची छडी,
कधी येतो हो मम देव, मज मारून दूध पाजण्यास ?
“दंडक्षीरद्वयं हस्ते जंगमो भक्तमंदिरं ।
तद्‌भक्त्या लिंगतुष्टीरपहासाच्चदंडनं ॥”
हे कूडलसंगमनाथ, भक्तिपथ दावण्यास केंव्हा येणार हो मम जन्मदाता

अनुक्रमणिका

चन्नबसवदेव उत्तरतात.

६४६

**मनाजोगे मंगळ म्हणण्याचे न टळे पहा हो बसवण्णा.**
**धुंडणाऱ्यास धुंडल्यानेंच होतसे साध्य-**
**हे निश्चित असे हो बसवण्णा !**
**तुमच्या मनाची आकांक्षा पुरविण्यास्तव.**
**कूडलचन्नसंगमदेवाचा शरण प्रभुदेवाचे आगमन**
**होण्याविण राहील का हो संगनबसवण्णा ?**

मडिवाळमाचिदेव कथन करतात.

६४७

**देवा, भक्ति करणाऱ्या भक्तात, प्रसन्न होणाऱ्या**
**देवात आहे का हो भेद ?**
**भक्ताच्या कायेतची काया, प्राणातचि प्राण.**
**हुडकल्यास स्वरोचि तो होता !**
**धुंडत अपेक्षिल्यास येतो तो इंद्रियद्वारे.**
**कलिदेवरदेवाचे आगमन होणार असल्याचे**
**आताच मज दर्शविले बा संगनबसवण्णा.**

बसवण्णांचे प्रत्त्युत्तर.

६४८

**भुकेजून रडणाऱ्या लेकरास, आईनें स्तनपान केल्यास,**
**ते लेकरू तृप्त झाल्याविण राहील कां सांग मज ?**
**प्राणवल्लभाच्या वियोगानें प्राणवियोग होणाऱ्या ललनेस,**
**तो प्राणवल्लभ आल्यानें विरह संतोषिल्याविना राहील का ?**
**कूडलसंगमदेवाच्या साक्षीनें, माझ्या घरास प्रभुदेव आल्यास,**
**माझी अपेक्षा होऊनी पूर्ण, मी चन्नबसवण्णाच्या कारुण्याचे**
**लेकरू होऊन वाचतो पहा, मडिवाळमाचिदेवा.**

असे बोलत असताना प्रभुदेवांच्या आगमनाची सुचना बसवदेवास दिसते.

अनुक्रमणिका

६४९

देवा, खाजवित आहे हो माझा तळवा, स्फुरतसे मम नयन.
येणार असे वाटते मज प्रथम मम सदना !
येणार असे वाटते पुरातन !
पाहिलेले स्वप्न खरे होऊन जंगम आल्यास मम सदना,
करितो मी शिवार्चन, कूडलसंगमेश्वरा तुमच्या समोर !

मोळिगे मारिदेव सांगतात.

६५०

अतिथीचे मस्तक स्पर्शानें,
देवा, शून्य सिंहासनास बांधिलेला फळांचा हार
चलन पावल्याचे देखिले !
मोत्याची आरती मुक्तीवनिता नित्यनिरंजनास
निवाळी ओवाळित होत्या !
मुक्तीवनिता त्यायोगे होई बा संतोषभरित.
निष्कळंक मल्लिकार्जूनदेव न आल्यास,
होई माझी गती तुझ्यासम. संगनबसवण्णा बांधि बा गुढी

सोड्डुळबाचरस म्हणतात.

६५१

मनाचा धनी आल्यास माझ्या घरा,
होतसे हो मन मन जडण घडण झाल्यापरि,
देवा, मनास होई मनोहर, होई चित्तास मनोहर !
महादानी सोड्डुळाच्या आगमनाची शुभ सुचना
प्रकट होत आहे-प्रभुदेवांचे आगमन आताच दावितो
मी संगनबसवण्णा.

बसवदेव कृतनिश्चयाने वदतात.

६५२

वंदितो मी अतिशय संतोषानें,
काढुन शेला बांधितो. कंबरेस !
हाताच्या मुठीनें जमिन ठोकल्यास एखादेवेळी चुकेल विना,

अनुक्रमणिका

**चुकेल का ! हो आदि शरण वाणी ?**
**कूडलसंगमदेवाच्या साक्षीने बांधतो मी तोरण,**
**फडकतो पहा हो ध्वज.**

६५३

**रानात तहान लागता, झाले मज त्याचठिकाणी पाणी दिसल्यापरि !**
**देवारे, झाले मज आंधळयास डोळा आल्या परि.**
**आमच्या कूडलसंगमदेवाच्या शरणांचे आगमन**
**झाले हो मज गेलेला प्राण परतुनी आल्यापरि !**

हडपदअप्पण्णा म्हणतात.

६५४

**आकांक्षित आकांक्षा, झाल्यापरि हस्तगत,**
**निधिनिधान घरास आल्यागत,**
**परिमळ शोधित येणाऱ्या भ्रमरागत,**
**चिंतमणि पुतळा चालण्यास शिकल्यागत,**
**बसवप्रियकूडलचन्नसंगय्याठायी, प्रभुदेवांचे आगमन**
**दिसताहे पहा हो मज संगनबसवण्णा.**

बसवदेव सांगतात.

६५५

**माझे आवडते प्रिय शरण येऊन माझ्या डोळ्यासमोर उभे टाकल्यास,**
**माझी तनु फाडून त्या  तनुत घेतो मी ठेवुन !**
**माझे मन भेदून मनांत घेतो मी ठेवुन !**
**माझे नयन छेदून नयनात घेतो ठेवून !**
**कूडलसंगाचे शरण माझे धनी होऊन**
**माझ्या घरी आल्यास, माझ्या मनाजोगे करितो**
**पहा मी भक्ति आप्पण्णा.**

चन्नबसवदेव कथन करतात.

अनुक्रमणिका

६५६

डोळ्याची दृष्टि करस्थळाचा प्राण.
माझ्या मनांत दिसतो पहा हो
गमनास ना गति, उभारण्यास ना पाऊल,
संचलनात एकप्रकारें आश्चर्यकारक संचलन असे देख
अदृश्य पराशिव चालण्यास शिकून येत आहे
पहा हो तयाची करुणा !
कूडलचन्नसंगमदेवाच्या साक्षीने, प्रभुदेव येणार
हे न चुके पहा संगनबसवण्णा.

बसवदेव सांगतात.

६५७

संग सानिध्य शरण आल्यास मम सदना,
श्रद्धा ठेवितसे मम मन ! करी प्रेम मम मन !
साप-दोरखंड ही भ्रांति असे तोपर्यंत,
देवा, मी कसा होईन बरे भक्त?
अंगलिंगसहित येणाऱ्या प्रभुदेवास पाहून,
मनात पुन्हः आल्यास संदेह, मज पोळेलकिहो कूडलसंगमदेवा !

बसवदेव तेथे प्रभुदेवांचे आगमन झाल्याचे पाहून त्यांचे विराट स्वरूप चन्नबसवण्णास दाखवितात.

६५८

डोकीचे केस पिंजरलेले मोकळे सोडले आहेत,
चालत आहे तो हेलकावे खात,
तयाच्या कपाळास टेंगुळ, करस्थळाच्या अनिमिष दृष्टियोगे
नुरे हो बहिरंगी लक्ष,
ताटरलेले डोळे, कान फाटुन होते लोंबकळत.
जखम होऊन भुवया फुटून डोळे ताटरून फाटके
कान लोंबकळत होते.
रक्ताची धार वाऱ्याच्या धुळीनें माखून पावसानें निसरत होती,
पाठीवरचे वळ, डाव्या उजव्या काखेत चिरलेले,
काट्यानें खरचटलेले पाहून, पाहणारे लोक होत होते चकित,
ढुंगणाच्या काळ्या दिगंबरात होते घाण झिरपत.
भूकेनें क्षीण होऊन, पडून फुटले होते गुडघे,
नव्या जखमेतून रक्ताची धार लागली होती,

अनुक्रमणिका

**जुन्या जखमेनें पाय वळून**
**सांदा चुकून, सहनातीत वेदना होत होता,**
**ठेचाळून बोट फुटल्यानें झाले होते जखम.**
**चेपलेल्या कंबरेचा पंगु, याचे बाह्यरूप पहा हो चन्नबसवण्णा,**
**कूडलसंगमदेवाचा हा विचित्र संचार !**
**पहाणाऱ्यास दिसतसे भयंकर,**

चन्नबसवदेव म्हणतात.

**६५९**

**देवा, तू आहेस रे आदिच्या पलिकडचा ! अनादिच्याही पलिकडचा !**
**या दोन्हीच्याही अतीत अत्यतिष्ठ दशांगुल आहे तो,**
**'चतुर्युग सहस्राणी' या संख्येची युगें मोजण्यापूर्वी,**
**कालचक्र रचण्यापूर्वी,**
**घालुनी पाया धरणी, मेरूस दिले होत स्थान, परि**
**अंडजाची नव्हती तेव्हां उत्पत्ति,**
**तुजशीच माहित तयाचे अंत; तुझा अंत तोच जाणी.**
**तुम्हा उभयतांची महिमा मज कसे कळले हो बसवण्णा,**
**देवा कूडलसंगमदेवा.**

**६६०**

**जन्मतःच द्रव्य म्हणजे काय याची नसे जाण,**
**अशा एका गरिबास लक्षांतर धन संपदा लाभल्यावर,**
**ती श्रीमंती पाहून तो आनंदाने परवश झाल्यापरि;**
**युद्धाचें तोंड कधीही न पाहिलेल्या एका राजास,**
**जन्मुनी एक वीर कुमार, रक्ता कालव्याच्या प्रवाहात पोहणाऱ्या,**
**कलहास पाहून अत्यानंद होण्यापरि-**
**मजला अतीव आनंद होतो चन्नबसवण्णा,**
**तू कूडलसंगाचा शरण प्रभुदेवांचे निजत्व निवेदिल्यास.**

बसवदेव-प्रभुदेवांचे स्वरूप अत्यंत निरामय असल्याचे वाखाणतात. तेंव्हा चन्नबसवदेव, त्यांच्या स्वरूपाचे मोजमापन कोणासही करता येत नाहीं असे सांगतात.

अनुक्रमणिका

६६१

**पाय नाहीं म्हणतात प्रभुदेवाना, तयानें पायतळी तुडविल्यानें संसार सूतक,**
**त्यास हात नाही म्हणतात प्रभुदेवाना, तयानें शिवले नसल्यानें परधन,**
**कान नाहीं म्हणतात प्रभुदेवाना, तयानें नच केले अन्य श्रवण.**
**नाक नाही म्हणतात प्रभुदेवाना, तो नच वळला दुर्वासनाकडे,**
**वक्षस्थल नाही म्हणतात प्रभुदेवाना, तयानें नच आलिंगिले परस्त्रीस.**
**या कारणें, कूडलचन्नसंगय्याठायीं प्रभुदेवांचे शेष प्रसाद सेवुन,**
**संगनबसवण्णा झालो हो आम्ही धन्य.**

चन्नबसवदेव, प्रभुदेवांचे आणि बसवदेवांचे पूर्वापार संबंध निवेदितात.

६६२

**कृतयुगांत देवांग या नावाचा गणेश्वर होऊन**
**तुम्ही आलात करीत असता आराधना-**
**स्थूलकाया या नावानें जंगम होऊन येऊन करुनी गेलात लिंगार्चन.**
**त्या क्रियांगाचे झाले कि हो विस्मरण तुम्हास बसवण्णा ?**
**त्रेतायुगांत तू घंटा कर्ण गणेश्वर होऊनी आलात, करीत असता आराधना-**
**शून्यकाया जंगम होऊनी, येऊनी करूनी गेला लिंगार्चन,**
**त्या क्रियांगाचा तुज पडला कि हो विस्मरण बसवण्णा ?**
**द्वापारयुगांत तू वृषभगणेश्वर होऊनी येऊनी करीत असता आराधना-**
**अनिमिष जंगम होऊनी आला, करूनी गेला लिंगार्चन,**
**बसवण्णा, त्या क्रियांगाचा पडला तुज विस्मरण.**
**कलियुगात तू बसवगणेश्वर होऊनी आला करीत असता आराधना**
**प्रभुदेव जंगम होऊनी, लिंगार्चन करण्यास्तव आला पहा बसवण्णा**
**या कारणें देव-भक्तया नावाचे नाटक आहे हो चमत्कारिक,**
**भिन्न भावे पाहिल्यास कूडलचन्नसंगमदेवा, न टळे हो नरक.**

बसवदेवांचे प्रत्युत्तर.

६६३

**अशी आहे हो तयाचे क्रम.**
**उभा ठाकल्याठायी ना साऊली, तो चाले परि ना पाऊल.**

अनुक्रमणिका

भूतळी तो पाहिल्याचे एकही स्थळ न उरे.
असा आहे या अनियमाचा संचार,
होय होय, जाणून बुजून जंगमस्थल ते असे असल्याविण
दुसरे काय असू शकते ते तूच सांग पाहू !
भूक कशी निवारेल हे न येई सांगता.
भोजनास वाढले तरी तो जेवतो किं नाही कोण जाणे ?
जेवत असल्यास वाढतो मी कुडलसंगमदेवास
चन्नबसवण्णा, तुज पटल्यास तूं सम्मति दिल्यास.

चन्नबसवदेव सांगतात.

६६४

देवा, जो शोधत शोधत जातो. शोधत असलेली वस्तु तोच हो तो.
जो इच्छित इच्छित जातो. इच्छित वस्तु तोच हो तो.
तुमच्या भावनेपरि ते घडत असते, अन्य कसे काय होणार ?
चौदा भुवने स्थापण्याची प्रेरणा हे सारे तुमच्यामुळें घडल्यानें,
होत आहे किंवा नाहीं हा संदेह
तुम्हास का असावा बसवण्णा ?
तुमचे पाय म्हणेल तसे, आठवेल तसे, पाहिले तसे
होणार हे निश्चित.
कूडलचन्नसंगमदेव साक्षीनें मी सांगतो,
प्रभूचीच ही आज्ञा होय उडवी बा ध्वज.

बसवदेवांचे उत्तर.

६६५

उत्तरेकडील द्वार पौळीत. आतुरतेने प्रवेशून,
पश्चिम द्वाराच्या धवल मंडपात पश्चिम दिशेनें केल्यास प्रवेश.
त्रिविधगतिनें शून्यसिंहासनावर तृप्ति लाभल्यास
मम मन ठेवि हो विश्वास !
कूडलसंगमदेव साक्षीनें सांगतो तू आमच्यावर रागावणार असल्यास,
रागाव बा चन्नबसवण्णा.

चन्नबसवदेव म्हणतात.

अनुक्रमणिका

६६६

**देव देवा, महाप्रसाद !**
**तुमच्या पायास प्रत्युत्तर नाहीं देता येत देवा,**
**जाणास मी जाणिले म्हणणारा जाणकार देही तू नाहींस,**
**मी भक्ती आहे ही युक्तिशून्य तू नाहींस,**
**मी जाणिले ही भाषा मजला टोचून बोचून जाळीत आहे,**
**चूक माझी, क्षमा तुमची !**
**कुडलचन्नसंगमदेव साक्षीनें, मज मारा, वा तारा हो हा तुमचा धर्म,**

बसवदेव सांगतात.

६६७

**पुण्याईच्या काळी शत्रु मित्र होई,**
**पुण्याईच्या वेळीं माती होई सोने, पुण्याईच्या काळी साप होई माळ,**
**पुण्याईच्या काळीं इतरजन होती आपुले.**
**ही सारी पुण्याई भक्तिने लाभे हो !**
**भक्ति झाल्यास लोप पुण्याई होई नाश.**
**अशी भक्ति असले पुण्य तुज लाभल्यानें**
**चन्नबसवण्णा मी जगलो हो कूडलसंगमदेवा.**

बसवदेव, चन्नबसवदेव वार्तालाप करीत प्रभुदेवास पाहिल्याचे सांगत असताना त्यावेळी सोड्डुळबाचरस येऊन सांगतात.

६६८

**एकदा धावत जाऊनी मारितो धक्का,**
**एकदा स्तब्ध होऊनी उभा टाकतो.**
**एकदा खूप हसतो, खुळ्यागत, वेडगळ्यागत दिशदिशा पाहतो.**
**सजविलेले राजमार्ग व दुकाने आनंदातिशयाने पहात,**
**दुतर्फा मंगलकर असे नाट्य करणारेस पाहून हसत,**
**पहाणाऱ्या जनसमुदायास बाजूस सारीत, मारल्यापरि करीत,**
**पळत, पाय बांधल्यागत उभारल्याठायीं पडतो,**
**नाट्य करणाऱ्यांच्या समोर जाऊन प्रत्युत्तर देत, गातो,**
**शिवी देतो, संतापानें बोलतो, वाद्य मेळाव्यास**
**पाहून तुच्छतेनें हसतो हात फिरवीत, गति उच्चारित,**
**खुळ्यापरि हातवारे करीत,**
**हळु हळु चालतो, थांबून पाहातो,**

अनुक्रमणिका

**ही असामान्य असे हो नाट्य लीला.**
**बसवण्णा, वाहतो हो तुमची आण हा सोड्डुळाविण**
**अन्य नसे हो कोण ?**

मडिवाळमाचिदेव म्हणतात.

६६९

**एकदा होतो बालक, एकदां इकडे तिकडे फिरतो.**
**एकदा होतो म्हातारा, एकदा होतो मस्तीखोर !**
**एकदा होतो प्रभामय, एकदा दिसतो पुन्हःलपतो !**
**विश्व पाहुनी होतसे विस्मय,**
**ठायीच असून पुढें दिसत असता,**
**संप्रदायिक जन लगबग धावत घेऊन सांगत असता,**
**येऊनी धावत जवळ असलेल्या,**
**बसवाचे महामने पाहिला मान उंचावुन;**
**एकही न सोडला बाजुच्या कोपऱ्यातले सारे नक्षीकाम,**
**नंदिमंडपाच्या वरच्या मजल्याची सुंदरता पाहुन**
**तुकविला मान, कलिदेवरदेवा, बसवाच्या महामनेस घालुनि**
**प्रदक्षिणा, उभा आहे द्वारापुढें येऊन.**

६७०

**गर्वानें ठेवित पाय चाले डोलत डोलत,**
**तुकवीत मान, पहातसे रंगूनी मन;**
**ईश्वरनिर्मित या भुवन मंदिरात भूत भविष्य पाहत मंदस्मितानें**
**मोत्याच्या तोरणास होऊनी आकर्षित,**
**कलिदेवरदेवांनीं केला प्रवेश बसवाच्या महाघरात;**

प्रभुदेव शून्यसिंहासनावर झाले आरूढ.

६७१

**वळुनी उजवीकडे, पौळीच्या उत्तर द्वारी प्रवेशिला मान वाकवून,**
**गांभिर्याने पावले ठेवीत, शुभ्र पश्चिमद्वारानें,**
**त्रिविध गतिच्या शून्यसिंहासनावर,**
**मुक्तिकेसाचा परमगुरुराज चढला कलिदेवरदेव.**

शून्यसिंहासनावर प्रभुदेव आसनस्थ झाल्यावर बसवदेव म्हणतात.

अनुक्रमणिका

६७२

निशून्याठायीं शिरविरहित एक होता हत्ती.
येऊनी हत्ती गिळुनी एका हत्तीस झाला तो नाहींसा
अंतरविना आत, आधाराविना बाहेर !
दळरहित कुसुमाच्या, पीठावर,
कायाविरहित घन येऊनी मूर्ति झाल्याचे पाहून साऱ्या जगास
वाटे विचित्र !
कूडलसंगमदेवाचा शरण प्रभुदेवांच्या श्रीपदास
म्हणतो मी नमो नमो.

हडपदअप्पण्णा म्हणतात.

६७३

नच भूमी आधारित, ना पोहोचे आकाशास;
नच तयास विशेष रूप ! भावचि खांब, ज्ञानाचि निवास,
त्यास निर्लेपचि भिंत, निरहंकाराचि शिखर,
महदंकारचि शोभिवंत कळस,
सहस्त्रपत्राच्या नवकमल सिंहासनास नित्यत्वाची उशी;
निजाच्या विस्तारात नित्य निराळरूपि महाघन येऊन.
मूर्ति झाल्याचे, कायेच्या नयनास न दिसे हो,
मनाच्या पुढें नच साध्य, भावाच्या विचारास नच
अंगिकारी, बसवप्रिय कूडलचेन्नसंगय्याठायी,
प्रभुदेवांच्या श्रीपदी म्हणतो मी नमो नमो.

सोड्डुळबाचरस म्हणतात.

६७४

आकारहित निराकार मंडपात
निराळरूपि नवरा येऊन बसल्यावर,
तिघी ललना करती सेवा,
दोघीनी केला संग, एकीने गिळिले हो पुरुषास
या षड्रिपुबरोबर कलह करणाऱ्यास पाहून
हाच प्रभुदेव हे मी ताडले. तयाच्या निजपदास वदून-
मी मम भवपाश तोडले.
माझ्या महादानी सोड्डुळास पाहिल्याचे अतिव सुखास,
मज देता येईना, हो कोणतीही उपमा.

अनुक्रमणिका

बसवदेव कथन करतात.

६७५

**माझ्या प्रभुच्या आगमनास्तव**
**मम अंतरंगरूपि घर ठेविले हो मी उघडे,**
**अष्टदळ कमळरूपि अंतःपुरात निजवासरूपि आंथरुनी बिछाना,**
**ध्यानरूपि वरती छत बांधून, ज्ञानरूपि दीप उजळून,**
**निःक्रियारूपि समस्त उपचाराचा केला विस्तार,**
**पश्चिमद्वाररूपि उघडुनी द्वार, डोळेच झाले हो मम प्राण,**
**आतुरतेनें पाहत होतो मी वाट केव्हा होईल आगमन ?**
**माझ्या न येण्याने झाली असेल चिंतातुर या जाणिवेनें**
**येऊन मूर्ती झाला मम हृदयसिंहासनावर.**
**मम आकांक्षा होऊनी अंतर्भूत**
**पूर्वी बारा वर्षाची चिंता आज होई हो निश्चित,**
**देव कूडलसंगमनाथ, झाल्याने कृपामूर्ति मी वाचलो हो.**

बसवदेव, प्रभुदेवांचे पादार्चन करतात.

६७६

**मम मन देखता तव चरण, विलीन झाल्यावीण मज न होई सहन,**
**देवा, त्राही त्राही घनमहिमावंता !**
**तव पदार्चनास मम परमानंद जल ठेवितो मी भरून.**
**देवा तव पूसेज मम हृदयकमलानें करितो हो अर्चन.**
**त्या-रतिने उचलितो मी आरती, मम महाप्रकाशाचे**
**करुनी धूप समर्पण, मम स्वानुभाव हेचि गंध लेपन.**
**देवारे, या विधानाविण अष्टविधार्चन षोडशोपचाराची वेगळी**
**रीत मज ना माहित.**
**प्रभु माझा प्राणलिंग असल्याने हे कूडलसंगमनाथ**
**आज मज झाले विदित.**

बसवदेव, दर्शनाचा सुखानंद वर्णितात.

६७७

**तुम्हास पाहण्यात लाभे हो मज अनंतसुख ! तव संयोग परमसुख !**
**कोटी कोटी रोम सारे नयन होऊन मी तुज पाहतो.**
**कूडलसंगमनाथ तुम्हास पाहून पाहून मम मनी उद्भवे रति**
**झाले हो प्रीत प्रज्वलीत.**

अनुक्रमणिका

६७८

मम वचनी साठले हो तव नामामृत.
मम नयनी दाटली देवा तव मूर्ति.
मन भरूनी तव चिंतन.
कर्ण भरूनी तव किर्तीगान.
हे कूडलसंगमदेवा, तव चरणकमली मी भरून.

६७९

देवा, स्वप्नी दिसलेले निधान मज आज लाभले हो !
ऐसे मी पाहिले निधान, नसे हो ते परित्याग करण्याजोगे !
कूडलसंगमदेवरूपि निधान पाहिले मी, नाहीं आता सोडत.

६८०

न दिसे ऐशीं वस्तु झाली हो मज हस्तगत.
आनंदे नाचतो गातो. मी, डोळाभरून पाहतो;
मन परवश होऊन करितो मी भक्ति,
कूडलसंगमनाथ तुमची.

६८१

नाचून नच दमती पाय ! पाहून ना थकती लोचन !
देवा, गाऊन ना होई मनास श्रम ! याचे काय सांगू कसे मी सांगू ?
तुम्हास हातानें पूजितसे, मन अविश्रांत,
काय वाणू, याचे आता मी काय सांगू ? कूडलसंगमदेवा,
तव उदर विदारून शिरण्याची आतुरता आहे हो मज.

अनुक्रमणिका

## १८

प्रभुदेव शून्यसिंहासनावर साकार होऊन आसनस्थ झाल्याचे पाहून, बसवदेव परमानंद-भरित होतात, भक्तिने प्रभुदेवांची पूजा करून, हर्षातिशयानें नाचतात, गातात, इकडें भोजनाकरितां येऊन बसलेले एक लक्ष शहाणऊ हजार जंगमांचा समूह बसवेश्वरांवर आणि प्रभुदेवांवर नाराज होऊन रागारागानें तेथून निघून जातात.

६८२

**डोळ्यात फूल पडलेल्याना, कमलापरि डोळे असलेल्यांचे नसे बघवत,**
**जटा ( बुचडा ) बांधलेल्याना पाहण्याचे, टक्कल पडलेल्याना नसे**
**सोसवत.**
**राजास पाहून पतीस विसरल्यागत केला की हो बसवण्णा,**
**महेंद्रजालाचा तो एक प्रभु.**
**तयास माझा प्राणलिंग म्हणत, आमच्याकडे वळुनहि पाही ना.**
**त्याच्यात काय पाहिला हो चांगुलपणा ?**
**आमच्यात काय पाहिला हलकेपणा ?**
**कांसास फेकून धरिला की हो खापर, त्याचे आचार कोणते ?**
**बसवाचा व्रत कोणता ! हे दोघेही देवलोक मृत्युलोकीच्या बाहेर**
**असती**
**आम्ही यांचे तोंड नाही पाहत, ऐसे म्हणून गेले हो कलिदेवाचे**
**समस्त शरण.**

प्रभुदेव उत्तरतात.

६८३

**देवा, सात्विक शरण वाणी असू शकेल का हो असत्य ?**
**ती असे सत्य सत्य !**
**आत वसे ते देवलोक, बाहेर वसे ते मृत्युलोक !**
**आम्ही राहतो या दोन्ही लोकींच्या, दूर दूर या दोन्ही लोकीं**
**तेच असू देत गुहेश्वरा,**

प्रभुदेव आपली निंदा करीत गेलेल्यांची विटंबना करतात.

अनुक्रमणिका

६८४

भोजनप्रिय सारे जमले हो भोजनास,
लिंग रहस्य याना कसे होईल अवगत ?
कायाजीवि सारे आहेत हो कळवळधारी,
देवाची वार्ता याना कसे कळणार ?
मद्यपान करून मदांध जोगीगत यांचे बोल,
गुहेश्वरा, तुमच्या शरणांचे हे कसे जाणतील ?

उपसेनापति चन्नबसवदेव विडंबन करून वदतात.

६८५

अतिमथनरूपि शून्य सिंहासनावर चढून,
वदती आम्हीच थोर, आम्हीच देव;
नच जाणती हो आपले आपण.
अद्‌भुत मन भुंजकांचे न रुचे आमच्या कूडलचन्नसंगास.

६८६

धरणीवर संचारणारे सारे भगवे वस्त्रधारी
अठरा पगड जातीच्या घरी जेवून, पावले विनाश,
गिरीवासी जटाधारी सारे फळ वृक्ष सेवनाने झाले हो क्षीण,
वाळलेली पाने खाऊन तप करणारे वायुभिक्षा सेवुन झाले ते हीन.
अतृप्त इंद्रियाना करूनी बंधन संज्ञेच्या राज्यास येऊन,
नरकास जे जाती तयाना थोर न मानी देवा मम मन.
कूडलचन्नसंगमदेवास झाल्यास अमान्य,
ते जाऊ देत त्याच्याच पाठी लागून, मी मात्र नाही हो सोडीत
प्रभुदेवांचे चरण.

सोड्डळबाचरस म्हणतात.

६८७

अरण्यात माजलेला हत्तीचा कळप आनंदानें मौजेत खेळत असता,
सिंह येताक्षणीं मजगज सारे सैरावैरा पळ काढल्यापरि
साकार होऊन सोड्डळ तुमचा शरण, प्रभुदेव येताक्षणीं
पांगापांग झाले हो जमलेले सारे शिवगण.

अनुक्रमणिका

जंगमांचा समूह रागावून गेल्यावर बसवदेव, प्रभुदेवास म्हणतात.

६८८

**देवारे, तव शरण संगचि मज परमसुख होय,**
**देवा, तुमचे शरण अंतरल्यास होतो मज प्राणवियोग.**
**शिव शिवा, आता मज कुठचे हो समाधान ?**
**आता माझी काय गत ? कूडलसंगमनाथ,**
**तुमच्या शरणांचा रुसवा मज पडे, न सोडविता येणारे कोडे.**

६८९

**गुरू रुसल्यास करितो मी एक दिवस सहन,**
**लिंग रुसल्यास अर्धा दिवस करतो मी सहन,**
**जंगमाचा रूसवा क्षणमात्र सहन न होता, जातो हो माझा प्राण,**
**हे कूडलसंगमेशा.**

६९०

**राजा रागावल्यास राहू नये त्या देशांत;**
**पति कोपल्यास राहू नये सति, हे कूडलसंगमेश,**
**कसा हो मी जगू मजवर जंगम कोपल्यास ?**

प्रभुदेव, बसवदेवाना समाधान करीत उपदेश करतात.

६९१

**नको भीति नको धास्ती,**
**कोण गेले ? कोण आहेत ? येथें बसवेशा !**
**एकमुखी बसणारा देव असतो एकच;**
**अनेकमुखी बसणारा देव तोच.**
**नाम अनेक, परि कार्य असे एकच.**
**मनांतील घन अंतरेल का तनु ?**
**गुहेश्वरलिंग वियोगास असे कां अवकाश ?**
**असल्यास मज दाव बा संगनबसवेश ?**

अनुक्रमणिका

६९२

मतीत झाली दुर्मतीची उत्पत्ति.
कलि घर्षणाच्या आधीन झाल्याच्या या बघ रीति.
ज्ञानास अज्ञान ग्रासिल्यावर-झाले ते सूर्य ग्रहणाधीन झाल्यागत.
दुभत्या पशुचे वासरू आईस अंतरून अजाण होऊन
मोहात पडल्यापरि. सांगण्यास युक्त;
ऐकण्यास मुक्त हा असे पहा अज्ञानभाव.
पाण्यावरची लिपी पढणारे असतात का कोण ?
तत्त्व वेद्य सार असल्याविण ?
देवा, आरशात पाहताना असू शकते का भिन्न ?
आरशात दिसणारे प्रकाश बिंब असे ते आपल्या नयनी-
गुहेश्वर ठाव जाणून पहा बा संगनबसवण्णा.

६९३

देवा, अद्वैत अंतरंगात जाणून, बाहेर दासोह विसरल्यास
कसे चालेल ? उभय संदेहात आहे का सत्य ?
तुमच्या शरणांचे दुखल्यास मन, मज कसे हो होईल सहन ?
हे कूडलसंगमनाथ, साप न मरता काठी न मोडण्यापरि
करा देवा तुमचा धर्म !

प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

६९४

एक झाल्याचे दोन होईल का ? दोन झाल्याचे होईल का एक ?
आनंद परवशतेच्या वेळी उद्‍भवावी काही शंका ?
आलेल्या जंगमांची असलेली उपस्थिती न जाणता,
पूर्वीचे आठवून अनेक अपेक्षा असाव्या का ?
तू एका आत्म्यास केल्यास तृप्त, तुझ्या एक लाख
शहाणऊ हजार जंगमाना तृप्त केल्यापरि होई देख,
गुहेश्वरलिंगाची निजस्थिती न जाणता, झालास बा अजाण
संगनबसवण्णा.

बसवदेव कथितात.

अनुक्रमणिका

६९५

हे देव देवा, महाप्रसाद !
तव चरणाविण मज आहे कां हो अन्य स्वातंत्र्य ?
असू शकेल का हो तारतम्य भाव ?
आरशांतील प्रतिबिंब-पहाणाऱ्या मुखास असू शकते का भिन्नभाव ?
चालत येणाऱ्या अनंत संचारात असशी तू एकटाच देव.
तवठायीं लपले आहेत हो अनंत संचार.
तुमच्याकरिता केलेला स्वयंपाक वाढतो मी तुम्हास
देवा, ऐकावे लक्ष देऊन कूडलसंगमेश.

प्रभुदेव म्हणतात

६९६

स्वतः करिता ठेविलेले द्रव्य, आपणास न लाभता,
गिळिले ते समस्त बंधु बांधव, जळला सागर;
मेले अभ्दुत, विरले रणरंग,
रात्र माणिकास गिळून, मरण पावल्यावर,
अमृत पुतळ्यास दूध पिण्यास बोलाविल्यास
गुहेश्वरलिंगास नाहीं जेवण बा संगनबसवण्णा.

६९७

कायात काया झिजून, प्राणात प्राण झिजून
निश्चिंत झाल्यानें-
भूक तहान गेले निवून !
आता जेवणाची ना अपेक्षा, नको म्हणण्याचे नच वैराग्य.
हे स्वभावतृप्तितच आहे गुप्त.
याकारणें आमच्या गुहेश्वरलिंगास नाहीं आरोगण
बा संगनबसवण्णा.

चन्नबसवदेव सांगतात.

६९८

नको म्हणणेच न्यूनता, प्रसन्न होतो म्हणणेच कमतरता !
तिरस्कार-प्रेम या दोन्हीस निपटून
झालो तृप्त म्हणणेच त्यास न्यूनता.

अनुक्रमणिका

कूडलचेन्नसंगमदेव-होऊनी भक्ताधीन
येथवर चालून आल्यावर, देवा आणखी कसला तो शिष्टाचार ?

प्रभुदेव उत्तरतात.

६९९

भक्ताधीन होऊनी आलो नाहीं मी भक्ति  मागण्यास,
मुक्ति आधीन होऊनी आलो नाही मी मुक्तिअपेक्षून,
अशनातुर होऊन आलो नाहीं मी विषय अपेक्षून,
गुहेश्वराचा शरण संगनबसवण्णा हा नसे भक्त,
मी मागणारा जंगम नव्हे, ऐक बा चन्नबसवण्णा.

बसवदेव विनवितात.

७००

तुमच्याशी कसला तो शिष्टाचार मज नाहीं समजत,
मी तव पदी आहे तद्वत.
भक्ति-युक्ति-विरक्तिचा उपचार नाहीं मज समजत,
कूडलसंगमेश्वरा, भिन्न विरहित
भृत्याचारानें आलेले पदार्थ, तुमचेच असल्यानें करावे हो स्विकार.

प्रभुदेव म्हणतात.

७०१

कायारूपि कल्पित सांडून, प्राणरूपि सूतक सोडून,
निजभक्तिस करावे साध्य, त्याविना न होई लिंगानंद वेद्य.
मीकेले, तुम्ही घ्यावे म्हणजेच अज्ञान.
आमच्या गुहेश्वरलिंगाचे चिन्ह निरसून,
निज उरल्याविण, पदार्थ वाढू नये पहा संगनबसवण्णा.

प्रभुदेवास बसवदेव सांगतात.

७०२

विस्मृतींने बनलेली ही खुणाची काया, करूनी आलो धारण.
परि, देवा मज नाही वाटत तो कमीपणा.

अनुक्रमणिका

पूर्वी तुमच्या लीलेनें घेतले होते सहावेळा जनन-
तुमच्या जंगमभक्तिनें त्याचे मी केले हो निवारण.
कायारहित जंगमास प्राणरहित क्रिया-,
नको म्हणण्याचे कारण काय सांगा हो कूडलसंगमनाथ ?

प्रभुदेव उत्तरतात.

७०३

आपण पाळलेला वेताळ आपणासच खाल्ले म्हटल्यागत,
तुझी भवावळी सांगे तोपर्यंत माझी विस्मृति मज होई स्मृति;
माझे पूर्व मज झाले साधन. तुझे वर्म नच मज उमजत,
ते कोणते म्हणजे;
पूर्वी तू काय होतास हे नच जाणल्यानें-
आज तुमच्या घरचे जेवण
गुहेश्वरलिंगास नाही घेता येत बा संगनबसवेशा.

बसवदेव सांगतात.

७०४

देवा, साती भवांतरात शिवभक्त होऊन न आल्यास,
तुमची आण, तुमच्या प्रमथांची आण !
देवा, तुमच्या प्रसादा वाचून नाहीं मी तोंड उघडत ! कारणः
प्रथम भवांतरात-शिलाद गणेश्वर या नावाने बोलावीत
मज करूनी घेतला होता सेवक.
देवा, दुसऱ्या भवांतरात- स्कंदगणेश्वर या नावानें बोलावून
मजवर केलीत, तुमची कृपा.
तिसऱ्या भवांतरात-नीललोहित गणेश्वर या नांवानें बोलावून
ठेविलात तुमच्या लीलाविनोदात.
चौथ्या भवांतरात-मनोहरगणेश्वर या नावाने बोलावून
तुम्हास मन प्रेरक व्हावे म्हणून ठेवून घेतलात.
पाचव्या भवांतरात-काललोचनगणेश्वर या नांवाने बोलावून
सर्वकाल संहार करण्यास लाविला.
सहाव्या भवांतरात,-वृषभगणेश्वर या नावाने बोलावून
तुम्हास चढण्यास वाहन करून घेतलात.
सातव्या भवांतरात-बसव दंडनायक या नावाने बोलावून
तुमच्या शेष प्रसादास योग्य व्हावा म्हणुन ठेवुन घेतलात.
याकारणें हे कूडलसंगमनाथ,

अनुक्रमणिका

**देवा येतो मी, तुम्ही आणलेल्या भवांतरात.**

प्रभुदेवांचे प्रत्युत्तर.

७०५

**पाताळांतील सात भुवने नसण्यापूर्वी, वरची सात भुवने नसण्यापूर्वी,**
**सहस्त्र ब्रह्मांड नसण्यापूर्वी-त्याहूनही पलिकडें,**
**बसवण्णा, तू होतास लिंगभक्त जंगमप्राणी !**
**शशिधराच्या शरणाना वृषधर स्वायत होऊनी,**
**आमच्या गुहेश्वरलिंगास बसवण्णाच भक्त**
**असल्याचे समजले बा मज आज.**

बसवदेव विनवितात.

७०६

**देवा, तुम्ही मज ओळखलात, परंतु कसा मी ओळखू तुम्हास ?**
**तुमची महती जाणून करावे म्हणतो परि,**
**तुमचे घन माझ्या मनास न होई हो साध्य,**
**कोणतीही उपमा न देता येई हो, झालो मी निर्वाच्य,**
**नित्यतृप्त महिमावंत, तुमच्या करिता सिद्ध केलेला प्रसाद.**
**सुचित्ताने स्विकारून मज तारा, प्रभो कूडलसंगमेश्वरा.**

प्रभुदेव म्हणतांत.

७०७

**समताचि माझे काषांबर,**
**सुबुद्धि हीच कानटोपी, विषयरूपि घालुनी खडाव,**
**मदरूपि खड्डयात न पडता, मत्सररूपि विंचु न डसता,**
**क्रोधरूपि लोंडक्यास न ठेचाळता,**
**आला आहे हा गुहेश्वराचा शरण, भक्ति  भिक्षा वाढ बा**
**संगनबसवण्णा.**

७०८

**नच अंतऐशा. देशांतरी केले मी भ्रमण.**
**इतिमिती नसलेले काषांबर करुनी परिधान,**

अनुक्रमणिका

भुकेवाचुन धरुनी कपाल आलो आहे भक्ति भिक्षा मागण्यास,
भुकेजलेल्या गुहेश्वरास, सांग बा संगनसबवण्णा प्रसाद सेवण्यास.

७०९

आहे मी, पौर्णिमेपर्यंत तोंड बंधित केलेल्या चकोरागत.
नाहीं जेवण घेत, हा शास्त्राधार नाहीं मी मानीत.
उपवास व्रताचा शास्त्र नाहीं मानीत लिंगवंत !
निशिदिनी सकल अष्टभोग घ्यावे लिंगदेवास करुनी अर्पित.
करणारे, वाढणारे निजभक्त नसल्यानें नसे मी तोंड उघडित,
करून वाढतो म्हटल्यानें परमानंदाची भूक,
झाली मज अधिक गुहेश्वरास वाढ बा सगनबसवण्णा.

बसवदेव म्हणतात.

७१०

वाढतो मी आकाररहित पक्वापन्न.
वाढतो रुचिरहित पदार्थ न करिता मथन-
वाढतो तुम्हास लिंगास्तव, लिंगपदार्थ अनंगमुख विसरून.
कामरहित, कल्पनारहित, भावरहित, भ्रमरहित
वाढतो तुमच्या ताटात.
सुचित्त समाधानाने करा देवा स्विकार, कूडलसंगमेश्वभर.

प्रभुदेव म्हणतात.

७११

तुमची लीला, तुमचा विनोद; तुमचे विशेष वाद्य, तुमची मुरली,
मज हे हवे वा नको असे मी नाहीं म्हणत !
वीज धरणीवर पडताना विचारते कां या लोकीच्या जना ?
उदराग्नि या धरणीवर पडताना विचारते का भूतळास ?
गुहेश्वर अल्लमप्रभुची निरूपम महिमा आहे बा अशी
तुला जसे वाटते तसे करावे, मी पाहिजे वा नको नाहीं म्हणत.

बसवदेव विचारतात.

अनुक्रमणिका

७१२

करणें, करवून घेणें या दोन्हीमध्यें आहे का तारतम्य भेद ?
देवा, देह हा प्राणाच्यासंगे आहे विना ?
तुला वाटते तसे कर, तुला वाटते तसे वाढ.
मला काहीं समजत नाहीं, असे म्हणणें तुम्हास
योग्य वाटते का ?
करण्यास, वाढण्यास सांगून करवून घ्यावयाचे सोडलात-
हाताने कालवल्यानें तोंडास भीड वाटते कां कूडलसंगमनाथ ?

प्रभुदेव म्हणतात.

७१३

धनवानाचा पेव उघडेपर्यंत गरिबांचा जातो प्राण,
या म्हणीची मज झाली आठवण !
वाचाडंबरात चालली वेळ ! तुझ्या अघळपघळ बोलीस ना अंत,
एकास पाहताना, होत आहे साठजणास पाहिल्यागत.
शुन्यसिंहासन गरगर फिरत आहे भोवऱ्यापरि;
जात आहे प्राण मस्तकाच्या मागील भागांत !
गुहेश्वरास लागली रे भूक संगनबसवण्णा वाढ बा पदार्थ.

बसवदेव सांगतात.

७१४

शुद्ध आहे म्हणावे ? तर मी नाहीं सुयिधानी
सिद्ध झाले म्हणावे ? तर मी नाहीं अवधानी
सुयिधान-अवधानाचे अर्पित, हे मज मुळातच नाहीं समजत,
आहे तसे ते मी वाढत आहे, आले तसे घ्यावे बा कूडलसंगमनाथ

प्रभुदेव म्हणतात.

७१५

होय होय ! विनय असावे बा असेच ! भलेरे बसवा ! भले !
जाणकार म्हणवून घेतो कां कधी आपणास जाणकार ?
लिंगवंतांची थोरवी अशीच असावी !
गुहेश्वराची भूक शमविण्याची रीत,

अनुक्रमणिका

**तुजविण या महितळात ओळखणारा आहे का अन्य कोण ?**
**सांग तूच बा संगनबसवण्णा !**

बसवदेव सांगतात.

७१६

**अभिषेकाच्या समयी सदाचार सत्क्रिया या भूमीवर,**
**सर्वशुद्धहेचि गोमय आणुन, विनयार्थ रूपि**
**उदकाने करूनि संम्मार्जन.**
**तनु अवगुणास बारीक कांडुन त्याची रांगोळी घालुन,**
**अकाया या कळशीत परमानंदचि भरुनी उदक,**
**समरसानें करुनी अभिषेक,**
**हृदयकमल पुष्प वाहून, सौख्यतर शांति गंध लेपन,**
**अक्षय चि अक्षता झाले अंतर्गत, सद्भाव धूप समर्पित,**
**सुज्ञानचि निवाळी ओवाळित, नित्यनिरंजनीच ओवाळुनी निरांजन,**
**ब्रह्मनादचि वाजवुनी घंटा, नित्य लिंगार्चनास**
**करुनि नैवेद्य; याचे वर्म, कर्म, स्थिती गति जाणून,**
**शिवलिंगार्चन करणारा मी या मृत्युलोकीं नाहीं पाहिला कोण !**
**कूडलसंगमेशा, प्रभु येऊन शिवलिंगार्चन केल्यास मीच**
**होतो हो परिचारक.**

प्रभुदेव आपल्या करस्थलाच्या शिवलिंगास अशा प्रकारे अष्टविधार्चन षोडशोपचार पूजा करीत असताना निवाळी ओवाळीत गातात.

*राग : ललित*

**मंगल मंगल गुहेश्वराचा शरण लिंगैक्या तुज ॥ धृ ॥**
**जगास करुनी ग्राम ग्रामास करुनी घर**
**तेथेच वावरणारा पहा हा संचार**
**संचाराची रीत न जाणता**
**देवलोक-मृत्युलोक समस्त पडले भ्रमांत ! ॥ १ ॥**

**चौऱ्याऐंशी लक्ष योनि मुख जीविना**
**चौऱ्याऐंशी लक्ष आराधना !**
**एकेक आराधना एकही न उमजता**
**झाले कि हो लय पडुनी गोंधळात ॥ २ ॥**
**न जाणीहो भक्ति युक्ति।, न जाणी षोडशोपचार**
**न जाणी भावसंकल्प विकल्प**

अनुक्रमणिका

नाम-सीमा सारे नेमके निवारून
होती भुवनें कंपित तयास ॥ ३ ॥
कुल निरसुन अहंगर्व निपटुन झाल्यास सुस्थिर
सूत्र जंत्र झाले परिहार
फलसिद्धी संपदा, निष्फल सिद्धी सांडून
आणिला तो मृत्युलोकी भक्तांगना ॥ ४ ॥
गेल्यानें मध्यस्थान लोकी
पहा हो नसे तयास पुनरपि जनन
तनुरुचि विसरून घनरुचि अवग्रहण
आपल्यासम केले ह्या गुहेश्वरलिंगास ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

# १९

प्रभुदेवांच्या भोजनाचे पात्र :

७१७

**अंग सामावलेल्या लिंगास अंगचि असे ताट !**
**प्राणावरच्या लिंगास मनचि असे ताट !**
**जाणाच्याही वरच्या लिंगास निर्भावचि ताट !**
**कूडलसंगमदेवा, प्रभुदेव भोजन करण्याकरिता**
**भक्ति पात्राविण अन्य ताट मज नाही हो माहित.**

ताटात सर्व पदार्थ वाढल्यावर प्रभुदेव म्हणतात.

७१८

**घन अशा ताटात, केलेला एक विध अन्न सामावुन,**
**नानाविध पदार्थ विधविध रीतिने आल्यानें**
**पाहण्याआधीच ते झाले रूप अर्पित.**
**शिवण्याआधीच झाले स्पर्श अर्पित.**
**चव घेण्याआधीच झाले सुख अर्पित.**
**घेरे घे आता लिंगदेवा !**
**तुझ्या आवडीचे पदार्थ, तूच अर्पिल्यास तुझ्या घनास,**
**माझ्या आवडीचें पदार्थ मी तुज अर्पितो**
**गुहेश्वरा, तुजला भरपूर आहार वाढण्यास आहे मी समर्थ**
**मजला तुजला आहे हा संगनबसवण्णाचा प्रसाद,**
**घे जेव आता देवा.**

७१९

**देहास केलेले अर्पित ते नव्हे अर्पित;**
**प्राणात केलेले अर्पित ते नव्हे अर्पित;**
**भावात केलेले अर्पित ते नव्हे अर्पित;**
**जाणिवेने केलेले अर्पित ते नव्हे अर्पित;**
**स्मरणाविण अवधान, विस्मरणाविण भोजन.**
**व्हावे, न शिवता न स्पर्शिता अर्पित.**
**गुहेश्वर लिंगाचे भोजन आज मी देखिले बसवण्णाच्या योगे**

अनुक्रमणिका

बसवदेव सांगतात.

७२०

**हात भरभरून आहार वाढल्यास करित आहे स्विकार मनभरून**
**होय ते खरे आहे स्वामीची भूक या लोकी आहे नाविन्यपूर्ण**
**कूडलसंगमदेवास लागली भूक अपार वाढतो मी सूप भरभरून.**

७२१

**सुपाने वाढल्यानें तोंडभरून घेत आहे आहार.**
**होय होय दुसरे काय ? देवाची भूक आम्हास नाविन्यपूर्ण नाहीं,**
**दिश दिशा समस्त विश्वतोमुख असा हा होय**
**कूडलसंगमनाथ यास वाढा हो दिशदिशात.**

चन्नबसवण्णा कथन करतात.

७२२

**अनाहत स्थलात शिव हा-आपल्या लीला विनोदानें-**
**तुम्हासहित झाला साकार. बाहेर धारण करुनी आकार.**
**आतल्या निरवयास भोजन करविण्यास्तव,**
**कूडलचन्नसंगमदेव, प्रभुदेवांच्या अपरिमित भोजनास,**
**बसवण्णा-मडिवाळ या दोघास बाहूरूपाने केला धारण**
**यास मी देऊ कोणती उपमा ?**

७२३

**तनुमुखास्तव वाढणारे अन्न परिपक्व होऊन सामावण्याआधी**
**पुरले ते मनमुखास.**
**मनमुखास वाढलेले अन्न परिपक्वप होऊन सिद्ध होण्याआधी देखताक्षणीं**
**झाले हो ते दिसेनासे.**
**आकाश तोंड वासल्यापरि करीत होता भोजन.**
**स्वयंपाक करविणारा महिमा पुरुष आहे का अन्य ?**
**कलिदेवरदेवाचे रहस्य जाणून वाढणारा**
**संगनबसवण्णाविण अन्याना न होई हो साध्य.**

हडपद अप्पण्णा सांगतात.

अनुक्रमणिका

७२४

मोठे टोपले भरून, सूप भरून,
कडधान्य निवडून भरलेल्या टोपलीनें,
मोठे भांडे भरभरून, चोहीकडून आणून वाढत असता
आश्चर्यकर रितीनें करीत होता स्विकार.
दश दिशेनें वाढत असता त्या समस्त दिशा
तोंड होऊन स्विकारित होता,
वाढताना जिकडे पहावे तिकडे तोंड असून सारखे
चावून खात आहे एक पळभर विलंब केल्यास-
तांदळाच्या कण्या, तांबा, भुस्सा इत्यादि वाढत असता
क्षणभरांत उरत नव्हते. भक्तिनें सारे बांधव आपापल्या मठांतले
स्वयंपाक आणून ओळी ओळीनें वाढत होते.
ऐसे अद्भुत भोजन पाहाल, स्वयंपाक लवकर करा
लवकर करा म्हणतात
बसवप्रिय कूडलचन्नसंगय्याठायीं, संतोषाने इकडे तिकडे
फिरत होता माझा परमगुरू संगनबसवण्णा.

बसवदेव आनंदाने सांगतात.

७२५

हे काय अद्भूत ! आज माझ्या नयनास लाभले हो मंगल.
एकदा असे एकदा तसे हा भ्रम नाहीं त्याच्यात.
हे पाहिजे हे नको म्हणण्याची चिंता त्याच्यात नाही.
चंचल दृष्टि, भाषा अलंकार निवारून,
संचार करण्याचे कष्ट परिहारास्तव आला आहे.
पाहणाऱ्यांच्या मनाचे सुखसागरनिधीस देऊ हो मी कोणती उपमा ?
मम उभयकर्म करूनी निवारण, आपल्याठायीं देण्यास ठाव.
आला आहे, हो माझा कृपामूर्ति कूडलसंगमदेव.

७२६

दरडावतो हो संगमेश, भय दावितो, झिडकारितो हा संगमनाथ,
श्रद्धेनें प्रीतिनें सहकरल्यास मिळुन खेळतो माझा संगमनाथ,
करितो समाधान संगमेश, तळमळण्यालावी संगमनाथ,
दुसऱ्यांच्या करवी छळितसे संगमनाथ, देतसे तो व्यथा,
पारखून पाहतो संगमनाथ आत बाहेर न म्हणता !
कूडलसंगमनाथ, मज नसे हो भय मडिवाळमाचिदेवांची

अनुक्रमणिका

**मजवर कृपा असें पर्यंत.**

माडिवाळमाचीदेवांचे उत्तर.

७२७

**न होई माचिदेवांच्या हातून, न होई इतरांच्या हातून.**
**मन मानेल तसे न येई वागता,**
**असावे बिंबविण्यागत, असावे अति अद्‌भुत.**
**जागृकतेनें अंतरी न विस्मरिता असावे हो निर्भीत.**
**पल्लट न होता प्रीत व्हावी आश्चर्यकर भक्तिभरित.**
**वीर हा फिरवित तलवार पुढें सरसावतो विना**
**छडीच्या आधाराची आशा असते कां तयास सांग बा !**
**कलिदेवरदेवाच्या गुरकावण्यास-धमकीस घाबरू**
**नकोस, बांधा बा वीरकंकण संगनबसवेशा.**

बसवेश्वरांचे प्रत्युत्तर.

७२८

**स्वयंपाकाचे पदार्थ संपले म्हणून मी घाबरल्यास**
**वाहतो तुमची आण, तुमच्या प्रमथांची आण,**
**सीदा पदार्थ वेळेवर न देता आल्याने,**
**मन व्याकुळतेने झाल्यास भयभीत, तुमच्या भक्ताना**
**मी नाहीं हो आवडणार,**
**पदार्थ संपल्यास झटकन अर्पितो मी मम काया.**
**शेवट पर्यंत नच पुरविल्यास, मडिवाळमाचिदेवाच्या**
**पादसाक्षीनें कूडलसंगमदेवास होतो मी दूर.**

७२९

**सिद्ध झालेले पदार्थ अर्पणास झाले हो योग्य.**
**सिद्ध होण्याआधीच स्विकारीत आहे माझा शिव.**
**आधीं केलेले पदार्थ होऊ द्या अर्पित.**
**कूडलसंगमनाथाच्या भोजनाच्या आतुरतेस**
**कडधान्याची सामग्री काढा पाहूं सोड्डुळबाचरसा.**

सोड्डुळबाचरस सांगतात.

अनुक्रमणिका

७३०

याहो, हिशोबनीसानों, सांगा तुम्ही हिशोब,
धान्य कडधान्य संग्रहाचा.
नवी ज्वारी साठ लाख खंडी, साळी धान्य तीस लाख खंडी,
गहू बारा लाख खंडी, हरबरा बत्तीस लाख खंडी,
मूग तीस लाख खंडी, राळे, उन्हाळी भात पीक, बरगें, भगर,
मोहऱ्या इत्यादि धान्य पांच लाख.
नवीन सुगीच्यावेळी आलेले धान्य होते अगणित.
महादानी सोड्डळाच्या भोजनाच्या आतुरतेस
विनियोग झालेल्या स्वयंपाकाच्या पदार्थाचा हिशेब हा
असा आहे परिसावे हो संगनबसवण्णा.

बसवदेव सांगतात.

७३१

हिशोब न झालेले कडधान्याचा स्वयंपाक क्षणार्धांत
संपल्याचे, गणना करता नाही येत.
वाढत असता बघण्याआधीच झाले ते अर्पित.
याप्रकारें मोजून मापून वाढावे म्हटल्यास
मनास नसे साध्य, आकाश तोंड वासल्यागत,
कूडलसंगमनाथ आहे स्विकारित.

७३२

लाडू, कानवले, मांडे, पोहे, गूळ, मनुके, साखर-समभाग.
नव्या मुगाचे खाद्य बारा खंडी.
सोलाण्याच्या पोळ्या अठरा खंडी, अकाली आंबे चोवीस लाख.
अपार केळी तेहत्तीस लाख खंडी,
चारोळी चौऱ्याऐंशी खंडी.
( तवराज ) अत्यंत गोड साखर घट्ट तूप, फणस,
मनमुक्त साय अठरा खंडी, खारीकाच्या पोतीस
दुधाच्या घागरीस नसे गणती,
मनास हवे ते गोड पदार्थ जेवा हे देवा,
कूडलसंगमदेवा.

अनुक्रमणिका

७३३

हातानें स्पर्शिता पदार्थ होतसे ऐक्य हातात.
दृष्टि निरखिता पदार्थ, होतसे ऐक्य दृष्टीत.
जीभ स्पर्शिता पदार्थ, ऐक्य होतसे जीभेंत.
वाढणारे सेवक कंटाळले,
जेवण करीत असलेला देव आहे हे त्यांना नाहीं माहीत.
ब्रह्मांड आपल्या पोटात सामावून घेऊन आलेल्या या देवास,
भोजन करवितो, या अहंकारात मी असल्यानें काय सांगू ?
झाली माझी ही दुस्थिती !
कूडलसंगमनाथाच्या तृप्तिची रीत तुम्हास अवगत असल्यास
मज सांगा हो माडिवाळमाचिदेवा.

मडिवाळमाचिदेव म्हणतात.

७३४

भ्रमित झालास का बसवण्णा ? तुज कसे कळेना ?
शेजारच्याना जे नच ओळखती ती असती गूढमती.
ही म्हण झाली खरी.
जगाच्या विस्तारास विस्तारातीत देवास
संज्ञेस आलेले पदार्थ हाती कां लागतात ?
वाढण्यास एकटाच नाहीं पुरत, करण्यास ना अंत;
येथेंच तुझ्या भक्तिंची झाली कमतरता.
कलिदेवरदेवाच्या तृप्तिची रीत, असे चन्नबसवण्णास
अवगत, करा विचारणा संगनबसवण्णा.

बसवेश्वर सांगतात.

७३५

धन मद, स्वयंपाक मद आवरल्यानें शेवटास नाही पोहोंचले.
हस्त परिसानें स्पर्शून केलेले पदार्थ संपले.
दृष्टि परिसानें पाहून केलेले सारे पदार्थ झाले नाहींसे.
वाक् परिसानें बोलून केलेले सारे अंतरले पदार्थ.
मन परिसाने स्मरून केलेले सारे झाले स्थगित.
भावपरिसाने भावनेचे पदार्थ सारे निर्भावाकडें नच वेधलें
अशा पंच परिसानें स्पर्शून वाढलेले पदार्थ सारे
दिसण्याआधीच पावले अमळोक्य.

अनुक्रमणिका

कूडलसंगेमदेवाची तृप्ति मी जाणली म्हटल्याने
झाली माझी हानी देख.

७३६

अदृश्य सिंहासनावर सांगता न येई, ऐसे घन खाली आल्यानें,
दिसून शोभणारा संगमनाथ गेला हो उडून.
वाढल्याचे, वाढत असल्याचे स्वयंपाक सारे झाले निरवय.
केलेले, करीत असलेले स्वयंपाक पुन्हः पाहण्यास नच मिळेल
काय सांगू मी या अनियमाच्या चरित्राचे ?
देऊ कोणती मी उपमा या विस्मयास ?
कूडलसंगमेशाच्या तृप्तिची रीत अवगत असल्यास
सांग बा मज चन्नबसवण्णा.

चन्नबसवदेव सांगतात.

७३७

पंचशतकोटी भूमंडल आदिकरून.
नवखंड पृथ्वि सारी दडली एका भुवनात,
ऐशी चौदा भुवनें अंतर्भूत झालेल्या महाघनास,
स्वयंपाक करून वाढतो म्हणणें, या धनीच्या
विसरभोळेपणास म्हणावे तरी काय ?
कूडलचन्नसंगमदेवाच्या तृप्तिची रीत जाणून प्रसन्न
करण्याचे असल्यास, तू अन्न हो, मी होतो जिन्नस !
याहून अधिक नसे कोणतेही घन पहा संगनबसवण्णा.

बसवदेव म्हणतात.

७३८

मम कायेचा काळोख विरला, चन्नबसवण्णा आजपासून.
मम तनु मन धनाचा लोभ निरसून झाली चिंता दूर,
चेन्नबसवण्णा आजपासून.
माझ्यातला अहंकार झाला लोप, चन्नबसवण्णा आजपासून.
कूडलसंगमदेवाच्या तृप्तिची रीत, तू मज दाविल्यानें
बचावलो मी चन्नबसवण्णा.

अनुक्रमणिका

चन्नबसवदेव म्हणतात.

७३९

तुम्ही माझी प्रशंसा करता अव्याहत.
मी तुम्हास वाखाणतो सतत.
एकमेकास वाखाण्यातच जातसे वेळ,
परि, भुकेजला आहे संगमनाथ, अजूनी त्यास वाढले नाहीं पदार्थ,
कूडलसंगमनाथास, स्वयंपाक सिद्ध करून घेऊन
चला हो संगनबसवण्णा.

बसवदेव सांगतात.

७४०

धन संपल्यास अर्पितो मी तन,
तनु क्षीण झाल्यास अर्पितो माझे मन,
मन झिजल्यास अर्पितो भाव, भाव जीर्ण झाल्यास अर्पितो हो निर्भाव,
कूडलसंगमनाथ, चन्नबसवण्णा असल्याने रक्षक
मी तुमच्यात झाल्यानें एक, होऊनी अर्पित देवारे, झालो मी पुनित.

७४१

आदिच्या लिंगास आणिला हो अल्लमप्रभु.
अनादि लिंगास आणिला अल्लमप्रभु.
भले रे जंगम ! निरवयलास अवग्रहिलात.
तुमच्याकरिता करीत असलेला स्वयंपाक करितो मी
करणीरहित, वाणीविरहित.
सकल कुळास तूच आहेस म्हणून अल्लमप्रभुच्या प्रसादास
पसरितो मी हात. नवब्रह्माच्या आळीत विराजे अल्लमाची प्रभा !
रूद्रभूमीतही अल्लमाचीच प्रभा !
भूतळी येऊन स्थिरावलेल्या निजस्थितीस अल्लम्माप्रभुचीच प्रभा;
स्वयंपाक शेवटास न गेल्यास स्वतःलाच अर्पितो मी तुज
कूडलसंगमनाथ.

अनुक्रमणिका

७४२

देव देवा महाप्रसाद, परिसावी देवा मम विनवणीः
अतळ-वितळ-सुतळ-तळातळ-रसातळ, महितळ
पाताळादिच्या पलिकडे तुमचे श्री चरण !
भूलोक- भुवर्लोक-स्वर्लोक-महर्लोक-जनोलोक-तपोलोक-
सत्यलोकादिच्या पलिकडे तुमचे उत्तमांग !
तरुमध्यें अग्नि असून घर्षणाने प्रकट होऊन आहुती झाल्यापरि
सर्वकर्ता नित्यानंदमय तू आहेस, भक्तिलीला विनोद कूडलसंगमेश्वरा
सुचित्तानें मन अनसूट आहार करा देवा स्विकार,

७४३

काळ नच स्पर्शित स्वयंपाक ! कल्पित विरहित स्वयंपाक !
कल्पित रहित स्वयंपाक !
अनंतरति या वनितेने न स्पर्शिलेला हा स्वयंपाक !
भाळलोचन या जंगमाने न स्पर्शिलेला स्वयंपाक !
कोणीही न स्पर्शिलेला स्वयंपाक करितो मी तुम्हास अर्पित,
स्विकार करा बा प्रभो, कूडलसंगमनाथ.

चन्नबसवदेव कथन करतात.

७४४

म्हणती अंग हे लिंगाचे ताट;
परि अंग नसे लिंगाचे ताट,
कायागुण निरसून, माया तमंधास निपटून,
मनरूपि घनताट उजळून, षडाधार चक्ररूपि आडणी
ठेवून सकल इंद्रियरूपि ताटाजवळ लहानशी
चंबु ठेवुन, सुज्ञान प्रकाशरूपि दीपस्तंभ उजळुन
सकल करणेंद्रियेंरूपि वरच्या साधनेस धरून,
सद्भक्तानंदरूपि आहार वाढून,
विनय विवेकरूपि वाढुनी तूप. प्रसन्न संतोषचि महारूचिरूपि
सुंदर दूध पेढा आणून ठेवून,
सुचित्त जागृकतेनें तुमच्या हस्ताने लक्ष देऊन सिद्ध झालेले करा
स्विकार;
बसवण्णाच असे भात, मी होऊनी कडी ( सार )
तुमच्या ताटांत आम्हीं झालो समर्पित,
करावे देवा भोजन हे कूडलचन्नसंगमनाथ.

अनुक्रमणिका

७४५

कायारूपि मडकें, करणेंद्रिये कडधान्य,
तयास चैतन्य हेचि जल, समताचि झाकण,
धृतिरूपि जळण, मतिरूपि अग्नि पेटवून
बहिर्ज्ञानरूपि पळींने गरगटून, पक्ककरून
भावनेंत बसवून संतोष हाच आहार, वाढतो तुज
हे कूडलचन्नसंगमेश्वर.

७४६

नयनाश्रयाच्या स्पर्शाचे सुखसंबंध महान् आश्रयास आणून
एक थेंबही न सांडता करितो तुम्हास अर्पित.
नासिक घ्राणाचे आश्रय मालिन्य न करिता न शिवता
करितो देवा तुम्हास अर्पण.
भुकेजून प्रयत्न करणारे चराचर चैतन्यात्म्याच्या घनलिंगास
आणुनी मध्यांत करतो तुम्हास अर्पण
गुरुलिंग प्रसाद-शिवलिंग प्रसाद-शरणप्रसादि
महान् अनुभाव प्रसादि, झालेला जंगमच लिंग असल्याचे उमजून,
कूडलचन्नसंगा बसवण्णाच्या प्रसादाने
झालो मी प्रसादि, त्यायोगें मी तुम्हास प्रसाद झालो हो,
करावे आतां भोजन हे प्रभो.

७४७

हे देवा, तुम्ही सिद्ध करून दिलेले पदार्थ करतो मी तुम्हास अर्पित,
तुमचे भोजन म्हणजे महाभोजन. सकल गुणाना असे हितार्थ.
हे कूडलचन्नसंगमनाथ, तुज नसे भूक, त्यायोगें केले नव्हते तुज अर्पित.

७४८

गुरूच भात, शिष्यच कडी; लिंगास हे पदार्थ झाले अर्पण,
घनास मन अर्पण, मनास महान् अर्पण !
घनात मन झाले हो तल्लीन, आता अर्पण करणारा भक्त उरे कोण ?
जेवणारा देव आहे कोण ?
नित्य तृप्तच जेवण्यास शिकल्यावर, देवा अर्पण करणे
साध्य आहे कां अन्य ?
कूडलचन्नसंगमदेवा, बसवण्णाच अन्न, मीच पदार्थ !
हे प्रभो, सुचित्ताने कराहो भोजन.

अनुक्रमणिका

प्रभुदेव तृप्त होऊन सांगतात.

७४९

**मनमुक्ति विवेकचि तांदुळ, रहस्य रूपि उखळात घालून,**
**अभिन्न मथन या मुसळानें कांडून,**
**किल्मिष भुसा पाखडून, समतेचा चाळणीनें चाळून,**
**त्याज्य असलेचे खडे काढून, दयामृतचि दूध भात करून,**
**समरसानें रूचकर करूनी शाक पाक;**
**स्मरणाचे उत्साद झाले तूप, निर्मलतेचे ताक घुसळुन**
**राखून ठेवलात.**
**पंचेंद्रियेरूपि कुत्री न शिवण्याजोगें राखून ठेवलात !**
**षड्वर्गरूपि मोलकरीण न शिवण्याजोगें राखून ठेवलात !**
**अष्टमदरूपि मुले न शिवण्याजोगें ! असले मुख्य हीन सारे.**
**न शिवण्याजोगें राखून ठेवल्यानें, हा आहार**
**गुहेश्वरलिंगास अर्पण झाला पहा चन्नबसवण्णा !**

७५०

**परिपूर्ण आहार, परिपूर्ण आहार म्हणत, सारे जग झाले हो भ्रमित !**
**परिपूर्ण आहारचि सत्य असल्यास**
**मृत्युलोकी करता येईल का संचलन ?**
**चतुर्विध अर्पणात कोणते आहे परिपूर्ण हे न जाणती**
**गुहेश्वरलिंगाठायी, परिपूर्ण आहार झाले हो साध्य चन्नबसवण्णास.**

प्रभुदेव, बसवदेवास सांगतात.

७५१

**बसवेशा, आज झाली मम तनु शुद्ध !**
**मम मन शुद्ध झाले आज बसवेशा !**
**आज माझी भक्ति-युक्ति-मुक्ति झाली शुद्ध बसवेशा.**
**हे सारे शुद्ध झाले बसवेशा आज.**
**आमच्या गुहेश्वर लिंगास तूं आदि आधार झालास की संगनबसवण्णा !**

प्रभुदेव, चन्नबसवदेवांचे स्तवन करतात.

अनुक्रमणिका

७५२

बसवेशा, तुजला सात जन्म, मजला चार जन्म,
चन्नबसवण्णास एकच जन्म
तु गुरू म्हणवून घेऊ नकोस. मी जंगम म्हणवून नाहीं घेत.
आम्ही दोघेही चन्नबसवण्णाचा शेष प्रसाद घेतल्यास.
संगनबसवण्णा, गुहेश्वर साक्षीनें आमचे झाले भव नास्ती.

बसवदेव सांगतात.

७५३

न दिसणारे घन दावियले करस्थली,
न सांगता येणारे घन, दावियले मनस्थली.
उपमातीत घनास, दावियला तव तृप्तिमुखी,
हे त्रिविध एकार्थ, असल्याची रीत, चन्नबसवण्णानें
मज दाविल्यायोगें मी वाचलो हो हे कूडलसंगमदेवा !

प्रभुदेव, चन्नबसवण्णांची स्तुती करतात.

७५४

गुरू शिष्यामध्यें जन्मले पहा एक मूल !
गुरूस गुरू झाल्याची रीत ती कोणती ?
शिष्यास शिष्य झाल्याची रीत ती कोणती ?
आदिच्या लिंगास साध्य करून दाविलेला
गुहेश्वरलिंगाचा शरण चन्नबसवण्णास करूनी वंदन,
जगतो मी पहा संगनबसवण्णा.

७५५

गुरू हस्त स्पर्श झाल्यानें अदृष्ट करणांच्या वरचे पूर्वाश्रय
होतसे निवारण म्हणणे हे नसे उचित
पंचेंद्रियांचे लिखित खोडून लिहावे हो लिंग लिखित-
शिष्याच्या हातीच आहे विना न होई गुरूच्या हातून.
भवीनें केलेला आहार भक्त न बघण्यापरि,
अर्पणाची रीत जाणून, प्रसादाचा पूर्वाश्रय निरसून
आकारास आणतो म्हटल्यास ते न होई साध्य चन्नबसवण्णा वाचून.
गुरू वाचून शिष्य, शिष्या वाचून गुरू, असती ते या दोन्हीच्या अतीत.
गुहेश्वरलिंगाठायी सहज पावला हो उदय.

अनुक्रमणिका

**अशा आमच्या या शरण चन्नबसवण्णास म्हणतो मी नमो नमो.**

बसवदेव, चन्नबसवण्णांची स्तुती करतात.

७५६

**लौकिकांच्या इच्छेनुसार नाहीं वागत, लौकिकांच्या इच्छेनुसार**
**नाही बोलत, लोक विरहित शरण,**
**शरणविरहित लोक असल्याचे आले हो आढळून !**
**लिंग झाले वासस्थान, जंगमचि स्वायत होऊन,**
**प्रसाद झाले प्राण, परमानंदात राहती शरण.**
**देवा कूडलसंगमनाथ, तुमचा शरण चन्नबसवण्णास म्हणतो मी**
**नमो नमो.**

चन्नबसवण्णा बसवण्णांची स्तुती करतात.

७५७

**अंगावर आचारलिंगचि झाले प्राणलिंग.**
**प्राणावर जंगमलिंगचि झाले प्राणलिंग.**
**आत्म्यावर स्म्यकज्ञान लिंग झाले प्राणलिंग.**
**अशा त्रिविधास त्रिविध प्राणलिंगीं झालेल्या,**
**आमच्या कूडलचन्नसंगमदेवाचा शरण संगनबसवण्णास**
**म्हणतो मी नमो नमो.**

७५८

**झिजली तनु गुरूठायी, उगाळिले मन लिंगाठायी,**
**झिजले धन जंगमाठायी,**
**झाली हो तनु गुरू, झाले मन लिंग, झाले हो धन जंगम,**
**हे त्रिविधही झाले ऐक्य, त्याठायी झाला निजभरित,**
**कायाधारक असून झाला कर्मरहित,**
**कूडलचन्नसंगय्याठायी आहे हो संगनबसवण्णा उपमातीत.**

चन्नबसवण्णा प्रभुदेवांची स्तुती करतात.

अनुक्रमणिका

७५९

घरातील आगीने जाळिले कानन,
कानन जळल्याने, लागली घरास आग !
जळुनी घर जळले खांब, त्या खांबावर एक रत्न असल्याचे पाहिले.
त्याची प्रभा व्यापिली कीहो तिन्ही लोकी !
या कारणे कूडलचन्नसंगाठायी
प्रभुदेवांच्या निजस्थितीस करतो मी वंदन.

७६०

अंगाठायीं लिंग विरून, लिंगाठायीं अंग विरून,
यायागों तनु उपाधि तयास नसे जाण !
उभारल्याजागी नच साऊली, संचारास नच पाऊले.
अपरिमित महिमावंताचे काय सांगू गूढ ?
शब्द जाणकार असूनही, नसे तो जवळचा,
गति धरूनही नसे आरूढ.
या दोन्हीस नुरूनी उरलेला आहे तो निश्चिंत, आपणात आपणचि
निज असणाऱ्या कूडलचन्नसंगमदेवाठायीं, प्रभुदेवांच्या चरणी
म्हणतो मी नमो नमो.

अशा प्रकारे प्रभुदेव, बसवदेव, चन्नबसवदेव एकमेकांची स्तुती करीत असताना बसवदेव, प्रभुदेवांना विचारतात, एक लाख शहाणऊ हजार जंगमांचा रुसवा का झाला हे मजला समजावून सांगावे.

७६१

**चंद्रमा अमृतकर असुनही, नाही सुटले हो तयाचे आतील कलंक !**
**सूर्य हा महाप्रकाशमान असूनही अस्तमान अस्तंगत**
**या उणिवेतून नाहीं झाली त्याची सोडवणूक !**
**मी तव कृपेस पात्र होऊनही, झाले निरर्थक,**
**तुमचे शरण मजवर रागावून गेल्यानें !**
**हे कूडलसंगमेश्वरा, तुमच्या शरणांच्या मनात**
**मजवर कृपा करण्याची प्रेरणा करून परत येण्याजोगे करावे देवा.**

तेव्हा प्रभुदेव जंगमांची विडंबना करतात.

७६२

**जंगमाना म्हणावे घन ? तर ते हात पसरून झाले सान.**
**लिंगास म्हणावे घन ? तर तो घडविणाऱ्याच्या हातून घडवून**
**घेऊन झाला सान.**
**भक्तास म्हणावे घन ? तर ते तनु मन धन वंचक होऊन**
**झाले सान. या त्रिविधात ना परमानंद ना परमार्थ,**
**गुहेश्वरलिंगाच्या घनाचा जाणकार आहे कां कोण ?**
**सांग मज संगनबसवण्णा.**

७६३

**तनुस नागडें केल्यानें काय प्रयोजन-मन निर्मळ झाल्याविण ?**
**मुंडन करूनी काय प्रयोजन-निर्भाव झाल्याविण ?**
**भस्म धारण करूनी काय प्रयोजन-सकल करणादि गुण**
**पायतळी तुडवून जाळल्याविण ?**
**अशा या आशाभरित वेषधारी भाषेस संगनबसवण्णा,**
**गुहेश्वरसाक्षीने म्हणतो मी छी.**

अनुक्रमणिका

७६४

आशारूपि सुळांवर बसवुनी वेषधारी प्रेत,
पहा हो ! धरणीवरचे सारे पुढारी इहलोकी गेले झिजून !
आशेस देऊनी थारा वावरणाऱ्या नेत्याना पाहून,
गुहेश्वरलिंगास आला किळस, बा संगनबसवण्णा.

७६५

आचार न जाणता, क्रियाचार न अवगत,
द्रव्यव्यामोह न त्यजिता, कोप न लोपता, ताप न तोडता,
नुसत्या भिजलेल्या बाजेगत फुगून,
मस्तीत मग्न झालेल्यांच्या दुर्दशेस पाहून,
झालो मी विस्मित पहा हो गुहेश्वरा.

७६६

स्वय न जाणती, न ऐकती दुजांचे
साहीचे रहस्य कोणते हे न जाणती,
आठाचे कंटकमुळीच नच अवगत.
चढलेली गिरी उतरण्याचे नसे जाणत,
यास म्हणावे तरी काय हे गुहेश्वरा.

७६७

जाणकार शरणाना नसे हो क्रमबद्ध व्रताचार बंधन,
सहजा चरणाना नसे हो लिंगाची गरज,
लिंगविरहित शरण संचार, जंगमाचे विपरित चरित्र असे.
पहा होते नसे प्रकट होत !
संसारीच्या व्यवहारीक कक्षेंत नाहीं तो सापडत.
खोटे अवलंबून, सत्यास विसरून,
निराकार लिंगास आकारास आणून,
पुजणाऱ्यास-आहे आचार, असल्यानें आचार असावा गुरू,
गुरू असल्यानें लिंग पाहिजे, लिंग पूजकाना असे भोग !
फोल बडबडून रंगविणारे झाले सारे पूजक.
गुहेश्वरलिंग तेथें नसल्याचे कसे हो कळणार या वेषधारी दांभिकाना
सांग बा तूच संगनबसवण्णा.

बसवदेव उत्तर देतात.

अनुक्रमणिका

७६८

घन गंभिर वारिधीत दिसणारे सारे विचार तरंग
त्या वारिधीस सोडून दिसू शकतील कां हो ?
जरी दिसल्यास ती वारिधी करून घेईल कां स्वतःचा तिरस्कार ?
तुमच्यात लपलेल्या साऱ्या प्रमथांचे सकल गुणादिगुण
तुम्हीच उचलून दाखवू शकता कां हो ?
जगात एकरूप होऊन परिपूर्ण झाल्यावर,
सांग बा, दुजेपणानें पाहून अनादराने बोलण्यास आहे कां हो वाव ?
कूडलसंगमेश्वरा, तुमच्या तुम्हीच घेऊनी निर्णय करावे हो स्विकार
उभयतांत आहे कां भिन्नभाव ?

७६९

न पाहता कुळी, न बघता जिद्द, बघता अस्तित्व
एक झाल्यावर तेथें उच्च नीच हुडकता येते कां हो ?
पुढे होऊन जंगमाना तुमच्या कृपेनें उपदेश केल्यावर,
आलेले आल्यापरि करावे हो स्विकार, असे तसे न येई म्हणता,
ऐक देवा, तू निराकार-साकार या दोन्ही मूर्ती केल्यानें धारण,
एकास दावुनी अनादर एकास आदरानें पाहिल्यास
तीच असे हो न्यूनता हे प्रभो कूडलसंगम नाथा,

प्रभुदेव सांगतात.

७७०

आकार-निराकार हे दोन्ही मीच आहे !
हे सत्य सत्य होय, हे अटळ असें देख.
आकारास असे भावचि प्राण, निराकारास महाज्ञानचि प्राण.
ऐक बा, या दोन्ही कुळास असे हेच लक्षण !
या दोन्हींपैकी कोणत्या मुखात जो रहावे म्हणतो-
तो त्या मुखात शुद्ध होईतोंवर, गुहेश्वरलिंगास असे दूर
संगनबसवण्णा.

बसवदेव विचारतात.

अनुक्रमणिका

७७१

प्रज्ञाविण असू शकेल कां तन ?
प्रज्ञाविण असू शकेल का प्राण ?
प्रज्ञाविण असू शकेल कां अस्तित्व ?
भावाविण असू शकेल कां हो भक्ति?
कूडलसंगमेश, तू असल्यानें परिपूर्ण; अवगुणास ना अवकाश.

प्रभुदेव म्हणतात.

७७२

होय होय, बसवण्णा ! तुझे म्हणणे खरे आहे येईल का ना खोडता ?
मम मनीचे निपटुनी काळे, करूनी निर्लेप,
मज निर्वयलात करूनी निश्चल प्रतिष्ठा करणारा
तूच असल्याचे सत्यवचन जाण !
गुहेश्वराचे महागण असतील तेथे जाऊन,
क्रोधाचे कारण घे समजावून हे संगनबसण्णा.

बसवदेव विचारतात.

७७३

बहुत कालापासून केलेली भक्ति-
एका दिवसाच्या उदासीनतेनें ठरते फोल ऐक बा.
मी किती जरी केली भक्ति तरी तुमच्या शरणांचे तिळमात्र
दुखविल्यास मन-माझ्या भक्तिचा नष्ट झाला अभिमान !
हे कूडलसंगमनाथ, मी कसा हो ओळखू शकेन ?
तुमचे शरण रागावल्याचे कारण ? तुम्हीच सांगा हो प्रभो !

प्रभुदेव सांगतात.

७७४

डाव्या पायांने मारल्यास लाथ, धरावा उजवा पाय
उजव्या पायानें मारल्यास लाथ, धरावा डांवा पाय.
त्राही त्राही घडली चूक माझ्याकडून असे सांगून
गुहेश्वराच्या शरणाना यावे घेऊन बा संगनबसवण्णा.

अनुक्रमणिका

बसवदेव, महाशिवगणांच्याकडे जाऊन राग धरू नका म्हणून बोलावतात.

७७५

दासानुदासावर रागावणे तुम्हास योग्य वाटते कां हो ?
देवा, आहे मी तुमच्या धर्माचा ! एकदा करावी कृपा दावी करूणा.
हे कूडलसंगमेश्वरा, उंदीरास भिवुन जाळती का हो घर ?

७७६

मी नाहीं हो भक्त, मी नाहीं युक्त;
तुम्ही बनवलेली आहे हो मी सूत्राची बाहुली.
मज आहे कां आगळे स्वातंत्र्य ?
तुम्ही माझ्या मानापमानाचे धनी असल्याकारणें
माझे अपराध न मानता, करावे हो आगमन हे कूडलसंगमनाथा.

७७७

झाली माझी भक्ति शाल्मलिवृक्षाच्या फळागत,
बाहेर मऊ, आत पोकळ ! बाहेर रेशिमासम मऊ
आत धागे दोरे.
तुम्हास देव म्हणून पूजुन, मानव समजून व्हावे कां मज विस्मरण.
सगुण निर्गुण हे उभय नच भिनले माझ्यांत असा मी आहे संदेही
माझा अपराध सहन करणारा तुझ्याविण आहे कां कोण ?
देवा कूडलसंगमदेवा, शरणु शरणार्थि ! करून कृपा करा करूणा.

शरण सोड्डुळ बाचरस म्हणतात.

७७८

धरलेले सोडून, सोडलेले धरण्यास आल्यावर, ते तसेच होणार !
धरतानाच घडली चूक, आता ती वस्तू हुडकून येईल
कां धरता ? घालुनी हार, प्रेमानें चढवितो हत्तीवर म्हटल्यास,
शिवशरणांच्या मनास नसे ते पटत.
फुटकी मोती मोल मोजुनी घेतील कां कोण ?
फुटके दूध पंचामृतास घेतील काहो कोण ?
आमची नसे तुम्हास गरज म्हणून, सोड्डळाच्या शरणाना देण्यास
निरोप, सांगत होता माझा परमाराध्य संगनबसवण्णा.

अनुक्रमणिका

बसवदेव विनयाने म्हणतात.

७७९

**डाव्या पायानें मारल्यास लाथ धरतो मी उजवा पाय.**
**उजव्या पायानें मारल्यास लाथ धरतो मी डावा पाय.**
**त्राहि त्राहि ! चूक माझी, क्षमा तुमची !**
**कूडलसंगमदेवा, मी तुमच्या कारूण्याचे लेकरू.**

७८०

**तुम्हीच मम अंतरंग. तुम्हीच मम बहिरंग.**
**तुम्हीच मम जाण. तुम्हीच मम विस्मरण.**
**तुम्हीच मम भक्ति, तुम्हीच मम युक्ति.**
**तुम्हीच मम आळस, तुम्हीच मम परवश.**
**सागरात विलीन झालेल्या कालव्याची खोली हुडकतो कां हो सागर ?**
**माझे योग्य-वा निरर्थक असल्याचे तुम्हासच ठाऊक,**
**यास तुमचे पायच साक्ष, माझे मनचि साक्ष हे कूडलसंगमेश्वर.**

चन्नबसवदेव सांगतात.

७८१

**कोणास करावी ही सद्भक्ति? कोणास कळे हो, या शिवज्ञानाचा**
**अंत ?**
**निराळाच्या सिंहासनावर बसला निरवय येऊन,**
**त्याने निराकार पदार्थ अर्पून केला हो प्रसन्न संपादन,**
**साकार सिंहासनावर आकार होऊन संगमनाथ गेल्यास**
**रागावून. शिरून तनुत तनु होऊन**
**मनात होऊनी मन, भावात भाव वेधून,**
**शिवशरणांच्या मनातील काळ डाग निपटुन,**
**आपल्याकडे फिरवुन, केला हो प्रसन्नतेचे संपादन.**
**या द्वय निर्णयात निस्सीम झालेला कूडलचन्नसंगमदेवाचा शरण**
**बसवण्णाच्या तोडीचा या त्रिजगीं कोण नाहीं त्याच्या समान**
**नाहीं कोण ?**

बसवदेवांची विनवणी ऐकून शरणांचा राग मावळला. महागण प्रसन्न झाल्याचे पाहून चन्नबसवदेव म्हणतात.

अनुक्रमणिका

७८२

भक्ति युक्तिची रीत जाणकार, नाही पाहिला मी या तिन्ही लोकी.
लिंग भक्तिनें न तुटे भव म्हणून, जंगम मुख लिंग होय, हे जाणून,
करूनी अर्पण पूजन दासोह करून बसवण्णानें संपादिली हो प्रसन्नता.
त्या प्रसन्नतेची गोडी असे उपमातीत.
वाचलो हो मी बसवण्णाच्या भक्ति प्रसादाचे करूनी सेवन.
बसवण्णाच्या त्या प्रसाद सेवनानें अल्लिमप्रभु झाला तृप्त
अल्लमप्रभुनी सेविले प्रसाद त्या तृप्तिनें लक्षावर शहाणऊ हजार
जंगम झाले तृप्त.
एक लक्ष शहाणऊ हजार जंगम तृप्तिनें,
सकल सचाराचर तृप्त झाल्याचे—
बिज्जळानें तर्क करून नाकारिले, तेव्हां बसवण्णानें
बेडुकाच्या पोटात अल्लामप्रभुचा प्रसाद नाहीं का दाविला ?
या कारणें कूडलचन्नसंगमदेवाठायीं, बसवण्णाच्या आणि
प्रभुदेवांच्या प्रसादाची महती वाढली हो त्रैलोकी.

प्रभुदेव म्हणतात.

७८३

लिंग जंगमाचे विधविधान जाणून,
केल्यास लिंगार्चन-जंगमार्चन तो लिंग जंगमाठायी लपून,
दिसतसे जंगमच परापर असल्याचे.
जंगमरूपि घन तुमच्यात लपल्या कारणें
गुहेश्वरा, तुमची रुचि अभिरुची जाणून,
संगनबसवण्णानें आपले प्रसाद वाढल्यानें,
तुमच्या सकल प्रमथांनी केला हो जयजयकार अशा बसवण्णास
म्हणतो मी नमो नमो.

बसवदेव उत्तरतात.

७८४

तलावानें ओढ्याचे पाणी पिऊन तृप्त झाल्यावर.
त्या तलावाचे पाणी स्थावर-जंगम पिऊन तृप्त झाल्यापरि.
प्रभुदेवांच्या तृप्तिनें असंख्य महागण झाले हो तृप्तल !
गरोदर स्त्री जेवल्यास पोटातील शिशु तृप्त झाल्यापरि
झाले हो सकल सचराचर तृप्त !
हे कूडलसंगमनाथ, तुमचे शरण प्रभुदेवांच्या महात्म्यास
म्हणतो मी नमो नमो.

अनुक्रमणिका

प्रभुदेव, बसवदेवांचे स्तवन करतात.

७८५

प्राणलिंगाचा पूर्वाश्रय नष्ट करण्यास्तव बसवण्णा झाला लिंगप्राणि.
काषाय वेषाचा पूर्वाश्रय नष्ट करण्यास्तव झाला हो जंगमप्राणि.
प्रसादाचे पूर्वाश्रय नष्ट करण्यास्तव झाला महाप्रसादि.
या त्रिविधांचे पूर्वाश्रय नष्ट करण्यास्तव आला पहा हो बसवण्णा !
या मर्त्यास गुहेश्वरा.

७८६

रचुनी आदि आधार, निर्माण केला हो अजकोटी ब्रह्मांड,
रचुनी चौदा भुवनें, हर हा-लीलेने; नृत्य करीत असता;
हरी-ब्रह्म-सुरासुरांची शिरोमाला धारण करून नृत्य करीत
असता- चरण खाली उतरले रसातळास, तेंव्हा झाले हो
भुवन जलमय;
हस्त-मुकुट घर्षनानें, झाले सकल लोक निरवय;
प्रकाशाच्या प्रभेंत सोहं म्हटल्याने, विचाराने झालें तेव्हांपासून
धन-मन; गुहेश्वरा, तूच लिंग, मीच जंगम;
बसवण्णाच भक्त होय.

७८७

भूवलयाच्या मध्यांतील अष्टदळावर विहरणाऱ्यास न करी जागृत.
तो असे हो कंटकविरहित, नात्यागोत्यास विरोधित, इहगुणविरहित.
गगन कमल कुसुम परिमळांत असे तो संतोषभरित !
मी-पणा मानुनी व्यर्थ, लिंग-जंगमचि मानुनी सत्य,
अर्पिला हो बसवण्णा आपले सारे सुखोपभोग.
हे गुहेश्वर तुमचा शरण बसवण्णाविण, न साधे हो ऐसे कोणास
जडण घडण.

७८८

राहुनी ओसाड घरात उभा ठाकिला उंबरठ्यात,
कोणीही आले नाहीं अशांची वाट पहात-
कोणासही नच लाभले ऐसे जिणे आम्हास लाभले म्हणत,
जो करितो आलोचना तयास ना शंका.
पाय नसता येणारे, हात नसता घेणारे, निरुपाचे सांगत असता

अनुक्रमणिका

मारारीची थोरवी बाळगून निरंतर-स्तुति पाठ करणाऱ्याविण
अन्य करिती कां कोण सांगा हो ?
बाजारी झोपडीतल्या वेश्येवर नजर ठेवल्याची गोष्ट लपवून ठेवतां
येईल का ?
हा मूढपणा नाहीं का होत ? यायोगें झाले होते हो माझे मन शंकित-
मागे पुढें मज सहाय्यक नाहींत कोण ही मनीची व्यथा.
हे गुहेश्वरा, तुमचा शरण संगनबसवण्णाच्या प्रसाद सेवनानें
झालो हो मी निरुपमसुखी.

७८९

वण्णाची त्या योगे-
लाभला नागलोकीच्या नागगणास बसवण्णाचा प्रसाद.
मर्त्यलोकीच्या महागणास बसवण्णाचा प्रसाद,
देवलोकीच्या देवगणास बसवण्णाचा प्रसाद.
गुहेश्वरा, तुमच्या शपथेनें सांगतो, मजला तुजला बसवण्णाचा प्रसाद.

आदीत झाली उत्पत्ती बस ७९०

उंच अशा मणिमुकुटांवर वेटाळा घातलेला नागभूषणाचा समूह
असे हो एक कोटी-शिववास्तव्याची स्थिरता कोणीही ना जाणती.
धारण केलेल्या रुंडमालेतील रुद्र एक कोटी असून,-
शिववास्तव्याची स्थिरता नसे हो कोण जाणता.
धारण केलेल्या रुंडमालेतील मुंडधारी एक कोटी असून-
शिववास्तव्याच्या निश्चलतेचा जाणकार नसे हो कोण.
खंडकपाल धारक मुंडधारी असूनी एक कोटी-
शिववास्तव्याची स्थिरता नसे हो कोण जाणता.
हे गुहेश्वरा, तुमचा आदिगुरू संगनबसवण्णा हा एकटाच हो
जाणकार.

७९१

खवळलेल्या क्षुब्धजलाच्या सामोरे पोहत येणाऱ्या स्वामीच्या पाठीमागें
जल अविरत वहात असलेली पहा हो ही अजबरीत.
करणी-वाणी-चैतन्य-शरीर करूनी एक, अविरत वेधित
पाहिली मी मनोहरता. अंतिम अचल दृष्टि,
धरुनी न सोडणारे हस्त, मज नका सोडू म्हणणारी सज्जन वधु,
आपल्या नक्याशीं लपून मिलन होण्याची रीत;
मध्यरात्र असूनही मध्यानापरि उजेड होता.
करून वाढणाऱ्यास पाहून देशदेशांतला जमला जनस्तोम.

अनुक्रमणिका

मुक्तहस्तानें दिल्याने होऊनी तृप्त, बसवेशाचे घेऊनी दर्शन,
करीत होते शुभ चिंतन, कोटि कोटी जन,
नाहीं तेथे द्वैत, देणारा एकटाच.
ऐशी ती एक सहज स्थिती, तयाच्या देहास ना श्रम ना
थकवा अथवा दिल्याचे मनीं छटा ही ना उमटें.
अशा महांताची मागतो मी करुणा
मम मस्तकी तयाचे चरण करुनी धारण. गुहेश्वराचा शरण
बसवण्णास म्हणतो नमो नमो.

७९२

पहा हो, या युगाचा हा उत्साह !
पंचशक्तिना आहेत पंचप्रधान, तयांचे होणे जाणे शरणचि
जाणतो तो शरण आपण आपणचि झाल्यानें, सहादर्शनाचा नच
याचक, तीन दर्शनावर नसे अवलंबक.
वेद-शास्त्रागम- पुराण-छंद-शब्दकोशाचा नसे तो भेदक.
याचे कारण ! त्यांच्या अंगावर नसे गुरु-नसे लिंग-नसे जंगम-
ना पादोहक-ना प्रसाद हाच असे प्रमाण.
गुरु-लिंग-जंगम- प्रसाद, पादोदक हे सारे झाल्यानें एकार्थ.
प्राणीमात्र गात होती प्रणम.
सकल जीवि म्हणत होती जय बसवा, बसवेशा.
सकल आत्मा मागत होती अंतस्थितीगती.
हे गुहेश्वरा, चौदाभुवनें करीत होती संगनबसवण्णांच्या चरणांचा
जयजयकार.

बसवदेव, प्रभुदेवांचे स्तोत्र करतात.

७९३

हेमाचा हव्यास नसल्यानें मज नसे हो समाधान त्यात,
मातीच्या प्राप्तींने मज नाही संतोष होत.
कामिनीच्या छंदात नाहीं मी रमत.
कूडलसंगमदेवाठायी, तयाविण मज नसे कोण हे जाणून, झाला संतुष्ट
माझा प्रभुदेव.

७९४

शरण हा श्रोत्रांते असवा ब्रह्मचारी, शरण असावा स्पर्शांत ब्रह्मचारी
शरण असावा नेत्राने ब्रह्मचारी. शरण असावा जिव्हेनें ब्रह्मचारी.

अनुक्रमणिका

शरण हा नासिकात ब्रह्मचारी होऊन करू नये संचलन.
या पंचेंद्रियात होऊनी ब्रह्मचारी कूडलसंगमदेवाठायी,
मम अस्तित्व नष्ट करण्यास्तव झाले हो प्रभुदेव ब्रह्मचारी.

७९५

पोटचि तोंड, तोंडचि पोट असल्याचे काढला टिपून,
नयनचि होऊनी मस्तक, मस्तकचि केला नयन.
पायचि हात होऊन, चालविला हातास पाय करून,
सावलीस जाळून, मज दिधला मन पसंत वस्त्र करण्यास परिधान.
मज दावियला मथनरहित संगसुख.
कूडलसंगमनाथ, अशा प्रभुच्या श्रीपदी करितो मी नमन.

७९६

या भूतलावरील भयंकर राक्षसी वृत्तिच्याना,
शिवस्वरूपाचे नसे कि हो जाण.
द्वारावती नगरी परवस्तु येताचि शरीराचे नाते जुळविण्याचे
नसे हो कोणास अवगत.
करवत करूनी नष्ट, जिंकून परशुरामास, देवतामध्यें वावरण्याचें
नाहीं कोणास माहित.
वारिधीच्या वर चढून, मरणास करूनी स्थिर,
त्रिपुर साकार करण्याचे नच कोणास अवगत.
मेरूत करूनी शिरकाव, मोजुनी एकशे आठ, सांगा पाहू हो,
निराकाराठायीं कोण झाला अंतर्गत !
एक हजार एकशें अठ्ठ्याऐंशी रासीचे परिस वेधण्याचे,
नाही हो कोणास माहित. कूडलसंगमनाथाच्या
शरणांचे नाते प्रभुविण अन्यांना ना होई हो साध्य.

७९७

एका नीळमणीनें गिळियले माणिकास,
वज्रानें त्यास लाविले बाहेर फेकण्यास !
लपलेले माणिक निळ्यारत्नाचे तुडवुनी मस्तक,
करीत होते ते आनंद नाट्य.
अंबरातल्या मुग्धेनें नयन मोत्याच्या मणीस
मथनावाचून गिळून मुखरस बाहेर टाकीत होती.
लिंग-जंगम असल्याची जाण आज झाली मज, झालो मी सुखी.
कूडलसंगमदेवाठायी, जगलो हो मी प्रभु कृपेने.

अनुक्रमणिका

७९८

पाण्याचे करूनी उखळ, सावलीचा करूनी मुसळ,
कांडीत असता आकाररहित तांदुळ;
मेरूगिरीच्या गायिचे काढुनी धार, त्या दुधात केला स्वयंपाक.
नारीच्या गर्भात येऊनी बसला नवरा, केलेला स्वयंपाक
मनसोक्त जेवण्यास्तव, हात करुनी वर, धरुनी शिर,
प्राणसखी आपल्या नवऱ्यास वाढीत असता,
फुलाच्या वस्त्रात समरस होण्याची असे ही रीत.
भावोन्मादात गर्जिल्यानें गर्जिल्यानें
कंपित होऊन भीतीने लपला तो आत.
शरण सति-लिंगपति हा नियम, लिंगांग सामरस्य होय,
हर याची पहात वाट नको सोडू श्वास.
जनन मरणरहित कूडलसंगमनाथाच्या अनुभावानें झालो मी सुखी.
प्रभुपदी करूनी वास.

प्रभुदेव चन्नबसवण्णांची स्तुती करतात.

७९९

बसवण्णा आता पुरे कर बा करीत असलेली माझी प्रशंसा,
मीही आता तुझी करीत नाहीं.
होता येते हो गुरू, होता येते लिंग, होता येते जंगम-
हे तिन्हीही होता येते. तुझ्या आचारास होऊनी प्राण,
माझ्या ज्ञानास होऊनी आचार, या उभयसंगसुखाच्या प्रसन्नतेस
अत्यानंदी प्रसादि होऊन आला हो हा महिमाशाली-
गुहेश्वरलिंगाठायी-चन्नबसवण्णा होता न येई बा संगनबसवण्णा.

८००

प्रकृति गुण असेपर्यंत नव्हे तो भक्त.
काम-क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर असे तोंवर नव्हे तो माहेश्वर.
भूक तहानादि विषय असे पर्यंत नव्हे तो प्रसादि.
आचारात अनुभावी, प्रसादात परमानंदी.
गुहेश्वरलिंगाठायी, चन्नबसवण्णा या प्रसादीस म्हणतो मी नमो नमो.

अनुक्रमणिका

८०१

आदीस अनुसरून येणारा तो नव्हे भक्त .
अनादीस अनुसरून येणारा नव्हे तो माहेश्वर.
स्थलास अनुसरणारा नव्हे तो प्रसादि.
लिंगास अनुसरणारा नव्हे तो प्राणलिंगी
शून्य काया देऊनी निशून्यास, प्राणलिंग प्रसाद.
तो घेतसे जाणकार, गुहेश्वरलिंगाठायीं ऐशा चन्नबसवण्णास म्हणतो
मी नमो नमो.

८०२

सद्योजात हा बद्धज्ञानी, वामदेव हा आतुरज्ञानी,
अघोर हा कोपज्ञानी, तत्पुरुष हा क्षणिक ज्ञानी,
ईशान हा अतीत ज्ञानी. हा नव्हे हो प्रकार ! गुहेश्वरलिंगाठायी,
अविरळज्ञानी चन्नबसवण्णाच्या श्रीपदास म्हणतो मी नमो नमो.

८०३

या वीर धरणींत नारीस रूप शृंगार दिले हो कोण ?
चौदा भुवनें करूनी अमळोक्य, बिंदु शक्तिस करूनी एक,
समरस योग सुखास बनवुनी साकार मूर्ति कुणी हो दिली हाती ?
एक-दोन ही वाचा ग्राहिल्याचे मी पाहिले.
बिंदु रसाच्या परिक्षेचा हा भेद पहा,
चंद्रकांत गिरीस येऊन अरुण आणि चंद्र हे उभयता झाले हो
समरस त्याठायींच.
तळहाताच्या स्थळावर ( इष्टलिंग ) नयनांत हृदय मिलनाचे
असे हो सुख,
त्या अनादिचे प्रतिबिंब आज मज दिसले देख.
माझ्या गुहेश्वरचा शरण चन्नबसवण्णास म्हणतो हो मी नमो नमो.

८०४

नच स्पर्शिता वसुधेस, ओसंड न देता रसास,
रसात स्तंभन करणेच योग होय.
बाह्य रसास आम्ही स्तंभन केले म्हणणारे सारे अंजन सिद्ध
होऊन गेले.
सुषुन्मा सुमन सुमुद्रेच्या मधल्या आधार स्तंभावर
पंचेद्रियांचे गुह्य स्वाधीन ठेवुन, रस स्तंभन करणारा,

**गुहेश्वराचा शरण चन्नबसवण्णास म्हणतो मी नमो नमो.**

चन्नबसवदेव प्रभुदेवांची स्तुती करतात.

८०५

**रूपरहित रस, निर्णयाविण निष्पत्ति, सीमातीत निस्सिम,**
**अगमरहित अगम्य, वाचारहित निशब्द,**
**अन्य न जाणणारा आनंदित परवश कूडलचन्नसंगाचा शरण**
**प्रभुदेवास म्हणतो मी नमो नमो.**

चन्नबसवदेव, बसवण्णांची स्तुती करतात.

८०६

**अंतरंगी प्रभुदेवास घेतला सामावून, बसवण्णा,**
**बहिरंगी घेतला मज सामावून, या उभयसंग मध्यात**
**पावला हो निजैक्य, प्रसादाठायी परमानंद सुखी होय.**
**ज्ञानाठायीं खूणनाशन घनाची ही निजस्थिती**
**कूडलचन्नसंगमदेवा, अशा बसवण्णाच्या चरणी नमो नमो.**

८०७

**कसे म्हणता येईल शिशु नंबियण्णास ?**
**विश्व प्रकाशित करणाऱ्या रविस म्हणता येईल कां सुक्ष्म ?**
**सृष्टि पाहणाऱ्या दृष्टिस म्हणता येईल कां सान ?**
**शेरा ( मापा ) स केला लिंग या भावनेस म्हणता येईल का सान ?**
**कूडलसंगमदेवा, युग युगाच्या अतीत असलेल्या या चन्नबसवेश**
**शरणास म्हणता येईल का हो सान ?**

बसवण्णा चन्नबसवण्णाची स्तुती करतात.

८०८

**चकमकीने मीच पेटविलेले विस्तव आहे म्हणून,**
**हात लावल्यास पोळल्याविण राहील का ?**
**हे मना, माझ्यानेच झाले असे म्हणू नकोस !**
**हे मना, मीच केले असे म्हणू नकोस.**
**ऐक बा कूडलसंगमेशा, अशा चन्नबसवण्णाच्या पदी म्हणतो नमो नमो.**

अनुक्रमणिका

८०९

लिंग गंभिराठायी जग निर्माण झाले तरी काय ?
त्या लिंगाहून जग होईल का घन ?
शिवलिंगाठायी वसे जग, जगाठायी शिवलिंग !
लोकादि लोकास तू दाविला भक्तिस डोळा उघडण्या लावून
कूडलसंगमदेवाठायी, अशा चन्नबसवण्णाच्या श्रीपदी नमो नमो.

८१०

प्राणलिंगात करूनी प्रवेश प्रसादाठायीं झाला समोप.
लिंगार्पिताविण अनर्पित नाही तो शिवत.
साऱ्या अंगगुणास झिडकारून झाला हो प्रसादाठायी ब्रह्मचारी.
कूडलसंगमदेवाठायी चन्नबसवण्णा.

८११

देवा, आहे पहा तो सर्वावधानी समयप्रसादि !
लिंगार्पितात तो आहे सर्वावधानी.
न मागता आलेले स्विकारित असलेल्या
कूडलसंगमदेवाठायी या चन्नबसवण्णास म्हणतो नमो नमो.

८१२

पहा हो, हा आहे ! अंगविकार त्यागी, सतिसंग नच भोगी.
देह गुणादि विरहित निर्देही प्रसादि देख.
अशन-व्यसनादि सारे जळुनी झाले राख.
सकल गुण नुरूनी उरल्यानें कूडलसंगमदेवाठायी.
आहे चन्नबसवण्णा सावधान प्रसादि.

८१३

घनाचा जाणकार वेधुनी घनास, घनगुरूस आपल्याठायीं
झाकळून ठेवल्याची पहा हो ही रीत !
गुरू-लिंग-जंगमाठायी, तन-मन-धनास वेधिल्याची पहा हो ही रीत.
कायाप्रसादाठायी स्वायत करून घेतल्याची पहा ही रीत.
षड्स्थलांत झाला प्राणालिंगी चन्नबसवण्णा कूडलसंगमनाथा.

अनुक्रमणिका

८१४

देवा रे, झाला हा निर्लेप, झाला हो निजगुणी.
ना वांछित ना कल्पित असे हा प्रसादि जाण.
वासनारहित प्रसादि ! गुरूमुखेण आलेल्या प्रसादाविण
न स्पर्शि अन्य-कूडलचन्नसंगमदेवाठायी हा चन्नबसवण्णा.

८१५

अर्पित करणारे अवधान, अन्य न स्पर्शित अवधान,
अरिषड्वर्ग न शिवणाऱ्या अवधानाची पहा हो ही रीत !
देवा, पंचभूत या भविसत्यजुन प्रसादि झाल्याची पहा हो ही रीत.
पंचेंद्रियांचे गुण नाशून पंचविंशति तत्त्वाठायीं असे तो
आनंदपरवश कूडलसंगमदेवाठायी चन्नबसवण्णा.

बसवण्णांची स्तुती चन्नबसवण्णा करतात.

८१६

भक्त-माहेश्वर-प्रसादि-प्राणलिंगी-शरण-ऐक्य
करूनी पृथःकरण, वागण्यात बोलण्यात नसे भिन्न.
अंतरंगी असे ज्ञान परिपूर्ण. बहिरंगी दासोह संपन्न.
मनो वाक् काया कर्मात सद्भक्ति संपन्न.
निरंतर लिंग संपन्न. सर्वांगाठायी सर्वाचार संपन्न.
म्हणतो मी कूडलचन्नसंगय्याठायी बसवण्णाच्या श्रीपदी नमो नमो.

८१७

गिळली वाचा ( मंत्र ) माणिक, गिळली काळोखास ज्योति,
धन्यास गिळला चाकर, लालारसाविना चर्वण, मथना विना संग.
मरणरहित ( जनन ) उदय, शोकाविना विरह.
समरसाविण मदगजानें प्रभात प्रकाशास गिळुन,
माहुतासही गिळुन नाहीं फेकले बाहेर !
आपल्या सदमधांद सोंडेत धरूनी चौदा भुवनें, किंकाळत
विजयी होऊनी टाकला उभा-कूडलचन्नसंगय्याठायीं.
सदमल ज्ञानसंपन्न अशा बसवेशास झाले हो साध्य.

अनुक्रमणिका

अग्निचि नेसुनी साडी, पदराचा टोक फडफडत जोराने हालवीत,
बायको आपल्या सोबतिणीसंगे खेळत असता-
येऊन नवरा धरला तिचे केस, नेसलेली साडी दिले फेकून,
करीत असता संभोग, समरतांत सति नुरुनी होऊनी पति,
पति नुरुनी, निष्पत्ति झाल्यानें,
सति-पति-निष्पत्ति झाले हो एकार्थ,
अशा कूडलचन्नसंगाठायीं, बसवण्णाच्या श्री चरणीं माझे नमन.

चन्नबसवण्णा बसवण्णाचे स्तोत्र गातात.

*राग : भूपाळी*

परममूर्ति परमज्ञानी लोक लौकिक प्रपंच
निःप्रपंच निर्नाम नाम होई निष्कामी ॥ धृ ॥

कायागुणा आणुनी जीवाठायी ठेवून
प्राणलिंगास करी समाधान
आश्रम न स्विकारता आश्रमात धिःकारून
द्वैताद्वैती नोहे तो लिंगसंगी ॥ १ ॥

कायाशून्य लिंग, प्राणशून्य शरण
भावभेद सारे नाश पावून
आत बाहेर सर्वांग लिंगाठायी
न आणीता अनुभवास ऐसा हा अनुपम ॥ २ ॥

कारण अकारण-कल्पित अकल्पित
नोहे संकल्प-विकल्प ऐसा सुज्ञानी
सावयव-निरवयव संगी-निस्संगी
परमात्मचि झाला आपण निर्बोध बोधि ॥ ३ ॥

निर्भाव-निर्नाम निर्देह-देही
निर्गुणास अवयव आकाररूप
सोडुनी परतत्व उभय नुरूनी उरला
त्रिविध संपन्न तोच उभय लिंगी ॥ ४ ॥

लिंगभुक्ता शेष भुक्ताच प्राणि
निर्गमन गमनियास नोहे गमन

अनुक्रमणिका

**स्वतंत्र कूडलचन्नसंगय्याठायी**
**असाध्य साधक होई लिंगसंगी ॥ ५ ॥**

त्याप्रसंगी मडिवाळमाचिदेव प्रभुदेवांची स्तुती करतात.

**८१९**

**झाला लिंगसंगी तनुगुण निवारून.**
**झाला ज्ञानसंबंधी मनगुण निरसून.**
**झाला प्रसाद संबंधी प्राणगुण नाशून.**
**झाला निजलिंगसंबंधी भावभ्रम निपटून.**
**असा हा चतुर्विधसंबंधी झाल्यानें शून्य सिंहासनास.**
**केला वासस्थान, कलिदेवा, ऐसा तुमचा शरण**
**प्रभुदेवांच्या श्रीपदी म्हणतो नमो नमो.**

**८२०**

**लिंग समाधिस्थिती परमसुखीयांचे काय वाणू ? कसा वाणू ?**
**डोळ्याच्या कांतीचा संग करूनी दूर, अंगविरहितास**
**देऊ कोणती हो उपमा ?**
**दृष्टित अनिमिष, संयोगात निस्संगी !**
**गमनात निर्गमन, उभा ठाकण्यात निराळ ! संचलनात परिपूर्ण !**
**घनाचा घन महिमावंत,**
**कलिदेवा, तुमचा शरण प्रभुदेवाच्या श्रीपदी म्हणतो मी नमो नमो.**

**८२१**

**संसार साराच्या मधुरसास रगडून पिळला.**
**त्याच्या पाठी लागून त्यातच रमणारा नव्हे. त्याच्याकडे वळून.**
**बघणारा नव्हे.**
**असे आहेत का कोण वीर ? असे आहेत का हो धीर ?**
**आहेत हे असे पौरूष चरित्रवान,**
**करूनी मायेस निर्नाम, कंबर कसून, पुढच्या जीवनाची**
**करीतसे पूर्ण सिद्धता. निजैक्य निर्वयल होऊनी निष्पत्ति,**
**निज निराळाठायीं स्वयेचि तो संचारितो.**
**कलिदेवा, या तुमच्या लिंगैक्य प्रभुदेवाच्या श्रीपदी राहतो मी**
**भृंग होऊन.**

प्रभुदेव मडिवाळमाचिदेवांचे स्तोत्र करतात.

८२२

लिंग गंभीर सुनाद जंगम गंभिरचि असे तनुगुण चरित्र,
जंगम गंभिर अनाहत हेचि मनगुण स्वभाव;
या दोन्हीचा संबंधचि सहजज्ञान.
ते महाज्ञानच शरीर, ( आचारचि वस्त्र )
परमानंद जलात त्यास घुसळून, झटकून,
वाळविले महाज्ञान प्रकाशांत, अनाहत मथनांत घालुनी घडी.
ते वस्त्र मज दिधल्यास ते परिधान करण्या आधीच त्यास
लागली आग.
ती आग न दिसे डोळ्यास, न येई मनास आठविता.
आग ग्रासून उष्णरहित त्या स्वयं ज्योतिच्या निजनिवासात.
होऊनी निश्चिंत मडिवाळाच्या कृपेने मी बचावलो पहा हे गुहेश्वरा.

८२३

जननी नसलेल्या शिशूस, शिशु नसलेल्या जननीनें करविलें स्तनपान.
करूनी स्तनपान बिलगल्याने शिशु झाली की हो जननी
त्या शिशुची सति !
पति नसता सतिसंगमुख जाणिवल्यानें, सति पति दोघेही
पावले हो विलय ! मज दाविले या निजाचे निर्णय.
गुहेश्वराचा शरण मडिवाळमाचिदेवाच्या चरणी म्हणतो
नमो मी नमो.

चन्नबसवण्णा मडिवाळमाचिदेवाचे स्तवन करतात.

८२४

मज काढला हो आपल्या पोटातून. बसवदेवास काढला पाठीतून,
अल्लमास काढला ब्रह्मरंध्रातून.
संगमनाथच का हा मडिवाळमाचिदेव ? कां मडिवाळच होय
संगमनाथ ?
कूडलचन्नसंगाठायी, असे मडिवाळ प्राणलिंग, आमच्या बसवण्णांस.

८२५

अंगावर लिंगभाव असावा सदैव.
अंगाचा लिंगाचा काय संबंध, मन स्पर्शिल्याविना ?
काया करीत असता कायक, मन लिंगाठायी असे अव्याहत

अनुक्रमणिका

**समरस करणाऱ्या मडिवाळाची पहा हो ही रीत ?**
**अंग-लिंग-संग हा तारतम्याचा भाव निवारून असे सर्वांगलिंग संबंधी.**
**कूडलचन्नसंगाठायी मडिवाळमाचिदेव.**

मडिवाळमाचिदेव चन्नबसवण्णांची स्तुती करतात.

८२६

**निरर्थक अशा मायेच्या संभ्रमात गुंतले आहे पहा हो सकल भुवन.**
**पाहिला मी मायेच्या अतीत असलेला हा निर्माय.**
**मी पणा या बोलीस लाजून, तू पणाच्या बोलीचा आला**
**तयास किळस.**
**आपण आपणच झाला तो घन महिमावंत.**
**कायेत ना खूण, भावनेंत ना भ्रम, मी ज्ञानी हा नसे भेद.**
**ना सावय ना निरवय, कलिदेवरदेवा असा आहे तुमचा शरण**
**चन्नबसवण्णा.**

८२७

**झिडकारून आधिक्यास, निरतिशय सुखात परमसुखी आहे**
**का कोण सांग बा ?**
**निजनिर्णयाचा जाणकार, आगळ्या भावनेस करूनी परिहार,**
**त्रिजगपति झाला आहे का कोण ?**
**माकडाच्या मनात होऊनी गमन विरहित निर्गमनी आहे का कोण**
**सांगा हो मज ?**
**शत्रूंच्या मध्यें शिरून, शत्रुत्वाचा करूनी नायनाट, मित्र बनून सौख्य**
**साधणार आहे को कोण ?**
**अंतरंग बहिरंग सर्वांग लिंग होऊनी राहणारा परमार्थी आहे का**
**कोण सांग ?**
**कलिदेवरदेवा, तुमचा शरण चन्नबसवण्णाची निजस्थिती**
**जाणून झालो मी सुखी करितो त्यास वंदन.**

मडिवाळमाचिदेव बसवेश्वरांची स्तुती करतात.

८२८

**मारारीच्या आज्ञेनें धरणीवर घेऊनी अवतार,**
**सामीप्य सद्भक्ति दावियला सकल शिवशरणास.**
**भक्तिचे विवेचन, मुक्तिच्या गुढाचा उपदेश केला सत्यशरणास**

अनुक्रमणिका

नित्य लिंगार्चनी मज ठेवून, कलिदेवरदेवा,
केला मम रक्षण बसवण्णा.

८२९

बसवण्णास सहा जन्म म्हणतात.
अर्थहीन ही गोष्ट नाहीं हो मज ऐकवत,
सहास्थल, सहा पथ दाखविण्यास, झाला हा परशिवमूर्ति.
कलिदेवा, या साही साही तत्त्वाच्या वरचा आहे हो बसवेश.

८३०

कल्याणरूपी नगरात वसतात छत्तीस गावचे महागण.
एका गावचे गण आणतात उदक,
दोन गावचे करतात सडासंमार्जन घालतात रांगोळी,
तीन गावचे लिंगार्चनास ठेवतात,
चार गावचे मिळून लिंगास आहार तयार करतात,
पाच गावचे गण अर्पित करण्यास वाढतात,
सहा गावचे गण प्रसादाठायीं झाले हो तद्‌गत.
सात गावचे गण झाले ध्यानारूढ, पुढच्या गावचे झाले निश्चिंत
निवासी.
या सकल गणांचा आहे हो मी सेवक,
बसवेशाच्या महामनेचा आहे मी धोबी हे कलिदेवरदेवा.

८३१

शिव शक्ति संपुट झालेल्या महामहिमांची निजस्थिती नाहीं शिवत,
नादाच्या उत्पत्तीस, बिंदुच्या आश्रयात नाहीं ते वाढत,
शुक्ल शोणितं या पंचवर्णाश्रमाचा नसे त्यास आधार,
अष्टदळ कमळास न शिवता, प्राण-अपान-व्यानोदान.
समान-नाग-कूर्म-कृकर-देवदत्त-धनंजय
या दशवायुच्या इच्छेनें नसे ते संचलन !
वाढे ज्ञानात, खेळे निरालंबात, हृदयकमल पद्मपत्राचे
श्वास नासिक शिर संपुट-जंगम खेळ खेळतसे-
लिंग दृष्टिनें पाहतसे, महाज्ञानात उजळितसे,
निजनिराळात होई निवासी,
कलिदेवरदेवा, अशी आहे तुमच्या शरण बसवण्णाची निजस्थिती.

अनुक्रमणिका

८३२

अष्टतनु जन्मलेला निष्ठापरात पोहोचण्याच्या भरात-
विद्येतील महाद्वार मंडपातले सहजत्व जाणकाराविण
अजाणास लिंग म्हणता येत नाही, जंगम म्हणता येत नाहीं,
प्रसाद म्हणता येत नाहीं, द्वार मंडपातील सहजत्वास न जाणत
करणेंद्रियास झाले हो आहुती करण लिंगार्चक.
करणाचे मरण चुकविता येते कां ?
हे सारे उल्लंघुन दावुनि लिंगार्चन.
मज वसविला हो निजैक्यात हा बसवण्णा, पहा हो कलिदेवा.

ते ऐकून बसवदेव मडिवाळमाचिदेवांचे स्तोत्र करतात.

८३३

मम कायेच्या करस्थली देखिले मी प्रभुदेवास,
मम प्राणाच्या करस्थली देखिले मी चन्नबसवण्णास,
मम सर्वांगाच्या करस्थली देखिले मी मडिवाळास,
संगमनाथच मडिवाळ आहे कां ? कां हा मडिवाळच संगमनाथ आहे ?
हे मज न येई हो सांगता;
माझे देहगुण करूनी हरण मज नेला पैलतिरी
मज वाचविला हा परमयोगी; कूडलसंगमनाथ,
ऐशा मडिवाळमाचिदेवाच्या पदी म्हणतो मी नमो नमो.

८३४

आचाराची अंतस्थिती अंगाठायी करूनी दाविला निश्चल.
अनुभावाची अंतस्थिती प्राणाठायी करूनी दाविला अचल.
महाज्ञानाची अंतस्थिती सर्वांगाठायी करूनी दाविला सुस्थिर.
या त्रिविधस्थलाचा निर्णय मज निरूपिला.
यास्तव कूडलसंगमदेव, मडिवाळमाचिदेवाच्या श्रीपदी म्हणतो
नमो नमो !

हडपदअप्पण्णा प्रभुदेवांचे स्तवन करतात.

८३५

अनिमिष ऐसे अत्याश्चर्यकर लिंगैक्यभाव भिनला.
ज्ञानच परमाश्रय पावलेला हा लिंगैक्य.

अनुक्रमणिका

महास सामवलेला हा महिम लिंगैक्य.
बसवप्रिय कूडलचन्नसंगमदेवा, तुमच्या शरण प्रभुदेवास
म्हणतो नमो, नमो.

८३६

निराकाराच्या शक्तिठायी निराळ हा, निशून्य अशा
सिंहासनावर होऊनी घन, होते झळझळ झळकत,
झाल्यासाऱ्या दिशा मुख सारे मुख झाले जग देख,
अखंड परिपूर्ण, झाला परब्रह्मचि आपण.
ऐशा महिमावंताचे केल्यास चिंतन लाभे मनोमुक्ति,
पाहता रूपमुक्ति  बोलता शब्दमुक्ति,
करिता संग होई सर्वांग लिंगैक्य. बसवप्रिय कूडलचन्नसंगमदेवा,
अशा तुमच्या प्रभु चरणी करूनी वंदन मी वाचलो देवा.

अक्कानागम्मा स्तोत्र करतात.

८३७

देवा, तुटली हो आज माझ्या भवाच्या वेलीची मुळी
सेविल्याने बसवण्णाचा शेषप्रसाद,
विरले हो माझ्या मनीचे माया गुण.
संपादिल्यानें मी चन्नबसवण्णाची करुणा,
आज माझ्या अंतरंगाचे तारतम्य भाव झाले हो देवा निवारण.
बसवण्णाप्रिय चन्नसंगमदेवा, देखिल्याने परमगुरू प्रभुचे श्रीचरण.

८३८

अजाणपणें विस्मरणानें आले हो मी या भवात !
आता जाणल्यावर होतील का मज व्यथा ?
हृदयकमल मध्यांत निजत्व बसल्यावर,
ओलांडिले मी पाय पुण्याच्या तीरापार.
चौदाभुवनीं होऊनी परिपूर्ण निरंजन ज्योति
प्रकाशणाऱ्या प्रभुदेवास पाहून मी जगत आहे बा बसवण्णाप्रिय
चन्नसंगमनाथा.

सोड्डुळबाचरस स्तवन करतात.

अनुक्रमणिका

८३९

पाणी न मिळता तोंडास कोरड पडलेल्यास अमृत मिळाल्यापरि,
जरा मरण दुःखितास संजीवनी मिळाल्यापरि,
वाचलो हो मी न जाता भवाच्या दारी.
पाहुनी नित्यास, आतील प्रज्वलीत प्रकाश बाहेर मूर्ती
झाल्यापरि, नेत्रास झाले हो मंगळ.
महाघनाठायीं साकार सोड्डळाच्या शरण प्रभुस्वरूपास
म्हणतो मी नमो नमो.

८४०

मनाच्या संचय ओवरीतली सुकली हो चकाकणारी गुच्छाची वेल.
माझ्या कायेच्या नयनात झाले हो मज साध्य निरूपम सुख.
वांछित कामना झाली मज हस्तगत.
हुडकणारी अपूर्णता झाली आता सुस्थिर,
अहा हा, झाली की हो करतलामलक !
देवारे, सत्य शरणांच्या दर्शनानें काय नाहीं होणार ?
महादानी सोड्डळाचा शरण प्रभुदेवाचे चरण पाहुनी वाचलो मी देवा.

डोहार कक्कय्या स्तोत्र करतात.

८४१

कष्ट कुळीच्या जननाचे करूनी कर्म निवारण,
शिवुन करूनी पावन, दिले देवा मम करस्थली लिंग.
त्या लिंगाने करूनी आगमन मज स्पर्शिल्याक्षणी,
माझ्या सर्वांगातील अनिष्ट झाले हो नष्ट,
माझ्या तनुत गुरूने केला वास, माझ्या मनात जंगमाने केला वास.
माझ्या ज्ञानात प्रसादाचा केला वास.
हे त्रिविधस्थान केले बसवण्णानें शुद्ध, तयाच्या करूणेने.
प्रभुच्या श्रीपदाचे केले अवलोकन वाचलो बा मी
अभिनव मल्लिकार्जुना.

८४२

आशा आमिष झाले विनाश, लटके-विषयादिंचा झाला ऱ्हास.
संशय संबंध झाले हो विसंबंध
मम मनी घन शांति आनंद लाभल्यानें मन पावले देवा मग्न.

अनुक्रमणिका

**अभिनव मल्लिकार्जुना, तुमचा शरण प्रभुदेवाच्या**
**कारुण्याने मी जगत आहे.**

मोळिगेय मारिदेव स्तोत्र करतात.

८४३

**गरिबानें अपेक्षिलेली संपत्ति लाभल्यापरि,**
**अदृश्य निशून्याने केले रूपधारण,**
**निराळ निर्णयावर निश्चितवर उभे राहिले !**
**माझ्या भावनेच्या अग्र टोकावर राहिला आहे करूनी घर**
**ऐशा प्रभुदेवास पाहून जगलो बा निष्कलंक मल्लिकार्जुन.**

८४४

**निधी आहे माझ्या चिंतनाचा ! माझ्या निजस्थितीचा घन तोच हो !**
**अहाहा माझी पुण्याई; आहाहा माझ्या नयनास करूनी घर**
**करिशी वास हे नित्य प्रकाशा !**
**माझ्या ध्यानातील दृढ तूच असशी, माझ्या सुखाचा तू सुगी;**
**निःकळंक मल्लिकार्जुन, तुमचा शरण प्रभुदेवाच्या चरणी**
**म्हणतो मी नमो नमो.**

एकांतरामीदेव स्तुती करतात.

८४५

**लोकांती नुरूनी उरल्याने एकांती; एकैक मूर्ति संग झाला हो**
**मज प्राप्त.**
**माझी बोलणी त्याच्या कानास वाटे मधुर,**
**त्याची वाणी माझ्या कानास वाटे हो मधुर;**
**आम्हा दोघांची बोलणी झाल्याने एक, वेधिले तैं निःशब्द.**
**त्या सुखद स्पर्शाच्या पुण्याइच्या फलानें**
**अनुपम चरित्र अल्लमप्रभुचे स्वरूप पाहून झालो देवा मी धन्य**
**एकांतवीर सोड्डुळ.**

८४६

**कासवाच्या शिशु स्नेहापरि देव आज माझ्या डोळ्यासमोर**
**प्रत्यक्ष झाला हो गोचर !**

अनुक्रमणिका

माझ्या अंतरंगात शिरून, विनयानें सद्गोष्टी करणारा,
निष्कळ चैतन्य हाचि झाला सकलरूप सन्निहित.
निशून्यचि बलिष्ठ झाल्यापरि, एकांति वीर सोड्डळ हाचि
तुमच्या शरण प्रभुदेवांचे स्वरूप होय.

शंकर दासीमय्या स्तवन करतात.

८४७

शिव-हराच्या आज्ञेनुसार. अवतरला हो बसवण्णा धरणीवर.
त्यायोगे, शिवाचार-सदाचार हे झाले विख्यात धरणीतलावर.
शिवगण-प्रमथगण या महिमाशालींचा संचार,
आढळिले धरणीवर, तुमच्या शरण संगाने झाले हो परिस
साधल्यापरि,
मी नंदिचा मुखवटा, भालनेत्र धारण केल्यानें अहंकाराने घेतला
होता पुढाकार,
माझ्यातले मद झाडून झटकून, संगनबसवण्णाच्या कारुण्यानें
प्रभुरूपि निराळास अवलोकून बचावलो मी निजगुरू शंकरदेवा.

८४८

निवारल्याविण कायेचा अहंकार, नच होई परिहार मायाविकार,
मायाविकार परिहाराविण, नच होई भवनिवारण.
भव नाशिल्याविण, न होई लिंग संबंधाचे जडण घडण.
लिंगाचे नाते साधल्याविण साध्य न होई सुख.
अनुपम सुखं परमशांतीस न लाभे विश्राम महानुभावींच्या संगाविण.
अशी आहे महानुभावाची मूर्ती संगनबसवण्णाच्या
कृपेंनें देखिले हो मी निजत्व.
या कारणे, निजगुरूशंकरदेवाचा शरण प्रभुदेवाचे श्रीचरण
पाहून झालो बा मी निश्चिंत.

मेदर केतय्या स्तोत्र करतात.

८४९

माझ्या कायेच्या कळवळास करूनी निश्चल, गुरूलिंगास दाविला.
माझ्या मनीचे व्याकुळास करूनी निश्चल जंगमलिंगास मज दाविला.
अंतरंग-बहिरंगात झाला हो स्वय, केला मज पावन.
सकल अमरगण मजवर रागावून नेले होते मज कैलासास ;

अनुक्रमणिका

सद्योन्मुक्ति मज दावण्यास्तव परतुनी आणिल्यानें मज मर्त्यलोकास,
संगनबसवण्णाच माझा गुरू, संगनबसवण्णाच माझा परात्पर.
या संगनबसवण्णाच्या कारूण्यानें घनाचा घन महिम अल्लमप्रभुचे
श्रीपद देखून मी जगतसे बा गवरेश्वरलिंगा.

८५०

प्राणस्थली झाली तृप्ती. लिंग-जंगम-तनुस्थलात झाली तृप्ति.
आचारलिंग स्थल-गुरूलिंगस्थल-हे उभयस्थल होऊन एक
दिसताहेत. हे दिसणारे दृश्यचि असे माझा बसवण्णा.
या बसवण्णाच्या कृपेंने प्रभुदेवांचे श्रीचरण अवलोकून
वाचलो बा गवरेश्वरलिंग.

घट्टिवाळ मुद्दण्णा आपला अनुभाव निवेदितात.

८५१

पाण्यात अग्निची होऊनी उत्पत्ति, सावलीस जाळिते.
सावली जाळल्यानें झाली हो विभूती, ती केल्याने धारण,
भूमी पावली मरण.
पेटला आकाश, देवाचे देवत्व झाले विनाश.
देवीचा संसार झाला हो विध्वंस.
सांगता न येई ऐशा ठायीं, अगोचर लिंग होई साकार,
झाली तयाची पूजा अगोचर.
चिक्कय्या प्रिय सिद्धलिंग प्रभुदेवांची निजस्थिती पाहून
म्हणतो मी नाही नाही.

८५२

योगाचे क्रम न येई साधता; अष्टयोगाची नसे पद्धत,
नऊ योगाची नाही रीत, सहायोगाची नाही स्थित
धरणीवरची अग्नि न शिवतां आकाशास
करिता आल्यास वास तोच होय योग.
ज्ञान नयनाचि प्रभा शिवल्यास शशिस घनमन अंतर्भूत होणेची योग.
साहीवनितांशी पतिने एकदा करूनी संयोग
हट्ट निवारून राहता आल्यास तोच होय योग.
घनमहिमावंत अशा प्रभुचा समरसयोग अवलोकुन.
चिक्कय्याप्रिय सिद्धलिंग नाही नाही म्हणतो मी.

अनुक्रमणिका

# २१

सकल असंख्यात महागण प्रभुदेवांचे स्तोत्र करीत असताना, प्रभुदेव-बसवराजदेव, मडिवाळमाचिदेव, आदिकरून समस्त असंख्याताना प्रभुदेव आपल्या अवताराचे अवसान निरूपण करतात.

८५३

**अध्यात्मिक हे काय आहे, ते न जाणता, आदिचा विचार न करिता,**
**अनादित आपण कोण हे न पाहता, करूनी काय प्रयोजन ?**
**'निशब्दं ब्रह्ममुच्यते' ऐसे घन तुम्ही स्तोत्र केल्यानें लाभले कां हो ?**
**बसवण्णा हा आदित, सातशें सत्तर अमरगणा समवेत**
**शिवाच्या आज्ञेनुसार आला हो मर्त्यलोकी एका कारणास्तव.**
**आलेल्या महान् कार्याची झाली पूर्तता-**
**मेळाव्यातील सकल पुरातन हे ऐकून-तुम्ही सारेजण तुमच्या तुम्ही**
**पहा जाणून निजत्वाचे.**
**आता आमच्या गुहेश्वरलिंगाचा साकारात नसे संचार.**

८५४

**मरेपर्यंत कवायित करीत बसल्यास लढाईचा दिवस केंव्हा येणार ?**
**आयुभर भजित गेल्यास स्वय होण्याचा दिवस कधी हो उगवणार ?**
**शब्द-अर्थ पिंजत बसल्यास निज संपादन केंव्हा होणार ?**
**कार्यास येऊन, ते कार्य हातून घडल्यावर, आता कशास हवे हो**
**मृत्युलोकीचा हव्यास ?**
**मधुररसाने ओथंबलेल्या अमृतफलाचा देठ लगोलग गळून पडतो-**
**हाच असे हो यास दृष्टांत !**
**बसवण्णा चन्नबसवण्णा आदि प्रथम समस्त**
**गुहेश्वरलिंगाठायी, निजत्व पावून व्हावे हो आता निश्चिंत.**

बसवदेव सांगतात.

८५५

**देव देवा, महाप्रसाद !**
**देवा माझ्या विज्ञापनाकडे द्यावे हो लक्ष !**
**कायेच्या माया संभ्रमात दिलात मज हा जन्म.**
**तो तुमचा असे लीला विनोद.**
**परवादी कसास लावीत असताना.**
**तीनशे साठ मृतांना दिलात प्राणदान,**

अनुक्रमणिका

छत्तीस अपवादांचा केलात निवारण,
अठ्ठयाऐंशी दैवी चमत्कार मिरविलात, तो तुमचा लीला विनोद.
आलात माझ्या मनीचे मालिन्य धुण्यास्तव,
शून्य सिंहासनावर मूर्ती होऊन, तुमची निज महिमा सकल.
प्रमथांच्यासमोर दाखवून, मज केलात हो पावन.
षड्स्थलास मम सर्वांगी करूनी प्रतिष्ठापन-
मज केलात तुम्हासमान, तोही तुमचा लीला विनोद.
हे कूडलसंगमनाथ, माझ्या वर्माचे सकील तुज आहे रे देवा अवगत
हे प्रभो, मज एकदा द्यावे समजावून करावे हो मम रक्षण.

प्रभुदेवांचे प्रत्त्युत्तर.

८५६

कायात होऊनी काया, भावात होऊनी भाव,
ज्ञानात होऊनी ज्ञानाचा सार,
अज्ञानाच्या आधीन न होता निजपद साध्य झाल्यावर,
कसला तो वर्म, कसला तो कर्म; कसला बोध, कसला संबंध !
मी तुम्हास सांगण्याजोगे आहे तरी काय ?
तुम्ही विचारण्याची अवश्यकता उरली नाहीं.
गुहेश्वरलिंगाठायीं गौप्य आहे तरी काय ? तूच सांग बा
संगनबसवण्णा ?

बसवदेवांचे प्रत्त्युत्तर.

८५७

शांति स्थापण्यास गेलो परि ते झाले वेताळ !
ज्ञानतृषा लागल्यांने-परहित साधण्यास्तव
दाविले तयास ममलिंग.
नेम पाळण्यास्तव दिले होते,
जातात का तेथून पळून.
अनिमिष देहभान हरपून बसल्यांनें मी अभवाच्या 'महामने'त
( महामंदिरात ) केल्यास प्रवेश जिगुप्सा पुढें करून,
धुंडण्यास मज धाडिले. त्या स्वतंत्राने.
आक्रंदून-थकून, नाच-गात
अनंत अवस्थेत, वचने रचली एक लक्ष शहाणऊ हजार,
आचार-विचाराचे वैचित्र्य अभय देऊन पाठविला तो मज.
गुहेश्वराचा शरण दाखविल्यास जाणतो मी कूडलसंगमरूपिलिंगास.

अनुक्रमणिका

८५८

जाणातील विस्मरण, विस्मरणातील जाण.
यास जाणून विसरून आठवल्यास न करी वास,
जाणकार कोण आहे हो अगम्य लिंगास,
देऊन प्रशंसा करणाऱ्या व्यवहारास लाभेल कैसे ते ?
पाण्यावर काढलेली लोणी, आकाशातील अग्नि,
पवन संचयाच्या शब्दास आहे का बरे रंग ?
गुहेश्वररूपि लिंग निराळाचे स्वरूप न येई दाखविता
ऐक बा संगनबसवण्णा.

बसवदेव उत्तरतात.

८५९

जाणिले म्हटल्यास जाणण्यास असे असाध्य.
चिंतितो म्हटल्यास चिंतनास असाध्य.
भावतो म्हटल्यास भावनेस असाध्य,
वाङ्मनास अगोचर लिंगास जाणण्याची रीत
कशी उमजेल गुरू दाविल्याविण ?
गुरू शिष्याच्या मथनानें स्वयंज्योति लिंगपावतो
उदय ही श्रुति आहे का हो खोटे ?
कूडलसंगमनाथ, तुमच्या महानुभाव मथनानें माझ्यात
करावे निजत्व निश्चल-हे प्रभो.

प्रभुदेव सांगतात.

८६०

मथनाच्या लीलेत होतो का ब्रह्म निर्माण ?
पहा बा श्रुति-स्मृतीस न होई साध्य !
पृथ्वीत नसलेला अचल अशा लिंगास तो सचराचरात आहे
भरित, असे कसे म्हणता ? येईल संगनबसवण्णा ?
नसणारा लिंग जेथे पहावे तेथे आहे म्हणणें ही होय
नीळवार्ता ( अवाई )
अशानें गुहेश्वरलिंग न होई साध्य बा संगनबसवण्णा.

अनुक्रमणिका

बसवदेव उत्तरतात.

८६१

**अनुभावाविण भक्ति नाहीं परिपक्व होत.**
**अनुभावाविण लिंग समरस सुख न होई प्राप्त.**
**अनुभावाविण प्रसाद न देई परमानंद,**
**अनुभावाविण कांहीही न येई हो जाणता.**
**आपल्यात सन्निहित असल्यावर कशास हवे शिवशरण**
**संग असे येईल कां हो म्हणता ?**
**कूडलसंगमनाथ, तुमच्या अनुभाव गोष्टिस शब्द मथन म्हणता**
**येईल कां ?**

प्रभुदेव सांगतात.

८६२

**भूमीच्या समोर असुनी दार, तीन टोकाच्या खांबाच्या सुळकात आहे**
**एक देऊळ. तेथें आतील चित्र पाषाणात-**
**नादमूर्तिलिंगास रोवले आहे**
**जो एकच बोलतो त्याच्याशी तो बोलतो.**
**गुहेश्वराच्या प्रितीस पात्र होण्यास्तव बहुबोलीच्या अनुभावाची**
**मज गमे लाज बा संगनबसवण्णा.**

बसवदेव उत्तरतात.

८६३

**जाणिवेंने जाणतो म्हटल्यास ते असे जाणिवेस असाध्य.**
**अजाणतेनें जाणण्याची रीत ती कोणती ?**
**भावाने समरस होतो म्हटल्यास भाव निर्भाव म्हटल्यानें**
**न दिसे पुन्हः भावल्याविण.**
**वाङ्मनास अगोचर म्हटल्यास न बोलता चालणे**
**साध्य असल्याची रीत ती कोणती सांगा मज ?**
**अनेक अक्षरे मिळून होतसे एक शब्द परि.**
**एकेका अक्षराचा अर्थ ग्रहित धरतो कां कोण सांग बा ?**
**तुमच्या बोलीचे तत्त्व एकच आहे विना आहेत का दोन ?**
**खोल विचार करिता न येई वदता, कृपा करून दावी बा मज करुणा.**
**हे कूडलसंगमनाथा.**

अनुक्रमणिका

प्रभुदेव निरूपण करतात.

८६४

**पहा बसवण्णा, प्रसाद लिंग असेंतोंवर, प्राणलिंग**
**ही वार्ता होई भंग.**
**सडकेवर फोडुनी मडके, हुडकल्यास तेथें मिळेल कां ?**
**गुहेश्वरलिंगास अन्यठायी हुडकतात कां बसवण्णा ?**

बसवदेव विचारतात.

८६५

**आदिठायी होई साध्य म्हटल्यास ? ते असे त्याच्याही**
**पारपलिकडे !**
**अनादिठायीं साध्य म्हटल्यास ? असे ते त्याच्याही पलिकडे !**
**साध्य असाध्य या मलीन शब्दाच्या अतीत असे ?**
**तो लिंगचि आलिंगनानें अविरळ संपन्न झाल्यानें**
**करता येतो कां हो भेद भाव ? तोच होई हो भव बीज !**
**माझा प्राणलिंग तुमचा प्राणलिंग झाल्यानें,**
**तुमचा प्राण तो माझा प्राण, मागतो मी तुम्हास, हे कूडलसंगमदेवा,**
**प्रभो माझा आदिलिंग मज दावा !**

प्रभुदेव सांगतात.

८६६

**भावून दिठी निश्चल होऊन अत्याश्चर्य झाल्याचे पाहिले.**
**कल्पून मन गुंतून झाले अत्याश्चर्य !**
**गुहेश्वरा, तवठायीं झाला सर्व निर्वाण संगनबसवण्णा.**
**तोच मम प्राणलिंग असल्याचे उमजून पाहिले तुम्हास.**

अनुक्रमणिका

चन्नबसवण्णा म्हणतात.

८६७

घेऊनी लपला तो एक, देऊनी शोधितो हा एक !
यायोगें चौदाभुवनात पावला विस्मय वृषभदेव.
खोदुनी जमीन, दगड चिखल धुवून सोने शोधण्यागत,
शोधित होता तो जंगमाठायी लिंग,
एकनिष्ठेनें पाहता, शिव हा एकरूप होतो.
जप समाधिठायीं दडल्यानें प्रभुदेव आलात तुंम्ही लिंग होऊन.
असंख्याकरिता केलेला स्वयपाक तुम्ही एकटेच सेवून झालात तृप्त.
तेव्हाच, कूडलचन्नसंगय्याठायी लिंग तुम्हीच असल्याचे.
आमच्या संगनबसवण्णास झाले हो अवगत.

प्रभुदेव सांगतात.

८६८

जिकडे पहावे तिकडे दिसतसे बसवरूपि वेल.
ती वेल उचलून पाहता तेथें असे लिंगरूपि झुबका.
लिंगरूपि झुबका पिळून पाहता असे तो भक्ति रसमय.
असा अमळोक्य साधक आहे का हो कोण ?
बाहेर प्रज्वलित करून दाखविणारे आहेत का कोण ?
बसवगुरूनी माझ्या करस्थल इष्ट लिंगाची आदि दिली
समजावून, गुहेश्वरलिंग स्वरूपाची जाण झाली तुझ्या योगे.
हे बाकीचे लोकादिलोक माझ्या मुखी किंचित.

बसवदेव सांगतात.

८६९

शोधित असलेली वेल पायास गुंडाळल्यापरि.
अपेक्षित आकांक्षा हाती लाभल्यापरि
झाले हे फार दिवसानी पाहुण्यांची भेट झाल्यापरि.
पूर्वी एकदां अनिमिषास देऊ केलेल्या या लिंगास
उल्हास उत्साहानें ओवाळिली मंगळारती
नवरत्नाचा बांधूनी हार-तोरण, संतोषाने माझे मनानें
त्वरेने, चक्राकार फिरून देखिले दृष्ट.
तुटली-मिटली मम भवमाला, गुहेश्वराचा शरण

अनुक्रमणिका

**प्रभुदेवाच्या करस्थली पाहिल्यांनें कूडलसंगम या लिंगास !**

प्रभुदेव सांगतात.

८७०

**मम करस्थली मी अवलोकिला एक महाप्रकाश !**
**दिसतसे ते महामंगळचि होऊनी निलय.**
**गुहेश्वररूपि लिंगाची कांती, - संगनबसवण्णास निवाळी.**
**होऊनी ओवाळिती.**

बसवदेव, प्रभुदेवांचे इष्टलिंग आपणास द्यावे म्हणून विनवितात.

८७१

**घेतले अनिमिषानीं मम करस्थलाचा इष्टलिंग.**
**तुम्ही घेतलात अनिमिषाच्या करस्थलाचा इष्टलिंग.**
**तुमचे करस्थलच झाले मम परस्थल.**
**चिन्ह नष्ट झाले तरी चिन्ह घेण्याची रीत ती कोणती ?**
**देणारे घेणाऱ्यात गुंतल्यावर,**
**हे कूडलसंगमेश्वर, तुमच्या करस्थलाचे लिंग मज साध्य झाल्याची रीत ती कोणती ?**

प्रभुदेव सांगतात.

८७२

**विस्मरण झाल्याचे देखुन श्रीगुरूनी दिले मम करस्थली चिन्ह.**
**ते चिन्ह दिठीत पावले हो निरसन,**
**ती दिठी मनी झाली निर्मूलन, ते मन पावे भावात विमोचन,**
**भाव झाले ज्ञानात निरसन, ज्ञान झाले समरसाठायी निरसन**
**आता सांग बा जाणण्याचे कोणते उरले चिन्ह ?**
**तू शोधित असलेले चिन्ह तेच होय माझे करस्थल.**
**माझ्या करस्थलासहित पावलो मी तुमच्यात निर्वयल.**
**माझा निर्वयल लिंग तुज झाल्यानें साध्य**
**असशी बा तूच परिपूर्ण.**
**तुमच्यात महाघनलिंग झाले साध्य, गुहेश्वरालिंगाची साक्ष,**
**तुमची अपेक्षित कामना झाली बा पूर्ण संगनबसवण्णा.**

अनुक्रमणिका

बसवदेव सांगतात.

८७३

देवा, दिलेले लिंग पुन्हः घेऊन येण्यास
धाडिले मज शशिधराने या मर्त्यलोकास.
तुमच्या मुखानें माझे भव तुटेल म्हणून मी विस्तरिला होता
हा दासोह,
तुमच्या आगमनाची वाट पहात लोटले होते अनंतदिन,
आज माझ्या पुण्याईच्या फळाने मज झाले हो गोचर.
पूर्वीचा संदेह-मालीन्य झाले परिहार.
माझा प्राणलिंग तुम्हीच झालात. माझ्या सर्वांगी झालात
हो सन्निहित.
माझी चिंता करा हो निश्चिंत, बा कूडलसंगमनाथ.

प्रभुदेव कथन करतात.

८७४

माझ्या गुरू अनिमिषास पूर्वी लिंग दिल्याचे मानू नको मालिन्य.
तेंव्हा अनिमिषाने तुझ्या हातून लिंग घेतला
म्हणून नको धरू संकल्प.
मागे-पुढे हा सांधा निवारून निजाठायी झाल्यावर परिपूर्ण
देता येते का ? घेता येते सांग बा तूच ?
धरावे म्हटल्यास न गवसे ! द्यावे म्हटल्यास जात नाहीं !
चलन वलनाच्या व्यवहारास न होई ते साध्य !
रूपसंचयास करूनी विलय, तुज झाले निजस्वय,
गुहेश्वररूपी लिंग तुज नव्याने द्यावे का सांग तूच संगनबसवण्णा !

बसवदेव विचारतात.

८७५

सकलात नसे तो सन्निहित परि निष्कलाठायी निज
असल्याची रीत ती कोणती ?
लिंगगमावलेला म्हणून प्रथमगण कुटाळतेनें वदतात.
असे असता सांगा मज लिंगैक्य मी कसा होणार ?
तुमच्या प्रमथाना पटवून होकारार्थि सम्मति मिळवून
मज साधारे स्विकारण्या लावून, तुमच्यात करावे देवा

अनुक्रमणिका

ऐक्य हे कूडलसंगमदेवा.

प्रभुदेव निरूपण करतात.

८७६

निंदा ही विरली आलेल्या भवात.
पुढें गुरूकारुण्य होताच नुरले पूर्वाश्रय
मृत्युलोकीच्या महगणाना मन पसंत होण्यापरि दासोह केल्याने.
सकल प्रथमगणानी आपल्याठायी तुम्हास सामावून घेतले.
अंगावर लिंगधारककाना मी संगमनाथचि जाणतो.
तुझ्या सर्वांगात लिंगसन्निहित झाल्यानें,तुझ्यात माझ्या प्राणलिंगाचे
नाते जुळले हो.
लाखावर शहाणऊ हजार प्रमथास्तव केलेला स्वयपाक
माझ्या शिवलिंगास वाढून केल्याने संतृप्त,
तुझे तनु-मन-धन-प्राण झाल्याने अर्पित, तुज महाप्रसाद झाले साध्य.
आदि लिंगासहित मी तुझ्यात पावल्याने अंतर्धान
पूर्वीचे संकल्प पावले निवारण.
सर्वाचार संपदा झाल्याने स्वयं, सर्व सूतक झाले विलय.
झाले तुझे हृदयकमलचि गुहेश्वरलिंगाचे वासस्थान.
तुझ्या करस्थली झाला आहे तो दैदिप्यमान.
परिशीलन करूनी पहा बा संगनबसवण्णा.

बसवदेवांचे प्रत्त्युत्तर.

८७७

अंगाच्या हाती लिंग, मनाच्या हाती निःसंसार !
कसे येईल हो बोलता, भिन्न ठेवून प्राणलिंग लिंगप्राण म्हणून ?
दिसताहे बाहेर होऊनी चिन्ह.
हे कृतयुगात मूर्ति झाल्याचे नोहे करस्थल.
हे त्रेतायुगात मूर्ति झाल्याचे नोहे करस्थल.
हे द्वापारयुगात मूर्ति झाल्याचे नोहे करस्थल.
हे कलियुगात मूर्ति झाल्याचे नोहे करस्थल.
खालील सात लोक वरील सात लोक उत्पत्तिच्या पार पलिकडेच
त्याच्या पूर्वीचे हे होय करस्थल.
संगनबसवण्णाच्या करस्थलात गुहेश्वररूपि लिंग.
झळकत प्रकाशित असल्याचे पाहून म्हणतो नमो नमो.

अनुक्रमणिका

८७८

जगत् स्वयंभु रूपि गणेश्वराने करस्थली धरून खेळविताना
आदिलिंग असल्याचा विचार नाहीं का करीत या लोकीचे जन ?
गुहेश्वरा, तुमचा शरण बसवण्णा अपेक्षित लिंगास धरल्यायोगें.
त्रिलोकीं दिसे तो फक्त पुसकट.

८७९

प्रळयातीत विजेता, नच वावरे विनाशाच्या जवळ !
कळाकुळ आत्म्याचा नोहे तो अंगसंगी.
संचलनाच्या सुक्ष्मात जाणून पाहिल्यास-
अणिमादि गुणरहिताचे कल्पित महात्म्याचे मी काय सांगू ?
छायेच्या वा कळवळाच्या जवळ न येई हो भावरूप.
प्रकाशातील प्रकाश गुहेश्वररूपि स्वरूप,
संगनबसवण्णाच्या करस्थली दैदिप्य होऊन आहे प्रकाशित.

८८०

गुरूस्थल- लिंगस्थल-जंगमस्थल-प्रसादस्थल
अंतर्भूत झाले आहे की हो बसवण्णाच्या करस्थलात ?
आता कोणासही नसे प्रकटत होत ऐसे लिंगस्थल !
गुहेश्वरा, अशा या संगनबसवण्णास शरणागत
होऊन जगतसे हो

८८१

जलांत विरलेल्या गारापरि,
लिंगाठायी समरस पावलेल्यास म्हणता येते कां हो देही ?
ज्योतित एक झालेल्या कर्पूरापरि ?
कूडलचन्नसंगय्या, तुमचा शरण बसवण्णाची
असे हो अंतस्थिती.

चन्नबसवदेव, बसवदेवांची स्तुती करतात.

८८२

जगच आपण, आपणच जग, ही जाण विरून,
घन वेद्य रूप होऊन, अन्यरहित अनन्य जाणण्यास आहे का हो वाव ?

अनुक्रमणिका

निरंजन निज चिद्रूप झाल्यानें आपण.
ज्ञान हेचि आपण म्हणण्याच्या ममकारास नच अवकाश.
मी-तू पणा नाहींसे होऊन उरलेली स्थिती सांगता येईल कां हो ?
अनुपम सार सर्वस्व आहे हो कूडलचन्नसंगमेश्वर, तुमचा शरण
बसवण्णा !

बसवदेव आदराने वदतात.

८८३

हरपली माझी तहान, झाली माझी इच्छा पूर्ण.
संकल्प झाले क्षीण, लाभले हो मज स्वय.
तुम्हास पाहून माझे नयन मंगळमय होऊन पावले विकसन.
आतले-बाहेर. जे बाहेरचे तेच आतले याची झाली मज जाण.
प्रभु कृपेनें कूडलसंगमनाथाठायीं, राहिलो हो मी अभिन्न.

८८४

काय सांगू कसे वाणू हो एकाचे दोन न होण्याचे ?
कोणत्या प्रकारे सांगू कसा मी सांगू दोन्हीचे एक न होण्याचे ?
अविरळ घन लिंगैक्याचे महादानी कूडलसंगमदेवच जाणे.

८८५

घन गंभिर महाघनाठायीं मी घनाचा घन झालो आहे.
कूडलसंगमदेव, या महा प्रकाशाठायीं प्रकाश होऊनी राहिलो हो मी
शब्द मुग्ध झाल्याचे ते कसे काय सांगता येईल मज ?

८८६

दश-दिशा भूमी-आकाश याचे कांही मज नाहीं देवा समजत.
'लिंगमध्यें जगत् सर्वं' हे कांहीं मज नाही हो कळत.
सागरात पडलेल्या गारागत, होऊनी भिन्नभाव विरहित
शिव शिवा म्हणतो हो मी हे कूडलसंगमनाथ.

८८७

जाण होईपर्यंत केली मी पूजा, करीत होतो अर्चना,
जाणीव होईपर्यंत गाऊनी केले स्तवन,

अनुक्रमणिका

जाण निवारण, नष्ट विस्मरण, भाव निर्भाव होऊन,
निज झाले अंतर्मुख, कूडलसंगमदेवाठायीं,
मी झालो सर्व निवासी देख.

८८८

ज्ञानातीत ज्ञान अवग्रहिल्यानें,
ज्ञानातीत विस्मरणातीत निज होऊनी निश्चल.
झाले हो निर्नाम ! पावे ते निष्पत्ति !
अगम्याठायीं गमन निरसन. निश्चलात पावे हो निराळ.
कूडलसंगमदेवाठायीं झाले शब्दमुग्ध.

८८९

देवा, अंतरंग बहिरंग आत्मसंग हे आहेत हो एकच.
नाद-बिंदु-कळातीत आदि आधार हेही असती एकच.
आरूढ संयोगाचे सुख कूडलसंगमदेवासच ठाऊक.

८९०

समस्त गाढ काळोखाचे निर्मूलन झाल्याचे ठाव देख !
प्रकाशाची प्रभा होऊनी सिंहासन,
प्रकाशाच्या प्रभेचे समरस संयोग कूडलसंगमनाथासच असे विदित.

चन्नबसवण्णा समरसानुभाव सांगतात.

८९१

ज्ञानाश्रयाचा जाणूनी संग होता तो अभंग,
भावाठायीं सर्प दंश होऊन, तो विश्रमिला
आकार प्राणात, भावात पूर्णता, निर्भावात निरत.
कूडलचन्नसंगमनाथ, निर्णय सकलाश्रयात.

अनुक्रमणिका

८९२

स्नेहाच्या सुखास गिळले हो नजर, नजर सुख गिळले मिलन.
मिलनाचे सुख गिळले आलिंगन.
अलिंगन सुख गिळले संग, संग सुख गिळले समरस.
समरस सुख गिळले परवश, परवशाचे सुख
कूडलचन्नसंगमनाथासच विहीत.

८९३

जाणावाचून जाण, विस्मरणावाचून विस्मरण.
पाहण्यावाचून दृष्टि, समरसावाचून संग.
एकहोण्यावाचून समाधीस्थिती सुस्थिर पावलेलेच लिंगैक्य होय.
हे कूडलचन्नसंगमदेवा.

८९४

ज्ञानातीत परवशतेचे शब्द न येई जाणता.
जाणल्यास त्यास तेच होई भंग
ज्ञान विरून विस्मरण नष्ट झाल्याचा भास होंणे अशा ज्ञानास नसे हो निर्णय.
ज्ञानातील बुद्धिस करूनी भस्म केल्यास धारण.
कूडलचन्नसंगमदेव होई सर्व निवासी.

८९५

काय सांगू हो कसे मी वाणू आश्रयविरहिताचे ?
काय सांगू कसे सांगू या नाम निर्नामाचे ?
काय सांगू मी कसे सांगू हो सार स्वरूपातीताचे ?
काय सांगू कसे सांगू हो देवा, क्रियातीत जुळलेले ते नाते.
कूडलचन्नसंगमनाथ, मी पणा झाला हो नष्ट
कोणती द्यावी उपमा त्यास ?

८९६

दृष्ट नष्ट झाले त्यास कोणता देऊ दृष्टांत ?
भाव नष्ट झाल्याचेच दृष्टांत !
भाव नष्ट झाले त्यास कोणता दृष्टांत ?
स्वय-पर न जाणणेंच होय दृष्टांत !

अनुक्रमणिका

स्वय- पर न जाणल्याची साक्ष ती कोणती ?
कूडलचन्नसंगमनाथ म्हणणेंच दृष्टांत !

८९७

न म्हणता येई त्यास सहज, न म्हणता येई निज;
न म्हणता येई हो खंडित,
न म्हणता येई परिपूर्ण, कांहीच न म्हणता येई हो
कूडलचन्नसंगमनाथाच्या लिंगैक्यास.

८९८

नोहे हो मी पण, नोहे तू पण, नोहे स्वय, नोहे पर,
नोहे जाण, नोहे हो विस्मरण, नोहे आत, ना बाहेर.
नोहे कूडलचन्नसंगमदेव हा शब्द मुळातचि.

८९९

तनु निराकार दडले निरवयलांत,
मन निराकार दडले ते निरवयांत, भाव निराकार दडले निरवयलात
निशून्य हे बयलुठायी होऊनी एक झाले परवस्तु
कूडलचन्नसंगमदेव ही वाणी त्यातच लपली.

मडिवाळमाचिदेव अनुभाव कथन करतात.

९००

दडले नित्य हे सत्यात, सत्य हे दडले हो आचारात,
दडले आचार अनुभावात, अनुभाव दडले ज्ञानात,
ज्ञान दडले मनोलयात, मनोलय झाले हो महाघन,
कलिदेवरदेवा, हेच होय तुमचे निजैक्य.

९०१

तनु नष्ट, मन नष्ट, नष्ट स्मरण, नष्ट भाव, ज्ञान नष्ट;
या पाचही नष्टांत झालो हो मी नष्ट.
त्या नष्टांत तूही झालास रे नष्ट. कलिदेवरदेव हे शब्द, वदे
'निःशब्दं ब्रह्म' !

अनुक्रमणिका

९०२

जाणातीत खूण तेच विस्मरणाचे बीज.
खूणाचे विस्मरण गिळुनी ज्ञान
वेद्य झाल्यावर घनाचे घन, आपणच होय हो परिपूर्ण.
कलिदेवरदेव हा वाङ्मनास असे अगोचर.

९०३

माझे आयत अवधान झाले निवारण !
माझे स्वायत भेद झाले निरसन !
माझे समाधान होऊनी परिपूर्ण.
देवारे, माझी जाण निजाठायी पावली निष्पत्ति.
कलिदेवरदेवा, तुजठायीं झालो मी शब्द मुग्ध.

९०४

नुरे तन, नुरे मन, नुरे भाव, नुरे वासना,
निज हेहि नुरे, नाम सीमा शून्याठायी झाल्यानें एक,
कलिदेवरदेवाठायीं, अन्य न उरता झालो एक.

हडपदआपण्णा अनुभाव सांगतात.

९०५

झिजली माझी तनु तुमच्या सेवेत,
झुरले माझे मन तुमच्या स्मरणात,
माझी जाण तुमच्या घनात झाली जीर्ण,
निश्चल निजैक्य पावून बसवप्रिय कुडलचन्नसंगमनाथ,
तू-मी पणाचे काय झाले हे मज नच अवगत.

९०६

माझे आचार-विचार झाले बसवण्णास अर्पण.
माझे अवधान-अनुभाव झाले बसवण्णास अर्पण.
माझे सर्वाचार संपन्नत्व झाले वेद्य बसवण्णाठायी,
झालो मी निज निवासी बसवप्रिय कूडलचन्नसंगमदेवाठायी.

अनुक्रमणिका

९०७

**वेगाने चढून पोहोचलो नाहीं. पोहोचून पुन्हः उतरलो नाहीं.**
**एक झालो म्हणून नाही केले चिंतन.**
**बसवप्रिय कूडलचन्नसंगमदेवाठायीं शब्दास नुरे स्थान.**

सोड्डुळबाचरसा स्वानुभाव निरुपितात.

९०८

**मन कायारूपि सिंहासनावर प्राणरूपि लिंगमूर्ति साकारून**
**ध्यानरूपि हस्तानें शिवून करीत असता पूजा,**
**हळु हळु आवती भोवतीचा संसार निःशून्याठायी झाले एक**
**तू-मि हा भेद निवारून महादानी सोड्डुळाठायीं**
**पावे हो निज लिंगैक्य.**

९०९

**अंग हे लिंगाचे घरटे झाले. लिंग हे अंगाचे झाले घरटे.**
**अंग-लिंग-संग हा सांधा होऊनी नष्ट पावे निजलिंगैक्य.**
**भाव-निर्भाव निष्पत्तिठायीं**
**महादानी सोड्डुळास झाले हो सर्वनिर्वाण.**

९१०

**मम अष्टविधार्चन षोडषशोपचाराचे संबंध तोडुन**
**वदतसे सोहं सोहं. सोहंच्या सुखाची गोडी.**
**महादानी सोड्डुळाच्या भोजनास वाढून**
**झालो मी निज निवासी, त्यायोगे, झालो मी नाम-सीमातीत.**

अक्कनागलांबिका स्वानुभाव निवेदन करतात.

९११

**माझी तनु चन्नबसवण्णाच्या बयलु यात पावे समरस.**
**माझे मन संगनबसवण्णाच्या निजपदात पावले समरस,**
**माझा प्राण प्रभुदेवाच्या बयलु यात पावले समरस.**
**बसवप्रिय चन्नसंगमदेदाच्या शरणानी प्रत्येकानी विभागून**
**घेतले, मज कांहीच नाहीं उरले.**

अनुक्रमणिका

महाघनाठायी झाले हो मी निजनिवासी.

९१२

मम कुळीचे सूतक केले बसवण्णानें निर्मूलन,
माझ्या जिद्दीचे सूतक केले बसवण्णाने निवारण.
मम तनु सूतक केले बसवण्णाने निरसन,
मम मन सूतक, मम प्राण सूतक, मम भाव सूतक
केले बसवण्णाने निवारण.
बसवण्णानें जाण-अजाणतेच्या भेदापासून केले हो मज मुक्त.
बसवण्णानें आपल्याठायीं मज दिले स्थान.
आपण मजठायी व्यापिला हो बसवण्णा.
निज निर्वयल समाधिच्या निजनिवासाचे कवाड
दावियला हो मज बसवण्णा.
बसवण्णा प्रिय चन्नसंगमदेवाच्या हृद्‌कमली स्वय
करूनी ठेविला मम पिता मज संगनबसवण्णा

मोळिगे मारय्या आपला अनुभाव निरूपण करतात.

९१३

माझी जाण-अजाणपण झाले हो बसवण्णास अर्पण.
भाव-निर्भाव झाले बसवण्णास अर्पण.
माझे अंतरंग-बहिरंग झाले बसवण्णास अर्पण.
तू-मी हे झाले हो बसवण्णास अर्पण.
अशा प्रकारे मजलाच मी बसवण्णास निवेदन करून
कोणत्याही अवलंबावाचून निरालंबात झालो हो मी
निवासी निःष्कलंक मल्लिकार्जुनाः

९१४

‘ब’ म्हटल्यानें आलो बसानिध्यांत ‘स’ म्हटल्याने झालो हो स्वय.
‘व’ म्हटल्यानें झालो निरवय.
बसवण्णाच्या निजपदी अभिन्नतेनें झाल्यानें समरस,
नमो नमो म्हणण्याची नुरे हो मज अवश्यकता.

डोहार कक्कय्या आपला स्वानुभव सांगतात.

अनुक्रमणिका

९१५

**माझ्या कष्टकुळीचे सूतक, तव हस्त स्पर्शानें झाले हो परिहार.**
**शुक्ल शोणिताचे सूतक, लिंग स्पर्शानें झाले निराकार.**
**मम स्पर्शित सुख सारे लिंग मुखास अर्पिल्यानें**
**मम पंचेंद्रियें पावले हो निरसन, अभिनव मल्लिकार्जुना,**
**तू स्पर्शिल्यानें मी झालो देवा निःशून्य.**

९१६

**स्मरण्यास नच जाणता येत, निर्धारास न येता येत,**
**असा आहे मी मनविरहित,**
**भावण्यास न येई, वागण्यास न येई, भाव झाल्यानें निर्भाव**
**मज न कळे ध्यान मौन, झाल्यानें तेच ध्यानातीत.**
**ज्ञातृ-ज्ञान-ज्ञेय याच्या होऊनी अतीत,**
**अभिनव मल्लिकार्जुनाठायीं झालो हो मी परमसुखी.**

अशा प्रकारे सकल प्रमथगण आपापल्या निजपदाचे रहस्य निरूपिल्यानंतर शेवटी, प्रभुदेव आपला स्वानुभाव निरूपितात.

९१७

**मनाच्या अग्रानें स्मरल्याचे चिंतन केले निश्चल जनन मरण.**
**ज्ञान ज्योतिचा उदय पावे हो भानुकोटीच्या अतीत.**
**स्वानुभावाचा उदय ज्ञानशून्यांत पावे अंतर्भूत.**
**त्या घनाचे कसे काय सांगू देवा गुहेश्वरा.**

९१८

**निर्विकल्प अशा निजाठायी, निरहंकाराभावात करितसे मी वास.**
**पाहिलें म्हणावे तर पाहण्याचे नसे कांही.**
**ऐकले म्हणावे तर ऐकण्याचे नसे कांही.**
**घन निरंजन प्रकाश सामावल्याचे कसे काय सांगता येईल हो**
**मज गुहेश्वरा !**

९१९

**पाहताचि घन अवग्रहिले मन.**
**पाहता पाहताचि झाले महाघन**

अनुक्रमणिका

त्याठायींच पावे हो विलीन, तद्वत शब्द मुग्ध झाल्याचे कसे काय
सांगता येईल गुहेश्वरा.

९२०

अमूर्त परवशतेच्या सुखाची गोडी न कळे परवशतेविना,
या वाणीस ना ठाव.
खुणाविना, ज्ञान संपादिल्यानें झाली समरस या अर्थहीन बोलीची
मज वाटे हो लाज गुहेश्वरा.

९२१

उपमेस उपमा देण्यास न आल्यानें घोषिले उपमातीत म्हणून उपमा
करिते रुदन
जाण हे जाणाच्या मागे दडल्याचें न जाणल्यानें
जाण हे खेळतसे खुणास धरून.
ध्यान हे ध्यान करण्यास न जाणता त्यातच
ध्यानासक्त होऊन झाले तेथेचि निश्चल.
ज्ञातृ-ज्ञान, ज्ञेयास होऊनी असाध्य,
ज्ञानासहे वेद वेद विज्ञान असे संबोधिल्यानें, तत्वमसि या
वाक्याचा अर्थ ठरला हो खोटा.
सच्चिदानंद असे संबोधिल्यानें, द्वैताद्वैत ब्रह्मवादी सगळे झाले हो संहार.
येऊनही न येता, समीप होऊनही न होता, आहे तो निश्चल
निराळ गुहेश्वर.

९२२

मी-म्हणणेंच प्रमाण, तूच म्हणणें प्रमाण, स्वय म्हणणे प्रमाण,
पर म्हणणे प्रमाण, प्रमाण म्हणणे हेच प्रमाण,
अप्रमाण म्हणणेही प्रमाण, गुहेश्वर म्हणणेही होई प्रमाण.

अनुक्रमणिका

# २२

बसवदेव, चन्नबसवदेव, प्रभुदेव आदि करून असंख्यात महागण आपापल्या निजपद निजैक्याची रीत सांगतात, ते ऐकून प्रभुदेव आपल्या निजपदाचे विवर निवेदितात, सकल असंख्यात महागणाना निर्वाहस्थितीगतिचे निरूपण करतात.

## ९२३

**सरली अवधी, उरला हो व्यवधान,**
**निज हे निजात सामावले, ऐक बा बसवण्णा !**
**कलियुगात पुढें राहू नये निजशरणाने;**
**बसवण्णा चल तू, आता कप्पडी संगमदेवाठायीं पावण्यास ऐक्य,**
**चन्नबसवण्णा तूं जा, उळवीत निजपदी पावण्यास ऐक्य.**
**मडिवाळमाचीदेवा, तू हो महाठायी ऐक्य.**
**सोड्डळबाचरस आदिकरून सकल प्रमथगण निर्वयल**
**समाधीत व्हावे हो निजैक्य.**
**अनुभवाने लिंगाठायी करतात प्रवेश.**
**जाणारे जातात काया सामावून कैलासास.**
**कायासहित तुम्ही सारे यावे हाच उपदेशमंत्र असे अटळ.**
**आम्हास कदळीत प्रवेशून निजाठायीं ऐक्य पावण्याचे**
**लाभे परमानंद हीच असे हो तुम्हा सकलाना आमच्या**
**गुहेश्वराची आज्ञा.**

बसवदेवादि प्रमुख असंख्यात गणांना निजसमाधीच्या विस्ताराचे निरूपण करून प्रभुदेव निरोप घेतात. कल्याण सोडून श्रीगिरीस जात असताना गोरक्ष नावाच्या सिद्धपुरुषास पाहून त्याच्याशी चर्चा करतात, त्याच्या वज्रदेहास असिताळपत्राने तोडून, पारखून पाहतात. गोरक्षास उपदेश करून कदळीस जातात. कदळीच्या द्वारात उभारून निरुपितात.

## ९२४

**कायारूपि कंथा धारण केलेला असो तो ब्रह्म,**
**असो विष्णु, असो रुद्र, असो ईश्वर,**
**सदाशिव, पंचमुख- दशभुज-त्रिनेत्र असो तयास,**
**तळपायी डोळा, सर्वांग डोळा, नंदी वाहन,**
**रुद्र, गंगाधर, गौरीपती कोणीही असो तो-**
**तयास माया ही छळल्यावाचून न सोडी देख.**
**कायारूपि आड पडदा देऊन, कैलासात वास करीत असता**
**कदर नसलेल्या रुद्रानें मज करूनी चेंदामेंदा**
**जमिनीत घातल्यानें, येऊनी तोडली मी भवाची वेल !**

अनुक्रमणिका

**भूतकालीन भयास भिवुन, भविष्याच्या परलोकीची गति अव्हेरून.**
**वीट येऊन केल्यास निवारण, पुण्य पाप या दोनीचा झाला हो**
**नायनाट.**
**गुहेश्वरानें विस्तारलेल्या संसार सागरास ओलांडुन, मी**
**नित्य निवासाचे दार पाहून, केला हो मी त्यात प्रवेश नतमस्तक**
**होऊन.**

कर्दळीच्या पुढील द्वारी उभारून आपले निजत्व जाणलेले प्रभुदेव त्या कर्दळीत प्रवेश करून निरवयलाठायी निवासी होतात.

९२५

**कायारूपि महा कदळीचा विजेता नाहीं हो मी पाहिला.**
**संसारसागररूपि सप्तसमुद्रांनीं घातला आहे गराडा.**
**भवरूपि महा अरण्यात पंचेंद्रियरूपि विषाचा पाऊस पडत आहे**
**जोरांत कोपरूपि व्याघ्र आहे तेथें वावरत,**
**अष्टमदरूप माजलेले हत्ती वाटेंत आडवे येताहेत.**
**कामरूपि मुसळधार पाऊस आहे पडत.**
**मत्सररूपि महासर्प अंगारा ओकतो आहे.आशारूपि पापीचे लेकरू.**
**फाडफाडून खात आहे. तापत्रयरूपि अग्निवर्षाव-**
**पाय ठेवू देत नाही. अहंकाररूपि पर्वत आडवे पडले आहेत.**
**पंचभूतरूपि भूत प्रेताचे भय पाहवत नाहीं.**
**मायारूपि राक्षसी कच्चे खात आहे. विषयरूपि विहीर वापरू नये.**
**मोहरूपि वेल गुंडाळीते पाया.**
**मोहरूपि तीक्ष्ण धारेचा हत्यार म्यानेच्या बाहेर काढू नये.**
**अशा या कर्दळीचा प्रवेश करणें न जाणता, देव-दानव-**
**मानव समस्त मतिहीन होऊन, मोहून बाहेर गेले पळून.**
**तळपायीं डोळा. अंगांग डोळा असलेल्यांचे मस्तक सर्वांग**
**नाहींसे झाले.**
**अशा या कर्दळींत काढुनी वाट, काटेंकुट्याना न शिवतां केला हो**
**प्रवेश.**
**मागचे सोडून पुढे सरसावून जिंकूनी झालो मी पार.**
**गुहेश्वररूपि लिंग निजसमाधीत होऊन सुस्थिर**
**परवशतेंने निराळात झालो हो निराळ.**

प्रभुदेव निजपदी ऐक्य झाल्यावर त्यांची बसवदेव स्तुती करतात.

९२६

**लिंग गंभिर मन झाले की हो निरसन !**
**जंगम गंभिर संचार झाले की हो निर्गमन !**
**प्रसाद गंभिर रूप झाले हो विलीन !**
**आचार गंभिर अवयव झाले की हो क्रियाविरहित !**
**ज्ञान गंभिर चाली बोली झाली कीहो स्तिमित !**
**कूडलसंगमदेवाठायी, प्रभुदेव पावल्याने निजत्व**
**बसवण्णा त्या संगेच पावला हो देवा सानिध्य.**

चन्नबसवदेव कथन करतात.

९२७

**मम अनुभावाचा तूं असशी अगम्य, मम ज्ञानाचा तूं विश्राम,**
**मम भावाचा तू क्रम,**
**मम निजाचा तू उत्तुंग, मम मनःशांतिचा तूं मेरू,**
**मम मनीचा तूं महिमावंत, कुठे लपले रे तुझे संचलन,**
**हे लिंगदेवा, तुझे नाम कुठे लोप पावले रे ?**
**हे परमगुरो, कूडलचन्नसंगमदेवाठायीं, शेष न उरता**
**उजळिल्या कर्पूरापरि झालास कीं हे प्रभो.**

मडिवाळमाचिदेव या संदर्भात स्तुती करतात.

९२८

**अष्टतनुचे निष्ठापरत्व सांडून परवस्तुठायीं निश्चल निजत्व**
**झाल्याचे पहा हो !**
**दश प्राणास करूनी निश्चल, तयास पिळून जाळल्यानें**
**स्फुरलेला हा घनचैतन्य पहा हो ! अविरत निष्ठा.**
**परिपक्व होऊन देठ गळुन पडलेल्या सच्चिदानंदाची पहा हो ही रीत**
**कलिदेवरदेवा, प्रभुदेवांच्या या महतीस म्हणतो मी नमो नमो.**

सोड्डळबाचरसा स्तवन करतात.

९२९

**निजतत्त्वाचे निरवय पावे चेतन,**
**चिंतनकाराचा परीस घनात झाला विलीन.**

अनुक्रमणिका

**भक्तांचे भाग्य पावे हो मुक्ति.**
**बसवण्णा-चन्नबसवण्णाच्या 'महामनें'त महादानी.**
**सोड्डळाचा शरण प्रभुदेव निरवयलात पावल्यानें विलीन,**
**सत्यलोकीचे उघडे हो कवाड.**

सोड्डळबाचरसा लिंगैक्य झालेले पाहून बसवदेव म्हणतात.

९३०

**आमच्या शरणाना ना मरण,**
**आमच्या शरणाना ना मरणाची जाण,**
**खऱ्या अर्थानें नसे हो मरण, लिंगाठायी उदय पावलेल्या**
**निजैक्यना, त्या लिंगाठायीच असे तयाना स्थान, नसे अन्य ठाव.**
**कूडलसंगमदेवाचा शरण सोड्डळ बाचरस निजलिंगाची**
**काया दुभंगून शिरल्याची उपमा देण्यास नसे हो वाव.**

९३१

**ऐका हो ! राजाचा विचार, संपत्ति आणि शृंगार हो मर्त्य लोकी**
**नसे हो स्थिर !**
**कल्याणाची झाली नासधूस, पडले हो कल्याण ओस,**
**हे ताडले लोकीच्या जनाने. शिवाचाराच्या अभिमानानें,**
**जगदेव-मोल्लेयबोमण्णा पुढें सरसावून, बिज्जळाचा केला वध.**
**कूडलसंगमदेव आपल्या हातानें आज्ञा टाकिला खोडून.**

९३२

**धाडिले कर्त्यानें मृत्युलोकी येथें बांधिले महामने.**
**उगळित जीवन जगतसे मी सत्य शरणांचा सेवक दास होऊन.**
**परतुनी ये अशी आज्ञा कर्त्याची झाल्यास,**
**कूडलसंगमदेवाची आज्ञा मानतो मी महाप्रसाद मानून.**

या प्रसंगी बसवदेव सकल असंख्यात महागणांना आपापल्या निजनिवासास पाठवीत, आपणही लिंगैक्य होणार असल्याचे कथन करून निरोप घेतात.

९३३

**मी आहे हो तुमच्या वीरांचा वीर, मी आहे हो तुमच्या**
**दासांचा दास**

अनुक्रमणिका

कूडलसंगमदेवाच्या समस्त शरणाना संगनबसवाची विज्ञापना ;
आज्ञेची झाली आता पूर्तता; निजपदी होण्यास एकरूप करावी बा
मजवरी कृपा.

९३४

माझ्या चुका न येई हो मोजता असती ते अगणित;
चुकतो मी वागण्या, चुकतो मी बोलण्यात,
करूनी चुकतो वाढुनी चुकतो,
चुकतो मिळुन मिसळुन, चुकतो जाणुन,
माझ्या चुका न धरिता मनी, नका आणू चित्ती,
कूडलसंगमेश्वर हा माझा भ्रतार. आपल्यात होण्यास्तव
एकाकार, मज धाडिला हो बोलावण.
सकल शिवशरणाना म्हणत शरणु निरोप घेण्याची असे मज त्वरा.

*राग : आहिर*

शरणू शरणू जमलेल्याना वदती मी शरणू.
अचल लिंगास केले प्रसन्न अशा शरणाना शरणू ॥धृ ॥
हस्तचि माता, दृष्टिच पिता
घेतले मी जनन अयोनीत.
गुरू साक्षीनें बांधिले कंकण.
शिवचि माझा पति जाण ॥ १ ॥

माय बाप तू बंधु बांधव
शिवभक्तीच होय माझे माहेर
सगळे मिळुनी तुम्ही पाठवा
ममनाथाच्या घरा ॥ २ ॥

लगनात शरणांनी नेसविली साडी
फाटली साडी झाली चिंधी
शरण स्वतंत्रशील परमज्ञानी
सावध केले मज, नये परतुनी ॥ ३ ॥

तुटली माझी तो भवमाला
तुमच्या कारुण्य प्रसादायोगें
ना भव आणिक, ते तुम्हा कळे
आहे हो मी तुमचा बाळ ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

**मिटतो तोंड, जोडितो हात**
**प्रतिशब्द नाहीं मी बोलत**
**मम मस्तक शरण चरणावरचे**
**न झाल्याने ते दूर ॥ ५ ॥**

**नानारिती करूनी पतिस प्रसन्न**
**एक झाल्याने स्नेह मिलन**
**सांगता न येई ऐकण्यास नसे वाव**
**अन्य शब्दास ना ठाव ॥ ६ ॥**

**शब्द निशब्द झाले माझे आता**
**कूडलसंगमदेवाठायी पावे लय**
**मन अल्लम प्रभु चरणी**
**पावल्याने स्वय ॥ ७ ॥**

बसवदेव महागणांचा निरोप घेऊन, आपल्या घरातील उपकरण लिंगजंगमाना देऊन सातशे सत्तर महागणाना निजपद प्राप्तिचे निरूपण करून पाठवितात. आपल्या समयाचाराचे तीनशे छत्तीस हजार जंगमाना चन्नबसवण्णांच्या स्वाधीन करून कप्पडी संगमनाथाच्या श्रीपद सानिध्यात येऊन सगमनाथास विनवणी करतात.

९३५

**हे बापा भवदुःखात जन्मलेला नसे हो मी प्राणी !**
**आता मज ना जनन, ना मरण.**
**आहे मी, जनन मरण या दोन्हीच्या बाहीर**
**तुम्ही सोपविलेले महान् कार्याची केली हो पूर्तता,**
**आता तुमच्यात ऐक्य करून घ्या देवा कूडलसंगमनाथा !**

९३६

**देवारे, पूर्वी झाले होते रे विस्मरण, त्यायागें हे भवबंधन,**
**देवा, तव लीला विनोद सूत्रानें, एक लक्ष शहाणऊ हजार**
**गायिलो मी गीत, दासोहरूपि महाघन समूहात, मज ठेवलात.**
**तुम्हीच मिरविली हो तुमच्या भक्तिची घनता.**
**परवादी बिज्जळ महाराजाशी उभे केले संघर्ष,**
**तीनशे साठ मरण पावलेल्या प्राण्यास देण्यास लाविले जीवदान,**
**छत्तीस अपवाद जिंकिलात, प्रशंसनीय अठ्याऐंशी दैवी**
**चमत्कार घडवितात.**
**मर्त्यलोकीच्या महागणांचा शेष प्रसाद मज वाढून केलात माझे पालन.**

अनुक्रमणिका

तुमचे महागण होऊनी प्रसन्न माझ्या सूतकाचे केले निरसन.
प्रभुदेवांच्या कृपेंने प्राणलिंगाचे नाते झाले मज स्वय.
तुम्ही आज्ञापिलेल्या कार्याची झाली हो पूर्तता
आता मज तुमच्यांत करा एकरूप देवा कूडलसंगमनाथा.

९३७

देवा, ज्वालेतील कर्पूराचे उरते का हो राख ?
अवकाशातील मृगजलास असतो कां चिखल ?
वायुस मिसळलेल्या परिमळास असते कां हो निर्माल्य ?
तुम्ही मनापासून प्रसन्न झाल्यावर असू शकेल कां हो मज भव ?
कूडलसंगमदेवा, तुमच्या चरण कमली द्यावा बा  मज ठाव.

आता ऐक्य :

९३८

शरण नात्यातला ऐक्य पावताना,
हरी ब्रह्मादि तेहतीस कोटी देवता, उघे चांगुभला ही
घोषणा करीत असताना,
ऐक्य होण्याचे बसवाचे स्थान कोणते म्हणजे ;
अंगकळेच्या उजवीकडे ब्रह्मस्थान, डावीकडे नारायण स्थान,
मज नको हो ऐसे स्थान !
कंठ विषस्थान, तोंड पाण्याचे स्थान, नाक वायुचे स्थान,
डोळे अग्निचे स्थान, जटा गंगाचे स्थान, भाळ हे चंद्राचे स्थान
डोक्याचा मागील भाग सूर्याचे स्थान, चरण अष्ट दिक्पालकांचे स्थान
गुह्य कामाचे स्थान, हस्त त्रिशूल-कपाल-खड्वांग, डमरूचे स्थान
नको हो मज हे सारे स्थान, कूडलसंगमदेवा,
मज द्या उघडून तुमचे हृदयकमल अंतराळातील एकपीठाचे
सिंहासन.

ऐक्य-

*राग : गुज्ररी*

एक तूं होशी अनेकही होशी
का बरे देवा मज तूं पीडिशी

हे परमात्मा तूं मजवर रागावुन

अनुक्रमणिका

धरणीवर धाडल्याचे काय रे कारण ? ॥ १ ॥

तहानलेल्या अनिमिषास
सात्विक उमजुन दाविले मी लिंगास ? ॥ २ ॥

उपकार केल्यानें आलो मजवर अपकिर्तीची वेळ
शांति करण्यास मी गेलो रे परि झाले ते बेताळ ॥ ३ ॥

गाय गिळुन माणिक झाले ते न थुंकण्यागत
मी होय पशु तू असशी पति का बरे तूं मज छळिशी ॥ ४ ॥

येऊनी मृत्यूलोकी भक्त  होऊनी करीत असता
कष्ट प्रभु होऊनी दिसशी रे तू मज आता ॥ ५ ॥

मृत्यूलोकीं मी परतुनी आल्यास
कष्ट तुमच्या राणीवासाची वाहतो मी शपथ ॥ ६ ॥

यद्य पश्यत्रिकालज्ञ स्वैलोक्याकर्षणं भवेत्
तथापि लौकिकाचारं मनसापि न लंघयेत् ॥ ७ ॥

याश्वृतिवाक्याचे पडले रे मज विसर
मज तुझ्यांत कर एकाकार देवा कूडलसंगमेश्वर ॥ ८ ॥

९३९

भूमी आकाशामध्यें उगवले एक आंब्याचे झाड,
त्या वृक्षास दोन शाखा, सहा पानें, छत्तीस पुष्प, एक फळ.
फळ रसानें भरल्याचे न दिसे कांहींच.
गळली पानें फळाचे देठ तुटुनं पडले.
ते फळ प्रभुदेवास वाढल्यानें निजाठायीं निरवयल पावले.
त्या प्रभुचा कृपा प्रसाद मी केल्यानें सेवन,
कूडलसंगमदेवानें येई बा इकडे म्हणून, मज दिले हो आपल्या
हृदयकमली स्थान.

बसवदेव हे अशाप्रकारे कप्पडी संगमनाथाचे हृदयकमल विदारून प्रवेश करून लिंगैक्य पावले. तेव्हा त्यांची वडील बहीण आक्कनागाई प्रलाप करते.

अनुक्रमणिका

९४०

हे देवा, मी आहे रे अनाथ !
हाय हाय, घ्यावी का देवा माझ्या हातातील आधाराची काठी
हिसकावून ?
कोवळ्या वासराचे कवळेपण न्यावे का रे ओढुन ?
भक्तजन हाय हाय म्हणत असता न्यावे कां ?
बसवण्णा प्रिय चन्नसंगमदेवा,

९४१

भक्तिचा भांडारी बसवा मुक्तिची मूर्ति बसवा,
लिंग जंगमाचा चैतन्य बसवा, तुम्हास अंतरून,
कशी करू मी सहन ?
हाय हाय हाय रे देवा, हे परमगुरू बसवा ?
तू माझ्या अंतरंगाची होतास ज्योत, बसवा
मज शेष प्रसाद वाढुन, मज वाचविला की हो करूनी पावन !
हे बसवलिंगा, मज आता कोण हो गति मति सांगा बा तुम्हा
वाचुन ?
बसवण्णा प्रिय चन्नसंगमदेवा, तुम्ही अंतरलात
परि, माझा प्राणअंतरेल कां हो तुम्हापासून ?

९४२

बसवेशा, तुम्ही मृत्युलोकी येऊन केल्याने वास
भक्ति अभिवृद्धि होऊन पसरली हो दशदिशा !
स्वर्ग-मृत्यु-पातळलोकी तुझ्या भक्तिच्या पिकाची घनता
जाणणारे आहेत कारे इथे कोण अण्णा ?
शशिधरानें सोपविलेल्या महत् कार्याची पूर्तता झाली म्हणून
तुम्ही झालात लिंगैक्य, तुमच्यासंगे गेली की हो भक्ति,
तुमच्या बरोबर गेला इथला सदाचार, अण्णा, गेले हो तुमच्या संगे
असंख्यात !
बसवण्णा, मृत्युलोकीतले महामने झाले हो शून्य.
मज का नाहीं नेले बसवा तुमच्या बरोबर ? गेलात की हो
पंचपरिसमूर्ति बसवण्णा ?
बसवण्णा प्रिय चन्नसंगमदेवास प्राणलिंगचि झालात की हो
बसवण्णा !

अशा प्रकारे आक्कनागाई कथन करून ऐक्य पावतात.

अनुक्रमणिका

९४३

पहा हो, आचार आहे ते अगोचर !
या मृत्युलोकी ते कोणासही नसे हो असाध्य.
अशा या सदाचाराची अभिवृद्धि करण्यास्तव
आलात बसवण्णा, केलात भक्तिस्थलाचा विस्तार.
गुरू लिंग जंगम दासोह प्रसाद पादोदकाचा मार्ग सकलाना दाविला.
शिवाचाराची अभिवृद्धि होत आहे वा नाहीं,
असा बिज्ज़ळ महाराजानें तर्क केला.
तयास अनंत मुखानें पटवून मान्य करण्यास तुम्ही लाविले.
आलेल्या महत् कार्याची पूर्तता म्हणून लिंगाठायीं करूनी प्रवेश,
माझ्या मागे या लोकीचे जन होऊनी जाणकार

जगावे म्हणून दिला हो निजभक्तिची परंपरा
मी मागे उरले म्हणून मज पुढची गति दाविला हो,
बसवण्णाप्रिय चन्नसंगय्याठायीं आपल्या प्रसादांत दिला मज स्थान,
माझा जन्मदाता संगनबसवण्णा.

त्या प्रसंगी चन्नबसवदेव कथन करतात.

९४४

लिंगचि जंगम, जंगमचि लिंग असल्याचे दावून झालात कि हो
निजैक्य, निजगुरू बसवण्णा !
प्रसादचि काया, कायाचि प्रसाद असल्याने माझ्या सर्वांगात
प्रतिष्ठा करून, मज सिद्धि साधण्या लावून, मज येथे सोडून
माझ्या आधीच गेलात कि हो संगनबसवण्णा !
लिंगप्राणचि प्राणलिंग असल्याचें माझ्या अंतरंगात करूनी
स्थापना, मज केलात हो तुम्हासम, निजलिंगाठायी निरवय झालात
कि हो परमगुरू बसवण्णा !
माझ्या मनास महातत्त्वात करूनी लय, गेलात की हो होऊन निरवय,
निजलिंगैक्य बसवण्णा !
तुमचे शेष प्रसाद वाढुन मज निर्णयास आणून
तुमच्या अंतरंगात आई नागाईस दिल्याने स्थान,
मम मन तव पदी विरून झाले ही क्षीण हे संगनबसवण्णा !
कूडलचन्नसंगमदेवास होण्यास्तव सुज्ञान वाहन,
निरवय झालात की हो संगनबसवण्णा !

अनुक्रमणिका

*राग : शोक बहुळ*

शरणु शरणु माझ्या गुरूस शरणु
उपमातीत अशा या गुरूस शरणु
लिंग जंगमचि घन म्हणून प्रसाद
मज दाविला हो गुरू अखंड निजपद ॥ धृ ॥

साकाररूप करूनी धारण बिज्ज्ळास
हवे तैसे दृष्ट दावियला मम गुरू
जग भरून तूच होऊन
गेलास मज चुकवून गुरू॥ १ ॥

भक्त माहेश प्रसादि प्राणलिंगी
शरण ऐक्य असशी तूचि गुरू
मोहि दासोही झालास भक्तगणा तूंच
इहपराचे सुख मज दाविलास गुरू॥ २ ॥

नाद बिंदु काळातीत महाघनाचा
आदिलिंग अनादि शरण आहेस तूं गुरू.
विज विजात एक झाल्यागत
समुहाचे मी काय वाणूं बा गुरू॥ ३ ॥

ज्ञान खुणास शोधित येऊन
ती खूण ज्ञानात विलीन, त्याचे नुरे भान
हे गुरो ज्ञातृ ज्ञान ज्ञेय या त्रिविध
गोष्टीस उल्लंघिलास ॥ ४ ॥

भाव भावचि भावून अनुभाव
निर्भाव एकार्थ झालात मम गुरू
वदतो मी बसवलिंगचि लिंग
कूडलचन्नसंगाठायी.

चन्नबसवदेव सांगतात.

९४५

हे देवा माजला रे कोलाहल, उडाला भक्तिचा गोंधळ !
शिष्टाचारास ठरले आदर्श परि ते उरले आता नाममात्र !
गेले बसवण्णासंगे भृत्याचार आणिक समयभक्ति

अनुक्रमणिका

कूडलचन्नसंगमदेवा, घेऊन गेल्यानें बसवण्णा.

९४६

गेले हो माझे स्थल, गेले माझे निःस्थल.
करूनी गेलात मज समाधिचे पाषाण
गेले माझे फुलाचे विमान.
गेला माझा बसवेश. गेले बसवाच्या घरचे जंगम.
आता मी बसवा म्हणून नाहीं आलापित
कूडलचन्नसंगमनाथ वाहतो तुमची शपथ.

माडिवाळमाचिदेव कलिदेवास विनवितात.

९४७

नेसलेले वस्त्र काढून टाकून गेलात हो तुम्ही बसवण्णा !
पादुका फेकून गेलात की हो बसवण्णा !
मोकळे केस सोडून गेलात की बसवण्णा !
सीमेचे नाते तोडून गेलात की बसवण्णा !
लिंगास केलेल्या त्या क्रियेस न स्पर्शिता गेलात हो बसवण्णा !
जंगमास केलेली क्रिया  गेली तुमच्या संगे बसवण्णा !
प्रकाश नेसुन निशून्य होऊन गेलात की बसवण्णा !
त्या बसवण्णाच्या पाठोपाठ जाण्याचा मार्ग मज दावाहो
कलिदेवाच्या देवा.

९४८

आकार निराकार झाले की हो बसवण्णा.
प्राण निःप्राण झाले की हो बसवण्णा !
लिंग-जंगमाच्या एकरूपाची झाली की हो समाप्ति बसवण्णा.
निशब्द वेद्य झालात की देवा बसवण्णा !
कलिदेवरदेवाच्या हृदयकमली प्रवेशून देवाचा देव होऊन
गेलातहो संगनबसवण्णा !

९४९

बिंदूस छेदिले की हो तुम्ही बसवण्णा !
नादास सिंहासन केलात हो बसवण्णा !
अष्टगुणास नष्ट केलात की निजलिंग बसवण्णा !

अनुक्रमणिका

शुक्ल शोणित मेधाने झालेली ती काया कोणीकडें गेली देवा
घनलिंग बसवण्णा !
मूर्तरहित अमूर्त विरहित लिंगास मज दाविला की हो.
बसवण्णा ! निरवय होऊन गेला हो आमचा बसवदेव
निराकार होऊन गेला हो आमचा बसवराज !
नेसुनी प्रकाश पावला निराकार आमचा बसवलिंग !
बसवण्णा, बसवण्णा, बसवण्णा असे म्हणू तरी मी
किती वेळा ? वाङ्मनास अगोचर झालेल्या बसवण्णास
आदरानें म्हणतो मी शरणु शरणु कलिदेवा.
पदवी दावा मज कलिदेवा.

मडिवाळमाचिदेवांचे ऐक्य :

९५०

निर्वाह झाले देवा बसवण्णाचे कप्पडी संगमनाथाठायीं.
आक्कनागाई, मिंड मल्लिनाथ, हडपदअप्पण्णा,
मोगवाडद केशिराज, कोल शांतय्या आदि करून सकल
शिवगण बसवण्णाच्या सर्वशून्याठायीं. झाले एक.
त्या सर्वशून्य प्रसादानें निरुपम प्रभुदेव कर्दळीच्या बनी पावले
शून्य निशून्य ( बयलु ) त्या बयलु प्रसादानें मोळिगे मारय्या, कक्कय्या,
पडिहारी उत्तण्णा, कन्नद मारण्णा, कलिकेत बोमण्णा
नुलिय चंदय्या, हेंडद मारय्या, शंकरदासिमय्या
एकांत रामय्या, मेदर केतय्या, आदिकरून अमरगणांचा
समूह पावला हो निजैक्य. आले महत् कार्याची
झाली आता पूर्तता प्रख्यात असलेले सकल पुरातन निपटिले
माझ्या मनीचे मालिन्य. या योगें
कलिदेवा, या सकलांचे शेष प्रसादाचे निशून्य ( बयलु ) झाले हो मज
प्राप्त.

मडिवाळमाचिदेव ऐक्य पावल्यानंतर चन्नबसवदेव ऐक्य पावतात.

९५१

चार कोस विस्तीर्ण नगरी, तीच झाली कल्याण रूपि प्रणति.
त्या प्रणतीत ओतिले महत् रूपि तेल,
ज्ञानरूपि ज्योति केल्याने प्रज्वलित होते तेथें विराजित, अशा
कल्याणांत
काळय्या-चौडय्या-कोल शांतय्या

अनुक्रमणिका

**मुखवाडद केशिराज, खंडनेय-बोमण्णा-मिंड मल्लिनाथ,**
**हडपदअप्पण्णा,**
**मडिवाळमाचिदेव-आई नागाई समवेत हे समस्त**
**संगनबसवण्णाच्या ( बयलुठायीं ) झाले एक.**
**कूडलचन्नसंगमदेवाठायीं या सकलांचे शून्य निशून्य**
**प्रसाद ( बयलु ) मज लाभले.**

प्रभुदेवांचे शून्य संपादन संपूर्ण.

शून्य संपादन हे परमगुरू परमवीरशैवसिद्धांत तत्त्वज्ञान आहे, हे वीरशैवाचार प्रतिष्ठापनाचार्य दिव्य वेदान्त शिरोमणी आहे, हे समस्त शास्त्रास मुख्य मुखदर्पण आहे, महाज्ञानवर्धन परमानुभावबोध आहे, हे सर्वाचार संपन्न समारूढ संग्रह, परमराजयोग साध्य सन्निधान, सत्चित्तानंद नित्यपरिपूर्णरसामृत प्रसन्न प्रसाद आहे, हे अज्ञान तिमिरांजन तंत्र असून **प्रभुदेवांचे शून्य संपादने**च्या महानुभाव गोष्टी शिवशरण महागण बसवदेव, चन्नबसवदेव प्रभुदेव आदिकरून प्रामुख्याने वचनानुसंगे कथा निरूपण करून-**शिवगण प्रसादि महादेव** यांनी शिवगणांचे शिवानुभव स्तोत्रद्वारमुखाने निर्मल दर्पण समर्पिले आहे, ही महाचर्चा सहृदयाने जाणलेल्याना नित्य निरवय लाभते. भवभारास भिऊन श्रवण केल्यास सद्योन्मुक्ति लाभते. सत्संगाने श्रवण करून मनन करणारे निर्मलात्मक बनतात. आदराने आनंदाने श्रवण केल्यास रुद्र लोकाधिपति होतात. मनोरतिनें लिहिल्यास, पठण केल्यास, कथन केल्यास, श्रवण केल्यास-सालोक्य, सामिप्य, सारुप्य सायुज्य ही चतुर्विध पदवी लाभते. हे शून्य संपादन शिवशरणानी श्रवण करावे, लालन करावे, पालन करावे, लिहून पठण करावे. **या निरूपण क्रमांत उणीव भासल्यास तुमच्या परमज्ञानाने सुधारणा करून या वचनानुभवाची चर्चा करून सुख संपादन करावे.**

**॥ मंगलमहा श्री श्री श्री ॥**

अनुक्रमणिका

# पारिभाषिक शब्द

( वचनवाङ्मयाच्या अभ्यासाला सहाय्यक होण्यासाठी व शरणाची जीवनसृष्टी समजून घेण्याच्या दृष्टीने त्या वाङ्मयातील काहीं पारिभाषिक शब्द येथे देण्यात येत आहे.)

**अनुभावी :** आपणास आपल्यांत जाणलेला अनुभावी शरण. अंग-लिंगानुभावी. अर्चन, अर्पण, स्वानुभावी. लिंगांग सामरस्य जाणण्यास हे त्रिविध साधन होत.

**अष्टदळ कमळ :** इंद्रदळ, अग्निदळ, यमदळ, नैर्ऋत्यदळ, वरुणदळ, वायुदळ, कुबेरदळ, ईशानदळ.

**अष्टमद ( बहिरंग ) :** कुलमद, छलमद, धनमद, रूपमद, यौवनमद, विद्यामद, राज्यमद, तपमद.

**अष्टविधार्चन :** जल, गंध, अक्षता, पत्र, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, तांबूल.

**अष्टावरण :** गुरू, लिंग, जंगम, विभुति, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक, प्रसाद.

**अहंभ्रम :** नाहंभ्रम, कोहंभ्रम, सोहंभ्रम, चिद्‌हंभ्रम.

**अंग :** कायविकार, मनविकार सोडुन, लिंगमय झालेला आत्मा. शिरस, उरद्वय, भुजद्वय.

**अनादि :** आत्मदेही, अनादि आत्मा.

**अष्टतनु :** स्थूल, सूक्ष्म, कारण, निर्मल, आनंद, चिन्मय, चिद्रूप, शुद्ध.

**अष्टमद ( अंतरंग ) :** संस्थित, तृणीकृत, वत्तिनी, क्रोधिनी, मोहिनी, अतिचारिणी, गंधचारिणी वासिनी.

**अष्टांगयोग :** यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधि.

**अर्पणत्रय :** कासार्पण, भावार्पण, कारणार्पण.

**आचारभंग :** आपण संपादिलेली संपत्ति, सत्कार्यी न लावता स्वतःच्या स्वार्थासाठी राखून ठेवणे.

**आत्मा :** मृत्यु न पावणारे अमर चित्त.

**आत्मत्रय :** जीवात्मा, परमात्मा, अंतरात्मा.

**आकाशत्रय :** दटाकाश, घटाकाश, महदाकाश. अथवा आकाश, चित्ताकाश, चिदाकाश.

अनुक्रमणिका

**आदि :** अनात्मा, नाद, लिंग.

**आदिप्रसादि :** अर्पित करण्याआधीच अनर्पित असा शरण.

**उभय :** आहे किंवा नाही, लिंग-प्राण यातील संबंध, प्राण-लिंग यातील संबंध ज्ञान-अज्ञान.

**एकादश प्रसाद :** गुरूप्रसाद, लिंगप्रसाद, जंगमप्रसाद, प्रसादि यांचा प्रसाद, अध्यापन प्रसाद, समय प्रसाद, पंचेंद्रिय विरहित प्रसाद, अंतःकरण चतुष्टय विरहित प्रसाद, सद्भाव प्रसाद, समताभाव प्रसाद, ज्ञानप्रसाद.

**एकादश रुद्र :** अजैकपाद, अहिर्बुंझ, हरु, निरुत, ईश्वर, भुवन, अंगारक, अर्धकेतु, मृत्यु, सर्प, कापालिक.

**ओ :**ॐ नमः शिवाय षडाक्षर मंत्र.

**कर्मत्रय- क्रिया :** संचित, प्रारब्ध, आगामी. मार्गक्रिया, अतीत क्रिया.

**गुणत्रय :** सत्व, रज, तम.

**चतुर्युग :** कृतायुग, त्रेयायुग, द्वापारयुग, कलियुग.

**चतुर्विध मोक्षपद :** सालोक्य, सामिप्य, सारूप्य, सायुज्य.

**चतुर्विध पुरुषार्थ :** धर्म, अर्थ, काम, मोक्ष.

**चतुर्विध प्राणी :** अंडज, स्वेदज, उब्दीज, जरायुज.

**चतुर्विध साराय संपन्न :** गुरू, लिंग, जंगम, प्रसाद.

**चौदाभुवने :** भूलोक, भुवर्लोक, महर्लोक, जनर्लोक, तपर्लोक, सत्यलोक ( हे सात उर्ध्वलोक ), अतल, वितल, सुतल, रसातल, तलातल, महातल, पाताळ ( हे सात अधोलोक ).

**चतुर्विध क्षेत्र :** केदार, रामेश्वर, सौराष्ट्र, श्रीशैल.

**गुरुत्रय :** दिक्षागुरु, शिक्षागुरु ( ज्ञानगुरु ), मोक्षगुरु.

**जंगम :** कायाविकार, मनविकार, करणविकार नसणारा, भवपार.

**तापत्रय ; चित्रकरण :** आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक. मन, वाक्, काया.

अनुक्रमणिका

**त्रिकाल; त्रिकांड :** उदय, मध्यान्ह, अस्तमान. भूत, वर्तमान, भविष्य. कर्मकांड, भक्तिकांड, ज्ञानकांड.

**त्रिपुट, त्रिपुर :** वाक्, दृश्य, दर्शन.द्राष्ट, ज्ञान, ज्ञेय. आकाशांत तिघा राक्षसांनी चांदी, सोने, लोखंडाचे तीन नगर रचिले.

**त्रिविध :** गुरू, लिंग, जंगम. इष्टलिंग, प्राणलिंग, भावलिंग. ज्ञान, सुज्ञान, महाज्ञान, योगांग, भोगांग, त्यागांग. काया, मन, ज्ञान. तनु, मन, धन.

**त्रिविध दासोह :**गुरू दासोह, लिंग दासोह, जंगम दासोह.

**त्रिविधार्पित :** कायार्पित, करणार्पित, भावार्पित.

**त्रिविधोदक**: लिंगोदक, पादोदक, प्रसादोदक. जलोदक, करुणोदक, समतोदक.

**त्रिविधजंगमलिंग :** स्वयजंगम, चरजंगम, परजंगम.

**त्रिविध प्रसादि ( त्रिविध प्रसाद ) :** अच्चप्रसादि, निच्चप्रसादि, समयप्रसादि. शुद्ध, सिद्ध, प्रसिद्ध प्रसाद.

**त्रिविधगति :** उर्ध्वगति, मध्यगति, अधोगति.

**त्रिविधभवि :** तनुभवि, मनभवि, धनभवि.

**दशदिशा :** पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य, ईशान्य, उर्ध्व, अधः

**दशवायु :** प्राण, अपान, व्यान, समान, उदान ( मुख्य प्राणवायु ), नाग, कूर्म, कृकर, देवदत्त, धनंजय ( उप प्राणवायु ).

**नवखंड :** अजनाभ ( भरत ), किंपुरुष, हरिवर्ष, इळावर्त, रम्यक, हिरण्मय, कुरुखंड, भद्राश्व, केतुमूल.

**नवलिंग :** आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग, महालिंग, निष्कलिंग, निरंजनलिंग, निशून्यलिंग.

**नाडित्रय :** इडा, पिंगळा, सुषुम्ना.

**पंचअवस्था :** जागृत, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या, तुर्यातीत.

अनुक्रमणिका

**पंचविष्य :**रूप, रस, गंध, स्पर्श, श्रवण.

**पंचसूतक :** जातीसूतक, जननसूतक, प्रेतसूतक, रजस्सूतक, उच्चिष्टसूतक.

**पंचभूत :** पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश.

**पंचपरिस :** मनपरिस, दृष्टिपरिस, भावपरिस, हस्तपरिस, वाक्परिस.

**पंचमहापातक :** ( १ ) गुरुद्रोह, लिंगद्रोह, जंगमद्रोह, आचारद्रोह, प्रसादद्रोह. ( २ ) ब्रह्महत्या, सुरापान, स्तेय, गुर्वंगनागमन, या दुराचारींचा स्नेह टाळावा. ( ३ ) चोरी, हिंसा, व्यभिचार, अन्यदेवताभजन, भवसंग ( दुराचारी संग )

**पंचमुख, पंचब्रह्म :** सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान.

**पंचवाद्य :** भेरी, दुंदुभी, शिंग, शंख, तूर्य.

**पंचाक्षर :** नमःशिवाय

**पंचामृत :** गाईचे दूध, दहि, तूप, साखर, मध.

**पंचमठ :** ब्रह्म, विष्णु, रूद्र, जिन, बुद्ध, यांचेशी संबंधित पाच पीठ.

**पंचज्ञानेंद्रिये :** डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा.

**पंचकर्मेंद्रिये :** गुद, गुह्य, पद, पाणी, वाक्.

**प्रमाणत्रय पंचाचार :** श्रृत, दृष्ट, अनुमान. लिंगाचार, शिवाचार, सदाचार, गणाचार, भृत्याचार.

**प्रणवत्रय :** अ, उ, भ. ( नाद, बिंदु, कला ) ब, स, व. ( चित्नाद, बिंदु, कलात्मक ).

**प्रसादत्रय :** वक्कप्रसाद, मिक्कप्रसाद, शेषप्रसाद.

**मलत्रय :** आणवमल, मायामल, कार्मिकमल.

**षट्त्रिंशत् प्रभा आगभोक्त षट्त्रिंशत् तत्व :** शिव, शक्ति, सदाशिव, ईश्वर, विद्या, काल, निराति, कला. अविद्या, राग, पुरुष, प्रकृति, मन, बुद्धि, चित्त, अहंकार. श्टोत्र, नेत्र, जिव्हा, प्राण, त्वचा, वाक्, पाद, पाणी, गुद, गुह्य, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, आकाश, वायु, तेज, जल, भूमी.

**षट्स्थल :** भक्त, महेश, प्रसादि, प्राणलिंगी, शरण, ऐक्य.

अनुक्रमणिका

**षड्क्षर :**ॐ नमः शिवाय.

**षड्दर्शन :** सांख्य, योग, न्याय, वैषेशिक, पूर्वमिमांसे, उत्तरमिमांसे.

**षड्वर्ण :** पीत, हरित, रक्त, श्वेत, कृष्ण, नील.

**षड्रिपु :** काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर.

**षड्चक्र :** आधार, स्वाधिष्ठान, मणिपूरक, अनाहत, विशुद्धि, आज्ञा.

**षड्लिंग :** आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग, महालिंग.

**षड्शक्तिः** चित्शक्ति, पराशक्ति, आदिशक्ति, इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति .

**द्वादशशक्ति मंत्रे :** ब, स, व, अ, ऊ, म, न, मः, शि, वा, य.

**सप्तधातु :** रस, रुधिर, मांस, मेधस्, आस्थि, मज्ज, शुक्ल.

**सप्तद्वीप :** जंबूद्वीप, पक्ष, शाल्मिली, कुश, क्रौंच, शाक, पुष्कर.

**सप्तव्यसन :** ( १ ) तनुव्यसन, मनव्यसन, धनव्यसन, राज्यव्यसन, उत्साहव्यसन, सेवकव्यसन, स्त्रीव्यसन. ( २ ) शिकार ( मटका ), पैज, दिवसानिद्रा, परनिंदा, परस्त्रीलालसा, मद्यपान, नृत्यगानवादनाभिरुचि.

**सप्तविधान्नः** शूद्रान्न, सूतकान्न, नैवेद्यान्न, श्राद्धान्न, पतितान्न, समूहान्न, राजान्न.

**सप्तसागर :** लवण, इक्षु, सुरा, धृत, दुध, दहि, जल.

**हस्तमस्तक संयोग :** सद्गुरु दीक्षात्रयानें शिष्यास शिवयोगाचे ज्ञान अनुग्रह करतो. क्रियादीक्षेनें तनुविकार नाहींसे करतो, मंत्रदिक्षेनें मनविकार नाशून मंत्रमय करतो, ज्ञानदीक्षेनें वायुप्राणास लिंगप्राण करतो. तेथें गुरु, शिष्य हा उभय भेद नष्ट होऊन ज्योतिस ज्योत लाविल्यानें जसे अभेद्य होते. तसे गुरु श्रेष्ठ, शिष्य कनिष्ठ हा भेद उरत नाहीं. गुरु गुरुच होऊन राहतो, शिष्य शिष्यच राहतो, हा भेदभाव बसवेश्वरानीं अमान्य करून समभाव जगास दाखविले. त्यायोगें श्री बसवेश्वर जग्ज्योति झाले.

**लिंगवंत :** ( १ ) अंगकरण सारे लिंगकरण झालेला. ( २ ) अंगभोग सारे लिंगभोग केलेला. ( ३ ) लिंगास लिंग हा प्राण झालेला. ( ४ ) सदाचारी.( ५ ) सर्वांलिंगी, सर्वकरणनिर्युक्त, सर्वनिर्वाणी. ( ६ ) अंगसूतक नसणारा. ( ७ ) परधन, परस्त्रीचा संग त्यजून राहणारा.

**लिंगैक्य :** देह सोडला तरी दृष्टीच्या चित्कलेचा प्रकाश निरंतर ठेवणारा.

अनुक्रमणिका

**शरण :** ( १ ) भावभ्रम विरहित, ( २ ) जीवदयापार, ( ३ ) चिंतासंतोषाच्या आधीन न होणारा, ( ४ ) स्त्रीमोहाला बळी न पडणारा ( ५ ) सकलात समचित्त राहणारा, ( ६ ) निगर्वी, ( ७ ) निजतत्त्वांचा निलय बनून, ( ८ ) स्वानुभवात अविरत लिंगवंत बनलेला.

अनुक्रमणिका

# अकारादी कोश


| श्लोक | श्लोक क्रमांक |
|---|---|
| **अ** | |
| अग्निचि नेसुनी साडी | ८१५ |
| अघटित घटित महाधन साधण्यास | ५५१ |
| अचलसिंहासनास निश्चल हेचि होय मंडप | ६२६ |
| अजकल्पकोटी वर्ष जगणारे सारे होतील का हो वडीलधारे | ६०८ |
| अजाणपणें विस्मरणानें आले हो मी भवात ! | ८३८ |
| अद्वैत शिशु येऊनी मम करस्थली, | ४५३ |
| अदृश्य सिंहासनावर सांगता न येई | ७३६ |
| अतिमथनरुपी शून्य सिंहासनावर चढून | ६८५ |
| अतिशय जिद्दीनें तू दोष माझ्यावर लादून | १६८ |
| अतिथीचे मस्तक स्पर्शानें | ६५० |
| अनंत देव सारे समुदायानें येऊन | १५६ |
| अनाहत स्थलात शिव हा आपल्या लीला विनोदाने | ७२२ |
| अनायासे करुनी घर | ४७२ |
| अनादि गणनाथाचा शिष्य आदि गणनाथ | २३३ |
| अनिमिषऐसे अत्याश्चर्यकर लिंगैक्यभाव भिनला | ८३५ |
| अनिमिष्यास लिंग दिले होते बसवण्णाने | ४८७ |
| अनुभावाविण भक्ति  नाहीं परिपक्व  होत | ८६१ |
| अर्पित अनर्पित जाणती का कोण | ६६३ |
| अर्पिला हो अंग आचारांस | ३८१ |
| अर्पित करणारे अवधान | ८१५ |
| अभिषेकाच्या समयी सदाचार सत्क्रिया या भूमीवर | ७१६ |
| अमूर्त परवशतेच्या सुखाची गोडी न कळे | ९२० |
| अरण्यात माजलेला हत्तीचा कळप आनंदाने | ६८७ |
| अरे अरे देवा ते आहेत तुमचे त्यांना झालेले दुःख माझेच दुःख | १२९ |
| अलभ्य गुरु झाल्यास गोचर डोळ्यास | ३९ |
| अविरळ घनांस मन सामावून | २३१ |
| अशी आहे हो तयाचे क्रम | ६६३ |
| अष्ट तनु जन्मलेला निष्टापरात | ८३२ |
| अष्ट तनुचे निष्टापरत्व सांडून | ९२८ |
| अष्टदळ कमळाचा शिला घालून उभा केला शुन्य | ६३७ |
| अष्ट तनुची घन वस्तु वितळवून | ५३६ |
| अष्ट विधार्चन षोडशोपचार करितो | ६१ |
| अष्ट विधार्चन षोडशोपचार ही सारी क्रिया | ३२४ |
| असावे अंधकाच्या हाथ अंधका धरल्यातग | ८० |


अनुक्रमणिका

अहं मी कोणासही उपदेश करु शकत नाही २४१
अहा हे मना तुझ्या पूर्वापारचे पडले की रे तुज विस्मरण ! ४५
अज्ञन सुज्ञान या दोनिसशिव वदल्यास ४०७

### आ

आकार- निराकार वदती हो सारे जण ५३२
आकार निराकार झाले की हो बसवण्णा ९४८
आकार रहित निराकार मंडपात ६७४
आकार-निराकार हे दोन्ही मीच आहे ! ७७०
आकांक्षित आकांक्षा ६५४
आचार अंग होऊनी निर्लेप ४२५
आचार हे असे अगोचर केल्याविना नसे ४६४
आचार न जाणता, क्रियाचार न अवगत, ७६५
आचाराची अंतस्थिती अंगाठायी करुनी दाविला ८३४
आचारीच लिंग संबंध झाल्या योगें ४६६
आठवण सारे विरले होरपळे भ्रांती ६८
आठलेल्या तलावास ओढा वाहत आल्यापरि १५१
आदिच्या लिंगास आणिला हो अल्लमप्रभु ७४१
आदिअनादि या दोन्हीचें मूळ बसवण्णानें ४४५
आदिअनादिच्या पलिकडे २४३
आणवमल मायामल कार्मिकमल हे ४३
आता मी कसे करु हो काय करू? २९५
आदि अनादि हा भेद आहे का ४४७
आदित नाहीं आला, अनादि बिंदुत नाहीं झाला ४४६
आदि जंगम अनादि भक्त असल्याचें ४१९
आदिच्या लिंगास दाविलेला अनिमिष ४११
आदिच्या लिंगास मेदिनीस आणुन २८०
आदि ठायी ना जनन ३८७
आदिभक्त अनादि जंगम ४१८
आदिस केला तो अनंगमुखी अर्पण ३७४
आदिस दाविला, अनादिचे समजावून दिला ४५४
आदिस पाहिले, अनादिस पाहिले ५४३
आदि बसवण्णा, अनादि लिंग ४५९
आदिच्याहि पलिकडे तूच होतांस माझा गुरु ४१
आदि पासून गुरुबीज झालेल्या पिंडास १९२
आदि गुरुस्थल, लिंगस्थल, जंगमस्थल ४२९
आदि बसवण्णा अनादि लिंग म्हणती २५४
आदिलिंग अनादि शरण, ऐसे कथन २४४
आदि युगात होती एक मायांगना ५१३

| | |
|---|---|
| आदीत झाली उत्पत्ती बसवण्णाची त्या योगे | ७८९ |
| आदीस अनुसरून येणारा तो नव्हे भक्त | ८०१ |
| आदी अनादित नव्हते हो तेव्हा साध्य असाध्य | ५३१ |
| आभाळा आड असलेल्या विजा परि | ३७९ |
| आयताविना अनुभाव, स्वायताविना समाधान | ४४८ |
| आपण पाळलेला वेताळ आपणासच खाल्ले | ७०३ |
| आयताठायी पाहिला पुर्वाचारी | ३६३ |
| आमच्यानी ( शरणांनी ) करुनी माझी स्तुती | ३१९ |
| आमच्या शरणाना ना मरण | ९३० |
| आयत लिंगठायी उदभवुनी | ४६३ |
| आयत-स्वायत-सन्निहित होऊन | ४६५ |
| आराधून करिती का विरोध | ३५७ |
| आलेला उदयमान गेलेला अस्तमान | ९ |
| आपण कोण याची नसे जाण म्हणणेंच अज्ञान | १९४ |
| आशा आमिष झाले विनाश | ८४२ |
| आशारुपि सुळांवर बसवुनी वेषधारी प्रेत | ७६४ |
| आहे गाय अच्छेराची, कास आहे पंचेर, | १४ |
| आहे मी, पौर्णिमेपर्यंत तोंड बंधित केलेल्या चकोरागत | ७०९ |
| आहेत बघणारे म्हणून करितो मी भक्ति | ३२५ |
| आदिठायी होई साध्य म्हटल्यास | ८६५ |

## इ

| | |
|---|---|
| इंद्र-व्यास-उपेंद्राचे दरबार, न जाणिले | ५६७ |
| इष्टलिंग प्राणलिंग हा भेद | २३५ |
| इहलोक परलोक नसती | ६३६ |

## उ

| | |
|---|---|
| उंच अशा मणिमुकुटांवर वेटाळा | ७९० |
| उत्तरे कडले द्वार पौळीत | ६६५ |
| उदकमूर्ति होऊन झाला उदय पिठाचा | ६५ |
| उद्भवुनी जलांत पुन्हा ते न होई जल | २७५ |
| उदयमुखाचे अनुभाव, गगन पवनावरच्या | ५६५ |
| उपमेस उपमा देण्यास न आल्याने | ९२१ |
| उपपातक-महापातक, | २७७ |
| उपाधिक मन निरुपाधिक मन | ६९ |

## ए


| | |
|---|---|
| एक झाल्याचे दोन होईल का ? | ६९४ |
| एकदा आठविता श्रीगुरु चरण | २५६ |
| एकदा धावत जाऊनी मारितो धक्का | ६६८ |
| एकदा होतो बालक, | ६६९ |
| एका नीळमणीने गिळियले माणिकास | ७९७ |
| एकमेकाचे नाते तुम्हा दोघाना | ४३२ |
| एकमेव न द्वितिय ब्रह्म | ३९३ |
| एक हातभर बयलु मज दिला | ५५२ |
| एका राक्षसीणीस दोन लेकरे | १८ |
| एकाग्र दृष्टि झाली करस्थली प्राण | ६१३ |
| एका शरणाने निराकारास आणिले साकारास | ३६७ |


## ऐ


| | |
|---|---|
| ऐका हे देवा ऐकां | ३५९ |
| ऐका हो बंधुनो सहज बोलणी न होती सहन | १२६ |
| ऐका हो ! राजाचा विचार | ९३१ |
| ऐरावत दडला हो मदोन्मत हत्तीत | ५६६ |


## ओ


| | |
|---|---|
| ओढ्यांत काष्ट वाहताना | ८ |
| ओ हो गुरुराया | २९७ |
| ओ हो, हे गुरो, तुझ्या करकमली | २६५ |


## अ


| | |
|---|---|
| अंग आणि अनंग हे दोन्ही करुनी निर्मुलन | १११ |
| अंग अंतर्गत लिंगैक्याचा संग न दिसे | ४४१ |
| अंग कळा लिंगाठायी न होता लीन | २८६ |
| अंगांठायी केला आचार स्वायत | २३९ |
| अंग धारी जरी असशी तूं | ४६२ |
| अंग नाहीं म्हटल्यानें न सोडी अंग शंका | ५५७ |
| अंग प्रकृतिस लिंगाठायी केले निरसन | ६३८ |
| अंगरुपि झाडाच्या अग्रभागी वसतो माकड | २५ |
| अंगरुपी संसारात जे झिजविती आपले जीवन | ४७८ |
| अंगलिंग, प्राणलिंग मनलिंग झाले | ५६२ |
| अंगसंगाठायी झाले मी लिंग संगी | ५९८ |
| अंग संसार विरहात होऊनी क्षीण, | ४८६ |
| अंगसंसार लिंगाठायी उमजून | ४३३ |
| अंग सामावलेल्या लिंगास अंगचि असे ताट ! | ७१७ |

अंग हे लिंगाचे घरटे झाले ९०९
अंग हेचि लिंग, लिंग हाची झाला प्राण ५०८
अंगाच्या हाती लिंग मनाच्या हाती निःसंसार ८७७
अंगाची कळा लिंगाठायी उमजल्यास १०७
अंगाठायी लिंग नसे पर्यंत ५५५
अंगाठायी लिंग संग, लिंगाठायी अंग संग ५९९
अंगाठायी लिंग विरून ७६०
अंगात होऊनी अंग ६०३
अंगाराच्या गिरीवर पाहिला मी २३
अंगावर आचार लिंगचि झाले प्राणलिंग ७५७
अंगावर जे करिती लिंग धारण ३९१
अंगावर लिंगभाव असावा सदैव ८२५
अंगावर लिंग स्वायत करून ४३७
अंतरंगी प्रभुदेवास घेतला सामावून, ८०६
अंतरंग लपले म्हटल्यास ४०३
अंबरी खेळणाऱ्या भ्रमर बिंबाच्या ८८

## क

करणे, करवून घेणे या दोन्हीमध्ये ७१२
करण्या जाता एक, ते झाले आगळे ४८५
करस्थळ लिंग दृष्टीस स्थिरावले नयन ५६३
करस्थळीचा लिंग झाल्याने मनस्थळी वेध ४९४
करावयास गेलो एक पण घडले दुसरेच ५४७
करितो मी लिंगार्चन ३०१
कल्याणरुपी नगरात वसतात ८३०
कल्याणची प्रणीत, भक्तिरस तेल ओतिले त्यात २७१
कल्याणांत प्रवेश करण्याची रीत ५४६
कल्पित निरसून मी केला गुरु स्वायत्त ५२२
कर्पूराच्या गिरीस घेरल्यास अग्नि २२७
कर्म समूहाचे झाले आज निरसन १२
कष्ट कुळीच्या जननाचे ८४१
कसभर कनक, वस्त्रातील एकच धागा ३३४
कसा असतो तो भाळी डोळा ५०९
कसे म्हणता येईल शिशु नंबियण्णास ? ८०७
कक्ष-करस्थल-उत्तुमांग-हृदय ४२८
कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग, कलियुग हे काही नव्हते तेव्हा २४७
कृतयुगांत भक्तिकारणे ६
कृतयुगांत देवांग या नावाचा गणेश्वर होऊन ६६२
कृतयुगात देवासुराचा संहार करताना ४५६

कृतयुगात होतास तूं स्कंद गणेश्वर ४२७
कृतयुग त्रेता युगे द्वापारयुग कलियुग ५०५
काढुनी सापाचे दात ५९२
कायायोगे झाली नच ही मूर्ति ३५
कामाच्या डोळ्याचा काटा निपटून ३८२
काया असे एक, प्राण हीं एक ४८४
कामाच्या करस्थळी मी केला गुरु स्वायत ५२२
कामारीस जिंकिले मी बसवण्णा ६००
कायाधारी मानवपरी हाती १६०
कायेच्या कळवळास दुर्लक्ष केल्यानें २०९
कायेच्या कपटापासून केव्हा होईल ३७६
कायेंत नच करणेंद्रिये १८०
काया विनाशिल्यास काय ३८६
कायेस धरून असे लिंग ४०९
काया हीच पिठिका २३४
कायाधारी होऊन जो घेई जनन ४६०
कायारूपि आड पडदा नसे हो ५६४
काया हीच का लिंग ५६१
काया लज्ञेच्या कल्पितास निपटुन ५८६
कायेनेच लिंग दर्शन ४६१
कायात काया झिजून ६९७
कायारुपि मडके ७४५
कायारुपि कल्पित सांडून ७०१
कार्यारंभ करून लोटली बारा संवत्सरे ६४०
कालाग्निसम पेटवूनी भयंकर ज्वाला १४०
कल्पित निरसून अकल्पि कथून ५४५
कायात होऊनी काया, भावात होऊनी भाव ८५६
कासवाच्या शिशु स्नेहापरि ८४६
काय सांगू कसे वाणू हो ८८४
काय सांगू हो कसे मी वाणू आश्रयविरहिताचे ८६५
कायारूपि कंथा धारण केलेला ९२४
कायारूपि महा कदळीचा विजेता ९२५
कायेच्या हाती करस्थल २८३
कायेत झाली अकार्यस्थिती ५९६
कासवाच्या शिशु स्नेहागत ३४७
कांही कांहीच नव्हते तेंव्हा ४५५
काळ नच स्पर्शित स्वयंपाक ७४३
केवळ काया शुद्ध झाली म्हटल्यानें ५९५
कैरी तोडुन रगडून येईल कां पिकविता २६३

| | |
|---|---|
| कोणास करावी ही सद्भक्ति | ७८१ |
| कोप ताप हें सारें असते जाणण्यांत | १६७ |


### ख


| | |
|---|---|
| खंडरहित घन मनांत निश्चल वास, | ५०२ |
| खवळलेल्या क्षुब्ध जलाच्या सामोरे | ७९१ |
| खाजत असता त्या फोडीवर | ४८३ |
| खाज सुटल्यावेळी नखानें खाजविल्या, परि | २६२ |
| खेचर पवनागत निज योगीची उपस्थिती | ६३५ |
| खेळांत हा खेळ चालला आहे तरी काय ? | १९ |


### ग


| | |
|---|---|
| गगनावरती जन्मले एक अभिनव पोपट | १७ |
| गति निरसन, धृति हरण | १७१ |
| गमनी असून निर्गमनी गतिविना संचार | ६२३ |
| गरिबाने अपेक्षिलेली संपत्ति लाभल्यापरि, | ८४३ |
| गर्वाने ठेवित पाय चाले डोलत डोलत | ६७० |
| गाराचा पुतळा बिलगल्यागत, | ५३५ |
| गिळली वाचा ( मंत्र ) माणिक | ८१७ |
| गुरूच भाव, शिष्यच कडी. | ७४८ |
| गुरूचा प्राण, लिंगाठायी झाल्यावर लीन, | ४९२ |
| गुरू झाला वधुकडचा, लिंगदेव हाच वर, | ५८९ |
| गुरू झाले स्वायत, लिंग झाले स्वायत. | ५१९ |
| गुरूठायी सदाचारी, लिंगाठायी शिवाचारी. | ४६७ |
| गुरूतत्त्वांत होतसे जनन, | ६१६ |
| गुरू नसता तर तुजला लिंग कसा लाभला असता ? | ४९१ |
| गुरू रूसल्यास करितो मी एक दिवस सहन | ६८९ |
| गुरू वचनाविना न येई लिंगास जाणता | ९८ |
| गुरूस्थल-लिंगस्थल-जंगमस्थल- | ८८० |
| गुरूस्थल-लिंगस्थल-जंगमस्थल-प्रसादस्थल | ३६४ |
| गुरूस अससी तुंच कर्ता | २४५ |
| गुरूस एकच गर्भ ( उगमस्थान ) | ४१५ |
| गुरूस नाहीं जाणत थोरांना नाही ओळखत | १२५ |
| गुरू शिष्यांत कोणते अंतर | ९९ |
| गुरू शिष्यांमध्ये जन्मले पहा एक मूल ! | ७५४ |
| गुरू शिष्याचा संबंध गेलो मी शोधित | ४९ |
| गुरू हस्त स्पर्श झाल्याने अदृष्ट | ७५५ |
| गेले हो माझे स्थल, गेले माझे निःस्थल | ९४६ |

## घ


| | |
|---|---|
| घडण्यात असे तो घडण | ४७५ |
| घन अशा ताटात | ७१८ |
| घन गंभिर महाघनाठायी | ८८५ |
| घन गंभिर वारिधीत दिसणारे | ७६८ |
| घन गंभीर महाघनाठायी | ४१० |
| घन महिम शरण संगाने | ११६ |
| घनाचा जाणकार वेधुनी घनास, | ८१३ |
| घरातील आगीने जाळिले कानन, | ७५९ |
| घेऊनी लपला तो एक, | ८६७ |
| घेतले अनिमिषानीं मम | ८७१ |


## च


| | |
|---|---|
| चकमकीने मीच पेटविलेले विस्तव | ८०८ |
| चरण धरणाऱ्यांसि दावुनि करुणा | २५१ |
| चंद्रमा अमृतकर असुनही, | ७६१ |
| चार कोस विस्तीर्ण नगरी | ९५१ |
| चालतोपरिचालरहित असे | ६२४ |
| चालुनी पुढे चढुनी वरती | ६० |
| चाले पायाविण, धरीतसे हाताविण | ३६८ |
| चिंतितो म्हटले तरी मनास | ४०१ |
| चिंतितो म्हटल्यास अंतरे संग | १९६ |


## ज


| | |
|---|---|
| जगच आपण, आपणच जग | ८८२ |
| जगत् स्वयभुं रुपि गणेश्वराने | ८७८ |
| जग विस्तार मंडपाच्या | ६३१ |
| जननाविण जन्म असे तुझा देवा | ४२४ |
| जननी नसलेल्या शिशूस | ८२३ |
| जन्मतःच द्रव्य म्हणजे काय याची नसे जाण | ६६० |
| जन्मलेल्या कुळीत न मिसळता | ३६५ |
| जलात जल उद्भवला | ६२९ |
| जलांत विरलेल्या गारापरि | ८८१ |
| जळल्यानें लाखेची बाहुली | २९ |
| जाणकार शरणाना नसे हो क्रमबद्ध व्रताचार | ७६७ |
| जाणण्याचे जाणून | २२१ |
| जाण-विस्मरण हे नच असती | २९९ |
| जाण होई पर्यंत केली मी पूजा | ८८७ |
| जाणातील विस्मरण, विस्मरणातील जाण | ८५८ |

| | |
|---|---|
| जाणातीत खूण तेच विस्मरणाचे बीज | ९०२ |
| जाणावाचून जाण | ८९३ |
| जाणिवेने जण जाणून | ४०८ |
| जाणिवेच्या तृप्तीस अनुभाव भाव | ४९८ |
| जाणिलें म्हणणें तें बयलु | २२९ |
| जाणिले म्हटल्यास जाणण्यास असे असाध्य | ८५९ |
| जाणिवेंने जाणतो म्हटल्यास | ८६३ |
| ज्याना आहेत दोन डोळे | १३८ |
| जिकडे पाहावे तिकडे दिसतसे | ८६८ |
| जे काया धारक जनित ते देव | ३९९ |
| जे चालून चालून शेवट गांठती | १०४ |
| जेथें भक्त असतो तेथें कर्ता | १७३ |
| जे पाहिले तेंने धरता | ३४ |
| जे पाहिले ते सर्व पावन | ७७ |
| जेव्हा ब्रह्म विष्णू आदिंची | ५ |
| जो अद्वैतास खोल रुजवून म्हणतो | १०२ |
| जो जाणतों आपल्या अपणास | १०० |
| जो जाणतो आपल्या आपण | १०५ |
| जो मृत्युलोक करितो पावन | ५१५ |
| ज्योतितील कापूर जलातील मीठ | ४२ |
| जो होता जाणकार | ८७ |
| जंगमाचा अंतरस्थ उद्देश जाणून | ३३० |
| जंगम बाहेर असताना ते कसले बरे लिंगार्चन | ३२१ |
| जंगम हाचि लिंग | २७० |
| जंगमचि लिंग म्हणून | ३४२ |
| जंगम हाच ज्ञानरूप | ४२० |
| जंगमाना म्हणवे घन | ७६२ |
| जंबु द्वीपाच्या व्यापाऱ्याने | १६ |


## झ


| | |
|---|---|
| झाडानें बीजाची उत्पति | ४६८ |
| झाला लिंगसंगी तनुगुण निवारुन | ८१९ |
| झाली तनु निराधार | ५२० |
| झाली मम मति हीन | २९६ |
| झाली माझी भक्ति शाल्मलि वृक्षाच्या फळागत | ७७७ |
| झाली माझी शुद्ध तनु | ५९४ |
| झाले गुरू स्वायत | ५१२ |
| झाले हो मज बसवा | ४१३ |
| झिडकारून आधिक्यास | ८२७ |

झिजली तनु गुरू ठायी ७५८
झीजली माझी तनु तुमच्या सेवेत, ९०५

## ड

डाव्या पायांने मारल्यास लाथ, धरावा उजवा पाय ७७४
डाव्या पायांने मारल्यास लाथ धरतो मी ७७९
डाव्या हाती दुधाची वाटी, उजव्या हाती शिक्षकाची छडी ६४५
डोकीचे केस पिंजरलेले मोकळे सोडले आहेत ६५८
डोकीवर डोके असे एक ७०
डोळ्याची दृष्टि करस्थळाचा प्राण ६५६
डोळ्यात फूल पडलेल्याना ६८२
डोळ्याने पाहातो परि नच रूप १६१
डोळ्याच्या बुबुळाच्या काळ्या नाळात ६७
डोळ्याच्या प्रकाशास न येई कल्पिता ६६
डोळ्यात ना कल्मष कायेत ना माया ३८०

## त

तनु असल्याचा भाव नसे हो मनीं, ५५६
तनु अर्पित म्हटल्यास होई गुरु द्रोह ३३७
तनु असुनी ही नसल्यापरि तनु, ५५८
तनु आहे म्हटल्यास होतसे ९३
तनु गुरुठायी झिजविली ५७०
तनु गुरुस करुनी अर्पित ५०६
तनु गुण विवरिले म्हटल्यास असावे हो मन शुद्ध ५९३
तनु गुण नास्ती मन गुण नास्ती ५२४
तनु मुखास्तव वाढणारे अन्न परिपक्व होऊन ७२३
तनुत असलेला लोभ मनास चोरुन ५२१
तनुस नागडें केल्यांने काय प्रयोजन-मन ७६३
तनु रहित वाणी विरहित, तयास ना अंत, ६१२
तनु रुपि चढण मन रुपि बांधारा १२२
तुं प्रेमळ पण दाविल्यास मी ही दावितो १९७
तनु जाली माजी क्षीण १७८
तनु नष्ट, मन नष्ट, नष्ट स्मरण ९०१
तनु निराकार दडले निरवयलांत ८९९
तनुत तनु सेवा करून नाहीं झाले कृश ३३३
तनु तुमची, मन तुमचे, धन असें तुमचेच; २८८
तनु दासोह, सकल अवयव आचार ४२१
तनु बेल ( इष्ट लिंग ठेवण्याचे ) ३२९
तनु मध्ये होऊनी तनु, मना मध्ये होऊनी मन ९६

तनुवर विश्वास ठेवल्याने अंतरले मी सत्यतेस ९२
तनु स्पर्श होण्याआधी मन स्पर्श होण्या आधी ६४
तनु होऊनी कंपायमान मन झाले तव ठायी तल्लीन ५३
तयास ना मरण, ना हानी ना रूप ५९०
तयाने आणिला तळ पाण्याचा कोप मनास १५०
तळपायीं डोळ्याचा होता येते परि ५७१
तळ हाती गोंधळलेले धरुनी तव शिर ८२
तव स्वर ग्रासित शब्द मम मनीं झाले वेद्य २३२
तळे बांधण्याचें वडारकाम काय सांगू १२३
तलावानें ओढ्याचे पाणी पिऊन तृप्त झाल्यावर ७८४
तव शरणांचे संग सुख कसा काय वांणू मी ३९७
ताप त्रयांत जे होरपळले, अशा देह धारकाश आणून १३५
त्या बाजारांत जमलेल्यास म्हणूं तरी काय ? ११७
तिच्या नजरेने मज आणिले मृत्युलोकी ३१
तीनसेसाठ दिवस करुनी तालीम ३२२
त्रिविधाची नित्यता त्रिविधाची अनित्यता कोण जाणता ६२
त्रिविध, त्रिधाठायी घडला माझ्या हातून अपराध ३१४
तीळा विण घाणास, फिरलेल्या बैलागत ३३८
तु माझा गुरु असल्यास, मी तुझा शिष्य असल्यास ४०
तुज नसे साध्य, मजही नसे साध्य २९३
तुमची शक्ति नसे जगांत, जगाची शक्ति नसे तुमच्यात १३६
तुमच्या योगें झालो मी आदिपासून १९१
तुमची शक्ति आहे हो त्याच्या ठायी ३०४
तुमचे तेज पाहण्यास्तव मागे सरून पाहत असता १३९
तुम्ही भवरोग वैध म्हणून देवा ३०५
तुम्ही मागितल्यास देतो मी तन ३३५
तुम्हास पाहता क्षणी जोडुनी हात ४२२
तुमच्याकडे दृष्टिक्षेप टाकीत असताना ६१७
तुम्हास पाहण्यात लाभें हो मज अनंत सुख ६७७
तुमच्याशी कसला तो शिष्टाचार मज नाहीं समजत ७००
तुमची लीला तुमचा विनोद; ७११
तुम्हीच मम अंतरंग तुम्हीच मम बहिरंग ७८०
तुम्ही माझी प्रशंसा करता अव्याहत. ७३९
तुम्हांस पाहण्यातच सुख आहे, ५४
तू आहेस नवयुवती इथे का आलीस हे सती ५८८
तू आहेस नीर क्षीरागत ६०७
तू निज जाणकार निश्चिंत, मरण्यास थोपटलेला ७३
तू मी हा उभयसंग निवारून आपण आपणच होऊन, ६११
तेथे बाणावेल कां निजत्व ? १२८

तेव्हाच्या गोष्टी तेव्हाच्या ४५८
तो ज्या मार्गाचा अवलंब करितो, तोच मी करितो १४७
तोडुनी कच्चेफळ त्यास रगडून पिकवितो, ३७८

## द

दश-दिशा भूमी-आकाश याचे कांही मज नाहीं देवा ८८६
दडले नित्य हे सत्यात, सत्य हे दडले हो आचारात ९००
दरडावतो हो संगमेश भय दावितो, ७२६
दाट वनातल्या गांवाच्या मध्यभागी पडली पांच प्रेते २२
दासानुदासावर रागावणे तुम्हास योग्य वाटते कां हो ? ७७५
दासोह भृत्याचार, अति प्रेम, ५३३
दासोहाच्या सेवेत तनु होऊनी क्षीण ३६६
दिसल्यास वाटे हो मनोहर, ६२०
दिसते काही अंधकास परिसाची गिरी ? ६४२
दुधाची चव स्वादिष्ट असल्याचे सांगू ४८९
दृष्ट नष्ट झाले त्यास कोणता देऊ दृष्टांत ? ८९६
देवा, अद्वैत अंतरंगात जाणून, ६९३
देवा, आहे पहा तो सर्वावधानी समयप्रसादि ! ८११
देव देवा, महाप्रसाद ! ८५५
देवा, अंतरंग बहिरंग आत्मसंग हे आहेत हो एकच ८८९
देवा, असतो अग्नि तरुंत परि मंथन २६६
देवा, ऐका बा, तुम्हांस देव म्हणून करता २२८
देवा, अहंकारीवर पांगी असे हो हे मन, ३१५
देवा ऐक बा, मी तुझे रूप नाहीं विचारित २१८
देवा ऐक बा, अंतरंगाठायी तुम्हास पाहणारा मी नव्हेरे २१६
देव देवा महाप्रसाद, परिसायी देवा मम विनवणी ७४२
देव देवा महाप्रसाद तुमच्या पायास ६६६
देव देवा महाप्रसाद; तव ३७२
देव देवा महाप्रसाद डोळ्यात ना किल्मिष, २८२
देव देवा महाप्रसाद ( तुमची कृपा कटाक्ष ) २४६
देव देवा महाप्रसाद तुमच्या शरणांच्या २९२
देव देवा, तुमच्या न येण्यानें मज लागला होता तुमचा १९०
देव देवाः शरणु शरणार्थी ऐक बा लक्ष देऊन ८६
देवा तुमची मूर्ति पाहण्यास दृष्टी नाही हो १३२
देवा, तुमच्या निजत्वाचा अंत जाणती कोण ? १५५
देवा, तमच्यांत समरस होऊन, १७९
देवा, तुम्ही मज ओळखलात; परंतु ७०६
देवा, तुम्ही मज ओळखलात ७०६
देवा, तुमचे शरण तुडविलेली ही धरणी असे हो पावन ५८३

| | |
|---|---|
| देवा, तुमच्या महानुभावाना अंतरून नाही हो मी वाचत | ६१८ |
| देवा, तुमच्या करस्थल धनास उपमा देणारे | २३६ |
| देवा, तुमच्या करस्थलाची घनता असूं द्या हो | २३८ |
| देवा, तुमच्या शरण वासाविण जे घर वसे ते व्यर्थ | २८१ |
| देवा, तुमचे शरण येऊन माझ्या दारी करीत | ३७५ |
| देवा रे तुज पहाताच मज होतसे अपार सुख | ३०६ |
| देवा, तुटली हो आज माझ्या भवाच्या वेलीची मुळी | ८३७ |
| देवा, तू आहेस रे आदिच्या पलिकडचा | ६५९ |
| देवारे, तव शरण संगचि मज परमसुख होय | ६८८ |
| देवा, तत्त्व-वितत्त्व नव्हते तेव्हां, | ४५० |
| देवा, तव शरणांनींच केले मज पावन, | ५०१ |
| देवा, तव शरण आहेत हो परमसुखी | ३८४ |
| देवा, तव शरणांच्या उपस्थितीचे जाणकार नाहींत हो | ३८५ |
| देवा, तव महानुभावींच्या संगाने झाली हो मम तनु शुद्धी | ३९८ |
| देवा, स्वप्नी दिसलेले त्रिधान मज आज लाभ हो | ६७९ |
| देवा, सात्विक शरण वाणी असू शकेल का हो असत्य | ६८३ |
| देवा, साती भवांतरात शिवभक्त होऊन | ७०४ |
| देवा, जालेतील कर्पूराचे उरते का हो राख ? | ५३७ |
| देवा, हत्ती असे धन अंकुशास कसे म्हणता येई सान | ४०० |
| देवा, भक्ति  करणाऱ्या भक्तात | ६४७ |
| देवा, खाजवित आहे हो माझा तळवा, | ६४९ |
| देवा, बहुत काळ दगड पाण्यांत भिजत | ३२३ |
| देवा रे, तुमच्या संदर्शनावर निष्ठा न ठेवता, | १७५ |
| देवा रे, मम कार्येत दाविला मडिवाळास | ५४८ |
| देवा रे, झालां हा निर्लेप | ८१४ |
| देवा रे, पुर्वी झाले होते रे विस्मरण, | ९३६ |
| देहच आहे हो देऊळ आणिक दुसरे हवे | १२० |
| देह भावाचा झाल्याविना निःपात | २०७ |
| देहास केलेले अर्पित ते नव्हे अर्पित | ७१९ |
| देवा, मनाच्या दोषाची माती काढुनी | २१० |
| देवा, मम अंतरंगी तुम्ही होऊनी ज्ञान | ४१६ |
| देवा, मम चित्त असे उंबराचे मुळ | ३४४ |
| देवा, माझे अष्टविधार्चन झाले शुद्ध | ५२३ |
| देवा, माझा भार असे तुमचाच | १७६ |
| देवा, युग युग हे एकदा होती नाश | १४१ |
| देवा, योगाची रीत मी कसा जाणूं शकेन | १८२ |
| देवा, घनगंभिर अशा समुद्राच्या आत | ५६९ |
| देवा, जगास आवरली तव माया | ४०२ |
| देवा, जो धुंडित जातो त्यास देवच हुडकत येतो | १४६ |

देवा, जो शोधत शोधत जातो ६६४
देवा, दिलेले लिंग पुन्हः घेऊन येण्यास ८७३
देवा, प्रकाश प्रकाशाचा होत असता घर्षण ५५४

**ध**

धन मद-स्वायंपाक मद आवरल्याने ७३५
धन वानाचा पेव उघडेपर्यंत ७१३
धन संपल्यास अर्पितो मी तन ७४०
धरणीवर संचारणारे सारे भगवे वस्त्रधारी ६८६
धरलेले सोडून, सोडलेले धरण्यास ७७८
धरलेला आचार न सुटे तोंवर ९४
धाडिले कर्त्यानें मृत्यू लोकी ९३२
धावत धावत जावउन धरितो १४९
धुंडति न दिसे तयास परि दिसलेले धुंडती का ? ४६
धुडीत फिरले तरी न साध्य ५८४
धुवून मन केले निर्मल म्हणशी २११
धुवुनि आत जलभरणाचे नच उमगत १२४
ध्यान मौन रुपि शस्त्र धरण्यास ३५१

**न**

नमः शिवाय लिंग ॐ नमः शिवायचि बसवण्णा २५७
नयनाश्रयाच्या स्पर्शाचे सुख संबंध ७४६
नसता संसार डोळ्यापुढें येऊन छळित असता ४८०
नरलोकीचे सारे नर झाले हो संसाराधीन ४८१
नर सुरादिक समस्त होते हो तुमच्या नदीत ५५३
नच तेंव्हा धरणी आकाश, ५०४
नच नाशवंत, नच तो अविनाशि ६०२
नच भूमी आधारित ६७३
नच अंतऐशा-देशांतरी केले ७०८
नच स्पर्शिता वसुधेस ८०४
नच देही, नच तो निर्देही, ४७४
न दिसे ऐशी वस्तु झाली हो ६८०
न मिसळतां अन्य विकार, ५६
न होई माचिदेवांच्या हातून, ७२७
न दिसणारे धन दावियले ७५३
न पाहता कुळी न बघता जिद्द, ७६९
न म्हणता येई त्यास सहज, ८९७
न केली पेरणी ना राखण, २५९
न सुटे विश्वास, असे ते मनी ४४४

न चाले न बोले असा हा गुरु ३७
न दिसणारे ते देखिले ८४
न येई जाणता ऐसे धन १४२
न दिसणारें धन न येई सांगता २०३
नव्हता तेंव्हा आदि आधार ३
नव्हता तेव्हा नाद बिंदू ४
नव्हेत या अभ्यासाच्या गोष्टी २०५
नयन होऊनि काढी ७६
नसे तो नश्वर नसे तो शाश्वत ९१
नसत्या शंका आहेत ९५
नको भीति नको धास्ती ६९१
नको म्हणणेच न्यूनता ६९८
नका हुडकु, हुडकु नका ३४३
नदीच्या मध्यात नावेतून उतरल्यागत ३७७
नसे हो मीपणा लिंगरुपि महंतास ४७१
ना आंत ना बाहेर असे ते ३६
ना संयोग ना अंतरे ५९७
नानाविध स्थानीं येऊन २६०
नाहींच्या ठायी असे नकारात्मक ३०
नाचून नच दमती पाय! ६८१
नाद बिंदु यास म्हणतो मी अंग-लिंग २२०
नाहीं हो तयास आदि आधार, २७३
नाहीं मी भक्त, नाही हो मुक्त ३४०
निर्विकल्प हे असे निज ठायी ७२
निस्सीम लिंगास सीमेस आणिले २००
निरवयाची भक्ति तनुवर ५०७
नितांत प्रेमानें सुख शांति ६१४
निशून्या ठायीं शिरविरहित ६७२
निरर्थक, अशा मायेच्या आहे ८२६
निराकाराच्या शक्ति ठायी ८३६
निधी आहे माझ्या चिंतनाचा ! ८४४
निवारल्याविना कायेचा अहंकार ८४८
निंदा ही विरली आलेल्या भवात ८७६
निर्विकल्प अशा निजाठायी, ९१८
निजतत्त्वाचे निरवय पावे चेतन, ९२९
निर्वाह झाले देवा बसवण्णाचे ९५०
निश्चल शरणांच्या घरच्या अंगणात, २७८
नित्यचि भक्त तयाच्या घरास ३९०
नित्य निजतत्व होऊनी ३४४

| | |
|---|---|
| निराकारचि होऊनी साकार, | ४९९ |
| निरालंबा ठायी निजलिंग मीच आहे | ४५१ |
| नीर क्षीर एकरुप झाल्याचे पाहून | ३७१ |
| नुरे तन, नुरे मन नुरे भाव, | ९०४ |
| नेसलेले वस्त्र काढून | ९४७ |
| नोहे हो मी पण नोहे तू पण | ८९८ |


**प**


| | |
|---|---|
| पंच ब्रह्म वरचे प्रणव मंत्र असलेले | ६३३ |
| पंच शत कोटी विस्तीर्ण | २१ |
| पंच शत कोटी भूमंडल | ७३७ |
| परमतत्त्व परमार्थ परापर | ७४ |
| परात्पर वस्तूने पाठविलेल्या | ४४२ |
| परिपूर्ण आहार, परिपूर्ण आहार म्हणत | ७५० |
| परिमितास आणिले चालवत | ३८९ |
| पहाण्याचे एक. ते पाहून घेण्याचे एक. | ४९३ |
| पणतीही आहे, वात ही आहे | ५५ |
| पहा बसवण्णा प्रसाद लिंग असें तोंवर | ८६४ |
| पहा पहा पहा हो सिद्धरामेश्वरा | ३०३ |
| पहा हो, आचार आहे ते अगोचर ! | ९४३ |
| पहा हो, हा आहे अंगविकार | ८१२ |
| पहा हो, या युगाचा हा उत्साह | ७९२ |
| पाण्यात अग्निची होऊनी उत्पति | ८५१ |
| पाणी न मिळता तोंडास कोरड | ८३९ |
| पाण्याचे करुनी उखळ | ७९८ |
| पाण्याचे बाहुलीने केले वेष धारण | ११ |
| पाण्याचा बाहुलीस बांधुनी | ९० |
| पाताळांतील सात भुवने | ७०५ |
| पायाविण गमन हताविण स्पर्शन | ७५ |
| पाय नाही म्हणतात प्रभुदेवाना | ६६१ |
| पाषाणातील अग्नि नाही जाळत | २ |
| पाषाणांतील पावकागत | १ |
| पाहताचि घन अवग्रहिले मन | ९१९ |
| पाहिला मी मम करस्थली | ५७५ |
| पाहिले म्हणणे हेच डोळ्यांचे विस्मरण | ८९ |
| पाहिलेले स्वप्न खरे वाटे | १९५ |
| पुण्य पाप जाणण्याआधीं | १५४ |
| पुण्याईच्या काळी माती होई सोने | ३२ |
| पुण्याईच्या काळी शत्रु मित्र होई | ६६७ |

पुसता तुम्ही माझी खूण ८३
पूर्वीची रीत अशी नाही ५०
पेटती चुल येते विझविता ३५५
पोटाचे तोंड तोंडाचे पोट ७९५
पोहोंचण्या आधी गुरू असतो, ४९६
प्रकाशित ज्योति प्रभागत ४३९
प्रकृति गुण असेपर्यंत नव्हे तो भक्त ८००
पृथ्वी पूर्वाश्रयाचें केल्याविण हनन ५९
प्रथम गुरूदर्शन मात्रे, २५०
प्रथमावस्थेंत होता तुम्ही निरालंबी २६१
प्रथमकाळी देवगण महागण ५२९
प्रसादीचे प्रसाद लाभलेल्या प्रसादीस ५६८
प्रळ्यातीत वीजेता ८७९
प्राणलिंगात करूनी प्रवेस ८१०
प्राणलिंगाचा पूर्वाश्रय नष्ट ७८५
प्राणस्थली झाली तृप्ती ८५०
प्रज्ञाविण असू शकेल कां तन ७७१

### ब

‘ब’ म्हटल्याने आलो ‘ब’ सानिध्यात ९१४
बसवण्णा, आता पुरे कर बा ७२९
बसवण्णा, अपण्णास न येई जीवन जगता ३४९
बसवण्णाचे नाम घेताच, ४३६
बसवण्णांची करणी परिस ५३४
बसवण्णा, तुज पाहून पाहून, ४२३
बसवण्णाची कर्म रहित काया, २७६
बसवण्णांनी मांसपिंडास परिवर्तून २५३
बसवण्णा लाभले बा मज तुजयोगे ४१७
बसवण्णा हा ॐ काराच्या पलिकडचा २५८
बसवण्णास सहा जन्म म्हणतात ८२९
बसवेशा, आज झाली मम तनु शुद्ध ७५१
बसवेशा, तुजला सात जन्म ७५२
बसवेशा, तुम्ही मृत्यूलोकी येऊन ९४२
बहिणी, बहिणी पांची जणी ५८१
बहिरंगात तू विहरीत असल्यानें १७७
बहुत कालापासून केलेली भक्ति ७७३
बांधिले उंच ध्वज तोरणें ६३९
बांधुनी दगडाचें घर दगडाचा देव करून ११९
बालीचे अंग पहा हो पुरातनानो ६०४

| | |
|---|---|
| बिंदु हाचि होऊनी पीठ | २१९ |
| बिंदूस छेदिले की हो तुम्ही बसवण्णा ! | ९४९ |
| बिंदुस निवारून, नादातीत होऊन | ५४२ |
| बोलणेच ज्योतिर्लिंग स्वरची परतत्त्व | १०३ |
| बोलण्याची आशा अजून तुमची जाईना | १०६ |
| बोलण्यातच चालण्याचे होईनास | ११३ |
| बोलत नाहीं या म्हणण्यांतच आहे बोलणी | ११० |
| ब्रह्म असो बा विष्णू असो, | १३१ |


**भ**


| | |
|---|---|
| भक्त जंगमाचा सकील | २८९ |
| भक्त -जंगम हे परस्पर संबंधाचे आहे | ४३४ |
| भक्त माहेश्वर-प्रसादि प्राणलिंगी-शरण ऐक्य | ८१६ |
| भक्ताची कायाच जंगम करितो धारण | २८७ |
| भक्ताधीन होऊनी आलो नाहीं | ६९९ |
| भक्ति आहे तुमच्यात | २९१ |
| भक्तिचे कुळस्थळ मृत्युलोकी | ४४३ |
| भक्ताची उन्नती त्याची अवनती | ३६१ |
| भक्तिचा भांडारी बसवा | ९४१ |
| भक्ति युक्तिची रीत जाणकार | ७८२ |
| भक्ति-युक्ति मज नाही कळत | ५७२ |
| भक्ति, युक्ति हें सारें कोणास | १६५ |
| भव नसले नसले तरी काय | २६८ |
| भ्रमित झालास बसवण्णा ? | ७३४ |
| भल्या पहाटे उठून स्पर्शाने लिंगाचें चरण | ५७ |
| भावनेने पाहिल्यास ते असे हो अंग | ६०१ |
| भावांत गमन, प्राणांत लोभ, | २४८ |
| भावुकांची मूर्ति आराधना | ४३० |
| भावून दिठी निश्चल होऊन | ८६६ |
| भिंऊ, नका , नका भिऊ | २४२ |
| भूकेने रडणाऱ्या लेकरास | ६४८ |
| भूत भूत मिळुन झाले अद्भूत | २४ |
| भूमी आकाशामध्ये उगवले | ९३९ |
| भूमीच्या समोर असुनी दार, | ८६२ |
| भूमीच्या सत्त्वाने वाढला एक तरु | ४३८ |
| भूमीचे काठिण्य आकाशाचे मृदुपण | २७ |
| भूमीची केली बाहुली | १३ |
| भूवलयाच्या मध्यांतील अष्टदळावर | ७८७ |
| भोजनप्रिय सारे जमले हो | ६८४ |

## म


| | |
|---|---|
| मज एकही न दाविता येई | ५४९ |
| मज झालें ज्ञान म्हणणे हेच अज्ञान | १०१ |
| मज तुम्हीच पिता, तुम्हीच माता | ३१८ |
| मज नाही समजत तुमच्या भक्तिची घनता | ३४६ |
| मडिवाळानी माझी काया केली हो शुद्ध | ५३९ |
| मतीत झाली दुर्मीतीची उत्पत्ति | ६९२ |
| मथनाच्या लीलेत होतो का ब्रह्म निर्माण | ८६० |
| मंत्र काढिला हो आपल्या पोटातून | ८२४ |
| मदगजास मद गजच धरतो | १४८ |
| मध्य रानांत न म्हणता दिनरात | १४५ |
| मन कायारूपि सिंहासनावर | ९०८ |
| मन धनी आल्यास माझ्या घरा | ३८८ |
| मन मग्न कसे आहे तसेच रहावे विना | २२५ |
| मन मन एक झाले भाव भाव एक | ३९५ |
| मन मन एक झालेल्या अनुभावाने | ४९७ |
| मन मुक्ति विवेकचि तांदुळ | ७४९ |
| मन मन होऊनी एक समरति | ५२६ |
| मन मन होऊनी एक झाले बा ज्ञान | ३७० |
| मन मन होऊनी एक | २८५ |
| मनाच्या अग्राने स्मरल्याचे चिंतन | ९१७ |
| मनाचा धनी आल्यास माझ्या घरा | ६५१ |
| मनाचा संकल्प मज नाही उमजत | २१२ |
| मनाच्या संचय ओवरीतली सुकली हो | ८४० |
| मना जोगे मंगळ म्हणण्याचे न टळे | ६४६ |
| मनास मन एकार्थ होऊन | ३५२ |
| मनांस मन मिळून एक झाल्यावर | १८४ |
| मनास मन झाले एकार्थ ( कायेस ) | २८४ |
| मनास मन झाले एकार्थ ( प्राणास ) | ६२१ |
| मम अंतरंग बसवण्णा | ५७४ |
| मम अष्ट विधार्चन षोडशोपचाराचे | ९१० |
| मम अनुभवाचा तूं असशी अगम्य | ९२७ |
| मम करणेंद्रियांना करितो मी एकरूप | ३०२ |
| मम करस्थली मी अवलोकिला एक महाप्रकाश | ८७० |
| मम कायेचा अंधार निरसन करण्यास | ५२७ |
| मम कायेच्या करस्थली देखिले | ७३३ |
| मम कायेचा काळोख विरला | ७३८ |
| मम कायेस बसवण्णानी घेतले सामावून | ५७६ |
| मम कुळीचे सूतक केले बसवण्णाने तोडून | ९१२ |

| | |
|---|---|
| मखाच्या झाडापरि जात्याच निर्माण होतो परिमळ | ४१२ |
| मम गति मति तूच असशी | ३५८ |
| मम गुणावगुण ममठायी करितो मी | २५६ |
| मम तनुचा धनी असशी तूंच देवा | ३४८ |
| मम तनु मम मन या दोन्हीत करुनी निवारण | ४०४ |
| मम भक्ति  तव धर्म ( कारुण्य ) | ६०५ |
| मम मन देखता तव चरण विलीन | ६७६ |
| मम मन बसवण्णा, मम वाणी चन्नबसवण्णा | ५७३ |
| मम मनीचे कलंक वितळून | ३३२ |
| मम संसार सूतक घासून पुसुन | ४८२ |
| मम वचनी साठले हो तव नामामृत | ६७८ |
| मला तूं इतक्या लवकर केलास ना बंदिवान ? | १७० |
| मरेपर्यंत कवायित करीत बसल्यास | ८५४ |
| माझ्या आदिचे करावे म्हणतो कथन | ५१० |
| माझ्या कष्ट कुळीचे सूतक | ९१५ |
| माझ्या कायेच्या कळवळास करूनी निश्चल | ८४९ |
| माझ्या वाणीने माझ्या ह्रदयाचे केले | ३५४ |
| माझ्या गुरु अनिमिषास पूर्वी लिंग दिल्याचे | ८७४ |
| माझ्या जाणिवेच्या डोळ्यातला काळोख | ४३५ |
| माझ्या चुका न येई हो मोजता असती तो | ९३४ |
| माझ्यात नसलेल्या घनतेस चढऊन बोलता | ४५२ |
| माझ्या प्रभुच्या आगमनास्तव | ६७५ |
| माझ्या मनाच्या अग्रावर अंगरहित रूप | ४८ |
| माझा राग हाच तुमचा डोळा | १६६ |
| माझ्या स्वामी आला मज आकर्षित होऊनी | १८९ |
| माझी तनु चन्नबसवण्णाच्या | ९११ |
| माझी जाण-अजाणपण झाले हो बसवण्णास | ९१३ |
| माझे आचार-विचार झाले बसवण्णास अर्पण | ९०६ |
| माझे अपराध अनंत कोटी | ३२८ |
| माझे आयत अवधान झाले निवारण | ९०३ |
| माझे आवडते प्रिय शरण येऊन | ६५५ |
| माझे अंतरंग उघडून पाहतां माझ्यांत | १७४ |
| माझे शिर तुमच्या चरणास घासून पुसून | ३०९ |
| मातेचे सुख दुःख भोगावे लागते | १२७ |
| मान्य अमान्यास तुम्हीच करतां हो | १८५ |
| मारारीच्या आज्ञेने धरणीवर घेऊनी अवतार | ८२८ |
| मी आहे हो तुमच्या वीरांचा वीर | ९३३ |
| मी जें जें करीत आहे ते सारे तुम्हीच | २०२ |
| मीनज रोमज ऋषिगण इत्यादि अनंत कोटी | २४० |

मी नाहि हो भक्त  मी नाही युक्त ७७६
मी पणाचे करुनी निरसन गुरुस अनुसरुन ४७९
मी म्हणणेच प्रमाण, तूच म्हणणे प्रमाण ९२२
मुक्तीस होऊनी मुख युक्तीच्या बाहेर ११५
मूढत्व आणि गाढत्व तूच असशी देवा ४०६
मोठे टोपले भरून, सूप भरून ७२४
मूग चर्मधारी स्वामीस शोधीत १५
मृत्यू लोकांतील महामने होऊ नये नाश १७९
मृत्यु लोक शिवलोकास एक शिडी २६७
म्हणती अंग हे लिंगाचे ताट ७४४
म्हणती आदि शक्ति अनादि शक्ति ६०६
म्हणावे तो बाहेर आहे तर पहा आहे तोच आत ६२२
म्हणती सारे योग-शिवयोग १८१
म्हणावे एकतर आहेत दोन दोन म्हणावे तर एकच आहे ३८

## य

या कल्याणात प्रवेशण्यास येते का हो कोणासही ५८२
या भूतलावरील भयंकर राक्षसी ७९६
या वीर धरणींत नारीस रूप शृंगार दिले हो कोण ८०३
याहो, हिशोबनीसानों सांगा तुम्ही हिशोब ७३०
युक्ति विचारल्यास दावितो भक्ति ५२८
येऊनही न आल्यागत ६३४
येईना चढतां दिलेल्या घोड्यावर ५८
योग वियोग या क्रमाचा जाणकार नाही २१५
योगाचे क्रम न येई साधता ८५२

## र

रचुनी आदि आधार ७८६
रविच्याठायी लपलेल्या प्रतिबिंबागत ८१
राजा रागावल्यास राहू नये त्या देशांत ६९०
रानात तहान लागता ६५३
राहुनी ओसाड घरात उभा ठाकिला ७८८
रूप असे नाशिवंत, निरूप असे शाश्वत ५९१
रूप निरूपाठायी पाते निश्चल ३१०
रूपरहितास जे करिती प्रसन्न तयाना ५८७
रूप रहित रस, निर्णयाविण निष्पति ८०५
रेड्याच्या शिंगाच्या अग्रांत २०
रोपावर सागर वाहत आल्यापरि ३९६

## ल


| | |
|---|---|
| लहान असला म्हणून झाले काय | ४८८ |
| लाडू, कानवले, मांडे, पोहे, गुळ, मनुके, साखर | ७३२ |
| लिंग अनुसरून लिंगायोगे झालेले ज्ञान | ४९० |
| लिंगाठायी अर्पित झालेले काया सुख | ३८३ |
| लिंग आणि प्राणाचा सकिल संबंध | २६४ |
| लिंगा ठायी उद्‌भवुनी, अंगविरहित होऊनीही | ४६९ |
| लिंगपूजा करूनी काय प्रयोजन | ३२६ |
| लिंग गंभिर मन झाले की हो निरसन | ९२६ |
| लिंग गंभिराठायी जग निर्माण झाले | ८०९ |
| लिंग गंभीर सुनाद जंगम गंभिरचि | ८२२ |
| लिंग जंगम-जंगम लिंगाचे मुख | २६९ |
| लिंग जंगम जंगमच लिंग | २९० |
| लिंगचि जंगम जंगमचि लिंग | २९४ |
| लिंगाठायी जंगम जंगमाठायी लिंग असल्याचे | ३२० |
| लिंग-जंगम जंगमलिंग हे मज कोणी दाविले | ४३१ |
| लिंग-जंगम पुजुन भक्त होणारास | ३५० |
| लिंगचि जंगम जंगमचि लिंग असल्याचे | ९४४ |
| लिंग जंगमाचे विधविधान जाणून | ७८३ |
| लिंगैक्याच्या तळ हातातील इष्टलिंग झाले विलीन | ५३७ |
| लिंगाच्या पुर्वाश्रय करूनी निरसन | २५५ |
| लिंगाचा पुर्वाश्रय करूनि निरसन | ४५७ |
| लिंग समाधि स्थिती परम सुखीयांचे काय वाणू | ८२० |
| लिंगसुख संगी झाले मम मन वेध | ६१० |
| लिंग हाचि प्राण, झाला प्राणलिंग | ४९५ |
| लिंग हे कसे असतें हे मज नसे अवगत | ३२७ |
| लीय होऊनी आलेली रीत | ५२५ |
| लोचनी करस्थली दिटि दाटली | ४४० |
| लोकांती नुरुनी उरल्यानें एकांती | ८४५ |
| लौकिकांच्या इच्छेनुसार नाहीं वागत | ७५६ |

### व


| | |
|---|---|
| वणवा पेटल्यास बळी पडे कानन | १३३ |
| वचनांची रचना ही नव्हे अलंकारिक भाषा | १६३ |
| वंदितो मी अतिशय संतोषाने | ६५२ |
| वळुनी उजविकडे, पौळीच्या उत्तर द्वारी | ६७१ |
| वाघाचे शिर हरिणीस हरिणाचेंशिर वाघास | २८ |
| वांछित इच्छा तूंच झाल्याची रीत कोणती | १९८ |
| वाटेवर पडलेले माणिक | ३७३ |
| वाढूनी अन्न बोली सत्य ठेविल्यास पाण पोई | १२१ |
| वाढतो मी आकाररहित पक्वान्न | ७१० |
| वाणी असें तोंवर न सुठे देह | १८७ |
| वाणीस नसे आवाज अंतराळास नसे सीमा | ७१ |
| वावरतसे कस्तुरी मृग येऊन | ४७ |
| विस्मृतीने बनलेली ही खुणाची काया | ७०२ |
| विश्वासलो बा मी | २९८ |
| विस्मरण झाल्याचे देखुन श्रीगुरुनी दिले | ८७२ |
| विज पडल्याने होई तयार विहीर | ११२ |
| वेगाने चढून पोहोचलो नाहीं | ९०७ |
| वेश्या अनेका ठायी होई रत | ३५३ |
| वैऱ्याने भोसकलेल्या जखमेस उपचार करण्यास | ३०० |
| व्योम विहारीना कशाला हवी शिडीची पर्वा | ५५९ |


### श


| | |
|---|---|
| शरण नात्यातला ऐक्य पावताना | ९३८ |
| शरण हा अदर्शनीय अथवा दर्शनीय | ४७३ |
| शरण हा अनुरागी आहे असे वाटल्यास | ४७० |
| शरण नसे हो हा साकार नसे निराकार | ४७६ |
| शरण हा श्रोत्रांते असावा ब्रह्माचारी | ७९४ |
| शरणू म्हणत गेलो मी धरणास तव चरण | ३१३ |
| शरणु शरणार्थी माते तेव्हा धरणी आकाश नव्हते | ८५ |
| शरणू शरणार्थी लक्ष देऊन ऐकांवी | ३६२ |
| शरणु शरणार्थी | ३६० |
| शाईस कितीक काळ उजळले तरी होईल कां ती धवल | ३१६ |
| शांति स्थापण्यास गेलो परि ते झाले वेताळ | ८५७ |
| शिव दिसतो हो, शिव लपतो | ३११ |
| शिव शक्ति संपुट झालेल्या महामाहिमांची | ८३१ |
| शिव-हराच्या आज्ञेनुसार अवतरला हो बसवण्णा | ८४७ |
| शुद्ध आहे म्हणावे ? तर मी नाहीं सुयिधानी | ७१४ |
| शोधीत असलेली वेल पायास गुंडाळल्यागत | ३३ |

शोधित असलेली वेल पायास गुंडाळल्यापरि ८६९
श्रद्धा आणि संतोषानें स्विकारलेल्या लिंगाच्या ४९९

## स

सकल जागसे नसे अवगत कायेच्या ७
सकल निःकल असे हो बसवण्णा ४७७
सकल मेरुगिरी या प्रमथांच्या वस्तु होत ३३६
सकल लिंगास धरुन न अंतरिता २०१
सकलात नसे तो सन्निहित पारे ८७५
सजन सांनिध्य भक्ति ३४१
सत्य संबंधित भूत्याचार नसे हो माझ्यात ३३१
सत चित-आनंद नित्य-परिपूर्ण असे वदती ३९२
सद्योजात हा बद्धज्ञानी ८०२
समजाविला अदि, दावीला आनादि ३६९
समताचि माझे काषांबर ७०७
समरसाने पाहिलें मी २०४
समसुख समसंधानरहित असे हो तो संग ५००
समरति समसंधाचे संगसुख तुझ्या योगे ५०३
समस्त गाढ काळोखाचे निर्मुलन झाल्याचे ८९०
समुद्रास चंद्र आगमन हाच होय जिव्हाला ६४१
सरली अवधी, उरला हो व्यवधान ९२३
सर्वव्यापी घन हं चिन्हास येण्याआधी ९७
सहस्त्र आठव्या दलात खेचर झाले ६३०
सागराच्या खोल पाण्यात २६
सागरातील प्राणी राहू शकतील का ११८
सात तालावर ऐकू देणारे सुनाद ६३२
साऱ्या मृत्युलोकाने धरिले आहे ज्ञानास ७८
साव्या भक्तियाभेद ५१४
सारी विवर वर्णने असतो ५३०
सिद्ध झालेले पदार्थ अपणास झाले हो योग्य ७२९
सिद्धराम देवा, धरुनी आयतलिंग पहावे स्वागतलिंग २३७
सिद्धरामा, मन असें का शिवयोगीस ? २२३
सुपाने वाढल्याने तोंडभरून घेत आहे आहार ७२१
सूत्रधारी मनाचे मालिन्य धुण्यास्तव ५४०
सूर्योदयाचि कमळास जीवकळा ६४३
सांगादेवा मन मग्न म्हटल्याने त्यात आहे २२४
संग सनिध्य शरण आव्यास मम सदन ६५७
संगायोगे झाली तनु त्या तनुयोगे पडला विसर ४०५
संसार रूपे पडले होते प्रेत १०

संसार साराच्या मधुरसास रगडून पिळला ८२१
सांग मज देवा १७२
सांडूनि काया गुण मर्दुनी माया मद १३४
सूत्रधारी तनाचे मालिन्य धुण्यास्तव
स्त्रोत्रहीं तुम्ही केल्यानेंच झाले आहें १६२
स्थावर जंगम हे एकच ३१७
स्थूल सूक्ष्म प्रकाशित पहा प्रकाश होऊन ६२८
स्नेहाच्या सुखास गिळले हो नजर ८९२
स्फटिक प्रज्वल ज्योति दिसते घरांत ७९
स्मरण विस्मरण हा गुणदोष असे हो तुमचाच १५८
स्मरण्यास नच जाणता येत ९१६
स्वतः करिता ठेवलेले द्रव्य ६९६
स्वयंपाकाचे पदार्थ संपले म्हणून ७२८
स्वय न जाणती, न ऐकली दुजांचे ७६६
स्वस्ती समस्त प्रशस्ती सहीत २७२
स्वस्थ पद्मासन घालून वसती २१७
स्वस्थ सुस्थिर सुमन मंडपात ६२७
स्वतंत्र परतंत्राची कोणतीही खूण १८६


**ह**


हर आपलेंरूप दाखविण्यास्तव आला मृत्युलोकी २५२
हे देवा आजच्या या अवस्थेमुळे १४३
हे देवा, उत्पति-स्थिती-लयाच्या आधीन नसलेला १८६
हर करुणेनें संपादिले सामर्थ्यबळ १३७
हे कलिदेवा आदिकूळ अनादिस्थळ ५४४
हरपली माझी तहान ८८३
हरवलेले लेकरु आपल्या आई करिता टाहो ६४४
हरी  न जाणी तुमचें चरण ब्रह्म नच जाणी तुमचेमुकुट १५७
हस्त मस्तक संयोग होण्या आधिच झाले हो यौवनमंथन २४९
हा गुरु हा लिंग ५११
हातभर भरून आहार वाढल्यास ७२०
हातानें स्पर्शिता पदार्थ होतसे ऐक्य हातात ७३३
हाताने खूण तोंडाने ओरडणे १०८
हाती जनावरास दाणे चाटणारे ३४५
हात सोडावून घेऊन दूर लोटल्यास १५९
हा मज गुरू होऊन करूनि उपदेश दाविला हो मज ५३८
हा मज पाहातो म्हणून झाला हो तो डोळ्याआड ३१२
हायरे देवा मज दुःखाच्या खाईत लोटलात १४४
हा सारा शिष्यगण हे त्रिनेत्रधारी असे तुमचाच १३०

| | |
|---|---|
| हां हां दुसरे काय | ६०९ |
| हिसोब न झालेले कड धान्याचा स्वयंपाक क्षणार्धांत | ७३१ |
| ही तनु दिली असे वदून गुरु वचनास झालो दूर | ३३९ |
| हे काय अदभूत ! आज माझ्या नयनास लाभले हो मंगल | ७२५ |
| हे देवा, अनेक गिरीगुहा कंदरात जमीन | ६२५ |
| हे देवा, जेथे जेथे माहेश्वराचे वास स्थान | २७४ |
| हे देवा, तयास ठाऊक गारूड | ५८० |
| हे देवा, तीन नगरीच्या वरच्या माळ्याच्या | ५७८ |
| हे देवा, तुमच्या निष्ठा | ५७७ |
| हे देवा, तुमच्या शरणाना पाहिल्याचे सुख | ३०७ |
| हे देवा, तुमचा शरण बसवण्णा योगें पाहुनि लिंग | ५७९ |
| हे देवा, तुम्ही सांगा हो मज | ६१५ |
| हे देवा, तुम्ही सिद्ध करून दिलेले पदार्थ करतो मी | ७४७ |
| हे देवा, तुम्हास पहात असता या डोळ्यानीं न पाहू शकता | १५२ |
| हे देवा, तप स्पर्शित गुणा योगें झालो मी पूर्वाचारी | ४१४ |
| हे देवा, तू वेदप्रिय नाहीस | १६४ |
| हे देवा, तू अणूमध्यें अणु होऊनी बसशी | १९९ |
| हे देवा, महाप्रसाद | ६९५ |
| हे देवा, मी सज्ञन शरणांचे सद्भाव पाहिल्यानें | ५८५ |
| हे पहा देवा, मम मनी नसें अन्यास ठाव | २२२ |
| हे पहा देवा, उपमा-अनुपमा हे आहेत तुमच्या आधीन | २०६ |
| हे देवा, मन स्पर्शिता भक्तिने | ३०८ |
| हे देवा, माझे शिर तुमचे चरण स्पर्शिल्यावर | १५३ |
| हे देवा, नीर-क्षिर वेगळे असल्याचा भेद जाणता हंस | २०८ |
| हे देवा, लोखंड पाण्यांस सामावून घेतल्यापरि | २३० |
| हे देवा, माजला रे कोलाहल, | ९४५ |
| हे देवा, मी आहे रे अनाथ ! | ९४० |
| हे बापा भवदुःखात जन्मलेला नसे हो मी प्राणी ! | ९३५ |
| हेमाचा हव्यास नसल्याने मज नसे हो समाधान त्यात | ७९३ |
| होय होय, बसवण्णा ! तुझे म्हणणे खरे आहे काना खोडता | ७७२ |
| होऊनी जर्जरीत, झालो मी दूबळा | ६१९ |
| हे देवा, मी सांगतो ऐका | १९३ |
| हे मना निर्णयाच्या अजाणतेनें | ४४ |
| हे देवा, ज्ञानाच्या बळायोगे पावे नास अज्ञान | ४२६ |
| होय होय ते खरे आहे असेच असावें निरंकार | ५५० |
| होय होय ते खरे आहे | ५६० |
| होय तें खरें आहे | १८८ |
| होय होय ! विनय असावे बा असेच | ७१५ |
| होय होय ! शिवशरणांची महती | ११४ |

### ज्ञ


| | |
|---|---|
| ज्ञान निरसून खूण विनाशून | १०९ |
| ज्ञानास झाले हो मारक विस्मरण | ५१६ |
| ज्ञानोदय झाल्याविण नष्ट न होई विस्मरण | ५१७ |
| ज्ञानाविण नच दिसे गुरू | ५१८ |
| ज्ञानातीत ज्ञान अवग्रहिल्यानें | ८८८ |
| ज्ञानाश्रयाचा जाणूनी संग होता तो अभंग | ८९१ |
| ज्ञानातीत परवशतेचे न येई जाणता | ८९४ |

# वचन-मुद्रिका

बसवयुगात एकंदर एक कोटी शहाण्णव लक्ष वचने लिहिली गेल्याचा उल्लेख आढळतो. या विषयावर आजवर झालेल्या संशोधनात, सुमारे चारशे शिवशरण व चाळीस ते साठ शिवशरणींची नावे वचनकार म्हणून निष्पन्न झाली आहेत. आपापली वचने सुलभतेने ओळखता यावीत म्हणून त्याच्या वचनकर्त्याने मुद्रिकेची योजना, साधारणपणे वचनाचे शेवटी केलेली आढळून येते. आपल्या गुरूची किंवा इष्टलिंगाची मुद्रिका त्यांनी स्वीकारलेली आहे. तर काही शरणांच्या मुद्रिकेत शिवानुभवाच्या सांकेतिक लक्षणाचा अंतर्भाव असलेली शब्दयोजना असल्याचे दिसून येते. शिवशरणींपैकी कांहींनी आपल्या गुरूच्या अथवा पतीच्या नांवाच्या वचन मुद्रिकेशी "प्रिय" व "अरस" ( स्वामी ) असा पदप्रयोग जोडला असल्याचे पहावयास मिळते. काही शरणींच्या मुद्रिका याखेरीज वेगळ्या स्वरूपाच्या अशा पण आहेत. शरणांची व त्यांचे वचन मुद्रिका अकार आदिने याखाली देण्यांत आला आहे.

| **नाव** | **मुद्रिका** |
|---|---|
| अक्का नागम्मा | बसवण्णा प्रिय चन्नसंगमनाथ ( संगय्या ) |
| अक्का महादेवी | चन्नमल्लिकार्जून देवा |
| अल्लम प्रभुदेव | गुहेश्वर |
| एकांत रामीदेव | एकांतवीर सोडळ |
| किन्नर बोमीदेव ( सोनार ) | महालिंग त्रिपुरांत देवा |
| गट्टिवाळ मुदण्णा | चिकय्याप्रिय सिद्धलिंगं नाहीं नाहीं |
| चन्नबसवण्णा | कूडल चन्नसंगमनाथा |
| ढोहर कक्कय्या ( ढोहर ) | अभिनव मल्लिकार्जुन |
| बसवेश्वर | कूडल संगमनाथा |
| मडिवाळमाचिदेव ( धोबी ) | कलिदेवर देवा |
| मुक्ताईअक्का | बाप अजगण्णा |
| मेदार केतय्या ( बुरूड) | गौरेश्वरलिंग |
| मोळिनी मारिदेवा ( काश्मीरचा राजा ) | निःकलंक मल्लिकार्जुन |
| शंकरदासीमय्या ( दर्जी ) | निजगुरू शंकरदेवा |
| सोडळ बाचरस | सोडळा |
| हडपद अप्पण्णा ( न्हावी अप्पण्णा ) | बसवप्रिय कूडल चन्नसंग ( संगमदेवा ) |

अनुक्रमणिका

# अनुभाव-कायक-गणाचार

सामान्यतः शिवशरण हे आपापले जीवनक्रम व जीवनदृष्टि व दर्शनाने ‘अनुभावी शरण’, ‘कायक शरण’ व ‘गणाचार शरण’ असे ओळखले जातात. अनुभाव ( बयलु सिद्धी ), कायक व गणाचार या शब्दांचे विश्लेषण खाली देण्यात येत आहे.

## अनुभाव

अनु भव, षट्स्थल, शिवयोग, ‘करण-हसिगे’, ‘लिंगांगसामरस्य’, ‘बयलु’, ‘शरणसतिलिंगपति’ इ. शब्द बसवधर्मातील अत्यंत सूक्ष्म व गूढ अर्थाने वापरले गेलेले पारिभाषिक पदप्रयोग आहेत. ‘षट्स्थल-सिद्धांत’ ही भारतीय तत्त्वज्ञानाला वीरशैव धर्माने दिलेली वैशिष्ट्यपूर्ण अशी देणगी आहे. यात तात्त्विक सिद्धांत व आचरणमार्ग या दोहोंचे विवरण केलेले असून या दोन्हींचा समन्वय साधून केलेले प्रत्यक्ष आचरण म्हणजेच ‘शिवयोग’ होय. शिवयोगाचे दर्शन म्हणजेच अनुभाव !

भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत योग, योगांग आणि विविध योगप्रकार यांचे सूक्ष्म विवरण केलेले दिसून येते. हठयोग, लययोग, मंत्रयोग, दृष्टियोग, अष्टांगयोग, राजयोग, त्राटकयोग, प्रार्थनायोग इ. योगांच्या या सर्व प्रकारातील उत्तमांश शिवयोगात अंतर्भूत आहे. आधुनिक योगद्रष्टे महायोगी अरविंद यांनी प्रतिपादिलेल्या पूर्णयोगाची सर्व लक्षणे शिवयोगात सामावलेली आहेत ! मात्र शिवयोगात आढळणारी सर्व लक्षणे पूर्णयोगात दिसून येत नाहीत, असे पौर्वात्य व पाश्चिमात्य योगवेत्त्यांचे मत आहे.

शिवयोगाचे मूळ सूत्र व प्रमुख कसोटी म्हणजे या योगाचरणाने व्यक्तिविकासाबरोबर समष्टिविकास झाला पाहिजे. रानावनात व मठामंदिरात बसूनच हा योग साधला पाहिजे, असे नाही; कारण शरणधर्मानुसार “कायकाविना शिवयोगाची पूर्ति कष्टसाध्य आहे !” खाणे सोडणे, परंतु भुकेने मात्रतळमळणे, म्हणजे खरे वैराग्य नाही ! अंग झाकण्यापुरते वस्त्र विणण्याची वा विकत घेण्याची क्षमता नसणाऱ्याने लंगोटी लावून फिरणे ही विरक्ती नव्हे !

या योगमार्गांत केवळ ईश्वराचे ज्ञान करून घ्यावयाचे नसून दिव्यत्व प्रत्यक्ष अनुभवाला आणून घ्यावयाचे असते. शिवयोग साधनेत स्वतंत्रपणे साकार करून घेतलेल्या शिवानुभवाची चर्चा करण्यासाठी वैयक्तिक आचरण स्वातंत्र्याच्या जोपासनेसाठी अनुभव-मंटपाची निर्मिती झाली.

## कायक

‘कायक’ हा शब्द बसवधर्मातील पारिभाषिक पदप्रयोग आहे. कर्म, क्रिया, कार्य, श्रम, उद्योग, व्यवसाय व मोलमजुरी इत्यादि शब्दांचा ‘अर्थ’ यातून ध्वनित होतो. परंतु शिवशरणांनी तो एका महान् सिद्धांताच्या स्वरूपांत वापरला आहे. आजचा ‘समाजवाद’, ‘समतावाद’ वा ‘शोषणरहित जीवनपद्धती’ इत्यादि विचारप्रणालींत किंवा शब्दप्रयोगात अंतर्भूत असलेला अर्थभार वाहण्याचे सामर्थ्य ‘कायक’ या एकाच पदात सामावलेले आहे. इतकेच नव्हे, तर या साऱ्या विचारप्रणालीवर उदात्ततेचा व दिव्यत्वाचा ते ठसा उमटविते.

अनुक्रमणिका

शरणांच्या आचारसंहितेत जीवनक्रमांत 'कायक' अर्थात 'दैहिक-श्रम' हे अटळ आहेत. देहधाऱ्यांनी शारीरिक श्रम करूनच उत्पादनात भर टाकली पाहिजे व आपल्या दैनंदिन गरजा भागविल्या पाहिजेत. त्यांच्या दृष्टिकोनांतून कोणत्याही कायकांत उच्च - नीचता नाही. यातून त्यानी 'श्रमगौरव' ( Dignity of Labour ) साधला. 'सत्यशुद्धतेने' कायक आचरणे हीच त्यांची योगसाधना होती. कायक हाच कैलास. गुरू असो, संन्याशी असो वा धर्मसंस्थापक असो, त्यालाही कायकानेच मुक्ती साध्य आहे. एवढेच काय, त्या जगन्नियामक परमात्म्यालाही या कायक नियमातून सूट ( Exemption ) नाही, असे ते मानीत ! शरण तत्त्वांतील हा 'कायक' सिद्धांत अर्थशास्त्रांतील'श्रम', 'श्रमविभाग' व 'श्रम-गौरव' या कल्पनांचे दिव्यत्वीकरण करतो. म्हणून त्यास 'श्रम-दिव्यत्व' ( Divinity of Labour ) प्राप्त झाले.

कायक तत्त्व आणि 'दासोह' तत्त्व यांचा 'अविनाभाव' संबंध आहे. दासोह म्हणजे आपल्या संपादनांतील प्राप्तीचा समाजकार्यासाठी व लोकासाठी विनियोग करणे, हे होय. 'जंगमदासोह'- गरजेपेक्षा अधिक संग्रही बाळगणे, हे कायक सिद्धांताशी विसंगत आहे. बसवयुगांतील या शिवशरणांनी प्रामुख्याने कायक तत्त्वाचे पालन काटेकोरपणे केलेले आहे.

## गणाचार

बसवधर्माच्या आचारसंहितेत पंच-आचार हा एक भाग आहे. त्यांच्या मते आचार म्हणजे केवळ काही व्रतनेमांचे पालन नव्हे, अथवा धार्मिक विधीचे सांप्रदायिक अनुकरणही नव्हे. परंतु त्यांत नैतिक निष्ठा व धार्मिक साधना या दोन्हीं गोष्टी अंतर्भूत आहेत. आचार हा विचाराबरोबर समन्वित असला पाहिजे. क्रिया हेच ज्ञान, ज्ञान हीच क्रिया. ज्ञान म्हणजे जाणीव. क्रिया म्हणजे त्या जाणीवेनुसार आचरण. पंचाचारामध्ये लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार व भृत्याचार असे पाच आचार सांगितलेले आहेत. शरणांनी मरणास 'महानवमी' असे संबोधलेले आहे. भय, भीति व भ्याडपणा यास जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रांत कोणत्याही स्तरावर नि कोठल्याही प्रसंगी शरण मुळीच थारा देत नाहीत. ते निर्भय अहित. ते न्यायनिष्ठुर व 'लोकविरोधी' असून कोणापुढेही मान तुकविणार नाहीत. सत्य आणि न्यायाच्या प्रतिपालनासाठी व समाजाचे समष्टि-हित साधण्यासाठी निर्भय मनोवृत्तीची जी शिकवण शरणांनी दिली आहे, तोच गणाचार होय. जो आचारयुक्त आहे तो भक्त, जो अनाचारी आहे तो 'भवि' अशी शरणांची धारणा आहे.

समस्त मानवजातीच्या हितासाठी व मानवी मूल्याच्या जोपासनेसाठी अधिकार, दौर्जन्य आणि क्रौर्य या राक्षसी प्रवृत्तीबरोबर मुकाबला करणे हागणाचाराचा भाग आहे. काही प्रसंगी अहिंसापालन निष्क्रीयतेचे व भ्याडपणाचे द्योतक ठरण्याचा संभव असतो. हिंसा किंवा भ्याडपणा यापैकी एखादा पर्याय निवडण्याचा प्रसंग आल्यास गणाचारी, खड्ग घेऊन दुष्ट शक्तीच्या संहारासाठी प्राणार्पण करतात, आत्म-बलिदानही देतात.

अन्याय, असत्य व अनाचार यांचेशी कधीही तडजोड नाही. हे आक्रमणाकरिता नसून तत्त्वप्रतिपालनाकरिता आहे.

या तत्त्वाची मूळ प्रतिपादिका अक्कनागम्मा या होत.

अनुक्रमणिका

# व्यक्ति नाम व स्थळ नाम

‘शून्य संपादन’ या ग्रंथात येणारे शिवशरण व शिवशरणी यांची नावे तसेच या ग्रंथांत उल्लेखलेल्या गाव, प्रदेश व स्थळ इत्यादींची नावे, वचन क्रमांकात खाली देण्यात आले आहे.

| नाम | भाग | वचनसंख्या |
|---|---|---|
| परमेश्वर | १ | प्रारंभिक गद्य |
| बसव चन्नबसवराज | ,, | ,, |
| अनिमिष गुहेश्वर | ,, | ,, |
| अल्लमप्रभुदेव | ,, | ,, |
| बसवेश्वर | ,, | ,, |
| चन्नबसवेश्वर | ,, | ,, |
| शिवगणप्रसादि महादेव | ,, | ,, |
| कैलास निर्माय | ,, | ,, |
| पार्वतीदेवी हैमवती | ,, | ,, |
| ‘कामलता’ | ,, | ,, |
| रुद्रकन्या | ,, | ,, |
| निर्माय गणेश्वर | ,, | ,, |
| बनवासी | ,, | ,, |
| नागवासाधिपति | ,, | ,, |
| सुज्ञानीदेवी | ,, | ,, |
| पुष्पवाटिका | ,, | ,, |
| अल्लमप्रभु | ,, | ,, |
| निर्भय गणेश्वर | ,, | ४ |
| अक्षय गणेश्वर | ,, | ,, |
| ॐकार गणेश्वर | १ | ४ |
| निर्माय गणेश्वर | ,, | ,, |
| ब्रह्म | ,, | ५ |
| विष्णू | ,, | ,, |
| रुद्रगण-बिजळ राजा | ,, | ,, |
| प्रथमगण | ,, | ,, |
| पंचवदन | ,, | ,, |
| दशभुज | ,, | ५, १७, १९ |
| अल्लमप्रभु | ,, | ६ |
| गणेश्वर | ,, | ,, |
| जंबुद्वीप | ,, | १६ |
| रुद्र | ,, | १७ |
| राक्षसी | ,, | १८ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| अंगाराच्या गिरी | ,, | २३ |
| त्रिपुर | ,, | ३१ |
| अजगण्णा | २ | गद्य |
| मुक्तायक्का | ,, | ,, |
| सिद्धरामदेव | ,, | ,, |
| सोन्नलगीपुर ( सोलापुर ) | ३ | ,, |
| मयूरबाण | ,, | १६२ |
| हलायुध | ,, | ,, |
| अल्लय्या | ,, | १२६ |
| इंद्र | ,, | १३१ |
| चंद्र | ,, | ,, |
| माहेश्वर | ,, | १३८ |
| सदाशिव | ३ | १३८ |
| कल्याण ( आजचे बसवकल्याण ) | ४ | २७१, २७२ |
| नागांबिका | ,, | गद्य |
| कप्पडि संगमदेव | ,, | ,, |
| इंगळेश्वर | ,, | ,, |
| बागेवाडी | ,, | ,, |
| मादिराज | ,, | ,, |
| मादलंबिका | ,, | ,, |
| कल्याण | ५ | २७१, २७२ |
| रुद्रलोक | ,, | ,, |
| नागलोक | ,, | ,, |
| त्रिपुरांत | ,, | गद्य |
| बिज्जळराजा | ,, | ,, |
| सिद्धरामदेव | ६ | ,, |
| महामने ( महाभवन ) | ,, | ,, |
| कल्याण | ,, | २८१ |
| श्रीयाळ | ,, | ,, |
| दासीमय्या | ,, | ,, |
| सिंधुबल्लाळ | ,, | ,, |
| गंगेवाळुक | ,, | ,, |
| सालोक्य | ,, | ,, |
| सामिप्य | ,, | ,, |
| सारूप्य | ,, | ,, |
| सायुज्य | ,, | ,, |
| कल्याण | ७ | ,, |


अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| हडपद अपण्णा ( न्हावी अपण्णा ) | ७ | २८२ |
| प्रभुदेव | ,, | गद्य |
| सिद्धरामदेव | ,, | ,, |
| बसवदेव | ,, | ,, |
| सोडळ बाचरस | ,, | २९९, ३०० |
| किन्नरबम्मय्या | ,, | ३२८, ३२९ |
| मडिवाळमाचिदेव ( धोबी माचय्या ) ( कलिदेवरदेव ) | ,, | ३६२ |
| मरुळशंकरदेव | ८ | ३७२ |
| प्रभुदेव | ९ | गद्य |
| बसवराजदेव | ,, | ,, |
| चन्नबसवदेव | ,, | ,, |
| सिद्धरामदेव | ,, | ,, |
| सकल शिवगण | ,, | ,, |
| मडिवाळ माचिदेव | ,, | ,, |
| सोडळ बाचरस | ,, | ,, |
| मरुळशंकरदेव | ,, | ,, |
| प्रभुदेव बसवदेव | १० | ,, |
| बसवदेव आणि प्रभुदेव | ,, | ,, |
| चन्नबसवदेव | ,, | ,, |
| अनिमिष | ,, | ४८७ |
| चन्नबसवदेव | १२ | ५५३ |
| प्रभुदेव | ,, | ,, |
| गंगागौरी | १२ | ५५३ |
| गंगेवाळुक | ,, | ,, |
| मडिवाळमाचिदेव | ,, | ,, |
| सिद्धरामदेव | १३ | ५५४, ५५६ |
| चन्नबसवदेव | ,, | ५५७ |
| प्रभुदेव | ,, | ५५९ |
| बसवेश्वर | ,, | ५६७, ५७२ |
| मडिवाळमाचिदेव | ,, | ५७३ |
| प्रभुदेव | १४ | गद्य |
| बसवदेव | ,, | ,, |
| चन्नबसवदेव | ,, | ,, |
| मडिवाळमाचिदेव | ,, | ,, |
| सिद्धरामदेव | ,, | ,, |
| सोडळ बाचरस | ,, | ,, |

| | | |
|---|---|---|
| पडिहारी उत्तण्णा | ,, | ,, |
| अक्का नागलांबिका | ,, | ,, |
| मेळिगे मारय्या | ,, | ,, |
| ढोहर कक्कय्या | ,, | ,, |
| किन्नरी बम्मय्या | ,, | ,, |
| कन्नद मारण्णा | ,, | ,, |
| मिंड मलिनाथ | ,, | ,, |
| कोल शांतय्या | ,, | ,, |
| वोलगद केशिराजदेव | ,, | ,, |
| खंडनेय केशिराज | ,, | ,, |
| महादेवी अक्का | ,, | ,, |
| किन्नरी बोमिदेवा | १४ | गद्य |
| प्रभुदेव | १५ | ६१४, ६१६ |
| सिद्धरामदेव | ,, | ६१५ |
| बसवदेव | ,, | ६१७ ते ६२० |
| चन्नबसवण्णा | ,, | ६२१ |
| बसवण्णा | ,, | ,, |
| धोबी माचय्या | ,, | ६२२ |
| अल्लमप्रभु | १६ | ६२३ ते ६३६ |
| पोन्नांबलनाथ | ,, | गद्य |
| रामेश्वर | ,, | ,, |
| रामनाथ | ,, | ,, |
| महाबळेश्वर | ,, | ,, |
| सौराष्ट्र | ,, | ,, |
| गंगाबुकण | ,, | ,, |
| केदार | ,, | ,, |
| सव्वालक्ष पर्वत | ,, | ,, |
| जंबुद्वीप कन्या | ,, | ६२९ |
| प्रभुदेव | १७ | गद्य |
| हडपद अप्पण्णा | ,, | ६३७ ते ६३९, ६७३ |
| कल्याण | १७ | गद्य |
| बसवेश्वर | ,, | ६४०, ६४५ |
| चन्नबसवदेव | ,, | ६४६ |
| माडिवाळमाचिदेव | ,, | ६४७, ६६९ |
| मोळिगी मारीदेव | ,, | ६५० |
| सोडळ बाचरस | ,, | ६५१, ६७४ |
| प्रभुदेव | १८ | ६८३,६८४ |
| मडिवाळमाचिदेव | १८ | ६८२ |
| सोडळ बाचरस | ,, | ६८७ |

| | | |
|---|---|---|
| बसवदेव | ,, | ६८८ |
| प्रभुदेवाच्या भोजनाचे पात्र विवरण | १९ | ७१७,७६० |
| ढोहार कक्कय्या | २० | ८४१,८४२ |
| मोळिगी मारीदेव | ,, | ८४३, ८४४ |
| एकांत रामीदेवा | ,, | ८४५, ८४६ |
| शंकर दासीमय्या | ,, | ८४७,८४८ |
| मेदार केतय्या | ,, | ८४९, ८५० |
| गट्टिवाळ मुद्दण्णा | ,, | ८५१, ८५२ |
| सद्योजात ( वामदेव ) तत्यपुरुष | ,, | ८०२, ८०७ |
| नंब्यिण्णा | ,, | ,, |
| प्रभुदेव | २१ | गद्य |
| बसवराजदेव | ,, | ,, |
| मडिवाळमाचिदेव | ,, | ,, |
| समस्त असंख्याताना ( शरणाना ) | ,, | ,, |
| अनिमिष | ,, | ८६९ |
| अनिमिष | २१ | ८७१, ८७४ |
| मडिवाळमाचिदेव | ,, | ९००, ९०४ |
| हडपद अप्पण्णा | ,, | ९०५, ९०७ |
| सोडळ बाचरस | ,, | ९०८, ९१० |
| अक्का नागलंबिका | ,, | ९११, ९१२ |
| मोळगी मारय्या | ,, | ९१३, ९१४ |
| ढोहार कक्कय्या | ,, | ९१५, ९१६ |
| प्रभुदेव | ,, | ९१७, ९२२ |
| ब्रह्म, विष्णु, रुद्र, ईश्वर | २२ | ९३४ |
| सदाशिव पंचमुख दशभुज | ,, | ,, |
| त्रिनेत्र नंदीवाहन | ,, | ,, |
| गंगाधर गौरीपती कैलास | ,, | ,, |
| श्रीगिरी उळवी | ,, | ९२३, ९२८ |
| महामने | ,, | ९२९ |
| गोरक्ष | ,, | -- |
| कदळीवन | ,, | -- |
| मडिवाळमाचिदेव सोडळ बाचरस | ,, | -- |
| कैलासजगदेव मल्लेबोम ( पैलवान बमण्णा ) | ,, | ९३१ |
| बिज्जळ कल्याण | ,, | ९३१, ९३६ |
| कल्याण बिज्जळ महाराज | ,, | ,, |

| | | |
|---|---|---|
| अक्का नागाई | ,, | ९४२ |
| कप्पडी संगमनाथदेव | ,, | ९५० |
| मिंड मल्लिनाथ | ,, | ९५० |
| मोगवाडद केशीराज | ,, | -- |
| कल्याण काळय्या चौडय्या | २२ | ९५०, ९५१ |
| कोल शांतय्या | ,, | ,, |
| पडिहारी उत्तण्णा | ,, | ,, |
| कन्नद मारण्णा | ,, | ,, |
| कलिकेत बमण्णा | ,, | ,, |
| नुलिय चंदय्या | ,, | ,, |
| हेंडद मारय्या | ,, | ,, |
| शंकर दासीमय्या | ,, | ,, |
| एकांत रामय्या | २२ | ९५०, ९५१ |
| मेदार केतय्या | ,, | ९५१ |
| काळय्या-चौडय्या | ,, | ,, |
| कोल शांतय्या | ,, | ,, |
| मडिवाळमाचिदेव | ,, | ,, |
| नागाई | ,, | ,, |
| संगनबसव | ,, | ,, |
| शिवगण प्रसादी महादेव | ,, | गद्य |
| हडपद अप्पण्णा आणि अक्का | ,, | ,, |
| नागम्मा इत्यादी शरण गण | ,, | ,, |
| मृत्युलोक शिवलोक | ,, | ,, |
| शिवगण प्रसादी महादेव | ,, | ,, |
| मृत्युलोक शिवलोक | ,, | ९५१ |
| काळय्या-चौडय्या | ,, | गद्य |
| कोल शांतय्या | ,, | ,, |
| शिवगण प्रसादी महादेव | ,, | ३९१ |

# वचनामध्ये संख्यात येणारे शब्द


| शब्द | पृष्ठ क्र. | वचनसंख्या |
|---|---|---|
| | **भाग १-पद १ ते ७७** | |
| एक घर | ८ | १७ |
| पंचवीस पोपट | ” | ” |
| एका राक्षसीणी | ९ | १८ |
| पाळण्यावरती पांच | ” | ” |
| सातशें सत्तर रहाट विहिरी | ” | २० |
| गळ्यांत सातशें सत्तर हत्ती | १० | ” |
| पंचशतकोटी विस्तीर्ण | ” | २१ |
| पांच प्रेते | ” | २२ |
| लाखाचा खांब | ” | २३ |
| एक हंस | ” | ” |
| पांच शिर | ११ | २६ |
| तिन्ही लोक | १२ | २९ |
| म्हणावे एक तर आहेत दोन | १६ | ३८ |
| मलत्रय | १८ | ४३ |
| अष्टविधार्चन | २३ | ६१ गद्य |
| षोडशोपचार | ” | ६१ |
| त्रिविध | २४ | ६२ |
| चौदा भुवनें | २५ | ६७ |
| डोकीवर डोके असे एक | २६ | ७० |
| षडांगाठायी षडस्थल | २७ | ७३ गद्य |
| | **भाग २-पद ७८ ते ११६** | |
| एकदां | ३६ | ९३ |
| अद्वैत | ४० | १०२ |
| | **भाग ३-पद ११७ ते २३९** | |
| द्वंद्वातीत | ४० | १०२ |
| दोन डोळे चतुर्भुज | ४६ | ११७ |
| तीन डोळे | ५४, ६०, ७६ | १३८ |
| शतकोटी सूर्य | ५४, ६०, ७६ | १३९ |
| | | १५७, २२४ |
| आठी दिशांना | ५५ | १४० गद्य |
| चतुर्दशभुवनांच्या | ५५, ५९ | १५५ |
| एकमुख अनंतमुख | ५५ | १४० गद्य |
| त्रिकरणरूपि | ७२ | १९० |
| चौऱ्याऐंशी लक्ष शिवालय | ७५ | १९९ |


अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| लक्षांवर शहाणऊ हजार लिंग | ” | २०० |
| अत्यतिष्ठ | ८० | २१७ |
| दशांगुल | ” | ” |
| **भाग ४- पद २४० ते २७०** | | |
| अनंत कोटी | ९१ | २४० |
| चतुर्थकाळी, पंचमकाळीं, षष्टमकाळीं | १०१ | २६१ |
| **भाग ५- पद २७१ ते २७५** | | |
| बारा योजन तीनशे पासष्ट | १०९ | २७२ |
| तीनशे पंचावन्न वज्र | ” | ” |
| दोनशे पंचवीस शिल्पकलेच्या महाद्वार | ” | ” |
| चारशे पंचवीस सोन्याचे दरवाजे | ” | ” |
| एकशें पंधरा चोरखिंड | ” | ” |
| एकशें पंधरा खिळ्यांचे दरवाजे | ” | ” |
| किल्ल्याची मोजणी अठ्ठेचाळीस योजन बाहत्तर | १०९ | २७२ |
| नियोगी यांची घरे एकलक्ष | ” | ” |
| मांडलिकांची घरे एकलक्ष | ” | ” |
| सावंतांची घरे एकलक्ष | ” | ” |
| द्वादश योजनेचे विस्तीर्ण सूर्यमार्ग एकशे सत्तर | ” | ” |
| सोममार्ग एकशेसाठ | ” | ” |
| त्या नगरीत एकलक्ष शहाण्णवु हजार शिवालये | ” | ” |
| तीनशे साठ पद्मपत्रांनी दोनलक्ष पंच्याऐंशी हजार | १०९ | २७२ |
| सातशे सत्तर दासोहाचे मठ | ११० | ” |
| सुवर्ण कलश सहस्त्र | ” | ” |
| बारा हजार क्रमनेमाचा मठ | ” | ” |
| बहाहत्तर हजार ‘महामने’ | ” | ” |
| दहा हजार नित्यनियम | ” | ” |
| पंधराहजारझऱ्याचेउदक वापरणाऱ्या व्रतस्थांचे मठ | ” | ” |
| पांच हजार, क्रमबद्ध नेम करणाऱ्यांचे मठ | ” | ” |
| बारा हजार अच्चप्रसादिंचे मठ | ११० १११ | ” |
| एक हजार रोज एक हजार जंगमांना भोजन घालणारे | १११ | ” |


अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| दासोहमठ बत्तीस हजार | ” | ” |
| रोज पांचशे जंगमांना बोलावून | १११ | २७२ |
| दासोह सत्यसदाचारींचे मठ | ” | ” |
| अठ्ठावन्न हजार एक हजार | ” | ” |
| एकशें जंगमांना दासोह | | |
| करणारे मठ अकराहजार | ” | ” |
| दररोज नियमितपणे क्रियाज्ञान | | |
| आचरणारे सद्भक्तांचे मठ | | |
| एक लक्ष | ” | ” |
| भक्तांचे मठ दोन हजार सातशे | ” | ” |
| सत्तर | | |
| अशा प्रकारे दोन लक्ष पंच्याऐंशी | | |
| हजार सातशें सत्तर मठ | ” | ” |
| असंख्यातांमध्ये प्रमुख्य असलेले | ” | ” |
| रुद्रलोकाहून आलेल्या प्रथम गणांचे | | |
| मठ सातशे सत्तर | ” | ” |
| अशा महाप्रमथांचा , पुरातनांचा, | ” | ” |
| असंख्यात महागणांचा प्रथम | ” | ” |
| नायक होवून | ” | ” |
| एकमुख, दशमुख, शतमुख, | ” | ” |
| सहस्त्रमुख | | |
| लक्षमुख, कोटीमुख, अनंतकोटीमुख | ” | ” |
| जगदाराध्य, प्रथनगुरु, बसवण्णा | ” | ” |
| सत्य सात्विक नित्यनिज्यैक्य | ” | ” |
| बसवण्णा षट्स्थल सर्वाचार | ” | ” |
| संपन्न | ” | ” |

**भाग ६-पद २७६ ते २७९**

| | | |
|---|---|---|
| कोट्यानुकोटी अडुसष्ट तीर्थ | ११५, ११६ | २७८ |
| अष्टविधार्चन | ११७ | २७९ गद्य |
| षोडशोपचार | ” | ” |
| त्रिकाल लिंगार्चन | ११८ | ” |
| कुलुपे नऊ द्वारास, दुसरे एक द्वार | ११९ | २८० |
| दहाजण परिचारक | ” | ” |
| एक स्त्री पाचताट | ” | ” |
| चतुर्विध | ” | २८१ |


**भाग ७-पद २८२ ते ३६९**

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| एकार्थ | १२२ | २८४ |
| तीनशें पीठ | १२४ | २८७ |
| अर्धवट जंगम | १२५ | २८९ |
| त्रिविध | १३४ | ३१४ |
| अनंतकोटी | १३५ | ३१६ |
| तीनशे साठ दिवस | १३७ | ३२२ |
| चतुर्दश भुवने | १४१ | ३३६ |
| अष्टतनु, अष्टमद, अष्टदल कमल | १५४, १५९ | ३६९, ३७६ पद्य |

**भाग ८-पद ३७० ते ३८७**

| | | |
|---|---|---|
| षड्वर्ण | १६२ | ३८३ |

**भाग ९-पद ३८८ ते ३९५**

| | | |
|---|---|---|
| नवरत्नखचित | १६५ | गद्य |
| षड्सम्यार्जन | ,, | ,, |
| पंच-महावाद्य | ,, | ,, |
| ‘एकमेव न द्वितिय ब्रह्म’ | १६९ | ३९३ |

**भाग १०- पद ३९६ ते ४३१**

| | | |
|---|---|---|
| चतुर्विध | १७७ | ४१३ |

**भाग ११-पद ४३२ ते ५०५**

| | | |
|---|---|---|
| कोट्यानुकोटी युगे | २१५ | ५०५ |
| चौदा लोक | ,, | ,, |
| अनंतकोटि ब्रह्मांड | ,, | ,, |
| पंचाचार | २१६ | ,, |
| षड्स्थल | ,, | ,, |

**भाग १२-पद ५०६ ते ५५३**

| | | |
|---|---|---|
| त्रिविधा | २२० | ५१२ |
| अष्टतनु | २२७ | ५३६ |
| मलत्रय | २३० | ५४१ |
| आठ हजार वर्षे | २३४ | ५५२ |
| चतुर्मुख, पंचमुख, | २३५ | ५५३, ५७१ |
| दशमुख | ,, | ,, |

**भाग १३-पद ५५४ ते ५८१**

| | | |
|---|---|---|
| अंगत्रय लिंगत्रय | २३७ | ५५५ |
| त्रिकरण | २४३ | ५७३ |
| बहिणी पांचजणी | २४५ | ५८१ |
| एका धन्याच्या राणी | ,, | ,, |

**भाग १४-पद ५८२ ते ६१३**

| | | |
|---|---|---|
| त्रिकूट | २५७ | ६११ |
| साहीचे झाले तीन | २५८ | ६१२ |
| तीनीचे झाले दोन | ” | ” |
| दोनीचे होऊनी एक झाले | ” | ” |

**भाग १५-पद ६१४ ते ६२२**

| | | |
|---|---|---|
| एकेक रात्र | २६१ | ६२० |
| एकेक दिवस | ” | ” |

**भाग १६-पद ६२३ ते ६३६**

| | | |
|---|---|---|
| ‘सव्वालक्ष’ पर्वत | २६४ | ६२५ गद्य |
| कोटी कळस | २६५ | ६२६ |
| चौदा भुवने | ” | ६२८ |

**भाग १७-पद ६३७ ते ६४८**

| | | |
|---|---|---|
| पचेंद्रियाची करुनी पौळी | २६९ | ६३७ |
| अंतःकरण | ” | ६३८ |
| अष्टद्वार दुकानें | २७० | ६३९ |
| अत्यतिष्ठ दशांगुल | २७६ | ६५९ |
| ‘चतुर्युग सहस्त्राणी’ | ” | ” |
| त्रिविधगति | २७९ | ६६५ |
| एक होता हत्ती | २८१ | ६७२ |
| षड्रिपु | २८२ | ६७४ |

**भाग १८-पद ६४९ ते ७१६**

| | | |
|---|---|---|
| एक लक्ष शहाण्णव हजार जंगम | २८६ | प्रारंभिक गद्य |
| सहावेळा जनन | २९२ | ७०२ |
| चौऱ्याऐंशी लक्ष योनि | २९८ | ७१६ |
| आराधना | ” | ” |

**भाग १९-पद ७१७ ते ७६०**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी साठ लाख खंडी | ३०४ | ७३० |
| साळी धान्य तीस लाख खंडी | ” | ” |
| गहू बारा लाख खंडी | ” | ” |
| हरबरा बत्तीस लाख खंडी | ” | ” |
| मूग तीस लाख खंडी | ” | ” |
| राळे, उन्हळी भात पीक, बरगें, भगर | ” | ” |
| मोहऱ्या, बरगें, भगर इत्यादी धान्य | ” | ” |
| पांच लाख | ” | ” |


अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| नव्या मुगाचे खाद्य बारा खंडी | ,, | ७३२ |
| पोळ्या अठरा खंडी | ,, | ,, |
| अकाली आंबे चोवीस लाख | ,, | ,, |
| केळी तेहत्तीस लाख खंडी | ,, | ,, |
| चारोळी चौऱ्याऐंशी खंडी | ३०५ | ,, |
| गोड साखर | ,, | ,, |
| घट्ट तूप | ,, | ,, |
| फणस साय अठरा खंडी | ,, | ,, |
| पंचशत कोटी भूमंडल | ३०७ | ७३७ |
| नवखंड पृथ्वि | ,, | ,, |
| दडली एका भुवनात | ,, | ,, |
| चौदा भुवनें अंतर्भूत | ,, | ,, |
| षडाधार चक्ररुपि | ३०९ | ७४४ |
| एक रत्न | ३१४ | ७५९ |

**भाग २०-पद ७६१ ते ८५२**

| | | |
|---|---|---|
| पंचामृतास | ३२२ | ७७८ |
| लक्षावर शहाणऊ हजार | ३२२ | ७७८ |
| पंचशक्ति | ३२७ | ७९२ |
| पंचप्रधान | ,, | ,, |
| चौदा भुवनें | ३२८ | ,, |
| त्रिपुर | ३२९ | ७९६ |
| मोजुनी एकशे आठ | ,, | ,, |
| एक हजार एकशे अठ्ठयाऐंशी | ,, | ,, |
| रासीचे परिस | ,, | ,, |
| एक नीळमणी | ,, | ७९७ |
| अरिषड्वर्ग | ३३५ | ८१५ |
| पंचभूत | ,, | ,, |
| पंचेंद्रियांचे गुण | ,, | ,, |
| पंचविंशति | ,, | ,, |
| पंचवर्णाश्रम | ३४२ | ८३१ |
| अष्टतनु | ,, | ८३२ |
| अष्टयोग | ३५० | ८५२ |
| नऊ योग, सहायोग | ,, | ,, |
| साहीवनितांशी पति | ,, | ,, |

**भाग २१-पद ८५३ ते ९२२**

| | | |
|---|---|---|
| सातशे सत्तर अमरगण | ३५१ | ८५३ |
| तीन लोकाच्या खांबाच्या | ,, | ८६२ |
| सुळकात आहे एक देऊळ | ,, | ,, |

| | | |
|---|---|---|
| भानुकोटी | ३७२ | ९१७ |

**भाग २२-पद ९२३ ते ९५१**

| | | |
|---|---|---|
| तापत्रय, | ३७७ | ९२५ |
| तीनशे छत्तीस हजार; जंगम | ३८१ | गद्य |
| एक लक्ष शहाण्णव हजार | ३८२ | ९३६ |
| गायिलो मी गीत | ,, | ,, |
| तीनशे साठ मरण पावलेल्या प्राण्यास | ,, | ,, |
| जीवदान छत्तीस अपवाद जिंकिलात | ,, | ,, |
| अठ्ठयाऐंशी दैवी चमत्कार घडविलात | ,, | ,, |
| हरी ब्रह्मादि तेहतीस कोटी देवता | ३८३ | ९३८ |
| त्रिशूल एक पीठाचे सिंहासन | ,, | ,, |
| एक आंब्याचे झाड | ,, | ,, |
| दोन शाखा, सहा पानें छत्तीस पुष्प, एक फळ | ३८४ | ९३९ |
| चतुर्विध पदवी | ३९० | ९५१ गद्य |

# 'शून्य संपादन' या संवादरूपी विवेचनांत येणाऱ्या शरण-शरणीवर काही टिप्पणी

'शून्य संपादन' या ग्रंथात आध्यात्मिक विषयावरील संवादरूपी तात्त्विक विवेचन घडून आले आहे. या विवेचनांत अल्लमप्रभू-बसवेश्वरादि प्रमुख चौदा शिवशरण व तीन शिवशरणी यांचा समावेश आहे. यात समाविष्ट झालेल्या एकूण ९५१ वचनांपैकी केवळ श्री. अल्लमप्रभूदेवांचीच ३५० च्या वर वचने आहेत. त्याखालोखाल श्री. बसवेश्वर, श्री. चन्नबसवेश्वर व श्री. सिद्धरामेश्वर यांच्या वचनांचा समावेश या ग्रंथात झालेला आहे. केवळ या चार प्रमुख शरणांचीच वचनसंख्या सुमारे ७४० च्या आसपास आहे. तेव्हा संबंधित शरण-शरणींची माहिती थोडक्यात खाली देण्यात येत आहे.

## १. महात्मा बसवेश्वर

इ. सनाच्या बाराव्या शतकात तत्कालीन समाजाची ( विशेषतः हिंदूंचीच ) विचारधारा व जीवनक्रम तेजोहीन व शिथिल बनला होता. उत्तरेकडे सतत होणाऱ्या परकीय आक्रमणाचे भय व वर्णाश्रमधर्मातील मूलभूत दोषामुळे सर्वत्र वाढलेली फुटीरता, अशा पार्श्वभूमीवर हिंदू समाज एकसंघ व एकजिनसी बनविण्याची नितांत आवश्यकता होती. याकरिता नव्या विचारप्रणालीची व आचारसंहितेची गरज होती. हे महान् कार्य म. बसवेश्वरांनी 'वीरशैव' या लिंगायतधर्माची ( बसवधर्माची ) स्थापना करून साधले. त्यांना बसवधर्माचे किंवा लिंगायतधर्माचे प्रवादी असेही म्हणतात. त्यांनी कायक, दासोह, सदाचार, सत्य, अहिंसा, अस्पृश्यता-निवारण, जाति-निर्मूलन, साक्षरता, स्त्री-शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य, गणाचार व समता या मूलभूत सामाजिक मूल्यांवर भर दिला. गांधीयुगापूर्वीही सुमारे ८५० वर्षे, म. बसवेश्वरांनी आरंभिलेल्या या सामाजिक क्रांतीने त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो व मति कुंठित होते. इष्टलिंगाची कल्पना व शिवयोग अथवा सहजयोग या संकल्पनांची महान् देणगी त्यांनी भारतीय अध्यात्मशास्त्राला दिली आहे. 'चाले , तैसा बोले', हे बसवधर्माचे ब्रीदवाक्य बनले.

उत्तर भारतातील नर्मदेपासून दक्षिणेकडील द्रवीड देशाच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत पसरलेल्या चालुक्य साम्राज्याचा कलचूर- बिज्जल हा वारस बनला. त्याची राजधानी कल्याण म्हणजे आजचे 'बसव-कल्याण' हे होते. अशा या महान् साम्राज्याचे बसवेश्वर पंतप्रधान झाले व सर-सेनापती ( महादण्डनायक ) ही पदवीही त्यांना मिळाली. पंतप्रधानासारख्या अधिकारपदावर असूनही त्यांची विनयशीलता या ग्रंथातील वचन-संदर्भावरून सहज लक्षात येण्याजोगी आहे. त्यांच्यातील, शौर्य धैर्य, विनय व औदार्य या गुणसंपन्नतेमुळे भारतातील सर्व ठिकाणचा व सर्व स्तरावरील जन-समुदाय आकर्षित झाला. विजापूर जिल्ह्यातील 'बागेवाडी' या गावी एका शैव कुटुंबात त्यांचा जन्म झाला. जातवेदमुनींच्या कूडलसंगम येथील आश्रमात त्यांचे अध्ययन झाले. वेद-उपनिषद, शास्त्र, पुराण व भारतीय तत्त्वज्ञानांत ते पारंगत झाले. गाढे विद्वान व संस्कृतज्ञ असूनही जनसामान्यांना समजण्यासाठी तत्कालीन मायबोली 'कन्नड' या भाषेतून हजारो वचने लिहून आपल्या विचारांचे प्रतिपादन केले.

भारतातील विविध ठिकाणांहून सर्व स्तरांतील व सर्व जाती-जमातींचे साधु-संत, तत्त्ववेत्ते व सामाजिक अग्रणी कल्याण ( आताचे बसवकल्याण- जि. बिदर-कर्नाटक राज्य ) येथे एकत्र जमले. त्यांच्यात तत्त्वज्ञानावर मुक्त चर्चा व परस्पर विचारांचे आदान-प्रदान चाले. तथापि अनुभव-मंटपातील कार्यसत्रांत भाग घेणाऱ्या प्रत्येकावर एक नियम कटाक्षाने पाळण्याचे बंधन असे. तो नियम म्हणजे प्रत्येकाने आपल्या अनुकूलतेप्रमाणे काहीतरी उद्योगव्यवसाय करावा व स्वतःचा उदरनिर्वाह चालवावा. दुसऱ्यावर

अनुक्रमणिका

बोजा बनून राहू नये. यालाच सत्य-शुद्ध-कायक असे म्हणतात. काश्मीरचा राजा महादेव भूपाळ यासारख्या मोठ्या व्यक्तीलासुद्धा हा नियम पाळावा लागे. तो जंगलांतील लाकडे तोडून ती विकून आपला चरितार्थ चालवी व अनुभव-मंटपातील कार्यांत भाग घेई. याप्रमाणे आपल्या कायकांत निमग्न राहून कार्य करणारे तत्कालीन इतर प्रमुख शिवशरण म्हणजे धोबी माचय्या, न्हावी अप्पण्णा, ढोर कक्कय्या, चांभार हरळय्या व वैद्य संगण्णा इ. होत. कायकाचेदुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे गरजेपेक्षा अधिक संग्रह न करणे. या नियमांचे काटेकोर पालन करणाऱ्यासच अनुभव-मंटपांत प्रवेश मिळे व अनुभव-मंटपांतील कार्यसत्रांत सहभागी होण्यास परवानगी दिली जाई. येथे चालणाऱ्या चर्चा-सत्रांत ज्ञान व क्रिया यांचा समन्वय असे अर्थात् हे अनुभावगम्य होय. म्हणून या स्थानास 'अनुभव-मंटप' ( Academy of Mystics ) हे नामाभिधान प्राप्त झाले.

'कर्नाटकांतील परमार्थ-मार्ग ( Pathway to God in Karnataka ) या आपल्या ग्रंथात आधुनिक संत व महान् तत्त्ववेत्ते निंबाळचे डॉ. रा. द. रानडे ( गुरुदेव रानडे ) लिहितात, "कर्नाटकांतील पारमार्थिक तत्त्वज्ञान हे जगातील पारमार्थिक तत्त्वज्ञानांत अत्यंत उच्चश्रेणीचे असे आहे".

येथे चालणाऱ्या चर्चा-सत्रांत व कार्य-सत्रांत महिलांचाही सहभाग असे. प्रस्तुत ग्रंथात ज्या शिवशरणींचा उल्लेख आहे त्यांत प्रमुख म्हणजे अक्कनागम्मा या होत. या म. बसवेश्वरांच्या वडील भगिनी व चन्नबसवेश्वरांच्या मातोश्री होत.

बसव-कल्याण येथे जेव्हा आंतरजातीय विवाहावरून रणकंदन माजले, तेव्हा म. बसवेश्वरांनी आपल्या पदाचा त्याग केला व आपल्या तत्त्वपालनार्थ हे स्थान सोडून तेथून निर्गमन केले. यानंतरच्या अवघ्या तीन एक महिन्यांतच ते लिंगैक्य पावले.

## २. प्रभुदेव

प्रो. रा. द. रानडे यांनी प्रभुदेवांच्या तत्त्वज्ञानाचा व 'शून्य संपादन' या ग्रंथाचा सखोल असा अभ्यास केला आहे. त्यांनी या संवादरूपी चर्चेची तुलना 'PLATO'S DISCOURSE' बरोबर केली आहे व प्रभुदेवांना " SOCRATES-सॉक्रेटीस" असे संबोधिले आहे. प्रभुदेवांचा जन्म शिमोगा जिल्ह्यातील 'बळ्ळेगावी' या खेड्यात झाला. या ठिकाणी 'व्हय्य-सळ' वकदंब इ. साम्राज्यकालीन अनेक व विविध अशा सुंदर शिल्पाकृती आजही दृष्टीस पडतात. प्रभुदेवांच्या वाद्य-संगीतांतील नैपुण्याबद्दलचा उल्लेख कन्नड साहित्यांत ठिकठिकाणी आढळतो. समकालीन विद्वानांमध्ये त्यांचे नाव अग्रेसर होते. भारतातील अनेक ठिकाणी त्यांचा संचार झाला होता. ते जसे ज्ञानसंपन्न होते; तसेच वैराग्यनिधीही होते. अगदी तरुण वयातच त्यांना वैराग्य प्राप्त झाल्याचा उल्लेख आढळतो. त्यांनी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारतातील अनेक ऋषी-मुनी, योगी, द्रष्टे, दार्शनिक व तत्त्ववेत्ते यांचे दर्शन व गाठीभेटी घेतल्या. त्याकाळी प्रचलित असलेल्या योग, योगांग, योगदृष्टी इत्यादींची अनुभूती त्यांना झाली होती. ते 'व्योमकाय' बनले होते. तथापि त्यांचे खरे समाधान कल्याणच्या अनुभव-मंटपातील तत्त्वज्ञानांत व अनुभावांतच झाले व ते परिपूर्णतया धन्य पावले. म. बसवेश्वरांनी प्रभुदेवांची योग्यता व थोरवी अचूकपणे हेरली व त्यांना अनुभव-मंटपाचे अध्यक्षस्थान बहाल केले. प्रभुदेवांच्या वचनांचे परिशीलन केल्यास त्यांच्या ज्ञानाची घनता व विद्वत्तेची चुणूक दिसून येते.

अनुक्रमणिका

परमार्थ-मार्गावर असणाऱ्या साधकांना येणाऱ्या शंका व अडचणींचे निवारण त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत व शैलीत करून दाखविले आहे. 'शून्य संपादन' या ग्रंथातील प्रमुख पात्र प्रभुदेवांचेच आहे. या कारणामुळे या ग्रंथाच्या काही आवृत्त्यांच्या संपादकांनी यास 'प्रभुदेवांचे शून्य संपादन' असे नाव दिले असावे. कल्याणमध्ये प्रभुदेवांनी काही काळ वास्तव्य केले; व बसवेश्वर आणि चन्नबसवेश्वर आदि शरणप्रमुखांच्या सहकाराने वीरशैव सिद्धांताचे संकलन करून षट्स्थल-सिद्धांतास विशेष असे रूप दिले. प्रभुदेवांना अल्लमप्रभुदेव असेही म्हणतात.

## ३. चन्नबसवेश्वर

हे बसवेश्वरांचे भाचे होत. त्यांच्या पित्याचे नाव शिवदेव असे होते. अगदी बालवयातच त्यांना महाज्ञान प्राप्त झाले होते. षट्-स्थल सिद्धांताचे चक्रवर्तीअसेही त्यांना संबोधिले जाते. वचन-साहित्याला षट्स्थल-सिद्धांताच्या चौकटीत बसविण्याचे महान् कार्य त्यांनी केले आहे. अल्लमप्रभूनंतर अनुभव-मंटपाचे अध्यक्षपद श्री. चन्नबसवेश्वरांनी भूषविले आहे. 'शून्य संपादन' या ग्रंथाच्या काही आवृत्त्यांत/प्रतींत श्री. सिद्धरामेश्वरांना श्री. चन्नबसवेश्वरांकडून लिंगदीक्षा मिळाल्याचा उल्लेख आहे. हा कथा-संदर्भ फारच मनोज्ञ, वैशिष्ट्यपूर्ण व गूढ तत्त्वज्ञानात्मक विश्लेषणाने भरलेला आहे.

आंतरजातीय विवाहाचे कारणावरून कल्याणांत घडलेल्या हलकल्लोळाच्या समयी त्यांनी गणाचाराची घोषणा देऊन आपल्या मातुश्री अक्कनागम्माबरोबर उळवीकडे प्रयाण केले व वचनसाहित्याचे अत्यंत काळजीपूर्वक जतन केले. कन्नड भाषेत त्यांनी हजारोंच्या संख्येने वचननिर्मिती केली. नंतर निर्बयलु पावले.

## ४. शिवयोगी श्री. सिद्धरामेश्वर

बाराव्या शतकात आजच्या सोलापूर या शहरास 'सोन्नलगी' असे नाव होते. त्याकाळी ते एक छोटेसे गाव होते. सुग्गलदेवी व मुद्दुगौडा या दांपत्याचे ते एकुलते एक पुत्र होते. सिद्धरामेश्वरांच्या जन्मापूर्वीच गुरुरेवणसिद्धेश्वर यांनी या दांपत्याच्या पोटी अवतारी पुरुषाचा जन्म होणार असल्याचे भाकित केल्याचा उल्लेख पुराणकथामधून आढळतो. या पुराणांनुसार वयाच्या आठव्या वर्षीच देवाचा शोध करीत श्री. सिद्धरामेश्वर श्रीशैल-श्रेत्रास ( आंध्रप्रदेश ) गेले. तेथील काननांत त्यांना श्रीशैल-मल्लिकार्जुनांचे दर्शन घडले. त्यांच्या आज्ञेनुसार ते सोलापूरला परत आले व गावाबाहेर आश्रय वसवून तेथे आपल्या योगसाधनेत व्यग्र झाले. त्यांना अनेक अणिमादि सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. आपल्या अष्टांग योगबलाने त्यांना त्रिनेत्र दृष्टीही प्राप्त झाली होती. योगि-कुल-चक्रवर्ती असेही त्यांना संबोधतात.

श्री. सिद्धरामेश्वरांनी सोलापुरात ६८ लिंगांची स्थापना केली. मठ-मंदिरे बांधली व आपल्या शिष्यगणांच्या साहाय्याने मोठा तलाव खोदण्याचे कामास सुरुवात केली. अशी अनेक लोकोपयोगी कामे करीत असता, त्या बाजूलाश्री. अल्लम-प्रभूदेवांचे आगमन झाले. त्यांना श्री. सिद्धरामेश्वरांबद्दल नितांत आदर व आपुलकी होती. असा थोर योगी कर्मकांडांत अडकून पडल्याचे पाहून त्यांचे ठायी सिद्धरामेश्वराबद्दल अनुकंपा निर्माण झाली.

श्री. प्रभूदेवांनी श्री. सिद्धेश्वरांच्या शिष्यांना बोलावून घेऊन, "तो कर्मयोगी सिद्धेश्वर कोठे आहे ?" अशी पृच्छा केली. काहीशा अनुदार अशा या उद्‌गारामुळे संतप्त झालेला सिद्धरामेश्वरांचा शिष्यगण प्रभूदेवांच्या अंगावर दगड-धोंड्यांचा वर्षाव करू लागला. त्यांचा तो प्रयत्न व्योमकायी प्रभूदेवांनी निष्फळ ठरविला. यावर तेथे श्री. सिद्धरामेश्वर प्रगट होऊन त्यांनी प्रभूदेवांना जाळून भस्म करण्याकरिता आपला तिसरा डोळा उघडला. त्यांतून अग्निज्वालांचा वर्षाव ते प्रभूदेवावर करू लागले. तथापि त्या ज्वाला प्रभूदेवांनी आपल्या तळपायांतील नेत्रांमध्ये आकर्षून व साठवून घेतल्या व श्री. सिद्धरामेश्वरांना निष्प्रभ करून टाकले. हा प्रकार पाहून सर्वांना आश्चर्य वाटले व सबब श्री. सिद्धरामेश्वरांनी प्रभूदेवांच्या चरणी धाव घेतली व शरणागती पत्कारली.

प्रभुदेवांनी त्यांना शिवयोगाची महति विशद केली. सर्व-शून्य-समाधीचे माहात्म्य व करस्थललिंगाचे म्हणजेच इष्टलिंगाचे महत्त्व त्यांना पटवून दिले. श्री. सिद्धरामेश्वरांनी त्यांच्याकडे, "इष्टलिंग धरून निजलिंगैक्य पावण्याचा मार्ग दाखवा" असे म्हणून, हट्ट धरला. तेव्हां "या इष्टलिंगाच्या 'सूक्ष्म-दर्शनाचा बोध अनुभव-मंटपांत चन्नबसवेश्वराकडून करवून देतो" असें सांगून ते श्री. सिद्धरामेश्वरांना कल्याणकडे घेऊन जातात. हा कथासंदर्भ या ग्रंथातील तृतीयोपदेशांत ( म्हणजे भाग ३ मध्ये ) येतो.

कल्याण मुक्कामी श्री. सिद्धरामेश्वरांना लिंगदीक्षा मिळाली व त्यांनी कन्नड भाषेत अमोलिक अशी वचने हजारोंच्या संख्येनी लिहिली. आपल्या एका वचनात त्यांनी उल्लेख केला आहे की, "अडुसष्ट हजार वचने गाऊन मी थकलो । इ."-यावरून त्यांनी लिहिलेल्या वचन संख्यांची कल्पना येते.त्यांनी आपल्या वचन-काव्यातून 'कपिलसिद्ध मल्लिकार्जुन' व 'योगिनाथ' अशा वचन मुद्रांचावापर केला आहे. त्यांनी अनेक त्रिविधी ( काव्यप्रकार ) लिहिल्या आहेत. त्यांची नावे अष्टावर्ण-त्रिविधी, बसव-स्तोत्र-त्रिविधी, मित्रस्तोत्र-त्रिविधी, इ. इ.- कन्नड साहित्यांत बसवेश्वरांच्या वचनानंतर श्री. सिद्धरामेश्वरांची वचन-रचना खास वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते.

कल्याणहून परतल्यानंतर सोलापुरात त्यांनी खोदावयास घेतलेल्या तलावाच्या मध्यभागी योग-समाधि घेतली. अजूनही ते स्थान जागृत असल्याचा भाविकांना प्रत्यय येतो. दरवर्षी मकरसंक्रांतीला येथे मोठी यात्रा भरते व हजारो भाविक दर्शनासाठी येथे लोटतात.

## ५. धोबी माचय्या

धोबी माचय्या ऊर्फ मडिवाळ माचय्या हे एक असामान्य अशा व्यक्तीमत्त्वाचे शरण होऊन गेले. बुद्धीने ते अत्यंत प्रगल्भ होते; तद्वतच त्यांना अलौकिक अशा शारीरिक सामर्थ्याची देणगी लाभली होती. त्यांच्या शरीरसामर्थ्याबाबत अशी आख्यायिका सांगतात की, बिज्जळ राजाचा एक मदोन्मत्त हत्ती त्यांनी त्याच्या शेपटीस पकडून अडविला होता. म्हणूनच शरणांनी स्थापिलेल्या व संघटित केलेल्या गणाचार दलाचे त्याना सेनापति नेमण्यात आले. जाति-व्यवसायानें ते धोबी होते. अनुभव-मंटपातील चर्चेत ते प्रामुख्याने भाग घेत. मूळचे ते विजापूर जिल्ह्यातील देवर-हिप्परगी येथील ग्रामवासी होते. कल्याणात येऊन त्यांनी वास्तव्य केले व अनेक वचने लिहिली. त्यांच्या सहधर्मचारिणीचे नाव मल्लम्मा असे होते. या

ग्रंथांत त्यांची सुमारे ६० वचने येतात. बेळगाव जिल्ह्यातील मुरगोड येथील डोंगरात प्राण पणास लावून वचन-साहित्याचे रक्षण करता-करता आपला देह ठेवला. ( लिंगैक्य झाले.)

### ६. न्हावी अप्पण्णा

न्हावी अप्पण्णा हे म. बसवेश्वरांचे आप्तकार्यदर्शी होते. म. बसवेश्वरांच्या घरगुती बाबीकडे संपूर्ण लक्ष ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यातआली होती. तथापि त्यांनी आपला कायक धर्म ( न्हाव्याचा ) काटेकोरपणे पाळला. त्यात कसलीही उणीव पडू दिली नाही. त्यांनी अनेक वचने लिहिली आहेत. अनुभव-मंटपाच्या क्रियाशील सभासदामध्ये त्यांचा समावेश होतो. या ग्रंथात त्यांची सुमारे २० एक वचने येतात. त्यांच्या वचनाची मुद्रिका 'बसवप्रिय कूडल चन्नसंगदेवा' अशी आहे.

त्यांच्या पत्नीचे नाव लिंगम्मा असे होते. त्या कल्याणच्याच रहिवासी असाव्यात, असा अंदाज आहे. शिवशरणींमध्ये त्या अग्रगण्य होऊन गेल्या. त्यांचे योगावर विशेष असे प्रभुत्व होते. त्यांनी 'योगांग-त्रिविधी' हा मौलिक ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी शिवयोगाचे विश्लेषण करून या योगाचे गूढमर्म सोप्या व सुगम्य शब्दांत प्रकट केले आहे. वचन-साहित्यांत लिंगम्मांच्या वचनांना बोधपर वचने म्हटले आहे.

बौद्धिक चर्चेत व योग-सामर्थ्यात त्यांनी अनुभव-मंटपातील पुरुष शिवशरणांच्या बरोबरीचे स्थान मिळविले आहे. तेथील शरणांनी त्यांच्या योगनैपुण्याकडे लिंगम्मांना 'योग-आचार्या' अशी पदवी बहाल केली आहे. त्याकाली त्यांनी एक फारच मार्मिक प्रश्न उपस्थित केला आहे. तो असा-'संस्कृत भाषा एवढी समृद्ध आहे- पण त्यांत 'गुरु' या संज्ञेचे स्त्रीलिंगी रूप काय ?त्याला यथार्थ पर्यायी शब्द नेमका कोणता ?'-

### ७. सोड्डुळ बाचरस

सोड्डुळ बाचरस हे मूळचे सौराष्ट्रातील रहिवासी. ते सौराष्ट्र-सोमनाथांचे नितांत भक्त होते. बाचरस यामधील 'अरस' या पदाचा कन्नड भाषेत राजा असा अर्थ होतो. यावरून ते सौराष्ट्रातील एखाद्या राजघराण्याचे असावेत, असे वाटते. कारण बिज्ज्ळ राजांनी आपल्या घोडदळाचा त्यांना प्रमुख नेमले.

कल्याणमध्ये दीर्घकाल वास्तव्य घडल्याने त्यांनी कन्नड भाषा अवगत करून घेतली व कन्नडमध्ये वचने लिहिली. म. बसवेश्वरांच्या शिकवणुकीचा वतत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव पडून ते अनुभव-मंटपाचे सक्रिय सभासद झाले. या ग्रंथात त्यांची पंधरा वचने येतात. 'सोड्डुळ' अशी त्यांची वचनमुद्रा आहे.

### ८. मोळिगी मारय्या

यांचे मूळ नाव महादेव भूपाळ. ते काश्मीराच्या एका राजकुलातील होते. त्यांचे जीवन चित्तवेधक असे आहे. त्यांच्या जीवनकार्यावरून भगवान् बुद्धदेवांची आठवण होते. काश्मीरच्या शैव सांप्रदायिक अशा या राजपुरुषास अचानक वैराग्यप्राप्ति झाली. आपली प्रिय राणी महादेवी व एकुलता एक पुत्र यांचा त्याग करून, बसवेश्वरांचेकडे आकर्षित होऊन ते बसवकल्याणास आले.

अनुक्रमणिका

तेथे लिंगायत धर्माची दीक्षा घेऊन अनुभव-मंटपाचे सभासदत्व पत्करले. शरणधर्माच्या नियमानुसार कायक पाळण्याकरिता ते जंगलातील लाकडे तोडून, त्यांच्या मोळ्या करून, त्या विकून आपला चरितार्थ चालवीत.

कालांतराने आपली राणी महादेवी यांनाही वैराग्यानुभूती झाल्याची खात्री पटवून घेऊन महादेव-भूपाळांनी कल्याणास बोलावून घेतले. 'मोळिगी' म्हणजे मोळी ( लाकडाची ), मारय्या म्हणजे विकणारा. ह्यांच्या कायकावरून त्यांना 'मोळिगी मारय्या' हे नाव पडले. दोघेही आपल्या कायकांत सदैव कार्यरत राहत. दोघानीही कन्नडमध्ये कांही वचने लिहिली आहेत. राजकुलातील या दांपत्याचा वीरशैव-धर्म-प्रसारावर बराच प्रभाव पडल्याचे दिसून येते. या ग्रंथात त्यांची पाच वचने आली आहेत.

## ९. ढोर कक्कय्या

या नावात सूचित झाल्याप्रमाणे ते ढोर जमातीचे होते. बिज्जळ राजा अधिकारावर येण्यापूर्वीपासूनच ते चालुक्यांच्या सैन्यात होते. अनेक युद्धांच्या अनुभवाची शिदोरी त्यांच्या पदरी होती. ते वयोवृद्ध व अनुभवी होते. बिज्जळाच्या सैन्यातील एका तुकडीचे ते प्रमुख होते. त्यांच्या दीर्घ सेवेचा व अनुभवाचा विचार करून बिज्जळ राजांनी त्यांना सेवानिवृत्त केले नाही.मूळचे ते 'माळवा' प्रांताकडील. जाति-निर्मूलन, समानता, स्त्रियोद्धार इ. बसवेश्वरांच्या तत्त्वांचा त्यांचेवर प्रभाव पडून त्यांनी बसवधर्माचा स्वीकार केला व अनुभव-मंटपातील सदस्यत्व पत्करले.

त्यांच्याप्रमाणेच मातंग-चन्नय्या व चांभार-हरळय्या यांनीही लिंगदीक्षा घेऊन बसवधर्माच्या प्रसार-कार्यास वाहून घेतले हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. म. बसवेश्वरांना या वयोवृद्ध व ज्ञानवृद्धवडील शिवशरणाबद्दल अत्यंत आत्मियता होती. या संदर्भात त्यांचे एक सुप्रसिद्ध वचन वाचण्याजोगे आहे.-

बाप आमुचा मातंग चन्नय्या ।
चुलता आमुचा ढोर कक्कया ॥
मला कां ओळखत नाही ? ।
कूडलसंगमदेवा ॥

म. बसवेश्वर या सर्वांच्या घरी प्रसाद-ग्रहण करून भाविकतेने त्याचे सेवन करीत. गणाचार संघटनेबाबत या दलाचे प्रमुख मडिवाळ-माचिदेव कक्कयांचा सल्ला व मार्गदर्शन घेत. कल्याण क्रांतीच्या धुमश्चक्रीसमयी कक्कय्यांनी कारवार जिल्ह्यातील उळवी या ठिकाणी आपल्या तुकडीसमवेत प्रयाण केले. जिल्हा बेळगावातील खानापूर तालुक्याच्या डोंगराळ प्रदेशांत वसलेल्या कक्केरी गावी त्यांची समाधी आहे. लिंगायत धर्मानुयायी हजारो भाविक त्यांच्या समाधिदर्शनास आजही जात असतात. त्यांची चार वचने या ग्रंथात येतात. त्यांची वचन-मुद्रिका 'अभिनव-मल्लिकार्जुन' अशी आहे.

अनुक्रमणिका

## १०. बुरुड केतय्या

बुरुड केतय्या व त्यांची पत्नी सातव्वा हे मूळचे बेळगाव जिल्ह्यातील कित्तूरजवळील बेलूर गावचे. व्यवसायाने ते बुरुड होते. जंगलांतील वेळू आणून त्यापासून टोपली, सुपे, करंड्या इ. वस्तू बनवून ती विकणे व तसेच त्याकाळी लेखनासाठी लागणारी ताडपत्री जंगलांतून आणून तीही विकणे-हा त्यांचा कायक होता. बाराव्या शतकात वीरशैव धर्माचा प्रसार करण्याकरिताठिकठिकाणी संचार करणाऱ्या जंगमाकडून त्या दोघांनी वीरशैव-धर्माची दीक्षा घेतली होती. हे दांपत्य अत्यंत सुशील व आचार-संपन्न असे होते. ते दोघे म. बसवेश्वरांच्या दर्शनार्थ कल्याणला आले व तेथेच स्थायिक बनून राहिले. आपल्या कायक-धर्माचे पालन करीत अनुभव-मंटपातील कार्यात सहभागी होत. केतय्यांची दोन वचने या ग्रथांत येतात. त्यांची वचन-मुद्रिका 'गौरेश्वर-लिंगा' अशी आहे.

## ११. किन्नारी बोम्मय्या

हे मूळचे आंध्र प्रदेशातील पुत्तुर या गावचे रहिवासी. पिढीजात व्यवसायाने ते सोनार ( Gold smith ) होते. तथापि वाद्य-संगीतात त्यांना विशेष रस होता व संगीताकडेच त्यांचा अधिक ओढा होता. खास करून ते 'किन्नरी' (वीणा) वादनात विशेष निपुण होते. एकदा काही घटनांवरून उपरति होऊन त्यांनी कल्याणांत म. बसवेश्वरांकडे धाव घेतली. तेथे त्यांनी वीरशैव-धर्माची दीक्षा घेतली. वीणा-वादनांतील त्यांचे कौशल्य व नैपुण्य पाहून म. बसवेश्वरांनी त्यांना वीणा-वादनाचे शिक्षण देण्याचा कायक नेमून दिला. कल्याणांतील त्रिपुरांतक ( एक तलाव ) या विभागात ते राहत असत.

कायक-धर्म आचरून, स्वावलंबी झाल्यावर म. बसवेश्वरांनी त्यांना अनुभवमंटपातील कार्यात सामील करून घेतले. त्यांची वचन-मुद्रा 'महालिंग त्रिपुरांत देवा' अशी असून, त्यांचेही वचन या ग्रथांत आहे.

## १२. एकांत रामय्या

शिवशरण रामय्यांचे मातापिता आळंदचे रहिवासी होते. त्यांच्या पित्याचे नाव पुरुषोत्तमभट व आईचे नाव सीतादेवी असे होते. सोमेश्वर देवतेच्या कृपा-प्रसादाने या दंपतीस एकुलता एक पुत्र झाला. त्यांनी त्याचे नाव 'राम' असे ठेवले. अय्या हे उपपद गौरवसूचक असे आहे,-जसे-रामराव, रामभाऊ, नरहरपंत इ.- जन्मतःच ते सिद्ध-पुरुष असल्याचे मानले जाते. बालवयापासूनच हे बालक एकांत-प्रिय होते. यावरूनच त्यांना 'एकांत रामय्या' हेनामाभिधान प्राप्त झाले. त्यांच्या जीवनांत अनेक चमत्कारिक घटना घडल्याचा उल्लेख साहित्यांत सापडतो. त्यांनीसुद्धा बसव-कल्याणला येऊन म. बसवेश्वरांचे शिष्यत्व पत्करले होते. शेवटी बसवधर्माची महती पटविण्यासाठी, त्याकाळी त्यांना आपले स्वतःचे बलिदान देणे भाग पडले. ही घटना वीरशैव-पुराण व निरनिराळ्या चरित्रग्रंथांत वर्णिलेली आढळते. एवढेच नव्हे तर, त्यांच्या वीर बलिदानाच्या घटनेचे सविस्तर वर्णन 'अवलूर' येथील शिलालेखांत कोरून ठेवलेले आढळते. याखेरीज आसपासच्या अनेक गावांतून 'एकांत रामय्याबद्दल' लिहिलेले शिलालेख आढळून येतात. त्यांची दोन वचने ग्रंथात येतात. त्यांची वचन-मुद्रिका 'एकांतवीर सोड्डळ' अशी आहे.

अनुक्रमणिका

## १३. शंकर दासमय्या

या शिवशरणांचे मूळ नाव गोविंद-भट्ट होय. विजापूर जिल्ह्यातील इलकल नजीकच्या कंदगल्ल या गावचे ते मूळ रहिवासी होत. कालांतराने त्यांनी रायचूर जिल्ह्यातील लिंगसुगुर तालुक्याच्या नविले या ग्रामी प्रयाण केले व तेथेच स्थायिक झाले. पुढे काही काळाने त्यांनी कल्याणला जाऊन बसवेश्वरांचे दर्शन घेतले व लिंगदीक्षा घेऊन अनुभव-मंटपाचे सदस्य बनले. कायक म्हणून त्यांनी आपला पिढीजात दर्जीचा व्यवसाय कायम ठेवला. वीरशैवांच्या वचन-साहित्यांत ते गौरवान्वित शिवशरण होऊन गेले. त्यांची दोन वचने या ग्रंथात येतात. त्यांची वचन-मुद्रा 'निजगुरू-शंकरदेवा' अशी आहे.

## १४. अक्क- नागम्मा

अक्क-नागम्मा या बसवेश्वरांच्या वडील भगिनी व चन्नबसवेश्वरांच्या मातुःश्री होत. त्यांच्या पतीचे नाव शिवदेव असे होते. त्या कल्याणांत बसवेश्वरासमवेत रहात असत. बाराव्या शतकात होऊन गेलेल्या सामाजिक क्रांतीचे श्रेय जेवढे बसवेश्वरांना आहे; तेवढेच अक्क नागम्मा यांनाही आहे. बसवेश्वरांच्या जीवनाच्या यशाला व सार्थकतेला त्या कारणीभूत ठरल्या. त्या अत्यंत बुद्धिमान् व धैर्यशाली होत्या. स्त्री-दास्यविमोचनाच्या चळवळींतत्या अग्रेसर होत्या. अज्ञान, अंधश्रद्धा, पारंपरिक रूढी इत्यादींच्या त्या कट्टर विरोधक होत्या. स्त्रियांवर चाललेल्या दौर्जन्याचा विरोध करण्याचे सत्र त्यांनी आरंभीले. अनादिकालापासून मनूने लादलेल्या स्त्रियांवरील बंधनांतून मुक्त होण्याच्या सर्वंकष प्रयत्नांस त्यांनी प्रारंभ केला.

स्त्री-पुरुषांत उच्च-नीच असा तारतम्य भाव न ठेवणाऱ्या बसवधर्माच्या त्या अग्रणी होत्या. विदुषी, तत्त्ववेत्त्या, योगसाधनेत पारंगत असणाऱ्या, अध्यात्माच्या अत्युच्च्य कोटीस पोहोचलेल्या कवयित्री, वाग्मी, शिवयोगिनी अशी अनेक स्त्री-रत्ने कल्याणांत एकत्र आली होती. स्त्री-शिक्षणाचा उपक्रम अक्क-नागम्मांनीच चालू केला. त्या जाहीरपणे ठणकावून सांगत, 'जो आपल्या मुलींना शिक्षणाची संधी देत नाही; तोच खऱ्या अर्थाने भवी, म्लेंच्छ, धर्मलंड व काफर होय' त्या गणाचाराच्या अध्वर्यू होत्या.

अशा ह्या शिवशरणी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आपल्या भक्ती, ज्ञान, वैराग्य व बलिदान इत्यादींच्या सामर्थ्याने पुरुषांच्या बरोबरीने सहभाग घेत, याप्रकारे त्यांनी बसवधर्माच्या प्रसाराचा झेंडा हाती घेतला. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे ८५० वर्षांपूर्वी या बंडखोर शिवशरणींनी स्त्री-मुक्तीच्या दिलेल्या घोषणा आजही नित्य-नूतन भासतात. त्यांचे प्रमुख प्रतिपादन व घोषवाक्य म्हणजे, 'जोपर्यंत स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य नाही; तोपर्यंत त्यांच्या मुक्तीला विशेष अर्थ नाही.' म्हणूनच त्यांनी तत्कालीन शिवशरणींना कायक-पालनाची सक्तीच जवळजवळ केली. त्याकाळी एकंदरीत साठ एक शिवशरणींनी वचन-साहित्याची निर्मिती केल्याचे आतापर्यंतच्या संशोधनावरून आढळून आले आहे. या ग्रंथात त्यांची ८ वचने येतात. त्यांची वचन-मुद्रा 'बसवण्ण-प्रिय चन्नसंगमनाथ' अशी आहे.

अनुक्रमणिका

## १५. महायोगिनी अक्कमहादेवी

महायोगिनी अक्कमहादेवींची गणना जगातील महान् गूढ-तत्त्ववेत्यांमध्ये केली जाते. आपल्या भक्ती, ज्ञान व वैराग्याच्या प्रभावाने त्यांनी बाराव्या शतकातील शिवशरणींमध्ये अद्वितीय असे स्थान प्राप्त करवून घेतले आहे.त्यांनी आपल्या असामान्य काव्यप्रतिभेने जागतिक स्तरावरील कवयित्रींमध्ये अढळ स्थान मिळविले आहे, असे आधुनिक विद्वान् जाणकारांचे मत आहे. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षीच देववेड्या होऊन, आपला प्रियकर चन्नमल्लिकार्जुन-देवाचा शोध घेत त्या ठिकठिकाणी भ्रमंती करीत. त्यांच्या खालील वचनांवरून याची प्रचीति येते.

आलिसमूहांनो, आम्रवृक्षांनो, हे चांदण्यांनो,
हे कोकिळांनो, तुम्हास माझी एकचि मागणी,
तुम्ही पाहिला का माझा चन्न-मल्लिकार्जुन धनी ?
पाहिल्यास मज दावा, मम सौभाग्याचा ठेवा ॥
गुलुगुलु गोड बोलणाऱ्या पोपटांनो,
तुम्ही देखिला का, देखिला ?
कुहु कुहु सुस्वर गाणाऱ्या कोकिळांनो,
तुम्ही पाहिला का, पाहिला ?
गुंजारव करीत धावणाऱ्या भ्रमरांनो,
तुम्ही देखिला का, देखिला ?
सरोवरतीरी खेळणाऱ्या हंसांनो
तुम्ही पाहिला का, पाहिला ?
गिरीवर नाचणाऱ्या मयूरांनो,
तुम्ही देखिला का, देखिला ?
मम देव चन्नमल्लिकार्जुन, कोठे आहे,
मला सांगा हो, सांगाल का ?

याप्रकारे आलाप करीत व संचार करीत त्या कल्याणनगरीपर्यंत येऊन पोहोचल्या. काव्यमय अर्थात् रसाळ अशी हजारो वचने त्यांनी कन्नड भाषेत लिहिली आहेत आणि शिवयोगावर ‘योगांग-त्रिविधी’ हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांचे सकल जीवनच एका महाकाव्याचे रूप धारण करून घडत गेले आहे. पाश्चिमात्य विद्वानांनीही त्यांच्या काव्याचा अभ्यास करून, त्यांची गणनाजगातील प्रथम श्रेणीच्या कवयित्रींमध्ये केली आहे. प्रस्तुत लेखिकेने त्यांच्या वचनांचा मराठी अनुवाद केला असून ‘महायोगिनी अक्क महादेवी’ या नावाने ग्रंथरूपाने तो प्रकाशित झाला आहे. जिज्ञासूंनी तो पहावा. शिमोगा जिल्ह्यातील उडुतडी या निसर्गरम्य व रमणीय परिसराच्या कुशीत जन्म घेऊन, सरितेप्रमाणे संचार करीत करीत कल्याणला काही काळ त्या विसावल्या व तेथे सत्य-शिव-सुंदर या मूल्यांची अनुभूती घेऊन शेवटी श्रीशैलपर्वताच्या भव्य, गंभीर अशा नैसर्गिक वातावरणातील कदली बनात विलीन झाल्या. ( निर्बयलू पावल्या ).

त्यांची १७ वचने या ग्रंथात येतात. त्यांची वचन-मुद्रिका ‘चन्न-मल्लिर्जुकान-देवा’ अशी आहे. त्यांचा कथा-संदर्भ या ग्रंथातील १४ व्या भागात येतो.

अनुक्रमणिका

## १६. मुक्तायक्का

अजगण्णा या थोर शिवशरणांच्या या धाकट्या भगिनी होत. त्यांनी सुंदर व गूढ अशी वचने लिहिली आहेत. प्रभुदेवासारख्या महाज्ञान्याबरोबर त्या समर्थपणे चर्चा करतात.त्या अनुभवी शरणी म्हणून ओळखल्या जातात. याबाबतचा कथा-संदर्भ या ग्रंथाच्या द्वितीयोपदेशात ( दुसऱ्या भागात ) येतो. त्यांची सुमारे २१ वचने या ग्रंथात येतात. त्यांची वचन-मुद्रा ( अजगण्णा-तंदे ) 'बाप-अजगण्णा' अशी आहे.

## १७. मरुळ शंकरदेव

हे बसवेश्वरांच्या अनुभव-मंटपातील दासोह कायकात सदैव मग्न असत. कायकावर त्यांची असीम निष्ठा होती. दासोहांतील कायकात सतत १२ वर्षे रत राहूनही ते कोणाच्या नजरेस व लक्षात आले नाहीत. खुद्द बसवेश्वरांनाही ही गोष्ट अज्ञात होती. आपल्या शिवयोगांत व नेमून दिलेल्या कायकात ते सदैव गढलेले असत. त्यांना मुग्ध-शरण म्हणत. मरुळ म्हणजे मुग्ध. यावरून त्यांचे नाव मरुळ शंकरदेव असे पडले आहे. ते गांधार देशातून( म्हणजे आजचे अफगाणिस्तान ) आले होते. या ग्रंथातील भाग ८ व ९ मध्ये त्यांचा उल्लेख येतो.

त्यांनी काही वचने लिहिली असून, त्यावर सूफी सांप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा ठसा उमटलेला आढळून येतो. या ग्रंथात त्यांचे वचन नाही.

या ग्रंथातील चर्चेत ज्यांचा प्रत्यक्ष भाग आहे, त्यांचे व्यक्तिचित्रण दिलेच आहे. परंतु ज्यांचा प्रत्यक्ष भाग नाही; तथापि काही अनुषंगाने ग्रंथात ज्यांच्या नावांचा उल्लेख आलेला आहे अशा व्यक्ती व काही स्थळे, तीर्थ, क्षेत्रे याबद्दलची संक्षिप्त माहिती खाली देण्यात येत आहे.

## अनिमिष

पाण्यातील मासा आपल्या डोळ्यांच्या पापण्या मिटवीत नाही. तद्वतच शिवयोग साधनेत तळहातावरील इष्टलिंगाकडे पापणी न मिटविता एकाग्र दृष्टीने पहात ध्यान करणे याला अनिमिषदृष्टी म्हणतात. या साधनेत पूर्णत्वास पोहोचलेल्या गुरूंचे नाव अनिमिष-देव असे होते. म. बसवेश्वरांनी या अनिमिषदेवाना इष्टलिंग दिले होते. ज्या गुहेत गुरू अनिमिषदेव ही साधना करीत ती गुहा, अजूनही प्रभुदेवांचे गाव बळ्ळेगावी ( जि. शिमोगा ) या ठिकाणी पहावयास मिळते. अशाच एका प्रसंगी गुरू अनिमिषदेव साधनेत रत असताना प्रभुदेव गुहेत शिरले व त्यांनी ते दृष्य पाहिले. कुतुहलाने त्यांनी अनिमिषदेवांच्या हातातील इष्टलिंग आपल्या हाती घेऊन त्याकडे एकाग्र दृष्टीने पाहू लागले. परंतु अनिमिषदेव या साधनेत एवढे समरस झाले होते की, ज्या क्षणी त्यांच्या हातावरील इष्टलिंग दूर झाले त्याक्षणीच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. म्हणजेच त्यांच्या पंचप्राणांचे व इष्टलिंगाचे ऐक्य घडून लिंगांग-सामरस्य साधले होते. प्रभुदेवांनी हाती घेतलेल्या इष्टलिंगामध्ये अनिमिष देवांच्या सर्व योग-शक्ती एकवटल्या होत्या, त्या प्रभुदेवांना लाभल्या. यावरून अनिमिषदेवांना प्रभुदेवांचे गुरू मानतात ; आणि श्री. बसवेश्वरांनी हे लिंगअनिमिषदेवांना दिल्यामुळे पर्यायाने ते प्रभुदेवांच्या गुरूंचे गुरू ठरतात. म्हणूनच प्रभुदेव आपल्या एका वचनात म्हणतात, 'गुरूचा गुरू परमाराध्य गुरू, बसवण्णा.'

अनुक्रमणिका

‘ॐकार गणेश्वर, निर्माय गणेश्वर, अक्षय गणेश्वर, गणेश्वर, गणनाथ’ इ. इ. पदांचा ‘शिवयोग साधनेत सिद्धी पावलेले’ असा अर्थबोध होतो.

**बिज्जळ राजा**

बाराव्या शतकातील कलचूर साम्राज्याचा हा सम्राट होता. कल्याण ( बसवकल्याण-जि. बिदर-कर्नाटक ) ही त्या साम्राज्याची राजधानी होती. म. बसवेश्वर हे या साम्राज्याचे पंतप्रधान होते. सम्राट बिज्जळाला, समस्त पृथ्वीवल्लभ, त्रिभुवनमल्ल, समस्तभुवनाश्रय, परमेश्वर, परमभट्टारक-इ. बिरुदावली होत्या. त्यांच्या साम्राज्याच्या ध्वजावर नंदीचे चिन्ह होते.

**जम्बूद्वीप**

बाराव्या शतकात भारताला जम्बूद्वीप असे म्हणत. परंतु तत्कालीन भारतात आजचे पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका, ब्रह्मदेश, अफगाणिस्तान या सर्वांचा समावेश होता.

**बाण, मयुरा, हलायुध**

हे परम शिवभक्त होते. त्यांनी संस्कृतात शिवस्तोत्रपर गद्य व पद्य वाङ्मय लिहिले आहे.

**निरंहकार, सुज्ञानीदेवी व कामलता ( भाग १ )**

सुज्ञानी व निरहंकार. हे प्रभुदेवांचे आईवडील मानले जातात. त्यांचे वडील नागवासाधिपती होते, असे म्हटले जाते.

कामलता ही प्रभुदेवावर अनुरक्त झालेली राजकन्या. त्यांचेशी विवाह करण्याची तिची कामना होती.

**अजगण्णा**

हे महान् शिवशरण होते व मुक्तायक्कांचे वडील भाऊ होते.

**त्रिपुरांत**

बसवकल्याणातील एका तळ्याचे नाव. शिवाचा वास असणारे स्थान असा याचा अर्थ होतो.

**शिरीयाळ, सिंधुबल्लाळ ( भाग ६ )**

हे तमिळनाडूचे परम शिवभक्त. ६३ पुरातनांमध्ये त्यांची गणना होते.

अनुक्रमणिका

**महामने**

मने म्हणजे घर. महामने म्हणजे महा-गृह. बसवेश्वरांनी चालविलेल्या दासोह व आश्रयस्थानाला महामने असे नाव आहे. तीर्थ, प्रसाद, मठ इत्यादि संन्यासत्वसूचक शब्द कटाक्षाने टाळण्याकरिता म. बसवेश्वरांनी 'मने' हा गृहस्थधर्मसूचक शब्द वापरला आहे. त्यांनी बोधिलेला धर्म संन्यासधर्म नसून गृहस्थधर्म होता.

**गंगेवाळुक**

गंगेच्या काठावरील वाळूकणाच्या संख्येएवढे असा अर्थ-तात्पर्य 'असंख्य'.

'कन्नद मारण्णा, मिंड मल्लीनाथ, कोल शांतय्या, ओलगद केसिराज, खंडने केसिराज'- ही सर्व शिवशरणांची नावे आहेत.

**घट्टिवाळ मुद्दण्णा ( भाग २० )**

हे समकालीन शिवशरण होते. त्यांनीही वचने लिहिली आहेत. त्यांची वचन-मुद्रिका, 'चिक्कय्याप्रिय सिद्धलिंग नाही नाही, अशी आहे.

**नंबीयण्णा**

यांच्याही नावाचा समावेश ६३ पुरातनांमध्ये होतो.

**असंख्यात**

असंख्यात म्हणजे शरण. ( गंगेवाळुक प्रमाणे )

**उळवी**

उळवी हा कारवार जिल्ह्यातील घनदाट जंगलातील मध्यवर्ती असणारा अत्यंत निर्जन प्रदेश. कल्याणक्रांतीच्या रक्तपातानंतर शिवशरणांनी आत्मरक्षणार्थ उळवीला आश्रय घेतला. चन्नबसवण्णा व इतर अनेक शरण-शरणींनी या ठिकाणी समाधि घेतली. वीरशैवांच्या अत्यंत पवित्र क्षेत्रांपैकी एक.

**कदली-वन**

कदली-वन अर्थात् - - कर्दळी-वन केळीचे वन.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्रीशैल क्षेत्रांतील अत्यंत घनदाट जंगलातील दुर्गम्य व निर्जन असे स्थान. प्रभुदेव व अक्कमहादेवी हे आपल्या जीवनाचा शेवटचा काल येथे शिवयोग साधनेत

अनुक्रमणिका

घालवून निर्बयलू पावले. अनेक संत-महंत-सिद्ध पुरुषांच्या जीवन-संदर्भात या कदली-वनाचा आवर्जून उल्लेख असतो. तेव्हा या स्थानास काहीतरी अलौकिक पारमार्थिक महत्त्व किंवा रहस्य असावे, असे दिसते.

**गोरक्ष**

गोरक्ष- ( गोरखनाख ). हे नाथपंथीय 'वज्रदेही सिद्धपुरुष' म्हणून ख्याति पावले होते.

**जगदेव-बम्म-मल**

हे बंधु-द्वय कलचुरी-साम्राज्याचे सुप्रसिद्ध असे मल्ल होते.

जाति-निर्मुलनासाठी चांभार-हरळय्याच्या मुलाशी ब्राह्मण-शिवशरण मधुवय्या यांच्या मुलीचा शरण-शरणींनीं विवाह घडवून आणला. ही घटना म्हणजे कल्याणक्रांतीच्या ज्वाला भडकावणारी ठिणगी ठरली. सनातनी व कर्मठ लोकांना हा विवाह संमत नव्हता. त्यांनी बिज्जळास भडकावले. वर्णसंकराच्या भीतीने त्यांनी व बिज्जळांनी यास विरोध केला. तथापि तो शरणांनी पार पाडला. बिज्जळ राजा क्रोधाने संतप्त झाला व वधू-वरांच्या पित्यांना हत्तीच्या पायाशी फरफटत नेण्याची शिक्षा त्याने ठोठावली. शरणांमधील गणाचार गटाच्या लोकांनी धर्मसंकट-निवारणार्थ धर्मयुद्ध पुकारले. यांत जगदेव-बम्म हेही सामील झाले. मध्यरात्री त्यांनी राजप्रासादात प्रवेश करून-निद्रिस्त बिज्जळ राजाला जागे करून-त्याच्याही हातात खड्ग देऊन द्वंद-युद्धाचे आव्हान दिले व त्याचा वध केला. हरळय्या-मधुवय्या यांच्या शिक्षेपूर्वीच म. बसवेश्वरांनी आपल्या मंत्रीपदाचा त्याग केला होता.

**नुलिय चंदय्या, काळय्या व चौडय्या ( भाग २२ )**

हे तत्कालीन शिवशरण होते.

**शिवगणप्रसादी महादेव**

शिवगणप्रसादी महादेवय्या हे 'शून्य संपादन' या ग्रंथाचे संकलनकार आहेत. त्यांची पूर्वापार माहिती उपलब्ध नाही. फक्त आपल्या नांवाखेरीज त्यांनी स्वतःबद्दलची कसलीच माहिती दिली नाही. ग्रंथाच्या शेवटी, 'शिव. गणप्रसादी महादेव यांनी शिवगणाचे शिवानुभव स्तोत्र द्वारमुखाने निर्मळ दर्पण समर्पित आहे' असे म्हणून, पुढे विनवितात, 'या निरूण क्रमात उणीव भासल्यास तुमच्या परमज्ञानाने सुधारणा करून, या वचनानुभावाची चर्चा करून सुख-संपादन करावे.'

**मंगल महा श्री श्री श्री**

अनुक्रमणिका